# भाषा, साहित्य व शास्त्र

## काही विचार

डॉ. वा. के. लेले



डॉ. बा. के. लेले
[ जन्म 29 मे, 1933 ]

1957 सालापासून विद्यापीठ-स्तरावरील मराठीचे अध्यापक. आजवर तीन विद्यार्थ्यांनी यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधनकार्य पूर्ण करून पीएच्.डी. पदवी संपादन केली आहे. सध्या काशी हिन्दू विश्वविद्यालयात मराठीचे प्राध्यापक व विभाग-प्रमुख.

डॉ. लेले यांच्या 'भारतीय काव्यशास्त्राची उत्क्रान्ति: प्रथम युग' या ग्रन्थाला भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने 1981 साली दहा हजार रुपयांचा राष्ट्रीय पुरस्कार दिला त्याखेरीज त्यांच्या इतर ग्रन्थांना महाराष्ट्र शासन, मुंबई विद्यापीठ, पुणे विद्यापीठ, महाराष्ट्र ग्रन्थोत्तेजक संस्था, इचलकरंजी ट्रस्ट, महानुभाव विश्वभारती, आर्. बी. करन्दीकर्स ट्रस्ट, इत्यादी शासकीय, साहित्यिक व सांस्कृतिक संस्थांची मिळून एकूण नऊ पारितोषिके व सहा पुरस्कार लाभले आहेत.

# भाषा, साहित्य व शास्त्र

## काही विचार

•

प्रा. डॉ. वामन केशव लेले
एम्. ए., पीएच्. डी.
मराठी विभाग प्रमुख
काशी हिन्दू विश्वविद्यालय
वाराणसी

प्रकाशक :
**सौ. मालती वामन लेले**
**6 FF,** जोधपूर कॉलनी,
काशी हिन्दू विश्वविद्यालय,
वाराणसी-221005 (उ. प्र.)

□

मुद्रक :
**भूपेन्द्र मिश्र**
राज प्रिंटिंग वर्क्स
के. 62/71, बुलानाला
वाराणसी-221001 (उ. प्र.)

(C) **प्रा. डॉ. वा. के. लेले**

□

प्रथमावृत्ती :
गुढी पाडवा, 17 मार्च 1991

किंमत शंभर रुपये

प्रस्तुत ग्रंथाच्या प्रकाशनाच्या खर्चापोटी काशी हिन्दू विश्वविद्यालयामार्फत विश्वविद्यालय अनुदान आयोगाकडून 7500/- (सात हजार पाचशे) रुपयांचे प्रकाशन - अनुदान साभार मिळाले.

स्नेहांकित डॉ० मुकुन्दराव कानडे यांस

# निवेदन

प्रस्तुत निबंधसंग्रह वाचकांच्या हाती देताना आनंद होत आहे.

हे आठ निबंध भाषा, साहित्य व शास्त्र ह्या तीन प्रमुख विषयांत विभागलेले आहेत. पैकी पहिल्या विभागातील 'छन्दोबद्ध कवितेची भाषा' हा निबंध 'युग-वाणी' त्रैमासिकात पूर्वी प्रसिद्ध झालेला असून तो येथे आवश्यक त्या दुरुस्त्यांसह पुनर्मुद्रित केला आहे. त्यात कवितेच्या भाषेचे वेगळेपण, तिचे निराळे व्याकरण, तिच्यावर छन्दामुळे होणारे विविध संस्कार व पडणारी विविध बन्धने आणि तिच्या अर्थाचा निर्णय करण्याची साधने इत्यादी मुद्यांचा परामर्श घेतला आहे. 'गद्य साहित्याची भाषा' या दुसऱ्या निबंधात परिवर्तित वाक्यसर्जक व्याकरण हे ललित साहित्याच्या निर्मितीला व विश्लेषणात्मक अभ्यासाला कसे व किती सहायक ठरते व म्हणून आवश्यक आहे, ते दाखवून दिले आहे. हा निबंधही 'डॉ. द. भि. कुळकर्णी अभिनंदन ग्रन्था'त ह्यापूर्वी प्रसिद्ध झाला होता.

'साहित्य' ह्या दुसऱ्या विषय-विभागातील 'साहित्याचे स्वरूप' ह्या निबंधात संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी ज्या साहित्याचे वर्णन व विवेचन केले आहे ते साहित्य विषय, भाषा, अभिव्यक्ति-माध्यम व व्यक्तिचित्रण अशा सर्वच दृष्टींनी अतिव्यापक असून ते व त्याचे लक्षणनिरूपण करणारे शास्त्र पूर्णपणे अखिल भारतीय स्वरूपाचे आहे, हे निदर्शनास आणले आहे. 'ललित साहित्याचे परिष्करण' हा या वर्गातील दुसरा निबंध असून त्यात एखाद्या ललित साहित्यकृतीचा कच्चा खर्डा तयार झाल्यापासून तो तिची अंतिम मुद्रणप्रत तयार होईपर्यंत तिच्यावर कोण-कोणते संस्कार होतात व ते का होतात या विषयाची चर्चा पौरस्त्य काव्यशास्त्रज्ञ व पाश्चात्त्य शैलीशास्त्रज्ञ यांच्या एतद्विषयक मतांची तुलना करीत-करीत केली आहे. वाङ्मयचौर्य या अत्यंत मनोरंजक व तितक्याच महत्त्वाच्या विषयाचे विवेचन प्राचीन साहित्यशास्त्रज्ञांना का करावे लागले, ते विवेचन किती सर्वांगस्पर्शी व सूक्ष्म आहे, त्याच्या अनुरोधाने मध्ययुगीन मराठी साहित्यकृतींचे विश्लेषण व मूल्यांकन करणे कसे शक्य आहे, इत्यादी मुद्यांचा विचार 'साहित्यातील उसनवारी' या निबंधात केला आहे.

शेवटचे तीन निबंध 'प्राचीन शास्त्रीय ग्रन्थांच्या निर्मितीचे व निरूपणाचे शास्त्र' अथवा 'संशोधनात्मक प्रबंधलेखनाची प्राचीन भारतीय पद्धती' ह्या विषयाच्या चर्चेला वाहिलेले आहेत. ह्यांपैकी 'शास्त्रीय ग्रन्थरचनेची प्राचीन पद्धती' ह्या

निबंधाच्या पूर्वार्धात पाणिनि-कौटिल्य-प्रभृती शास्त्रकारांनी कल्पिलेल्या तन्त्रयुक्त्या-प्रभृती शास्त्रोपायांचा केवळ परिचय करून देऊन उत्तरार्धात त्यांनी प्रतिपादिलेल्या शास्त्रीय ग्रन्थांच्या एकोणीस गुणांचे व पंधरा दोषांचे स्वरूप विशद केले आहे.

'शास्त्रीय ग्रन्थरचनेचे मुख्य उपाय' हा सातव्या निबंधाचा विवेच्य विषय आहे. त्यात त्या उपायांची लक्षणे, बिभिन्न संज्ञा, विविध अर्थच्छटा व कार्ये नमूद करून त्यांच्या स्पष्टीकरणासाठी काव्यशास्त्रपर ग्रन्थांतील उदाहरणे उद्धृत केली आहेत. त्या निबंधाच्या अखेरीस असे दर्शवून दिले आहे की, वरील उपायांच्या मदतीने एखाद्या शास्त्रीय विषयावर पद्धतशीर व विद्वन्मान्य ग्रन्थ लिहिता येतो. तसेच हे उपाय एखाद्या शास्त्रीय ग्रन्थाचा प्रतिपाद्य विषय, त्याचे प्रयोजन, तदन्तर्गत तत्त्व-चर्चा, रचनालाघव व भाषासौष्ठव या घटकांच्या चिकित्सक अभ्यासाला उपकारक ठरतात. प्रस्तुत पुस्तकातील शेवटच्या निबंधात कल्पना, आश्रय व ताच्छील्ये या प्राचीन शास्त्रकारांनी प्रत्यक्षपणे निरूपिलेल्या व अनुवृत्ति-विग्रहादी अप्रत्यक्षपणे सुचवलेल्या गौण शास्त्रोपायांचे विवरण करून शेवटी असा निष्कर्ष काढला आहे की, प्राचीन भारतीय विचारवंतांनी सिद्ध केलेली व स्वरचित शास्त्रीय ग्रन्थांत उपयोजिलेली ही ग्रन्थरचना-पद्धती अर्वाचीन शोधप्रबंधपद्धतीशी खचित तुलनीय आहे.

प्रस्तुत पुस्तकात सन्दर्भ टीपा त्या-त्या निबंधाच्या अखेरीस छापल्या आहेत. तसेच सर्वत्र आंतर्राष्ट्रीय अंकांचा वापर केला आहे.

पहिल्या दोन निबंधांच्या पुनर्मुद्रणास अनुक्रमे 'युगवाणी'च्या संपादकांनी व 'समकालीन साहित्य : प्रवृत्ती आणि प्रवाह' या ग्रन्थाच्या प्रकाशकांनी औदार्याने परवानगी दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

राज प्रिंटिंग वर्क्सचे संचालक व सेवक यांनी खूप मेहनत घेऊन प्रस्तुत पुस्तक अल्पावधीत व सुबकपणे छापून दिले, त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

सहृदय वाचकांनी प्रथमतः शुद्धिपत्राधारे ग्रन्थ शुद्ध करून घ्यावा.

मर्मज्ञ अभ्यासक प्रस्तुत निबंधसंग्रहाचे यथोचित स्वागत करतील अशी आशा आहे.

वाराणसी

वा. के. लेले

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| 1. | छन्दोबद्ध कवितेची भाषा | 1-18 |
| 2. | गद्य साहित्याची भाषा | 19-34 |
| 3. | साहित्याचे स्वरूप | 35-59 |
| 4. | ललित साहित्याचे परिष्करण | 60-84 |
| 5. | साहित्यातील उसनवारी | 85-112 |
| 6. | शास्त्रीय ग्रन्थरचनेची प्राचीन पद्धती | 113-134 |
| 7. | शास्त्रीय ग्रन्थरचनेचे मुख्य उपाय | 135-195 |
| 8. | शास्त्रीय ग्रन्थरचनेचे गौण उपाय | 196-231 |

# शुद्धिपत्र

| पृष्ठांक | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| 14 | 12 | obliqultyin | obliquity in |
| 19 | 23 | कुठ्ठे | कुठ्ठे कुठ्ठे |
| 34 | 4 | शिक्षा | शिक्षण |
| 38 | 28 | प्राकृताप्रमाणेच | प्राकृताप्रमाणे |
| 40 | 14 | अस | असा |
| 55 | 30 | घडवते | घडवत |
| 69 | 18 | Herbrt | Herbert |
| 75 | 30 | परिणाम ? | परिणामः ? |
| 93 | 12 | प्रवन्धतश्च | प्रबन्धतश्च |
| 95 | 16 | न | स |
| 111 | 12 | ( ii ) 'पठे | ( iii ) 'पठे |
| 120 | 1 | प्राय | प्रायः |
| 135 | 16 | केलेला | घेतलेला |
| 141 | 10 | भामह् | भामहाने |
| 148 | 8 | शब्दर्थाचे | शब्दार्थाचे |
| 172 | 25 | मत | मतः |
| 202 | शेवटची | शोधन | शोधून |
| 207 | 4 | इत्येकार्था | इत्येकार्थाः |
| 209 | 5 | interdisplinary | interdisciplinary |

# 1. छंदोबद्ध कवितेची भाषा

## [आधुनिक शैलीशास्त्रीय प्रक्रियांनुसार विश्लेषण]

### (1) भाषेचा बहुविध वापर

भाषा ही मनुष्यानेच स्वबुद्धीने व स्वप्रयत्नांनी संपादन केलेली एक शक्ती (faculty) आहे. आपण तिचा वापर अनेक कामांसाठी व अनेक उद्दिष्टांसाठी करतो. उदाहरणार्थ, आपण आपले बाह्य जगाबद्दलचे अनुभव भाषेत व्यक्त करतो; तसेच आपल्या मनात जे खदखदत असते ते आपण भाषेतूनच बोलून दाखवीत असतो आणि आपल्याला सुचलेल्या कल्पनाही भाषेच्या माध्यमातूनच प्रकट होत असतात. आपण एखाद्याशी एखाद्या तात्त्विक प्रश्नासंबंधी वाद भाषेच्या मदतीने घालतो; तर दोन व्यक्ती एकमेकांना भेटल्यावर त्यांच्यामध्ये जे औपचारिक किंवा अनौपचारिक संभाषण होते तेही भाषेच्या मदतीनेच होते. आपण तीच भाषा कथा, कादंबरी, नाटक इत्यादींच्या लेखनासाठीही वापरत असतो. कविता हादेखील एक लेखनप्रकार असल्यामुळे त्याच्या अभिव्यक्तीचे वाहनही भाषाच असते. पण वरीलपैकी प्रत्येक भाषा-वापराचे स्वरूप वेगळे असते, कारण त्याचे प्रयोजन वेगळे असते. कवितेची भाषाही विशिष्ट प्रयोजनमूलक असते, म्हणूनच ती कशी असते हा विचार करण्याजोगा विषय ठरतो. प्रस्तुत लेखात तोच विचार करावयाचा आहे.

### (2) कवितेची भाषा

प्रस्तुत लेखात गण-मात्रा-वृत्तबद्ध कवितेच्याच भाषेची पाहणी करावयाची आहे. वस्तुत: कविता हा जर ललित साहित्याचा एक प्रकार आहे तर 'कवितेची भाषा' असा वेगळा शब्दप्रयोग करण्याचे कारणच काय, असा प्रश्न साहजिकपणेच उत्पन्न होतो. कारण जी ललित साहित्याची भाषा तीच त्याच्या एका प्रकाराची भाषा हे ओघानेच आले. पण प्रत्यक्षातला अनुभव काही वेगळा आहे. तो असा की, ज्या भाषेत कथा किंवा कादंबरी लिहिलेली असते त्या भाषेसारखी कवितेची भाषा काही अंशी असते व काही अंशी नसते. तसेच आपण सर्वसामान्य व्यवहार ज्या भाषेत करतो त्या भाषेशी कवितेची भाषा जुळतीमिळती असूनही पूर्णपणे तशीच नसते. म्हणजेच कवितेची भाषा व्यावहारिक भाषेहून तसेच कथा-कादंबरी-प्रभृती ललित साहित्याच्या इतर प्रकारांच्या भाषेहून वेगळी असतेही आणि नसतेही. ह्या अर्थाने ती वैशिष्टचपूर्ण असते, असे ठरते. ह्या वैशिष्टचाला श्री. मुण्डा यांनी विचलन असे नाव दिले आहे.

ते ह्या बाबतीत म्हणतात: 'Poetic language has been called a deviation from the norm.'[1] अर्थात कवितेची भाषा ही सर्वमान्य नियमबद्ध भाषेपासून काहीशी दूर सरकलेली अशी भाषा असते. आणि हे दूर सरकणे किंवा विचलन हेच कवितेच्या भाषेचे सर्वस्व मानण्यात येते. ह्या विचलनाचे स्वरूप स्पष्टपणे कळावे आणि विवेचन समूर्त व सुबोध व्हावे ह्यासाठी खाली काही छंदोबद्ध पद्ये उतरून घेऊ आणि मग त्यांचे विश्लेषण करू. नंतरचे विवेचन सुकर व्हावे ह्यासाठी पुढे उतरून घेतलेल्या कवितांच्या चरणांना अनुक्रमांक दिले आहेत व ते नंतरच्या चर्चेत उद्धृत केले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| **रामदास :** | सदा सर्वदा योग तूझा घडावा | 1 | (वृत्त : भुजंगप्रयात) |
| | तुझे कारणीं देह माझा पडावा | 2 | |
| | उपेक्षूं नको गूणवंता अनंता | 3 | |
| | रघूनायका मागणें हेंचि आतां | 4 | मनाचे श्लोक |
| **रामदास :** | प्रभाते मनीं राम चिंतीत जावा | 5 | (वृत्त : भुजंगप्रयात) |
| | पुढें वैखरीं राम आदीं वदावा | 6 | |
| | सदाचार हा थोर सोडूं नये तो | 7 | |
| | जनीं तोचि तो मानवीं धन्य होतो | 8 | मनाचे श्लोक |
| **तुकाराम :** | काय जाणें मी पामर । पांडुरंगा तुझा पार | 9 | (वृत्त : अभंग) |
| | धरिलीया धीर । काय एक न करिसी ? | 10 | |
| | उताविळ जालों आधीं । मतिमंद हीनबुद्धी | 11 | |
| | परि तूं कृपानिधी । नाहीं केला अव्हेर | 12 | |
| | तूं देवांचाही देव । अवघ्या ब्रह्मांडाचा जीव | 13 | |
| | आम्हां दासां कींव । कां भाकणें लागली ? | 14 | |
| | तुका म्हणे विश्वंभरा । मी तो पतितचि खरा | 15 | |
| | अन्याय दुसरा । दारीं धरणें बैसलों | 16 | अभंग |
| **मोरोपंत :** | सुसंगति सदा घडो, सुजनवाक्य कानीं पडो | 17 | (वृत्त : पृथ्वी) |
| | कलंक मतिचा झडो, विषय सर्वथा नावडो | 18 | |
| | सदंघ्रिकमळीं दडो, मुरडितां हटानें अडो | 19 | |
| | वियोग घडतां रडो, मन भवच्चरित्रीं जडो. | 20 | केकावली |

**रघुनाथपंडित :**

| | | |
|---|---|---|
| म्हातारी उडतां नयेचि तिजला माता मदीया अशी | 21 | (शार्दूलविक्रीडित) |
| कांता काय वदों नवप्रसव ते साता दिसांची तशी | 22 | नलदमयंती- |
| पाता त्या उभयांस मी मज विधी घातास योजीतसे | 23 | स्वयंवर- |
| हातामाजि नृपा तुझ्या गवसलों आतां करावें कसें | 24 | आख्यान |

**चंद्रशेखर :**

अवयव थिजले, शरीर भिजलें, उठले रोम तृणांकुरसे, 25 (वृत्त:मदिरा)
सद्‌गद कंठीं बुदबुद करितें वचन, घटोन्मुख नीर जसें; 26
अधर थरारे, अश्रुमलिन मुख हो, मतिसंकर मदन्तरीं, 27 गोदागौरव
जय संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे ! भवताप हरी 28

**माधव (मा. के. काटदरे) :**

| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्रा ! तुझे सकल पुरले जाण नवस | 29 | (वृत्त:शिखरिणी) |
| महाराष्ट्रा ! आतां तव न उरले दैन्यदिवस | 30 | |
| महाराष्ट्रा ! आली अविरत तपस्या तव फळा | 31 | |
| महाराष्ट्रा ! होती खचित तव पुण्याइ सबळा | 32 | |

| | | |
|---|---|---|
| **गोविंदाग्रज :** भेट जहाली पहिल्या दिवशीं | 33 | (वृत्त : अंजनीगीत) |
| परिचित नव्हतों कुणी कुणाशीं, | 34 | |
| त्यजुनि तेव्हां परस्परांशीं, | 35 | |
| दूर-दूर बसलों | 36 | |
| दिवस यापरी जातां चार, | 37 | |
| लज्जा उरली नाहीं फार, | 38 | |
| त्रास न होतां मग अनिवार— | 39 | |
| जवळ जरा-आलों. | 40 | |
| यापरि गेले महिने कांहीं | 41 | |
| परिचयास मग पार न राही | 42 | |
| लज्जा नुरतां तिळभर पाहीं— | 43 | |
| सांग कसे बसलों ? | 44 | सांग, कसे बसलों ! |
| प्रेमें सख्या धरिं हिला हृदयीं सदाही | 45 | (वृत्त : वसंततिलका) |
| दे टाकुनी तुडवि ही अथवा पदांहीं | 46 | |
| मातें दशा समचि या गमतात दोन्ही | 47 | |
| माझी मलाच लखलाभ सदा असो ही | 48 | वाचकांस विज्ञापन |

## (3) प्रथम प्रतिक्रिया

वरील पद्ये वाचून एखाद्या वाचकाच्या ज्या तात्कालिक किंवा प्राथमिक प्रतिक्रिया संभवतात त्यांची नोंद करणे उद्‌बोधक ठरेल. अशा वाचकाला सर्वप्रथम एक गोष्ट जाणवते ती अशी की, ह्या पद्यांच्या भाषेला एक विशिष्ट लय आहे, त्यामुळे ही भाषा गाता येते, किंवा विशिष्ट चालीवर म्हणता येते. व्यावहारिक किंवा अन्य ललित प्रकारांतील गद्यभाषा अशी नसते. दुसरी जाणवणारी गोष्ट अशी की, ही भाषा कानांवर संस्कार करते, त्यामुळे ती **गुणगुणावीशी** वाटते. ती गुणगुणण्याचा

**एक आनंद होतो. व्यावहारिक गद्य किंवा कथाकादंबऱ्यांची गद्यभाषा** असा आनंदानुभव देत नाही. जाणवणारी तिसरी गोष्ट अशी की, 1–8, 9–16, 17–20, 21–24, 25–28, 29–32, 33–44 व 45–48 हे चरणसमूह प्रत्येकी **वेगवेगळ्या पद्धतीने म्हणावे किंवा गावे** लागतात. अर्थात ह्या प्रत्येक चरणसमुदायाच्या भाषेची चाल वेगवेगळी आहे. त्यानंतर अभ्यासकाला असे जाणवते की, सदा, सर्वदा, योग, देह, माझा, मागणें, आतां, राम, सदाचार, थोर, अव्हेर असे अनेक **शब्द** आपल्या **परिचयाचे** आहेत तर तूझा, गूणवंता, हेंचि, तोचि, पतितचि, बैसलों, मुरडितां, हातामाजि हे **शब्द** आपल्या **परिचयाच्या** क्रमशः तुझा, गुणवंता, हेंच, तोच, पतितच, बसलों, मुरडतां, हातामध्ये ह्या **शब्दांसारखे** आहेत. अभ्यासकाच्या असेही लक्षात येते की, कारणीं, आदीं, मानवीं, जनीं, कंठीं ही शब्दरूपे 'ध्यानींमनीं'-तील **रूपांसारखी** (समांतर) आहेत; 'आदीं' हे 'आधीं'-सारखे आहे तर 'जालों' म्हणजे 'झालों'. परंतु, सर्वसाधारण अभ्यासकाला वैखरीं, सदंघ्रिकमळीं, भवच्चरित्रीं, मदीया, घटोन्मुख नीर, मतिसंकर, मदन्तरीं, पयोदे, मातें ह्या शब्दांच्या **अर्थांचे आकलन होत नाही.** पण वाचक परि, प्रभाते, म्हणे, वदों, नवप्रसव, दिसांची, हर व यापरी ह्या शब्दांचे अर्थ अनुक्रमे पण, पहाटे, म्हणतो, वदू-सांगू, नुकतीच प्रसूत झालेली, दिवसांची, हरण कर आणि ह्याप्रमाणे असे असावेत असे **अनुमान करतो.** 'देवांचाही देव', 'नाहीं केला अव्हेर', 'अवयव थिजले', 'शरीर भिजलें' अशा काही शब्दखंडांचा किंवा वाक्यांचा अर्थ अभ्यासकाच्या लक्षात येतो, पण 'काय एक न करिसी ?' (10), 'अन्याय दुसरा दारीं धरणें बैसलों' (16), 'सदंघ्रिकमळीं दडो' (19), 'बुदबुद करितें वचन' (26), अशा काही **वाक्यांचा अर्थ** त्याला **कळत नाही.** शिवाय, 'काय जाणें मी' (9), 'मी तो पतितचि खरा' (15), 'म्हातारी उडतां नयेचि तिजला' (21), 'नवप्रसव ते' (22), 'पाता त्या उभयांस मी' (23), 'सकल पुरले' (29), 'तव पुण्याइ सबळा' (32), 'लज्जा नुरतां तिळभर' (43), अशा वाक्यांतील काही शब्दांचे **वेगळेच अर्थ** अभ्यासकाला **जाणवतात व त्यामुळे** अशा वाक्यांच्या खऱ्याखुऱ्या **अर्थाविषयी** त्याच्या मनाचा **गोंधळ** उडतो. म्हणूनच तो शेवटी निर्वाळा देतो की, वरील पद्यांची भाषा आपण नित्याच्या संभाषणात वापरत असलेल्या तसेच कादंबरी-कथादींत वाचत असलेल्या भाषेसारखी काही अंशी आहे, पण बऱ्याच अंशी ती तशी नाही; अर्थात ती वेगळी आहे. सामान्य अभ्यासकाचा हा रास्त निर्णय आता शास्त्रीय दृष्टीने पारखून घेऊ.

## (4) छंदाचा प्रभाव

वरील चरणसमूह वेगवेगळ्या चालींवर म्हणता वा गाता येतात व त्यायोगे आनंद होतो, ही सामान्य अभ्यासकाची आद्य प्रतिक्रिया **योग्यच** आहे. हा अनुभव

छंदामुळे येतो. छंदामुळे वरील पद्यचरणांना लयबद्धता प्राप्त झालेली आहे. वरील 1–4, 17–20, 29–32 इत्यादी चरणसमूहांत ती स्पष्टपणे प्रतीत होते आणि 25–28 मध्ये तर ती इतकी उत्तान आहे की, हे चार चरण म्हणताना मन स्वाभाविकपणे ठेका धरू लागते. प्रत्येक चरणाच्या उच्चारणानंतर आपण क्षणभर थांबतो; शेवटचे अक्षर मोठ्याने उच्चारतो; ह्या पद्धतीने प्रत्येक चरणाचा उच्चार करतो आणि चवथ्या चरणाचे शेवटचे अक्षर हलकेच उच्चारून आपण थांबतो. अशा प्रकारे प्रत्येक चरणात व त्यायोगे समग्र कडव्यात असणारी ही लय मनात अशी एक जाणीव उत्पन्न करते की, समग्र कडवे हे आकार व आशय ह्या दोन्ही दृष्टींनी एक एकसंध एकक (an integrated unit) आहे. साहजिकपणे ज्या कवितेत अनेक कडवी असतात त्या कवितेत अशी अनेक एकसंध एकके असतात. अर्थात जितकी एकके तितके आशयपुंज हे ओघानेच आले. हे आशयपुंज तद्गत लयीमुळे संस्मरणीय बनतात.[2] ह्यावरून असे म्हणता येते की, छंद (गणवृत्त, मात्रावृत्त, इत्यादी) कवितेच्या भाषेला संक्षिप्त व संस्मरणीय स्वरूप देतो.

परंतु, छंदाचा कवितेच्या भाषेवर ह्याहून अधिक व्यापक व सखोल प्रभाव पडत असतो. त्याचे वर्णन श्री. मुण्डा यांनी पुढील शब्दांत केले आहे : "Meter puts a constraint on the spoken language and modifies it to the extent of 'deforming' it to fit its requirements...."[3].... "This process can be studied under three heads : (1) deletions, (2) additions, and (3) substitutions."[4] अर्थात छंदामुळे नित्याच्या भाषेला आळाबांधा पडतो. अक्षरे वा मात्रा यांची संख्या, लघुगुरुक्रम, यती, गण इत्यादी छंदाच्या गरजा भागवण्यासाठी भाषेला आपले निजरूप टाकून काहीसे विरूप व्हावे लागते. भाषेच्या ह्या विरूपतेचा अभ्यास पुढीलप्रमाणे तीन सदरांत करता येतो:—(1) वर्जन किंवा वगळणे, (2) वर्धन किंवा वाढवणे/भर घालणे आणि (3) अन्ययोजन किंवा एकाऐवजी दुसरे वापरणे किंवा योजणे. वर उतरून घेतलेल्या पद्य-चरणांतील भाषेत ह्या तीन प्रक्रियांच्या संदर्भात कोणकोणती परिवर्तने झाली आहेत, ते आता अभ्यासू.

## (5) वर्जन-प्रक्रिया

छंदाच्या कारणाखातर झालेल्या वर्जनांच्या नोंदी खाली चरणशः केल्या असून प्रत्येक स्थळी कशाचे वर्जन झाले आहे ते कंसांत नमूद केले आहे.

चरण 3 : 'हे' (संबोधन), 'तू' (सर्वनाम), 'नकोस' मधील 'स' प्रत्यय; 'मला' (सर्वनाम)

4 : 'हे' (संबोधन), आहे (क्रियापद)

6 : 'वैखरीने' मधील 'ने' (विभक्तिप्रत्यय)

7 : 'आहे' (क्रियापद)

8 : तो आणि तोचि मधील 'आणि' हे (उभयान्वयी अव्यय)

9 : 'जाणणार' चे जाणणें (भविष्यकालीन प्रत्यय), 'हे' (संबोधन)

10 : 'तू' (सर्वनाम)

11 : 'व' (मतिमंद व हीनबुद्धी या शब्दांमध्ये—उभयान्वयी अव्यय) 'उताविळ' पूर्वी, 'शिवाय' (अव्यय)

12 : 'हे' (संबोधन), 'नाहीस–' मधील 'स' (प्रत्यय)

13 : 'आहेस' ( 'देव' नंतरचे क्रियापद), 'आणि' (उभयान्वयी अव्यय), 'आहेस' (जीवनंतरचे क्रियापद).

14 : 'दासांना–' मधील 'ना' (विभक्तिप्रत्यय)

15 : 'हे' (संबोधन); 'आहे' (क्रियापद)

16 : 'आणि' (उभयान्वयी अव्यय), 'हा कीं' (सर्वनाम व अव्यय); 'धरणें' नंतर 'धरून' (अव्यय)

17 : घडो व सुजनवाक्य नंतरचे 'आणि' (अव्यय), 'कानीं'-पूर्वी 'सदा' (अव्यय)

18 : 'विषय'–पूर्वी 'तसेच' (अव्यय)

19 : सुरुवातीलाच 'मन' (नाम), दडो–नंतर 'आणि' (अव्यय)

20 : सुरुवातीलाच 'सदंघ्रिकमळांचा' (सविभक्तिक नाम), रडो–पूर्वी 'मन' (नाम), 'आणि' (अव्यय)

21 : म्हातारी–नंतर 'असून' (ऊन–प्रत्ययान्त), अशी-नंतर 'आहे' (क्रियापद)

22 : तशी–नंतर 'आहे' (क्रियापद).

23 : पाता–नंतर 'आहे' (क्रियापद) मजला–मधील 'ला' (विभक्तिप्रत्यय).

24 : नृपा–पूर्वी 'हे' (संबोधन); गवसलों–नंतर 'आहे' (क्रियापद)

27 : होते–मधील 'ते' (क्रियापदांश), मतिसंकर–नंतर 'होतो' (क्रियापद)

28 : 'हे' (संबोधन); जय–नंतर 'असो' (क्रियापद)

29 : 'हे' (संबोधन); जाण–पूर्वी 'हे तू' (सर्वनामे)

30 : 'हे' (संबोधन); 'नाहीत' क्रियारूपाचा 'आहीत' हा अंश.

31 : 'हे' (संबोधन); फळास–शब्दाचा 'स' हा अंश.

32 : 'हे' (संबोधन); पुण्याई–मधील 'इ' (स्वर)

34 : सुरुवातीसच 'तेव्हा' (अव्यय)

35 : त्यजून–मधील 'उ' कार.

36 : प्रारंभीच 'आपण' (सर्वनाम)

40 : सुरुवातीसच 'आपण' (सर्वनाम).

41 : यापरी–मधील ऱ्हस्व 'इ' (स्वर)

42 : राहिला–मधील 'ला' (क्रियापदांश)

44 : सुरुवातीस 'तू' (सर्वनाम), कसे-पूर्वी 'मग आपण' (अव्यय व सर्वनाम)

45 : प्रेमानें–मधील 'नें' (विभक्तिप्रत्यय); 'हे' (संबोधन)

46 : दे–पूर्वी 'अथवा' (उभयान्वयी अव्यय); हीस–मधील 'स' (विभक्तिप्रत्यय)

वरील नोंदींवरून हे स्पष्ट होते की, कवितेच्या भाषेमध्ये स्वर, नामे, सर्वनामे, क्रियापदे, क्रियाविशेषणे, उभयान्वयी अव्यये, केवलप्रयोगी अव्यये, नाम-सर्वनामांचे विभक्तिप्रत्यय आणि क्रियापदांचे कालदर्शक व अर्थदर्शक प्रत्यय ह्या भाषिक घटकांपैकी कोणत्याही घटकाचे वर्जन संभवते; हे वर्जन त्या त्या पद्यासाठी वापरलेल्या वृत्ताच्या आवश्यकतेने नियमित होत असते. श्री. मुण्डा यांचे ह्या बाबतीतील "The most frequently deleted elements are (a) the simple connectives like 'and', 'that', 'but', (b) relative particles 'then', 'so', (c) gerundives, (d) verbs."[5] हे निरीक्षण वरील निष्कर्षाशी एकंदरीत जुळतेमिळते असले तरी प्रत्येक भाषेच्या प्रकृत्यनुसार ह्याबाबतीत फरक पडत असतो, हे लक्षात ठेवावयास हवे. आता दुसऱ्या म्हणजे वर्धन–प्रक्रियेकडे वळू.

## (6) वर्धन–प्रक्रिया

वरील चरणांमध्ये कोणकोणत्या भाषाघटकांची वृद्धी झाली आहे ते नोंदींच्या आधारे समजून घेऊ :

चरण 1 तूझा-मध्ये एक अधिकचा 'उ' कार; 3 गूणवंता-मध्ये तसाच एक अधिकचा 'उ'; 4 रघूनायका–तील 'रघू' मधला अधिकचा 'उ'; 5 चिंतीत–तील 'ती' मधली 'इ'; 10 धरिल्यास–स्थानीच्या धरिलिया–मधील 'अ'; 15 मी तो ह्यातील अधिकचा तो; 21 तिजला–मधील 'ज'; 22 वदूं ऐवजी वदों (ऊं चा ओं); ती ऐवजी ते ('ई' चा 'ए'), साता–मधील 'आ'; 28 संजीवनि, जननि, पयोदे ह्या संबोधनांचे संख्याधिक्य; हर–ऐवजी हरी (अ ची ई); 29 तूझे–मधील अधिकचा 'उ' कार; 32 सबळ-स्थानी सबळा (अ चा आ); 33 झाली–ऐवजी जहाली (एक अधिकची मात्रा); 36 दूर दूर – एक अधिकचे क्रियाविशेषण; 45 सदाही–मधील 'ही'च्या दोन मात्रा (वृत्तभंगपरिहारार्थ); 46 टाकून–स्थानी वापरलेल्या टाकुनी–तील 'न' ची एक अधिकची मात्रा; 47 मला–स्थानी वापरलेल्या 'माते'–तील एक अधिकची मात्रा.

वरील नोंदींचे विश्लेषण केल्यावर असे जाणवते की, अ ची आ, अ ची ई, ई ची ए व ऊ ची ओ अशी वृद्धी होते; नामे, सर्वनामे, विशेषणे, क्रियापदे, क्रियाविशेषणे व तद्धिते यांच्या स्वरांत व अक्षरांत वाढ होते, तसेच सर्वनामे, क्रियाविशेषणे व संबोधने यांचेही संख्याधिक्य प्रतीत होते. शिवाय, व्यावहारिक व अन्य लेखनप्रकारां-

तील भाषेत न वापरले जाणारे असे काही शब्द वृत्ताची गरज भागवण्यासाठी वापरले जातात. श्री मुण्डा यांनीही पूर्व भारतामधील एका भाषेतील गीतांचे विश्लेषण करून "Special forms of words are used only in poetry."[6] असाच निर्वाळा दिला आहे. पण वरील नोंदींच्या संदर्भात आणखी एका महत्त्वपूर्ण मुद्याचा विचार करणे अगत्याचे आहे. तो मुद्दा असा की, छंदोबद्ध कवितेच्या भाषेचे व्याकरण नित्याच्या व्यावहारिक व इतर गद्य साहित्यिक भाषेच्या व्याकरणाहून काहीसे निराळे असते. नेहमीच्या व साहित्यिक भाषेत तुझा, गुणवंता, रघनायका, तिला, तुझे, टाकून ही रूपे शुद्ध मानून वापरलेली असतात, तर कवितेच्या भाषेत, वरील नोंदींत दाखल केलेली क्रमश: तूझा, गूणवंता, रघूनायका, तिजला, तूझे, टाकुनी अशीही रूपे वापरलेली आढळून येतात. ती रूपे त्या त्या छंदाच्या नियमाचे पालन करण्यासाठी वापरलेली असतात. ती व्यवहारात किंवा अन्य गद्यलेखनात वापरल्यास अशुद्ध मानण्यात येतात, पण कवितेत ती तशी मानण्यात येत नाहीत. म्हणजेच ती कवितेत आक्षेपार्ह ठरत नाहीत. श्री. मुण्डा यांचा एतद्विषयक पुढील अभिप्राय ह्याच निष्कर्षाला दुजोरा देणारा आहे. ते म्हणतात : "Sometimes the language of poetry refers to a different grammatical construction. In other words, to a certain extent, the grammar of language of poetry is different from that of ordinary prose."[7]

वर्धन–प्रक्रियेच्याच आणखी एका स्वरूपाकडेही लक्ष पुरवणे आवश्यक आहे. ते स्वरूप म्हणजे विस्तार किंवा expansion हे होय. उपर्युद्धृत आठव्या चरणात जनीं आणि मानवीं असे दोन एकाच अर्थाचे शब्द वापरलेले आहेत. वस्तुत: त्यांपैकी कोणत्याही एकाच्या वापराने कवीला अभिप्रेत असलेला अर्थ व्यक्त झाला असता. पण कवीने केवळ चरणपूर्तीसाठी मानवीं हा अधिकचा शब्द वापरला आहे. चरण क्रमांक 25 मध्ये जमिनीमधून उगवणाऱ्या तृणांकुराची आणि चरणांक 26 मध्ये घड्यातील पाण्याची उपमा देऊन मुळातला आशय वृद्धिगत केला आहे. ही तिन्ही वर्धनाचीच उदाहरणे आहेत. आता तिसऱ्या म्हणजे अन्ययोजन प्रक्रियेचा परामर्श घेऊ.

### (7) अन्ययोजन-प्रक्रिया

ह्या प्रक्रियेची Reordering (क्रमपरिवर्तन), Replacement (एका शब्दाच्या जागी तत्समानार्थक दुसरा शब्द योजणे) आणि Substitution (विधानाऐवजी प्रश्नात्मक वाक्य, होकारात्मक वाक्याऐवजी नकारात्मक वाक्य, साध्या शब्दप्रयोगा-ऐवजी वाक्प्रचाराचा प्रयोग, रूपकाची योजना, मानुषीकरण, अन्यधर्मारोप इत्यादी एकाऐवजी दुसऱ्याची योजना) अशी तीन स्वरूपे आहेत. ती क्रमश: विचारात घेऊ.

(अ) **क्रमपरिवर्तन :** खालील नोंदींत प्रथमत: क्रमपरिवर्तित रचना (त्या–त्या चरणात प्रत्यक्षात वापरलेली) देऊन नंतर कंसात क्रमबद्ध, स्वाभाविक किंवा

नियमानुसारी (normal) रचना दिली आहे. त्यायोगे फरक कोठे, कोणता व कसा झाला आहे ते त्वरित लक्षात येईल. नोंदींतील आकडे चरणांचे अनुक्रमांक आहेत.

**चरण** 1 योग तूझा घडावा (तुझा योग घडावा); 2 देह माझा पडावा (माझा देह पडावा); 3 उपेक्षूं नको गूणवंता अनंता (गुणवंता अनंता उपेक्षूं नकोस); 7 सदाचार हा थोर सोडूं नये तो (हा थोर, सदाचार, तो सोडूं नयेस); 9 काय जाणें मी पामर (मी पामर काय जाणें); 12 परि तूं कृपानिधी । नाहीं केला अव्हेर (परि कृपानिधी तूं अव्हेर केला नाहीस); 17 सुसंगति सदा घडो (सुसंगति सदा घडो किंवा सदा सुसंगति घडो); सुजनवाक्य कानीं पडो (सुजनवाक्य कानीं पडो किंवा कानीं सुजनवाक्य पडो); 18 कलंक मतिचा झडो (मतिचा कलंक झडो); विषय सर्वथा नावडो (विषय सर्वथा नावडो); 20 मन भवच्चरित्रीं जडो (मन भवच्चरित्रीं जडो); 25 अवयव थिजले, शरीर भिजलें, उठले रोम तृणांकुरसे (अवयव थिजले, शरीर भिजलें, तृणांकुरसे रोम उठले); 26 सद्गद कंठीं बुदबुद करितें वचन (सद्गद कंठीं वचन बुदबुद करितें); 33 भेट जहाली पहिल्या दिवशीं (पहिल्या दिवशीं भेट जहाली); 37 दिवस यापरी जातां चार (यापरी चार दिवस जातां); 38 लज्जा उरली नाहीं फार (फार लज्जा उरली नाहीं); 39 त्रास न होतां मग अनिवार (मग अनिवार त्रास न होतां); 47 मातें दशा समचि या गमतात दोन्ही (या दोन्ही दशा मातें समचि गमतात); 48 माझी मलाच लखलाभ सदा असो ही (ही माझी मलाच सदा लखलाभ असो).

वरील तपशिलावरून हे स्पष्ट होते की, कवीला नित्याच्या स्वाभाविक शब्दानुक्रमात, वृत्ताच्या दृष्टीने, फेरबदल करावा लागला आहे. म्हणजेच एका विशिष्ट शब्दानुक्रमाच्या जागी अन्य शब्दानुक्रम वृत्तसुखार्थ पत्करावा लागला आहे. पण असे करताना वृत्तासाठी म्हणून शब्दांत वा शब्दार्थांत कोणताही फेरबदल करावा लागलेला नाही. क्रमपरिवर्तनाची चर्चा संपविल्यावर आता समानार्थक शब्दयोजनेची चर्चा करू.

## (ब) समानार्थक शब्दयोजना

चरण क्रमांक 6 मध्ये **'पुढें'** शब्द वापरण्यात आला आहे. त्याचे संदर्भानुरूप समानार्थक पर्याय नंतर, मग, पश्चात् इत्यादी आहेत. पण त्यांपैकी कोणताही पर्याय निवडून कवीने तो वापरला असता तर छंदोभंग झाला असता. तो टाळण्यासाठी कवीने पुढे शब्द वापरला आहे. चरणक्रमांक 30 व 31 मध्ये कवीने **तव–चे** समानार्थक क्रमशः तुझे व तुझी हे पर्याय छंदोभंगकारक म्हणून बाजूला सारले आहेत. तोच न्याय चरण क्रमांक 32–मधील 'तव'–लाही लागू आहे. एकंदरीने भाषेतील समानार्थक शब्दांचा वापरही कवीला वृत्तसापेक्षतया करावा लागतो. (वृत्ताचे हे बंधन ध्यानात घेता समानार्थक शब्द पाठ करणे किंवा तशा शब्दांचा

कोश हाताशी असणे काव्य रचणाऱ्याला खचित उपकारक ठरत असेल म्हणूनच संस्कृतातील कविशिक्षापर ग्रंथांत अशा शब्दांच्या याद्या दिलेल्या आढळतात). आता अन्ययोजन ह्या स्वरूपाचे अवलोकन करू.

## (क) अन्ययोजन

चरण 2—'देह माझा पडावा', ह्यात देह पडणे ह्या वाक्प्रचाराचा 'माझे मरण होवो' या सामान्य वाक्यार्थाऐवजी प्रयोग करण्यात आला आहे. त्यायोगे वृत्ताचे बंधन पाळले गेलेच पण शिवाय काव्यकलेची भाषा डौलदार असावी ह्या सर्वसाधारण अपेक्षेचीही पूर्ती झाली.

चरण 13—देवांचाही शब्दाऐवजी सर्वश्रेष्ठ हा चार–अक्षरी शब्द वापरता आला असता. पण **'देवांचाही देव'** या शब्दजोडीमुळे प्रास साधला गेला. प्रास ही एक प्रकारची आवृत्ती आहे आणि ती कवितेचे एक व्यवच्छेदक लक्षण मानण्यात येते ("Repetition is one of the characteristics that distinguishes the language of poetry from the spoken language."[8]). सर्वश्रेष्ठ शब्द वापरला असता तर हे उद्दिष्ट सफल झाले नसते.

चरण क्र. 26 मध्ये **'बुदबुद करितें वचन'** अशी शब्दयोजना आहे. तिच्या योगे **'सद्गद कंठीं'** शब्दांशी अनुप्रास साधला गेला आहे. शिवाय, वाणी पाण्याच्या बुडबुड्यांचा आवाज करते, अशा अन्यधर्मारोपाच्या द्वारे चमत्कृतीही साधली आहे. ती कवितेला कवितापण मिळवून देते (**'न हि चमत्कारविरहितस्य कवेः कवित्वम्, काव्यस्य वा काव्यत्वम् ।'**)[9]

चरण 37 मधील **'चार'** शब्द चार ही संख्या दर्शविणारा नसून थोडे किंवा काही ह्या गौण अर्थाचा आहे. ह्या दोहोंपैकी कोणताही शब्द वापरला असता तर छंदोभंग झाला असता. चार शब्दाने तो टळला. शिवाय 'चार दिवस' ह्या गौणार्थी प्रयोगाने डौलदारपणा साधला.

अन्ययोजनेच्या आणखी एका स्वरूपाकडे येथेच लक्ष वेधणे आवश्यक आहे. ते स्वरूप म्हणजे पूर्वकालीन मराठी भाषेतील शब्दांची रूपे आणि मराठीखेरीज अन्य भाषेतील शब्दांची रूपे वापरणे, हे होय. कोणताही कवी, काही विशिष्ट प्रयोजन नसल्यास, सामान्यपणे स्वकालीन भाषेतच लिहीत असतो. वर उतरून घेतलेली काही पद्ये रामदास, तुकाराम, रघुनाथपंडित, मोरोपंत ह्या पूर्वकालीन कवींची आहेत. त्यांनी वापरलेली भाषा त्यांच्या दृष्टीने स्वकालीन असली तरी आपल्या दृष्टीने ती पूर्वकालीन म्हणजे भिन्नकालीनच आहे. स्वाभाविकपणे त्या भाषेत त्या–त्या काळातील रूपे आलेली आहेत. ती म्हणजे **आदीं** (चरण 6), **जालों** (11), **वदों** (22), ते (22), ही होत. ह्यांखेरीज **प्रभाते** (5), **वैखरीं** (6), **सुसंगति** (17), सुजनवाक्य (17), **सदंघ्रिकमळीं** (19), **भवच्चरित्रीं** (20), **मदीया** (21),

**कांता** (22), **नवप्रसव** (22), **घटोन्मुख** (26), **नीर** (26), **अश्रु-मलिन** (27), **मतिसंकर** (27), **मदन्तरीं** (27), **पयोदे** (28), हे शुद्ध संस्कृत शब्द मराठी शब्दांच्या ऐवजी वापरले आहेत. ह्या प्रवृत्तीला substitution of linguistic elements from neighbouring dialects or other languages[10] असे म्हणतात. ह्याच संदर्भात **परि** (12), **माजि** (24), **जहाली** (33), **यापरी** (37), **यापरि** (41), **धरिं** (45), **पदांहीं** (46), **मातें** (47), **गमतात** (47) हे केवळ कवितेत वापरले जाणारे शब्द आणि **कुणी कुणाशीं** (34) हे प्राधान्याने बोलीभाषेत वापरले जाणारे शब्दही वरील चरणांत आढळून येतात, हे नमूद करणे आवश्यक आहे. ह्या दोन प्रकारच्या शब्दांना substitution of vocabulary unique to poetry and substitution by elements from within the spoken language[11] असे म्हणतात.

येथवर वर्जन, वर्धन व अन्ययोजन या प्रक्रियांचा सोदाहरण विचार केला. परंतु, कवितेच्या भाषेवर, वृत्ताच्या गरजेपोटी, आणखी दोन प्रकारचे संस्कार होत असतात. ते म्हणजे Adjunction (संयोग) व Combination (मिश्रण). या दोन संस्कारांना मिळून संक्षिप्तीकरण असे नाव देता येईल. तेव्हा आता या प्रक्रियेचा वरील चरणसमूहांच्या संदर्भात विचार करू.

## (8) संक्षिप्तीकरण

(अ) **संयोग :** वर उतरून घेतलेल्या चरणांत ह्या प्रकाराची खालील उदाहरणे आढळून येतात, ती चरणानुक्रमे दिली आहेत. कंसामध्ये संयोगाची उकल करून दाखविली आहे.

चरण. 18–**नावडो** (न+आवडो), 21–**नयेचि** (न+येतचि), 23–**योजीतसे** (योजीत+असे), 25–**तृणांकुरसे** (तृणांकुर+असे), 27–**मदन्तरीं** (मद्+अन्तरीं), 43–**नुरतां** (न+उरतां).

ह्या संयोगांवरून नजर फिरविल्यावर असे लक्षात येते की, मदन्तरीं खेरीज बाकीची शब्दरूपे तशीच वापरणे वृत्तदृष्टया अपरिहार्य होते; त्या–त्या शब्दांपुढील कंसांतील शब्दरूपे वापरली असती तर वृत्तभंग झाला असता. मदन्तरींचा संधी एकाच प्रकारचा संभवत असल्यामुळे हे रूप असेच वापरण्यावाचून कवीला गत्यंतर नव्हते. ह्या सर्व संयोगांमुळे वृत्तनिर्बंध पाळला जाऊन शिवाय भाषेत सुटसुटीतपणा आला.

**(ब) मिश्रण :** आता ह्या संस्काराची उदाहरणेही वरील पद्धतीनेच चरणशः अवलोकू. चरण. 11–**मतिमंद** (समास), **हीनबुद्धी** (समास), 17–**सुसंगति** (समास), **सुजनवाक्य** (समास), चरण 17 ते 20 ह्यांत एकूण 8 साधी वाक्ये आहेत.

त्या सर्वांचे मिळून एक दीर्घ संयुक्त वाक्य बनविले आहे आणि तेदेखील सातव्या व आठव्या वाक्यांमध्ये कोणतेही उभयान्वयी अव्यय न वापरता.

च. 19–**सदंघ्रिकमळीं** (समास), 22–**नवप्रसव** (समास), 26–**घटोन्मुख** (समास), 27–**अश्रुमलिन** (समास), **मतिसंकर** (समास), 30–**दैन्यदिवस** (समास).

वरीलपैकी कोणताही सामासिक शब्द विग्रह करून वापरला असता तर वृत्तभंग तर झालाच असता, पण शिवाय पद्यरचनेत शिथिलता किंवा विशविशीतपणा उत्पन्न झाला असता. उदाहरणार्थ, सुजनवाक्य या समासातील श्लिष्टता सुजनांचे वाक्य या समासरहित शब्दजोडीत नाही. एकंदरीने मिश्रण हा संस्कार वृत्तदृष्टचाही आवश्यक असतो आणि काव्य प्रभावसंपन्न बनविण्याच्या दृष्टीनेही आवश्यक असतो.

संयोग व मिश्रण यांचे पर्यवसान कवितेच्या भाषेच्या **संक्षिप्तीकरणात** होते. श्री. मुण्डा यांचाही असाच अभिप्राय आहे. ते म्हणतात : "Poetic language is often called compressed language. It emphasizes conveying message through the minimum usage of language."[12] कोणताही महान कवी कमीत कमी शब्द वापरून जास्तीत जास्त परिणाम साधत असतो; किंबहुना तेच त्याच्या महात्मतेचे गमक असते, ह्या सर्वमान्य गृहीतकाचा संक्षिप्तीकरणाशी निकटचा संबंध आहे.

छंदोबद्ध कवितेच्या भाषेचा येथवर वृत्तसापेक्ष विचार केला. आता वृत्तनिरपेक्ष विचार करू.

## (9) कवितेतील शब्दांचे अर्थ

पूर्वी छेदक 3 मध्ये सामान्य अभ्यासकाच्या प्रथम प्रतिक्रिया नोंदवल्या आहेत. त्यांमध्ये त्या अभ्यासकाला काही शब्दांचे व वाक्यांचे अर्थ कळत नाहीत, काहीं-विषयी तो अंदाज बांधतो, काहींचे वेगळेच अर्थ लावून बुचकळ्यात पडतो तर काहींच्या अर्थांविषयी त्याचा गोंधळ उडालेला असतो, अशा प्रतिक्रिया नमूद केल्या आहेत. कवितेच्या अर्थांविषयी असे प्रकार घडून येतात, ही अनुभवसिद्ध बाब आहे. अशा स्थितीत चिकित्सक किंवा विवेचक-अभ्यासक कविप्रयुक्त शब्दांचे सुसंगत व कवीला प्रायः अभिप्रेत असलेले अर्थ कसे लावतो त्याचाच आता, वर उतरून घेतलेल्या चरणांत वापरलेल्या शब्दांच्या अनुरोधाने, विचार करू.

चरण 1. **योग**–ह्या शब्दाचे कोशात[13] जुळणी, मिलाफ, संबंध, सान्निध्य, स्पर्श, कार्यपद्धती, उपाय, व्यासंग, चित्तवृत्तिनिरोध, ईश्वरी संकल्प, सूत्र इत्यादी अनेक अर्थ दिलेले आढळतात. स्वाभाविकपणे ह्या शब्दाचा प्रयोग बव्हर्थोत्पादक म्हणजेच संदिग्ध ठरतो.[14] चिकित्सक वाचकाला अशा प्रसंगी संयोग–विप्रयोग–प्रभृती अर्थ-नियामके[15] आठवतात व त्यांपैकी प्रकरण (=बोलणाऱ्याचे मनोगत. रामदास

देवाजवळ मागणे मागत आहेत; त्याची भक्ती करण्यासाठी ते आपले प्राण द्यावयास तयार आहेत, हे त्यांचे मनोगत) हे अर्थनियामक प्रस्तुत स्थळी लागू पडत असल्याचे लक्षात येते आणि वाचक योग शब्दाचा सांनिध्य असा अर्थ निश्चित करून चरणार्थ लावतो.

चरण 3 **अनंता**—ह्या शब्दाचेही विष्णू , विष्णूचा शंख, शेषशायी, कृष्ण, शिव, वासुकी इत्यादी अनेक अर्थ आहेत.[16] विवेचक वाचक चौथ्या चरणातील 'रघूनायका' हे संबोधन लक्षात घेऊन त्याच्या सांनिध्यातील प्रस्तुत 'अनंता' शब्दाचा अर्थ 'देवा' असा लावतो.

चरण 4. **रघूनायका**—दिलीप राजाचा मुलगा आणि अजाचा पिता रघू हा सूर्यवंशातील प्रसिद्ध राजा. त्याने तत्कालीन जग जिंकले आणि विश्वजित् यज्ञ केला. त्याच्या ह्या अद्वितीय पराक्रमामुळे व औदार्यामुळे वस्तुतः त्याच्या वंशाला रघुवंश म्हणतात. म्हणजे खरे पाहता तोच रघुनायक. पण त्याला 'देव' मानण्याची प्रथा नाही, तर त्याच्या वंशातील 'रामा'ला देव मानतात व त्याची पूजाअर्चा करतात. प्रस्तुत कवितेचे कर्ते रामदास रामोपासक म्हणून प्रसिद्ध होते. या दोन गोष्टींच्या संस्काराच्या उद्बोधनापासून येथे 'राम' असे अर्थग्रहण होते.

चरण 5-6. **राम**—परशुराम, बलराम व दशरथपुत्र राम हे तीन प्राचीन राम प्रसिद्ध असले तरी त्यांपैकी 'रामा' ला देवत्व लाभून त्याचे भजन, पूजन, चिंतन, नामस्मरण रूढ झाले. अर्थात येथे दशरथपुत्र राम ह्या अर्थाचे ग्रहणच रूढिजन्य औचित्याला धरून आहे, असे ठरते.

चरण 6. **वैखरीं**—परा (=शब्दाचे योगगम्य सूक्ष्म स्वरूप[17]), पश्यन्ती (नाभीमध्ये किंचित उमटणारी वाणी[18]), मध्यमा (हृदयस्थ वाणी[19]) आणि वैखरी (स्पष्ट उमटणारी वाणी[20]) अशी वाणीची चार स्वरूपे आहेत. ज्याअर्थी कवी रामाचा जप करण्याचा उपदेश करीत आहे त्याअर्थी त्याला वैखरी म्हणजे प्रस्फुट वाणी अभिप्रेत आहे हे कार्यकारणभावामुळे वाचकाच्या लक्षात येते व तो वैखरीं म्हणजे वाणीने, प्रकट उच्चाराने असा अर्थ घेतो.

चरण 6. **वदावा**—वदणे ह्या सकर्मक क्रियेचे बोलणे, म्हणणे, कबूल करणे, सांगणे, पाठ केलेले म्हणून दाखवणे इत्यादी अनेक अर्थ आहेत. तदनुसार 'म्हणावा' असा प्रस्तुत शब्दाचा अर्थ घेतल्यास 'राम म्हणावा' असा अशुभ अर्थ प्राप्त होतो. त्याच्या परिहारार्थ 'जपावा' असा अर्थ वाचक ग्रहण करतो. एकंदरीने कवीचा उपदेश असा : मनुष्याने पहाटे उठून मनात प्रभू रामाचे चिंतन करावे, म्हणजेच हृदयस्थ वाणीने रामनाम घ्यावे. त्यानंतर त्याने इतर कोणत्याही देव-देवतांच्या नामस्मरणापूर्वी प्रकट वाणीने रामाचे नामोच्चारण करावे, त्याला सर्वांआधी वंदन करावे आणि मग इतर देवांना वंदन करावे. हा सर्व अर्थ वैखरीं, राम व आधीं ह्या

तीन शब्दांचे सुसंगत अर्थ लावले की ध्यानात येतो. म्हणजेच कवीने तो अर्थ प्रत्यक्ष शब्दांनी सांगितलेला नाही, तर तो सुचविला आहे. या प्रक्रियेचे यथार्थ वर्णन व्ही. प्रकाशम् ह्यांनी पुढील शब्दांत केले आहे : "The poet's creative handling of words may be considered the main source of their suggestive power. This power may emanate from both the sense and the word itself The latter with its phonological and formal properties functions as the source of suggestion. The suggestion may be code-based (semantic) or coder-based (pragmatic) or both. In other words it can be text-based or context-based or both. This suggestive power of language is part of what Jakobson terms the poetic function of language which is the dominant and determinant function of verbal arts. This indirectness or obliquityin literary semantics is reflected in E M. W. Tillyard's comment "all poetry is oblique; there is no direct poetry."[21]

चरण 8. **तोचि**—तोच. सदाचार सोडणारा धन्य म्हणजे कृतार्थ व सुखी होत नाही हे सांगण्यासाठी अर्थात असदाचाऱ्याची व्यावृत्ती करण्यासाठी 'चि' जोडले आहे.

चरण 9. **पार**—ह्या शब्दाचे समुद्रादीचे पैलतीर, पलीकडची बाजू, पराकाष्ठा, शेवट, पूर्णता, वड, पिंपळ इत्यादींच्या मुळाभोवती बांधलेला ओटा इत्यादी अनेक अर्थ कोशात दिलेले आढळतात.[22] पण येथे आपण परमावधीचे **सामर्थ्य हा** ईश्वराचा असाधारण धर्म (त्याला लिंग म्हणतात) असतो हे लक्षात घेऊन पार शब्दाचा 'परमावधीचे सामर्थ्य' असा अर्थ घेतो

चरण 10. **काय एक**—येथे विदग्ध वाचक काय एक → काय अनेक → काय काय → सर्व काही अशी substitutions (ह्यांना 'म्हणजे'–अर्थ म्हणता येईल काय ?) मनातल्या मनात एकामागोमाग एक करीत जातो.

चरण 11. **हीनबुद्धी**—ह्याअगोदरच्या मतिमंद (तीव्र बुद्धीचा अभाव) शब्दाच्या सांनिध्यामुळे वाचक हीनबुद्धी शब्दाचा 'सारासार विचार करण्याची शक्ती नसलेला' असा अर्थ लावतो.

चरण 14. **आम्हां दासां**. या चरणापासून पुढील सूचित अर्थ वाचकाच्या ध्यानात येतो : 'हे सर्वेश्वरा, तुला अखिल ब्रह्मांड प्राणप्रिय आहे. त्यामुळे तू, आम्ही तुझी प्रार्थना करण्यापूर्वीच, आमचा उद्धार करावयास हवा होतास.'

चरण 15. **तुका**—स्वरचित अभंगादीत आपली नाममुद्रा गोवून देण्याच्या प्राचीन साहित्यिकांच्या प्रथेच्या ज्ञानामुळे प्रस्तुत शब्दाचे 'तुकाराम' असे अर्थग्रहण होते.

चरण 16. **अन्याय**—न्यायास सोडून वर्तन, खोटा निकाल, गुन्हा, पाप, अनीतीचे वर्तन असे ह्या शब्दाचे विविध अर्थ कोशात दिलेले आढळतात.[23] पण संदर्भज्ञ वाचक प्रस्तुत शब्दाचा अपराध असा अर्थ ग्रहण करतो. अशा अर्थाला श्री. महापात्र 'mental meaning'[24] म्हणतात.

चरण 17. **सुजनवाक्य**—सज्जन मनुष्याचे वाक्य हा ह्या सामासिक शब्दाचा अर्थ आहे. कोशात वाक्य शब्दाचे भाषण, व्याकरणानुसारी सार्थ शब्दसमुदाय, आज्ञा, नियम, वार्तिक, धर्मशास्त्रीय नियम असे बहुविध[25] अर्थ दिलेले असले तरी आपण कवीचे मनोगत (ह्याला 'प्रकरण'–अर्थनियामक म्हणतात) लक्षात घेऊन वाक्य म्हणजे 'बोलणे' (भाषण) असा अर्थ घेतो.

चरण 18 **विषय**—आपण वरीलप्रमाणेच ह्या शब्दाचा इंद्रियसुख असा अर्थ लावतो.

चरण 21. **अशी**—वस्तुत: हा शब्द असा ह्या विशेषणाचे स्त्रीलिंगी रूप असून ह्याचा अर्थ ह्या प्रकारची किंवा ह्या जातीची असा आहे. पण ह्या पद्याच्या वक्त्याचा (पक्ष्याचा) अभिप्राय लक्षात घेऊन आपण ह्या शब्दाचा 'हतबल' हा unexpressed meaning ग्रहण करतो. आपण चरण 22–मधील '**तशी**' चाही असाच अर्थ घेतो. तेथे पद्यवक्त्याला आपल्या आईची तसेच पत्नीची हतबलता किंवा असहायता व्यक्त करावयाची आहे. नळराजाने पकडल्यामुळे भेदरलेल्या आणि आता आपल्या वृद्ध व असहाय आईचे आणि नवप्रसूत व हतबल पत्नीचे कसे होईल ह्या चिंतेने व्याकुळ झालेल्या पक्ष्याची मूर्ती जर आपण डोळ्यांसमोर आणली (आणि तशी ती सहृदयाच्या डोळ्यांसमोर येतेच) तर आपल्याला **नॉर्मन सिम्स** यांच्या पुढील निरीक्षणात अनुस्यूत असलेले कवितेच्या भाषेचे रहस्य तत्काळ पटते : "Language is a word, then, which we take as a kind of shorthand for a vast array of verbal and gestural, as well as complexly unperceived and inaudible actions associated with speech and its absence."[26]

चरण 30. **तव**—हा शब्द 'दैन्यदिवस'–शी अन्वित करावयाचा असल्यामुळे ह्याचा अर्थ तुझे असा करावयाचा आणि चरण 31 व 32 मधील तव शब्दाचा संबंध क्रमश: तपस्या व पुण्याई ह्या स्त्रीलिंगी शब्दांशी असल्यामुळे त्या प्रत्येक चरणात 'तव'चा अर्थ तुझी असा घ्यावयाचा हे व्याकरणामुळे निश्चित होते.

चरण 38. **लज्जा**—ह्या शब्दाचा 'म्हणजे'–अर्थ संकोच किंवा भीड असा ध्यानात येतो.

चरण 39. **त्रास**—ह्या शब्दाचे गांजणूक, किळस, वीट, अप्रीती, उपद्रव इत्यादी

कोशगत[27] अर्थ न घेता आपण वक्त्याचे मनोगत लक्षात घेऊन अवघडलेपणा, संकोच असा अर्थ घेतो.

चरण 42. **पार**—चरण 9 मध्येही पार शब्द आला आहे (आणि पूर्वी त्याचे विविध अर्थही नमूद केले आहेत). तेथे 'परमावधीचे सामर्थ्य' ह्या अर्थी त्याचे ग्रहण केले आहे. तो अर्थ चरण 42 मध्ये ग्राह्य ठरत नाही. कारण पद्यातील व्यक्तीचा तसे काही बोलण्याचा उद्देश नाही. तो उद्देश (प्रकरण) लक्षात घेऊन वाचक प्रस्तुत स्थळी पार म्हणजे मर्यादा असा अर्थ घेतो.

चरण 44. **सांग कसे बसलों ?**—चरण 36 मध्ये 'एकमेकांपासून दूर (अंतर राखून) बसलों' असे म्हटले, तर चरण–40 मध्ये 'एकमेकांजवळ (अंतर कमी करून) बसलो' असा अभिप्राय व्यक्त केला आहे. हे दोन्ही आशय व चरण 41 ते 43 मधील आशय लक्षात घेऊन "सांग कसे बसलों ?" या चरणाचा 'अंतर संपवून एकमेकांना खेटून बसलो' असा तर्कगत अर्थ आपण ग्रहण करतो. अर्थग्रहणाचा हा मार्ग ध्यानात घेता, "As a matter of fact we cannot communicate a complete fact as a whole to others"[28] हे श्री. महापात्र यांचे मत यथायोग्य वाटते.

चरण 47. **दोन्ही**—हे दशा या नामाचे संख्यावाचक विशेषण आहे. 'दोन्ही दशा' या दोन शब्दांचा सरळ अर्थ दोन अवस्था असा होतो पण कवितेत हिला प्रेमाने हृदयात स्थान दे, अथवा टाकून दे अथवा पायदळी तुडव अशा तीन कृतींचे वर्णन केले आहे. अशा ह्या तीन कृतींच्या वास्तविकपणे जाती दोनच आहेत : (1) हृदयाशी कवटाळणे व (2) तिरस्कार करणे. म्हणूनच कवीने दोन्ही हा शब्द वापरला आहे. कवीचा तो मनोगत अभिप्राय लक्षात घेऊन रसिक वाचक दोन्ही शब्दाचा यथावत अर्थ ग्रहण करतो.

वर कवितेतील शब्दार्थांची जी चिकित्सा केली तिच्यावरून हे लक्षात येते की, कवितेतील शब्दांचे अर्थ नीटपणे समजून घेण्यासाठी वाचकाला अर्थनियामके, समाजाच्या सामाजिक/धार्मिक प्रथा/श्रद्धा, कार्यकारणभाव, समाजाचे शुभाशुभ-विषयक संकेत, व्यंजना, कवीचे मनोगत, साहित्यिक संप्रदाय, पद्यरचनाकालीन व्याकरणाचे नियम, संदर्भ, काव्यातील पात्राचा अभिप्राय, तर्कसंगती इत्यादी विविध घटकांचा आधार घ्यावा लागतो. ह्यांना एका दृष्टीने 'काव्यातील अर्थनिश्चितीचे आश्रय' असे म्हणता येईल.[29]

## (10) निष्कर्ष

छंदोबद्ध कवितेच्या भाषेचे वर विस्ताराने विवेचन केले. त्यामधून हाती येणारे निष्कर्ष असे : (अ) छंदोबद्ध कवितेची भाषा व्यावहारिक आणि गद्य-साहित्यिक भाषेहून वेगळी किंवा विचलित असते; (आ) छंदामुळे कवितेच्या भाषेत गेयता व संस्मरणीयता हे गुण उत्पन्न होतात; (इ) कवितेच्या भाषेचा छंद-सापेक्ष व छंदोनिरपेक्ष

असा उभयविध विचार करावा लागतो; (ई) कवितेच्या भाषेवर वर्जन, वर्धन, विस्तार, क्रमपरिवर्तन, अन्ययोजन, संयोग, मिश्रण इत्यादी संस्कार होतात; हा कवितेच्या भाषेचा छंदःसापेक्ष विचार होय; (उ) छंदोबद्ध कवितेच्या भाषेचे व्याकरणही व्यावहारिक व गद्य-साहित्यिक भाषेच्या व्याकरणाहून काही अंशी निराळे असते; (ऊ) कवितेतील शब्दांच्या अर्थांचा निश्चय करताना संयोग-विप्रयोग-प्रभृती अर्थनियामके, सामाजिक प्रथा/श्रद्धा, साहित्यिक संप्रदाय, शुभाशुभविवेक, व्यंजना, व्याकरणाचे नियम, संदर्भ, तर्कसंगती इत्यादी अनेक बाबींची मदत घ्यावी लागते. ह्यांना छंदोबद्ध कवितेतील शब्दार्थ निर्धारित करण्याची साधने म्हणता येईल. ही साधने वृत्तनिरपेक्ष असतात.

**संदर्भ-टीपा :**

1. R. D. Munda, *The Language of Poetry (LP)*, First, New Delhi, Classical Publishing Company, 1981, p. 1.
2. Ibid., pp. 4, 5. 3. Ibid., Preface. 4. Ibid., p. 26.
5. Ibid., p. 33 6. Ibid., Preface & p. 6. 7. Ibid., p. 6.
8. Ibid., Preface.
9. क्षेमेन्द्र, **कविकण्ठाभरण**, संपा. वा. के. लेले, प्रथम, वाराणसी, मोतीलाल बनारसीदास, 1967, पृ. 76.
10. *LP*, pp. 32, 34 11. Ibid., p. 32 12. Ibid., p. 26.
13. वि. वा. भिडे (मूळ रचनाकार) व रा. शं. वाळिंबे (पुरवणी रचनाकार), **सरस्वती शब्दकोश भा 2 रा** (सश–2), आवृत्ती दुसरी, पुणे, चित्रशाळा प्रेस, 1970, पृ. 1537.
14. संदिग्धता हे काव्याच्या भाषेचे एक वैशिष्टय़ असते. पाहा : "This occasionally leads to ambiguities (which also is a characteristic of poetic language) leading to various interpretations of the same grammatical form." *LP* p. 26.
15. पण्डितराज जगन्नाथ, **रसगंगाधर खंड 1 ला**, अनु. रा. ब. आठवले, पुणे, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ (मराठी शास्त्रीय ग्रंथमंडळ), 1953, पृ. 281–307.
16. पाहा: V. S. Apte, *The Student's Sanskrit-English Dictionary*, Reprint, Delhi, Motilal Banarsidass, 1973, p. 16.
17. सश–2, पृ. 1134. 18. तत्रैव, पृ. 1144.
19. तत्रैव, पृ. 14.5. 20. तत्रैव पृ. 1751.

21. V. Prakasam, *Functional Stylistics Theory and Practice,* First, Patiala, Indian Institute of Language Studies, 1982, pp. 10-11.

22. सश–2 पृ. 1182.

23. वि. वा. भिडे (मूळ रचनाकार) व रा. शं. वाळिंबे (पुरवणी रचनाकार), **सरस्वती शब्दकोश भाग–1 (सश–1)**, आवृत्ती दुसरी, पुणे, चित्रशाळा प्रेस, 1969, पृ. 66.

24. Amulya Ranjan Mohapatra, *The Idea of the Inexpressible A Philosophical Analysis, (IPA),* First, New Delhi, Cosmo Publications, 1984, p. 126.

25. सश–2, पृ. 1675.

26. Norman Simms, *Creative Writing : A Guide to the Perplexed,* First, Allahabad, New Horizon Publication, 1986, p. 15.

27. सश–1, पृ. 908.

28. *IPA,* p. 2.

29. प्रस्तुत लेखात वापरलेल्या Addition, Adjunction इत्यादी पारिभाषिक शब्दांच्या खुलाशासाठी ह्याच लेखसंग्रहातील, 'गद्य साहित्याची भाषा' हा लेख पाहा.

पूर्वप्रसिद्धी : युगवाणी त्रैमासिक, जा-फे-मा 88, पृ. 32–44.

# 2. गद्य साहित्याची भाषा

## [परिवर्तित वाक्यसाधक व्याकरणाच्या निकषांनुसार अध्ययन]

(1) मनुष्य स्वनिर्मित भाषेच्या साहाय्याने विचार करणे, बोलणे, ऐकणे, लिहिणे व वाचणे अशी पाच कार्ये साधतो. पैकी विचार करणे हे इतर चारी कार्यांच्या मुळाशी असते. बोलणे व ऐकणे ही मानवी भाषेची प्रधान कार्ये असून लिहिणे व वाचणे ही सापेक्षतया गौण कार्ये होत. मनुष्य आपल्या विविध मनोगतांच्या प्रकटीकरणासाठी अनेकदा भाषेच्या 'लिखित' रूपाचा अवलंब करतो. ललितलेखन हा भाषेच्या 'लिखित' रूपाचाच एक प्रकार आहे. मनुष्य ललितलेखनाच्या द्वारे आपल्या 'विशिष्ट' मनोगताचे प्रकटीकरण करतो. ह्या लेखनाच्या भाषेची पद्धत सर्वसामान्य व्यवहाराच्या भाषेच्या पद्धतीसारखी असूनही पूर्णपणे तशी नसते, असे रास्तपणे मानण्यात येते. अशा लेखनाच्या भाषाशैलीची पद्धतशीर मीमांसा करण्यास अलीकडच्या काळातील भाषाशास्त्रज्ञांनी सिद्ध केलेल्या परिवर्तित वाक्यसाधक व्याकरणाचे कितीसे साहाय्य होते, त्याचा परामर्श घेणे हे प्रस्तुत लेखाचे प्रयोजन आहे. परिवर्तित वाक्यसाधक व्याकरण हा शब्द 'Transformational Generative Grammar–' साठी वापरला आहे.

(2) शब्दयोजनेची किंवा वाक्यरचनेची विविधता साहित्यिक शैलीच्या मुळाशी असते. किंबहुना ती विविधता हा शैलीच्या संकल्पनेचा गाभा होय. ओहमन (Ohmann) म्हणतो: "The notion of style calls for different ways of expressing the same content."[1] ह्या धारणेचे स्पष्टीकरण दोन-तीन उदाहरणांच्या साह्याने करू.

(अ) 'आम्हाला रंगीत दगड कोठेही मिळाले नाहीत' हा आशय 'आम्हाला रंगीत दगड कोठेच मिळाले नाहीत', 'आम्हाला रंगीत दगड शोधशोधूनही कोठे मिळाले नाहीत', 'कोठे म्हणता कोठेही आम्हाला रंगीत दगड मिळाले नाहीत', 'कुठ्ठे म्हणून आम्हाला रंगीत दगड मिळाले नाहीत', इत्यादी वेगवेगळ्या वाक्यविन्यासांच्या द्वारे व्यक्त करता येतो. ह्यांपैकी अखेरचे वाक्य वगळता बाकीच्या तीन वाक्यांत आपण परिचित शब्दांना सांकेतिक (Conventional) व्याकरणानुसार प्रत्ययादी लावले व त्यांची वाक्यांत योजना केली. परंतु शेवटच्या वाक्यात आपण 'कोठे' ह्या लिखित भाषेतील रूपाचे 'कुठे' हे बोलीतील रूप वापरले. ते जसेच्या तसे न वापरता 'ठ्'ची

द्विरुक्ती करून वापरले. शिवाय, 'कुठ्ठे' ह्या अव्यय-शब्दाचीही द्विरुक्ती केली आणि ते दोन्ही शब्द वाक्यारंभी वापरले. ह्यावरून आपण त्या वाक्यातील शब्दविन्यासात परंपरागत व्याकरणापासून दूर सरकलो. ह्याला शैलीशास्त्राच्या भाषेत विपथन किंवा विचलन (Deviation) असे म्हणतात. आपण हे विचलन अज्ञानामुळे केले नाही तर जाणूनबुजून केले. मूळ वाक्याच्या चार विकल्पांपैकी शेवटचा विकल्पच आपले मनोगत अचूकपणे व्यक्त करू शकेल असे आपल्याला खात्रीपूर्वक वाटल्यामुळे आपण त्याची व त्याचीच निवड (choice) व योजना (use) केली.[2] 'कोठे' ह्या अर्थांशावर आपल्याला जोर द्यावयाचा होता व त्याच्याकडे श्रोत्यांचे लक्ष वेधावयाचे होते. म्हणून आपण त्या शब्दाच्या साधित रूपांना वाक्यारंभी अग्रस्थान दिले. ह्यावरून हे ध्यानात येईल की, आपल्या मनातील 'अर्था'च्या जवळ जाऊन पोचणाऱ्या अनेक शब्द-संघटना (word structures) संभवतात, परंतु त्यांपैकी एखादीच तो (=मनातील) अर्थ पूर्णपणे व्यक्त करणारी असते. अर्थात, अर्थ व वाक्यविन्यास यांचा अतिनिकटचा किंबहुना अविभाज्य संबंध असतो.

(आ) एखाद्या वक्त्याला 'मी लगेच येतो' हा आशय व्यक्त करावयाचा आहे. त्याला 'मी ताबडतोब येतो', 'मी त्वरित येतो', 'मी लगेच येतो', 'आत्ता येतो बघा', 'हा आलोच बघा' इत्यादी अनेक पर्याय उपलब्ध आहेत. ते सगळे अर्थदृष्टचा जवळजवळ सारखेच असले तरी ज्या वक्त्याला आपल्या विनाविलंब आगमनाविषयी श्रोत्यांच्या मनात विश्वास उत्पन्न करावयाचा आहे, त्या वक्त्याला वरीलपैकी अन्तिम दोन पर्याय अर्थदृष्टचा आत्यंतिक समान वाटतात व तो त्या दोहोंपैकी एकाची निवड व योजना करतो. ह्या अन्तिम दोन पर्यायी वाक्यरचनांमध्ये बघा' हे क्रियारूप वाक्यालंकारात्मक आहे. 'मी' हा कर्तृवाचक शब्द दोहोंत अनुक्त आहे. 'हा आलोच बघा' ह्या वाक्यविन्यासात 'मी' ची जागा 'हा' ने घेतली असली तरी 'हा' हे येथे सर्वनाम नसून 'अव्यय' आहे, अर्थात सर्वनामाचा अव्ययार्थी प्रयोग हा प्रचलित प्रयोग नसून विचलित प्रयोग आहे. (तो भाषेच्या अंगवळणी पडलेला असल्यामुळे आता प्रचलितसा दिसतो, एवढेच.) 'आत्ता येतो बघा' या वाक्यरचनेतील 'आत्ता' हे रूप 'आता' ह्या रूढ (normal) रूपाचे विचलित रूप आहे. 'त' द्वित्व पावल्यामुळे 'आता' हा अर्थ उत्कट झाला आहे. ह्यावरून आपले मनोगत अचूकपणे व ग्रहणकर्त्याच्या मनावर कोरले जाईल अशा पद्धतीने व्यक्त करू इच्छिणारा वक्ता किंवा लेखक विविध वाक्यविन्यासांची योग्यायोग्यता मनात पारखतो व त्यांतील योग्यतम (mot juste) वाक्यविन्यास निवडून उच्चारतो किंवा लिहितो. तसे करताना तो काही शब्द जाणूनबुजून वगळतो.

(इ) आता सुनील गावसकर-लिखित पुढील वाक्याचा विचार करू.

'मंदगती गोलंदाज चेंडूफेक करू लागले तेव्हा तर माझं काम पावाला लोणी

लावण्याइतकं सोपं होऊन गेलं'. (सनीडेज पृष्ठ 177)[3] ह्या वाक्यात सुरुवातीचा अध्याहृत असलेला 'जेव्हा' हा अव्यय-शब्द साक्षात अप्रयुक्त आहे. 'मंदगती गोलंदाज चेंडूफेक करू लागले तेव्हा' हे शब्द वाचल्यावर वाचक मनातल्या मनात 'मी चेंडू टोलवू लागलो व (वैयक्तिक व सांघिक) धावसंख्या वाढवू लागलो', असा काहीतरी वाक्याचा उत्तरार्ध रचतो. कारण तो अर्थदृष्टचा पूर्वार्धाशी सुसंगत असल्याची वाचकाची अटकळ असते. परंतु, प्रत्यक्षात लेखकाने लिहिलेल्या उत्तरार्धात चेंडू टोलवण्याचा, धावा काढण्याचा, धावसंख्या सहजपणे व झपाट्याने वाढविण्याचा प्रत्यक्ष उल्लेख मुळीच नाही. तथापि तो सर्व 'अर्थ' एका समर्पक उपमेच्या साह्याने 'सूचित' झाला आहे. इतकेच नव्हे तर तो जणू दृश्यमान (vivid) झाला आहे. 'मी चेंडू टोलवू लागलो व धावसंख्या वाढवू लागलो' ही शब्दरचना वास्तविक अर्थ साक्षात प्रकट करणारी आहे. 'माझं काम पावाला लोणी लावण्याइतकं सोपं होऊन गेलं' ही शब्दरचना तशी म्हणजे वास्तविक अर्थ साक्षात प्रकट करणारी नाही. तरीही लेखकाने तिचीच निवड व योजना केली आहे. अर्थात प्रस्तुत उदाहरणातील विपथन किंवा विचलन ह्यापूर्वीच्या दोन उदाहरणांतील विचलनाहून **अधिक** असून **अधिक स्पष्ट** आहे. 'माझं', 'लावण्याइतकं', 'सोपं' व 'गेलं' ही बोली—भाषेतील रूपे लिखित भाषेत वापरून लेखकाने मागील उदाहरण (अ) मधील विचलनासारखे विचलनही साधले आहेच.

(3) वरील उदाहरणांच्या विवेचनावरून आपल्या असे लक्षात येते की, आपले मनोगत पूर्णपणे व अविकृतपणे व्यक्त करण्यास भाषेतील केवळ शब्द पुरेसे नसतात, तर त्या शब्दांच्या विशिष्ट रचना आवश्यक असतात. म्हणजेच अर्थाची यथावत अभिव्यक्ती शब्दांनी होत नसते तर शब्दसाधित वाक्यांनी होत असते. अर्थात **वाक्य** हे प्रभावी लेखनाच्या किंवा शैलीच्या सिद्धीचे व मीमांसेचे मूलभूत **एकक** आहे. डर्बीशायरने हा मुद्दा पुढील शब्दांत मांडला आहे, तो मननीय आहे :

"Two points deserve to be noticed. The first is that in analysing sentences we discover that our traditional notion of what is meant by the word **word** is not very helpful. The simple truth is that there are not enough words in the language to enable us to say all that we want. Consequently we have to make structures of words inside sentences, and these structures, though comparatively loose in one sense, behave as if they were stabilized elements like those entities we traditionally call words. They behave, that is, as if they were the sorts of things we could go and look up in a dictionary...."[4]

(4) वरील उदाहरणांच्या चर्चेमधून जी दुसरी गोष्ट आपल्या लक्षात येते ती अशी की, एखादा अर्थ प्रभावीपणे व्यक्त करण्यासाठी किंवा तो श्रोत्यांच्या / वाचकांच्या मनावर कोरण्यासाठी वक्त्याला / लेखकाला उपरिवर्णित शब्दशृंखलांचे अनेक पर्याय उपलब्ध असतात. असे किती पर्याय उपलब्ध होऊ शकतात त्याचा बोध आपल्याला परंपरागत व्याकरणावरून होऊ शकत नाही. कारण परंपरागत व्याकरणात शब्द व त्यांना जोडले जाणारे पूर्व व अपर प्रत्यय यांचा विचार केलेला असतो; अशा प्रकारच्या प्रत्ययघटित शब्दांची वाक्यात कोणत्या क्रमाने योजना करावी याचा खुलासा केलेला असतो; नाम–सर्वनाम–क्रिया–प्रभृती शब्दांना लिंग–वचन–विभक्ती–काळ–अर्थ–प्रभृतींचे कोणते प्रत्यय लागतात त्याचे विवरण केलेले असते. आणि कोणते रूप व / वा वाक्य शुद्ध व कोणते अशुद्ध त्याचा उलगडा केलेला असतो. परंतु परंपरागत व्याकरणाने पर्यायी शब्दशृंखला किंवा शब्दसंहती यांच्या सिद्धीवर व संख्येवर प्रकाश पडू शकत नाही. आपल्याला अशा पर्यायी वाक्यविन्यासांची आवश्यकता असते. कारण आपल्याला व विशेषत: ललितलेखकाला कोण, कोठे, केव्हा, काय, कसे इत्यादींचे तपशीलवार वर्णन कर्तव्य असते. **डर्बीशायरने** हा विचार खालील समर्पक शब्दांत मांडला आहे :

"**....**The kinds of things that we want to say are the kinds of things that our society demands, positively, negatively or with assumed neutrality, that we should say. Therefore our society has made for us institutionalized and semi-institutionalized ways of saying whatever we think should be said. We also have to acknowledge a need to embellish the basic forms with modification which helps us to define and clarify, to particularize and to make specific. We need also the management of a great deal of adverbial qualification, for not only do we have to say or be told that things exist and happen, but we also want to say or be told when, where, how and why."[5] वेगळ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे अर्थाच्या प्रभावी अभिव्यक्तीसाठी शब्दबंधाच्या मूलभूत स्वरूपाची किती वैचित्र्यपूर्ण रूपांतरे करता येतात त्याचे आकलन सांकेतिक व्याकरणाने होऊ शकत नाही. म्हणूनच अन्य व्याकरणाची मदत घ्यावी लागते. त्या व्याकरणालाच Transformational Generative Grammar असे म्हणतात.

(5) प्रथमत: Transformational Generative Grammar - च्या काही व्याख्या विचारात घेऊ :

(अ) **डर्बीशायरने** केलेली व्याख्या अशी आहे :

"....A transformational grammar is one which attempts to give a description of a language, or a part of a language, by means of a set of rules. If these rules are applied in a certain fixed order specified in the grammar, then all the grammatical sentences, and only the grammatical sentences, of the language, or part of it, can be generated....."[6]

अर्थात काही नियमांच्या मदतीने एखाद्या भाषेचे किंवा भाषेच्या अंशाचे वर्णन करणाऱ्या व्याकरणाला परिवर्तनात्मक व्याकरण असे म्हणतात. अशा व्याकरणात सांगितलेले नियम विशिष्ट क्रम पाळून लागू केले तर संबंधित भाषेतील सर्व व्याकरणिक वाक्ये व फक्त व्याकरणिक वाक्येच सिद्ध करता येतात.

**(आ) ई. बाक** (E. Bach)कृत व्याख्या "A (generative) grammar of a language is a theory or set of statements which tells us in a formal and explicit way which strings of the basic elements of the language are permitted."[7] अशी आहे. बाकच्या या विधानाचा आशय असा की, परिवर्तित वाक्ये सिद्ध करणारे व्याकरण हा एक सिद्धान्त किंवा विधानसमूह असून तो संबंधित भाषेतील मूलभूत पदांच्या कोणत्या श्रृंखला साधता येतात ते रीतसर व स्पष्टपणे सांगतो.

**(इ) के. डब्ल्यू. हण्ट** (K. W. Hunt) ने ह्या व्याकरणाचे स्पष्टीकरण पुढील शब्दांत केले आहे :

"The newest model in grammar is called generative–transformational. It is called generative because it aims to be as explicit as the mathematical formulae that generate a circle or a straight line on a sheet of graph paper. An explicit formula is capable of being proved true or false. A vague statement is not capable of being proved either true or false. So generative grammar aims to say explicitly many of the things that traditional grammars have said only vaguely. It tries to generate the same sentences that people generate and it tries to generate none of the non-sentences. This grammar is by no means complete, but no other grammar is complete either, as any experienced grammarian knows."[8]

परिवर्तित वाक्यसाधक व्याकरण हे आधुनिकतम व्याकरण होय. ज्याप्रमाणे आपण गणिताच्या एखाद्या सूत्राच्या साह्याने कागदावर वर्तुळ किंवा सरळ रेषा काढू शकतो, त्याप्रमाणेच प्रस्तुतच्या व्याकरणाच्या सुस्पष्ट नियमांप्रमाणे आपल्याला

वाक्ये सिद्ध करता येतात. गणितीय सूत्र किंवा नियम बरोबर की चूक ते पडताळून पाहून निश्चित करता येते; परंतु कोणतेही संदिग्ध विधान अशाप्रकारे पडताळून-पारखून पाहता येत नाही. वस्तुतः हे 'नवीन' व्याकरण परंपरागत व्याकरणांनी सांगितलेल्याच गोष्टी प्रतिपादन करीत असते. फरक इतकाच असतो की, परंपरागत व्याकरण त्या गोष्टी संदिग्धपणे सांगते तर हे नवीन व्याकरण त्या गोष्टी सुविशदपणे सांगते. म्हणून त्याला परिवर्तित वाक्यसाधक व्याकरण म्हणतात. आपण जी वाक्ये साधतो तीच वाक्ये हे नवीन व्याकरणही साधते. किंबहुना, ज्यांना वाक्ये म्हणता येणार नाही अशी वाक्ये हे नवीन व्याकरण मुळीच साधत नाही. हे व्याकरण परिपूर्ण नाही, हे अनुभवी लोक जाणतातच. तात्पर्य असे की, परिवर्तित वाक्यसाधक व्याकरण परिमेय नियमांच्या साह्याने अक्षरशः अपरिमेय वाक्ये सिद्ध करू शकते. तसेच प्रत्यक्षात सिद्ध होणाऱ्या अशा प्रकारच्या अपरिमेय वाक्यांचे बिनचूक विश्लेषण कसे करावयाचे त्याचे दिग्दर्शन करू शकते. शैलीच्या विश्लेषणात्मक अभ्यासाला ह्या व्याकरणाची नितांत उपयुक्तता अतएव आवश्यकता असते. ह्या मुद्याचा विस्तृत विचार **ओह्मनने** केला आहे. तोच थोडक्यात समजून घेऊ.

(6) **ओह्मन** (Ohmann) च्या मते ह्या नवीन व्याकरणाची, शैलीशास्त्राच्या संदर्भात, तीन महत्त्वाची वैशिष्टये आहेत. त्यांपैकी पहिल्या वैशिष्टयाचे निरूपण त्याने पुढील शब्दांत केले आहे :

"In the first place, a large number of transformations are optional."[9]

ह्याचे सोदाहरण स्पष्टीकरण करू या. कोणत्याही वाक्यातील शब्द त्या वाक्याचे घटक असतात. ते विशिष्ट नियमांनी एकमेकांशी संबद्ध असतात. त्यांच्या योगाने सिद्ध होणाऱ्या प्रत्येक वाक्याच्या उत्तान व गूढ संघटना अशा दोन संघटना असतात. हे वैशिष्टय सर्व मानवी भाषांमध्ये समान रूपाने आढळते. **जेकब्ज व रोझेनबॉम** ह्यांनी ह्याबाबतीत म्हटले आहे :

"Perhaps the most important fact about the sentences of human languages is that **all sentences have both a deep structure and a surface structure.**"[10]

उदाहरणार्थ, 'ती नवीन कल्पना मौलिक आहे', ह्या वाक्यातील 'ती नवीन कल्पना' ह्या उत्तान शब्द-संघटनेच्या पोटात 'ती कल्पना नवीन आहे', हे संपूर्ण वाक्य आहे. पण ते 'गूढ' आहे. त्यालाच deep structure म्हणतात. ही गूढ संघटना वाक्याचा अर्थ घोषित करते. ती वाक्याच्या उत्तान संघटनेशी परिवर्तना (transformation)च्या मार्गाने निगडित असते. वरील 'ती कल्पना नवीन आहे' ह्या गूढ संघटनेचे परिवर्तनमार्गे 'ती नवीन कल्पना' असे उत्तान संघटनेत

रूपांतर झाले आहे. **जेकब्ज व रोझेनबॉम** ह्यांनी परिवर्तनाचे लक्षण "Transformations have been defined as those processes which convert deep structures into intermediate and / or surface structures."[11] ह्या शब्दांत केले आहे. परंतु, ह्या परिवर्तनाचे एक महत्त्वाचे वैशिष्टच असे की, परिवर्तित उत्तान संघटनेपासून मूळची गूढ संघटना पुन: प्राप्त करता येते. वरील उदाहरणातील 'ती नवीन कल्पना' ह्या परिवर्तित उत्तान संघटनेपासून 'ती कल्पना नवीन आहे' ही मूळची गूढ संघटना पुन: प्राप्त करता येते. म्हणजेच परिवर्तित शब्दसंघटना मूळचा अर्थ टिकवून धरते; गूढ संघटना पूर्णपणे नष्ट होत नाही. **जेकब्ज व रोझेनबॉम** ह्या वैशिष्टयाचे वर्णन पुढील शब्दांत करतात :

"Transformations are, you should remember, meaning preserving. This implies that the deep structure is not lost, that it is still traceable, or as it is sometimes worded that the deep structure is **recoverable.**[12]

गूढ संघटनेचे किंवा मूळ आशयाचे परिवर्तन अनेक स्वरूपांत संभवते. उदाहरणार्थ, 'मुलगा धावतो' ची 'सडसडीत मुलगा धावतो' (विशेषण-साधित), 'मुलगा वेगाने धावतो' (क्रियाविशेषण-साधित), 'सडसडीत मुलगा वेगाने धावतो' (विशेषण व क्रियाविशेषण-उभयसाधित), 'मुलगा धावत नाही' (नकारात्मक), 'मुलगा धावतो काय ?' (प्रश्नात्मक), अशी अनेक परिवर्तने संभवतात. तसेच 'मुलगा वेगाने धावतो'ची 'मुलगा अतिशय वेगाने धावतो', 'मुलगा द्रुतगतीने धावतो', 'मुलगा चित्त्यासारखा धावतो' अशी विविध रूपान्तरे शक्य आहेत. परंतु, ही परिवर्तने किंवा रूपांतरे वैकल्पिक (optional) आहेत, अनिवार्य (obligatory) नाहीत, हे ह्यांचे पहिले वैशिष्टच होय. हे वैशिष्टच शैली-संकल्पनेच्या दृष्टीने विचारणीय असते.

(7) परिवर्तन शब्दसंघटनेत बदल घडवून आणते हे खरे, परंतु मूळच्या शब्दसंघटनेचा काही भाग अपरिवर्तित राहिलेला असतो. अर्थात, परिवर्तित शब्दसंघटना व मूळची शब्दसंघटना यांतील संबंध परिवर्तनानंतरही जाणवतो. म्हणजेच ह्या परिवर्तन-प्रक्रियेत मूळच्या शब्दसंघटनेचे आमूलाग्र रूपांतर घडून येत नाही, हे परिवर्तनाचे दुसरे वैशिष्टच होय. त्याचे वर्णन **ओहमनने** असे केले आहे :

"A transformation works changes on structure, but normally leaves **Part** of the structure unchanged. And in any case, the new structure bears a precisely specifiable relationship to the old one, a relationship, incidentally, that speakers of the language will intuitively feel."[13]

एखाद्या उदाहरणाने हा मुद्दा स्पष्ट करू. 'मोहनने हे पुस्तक वाचले' ह्या मूळ

वाक्याचे 'मोहनने हे पुस्तक वाचले नाही / वाचलेच नाही' असे किंवा 'मोहनने हे पुस्तक वाचले ?' असे कोणतेही परिवर्तन होऊ शकते; परंतु 'राजेशने केळे खाल्ले नाही', असे रूपांतर होऊ शकत नाही. अर्थात रूपांतरित वाक्यात मूळ वाक्यातील किमान काही घटक शिल्लक राहतात. आणखी एखाद-दोन उदाहरणे विचारात घेऊ. 'त्याला आनंद झाला' ह्या मूळ वाक्याचे 'त्याची कळी खुलली' हे रूपांतर पाहा. तसेच, 'त्याला भीती वाटली'चे 'त्याची पाचावर धारण बसली' हे परिवर्तन पाहा. ह्या दोन्ही परिवर्तनांत मूळ शब्दसंघटनेतील 'तो' ह्या सर्वनामाची सविभक्तिक रूपे तेवढी रूपांतरांत दिसतात, बाकी घटक शिल्लक राहिलेले नाहीत. पण रूपांतरित वाक्ये अर्थदृष्टया मूळच्या वाक्यांसारखीच आहेत. मात्र फरक असा आहे की, रूपांतरित शब्दसंघटनांना शैलीचा स्पर्श झालेला आहे. ही रूपांतरे कोणत्या नियमांनुसार झाली त्याची चर्चा पुढे करूच. तूर्त एवढेच ध्यानात ठेवावयास हवे की, वरीलसारख्या मोठ्या प्रमाणावरील परिवर्तनांची मीमांसा सांकेतिक व्याकरणाने होऊ शकत नाही, ती परिवर्तित वाक्यसाधक व्याकरणानेच होऊ शकते.

(8) शैलीचा विश्लेषणात्मक अभ्यास करणाऱ्याला प्रस्तुत व्याकरणाचा आणखी एका दृष्टीने उपयोग होतो. त्याचे वर्णन **ओहमनने** पुढील शब्दांत केले आहे :

"The third value of a transformational grammar to the analyst of style is its power to explain how complex sentences are generated, and how they are related to simple sentences...."[14]

ह्याचा खुलासा करू. वाक्यांचे केवल, मिश्र, संयुक्त इत्यादी प्रकार सर्वपरिचित आहेत. पैकी संयुक्त वाक्य हे अनेक केवल व / वा मिश्र वाक्यांच्या एकत्रीकरणाने सिद्ध झालेले असते. संयुक्त वाक्याची घटक-वाक्ये परस्परांशी संबद्ध असतात. ती परिवर्तने पावून संयुक्त वाक्याला जन्म देतात. ही परिवर्तने निरनिराळ्या पद्धतींनी व नियमांस धरून होत असतात. ह्या नियमांचे विवरण प्रस्तुत व्याकरणात आढळते. प्रत्येक लेखक ह्या संदर्भात वेगवेगळ्या पद्धतींचा अवलंब करून आपली पृथगात्मता प्रकट करतो. ती त्याच्या शैलीचे वैशिष्ट्य ठरते आणि एकूण शैलीच्या विश्लेषणात्मक अध्ययनास सहायक ठरते. अशा प्रकारे परिवर्तित वाक्य-साधक व्याकरण शैलीच्या अभ्यासाला उपयुक्त व अत्यावश्यक आहे. आता या परिवर्तनप्रसंगी कोणकोणत्या कृती (operations) होतात, ते विचारात घेऊ.

(9) परिवर्तन-प्रक्रियांच्या संख्येच्या बाबतीत शैलीशास्त्रकारांत मतभिन्नता आढळून येते. उदाहरणार्थ, (अ) **जेकब्ज व रोझेनबॉम** यांनी तीन प्रक्रिया मानल्या असून तद्विषयक प्रतिपादन पुढील शब्दांत केले आहे :

"There seem to be at least three different kinds of elementary

transformations which can be used in the formulation of a particular transformation :

1. Adjunction. 2. Substitution. 3. Deletion.

Within these transformation types there are probably subtypes."[15]

अर्थात वरील दोन विचारवंतांच्या मते कोणत्याही एखाद्या मूळ शब्द-संघटनेचे परिवर्तन होताना संक्षिप्तीकरण, अन्यसमावेशन व वर्जन या तीन प्रक्रियांपैकी एक प्रक्रिया अवलंबिली जात असते.

(आ) **ओह्मनच्या** मते याबाबतीत चार प्रक्रिया संभवतात. त्या अशा :

"There are four possibilities : addition, deletion, reordering, and combination."[16]

अर्थात 1. भर घालणे, 2. वगळणे, 3. फेरजुळणी करणे व 4. जोडणे या चार प्रक्रियांच्या साह्याने परिवर्तने साधता येतात, अशी **ओह्मनची** विचारसरणी आहे. अर्थात त्याने केवळ प्रक्रियांच्या संख्येत भर घातली आहे असे नव्हे तर जेकब्ज-रोझेनबॉम-कल्पित प्रक्रियांहून स्वरूपदृष्टचा वेगळ्या प्रक्रियाही कल्पिल्या आहेत.

(इ) **बाकने** या संदर्भात असे विधान केले आहे :

"A rule of grammar may perform any of the following operations.

deletion : $a+b \rightarrow b$ (or $a \rightarrow$ null)

replacement : $a \rightarrow b$

expansion : $a \rightarrow b+c$

reduction : $a+b \rightarrow c$

addition : $a \rightarrow a+b$

permutation : $a+b \rightarrow b+a$[17]

बाकच्या मते वगळणे, एकाच्या जागी दुसऱ्याची योजना करणे, विस्तार करणे, संक्षेप करणे, भर घालणे व फेरजुळणी करणे अशा एकूण सहा प्रक्रिया शक्य आहेत.

वरील तीन याद्यांतील सर्वसमान (common) प्रक्रिया वगळता उरलेल्यांची इंग्रजी आद्याक्षरानुसार सूची खालीलप्रमाणे सिद्ध होते :

(क) Addition, (ख) Adjunction, (ग) Combination, (घ) Deletion, (ङ) Expansion, (च) Permutation, (छ) Reduction, (ज) Reordering, (झ) Replacement, व (ञ) Substitution.

आता यांचा क्रमशः सोदाहरण परिचय करून घेऊ.

(10) **addition** = भर घालणे, वाढवणे. या प्रक्रियेची विविध रूपे येणेप्रमाणे :

(अ) **ध्वनिविचलित रूपे**—कधी, कुठे, कुणी, असा, तसे, खलास इत्यादी शब्दांची अनुक्रमे कध्धी, कुण्णी, अस्सा, तस्से, खल्लास, अशी 'द्वित्व'युक्त रूपे.

(आ) **क्रियांची कालदर्शक रूपे**—'मी जातो' चे 'मी जात आहे', इत्यादी.

(इ) **एकाधिक कर्ते**—तो व ती जातात, तो व ती जात आहेत इ.

(ई) **आवृत्ति**(repetition)**युक्त शब्दसंघटना**—'तो वाट सापडेपर्यंत भटक भटक भटकला होता'. (**करुणाष्टक**[18] पृ. 93); 'बिशननं उरलेल्या फलंदाजांना चकवत चकवत बाद केले'. (**सनीडेज** पृ. 226); 'त्यामुळे कण-कण, कवडी—कवडी साचवील तोच खरा मंत्री असतो'. (**हितोपदेश,**[19] पृ. 91)

(उ) **विशेषणांचे संख्याधिक्य**—जो विद्यार्थी चपळ, स्वतंत्र, शोधकबुद्धीचा, उपक्रमशील व उत्साही असतो तो खरा आदर्श विद्यार्थी होय.

(ऊ) **क्रियाविशेषणांचे संख्याधिक्य**—'पतीने आपल्या पत्नीला इतक्या प्रेमाने, कौतुकाने, आनंदाने, जिव्हाळ्याने, रसिकतेने आणि कृतज्ञतेने केलेले असे हृदयंगम लिखाण मराठी वाङ्मयात आम्ही पूर्वी वाचलेले नव्हते'. (**गुद्दे आणि गुदगुल्या**[20], पृ. 100)

(11) **Adjunction**–जवळ आणून जोडणे, संक्षित करणे. प्रक्रियेची स्वरूपे अशी :

(अ) **विलीनीकरण**—इंग्रजीत do not, does not, is not, must not, I will इत्यादींची क्रमशः don't, doesn't, isn't, mustn't, I'll अशी संक्षिप्त रूपे होतात. मराठीतही बोलीभाषेत व बोलीचा आभास कर्तव्य असता लेखी भाषेत, 'करीत आहे', 'नाही आहे', 'आला आहे' इत्यादी शब्दयुग्मे जोडून त्यांची अनुक्रमे 'करताहेत', 'नाहीये', 'आलाय्' अशी संक्षिप्त रूपांतरे करण्यात येतात. उदाहरणार्थ पाहा :

'आता तू पुढं काय करणारेस ?' (**स्वगत**[21] पृ. 173)

'तरी तो सुका तो सुकाच राहिलाय'. (**आम्ही मराठी माणसं**[22] पृ. 45)

'तू पण बदललायस'. ('रुक्मिणी', **अक्षर दिवाळी**[23] 1980 पृ. 41)

(आ) **श्लेष किंवा शाब्दिक कोटचा**

मूळ वाक्ये–आम्ही ज्ञानार्जनासाठी जमिनीवर बैठक मारून बसत असू + आमच्या ज्ञानाला भक्कम अधिष्ठान असे → आमच्या ज्ञानार्जनाला बैठक असे (**वाटेवरल्या सावल्या**[24] पृ. 17) या रूपांतरात 'बैठक' शब्दावर श्लेष आहे, हे उघड आहे.

(12) **Combination**–'मिश्रण' प्रक्रियेची स्वरूपे खालीलप्रमाणे :

(अ) **नामधातू**—उपदेश देणे → उपदेशणे, अनुवाद करणे → अनुवादणे, उत्तर देणे → उत्तरणे, फूल येणे → फुलणे, उजेड फाकणे → उजाडणे इ.

(आ) **समास**—पाण + वाट → पाणवाट, वाट + गाव → वाटगाव, जळ+ कात्री → जळकात्री, गदळ + गाळ → गदळगाळ, वध + वाद → वधवाद, पिशवी + पती → पिशवीपती, पाठ + भित → पाठभित इ.

(इ) **एकाधिक केवल वाक्ये 'आणि' ने जोडणे**—सुरेशने कविता म्हटली+रमेशने कविता म्हटली → सुरेश आणि रमेश यांनी कविता म्हटली.

(ई) **'आणि' वगळून संयुक्त किंवा मिश्र वाक्य बनविणे**—उदा०—दारावरची घंटा वाजली. + मी दार उघडले. + तो आत आला. → दारावरची घंटा वाजताच मी दार उघडले तेव्हा तो आत आला.

(13) **Deletion**—वर्जन, वगळणे. प्रक्रियेची विविध रूपे अशी :

(अ) **शब्दवगळ**—मोहनला क्रिकेट खेळता येते आणि वसंतालाही क्रिकेट खेळता येते → मोहनला क्रिकेट खेळता येते आणि वसंतालाही येते. (या रूपांतरात 'क्रिकेट खेळता' हे शब्द 'वसंतालाही' शब्दानंतर वगळले आहेत.)

(आ) **आज्ञार्थक वाक्ये**—तू खाली बस → खाली बस. तुम्ही विचार करा → विचार करा. या परिवर्तनांत तू, तुम्ही ही सर्वनामे वगळलेली आहेत.

(इ) **प्रश्नोत्तरात संपूर्ण वाक्याचे वर्जन**—उदाहरणार्थ,

प्रश्न—सगळे उतारू चढले ?

उत्तर—हां / हो / होय ('सगळे उतारू चढले' हे संपूर्ण वाक्य वगळले.)

प्रश्न—हे पुस्तक वाचले का ?

उत्तर—नाही. ( 'हे पुस्तक वाचले नाही' हे संपूर्ण वाक्य वगळले.)

(ई) **सूचना-फलकांतील वाक्यवर्जन**—उदाहरणार्थ,

बस थांबवा ('येथे तुम्ही' हे सुरुवातीचे शब्द वगळले.)

स्टेशनकडे ('हा रस्ता स्टेशनकडे जातो'.)

पुणे 50 कि. मी. (= येथून पुणे 50 कि. मी. अंतरावर आहे)

(14) **Expansion**—विस्तार. ह्या प्रक्रियेची स्वरूपे खालीलप्रमाणे—

(अ) **विधेयविस्तार**—तो घरी गेला → तो काल गाडीत बसून घरी गेला.

(आ) **वेगळी वाक्ये करणे**—राजेशच्या गैरवर्तनामुळे त्याच्या आई-वडिलांना काळजी वाटत असे → राजेश गैरवर्तन करीत असे. त्याच्या आईवडिलांना काळजी वाटत असे.

(इ) **उपमा योजणे**—त्याने कमालीच्या बेफिकिरीने माझे तोंड रंगवले.→'गाडगे रंगवावे इतक्या बेफिकिरीने माझे तोंड रंगवून टाकले.' (**वाटेवरल्या सावल्या**, उ. नि. पृ. 69.)

तो ग्रामोफोनच्या तबकड्या भराभर तयार करून फेकायचा → 'सराईत

सुगरणीने भराभर पुऱ्या तळून टाकाव्या तशा तो ग्रामोफोनच्या तबकड्या तयार करून फेकायचा.' (**माझ्या जीवनाची सरगम** [25] पृ. 80)

(ई) **साहित्यिक संदर्भोल्लेख**—माझ्या आईने स्वतःच्या वाट्याला आलेल्या अर्ध्या इस्टेटीचा त्याग केला → 'माझी आई काही पंडिता नव्हती, सर्वनाशही ओढवलेला नव्हता. तरी आपल्या वाट्याला आलेली ही अर्धी इस्टेट तिनं आनंदानं त्यजिली'. (**करुणाष्टक** पृ. 114)

या परिवर्तनात 'सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः ।'

या पंचतंत्रातील (5. 42) श्लोकार्धाचा प्रच्छन्न उल्लेख आहे.

(उ) **अवतरणे**

"इतर वेळी ओव्या, श्लोक, अभंग, आर्या मुखी घोळवीत ते घरातल्या घरात फिरत असत.

"दयाब्द वळशील तू तरि न चातका सेवका ।
उणे किमपि, भाविका उबगशील तू देव का ।"

[**सारे प्रवासी घडीचे**[26] पृ. 23]

बागाइतकर मास्तर नावाच्या पात्राच्या तोंडी लेखकाने मोरोपंतांच्या केकावली नामक प्रसिद्ध भक्तिकाव्याच्या विसाव्या श्लोकाचे पहिले दोन चरण घातले आहेत. अशा प्रकारे मूळ आशय विस्तार पावला आहे.

(15) **Permutation**—रचनावैविध्य. प्रक्रियेची विविध रूपे पाहा :

(अ) **समानांतर शब्दसंघटना :**

**अर्थसाम्य :** पुणतांब्यात जाणता वैद्यही नव्हता आणि शहाणा डॉक्टरही नव्हता →'पुणतांब्यात ना जाणता वैद्य, ना शहाणा डॉक्टर'. (**माझ्या जीवनाची सरगम,** उ. नि. पृ. 48)

**अर्थवैषम्य**

इमारत बांधणारा जमिनीपासून वर जात असतो तर खड्डा खोदणारा जमिनीच्या खाली जात असतो → 'इमारत बांधत असतो तो वर चढत असतो, खड्डा खोदत असतो तो खाली जात असतो.' (**हितोपदेश,** 1 पृ. 75)

(16) **Reduction**—घटवणे, कमी / उणे करणे. प्रक्रियेची स्वरूपे अशी :

(अ) **शब्दसंख्या कमी करणे**

( i ) वर्णन करता येणार नाही इतका आंबा गोड आहे. → आंब्याची गोडी वर्णनातीत आहे **किंवा** आंबा अतिशय गोड आहे.

( ii ) तो पक्का खोटारडा आहे, हे सत्य मला ठाऊक आहे → तो पक्का खोटारडा आहे.

( iii ) जो मनुष्य फाटकाशी उभा होता त्याने गोंधळ माजवला→फाटकाशी उभ्या असलेल्या मनुष्याने गोंधळ माजवला.

( iv ) ह्या झाडाला फुले येतील → हे झाड फुलेल.

(17) **Reordering**—जर एक विधान खरे असेल तर दुसरेही विधान खरे असणारच. तसेच जर एक विधान खोटे असेल तर दुसरेही विधान खोटे असणारच या तत्त्वाधारे शब्दांचा किंवा शब्दसंहतींचा क्रम बदलून त्यांची फेरमांडणी करणे. ह्या परिवर्तनाची स्वरूपे अशी :

(अ) **कर्तरीचा कर्मणी प्रयोग**

त्याने ग्रंथ लिहिला → त्याच्याकडून ग्रंथ लिहिला गेला.

**(आ) शब्दक्रम–विपर्यय**

त्या डुलांमुळे त्या वेषभूषेला एक आगळी शोभा आली → 'त्या वेषभूषेला एक आगळी शोभा आली त्या डुलांमुळे'. **(मी दुर्गा खोटे** [27] पृ. 45) अशा शब्दरचनेला inversion म्हणतात.

(18) **Replacement :** मूळ शब्दसंघटनांच्या जागी समानार्थक शब्दसंघटनांची योजना करणे. या प्रक्रियेची स्वरूपे पाहा :

(अ) **समानार्थक** (Synonymous) **शब्दांची योजना**

तो अध्यापन करीत आहे → तो शिकवीत आहे.

**(आ) समानार्थक शब्दसंहतींची योजना**

यत्नदेवाचा अनुग्रह झाला म्हणजे दुर्बळांचे सबळ होतात. यत्नदेवाचा अनुग्रह झाला म्हणजे लहानाचे थोर होतात. यत्नदेवाचा अनुग्रह झाला की करंट्याचे कर्तबगार होतात. यत्नदेवाचा अनुग्रह झाला की, अज्ञानांचे सज्ञान होतात··· →"यत्नदेवाचा प्रसाद झाला म्हणजे दुर्बळांचे सबळ होतात. यत्नदेवाची कृपा झाली म्हणजे लहानांचे थोर होतात. यत्नदेवाची तृप्ती झाली की करंट्याचे कर्तबगार होतात. यत्नदेवाचा वरदहस्त डोक्यावर पडला की भाग्यहीनांचे भाग्यवंत होतात. यत्नदेवाचा संतोष झाला की अज्ञानांचे सज्ञान होतात····" ( द. वा. पोतदार, 'भाग्यासी काय उणे रे !'–**कुमार भारती** [28] पृ. 52)

(19) **Substitution :** एकाबद्दल दुसरे योजणे. येथे समानार्थकाचा काटेकोर आग्रह नसतो. प्रक्रिया-स्वरूपे अशी :

**(अ) एकाबद्दल दुसरे**

रमेशने गुंडाला बदडले → रमेशने कुत्र्याला बदडले.

**(आ) उत्तरगर्भ प्रश्न योजणे**

विधान– हा उघड उघड पंक्तिप्रपंच आहे → उत्तरगर्भ प्रश्न–'हा उघड-उघड पंक्तिप्रपंच नाही काय ?' (**वाघनखे** [29] पृ. 39)

**(इ) नकारात्मक वाक्यरचना**

होकारात्मक वाक्य : आम्हाला शिस्त अवश्य होती → नकारात्मक वाक्य : 'आम्हाला शिस्त नव्हती असे नव्हे'. (**मी दुर्गा खोटे** उ. नि. पृ. 11)

**(ई) वाक्प्रचाराची योजना**

तिच्या घरातल्या माणसांना आजोबांच्या रूपाने अगदी अकल्पित लाभ झाला. →'तिच्या घरातल्या माणसांना आजोबांच्या रूपानं नागवं कोल्हंच भेटलं.'

(**जोशी पुराण**[30] पृ. 198)

**(उ) रूपकात्मक रचना**

चित्रण मोठ्या प्रमाणावर व झपाट्याने होऊ लागले.→ 'चित्रणाच्या कामाला पूर आला'. (**वाटेवरल्या सावल्या, उ. नि.** पृ. 77)

**(ऊ) मानुषीकरण** (Personification)

वाद्ये वाजायची थांबतात. → 'वाद्ये मुकी होती'. (**माझ्या जीवनाची सरगम, उ. नि.** पृ. 80)

**(ए) अन्यधर्मारोप**

व्यास नदीचे पाणी चिचोळ्या दरीतून खळखळाट करीत वाहते→ 'चिचोळ्या दरीतून अंग घासटीत, कात टाकीत व्यास नदी खळखळते' (**बारा गावचं पाणी,**[31] पृ. 9)

(20) ललित लेखकाला आपले मनोगत रमणीय व स्मरणीय (memorable) बनविण्याची आकांक्षा असते. त्यासाठी त्याला वर वर्णिलेल्या दहा प्रक्रियांच्या आधारे परिवर्तित वाक्ये सिद्ध करून आपल्या लेखनात ती योजावी लागतात. ललितलेखकाला परिवर्तित वाक्यसाधक व्याकरणाच्या साह्याने वरीलप्रमाणे रूपांतरित वाक्ये सिद्ध करता येतात. शैली–अभ्यासकाला सदरहू व्याकरणाच्या अभ्यासाच्या साहृयाने ललित लेखकाने सिद्ध केलेल्या रूपांतरित वाक्यांचे पद्धतशीर विश्लेषण करता येते; लेखन शैलीसंपन्न आहे की नाही त्याचा साधार निर्णय करता येतो, लेखक कोणत्या परिवर्तनप्रक्रिया प्रभुत्वाने व प्राचुर्याने हाताळतो ते संख्यादृष्टया मोजणी करून निश्चित करता येते व तदाधारे लेखकाच्या शैलीला योग्य नामाभिधान देता येते. यावरून हे परिवर्तित वाक्यसाधक व्याकरण शैलीसंपन्न ललित–साहित्याच्या 'जनका'-ला जितके उपयुक्त व अत्यावश्यक आहे तितकेच ते त्या साहित्याच्या विश्लेषक–अभ्यासकालाही उपयुक्त व अत्यावश्यक आहे, हे पटेल.

## संदर्भ टीपा

(1) R. Ohmann 'Generative Grammars and the Concept of Literary Style', *Contemporary Essays on Style*, ed., G. A. Love and M. Payne, Chicago, Scott, Foresman and Company, 1969, P. 140

(2) तुळा: "The encoder makes a *choice* of the type of sentence to suit the kind of meaning he wants to express. And he has to use one particular kind of sentence-form to do this."

A. E. Darbyshire, *A Grammar of Style* (*GS*), London, Andre Deutsch, 1971, P. 67

(3) **सनीडेज** (एक आत्मचरित्र), सुनील गावसकर, अनु., बाळ ज. पंडित द्वितीयावृत्ती, पुणे, उत्कर्ष प्रकाशन, 15–8–1979

(4) *GS.* पूर्वोक्त, पृ. 84 (5) तत्रैव, पृ. 86 (6) तत्रैव, पृ. 59

(7) E. Bach, *An Introduction to Transformational Grammars* (*ITG*), New York, Holt, Rinehart and Winston, Inc., 1964, P. 13.

(8) K. W. Hunt, 'How Little Sentences Grow into Big Ones', *ITG.* पूर्वोक्त पृ. 171

(9) R. Ohmann, 'Generative Grammars and the Concept of Literary Style', *Readings in Applied Transformational Grammar* (*ATG*), ed. M. Lester, New York, Holt, Rinehart and Winston, Inc., 1970, P. 125

(10) R. A. Jacobs and P. S. Rosenbaum, *English Transformational Grammar* (*ETG*), Waltham, Blaisdell Publishing Company, 1968 [ Blaisdell International Edition ], पृ. 17

(11) तत्रैव, पृ. 23 (12) तत्रैव, पृ. 74 (13) *ATG* पृ. 126

(14) तत्रैव, पृ. 126-27 (15) *ETG* पृ. 26 (16) *ATG* पृ. 135

(17) *ITG* पृ. 70

(18) **करुणाष्टक**, व्यंकटेश माडगूळकर, मुंबई, मॅजेस्टिक बुक स्टॉल, सप्टेंबर 1982

(19) **हितोपदेश 1**—आनंद साधले, मुंबई, मॅजेस्टिक, जून 1981

(20) **गुद्दे आणि गुदगुल्या**—प्र. के. अत्रे, मुंबई, डिव्हाईन, 13–8–80

(21) **स्वगत**—जयवंत दळवी, दुसरी आवृत्ती, मुंबई, मॅजेस्टिक बुक स्टॉल, जुलै 1981

(22) **आम्ही मराठी माणसं**—दि. बा. मोकाशी, पुणे, उत्कर्ष, 1-5-1981

(23) **'अक्षर दिवाळी'** 1980–संपा. य. दि. फडके व इतर, पुणे, विश्वकर्मा साहित्यालय, 2 मे, 1981

(24) **वाटेवरल्या सावल्या**—ग. दि. माडगूळकर, पुणे, विश्वमोहिनी, 14 डिसेंबर 1981

(25) **माझ्या जीवनाची सरगम**—सी. रामचंद्र, पुणे, इनामदार बंधू, 12-1-1977

(26) **सारे प्रवासी घडीचे**—जयवंत दळवी, तृतीयावृत्ती (महाविद्यालयीन), मुंबई, मॅजेस्टिक, जून 1974

(27) **मी दुर्गा खोटे**—दुर्गा खोटे, मुंबई, मॅजेस्टिक बुक स्टॉल, 14-1-82

(28) **कुमारभारती**—इयत्ता आठवी, पुणे, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षा मंडळ, 1976

(29) **वाघनखें**—पु. भा. भावे, पुणे, देशमुख आणि कंपनी, जून 1961

(30) **जोशी पुराण**—श्री. ज. जोशी, पुणे, श्रीविद्या, 1–8–1982

(31) **बारा गावचं पाणी**—वसंत बापट, मुंबई, पॉप्युलर, 1966/1887

**पूर्वप्रसिद्धी :** डॉ. द. भि. कुळकर्णी अभिनंदन ग्रंथ **'समकालीन साहित्य : प्रवृत्ती आणि प्रवाह** (पृ. 213–229) यातील लेख 'समकालीन साहित्य व परिवर्तित वाक्यसाधक व्याकरण'

•

# 3. साहित्याचे स्वरूप

## [संस्कृत साहित्यशास्त्रात वर्णिलेल्या ललितसाहित्याच्या स्वरूपाचा परामर्श]

1. नाट्यशास्त्रकार भरताने नाटकाश्रय काव्याच्या चर्चेच्या निमित्ताने काव्याची भूषणे, काव्याचे अलंकार, गुण व दोष ह्या धर्मांचे विवेचन आपल्या ग्रंथाच्या सोळाव्या अध्यायात केले आहे; त्याने त्या अध्यायाच्या पुष्पिकेत [**'इति भारतीये नाट्यशास्त्रे वागभिनये काव्यलक्षणो नाम षोडशोऽध्यायः'**][1] त्या अध्यायास नावही **काव्यलक्षण** असेच दिले आहे. भरतप्रणीत 'काव्यलक्षण'च भारतीय काव्यशास्त्राचा मूलस्रोत मानला जातो. परंतु, भरतकृत ती चर्चा नाट्यसापेक्ष काव्याची आहे, नाट्यनिरपेक्ष काव्याची नाही. तशी नाट्यनिरपेक्ष काव्याची चर्चा भरतोत्तर काळातील मेधावी,[2] रामशर्मा[3] व शाखावर्धन[4] नामक शास्त्रकारांनी किंवा काव्यालंकारकर्त्या भामहाने ज्यांचा उल्लेख अन्ये,[5] अन्यैः,[6] अपरे,[7] केचित्,[8] कैश्चित्[9] व परे[10] ह्या शब्दांनी केला आहे त्या शास्त्रकारांनी केली असावी. तथापि, एक तर त्यांचे ग्रंथ आज उपलब्ध नाहीत; शिवाय ते सर्व केवळ कवी होते की, केवळ काव्यमीमांसक होते की दण्डी-राजशेखरप्रभृतींप्रमाणे 'काव्यमीमांसक कवी' होते ते निश्चित करण्यास कोणतेही साधन सध्या आपल्यापाशी नाही. अशा स्थितीत वरील सर्वांचा निर्देश करणारा व ज्याचा समग्र ग्रंथ आज आपल्याला उपलब्ध आहे असा जो भामह तोच नाट्यनिरपेक्ष काव्याची विस्तृत चर्चा करणारा ज्ञात आद्य काव्यशास्त्रकार मानावा लागतो व त्याचा **काव्यालंकार** हा ग्रंथ आद्य उपलब्ध काव्यशास्त्रपर ग्रंथ ठरतो. त्याच्या काळापासून [ इ. स. 500 ते 600 ] सतराव्या शतकात[11] होऊन गेलेल्या **'रसगंगाधर'**-कर्त्या जगन्नाथाच्या काळापर्यंतच्या वेगवेगळ्या काव्यमीमांसकांनी काव्याच्या विविध ग्राह्याग्राह्य धर्मांचा, प्रयोजन-कारणादींचा, काव्यसमयांचा व काव्याच्या प्राणतत्त्वांचा परामर्श घेताना जे काव्य डोळ्यांसमोर ठेवले होते त्याचे स्वरूप कोणते होते किंवा त्याची व्याप्ती किती होती, ह्या मुद्याचे अध्ययन करणे हे प्रस्तुत लेखाचे उद्दिष्ट आहे. हे अध्ययन भामह, दण्डी, उद्भट, वामन, रुद्रट, ध्वन्यालोककार आनन्दवर्धन, राजशेखर, कुन्तक, धनंजय, भोज, क्षेमेन्द्र, मम्मट, वाग्भट, हेमचन्द्र, काव्यानुशासनकार वाग्भट, विश्वनाथ, केशवमिश्र व जगन्नाथ ह्या प्रमुख काव्यशास्त्रकारांच्या ग्रंथांचे विश्लेषण करून करावयाचे आहे. प्रथमतः ह्यांपैकी प्रत्येक ग्रंथकाराने काव्याच्या व्याप्तीविषयी व्यक्त केलेल्या व सुचविलेल्या

विचार-संकल्पनांची नोंद करावयाची व त्यानंतर अशा प्रकारच्या सर्व नोंदींमधून हाती आलेल्या तपशिलाचे संकलन करून त्यावरून काही निष्कर्ष हाती येतात काय, ते अजमावण्याचा प्रयत्न करावयाचा, ही पद्धत स्वीकारली आहे. तीस अनुसरून आता भामहाच्या ग्रंथापासून तपशील संकलित करावयास सुरुवात करू.

## (2) भामहाचा काव्यालंकार

भामहाने **'शब्दार्थौ सहितौ काव्यं'**[12] अर्थात शब्द व अर्थ ह्यांच्या सह-अस्तित्वाला काव्य म्हणतात असा प्रस्तुत विषयाच्या विचाराचा उपन्यास करून पुढीलप्रमाणे अधिकचे विवेचन केले आहे. काव्याचे गद्य व पद्य असे मुख्य भेद असतात [ **गद्यं पद्यं च तद्द्विधा ।**[13] ]. ह्या दोहोंचे पुन्हा संस्कृत, प्राकृत व अपभ्रंश असे भाषादृष्टचा तीन पोटप्रकार असतात. अर्थात संस्कृत गद्य व पद्य, प्राकृत गद्य व पद्य आणि अपभ्रंश गद्य व पद्य असे एकूण सहा भेद होतात. [ **'संस्कृतं प्राकृतं चान्यदपभ्रंश इति त्रिधा ।। 16 ।।'**[14] ]. ह्यांचे पुन्हा प्रतिपाद्य विषयानुसार देव, राजे, महापुरुष इत्यादींच्या चरित्राचे वर्णन, पूर्णपणे कविकल्पित कथानक, संगीत-चित्रप्रभृती कलांच्या तत्त्वादींचे निरूपण आणि अध्यातमादी शास्त्रांच्या सिद्धान्तांचे प्रतिपादन असे चार उपभेद होतात [ **'वृत्तदेवादिचरितशंसि चोत्पाद्यवस्तु च । कलाशास्त्राश्रयं चेति चतुर्धा भिद्यते पुनः ।। 17 ।।'**[15] ] म्हणजे संस्कृत गद्य व पद्य ह्यांपैकी प्रत्येकाचे वरीलप्रमाणे चार म्हणजे एकूण आठ पोटभेद होतात. तसेच आठ-आठ पोटभेद प्राकृत व अपभ्रंश ह्यांचेही होतात. त्या सर्वांची बेरीज चोवीस होते. ह्याशिवाय सर्गबद्ध महाकाव्ये, नाटकादी दशरूपके व द्विपदी, शम्या, रासक, स्कंधक आणि तत्सदृश अभिनयासाठी रचलेली काव्ये, गद्ययुक्त आख्यायिका, कथा, प्राकृत गाथा व संस्कृत श्लोक हे आणखीही काव्यप्रकार असतात [ **सर्गबन्धोऽभिनेयार्थं तथैवाख्यायिकाकथे । अनिबद्धञ्च काव्यादि तत्पुनः पञ्चधोच्यते ।। 18 ।।**[16]**···नाटकं द्विपदीशम्यारासकस्कन्धकादि यत् । उक्तं तदभिनेयार्थमुक्तोऽन्यैस्तस्य विस्तरः ।। 24 ।।**[17]**···गद्येन युक्तोदात्तार्था सोच्छ्वासाऽऽख्यायिका मता ।। 25 ।।**[18]**···संस्कृतासंस्कृता चेष्टा कथाऽपभ्रंशभाक्तथा ।। 28 ।।**[19]**···अनिबद्धं पुनर्गाथा श्लोकमात्रादि तत्पुनः ।**[20] ]. ह्यांपैकी महाकाव्ये संस्कृत, प्राकृत व अपभ्रंश ह्या तिहींपैकी कोणत्याही भाषेत असू शकतात; नाटकादी अभिनेयार्थ काव्येही भाषादृष्टचा मिश्र असू शकतात, आख्यायिका संस्कृतातच असतात [ **संस्कृतानाकुलश्रव्यशब्दार्थपदवृत्तिना**[21] ], कथा संस्कृत, प्राकृत व अपभ्रंश अशा तिन्ही भाषांत रचल्या जाऊ शकतात [**संस्कृतासंस्कृता चेष्टा कथाऽपभ्रंशभाक्तया ।**[22]]. पण गाथा केवळ प्राकृतातच असतात. मात्र हे म्हणजे पूर्वोक्त सर्व प्रकारांतील काव्य वक्र स्वरूपाच्या वचनांनी युक्त असणे अभीष्ट असते [ **युक्तं वक्रस्वभावोक्त्या सर्वमेवैतदिष्यते ।। 30 ।।**[23] ]. भामहाने अमुक काव्य वैदर्भ आहे म्हणून श्रेष्ठ व तमुक काव्य गौडीय आहे म्हणून

निकृष्ट अशा प्रकारची त्याच्या काळात प्रचलित असलेली काव्यविभाजनपद्धती झिडकारली आहे [24] [ गौडीयमिदमेतत्तु वैदर्भमिति किं पृथक् । गतानुगतिकन्यायान्नानाख्येयममेधसाम् ॥ 32 ॥ ]. तसेच त्याने व्याख्यागम्य प्रहेलिका ( म्हणजे शब्दकोडी ) हा लोकप्रिय होऊन स्थिरावू पाहणारा काव्यरचनाप्रकारही निषिद्ध मानला आहे [ 'काव्यान्यपि यदीमानि व्याख्यागम्यानि शास्त्रवत् । उत्सवः सुधियामेव हन्त दुर्मेधसो हताः ॥'[25] ]. एवंच भामहाने काव्याच्या व्याप्तीचा विचार करताना छंद, भाषा, कथानकाची प्रसिद्धाप्रसिद्धता, वर्ण्यविषय, आस्वादनाचे माध्यम, निर्मितिप्रयोजन, निबद्धानिबद्धता, रीती, कृत्रिमता-अकृत्रिमता अशा अनेक कसोटचा वापरल्या होत्या, असे प्रतीत होते.

आता दण्डीच्या ग्रंथाचा विचार करू.

## (3) दण्डीचे काव्यलक्षण

दण्डीने आपल्या **काव्यलक्षणम्** नामक ग्रंथात, कवीला अभिप्रेत असलेल्या अर्थाने युक्त अशा शब्दसमूहाला काव्याचे शरीर मानतात, असे प्रास्ताविक करून [ **'शरीरं तावदिष्टार्थव्यवच्छिन्ना पदावली ।'** [26] ] ते शरीर पद्यात्मक, गद्यात्मक व पद्यगद्योभयात्मक असे तीन प्रकारांचे असते असे निश्चितार्थक विधान केले आहे [ **पद्यं गद्यं च मिश्रं च तत् त्रिधैव व्यवस्थितम् ।** [27] ]. ह्यांपैकी पद्याचे अक्षरगणवृत्तरूप व मात्रावृत्तरूप असे छन्दःशास्त्रदृष्टचा दोन [ **'पद्यं चतुष्पदी तच्च वृत्तं जातिरिति द्विधा ॥ 11 ॥'**[28] ] आणि मुक्तक, कुलक, कोश, संघात असे अर्थदृष्टचा इतर भेद [ **'मुक्तकं कुलकं कोश संघात इति तादृशः ।'** [29] ] होतात. हे उत्तरोक्त प्रकार सर्गबंधाच्या अंशांच्या म्हणजे भागांच्या स्वरूपाचे असतात [ **सर्गबन्धांशरूपत्वाद**··· ][30]. स्तोत्र, अवदान, परिकथा, इत्यादींचा समावेश संघातात [ =एकाच विषयाचे वर्णन करणाऱ्या श्लोकसमूहात ] होतो. त्या सर्व पद्यविलसिताचे, वर निर्देशिल्याप्रमाणे, वृत्तरूप व जातिरूप असे द्विविध वर्गीकरण होतेच. सर्गबद्ध महाकाव्यांपैकी काहींची सुरुवात आशीर्वचनाने, काहींची नमस्काराने व काहींची कथावस्तूच्या निर्देशाने होते. अर्थात महाकाव्यांच्या अशा त्रिप्रकारक सुरुवातीवरूनही त्यांचे त्रिप्रकार संभवतात [ **आशीर्नमस्क्रिया वस्तुनिर्देशो वापि तन्मुखम् ॥ 14 ॥**[31] ]. काही महाकाव्ये इतिहासप्रसिद्ध व्यक्तींच्या चरित्रान्तर्गत घटनांवर आधारित असतात, तर काही इतिहासेतर सत्प्रवृत्त व्यक्तींच्या जीवनातील घटनांवर आधारित असतात, काही महाकाव्यांच्या प्रारंभी नायकाच्या गुणांचे तर काहींच्या प्रारंभी प्रतिनायकाच्या गुणांचे प्रशंसापर वर्णन असते [ **इतिहासकथोद्भूतमितरद्वा सदाश्रयम्**[32]··· **गुणतः प्रागुपन्यस्य नायकं तेन विद्विषाम् । निराकरणमित्येष मार्गः प्रकृतिसुन्दरः ॥ 21 ॥**[33] ···**वंशवीर्यश्रुतादीनि वर्णयित्वा रिपोरपि । तज्जयान्नायकोत्कर्षकथनं च धिनोति नः ॥ 22 ॥**[34] ]. ज्या महाकाव्यातील शब्दार्थालंकार सुप्रयुक्त [योग्य जागी योग्य

अलंकार] असतात असे महाकाव्य काव्यरसिकांचे मनोरंजन करून यावच्चन्द्रदिवाकरौ टिकते [ ...लोकरञ्जनम् । काव्यं कल्पान्तरस्थायि जायते सदलंकृति ॥[85] ]. महाकाव्यात किंवा कोणत्याही स्वरूपाच्या काव्यात शास्त्रप्रणीत एखादे वैशिष्टच नसले तरी त्यामुळे काव्यात वैगुण्य उत्पन्न होत नाही. त्या काव्यातील शब्दार्थसंपदा काव्यमर्मज्ञांचे रंजन करणारी असली की ते काव्य वर्ज्य मानले जात नाही. [ न्यूनमप्यत्र यैः कैश्चिदङ्गैः काव्यं न वर्ज्यते । यद्युपात्तेषु संपत्तिराराधयति तद्विदः ॥ 20 ॥[86] ] जरी गद्यरूप काव्याचे आख्यायिका व कथा असे दोन प्रकार मानण्यात येत असले, तरी वस्तुतः त्यांची जात एकच व ती म्हणजे गद्य-काव्य ही होय [ गद्यमाख्यायिका कथा । इति तस्य प्रभेदौ द्वौ...[87] ...तत्कथाख्यायिकेत्येका जातिः संज्ञाद्वयाङ्किता ।[88] ] आणि आख्यानकाव्याचे इतर प्रकार ह्यांतच मोडतात [ अत्रैवान्तर्भविष्यन्ति शेषाश्चाख्यानजातयः ॥ 28 ॥[89] ]. ह्यांपैकी आख्यायिका संस्कृत भाषेत किंवा संस्कृतेतर कोणत्याही भाषेत रचलेली असू शकते, तर कथा संस्कृतमय, प्राकृतमय, अपभ्रंशमय, पैशाचीमय किंवा सर्वभाषामिश्रणमय अशीही असू शकते. कथा व आख्यायिका ह्यांमध्ये मधूनमधून प्रसंगपरत्वे पद्ये असतात पण रूपकाच्या नाटकादी दहा प्रकारांत ती अधिकाराने वावरतात. म्हणूनच नाटकादी काव्ये गद्यपद्योभयमिश्र [ मिश्राणि नाटकादीनि...[40] ] मानली जातात. तसाच चंपू हादेखील गद्यपद्यात्मक [ मिश्र स्वरूपाचा ] काव्य-प्रकार होय. [ गद्यपद्यमयी कापि चम्पूरित्यभिधीयते ॥ 31 ॥[41] ]. नाटक रंगमंचावर बघावयाचे असते तर चंपू वाचावयाचा असतो, हा दोहोंतील फरक आहे. वरील पद्य, गद्य व पद्यगद्योभयमिश्र स्वरूपाच्या काव्याचे पुन्हा भाषानिहाय चार भेद होतात, ते असेः संस्कृत पद्य, प्राकृत पद्य, अपभ्रंश पद्य व संस्कृत+प्राकृत+अपभ्रंश+पैशाची-मिश्र पद्य. असेच गद्याचे चार व पद्यगद्यमिश्राचेही चार. [ तदिदं वाङ्मयं भूयः संस्कृतं प्राकृतं तथा । अपभ्रंशश्च मिश्रं चेत्याहुराप्ताश्चतुर्विधम् ॥ 32 ॥[42] ]. ह्या भाषांपैकी संस्कृत भाषा एकच आहे, तिचे प्रकार नसतात. पण प्राकृताचे तद्भव ( संस्कृतोद्भव ), तत्सम ( संस्कृतसम ) व देशी ( त्या त्या प्रांतातील लोकांची व्यवहारभाषा ) असे प्रकार असतात [ संस्कृतं नाम दैवी वागन्वाख्याता महर्षिभिः । तद्भवं तत्समं देशीत्यनेकः प्राकृतक्रमः ॥ 33 ॥[43] ]. तसेच शौरसेनी, गौडी, लाटी, मागधी, पांचाली इत्यादी सामान्यभाषाही महाराष्ट्री प्राकृताप्रमाणेच प्राकृतभाषाच मानल्या जातात [ सौरसेनी च गौडी च लाटी चान्या च तादृशी । याति प्राकृतमित्येव व्यवहारेषु सन्निधिम् ॥ 35 ॥[44] ]. त्या-त्या भाषांतील पद्यमय, गद्यमय व पद्यगद्यमय काव्यांचाही विचार कर्तव्य ठरतो. ह्याखेरीज गवळी, भोई, गाडीवान इत्यादी व्यावसायिकांच्या भाषांना काव्याच्या संदर्भात अपभ्रंश म्हणतात व त्या भाषांचे प्रयोग गद्य, पद्य व मिश्र स्वरूपाच्या काव्यांत होतात. अर्थात, गवळी-प्रभृतींच्या अपभ्रंश भाषांतील गद्यप्रभृती

रचनाही काव्य मानल्या जातात व काव्यशास्त्रकार त्यांची चर्चा करतात [ **आभीरादिगिरः काव्येष्वपभ्रंश इति स्मृताः। शास्त्रे तु संस्कृतादन्यदपभ्रंशतयोदितम् ॥ 36 ॥**[45] ]. शृंगारप्रधान लास्य नृत्त, छद्मप्रधान छलिननृत्त इत्यादींच्या प्रयोगासाठी रचलेली काव्ये ही पाहावयाची असतात, ऐकण्यासाठी रचलेली नसतात, तरीही ती काव्ये ह्या नात्यानेच विचारणीय ठरतात [ **लास्यच्छलिनशम्यादि प्रेक्षार्थमितरत्पुनः। श्रव्यमेवेति सैषापि द्वयी गतिरुदाहृता ॥ 39 ॥**[46] ], पण मुक्तके, महाकाव्ये, स्तोत्रे इत्यादी काव्ये ऐकण्यासाठीच असतात, पाहाण्यासाठी नसतात. विनियोगदृष्टचा अशी ही द्विदल व्यवस्था असते. प्रयोगासाठी रचलेली लास्यादी काव्ये संस्कृतप्रभृती कोणत्याही भाषेत असू शकतात. अशा ह्या काव्यशरीराचे रचनाप्रकार अक्षरशः अगणित असतात [ **अस्त्यनेको गिरां मार्गः**···[47] ], तसेच त्यांच्या ठायी सौन्दर्य निर्माण करणारे धर्मही अनन्त असतात [ **ते चाद्यापि विकल्प्यन्ते कस्तान् कात्स्न्र्येन वक्ष्यति ॥ 1 ॥**[48] ]. पण समाधी नावाचा एक गुणधर्म [ लोकमर्यादेचे पालन करून एका वस्तूच्या धर्मांचे दुसरीच्या ठायी कल्पनापूर्वक वर्णन करणे म्हणजे समाधी. **अन्यधर्मस्ततोऽन्यत्र लोकसीमानुरोधिना। सम्यगाधीयते यत्र स समाधिः स्मृतो यथा ॥ 93 ॥**[49] ] गद्य, पद्य व मिश्र अशा सर्वच प्रकारांच्या काव्यांचे सर्वस्व असून तो साधण्यासाठी सगळे कवी झटून प्रयत्न करतात [ **तदेतत् काव्यसर्वस्वं समाधिर्नाम यो गुणः। कविसार्थः समग्रोऽपि तमेनमनुगच्छति ॥ 100 ॥**[50] ]

अशा प्रकारे दण्डीने आपल्या ग्रंथात छंद, अर्थ, दीर्घादीर्घता, प्रारंभ, वर्ण्यव्यक्ती / वर्ण्यविषय, वर्णनक्रम, आख्यानप्रकार, भाषा, गद्यपद्यमिश्रत्व, प्रेक्ष्य-वाच्य-भाव, लोकभाषा, विनियोग अशा बहुविध कसोट्यांच्या आधारे काव्याच्या व्याप्तीचा विचार मांडला आहे. आता उद्भटाच्या ग्रंथाचे अवलोकन करू.

## (4) उद्भटरचित काव्यालंकारसारसंग्रह

काव्यहेतू नामक अलंकाराचे निरूपण करताना उद्भटाचा टीकाकार जो प्रतीहारेन्दुराज त्याने पुढीलप्रमाणे उद्गार काढले आहेत : **"काव्यं खलु गुणसंस्कृतशब्दार्थशरीरत्वात्सरसमेव भवति न तु नीरसम्।···यद्येवं गुणशून्यत्वान्नीरसे व्याकरणादौ भरतादौ च काव्यव्यपदेशो न प्राप्तः···अतो वक्तव्यमेतत्कथं तत्र काव्यव्यपदेश इति। उच्यते। मुख्यया तावद्वृत्त्या गुणसंस्कृतशब्दार्थशरीरमेव काव्यम्। गुणरहितशब्दार्थशरीरे तु काव्यमात्रे काव्यशब्दस्य सादृश्यादुपचारात्प्रयोगो भविष्यति।···भक्त्येत्युपचारेणेत्यर्थः॥"**[51], अर्थात-गुणसंस्कृत शब्दार्थ हे काव्याचे शरीर असल्यामुळे काव्य नेहमी सरसच असते, नीरस असतच नाही. पण मग प्रश्न असा उत्पन्न होतो की, व्याकरणादी शास्त्रावरील ग्रंथ व भरताचे नाटचशास्त्रप्रभृती ग्रंथ गुणशून्य आणि नीरस असूनही त्यांना अनुलक्षून 'काव्य' ही संज्ञा का लावली

जाते ? ह्या शंकेचे निरसन असे की, गुणरहित शब्दार्थशरीरनिष्ठ रचना ही काव्यासारखीच दिसते. व्याकरणादी शास्त्रांत काव्यातल्यासारखेच शब्दार्थ असतात. म्हणजे काव्ये व व्याकरणादी शास्त्रे या दोहोंचे 'शरीर' सारखेच असते. ह्या सादृश्यामुळे शास्त्रादींना औपचारिकपणे काव्य ही संज्ञा लावण्यात येते. ती मुख्यार्थाने लावलेली नसते व मुख्यार्थाने समजूनही घ्यावयाची नसते. एकंदरीने प्रतीहारेन्दुराजाने काव्य व शास्त्र यांतील फरक स्पष्ट करून सांगितला आहे.

ह्यानंतर आता वामनकृत एतद्विषयक विवेचनाचा परिचय करून घेऊ.

## (5) वामनाची काव्यालंकारसूत्राणि

इसवी सन 800-850 ह्या कालावधीत[52] होऊन गेलेल्या वामनाने **काव्यालंकार-सूत्राणि** नामक आपल्या ग्रंथाच्या पहिल्याच अधिकरणात 'काव्यविशेष' शीर्षकाखाली प्रस्तुत विषयाची जी चर्चा केली आहे ती आता विचारात घेऊ. वामनाने आपल्या पूर्वसूरींप्रमाणे काव्याचे गद्य व पद्य असे दोन मुख्य प्रकार [ '**काव्यं गद्यं पद्यं च** ॥ 21 ॥'[53] ] उल्लेखिले आहेत. पण वामनाने गद्याविषयी पूर्वसूरींनी न मांडलेला एक महत्त्वपूर्ण विचार मांडला आहे; तो असा की, गद्याचे विषय वा विलासक्षेत्र मोठ्या कष्टाने ध्यानात येत असल्यामुळे आणि गद्य लिहिणे अवघड असल्यामुळे गद्यलेखन ही कवींची कसोटी मानली जाते [ **गद्यस्य पूर्वं निर्देशो दुर्लक्ष्यविषयत्वेन दुर्बन्धत्वात् । यथाहुः 'गद्यं कवीनां निकषं वदन्ति ।'** ].[54] गद्याचे वृत्तगन्धी (पद्यांशयुक्त), चूर्ण ( लहान समास व ललित शब्दयोजना यांनी युक्त ) व उत्कलिका-प्राय ( दीर्घ सामासिक शब्द व कठोर शब्दांनी युक्त ) असे तीन प्रकार असतात [ **गद्यं वृत्तगन्धि चूर्णमुत्कलिकाप्रायं च** ॥ 22 ॥[55] ]. पद्याचे समवृत्तात्मक, अर्धसम वृत्तात्मक, विषमवृत्तात्मक इत्यादी अनेक भेद असतात [ **पद्यं खल्वनेकेन समार्धविष-मादिना भिन्नं भवति ।**[56] ]. गद्यरूप व पद्यरूप काव्याचे पुन्हा अनिबद्ध ( सुटे श्लोक किंवा प्राकृत गाथा ) आणि निबद्ध ( प्रदीर्घ रचना, उदाहरणार्थ सर्गबद्ध महाकाव्य ) असे दोन पोटप्रकार होतात [ **तदिदं गद्यपद्यरूपं काव्यमनिबद्धं निबद्धं च ।**[57] ] अर्थात अनिबद्ध गद्य [ विशिष्ट वर्णनपर लहानलहान परिच्छेद ] व अनिबद्ध पद्य [ विशिष्ट वर्णनपर सुटे श्लोक किंवा प्राकृत गाथा ], निबद्ध गद्य [ उदाहरणार्थ, कथा, आख्यायिका इत्यादी ] व निबद्ध पद्य [ महाकाव्य इत्यादी ] असे एकूण चार प्रकार होतात. ह्यांपैकी अनिबद्ध गद्य व पद्य लिहिण्याची कला आत्मसात झाली की तिची पुढची व व्यापक पायरी म्हणजे निबद्ध गद्य व पद्य लिहिण्याची कला आत्मसात होते [ हार गुंफण्याचे कसब साधले की मुकुट गुंफण्याचे कसब हळूहळू साध्य होते— **क्रमसिद्धिस्तयोः स्रगुत्तंसवत्** ॥ 28 ॥[58] ]. काही विचारवंत अनिबद्ध काव्यरचनेलाच काव्यकलेची परमावधी समजतात. पण वामनाला ती विचारसरणी पटत नाही. म्हणून ती खोडून काढण्यासाठी तो प्रतिपादितो की, अनिबद्ध गद्यपद्यरूप काव्य असंकलित

स्वरूपाचे असते. ते अंगभूत सुटेपणामुळे, त्रुटितपणामुळे किंवा संक्षिप्तपणामुळे सौंदर्यपूर्ण भासत नाही [ **केचिदनिबद्ध एव पर्यवसितास्तद्दूषणार्थमाह–नानिबद्धं चकास्त्येकतेजःपरमाणुवत् ॥ 29 ॥**[59] ]. वामनाच्या मते अनिबद्ध गद्यपद्यरूप काव्ये आगीच्या ठिणगीसारखी असल्यामुळे प्रकाशत नाहीत. ह्याच्या उलट निबद्ध गद्यपद्यरूप काव्ये व्यापक आगीच्या स्वरूपाची असल्यामुळे प्रकाशतात. ह्या निबद्ध काव्यांपैकी नाटक, प्रकरण, भाण, प्रहसन, डिम, व्यायोग, समवकार, वीथी, अंक व ईहामृग ही दशरूपके अत्यंत प्रशंसनीय होत. [ **'संदर्भेषु दशरूपकं श्रेयः ॥ 30 ॥'**[60] ] कारण त्यांत कथानक, विविध भाषा, चतुर्विध अभिनय, पात्रांचे पोषाख, त्यांच्या तोंडचे गद्यपद्यात्मक पाठ्यकाव्य, त्या काव्यातील गुणालंकारादी वैशिष्टचे, वृत्ती, संगीत, वाद्यवादन, नृत्त, नाटचगृह, त्याची सजावट व रसभावविलास इत्यादी सर्व वैशिष्टचे एकवटलेली असतात [ **तद्दशरूपकं हि यस्माच्चित्रं चित्रपटवत् । विशेषाणां साकल्यात् ।**[61] ] त्या दशरूपकांपासून कथा, आख्यायिका, महाकाव्य इत्यादी इतर सर्व काव्यप्रकारांची कल्पना करण्यात आली आहे; किंबहुना हे सर्व काव्यप्रकार दशरूपकाची विलसिते होत [ **ततो दशरूपकादन्येषां भेदानां क्लृप्तिः कल्पनमिति । दशरूपकस्यैव हीदं सर्वं विलसितम् । यच्च कथाख्यायिके महाकाव्यमिति··· ।'** [62] ]. दशरूपके ही अभिनेय काव्ये असतात, त्यांतील अभिनयाचा भाग वगळून बाकीच्या वैशिष्टचांच्या ग्रहणाने कथा, आख्यायिका, महाकाव्य इत्यादी श्रव्य काव्यप्रकारांची सिद्धी होते. काव्य हा शब्द गुणालंकारसंपन्न शब्दार्थांना अनुलक्षून वापरला जात असला तरी तो केवळ शब्दार्थांचा वाचक असल्याचे गौणार्थाने मानण्यात येते [ **'काव्यशब्दोऽयं गुणालंकारसंस्कृतयोः शब्दार्थयोर्वर्तते । भक्त्या तु शब्दार्थमात्रवचनोऽत्र गृह्यते ।'**[63] ]; काव्य अलंकारामुळे =सौन्दर्यामुळे ग्राह्य बनते [ **'काव्यं ग्राह्यमलंकारात् ॥ 1 ॥···सौन्दर्यमलंकारः ॥ 2 ॥'** [64] ] आणि हे सौन्दर्य गुण व उपमादी अलंकार यांच्या योजनेपासून तसेच दोषांच्या वर्जनापासून उत्पन्न होते [ **स दोषगुणालंकारहानादानाभ्याम् ॥ 3 ॥**[65] ], असे काही मूलभूत विचार आपल्या ग्रंथाच्या सुरुवातीलाच वामनाने मांडले आहेत. ह्याखेरीज त्याने गुणांचे स्फुटत्व म्हणजे विशदत्व आणि गुणांचे साकल्य ह्या दोहोंना मिळून काव्यपाक म्हणतात, ह्याला आम्रपाकाची उपमा दिली जाते; जे काव्य व्याकरणदृष्ट्या शुद्ध असते पण ज्यातील अर्थ वा कथावस्तू क्लिष्ट किंवा अस्पष्ट असते त्या काव्याला 'वांग्याच्या पाका'ची उपमा दिली जाते आणि जे काव्य सर्वथा गुणशून्य असते ते अपार्थक होय असेही विवेचन केले आहे [ **'गुणस्फुटत्वसाकल्यं काव्यपाकं प्रचक्षते । चूतस्य परिणामेन स चायमुपमीयते । सुप्तिङ्संस्कारमात्रं यक्लिष्टवस्तुगुणं भवेत् । काव्यं वृन्ताकपाकं तज्जुगुप्सन्ते जनास्ततः ॥ गुणानां दर्शनान्मुक्तो यस्यार्थस्तदपार्थकम् । दाडिमानि दशेत्यादि न विचारक्षमं वचः ॥'**[66] ]. एकंदरीने वामनाने काव्यभेद व काव्यप्रकार ह्या सर्वप्रसिद्ध शब्दांखेरीज 'काव्यविशेष' हा अधिकचा

शब्द योजून त्या काव्यविशेषांची चर्चा छंद, गद्यप्रकार, पद्याचे समवृत्तप्रभृती भेद, निबद्धानिबद्धता, प्रेक्ष्यत्व, श्रव्यत्व, शब्दगुण, अर्थगुण, ह्या निकषांच्या आधारे केली आहे व तिच्या ओघात काही वैशिष्ट्यपूर्ण विचार मांडले आहेत.

आता क्रमागत रुद्रटाच्या विचारांची ओळख करून घेऊ.

## (6) रुद्रटाचा काव्यालंकार

सुमारे इ. स. 825-850 च्या[67] दरम्यान होऊन गेलेल्या रुद्रटाने शब्द व अर्थ ह्या दोहोंना मिळून काव्य म्हणतात, असे प्रास्ताविक करून [ **ननु शब्दार्थौ काव्यं**...[68] **।**' ] पुढे असे प्रतिपादन केले आहे की, काव्यातील वाक्य (उक्ती) गद्यरूप (म्हणजे छंदोरहित) आणि छन्दोगत असे दोन प्रकारचे असते. शिवाय ते वाक्य समस्तदोषरहित, सकलगुणयुक्त व सौन्दर्यपूर्ण शब्दसमूहरूपी असते. [ **'वाक्यं भवति द्वेधा गद्यं छन्दोगतं च भूयोऽपि ।'**[69]...**'अन्यूनाधिकवाचकसुक्रमपुष्टार्थशब्दचारुपदम् । क्षोदक्षममक्षूणं सुमतिर्वाक्यं प्रयुञ्जीत ॥'**[70] ] त्या वाक्याचे [ काव्याची प्रत्यक्ष उक्ती—the text of the creative writing ] पुन्हा प्राकृत, संस्कृत, मागधी, पैशाची, शूरसेनी व विविध प्रांतीय अपभ्रंश भाषा असे भाषानिष्ठ सहा भेद असतात; अर्थात गद्यरूप काव्याचे असे भाषागत सहा भेद व छन्दोगताचेही असे सहा भेद मिळून एकूण बारा भेद संभवतात [ **'प्राकृतसंस्कृतमागधपिशाचभाषाश्च सूरसेनी च । षष्ठोऽत्र भूरिभेदो देशविशेषादपभ्रंशः ॥ 12 ॥'** ].[71] ह्यांपैकी अपभ्रंश भाषेचे व म्हणून त्या भाषेत रचलेल्या गद्यरूप व पद्यरूप काव्याचे विशिष्ट देशांतील विशिष्ट स्वरूपांच्या कारणाखातर अनेक पोटप्रकार संभवतात. पुन्हा ह्या गद्यरूप व पद्यरूप वाक्याचे श्लेषनिष्ठ पाच प्रकार होतात ते असे: संस्कृत+प्राकृत, संस्कृत+मागधी, संस्कृत+पैशाची, संस्कृत+सूरसेनी, संस्कृत+अपभ्रंश,[72] [ **'यस्मिन्नुचार्यन्ते सुव्यक्तविविक्तभिन्नभाषाणि । वाक्यानि यावदर्थं भाषाश्लेषः स विज्ञेयः ॥ 10 ॥'**[73] ]. ह्याशिवाय एकाच वाक्यात अनेक भाषा गुंफलेल्या असतात, हा जो भाषाश्लेषात्मक काव्याचा विद्वन्मान्य दुसरा प्रकार आहे त्याचे द्वैभाषिक, त्रैभाषिक असे एकूण सत्तावन्न पोटप्रकार होतात.[74] रुद्रटाच्या मते काव्यप्रबंध=काव्यरचना दोन प्रकारच्या असतात: 1 रसपूर्ण काव्ये व 2 कथा+आख्यायिका [ **सन्ति द्विधा प्रबन्धाः काव्यकथाख्यायिकादयः काव्ये ।**[75] ]. ह्यांत मुक्तक, कुलक, दशरूपके इत्यादी सर्वांचा समावेश होतो. ह्यांचे पुन्हा 1. उत्पाद्य [ वर्ण्य व्यक्ती इतिहासप्रसिद्ध वा पुराणप्रसिद्ध असते. पण तिचे चरित्रवर्णन कवि-कल्पित असते; कधी वर्ण्य व्यक्तीही कविकल्पित असते व तिचे चरित्रवर्णनही कविकल्पित असते; उदाहरणार्थ, धनपालविरचित तिलकमंजरी किंवा बाणभट्टरचित कादंबरी ], 2. अनुत्पाद्य [ वर्ण्य नायक व त्याचे चरित्र ह्या दोन्ही गोष्टी पूर्वप्रसिद्ध असतात ] असे दोन मुख्य प्रकार असतात व ह्यांचे पुन्हा दीर्घ व लघू असे उपप्रकार असतात [ **सन्ति द्विधा प्रबन्धा**

**काव्यकथाख्यायिकादयः काव्ये । उत्पाद्यानुत्पाद्या महल्लघुत्वेन भूयोऽपि ॥ 2 ॥**[76] ] अशा प्रकारे उत्पाद्य दीर्घ, उत्पाद्य लघू, अनुत्पाद्य दीर्घ व अनुत्पाद्य लघू असे चार प्रकार होतात. कथा व आख्यायिका हे काव्यप्रकार गद्यात तसेच गाथात (प्राकृत पद्यात) व संस्कृताप्रमाणेच प्राकृतादी भाषांतही रचलेले असतात. [ **इति संस्कृतेन कुर्यात्कथामगद्येन चान्येन ॥ 23 ॥**[77]; **'अथ तेन कथैव यथा रचनीयाख्यायिकापि गद्येन ।**[78] ] मेघदूतासारखी काव्ये ही लघुकाव्ये होत. तसे लघुगद्यरचनाप्रकार म्हणजे खण्डकथा होत.[79] ह्याखेरीज प्रशस्ती [यशःप्राप्त्यर्थ केले गेलेले ईश्वरकुलवर्णन], मुक्तक [ संपूर्ण अर्थ व्यक्त करणारे एक पद्य ], कुलक [ एकच विषय वर्णन करणारा पाच ते चौदा श्लोकांचा समूह ], संदानितक [एक अर्थ व्यक्त करणारे दोन श्लोक], विशेषक [तसेच तीन श्लोक], कलापक [तसेच चार श्लोक], कोष [स्वतंत्र अर्थांच्या अनेक श्लोकांचा संग्रह], परिकथा [ अनेक छंदांद्वारे व्यक्त होणारे एक वाक्य व अशा अनेक वाक्यांचा समूह ], तसेच नाटक, प्रकरण इत्यादी दशरूपके आदी काव्यप्रकार विविध भाषांत रचलेले असतात [ **अन्यद्वर्णकमात्रं प्रशस्तिकुलकादिनाटकाद्यन्यत् । काव्यं तद्बहुभाषं विचित्रमन्यत्र चाभिहितम् ॥ 36 ॥**[80] ]. ह्या विविध प्रकारच्या काव्यांत भारतवर्षातील स्त्रीपुरुषादींच्या जीवनातील आधिभौतिक सुखदुःखे, मानसिक क्लेश, दारिद्र्य, शारीरिक पीडा, इत्यादींची वर्णने वेगळी असावीत व इतर वर्षांतील स्त्रीपुरुषादींच्या जीवनातील वर्णने वेगळी असावीत [ **दारिद्र्यव्याधिजराशीतोष्णाद्युद्भवानि दुःखानि । बीभत्सं च विदध्यादन्यत्र न भारताद्वर्षात् ।**[81] ]. एतावता रुद्रटाने छंद, भाषा, भाषाश्लेष, रचनाप्रकार, उत्पाद्यानुत्पाद्यता, लघुदीर्घत्व व देश इत्यादी कसोट्यांच्या अनुरोधाने काव्याच्या व्याप्तीचे वर्णन केले आहे.

ह्यानंतर आता ध्वन्यालोककार आनंदवर्धन ह्याचे एतद्विषयक विचार जाणून घेऊ.

## (7) आनंदवर्धनांचा ध्वन्यालोक

इसवी सन 860 ते 890 ह्या कालावधीत[82] ज्याने आपली ग्रंथनिर्मिती केली त्या आनंदवर्धनाने आपल्या ध्वन्यालोक नामक ग्रंथात संघटना ह्या संकल्पनेची चर्चा करताना पुढीलप्रमाणे काव्यप्रभेदांची गणना केली आहे : मुक्तक [ संस्कृत, प्राकृत व अपभ्रंश भाषांत रचलेली कविता ], युग्मक किंवा सन्दानितक [ एक अर्थ व्यक्त करणारी दोन पद्ये ], विशेषक [ तशीच तीन पद्ये ], कलापक [ तशाच चार पद्यांचा समूह ], कुलक [ तशीच पाच पद्ये ], पर्यायबन्ध [ एकाच विषयाचे वर्णन करणारी खंडकाव्यात्मक रचना ], परिकथा [ अनेक वृत्तान्तबर्णनपर काव्य ], सकल कथा [फलश्रुतीपर्यंत सकलवृत्तान्ताचे वर्णन करणारी प्राकृत भाषेतील कविता], खंडकथा [ एकाच वृत्तान्ताचे वर्णन करणारी प्राकृतातील कविता ], सर्गबन्ध [श्रव्य महाकाव्य], अभिनेयार्थ [दशरूपकप्रभृती दृश्य काव्य], आख्यायिका [गद्यप्रधान श्रव्य काव्य], कथा [ गद्यप्रधान श्रव्य काव्य ], चंपू [ गद्यपद्यमय श्रव्य काव्य ], कोष

[ अन्योन्यनिरपेक्ष श्लोकांचा समूह ], संघात [एकच भाव सुरुवातीपासून अखेरपर्यंत वर्णन करणारा श्लोकसमूह], चक्रवाल, उदाहरण, बिरुदावली, भोगावली, तारावली, विश्वावली, रत्नावली, पंचाननावली [यतः **काव्यस्य प्रभेदाः मुक्तकं संस्कृतप्राकृतापभ्रंशनिबद्धम्, सन्दानितकविशेषककालापककुलकानि, पर्यायबन्धः, परिकथा, सकलकथाखण्डकथे, सर्गबन्धोऽभिनेयार्थमाख्यायिका कथेत्येवमादयः ।**[83]]. ह्यांपैकी कथानकयुक्त दीर्घ काव्यात उत्तम, मध्यम, अधम, दिव्य, मानवी, इत्यादी भिन्नभिन्न प्रकृतींच्या स्त्रीपुरुषांची वर्णने आढळून येतात [ **प्रकृतिर्ह्युत्तममध्यमाधमभावेन, दिव्यमानुषादिभावेन च विभेदिनी ।**[84] ]. ध्वनिमार्गाच्या अनुसरणाने कवीच्या प्रतिभेला कशी अपूर्व झळाळी प्राप्त होते आणि तिच्या योगे पूर्ववर्णित विषयांनाही अभिनव व रमणीय स्वरूप कसे लाभते, ते विशद करण्याच्या ओघात आनंदवर्धनाने असे निदर्शनास आणले आहे की, रस, भाव, रसाभास, भावाभास, भावप्रशम इत्यादींच्या स्वरूपाच्या रसादिमार्गाला त्या-त्या घटकांच्या विभाव, अनुभाव इत्यादी भेदोपभेदांमुळे अक्षरशः अपरिमितता प्राप्त होते. अर्थात, असंख्य प्राचीन कवींनी विविध मार्गांनी हाताळल्यामुळे काहीसा मर्यादित झालेला काव्यमार्ग [ म्हणजेच काव्याचे प्रकार किंवा आविष्कार ] शब्दशः अनन्त रूपे धारण करतो [ काव्याविष्कार अगणित मार्गांनी होतो ]. महाकवींची वाणी अशी अद्भुत असते [ '**दिशाऽनयाऽनुसर्तव्यो रसादिर्बहुविस्तरः । मितोऽप्यनन्ततां प्राप्तः काव्यमार्गो यथाश्रयात् ।**[85] ]. तसेच ध्वनिसापेक्ष व ध्वनिनिरपेक्ष अशा सर्व चेतन व अचेतन वर्ण्य विषयांचे अवस्था, देश, काल व स्वरूप यांच्या अनुरोधाने अगणित प्रकार होतात [ **'अवस्थादेशकालादिविशेषैरपि जायते । आनन्त्यमेव वाच्यस्य शुद्धस्यापि स्वभावतः' ॥ 111 ॥**[86] ]. थोडक्यात, प्रत्येक युगात जन्माला येणाऱ्या कवींच्या अपूर्व प्रतिभाविलासामुळे काव्यांच्या अर्थांच्या परंपरेत निरंतर वृद्धीच होत राहील, त्या परंपरेत कधीच कमतरता उत्पन्न होणार नाही. अशा प्रकारे आनंदवर्धनाने रचना-प्रकार, कथानक, दीर्घता-लघुता, रसादिमार्ग, अवस्था, देश, काल व स्वरूप ह्यांच्या अनुरोधाने काव्याचे अक्षरशः असंख्य प्रकार संभवतात व त्यांचा कधीही अंत होणे शक्य नाही, असे प्रतिपादन केले आहे.

आता ह्यानंतर राजशेखराच्या एतद्विषयक विवेचनाचे अवलोकन करू.

## (8) राजशेखराची काव्यमीमांसा

राजशेखराने इ. स. 875-900 च्या सुमारास रचलेल्या आपल्या ग्रंथाच्या दुसऱ्या अध्यायात वाङ्मयाची शास्त्र व काव्य अशी मूलभूत द्विविध विभागणी करून पुढे असा उपदेश केला आहे की, काव्ये ही शास्त्रपूर्वक रचिली जात असल्यामुळे होतकरू कवीने अपौरुषेय व पौरुषेय अशी उभयविध शास्त्रे अभ्यासावीत. ही उभयविध शास्त्रे काव्यात एकवटलेली आढळून येतात [ **इह हि वाङ्मयमुभयथा शास्त्रं काव्यं च । शास्त्रपूर्वकत्वात् काव्यानां पूर्वं शास्त्रेष्वभिनिविशेत ।**...'**सकल-**

**विद्यास्थानैकायतनं पञ्चदशं काव्यं विद्यास्थानम्' इति यायावरीयः ।'** [87] ]. काव्ये गद्यपद्यमय, कविधर्मरूप व हितोपदेशक असतात [ **'गद्यपद्यमयत्वात् कविधर्मत्वात् हितोपदेशकत्वाच्च ।**[88] ]. ज्यांना पुण्यविशेषरूप प्रतिभा जन्मतः लाभलेली असते असे महाकवी न पाहिलेल्याही देशांची, बेटांची व स्त्रीपुरुषांची, बिनचूक व चित्ताकर्षक वर्णने करू शकतात, अर्थात महाकाव्यादींत अशी वर्णने असतात [ **प्रतिभावतः पुनरपश्यतोऽपि प्रत्यक्ष इव ।…किञ्च न महाकवयोऽपि देशद्वीपान्तरकथापुरुषादिदर्शनेन तत्रत्यां व्यवहृतिं निबध्नन्ति स्म ।** [89] ]. सत्काव्यांमध्ये वेद, स्मृतिग्रंथ, रामायण-महाभारतादी इतिहास, अठरा पुराणे, न्याय-सांख्य-वैशेषिक-बौद्ध-जैन-चार्वाक इत्यादी दर्शने, शैव-पांचरात्रादी सिद्धान्त, अर्थशास्त्र, नाटयशास्त्र, कामशास्त्र, सामान्य ( अशिक्षित वा अल्पशिक्षित ) स्त्रीपुरुषांचा लौकिक व्यवहार, शिक्षित स्त्रीपुरुषांचा व्यवहार, दाक्षिणात्य-पौरस्त्य-प्रभृतींचे वर्तन, विविध शास्त्रान्तर्गत तत्त्वे व प्रमेये इत्यादींचे वर्णन आढळून येते. [90] शिवाय, श्रेष्ठ दर्जाचे कवी आपल्या काव्यांमध्ये दिव्य, दिव्यमानवी, मानवी, पातालीय, मर्त्यपातालीय, दिव्यपातालीय, दिव्यमर्त्य-पातालीय अशा विविध स्त्रीपुरुषांचे बोलणे, वागणे, विचार करणे, भावना व्यक्त करणे–थोडक्यात एकूण जगणे—इत्यादींचे वर्णन करतात.[91] पुन्हा, अशी वर्णने मुक्तकात, तसेच प्रबंधांत, संस्कृतात तसेच इतर भाषांतही केलेली असतात[92]. अशा प्रकारे राजशेखराने काव्याच्या व्यापकतेचे वर्णन शास्त्रपूर्वकत्व, छंद, कविधर्मत्व, हितोपदेशकत्व, वर्ण्य विषयांचे स्तर, स्त्रीपुरुष पात्रे, रचनाप्रकार व भाषा इत्यादींच्या संदर्भात केले आहे. राजशेखरानंतर होऊन गेलेल्या कुन्तकाची एतद्विषयक विचार-सरणी आता समजून घेऊ.

### (9) कुन्तकाचा वक्रोक्तिजीवित

राजशेखरानंतर सुमारे पन्नास वर्षांनी म्हणजे इ. स. 950 च्या आसपास[93] होऊन गेलेल्या आचार्य कुन्तकाने आपल्या ग्रंथामध्ये प्रस्तुत विषयाबद्दल अतिसंक्षिप्त चर्चा केली आहे. तिचे स्वरूप असे : रमणीय काव्यांत मोठमोठे राजे, त्यांचे प्रधान, इतर सेवक इत्यादी सर्वांची विविध कर्तव्ये व आचरणे यांचे चातुर्यपूर्ण वर्णन करण्यात येत असते. अर्थात लोकव्यवहाराच्या कार्यपरंपरेचे स्वरूप काव्याच्या सांगोपांग अभ्यासाने आह्लाददायकरीत्या स्पष्ट होते. [ **'व्यवहारो लोकवृत्तं तस्य परिस्पन्दो व्यापारः क्रियाक्रमलक्षणस्तस्य सौन्दर्यं रमणीयकं तद्व्यवहारिभिर्व्य-वहर्तृभिः सत्काव्याधिगमादेव कमनीयकाव्यपरिज्ञानादेव नान्यस्माद् आप्यते लभ्यत इत्यर्थः । कीदृशं तत्सौन्दर्यम्—नूतनौचित्यम् । नूतनमभिनवमलौकिकमौचित्यमुचित-भावो यस्य । तदिदमुक्तं भवति - महतां हि राजादीनां व्यवहारे वर्ण्यमाने तदङ्गभूताः सर्वे मुख्यामात्यप्रभृतयः समुचितप्रातिस्विककर्तव्यव्यवहारनिपुणतया निबध्यमानाः सकलव्यवहारिवृत्तोपदेशतामापद्यन्ते । ततः सर्वः क्वचित्कमनीयकाव्ये कृतश्रमः**

**समासादितव्यवहारपरिस्पन्दसौन्दर्यातिशयः श्लाघनीयफलभाग् भवतीति ।'** [94] ] असे हे काव्य शब्द व अर्थ दोन्ही एकत्र आल्याने सिद्ध होत असते. कुन्तकाने वाक्याच्या वक्रत्वाचे ( =सौन्दर्याचे ) प्रतिपादन करताना असा एक विचार मांडला आहे की, सृष्टीच्या आरंभापासून आजतागायत असंख्य श्रेष्ठ कवींनी आपापला प्रतिभाविलास प्रकट करून अगणित विषयांचे वर्णन केलेले असले तरी आजच्या कवींना आपल्या प्रतिभासामर्थ्याने वर्णन करता येतील असे असंख्य विषय अद्यापि शिल्लक आहेत. अर्थात सत्कवींना काव्यानुरूप विषयांची वाण कधीच भासत नसते. [ **'आसंसारं कविपुङ्गैः प्रतिदिवसगृहीतसारोऽपि । अद्याप्यभिन्नमुद्र इव जयति वाचां परिस्पन्दः ॥'**[95] ] काव्यातील ह्या वर्णनीय विषयांत चेतन व अचेतन अशा उभयविध पदार्थांचा समावेश होत असून त्यांचे वर्णन पुरुषार्थप्राप्तिसापेक्षपणे आणि पुरुषार्थप्राप्तिनिरपेक्षपणे असे उभयविध स्वरूपांत करण्यात येते [ **'भावानामपरिम्लानस्वभावौचित्यसुन्दरम् । चेतनानां जडानां च स्वरूपं द्विविधं स्मृतम् ॥ 5 ॥'** [96]; **'धर्मादिसाधनोपायपरिस्पन्दनिबन्धनम् । व्यवहारोचितं चान्यल्लभते वर्णनीयताम् ॥ 10 ॥'** [97] ].

एतावता कुंतकाने लोकव्यवहाराची अमर्यादता, विषयांची अगणितता व वस्तुमात्रांची असंख्यता ह्या तत्त्वत्रयीच्या अनुषंगाने एकूणच काव्याच्या—सुन्दर काव्याच्या-अनंतत्वाचा पुरस्कार केला आहे.

आता दशरूपककर्त्या धनंजयाच्या विवेचनाकडे दृष्टिक्षेप करू या.

## (10) धनंजयाचे दशरूपक

इसवी सनाच्या दहाव्या शतकाच्या शेवटच्या चरणात [98] होऊन गेलेल्या धनंजयाने आपला **दशरूपकम्** नामक ग्रंथ भरताच्या नाट्यशास्त्रान्तर्गत तत्त्वादींचे विवरण करण्यासाठी लिहिला आहे, आणि त्याच्यावर धनिक नामक त्याच्याच भावाने अवलोक नावाची टीका लिहिली आहे. अशा ह्या ग्रंथात धनंजयाने पुढीलप्रमाणे विचार मांडले आहेत: रूपकाचे नाटकप्रकरणादी दहा भेद असतात. नाटकादींच्या कथानकाचे आधिकारिक ( =मुख्य ) व प्रासंगिक ( =गौण ) असे मुख्य दोन भेद असतात [ **तत्राधिकारिकं मुख्यमङ्गं प्रासङ्गिकं विदुः ॥ 11 ॥** [99] ]. प्रासंगिकाचे पुन्हा पताका [कथानकाच्या शेवटपर्यन्त टिकणारी] व प्रकरी [ कथानकाच्या एखाद्या भागातच असणारी ] असे दोन पोटभेद असतात. [ **सानुबन्धं पताकाख्यं प्रकरी च प्रदेशभाक् ॥ 13 ॥** [100] ]. उपर्युक्त तीन भेदांचे प्रत्येकी इतिहासप्रसिद्ध, कविकल्पित व प्रसिद्ध-कल्पित-मिश्र असे आणखी वेगळ्या तत्त्वांनुसार तीन उपप्रकार होतात. [ **प्रख्यातोत्पाद्यमिश्रत्वभेदात्त्रेधापि तत्त्रिधा ।** [101] ]. अर्थात, नाटकादींतील मुख्य कथानक इतिहासप्रसिद्ध, पूर्णपणे कविकल्पित व अंशतः प्रसिद्ध व अंशतः कविकल्पित असे त्रिप्रकारक असू शकते. नाटकादींतील कथानकाच्या अखेरीपर्यंत टिकणारे गौण

कथानकही असे त्रिविध असू शकते, तद्वत नाटकाच्या एखाद्याच प्रवेशात किंवा अंकात असणारे गौणकथानकही असेच त्रिविध असते. शिवाय, नाटकाची उपरिर्वणित एकविध मुख्य व द्विविध गौण कथावस्तू पात्रांच्या दृष्टीने दिव्य, मर्त्य, पातालीय इत्यादी विविध स्वरूपांची असू शकते [ **'दिव्यमर्त्यादिभेदतः ।।'**[103] ]. म्हणजे कवीला जशी इतिहासातून मुख्य किंवा गौण कथावस्तू निवडण्याची किंवा ती स्वतंत्रपणे कल्पिण्याची मुभा असते तशीच मुभा कथानकात दिव्य, मानवी व पातालीय ह्यांपैकी कोणत्याही लोकातील पात्रांचे चरित्रवर्णन करण्याचीही असते. ह्याबाबतीत त्याला पूर्ण स्वातंत्र्य असते. नाटकातील कथानकाचे सूच्य [ म्हणजे ज्या भागाची फक्त सूचना दिली जाते, जो भाग रंगमंचावर प्रत्यक्षात अभिनयाद्वारे दाखविला जात नाही व म्हणून प्रेक्षकांकडून पाहिला जात नाही ] व दृश्यश्रव्य [ अर्थात जो भाग रंगभूमीवर प्रत्यक्षात दाखवला जातो व परिणामी प्रेक्षकांकडून पाहिलाही जातो ] असे दोन भाग असतात [ **द्वेधा विभागः कर्तव्यः सर्वस्यापीह वस्तुनः । सूच्यमेव भवेत्किंचिद्दृश्यश्रव्यमथापरम्** ।। 56 ।। [103] ]. ज्या गोष्टी नीरस किंवा रटाळ असतात आणि ज्या गोष्टी रंगभूमीवर प्रत्यक्षपणे दाखवणे उचित नसते त्या गोष्टी सूच्य मानल्या जातात आणि ज्या मधुर, उदात्त व रसभावसंपन्न असतात त्या दृश्यश्रव्य असतात.[104] सूच्य कथानकांशापैकी काही भाग मागधी, शकारी इत्यादी अशिष्ट प्राकृत भाषांत रचिलेला असतो.[105] नाट्यधर्मदृष्ट्या नाट्यवस्तूचे सर्वश्राव्य ( सर्वांनी ऐकावयाचे ), नियतश्राव्य ( काही पात्रांनीच ऐकावयाचे, इतरांनी ऐकावयाचे नाही ) व अश्राव्य ( कोणत्याच पात्राने ऐकावयाचे नाही ) असे त्रिभेद असतात [ **'सर्वेषां नियतस्यैव श्राव्यमश्राव्यमेव च ।'**[106] ] नाटकातील उच्च कुळातील व सत्प्रवृत्त पात्रांच्या तोंडी संस्कृत भाषा असली पाहिजे; तपस्विनी, महाराणी, मंत्रिकन्या व वेश्या यांच्या तोंडीही कधीकधी संस्कृत भाषेतील गद्य-पद्यांचा प्रयोग करावा; सर्वच स्त्रीपात्रांच्या तोंडी प्राकृत भाषा योजावी; अकुलीन पात्रांच्या तोंडी सौरसेनी भाषा योजावी, पिशाचजातीची आणि अत्यंत नीच जातीची पात्रे ही पैशाची वा मागधी भाषा बोलणारी असावीत; जे नीच पात्र ज्या देशातील असल्याचे नाटककाराने दाखवलेले असेल त्या नीच पात्राची त्या देशातील देशी भाषा असावी असे त्याने उपदेशिले आहे. कारणपरत्वे भाषाप्रयोगाच्या बाबतीत उलटफेर करण्यास हरकत नाही.[107] एकंदरीने नाटकातील पाठ्याचे स्वरूप कसे असावे ते धनंजयाने वरीलप्रमाणे वर्णिले आहे. आपल्या ग्रंथाच्या अखेरीस धनंजयाने एक व्यापक सिद्धान्त माडला आहे. तो असा की, ह्या दुनियेत रमणीय किंवा किळसवाणी, उदार किंवा नीच, उग्र किंवा प्रसन्न, गंभीर किंवा विकृत असलेली अशी एकही वस्तू नाही की जिला कविवाणीचा स्पर्श झाला की तिला भावाचे किंवा रसाचे स्वरूप प्राप्त होत नाही. म्हणजेच कविवाणीचा स्पर्श झाला की

कोणताही विषय रसभावसंपन्न बनतो व तो काव्यनाटकादीत वर्णन करण्याजोगा विषय ठरतो. [ **'रम्यं जुगुप्सितमुदारमथापि नीचमुग्रं प्रसादि गहनं विकृतं च वस्तु । यद्वाप्यवस्तु कविभावकभाव्यमानं तन्नास्ति यन्न रसभावमुपैति लोके ॥ 85 ॥'**[108] ]. एतावता धनंजय व त्याचा भाऊ धनिक ह्यांनी नाटकान्तर्गत काव्याची गौणमुख्यभाव, उत्पाद्यानुत्पाद्यता, पात्रांची दिव्यादिव्यता, सूच्यदृश्यनिष्ठा, भाषा, श्राव्याश्राव्यता, पात्राचा सामाजिक दर्जा, अशा विविध दृष्टिकोणांतून चर्चा केली असून सरतेशेवटी कविवाणीला कोणताही विषय वर्ज्य नसतो असा एक व्यापक सिद्धान्तही सांगितला आहे.

आता भोजाच्या एतद्विषयक मतांचा परिचय करून घेऊ.

## (11) भोजाचे सरस्वतीकण्ठाभरणम्

अकराव्या शतकाच्या[109] पूर्वार्धात होऊन गेलेल्या भोजाने आपल्या **सरस्वती-कण्ठाभरणम्** नामक ग्रंथात शब्दालंकारांना 'बाह्य' अलंकार [ **शब्दार्थोभयसंज्ञाभि-रलङ्कारान् कवीश्वराः । बाह्यानाभ्यन्तरान् बाह्याभ्यन्तरांश्चानुशासति ॥ 1 ॥** [110] ] म्हटले असून त्यांमध्ये 'जाति' नावाच्या अलंकाराची चर्चा सर्वप्रथम केली आहे [ **'ये व्युत्पत्त्यादिना शब्दमलङ्कर्तुमिह क्षमाः । शब्दालङ्कारसंज्ञास्ते ज्ञेया जात्यादयो बुधैः ॥ 2 ॥'** [111] ]. त्याच्या मते जाती म्हणजे संस्कृतादी भाषा [ **'तत्र संस्कृतमि-त्यादिर्भारती जातिरिष्यते ।'** [112] ]. त्यांचा औचित्यपूर्ण प्रयोग शोभून दिसतो, म्हणून तसा भाषाप्रयोग काव्याचा बाह्य अलंकार ठरतो. भोजाने ह्या संदर्भात संस्कृत, प्राकृत, पैशाची, मागधी, शौरसेनी, अपभ्रंश ह्या भाषांचा उल्लेख केला असून कवीने ह्या भाषा क्रमशः उत्तम, मध्यम, हीन, नाति-उत्तम, नाति-मध्यम व नाति-हीन पात्रांच्या तोंडी योजाव्यात असा उपदेश केला आहे.[113] अर्थात ह्या काव्याच्या भाषा म्हणून त्याला मान्य होत्या, असे ठरते. ह्या सहा शुद्ध म्हणजे मूळ स्वरूपात, (अमिश्रित स्वरूपात) वापरावयाच्या भाषांखेरीज संस्कृत+प्राकृत, संस्कृत+पैशाची इत्यादी साधारणभाषा तसेच काव्यातील पात्र, विषय, औचित्य इत्यादींच्या अनुरोधाने एकाच पद्यात संस्कृत-प्राकृतादींचे मिश्रण, इत्यादी भाषाप्रयोगही लेखकाने करावेत असे भोजाने सुचवले आहे. थट्टामस्करी, क्रीडागोष्ठी, नकला इत्यादींच्या वर्णनप्रसंगी कवीने संस्कृत-प्राकृतादींची मिश्रणे अवश्य योजावीत, अशी भोजाची सूचना आहे.[114] त्याने 'गति' नामक दुसरा शब्दालंकार विचारात घेतला असून त्याचे गद्य, पद्य व गद्यपद्यमिश्र असे तीन भेद नमूद केले आहेत [ **'पद्यं गद्यञ्च मिश्रञ्च वाक्यं यत् सा गतिः स्मृता । अथौचित्यादिभिः सापि वागलङ्कार इष्यते ॥ 18 ॥'** [115] ]. त्याने ह्याबाबतीत असा उपदेश केला आहे की, कवीने स्वतःचा तसेच काव्यगत पात्राचा विचार करून उपर्युक्त तीन माध्यमांचा यथामती, यथाशक्ती, यथौचित्य व यथारुची प्रयोग करावा [ **यथामति यथाशक्ति यथौचित्यं**

**यथारुचि । कवेः पात्रस्य चैतस्याः प्रयोग उपपद्यते ॥ 21 ॥** [116] ] भोजाने 'अध्येय' नामक शब्दालंकाराच्या लक्षणनिरूपणात उक्तिप्रधान काव्य, शब्दप्रधान शास्त्र, भूतकालीनार्थप्रधान इतिहास, काव्यद्वारा शास्त्रवर्णन, काव्यद्वारा प्राचीनेतिहासवर्णन आणि धर्मादी चार पुरुषार्थांचे वर्णन करणारा इतिहास असे सहा काव्यप्रकार मानले आहेत. [117] ह्याखेरीज त्याने आणखी तीन प्रकारच्या काव्याची नोंद व चर्चा केलेली आढळते. त्यांपैकी पहिला प्रकार म्हणजे 'श्रव्य' हा होय. हे काव्य फक्त ऐकावयाचे असते, ह्याचा अभिनय होत नसतो, त्यामुळे ते दृश्य नसते. ह्यात आशीर्वचन, नान्दी, नमस्क्रिया, वस्तुनिर्देश, प्रयोगफलवर्णनपर आक्षिप्तिका, व पात्रप्रवेशादिप्रयोजनाचे वर्णन करणारी 'ध्रुवा' यांचा समावेश होतो. [ **'श्रव्यं तत् काव्यमाहुर्यन्नेक्ष्यते नाभिनीयते । श्रोत्रयोरेव सुखदं भवेत् तदपि षड्विधम् ॥ 156 ॥ आशीर्नान्दी नमस्कारो वस्तुनिर्देश इत्यपि । आक्षिप्तिका ध्रुवा चेति शेषो ध्येयं भविष्यति ॥ 157 ॥'** [118] ] ह्या कोटीतील दुसरा प्रकार म्हणजे 'प्रेक्ष्य' काव्य. हे काव्य आंगिक अभिनयाने व्यक्त करावयाचे असते, पण त्याला वाचिक अभिनयाची जोड द्यावयाची नसते. ह्यात लास्य, ताण्डव, छलिक, शम्पा, हल्लीसक व रास ह्या सहांचा अन्तर्भाव होतो [ **'यदाङ्गिकैकनिर्वर्त्यमुज्झितं वाचिकादिभिः । नर्तकैरभिनीयेत प्रेक्षणाक्ष्वेडिकादि तत् ॥ 158 ॥ तल्लास्यं ताण्डवं चैव च्छलिकं शम्पया सह । हल्लीसकं च रासश्च षट्प्रकारं प्रचक्षते ॥ 159 ॥** [119] ]. ह्या वर्गातील तिसरा व शेवटचा काव्यप्रकार म्हणजे 'अभिनेय' काव्य. हे आंगिक, वाचिक, सात्त्विक, आहार्य, सामान्य व चित्र ह्या सहा प्रकारच्या अभिनयाच्या द्वारे व्यक्त करावयाचे असते. [ **'अङ्गवाक्सत्त्वाहार्याः सामान्यश्चित्र इत्यमी । षडत्राभिनयास्तद्वदभिनेयं वचो विदुः ॥ 161 ॥** [120] ] तात्पर्य, भोजाने भाषा, पात्रांचा दर्जा, छंद, उक्ती, शब्द, अर्थ, शास्त्र, इतिहास, पुरुषार्थ, श्रव्य, प्रेक्ष्य व अभिनेय अशा बहुविध स्वरूपाच्या काव्याचा परामर्श घेतला आहे.

आता ह्यानंतर क्षेमेन्द्राचे एतद्विषयक विचार जाणून घेऊ.

## (12) क्षेमेन्द्राचे कविकण्ठाभरणम्

क्षेमेन्द्राने आपल्या ग्रंथात संस्कृतातील गीते, प्राकृतातील गाथा व विविध देशी भाषांतील काव्ये ह्यांचा उल्लेख केला आहे [ **'गीतेषु गाथास्वथ देशभाषाकाव्येषु दद्यात् सरसेषु कर्णम् ।'** ]. [121] त्याशिवाय, काव्यात स्थावरजंगम सृष्टीच्या विविध अवस्था, त्यांची विविध स्वरूपे, समुद्राची भरती-ओहटी, आकाशातील ग्रह-नक्षत्र-तारे, चंद्रसूर्यांचे उदयास्त, षड्ऋतूंतील निसर्गाची बदलती रूपे, रानावनातील झाडेझुडपे, पशुपक्ष्यादींचे जीवन, इतिहासप्रसिद्ध व्यक्तींची जीवनगाथा, चित्रसंग्रहालये, पत्रव्यवहार, शिलालेख, शिल्पाकृती, वीरांची युद्धे, शोकसंतप्त व्यक्तींचा विलाप, स्मशानातील वातावरण, व्रतस्थ व्यक्तींची उपासना, यज्ञादी अनुष्ठाने,

4

सभागृहे, विद्यालये, कविसंमेलने, विद्वानांच्या सभा, विविध देशी भाषांमधून होणारा सामाजिक व्यवहार, इत्यादींची वर्णने असतात असे सूचित केले आहे.[122] आता ह्यानंतर मम्मटाची एतद्विषयक मते जाणून घेऊ.

## (13) मम्मटाचा काव्यप्रकाश

मम्मटाच्या 'काव्यप्रकाश' नामक सुप्रसिद्ध ग्रंथात प्रस्तुत विषयाबद्दल फारच थोडी चर्चा आढळते. ती अशी—मम्मटाच्या मते कवीची वाणी [ लेखणी ] जी काव्यनिर्मिती प्रकट करते ती नियतीच्या म्हणजे दैवाच्या नियमांपासून सर्वथा मुक्त, आल्हादैकमय, लेखणी-वाणीशिवाय अन्य कशाचेहीं बंधन न पाळणारी, आणि शृंगारादी नऊ रसांनी ओतप्रोत असल्यामुळे अतिरमणीय असते. [ **'नियतिकृतनियमरहितां ह्लादैकमयीमनन्यपरतन्त्राम् । नवरसरुचिरां निर्मितिमादधती भारती कवेर्जयति ॥ 1 ॥'**[123] ]. असे हे काव्य रमणीने केलेल्या उपदेशासारखा उपदेश देऊन तत्काल परम आनंद देते [ **'सद्यःपरनिर्वृतये कान्तासंमिततयोपदेशयुजे ॥ 2 ॥'**[124] ]. हे काव्य शब्द व अर्थ यांच्या योगाने सिद्ध होते व ते निर्दोष, सगुण व क्वचित्प्रसंगी अलंकारहीन असे असते. [ **'तददोषौ शब्दार्थौ सगुणावनलंकृती पुनः क्वापि ।'**[125] ]. अशा काव्यातील नायक इंद्रादींसारखे दिव्य, सामान्य माणसांसारखे अदिव्य आणि सामान्य मनुष्याप्रमाणे पृथ्वीवर अवतरलेले पण वस्तुतः दिव्य असलेले श्रीराम, श्रीकृष्ण ह्यांसारखे दिव्यादिव्य असे तीन प्रकारचे असतात [ **'प्रकृतयो दिव्या अदिव्या दिव्यादिव्याश्च वीररौद्रशृंगारशान्तरसप्रधाना धीरोदात्तधीरोद्धतधीरललितधीरप्रशान्ताः उत्तमाधममध्यमाश्च ।'**[126] ]. त्यांचे पुन्हा धीरोदात्तादी चार व अशा प्रकारच्या द्वारा नायकांचे प्रत्येकी उत्तमादी तीन मिळून एकूण छत्तीस प्रकार होतात. एवंच, काव्यात अशा छत्तीस प्रकारच्या नायकांची वर्णने असतात. एकंदरीने मम्मटाने स्वतंत्र, अनन्यपरतंत्र, आनंदैकमय, नवरससंपन्न, निर्दोष, सगुण, सालंकृत-निरलंकृत व विविध प्रवृत्तींचे नायक असलेले असे एकूण काव्यस्वरूप कल्पिले आहे, असे निष्पन्न होते.

आता वाग्भटालंकाराकडे वळू.

## (14) वाग्भटाचा वाग्भटालंकार

बाराव्या शतकाच्या प्रथमार्धात[127] होऊन गेलेल्या ह्या जैन काव्यशास्त्रकाराने आपल्या ग्रंथात असे प्रतिपादन केले आहे की, कवी आपल्या काव्यांमध्ये भू, भुवस्, स्वर्ग, महस्, जन, तप व सत्य या सात किंवा ह्या सातांशिवाय तल, वितल, सुतल, नितल, तलातल, रसातल व पाताल ह्या सात मिळून चौदा लोकांची वर्णने करीत असतात [ **भुवनानि निबध्नीयात् त्रीणि सप्त चतुर्दश ।**[128] ]. अशी वर्णने संस्कृत, संस्कृतोद्भव प्राकृत, संस्कृतसम प्राकृत, देश्य ( देशी = प्रांतीय ), विशिष्ट प्रदेशात निर्मिश्र स्वरूपात बोलल्या जाणाऱ्या अपभ्रंश तसेच पिशाचप्रभृती निम्न जाति-

जमातींच्या भाषा, ह्यांमध्ये केलेली असतात, अर्थात ह्या सर्व काव्यव्यवहाराच्या भाषा म्हणून मान्य केल्या गेल्या आहेत [ **'संस्कृतं प्राकृतं तस्यापभ्रंशो भूतभाषितम् । इति भाषाश्चतस्रोऽपि यान्ति काव्यस्य कायताम् ॥ 1 ॥'**[129] ]. अशा विविध भाषांमध्ये रचले गेलेले काव्य पद्यात, गद्यात किंवा पद्यगद्यसंमिश्र स्वरूपात असते. [ **'छन्दोनिबद्धमच्छन्द इति तद्वाङ्मयं द्विधा । पद्यमाद्यं तदन्यच्च गद्यं मिश्रं च तद्द्वयम् ॥ 4 ॥'**[130] ] अशा प्रकारे तीन माध्यमांत व अनेक भाषांत लिहिल्या जाणाऱ्या काव्यांत निसर्गातील वस्तूंची स्वाभाविक रूपे, विविध ऋतूंतील निसर्गाची स्थितिगती, वेगवेगळ्या भौगोलिक प्रदेशांतील वस्तुस्थिती, पशुपक्ष्यादींचे स्वभाव, मनुष्य व पशुपक्षी यांचे जीवन इत्यादी अनेक विषयांची वर्णने केलेली असतात[131]. अशा प्रकारे वाग्भटाने लोक, भाषा, छंद व स्थावरजंगमाची स्थितिगती ह्यांच्या व्यापक व संमिश्र विलसितांची कल्पना केली आहे.

आता हेमचन्द्राचे एतद्विषयक विवेचन समजून घेऊ.

## (15) हेमचन्द्राचे काव्यानुशासनम्

वाग्भटाप्रमाणेच हेमचन्द्रही एक जैन आचार्य होता. त्याने आपल्या काव्यानुशासनात असे प्रतिपादन केले आहे की, अदोष, सगुण व क्वचित सालंकृत तर क्वचित निरलंकृत अशा शब्दार्थरूपी काव्यात नऊ स्थायिभाव, तेहत्तीस व्यभिचारिभाव, आठ सात्त्विकभाव, रसाभास, भावाभास इत्यादींची वर्णने केलेली असतात.[182] ह्याचे पुन्हा व्यंग्यार्थप्रधान, व्यंग्यार्थ-अप्रधान व व्यंग्यार्थरहित असे तीन पोटभेद असतात.[133] एकाच पद्यात संस्कृत+प्राकृत, संस्कृत+मागधी, संस्कृत+पैशाची, संस्कृत+शूरसेनी, संस्कृत+अपभ्रंश अशी निरनिराळी मिश्रणे असू शकतात.[134] अशा भाषादृष्ट्या मिश्र काव्यांत कधी दोन, कधी तीन, कधी चार, कधी पाच तर कधी सहा भाषा एकत्र गुंफलेल्या असतात. त्यामुळे अशा विविध भाषामिश्र काव्यांची एकूण संख्या 57 होते.[135] काव्याचे प्रेक्षणीय व श्रवणीय असे दोन मुख्य भेद असतात. प्रेक्षणीयाचे पाठ्य व गेय असे दोन उपभेद असतात; पाठ्यात नाटक, प्रकरण, नाटिका, समवकार, ईहामृग, डिम, व्यायोग, उत्सृष्टिकांक, प्रहसन, भाण, वीथी, सट्टक व तोटक ह्या वाक्यार्थाभिनयात्मक काव्यांचा अन्तर्भाव होतो; तर गेय उपभेदात डोंबिका, भाण, प्रस्थान, शिंगक, प्रेरण, रामाक्रीड, हल्लीसक, रासक, गोष्ठी, श्रीगदित, रागकाव्य, शम्या, छलित, द्विपदी ह्या पदार्थाभिनयात्मक काव्यांचा समावेश होतो. श्रवणीय काव्याचे महाकाव्य, आख्यायिका, कथा, चंपू, व अनिबद्ध मुक्तके असे पोटप्रकार असतात.[136] महाकाव्ये ही संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश व ग्रामीण ह्यांपैकी कोणत्याही भाषेत रचलेली असू शकतात[137]. आख्यायिका संस्कृत भाषेत व गद्यात रचलेली असते[138], तर कथा गद्यात किंवा पद्यात तसेच कोणत्याही भाषेत रचली जाऊ शकते.[139] कथेचे आख्यान, निदर्शन, प्रवल्हिका, मतल्लिका, मणिकुल्या,

परिकथा, खण्डकथा, सकलकथा, उपकथा व बृहत्कथा इत्यादी उपभेद असतात.[140] हे सर्व कथासाहित्य व चंपूसाहित्य गद्यपद्योभयात्मक असते.[141] श्रवणीय काव्याचा जो अन्तिम उपप्रकार अनिबद्ध काव्य त्याचे मुक्तक, संदानितक, विशेषक, कलापक, कुलक, उपनिबन्ध, कोश, संघात, संहिता असे अगणित पोटभेद असतात.[142] ही अनिबद्ध काव्ये कोणत्याही भाषेत रचलेली असू शकतात, त्याबाबतीत कोणतेही बंधन नसते. मात्र आख्यायिका, कथा, चंपू व अनिबद्ध या सर्व काव्यांत मुख, प्रतिमुख इत्यादी संधींची ( विभागांची ) सुंदर गुंफण, शब्दवैचित्र्य, अर्थवैचित्र्य व उभयवैचित्र्य ही सगळी वैशिष्ट्ये, महाकाव्यात असतात तशी, असावी लागतात.[143] एकंदरीने हेमचन्द्राने काव्यातील गुण, दोष, अलंकार, रस, भाव, व्यंग्यार्थ, भाषा, भाषामिश्रण, प्रेक्ष्यत्व, श्रव्यत्व, पाठ्यत्व, गेयत्व, अशा बहुविध मुद्यांचा विचार केला आहे. तो करताना त्याने काही महत्त्वाच्या कल्पना मांडल्या आहेत, त्यांची चर्चा प्रस्तुत लेखाच्या समारोपात करू.

तूर्त चौदाव्या शतकात[144] होऊन गेलेल्या वाग्भटाच्या **काव्यानुशासन** ग्रंथावर नजर टाकू.

## (16) वाग्भटाचे काव्यानुशासनम्

हादेखील पूर्ववर्णित वाग्भटाप्रमाणे जैन ग्रंथकार असून त्याने मम्मटाप्रमाणेच **'शब्दार्थौ निर्दोषौ सगुणौ प्रायः सालंकारौ काव्यम् ।'** असेच काव्याचे स्वरूप मानले असून त्याचे गद्य, पद्य व गद्य-पद्य-मिश्र असे तीन भेद मानले आहेत; त्याच्या मते महाकाव्य हे संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश किंवा ग्रामीण भाषेत रचलेले असते; मात्र त्यातील कथानक लोकप्रसिद्ध असते, कविकल्पित असत नाही; प्रकरणिका हा प्रकरण ह्या दशरूपकांपैकी एकाचाच उपभेद समजावा.[145] त्याने मुक्तक, आख्यायिका, दशरूपक इत्यादी मुद्यांच्या विवेचनाच्या बाबतीत हेमचन्द्राचे अनुसरण केले आहे त्यामुळे त्या विवेचनात वेगळेपणा आढळत नाही.

आता विश्वनाथाच्या **साहित्यदर्पणम्** ह्या प्रसिद्ध ग्रंथाकडे वळू.

## (17) विश्वनाथाचे साहित्यदर्पणम्

विश्वनाथाने प्रथमतः ध्वनिकाव्य व गुणीभूतव्यंग्य काव्य असे काव्याचे दोन मुख्य प्रभेद सांगून तदनंतर दृश्य व श्रव्य असे इतरांनी पूर्वी प्रतिपादिलेले दोन प्रकार सांगितले आहेत. त्याचे दृश्य काव्यनिरूपण पूर्वसूरींच्या एतद्विषयक निरूपणासारखेच आहे. त्यात फक्त एकच उल्लेखनीय वैशिष्ट्य आहे. ते असे की, विश्वनाथाने उप-रूपकाचे नाटिका, त्रोटक, गोष्ठी, सट्टक, नाट्यरासक, प्रस्थानक, उल्लाप्य, काव्य, प्रेङ्खण, रासक, संलापक, श्रीगदित, शिल्पक, विलासिका, दुर्मल्लिका, प्रकरणिका, हल्लीश व भाणिका असे अठरा प्रकार लक्षणोदाहरणांसह निरूपिले आहेत.[146] ह्या सर्व दृश्य काव्यांत सुखदुःखात्मक मानवी जीवनाचे वर्णन केलेले असते, त्याच्या

दर्शनाने रसिकाला विविध भावभावनांची प्रचीती येते. ह्या सर्व प्रकारच्या काव्यांत राजे, राजपुत्र श्रीकृष्णासारख्या दिव्य व्यक्ती, रामासारख्या दिव्यादिव्य व्यक्ती, आणि चारुदत्तासारख्या अदिव्य व्यक्तीही पात्ररूपाने असतात. ह्याशिवाय सुशिक्षित स्त्रीपुरुष, राजवाड्यातील दास, दासी, चेट, विट, शहरातील व्यापारी, धूर्त, जुगारी, सैनिक, नागरिक, शबर-शक-यवनांसारखे परकीय, आभीर-चांडालप्रभृती निम्न-जातीय, लोहार-सुतार-गवळी-पारधी-प्रभृती विभिन्न व्यावसायिक, बालक, नपुंसक, ज्योतिषी, उन्मत्त, रोगी इत्यादी भिन्नभिन्न थरांतील, व्यवसायांतील, वयोगटांतील, व्यक्तींचे आणि त्यांच्या संस्कृत, शौरसेनी, महाराष्ट्री, मागधी, अर्धमागधी, गौडी, आवन्ती, दाक्षिणात्या, बाह्लीक, द्राविडी, आभीरी, चंडाली, शाबरी, पैशाची इत्यादी निरनिराळ्या भाषांचे दर्शन घडते. हे सर्व दृश्य काव्याचे स्वरूपवर्णन झाले. [147] श्रव्य काव्याचे पद्य व गद्य असे दोन प्रमुख भेद असतात. [148] पैकी पद्यात मुक्तक, कुलक, संघात, महाकाव्य, काव्य ( =संस्कृत, प्राकृत किंवा अपभ्रंश भाषेत रचलेले, सर्ग-रहित, संधिसामग्रीशून्य, एकाच कल्पनेचे किंवा आशयाचे वर्णन करणारे संगृहीत श्लोक ), खंडकाव्य व कोश एवढ्या उपप्रकारांचा समावेश होतो. [149] तर गद्यात मुक्तक ( समासरहित शब्दरचना ), वृत्तगंधी ( छंदाच्या स्पर्शाने युक्त ), उत्कलिका-प्राय ( दीर्घसमासांनी युक्त ), चूर्णक ( लघुसमासांनी युक्त ), कथा ( उदा० बाणाची कादंबरी ), आख्यायिका ( उदा० बाणाचे हर्षचरित ), आख्यान ( उदा० पंचतंत्र ) यांचा अन्तर्भाव होतो. [150] चंपू, बिरुद ( राजप्रशस्तिपर गद्यपद्यात्मक रचना ) आणि करभक ( विविध भाषांमध्ये रचलेले गद्यपद्यमिश्र काव्य, उदा० विश्वनाथकृत प्रशस्तिरत्नावली. हिच्यात त्याने सोळा भाषा वापरल्या आहेत ) हे गद्यपद्योभयात्मक काव्यप्रकार होत. [151] विश्वनाथाचे हे काव्यस्वरूपवर्णन बऱ्याच अंशी पूर्वीच्या शास्त्र-कारांनी केलेल्या काव्यस्वरूपवर्णनासारखेच असले तरी काही अंशी ते वैशिष्ट्यपूर्णही आहे. ती वैशिष्ट्ये वर नमूद केलीच आहेत. शिवाय, त्यांचे संकलन व समालोचन लेखान्ती करावयाचेच असल्यामुळे ह्यानंतरच्या ग्रंथकाराकडे वळू.

## (18) केशवमिश्राचा अलङ्कारशेखर

केशवमिश्राने आपला प्रस्तुतचा ग्रंथ सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धात रचिला.[152] त्यात त्याने देवादींच्या संस्कृत, किन्नरादींच्या प्राकृत, पिशाचादींच्या पैशाची व हीन-जातींच्या मागधी ह्या भाषांचा निर्देश केला असून त्या-त्या पात्रांच्या तोंडी कवीने त्या-त्या भाषा योजाव्यात असे सुचवले आहे. अर्थात ह्या काव्यरचनेच्या कवि-विद्वन्मान्य भाषा ठरतात. [ **'देवाद्याः संस्कृतं प्राहुः प्राकृतं किन्नरादयः । पैशाचीं च पिशाचाद्या मागधीं हीनजातयः ॥'** [153] ] त्याच्या मते गद्य, पद्य व मिश्र असे काव्य त्रिविध असते; पैकी गद्याचे उत्कलिकाप्राय व पद्यगन्धी असे दोन भेद असतात., पद्याचे गणवृत्ते, मात्रावृत्ते, समवृत्ते, विषमवृत्ते असे असंख्य भेदोपभेद असतात

[ **'गद्यं पद्यं च मिश्रं च तत् त्रिधैव व्यवस्थितम् । गद्यमुत्कलिकाप्रायं पद्यगन्धीति च द्विधा । तत्रापि पद्यं तदपि वृत्तकं वर्णमात्रयोः । समवैषम्यभेदेन तदानन्त्याय कल्पते ।'**[154] ]. केशवमिश्राने पूर्वसूरींप्रमाणेच काव्यशरीराचे संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश व मिश्र असे चार भेद नमूद करून प्राकृत भाषांचे अनेक भेदोपभेद असतात व अपभ्रंश भाषा म्हणजे त्या-त्या प्रांतविशेषांत शुद्ध स्वरूपात बोलल्या जाणाऱ्या भाषा होत, असे विवेचन केले आहे.[155] कवीने ह्या चार भाषांचा महाकाव्यादी रचनाप्रकारांत यथामती, यथाशक्ती, यथौचित्य व यथारती उपयोग करावा असा उपदेश केशवमिश्राने, भोजाचा अनुवाद करून, केला आहे. एवंगुणविशिष्ट विविध स्वरूपाच्या काव्यात राजे, राजपुत्र, राण्या, अंतःपुरे, विविध देश, गावे, शहरे, नद्या, सरोवरे, समुद्र, राने, उद्याने, पर्वत, सैन्याचे कूच, रणांगणावरील हत्ती, घोडे इत्यादी, चंद्र-सूर्य, षड्ऋतू, विवाह, स्वयंवर, फुले-फळे, झाडे-झुडपे, पशुपक्षी, शिकारी इत्यादींची वर्णने दिव्य, मर्त्य व दिव्यादिव्य स्त्रीपुरुष पात्रांच्या अनुरोधाने केलेली असतात.[156] एकंदरीने केशवमिश्राचे प्रस्तुत विषयाच्या बाबतीतील वरील विचार पूर्वींच्या विचारवंतांच्या पुनरुच्चारासारखे आहेत. जगन्नाथाच्या रसगंगाधरात प्रस्तुत विषयाबद्दल विशेष चर्चा आढळत नाही. त्यामुळे येथवर काव्याच्या स्वरूपाच्या व व्याप्तीच्या बाबतीतील निरनिराळ्या काव्यशास्त्रज्ञांचे जे विचार समजून घेतले त्यांचे विश्लेषण केल्यावर कोणते निष्कर्ष हाती येतात ते पाहू.

## (19) निष्कर्ष

वरील तपशिलाचे विश्लेषण केल्यावर प्राचीन भारतीय साहित्यशास्त्रकारांनी वर्णिलेल्या साहित्याच्या स्वरूपाची खालील वैशिष्टचे प्रतीत होतात :

( i ) प्राचीन भारतीय साहित्य विषयदृष्टचा अतिशय व्यापक व सर्वसमावेशक होते. साहित्यिकाला स्वकल्पित, इतिहासप्रसिद्ध, ध्वनिसापेक्ष, ध्वनिनिरपेक्ष, पुरुषार्थ-प्राप्तिसापेक्ष, अशा कोणत्याही विषयावर साहित्यनिर्मिती करण्याची पूर्ण मुभा होती; कोणताही विषय वर्ज्य नव्हता. डॉ. वॉर्डर रास्तपणे म्हणतात त्याप्रमाणे : "the writers wrote on every conceivable subject."[157] इतकेच नव्हे तर कवीच्या अद्भुत शक्तिसंपन्न वाणी-लेखणीचा स्पर्श झाला की, अत्यंत टाकाऊ, कुरूप, निकृष्ट वा विकृत अशा विषयालाही सुन्दर, सरस व संस्मरणीय स्वरूप प्राप्त होत असे. त्यामुळे सत्कवींना कधीही विषयांची वाण भासत नसे; त्यांना सतत अभिनव व मनोरम विषय सुचत असत व ते तितकेच अभिनव व मनोहर काव्यरूप धारण करीत असत.

( ii ) प्राचीन साहित्यिकाला कोणताही विषय निवडण्याची जशी मुभा होती तशीच कोणत्याही भारतीय भाषेत साहित्यकृती सिद्ध करण्याचीही मुभा होती. त्याला संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश, मागधी, पैशाची, शूरसेनी ह्या मुख्य भाषा; विविध

प्रांतांतील प्रांतिक भाषा, शबर-चांडाल-प्रभृतींच्या जातिभाषा इत्यादींपैकी कोणत्याही भाषेचा वापर करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य होते. इतकेच नव्हे तर, संस्कृत+प्राकृत, संस्कृत+मागधी इत्यादी भाषांची साधारण व विशेष मिश्रणे करण्यासही कोणताच प्रतिबंध नव्हता. परिणामी द्वैभाषिक, त्रैभाषिक, अनेकभाषिक काव्यरचना साकार होत होत्या. प्रत्येक भाषेचे साहित्यिक अत्यंत उत्साहाने साहित्यनिर्मिती करीत होते. भिन्नभिन्न भाषांत व भाषामय साहित्यांत क्रिया-प्रतिक्रिया होत होती. जणू तत्कालीन भारताचा प्रत्येक कोनाकोपरा साहित्यिक वातावरणाने दुमदुमत होता; ह्या साहित्यिक ध्वनीचे प्रतिध्वनी बृहत्तर भारतातही उमटत होते. उदाहरणार्थ, भट्टीच्या रावणवध काव्याचे भाषान्तर जावा देशात झाले होते व ते तिकडे खूप रसिकप्रिय बनले होते.[158] तर इसवी सनाच्या चौथ्या शतकातील चन्द्रगोमिन् नामक बौद्ध नाटककाराचे लोकानन्द नावाचे पाच अंकी नाटक इसवी सनाच्या सातव्या शतकात समस्त भारतातच नव्हे तर जपानमध्येही खूप गाजत होते.[159] हे लक्षात घेता डॉ. वॉर्डर यांचे पुढील उद्गार यथार्थ वाटतात : "....The gradually increasing popularity of Sanskrit eventually eliminated the barriers of dialect and consolidated a pan-Indian republic of civilization and culture in defiance of the spread of monarchial and feudal institutions in its ever fragmenting political parts."[160] तात्पर्य, प्राचीन भारतीय साहित्य भाषादृष्टचा एकदेशीय नव्हते तर ते समग्रदेशीय किंवा राष्ट्रीय ( National ) होते, असे निखालसपणे म्हणता येते.

( iii ) प्राचीन भारतीय साहित्याची ही व्यापकता त्यातील पात्रांच्या रेखाटनाच्या संदर्भातही जाणवते. प्राचीन साहित्यात दिव्य, दिव्यमानवी, मानवी, पातालीय, मर्त्यपातालीय, उत्तम, मध्यम, नाति-उत्तम, हीन, नातिमध्यम, राजा, राजपुत्र, राजर्षी, सेनापती, दासदासी, शिक्षित-अशिक्षित, चेट, विट, व्यापारी, धूर्त, जुगारी, सैनिक, नागरिक, लोहार, सुतार, सोनार, चांडाल, बालके, ज्योतिषी, उन्मत्त, रोगी इत्यादी सर्व लोकांतील, सामाजिक थरांतील, व्यवसायांतील, जातिजमातींतील, वयोगटांतील, भिन्न शारीरिक व मानसिक अवस्थांतील स्त्री-पुरुषांचे स्वभावदर्शन घडवण्यात येत असे. पात्रांच्या निवडीवर जात, व्यवसाय, दर्जा, वय, लिंग ह्यांपैकी कशाचेही बंधन नसे. एकंदरीने पात्रदृष्ट्या समस्त भारतीय समाज विषय बनून साहित्यात प्रतिबिंबित होत असे. म्हणजेच, प्राचीन भारतीय साहित्य हे तत्कालीन समाजाच्या विविध थरांचे व गटांचे प्रातिनिधिक दर्शन घडवते असे, असे म्हणता येते. प्राचीन भारतातील विविध भाषांतील ललित साहित्याचा विस्तृत आढावा घेऊन डॉ. वॉर्डर ह्यांनी ह्याबाबतीत पुढील निष्कर्ष काढला आहे, तो यथायोग्य वाटतो :

"In the earlier period and in the later period of heroic

struggle, kāvya was a national literature, or more correctly the literature of a civilization, not the literature of a class." [161]

ह्या वस्तुस्थितीला साहित्याच्या क्षेत्रातील लोकशाहीच म्हणता येईल.

( iv ) प्राचीन भारतीय साहित्याचे अन्तिम ठळक वैशिष्ट्य असे की, ते बाह्याकारदृष्ट्याही कमालीचे वैविध्यपूर्ण होते. गद्य, पद्य व गद्यपद्यमिश्र ही तर त्याच्या अभिव्यक्तीची अगदी ढोबळ माध्यमे होती. त्याचे काही प्रकार केवळ ऐकण्यासाठी, काही केवळ पाहण्यासाठी तर काही ऐकण्यासाठी व पाहण्यासाठी असे उभयविध होते. पठनीय साहित्यात मुक्तक, संदानितक, कुलक, विशेषक, पर्यायबंध, परिकथा, खंडकथा, सकलकथा, महाकाव्य, कोष, करभक, आख्यान, बृहत्कथा, चंपू इत्यादींचा समावेश होत असे; तर श्रवणीय साहित्यात आशीर्वचन, नांदी, नमस्क्रिया, प्रयोगफलवर्णन, पात्रप्रवेशादिप्रयोजन-वर्णन नामक सहा ध्रुवा यांचा अन्तर्भाव होत असे आणि श्रवणीय व प्रेक्षणीय अशा उभयस्वरूपी साहित्यात लास्य, छलित, शंपा इत्यादी अभिनयद्वारे व्यक्त होणारे साहित्य, रूपकाचे नाटकादी दहा प्रकार, गेय पाठ्याचे डोंबिकाप्रभृती उपभेद, इत्यादींचा समावेश होत असे. ह्याखेरीजसुद्धा गीते, गाथा, प्रशस्ती, देशी भाषेतील काव्ये रचली व आस्वादली जात असत. ह्या असंख्य साहित्यप्रकारांत एकोक्ती ( monologue. ), लोकगीते, ग्रामीण गीते या सर्वांचा अन्तर्भाव होत असे. शिवाय हे समग्र साहित्य जाति-धर्म-संप्रदाय-निरपेक्ष ( secular ) होते.

एतावता भारतीय साहित्यशास्त्रकारांनी विवेचिलेले 'साहित्य' अभिव्यक्ति-प्रकारांच्या दृष्टीने अनन्तमुखी, भाषांच्या दृष्टीने अखिल भारतीय, वर्ण्यविषयांच्या दृष्टीने सर्वभावस्पर्शी व तदन्तर्गत वर्णित पात्रांच्या दृष्टीने सकल-समाज-व्यापी होते. त्याची ही सर्वांगीण विविधता, व्यापकता व विचित्रता ध्यानात घेता त्याला 'भारतीय ललित साहित्य' ही संज्ञा देणे योग्य ठरेल.

**संदर्भ टीपा**


1. भरत, **नाट्यशास्त्रम्** श्रीमदभिनवगुप्तविरचितविवृतिसमेतम्, *Vol II*, संपा., एम्. रामकृष्ण कवि, बडोदे, गायकवाड ओरिएण्टल सीरीज्, 1934, पृ. 347.
2. भामह, काव्यालङ्कार, [ **भामहालङ्कार** ], भाष्यकार देवेन्द्रनाथ शर्मा, पटना, बिहार-राष्ट्रभाषा-परिषद्, 1962, पृ. 46, 63.
3. तत्रैव, पृ. 37, 53. 4. तत्रैव, पृ. 49. 5. तत्रैव, पृ. 67
6. तत्रैव, पृ. 7, 14, 30, 53 इ. 7. तत्रैव, पृ. 8, 17, 31, 32, 67, 71 इ.
8. तत्रैव पृ. 29, 66, 139, इ 9. तत्रैव, पृ. 44 इ. 10. तत्रैव, पृ. 7.
11. P. V. Kane, *History of Sanskrit Poeties* [ *HSP* ], Third revised ed., Delhi, Motilal Banarsidass, 1961, p. 324.

12. **भामहालङ्कार**, उपरिनिर्दिष्ट, पृ. 9. 13. तत्रैव 14. तत्रैव
15. तत्रैव, पृ. 10. 16. तत्रैव 17. तत्रैव, पृ. 14. 18. तत्रैव पृ. 15.
19. तत्रैव 20. तत्रैव, पृ. 16. 21. तत्रैव, पृ. 15. 22. तत्रैव
23. तत्रैव, पृ. 16. 24. तत्रैव, पृ. 17. 25. तत्रैव, पृ. 37.
26. दण्डि, **काव्यलक्षणम्**, संपा. अनन्तलाल ठाकुर व उपेन्द्र झा, दरभंगा, मिथिला इन्स्टिट्यूट ऑफ् पोस्ट-ग्रॅज्युएट स्टडीज् ॲण्ड रीसर्च इन् संस्कृत लर्निंग, 1957, पृ. 7.
27. तत्रैव, पृ. 8. 28. तत्रैव 29. तत्रैव, पृ. 9. 30. तत्रैव
31. तत्रैव, पृ. 10. 32. तत्रैव, पृ. 11. 33. तत्रैव, पृ. 14. 34. तत्रैव
35 तत्रैव, पृ. 13. 36. तत्रैव, पृ. 14. 37. तत्रैव, पृ. 15.
38. तत्रैव, पृ. 19. 39. तत्रैव 40. तत्रैव, पृ. 22. 41. तत्रैव
42. तत्रैव, पृ. 23. 43. तत्रैव 44. तत्रैव, पृ. 24. 45. तत्रैव, पृ. 25.
46. तत्रैव, पृ. 26. 47. तत्रैव, पृ. 27. 48 तत्रैव, पृ. 67.
49. तत्रैव, पृ. 54. 50. तत्रैव, पृ. 56.
51. उद्भट, **काव्यालंकारसारसंग्रहः**, संशो. ना. द. बनहट्टी, प्रथम, पुणे, भाण्डारकर प्राच्यविद्यासंशोधनमन्दिर, 1925, पृ. 82-84.
52. *HSP*, p. 147.
53. वामन, **काव्यालंकारसूत्रवृत्तिः**, संपा. नारायण नाथाजी कुळकर्णी, पुणे, ओरिएण्टल् बुक एजन्सी, 1927, पृ. 13.
54. तत्रैव 55. तत्रैव 56. तत्रैव पृ. 14. 57. तत्रैव
58. तत्रैव, पृ. 15. 59. तत्रैव 60. तत्रैव 61. तत्रैव
62. तत्रैव 63. तत्रैव, पृ. 2. 64. तत्रैव 65. तत्रैव
66. तत्रैव, पृ. 47. 67. *HSP*, p. 155.
68. रुद्रट, **काव्यालंकार [ रुद्रटालंकार ]**, संपा. दुर्गाप्रसाद व वा. ल. पणशीकर, तृतीय, मुंबई, निर्णयसागर मुद्रणालय, 1928, पृ. 8.
69. तत्रैव, पृ. 13. 70. तत्रैव, पृ. 11. 71. तत्रैव, पृ. 13.
72. तत्रैव, पृ. 40-42. 73. तत्रैव, पृ. 39. 74. तत्रैव, पृ. 44.
75. तत्रैव, पृ. 167. 76. तत्रैव 77. तत्रैव, पृ. 170.
78. तत्रैव, पृ. 171. 79. तत्रैव, पृ. 172. 80. तत्रैव, पृ. 172.
81. तत्रैव, पृ. 173. 82. *HSP*, p. 202.
83. आनन्दवर्धनाचार्य, **ध्वन्यालोकः**, संपा. शोभितमिश्र, द्वितीय, बनारस, चौखम्बा-संस्कृत-सीरीज, 1953, पृ. 282-85.
84. तत्रैव, पृ. 299. 85. तत्रैव, पृ. 596. 86. तत्रैव, पृ. 633.

87. राजशेखर, **काव्यमीमांसा**, संपा. सी. डी. दलाल व इतर, तृतीय, बडोदे, ओरिएण्टल इन्स्टिटचूट, 1934, पृ. 2, 4.

88 तत्रैव, पृ. 4. 89. तत्रैव, पृ. 11-12. 90. तत्रैव, पृ. 35-41.

91. तत्रैव, पृ. 42-45. 92. तत्रैव, पृ. 46-49. 93. *HSP*, p. 415.

94. कुन्तक, **वक्रोक्तिजीवितम्**, संपा. राधेश्याम मिश्र, द्वितीय, वाराणसी, चौखम्भा संस्कृत संस्थान, 1977, पृ. 12-13.

95. तत्रैव, पृ. 292. 96. तत्रैव, पृ. 296.

97. तत्रैव, पृ. 306. 98. *HSP*, p. 247.

99. धनञ्जय, **दशरूपकम्**, व्याख्याकार भोलाशङ्कर व्यास, बनारस, चौखम्बा विद्याभवन, 1955, पृ 7.

100. तत्रैव, पृ. 8. 101. तत्रैव, पृ. 11. 102. तत्रैव

103. तत्रैव, पृ. 64. 104. तत्रैव, पृ. 65. 105. तत्रैव, पृ. 66.

106. तत्रैव, पृ. 70. 107. तत्रैव, पृ. 140.

108. तत्रैव, पृ. 282. 109. *HSP*, p. 261.

110. भोज, **सरस्वतीकण्ठाभरणम्**, संपा. आनन्दराम बरुआ, पुनर्मुद्रण, गौहती, पब्लिकेशन बोर्ड, आसाम, 1969, पृ. 49.

111. तत्रैव 112. तत्रैव 113. तत्रैव, पृ. 49-51.

114. तत्रैव, पृ. 52. 115. तत्रैव, पृ. 52. 116. तत्रैव

117. तत्रैव, पृ. 122-23. 118. तत्रैव, पृ. 123-124.

119. तत्रैव, पृ. 124-125. 120. तत्रैव, पृ. 126-27.

121. क्षेमेन्द्र, **कविकण्ठाभरण**, संपा. वामन केशव लेले, प्रथम, वाराणसी, मोतीलाल बनारसीदास, 1967, पृ. 52.

122. तत्रैव, पृ. 64-72.

123. मम्मट, **काव्यप्रकाश**, झळकीकरकृत बालबोधिनीसहित, संपा. रघुनाथ दा. करमरकर, सातवी, पुणे, भाण्डारकर प्राच्यविद्यासंशोधनमन्दिर, 1965, पृ. 2.

124. तत्रैव, पृ. 6. 125. तत्रैव, पृ 13.

126. तत्रैव, पृ. 441-442 127. *HSP*, p. 287.

128. वाग्भट, **वाग्भटालङ्कार**, सिंहदेवगणिविरचित टीकेसह, हिन्दी टीकाकार सत्यव्रतसिंह, वाराणसी, चौखम्बा विद्याभवन, 1957, पृ. 12.

129. तत्रैव, पृ. 18. 130. तत्रैव, पृ. 19. 131. तत्रैव, पृ. 31.

132. हेमचन्द्र, **काव्यानुशासनम्**, सटीकम्, संपा. शिवदत्त शर्मा व इतर, द्वितीय, मुंबई, निर्णयसागर मुद्रणालय, 1934, पृ. 100-124.

133. तत्रैव, पृ. 125-31. 134. तत्रैव, पृ. 273-77.

135. तत्रैव, पृ. 279. 136 तत्रैव, पृ. 379-395.
137. तत्रैव, पृ. 395-405. 138. तत्रैव, पृ 405.
139. तत्रैव, पृ. 406. 140. तत्रैव, पृ. 406-08. 141. तत्रैव, पृ. 408.
142. तत्रैव 143. तत्रैव 144. *HSP*, p 296.
145. वाग्भट, **काव्यानुशासनम्**, अलंकारतिलकसहित, संपा. शिवदत्त शर्मा व का. पां. परब, प्रथम, मुंबई, निर्णयसागर मुद्रणालय, 1915, प्रथम अध्याय.
146. विश्वनाथ, **साहित्यदर्पणः**, संपा सत्यव्रतसिंह, पंचम, वाराणसी, चौखम्बा विद्याभवन, 1979, पृ. 532-46.
147. तत्रैव, पृ. 359-546. 148. तत्रैव, पृ. 546.
149. तत्रैव, पृ. 547-555. 150. तत्रैव, पृ. 555-57.
151. तत्रैव, पृ. 558. 152 *HSP*, p. 317.
153. केशवमिश्र, **अलङ्कारशेखरः**, संपा. अनंतराम वेताळ, बनारस सिटी, चौखम्बा संस्कृत सीरीज ऑफिस, 1927, पृ. 5.
154. तत्रैव, पृ. 6. 155. तत्रैव 156. तत्रैव, पृ. 61-65.
157. A. K. Warder, 'Classical Literature', *A Cultural History of India*, ed. A. L. Basham Oxford, Clarendon Press, 1975, p. 195.
158. पाहा: A. K. Warder, *Indian Kāvya Literature*, Volume four, First, Delhi, Motilal Banarsidass, 1983, p. 121.
159. पाहा : A K. Warder, *Indian Kāvya Literature*, Volume three, First, Delhi, Motilal Banarsidass, 1977, p. 71.
160. पाहा : A. K Warder, *Indian Kāvya Literature*, Volume two, First, Delhi, Motilal Banarsidass, 1974, p. 115.
161. पाहा : A. K. Warder, *Indian Kāvya Literature*, Volume one, First, Delhi, Motilal Banarsidass, 1972, p. 217.

# 4. ललित साहित्याचे परिष्करण

## [ पौरस्त्य व पाश्चात्त्य चिन्तकांच्या विचारांचा तुलनात्मक अभ्यास ]

ललित साहित्याची निर्मितिप्रक्रिया ह्या विषयाबद्दल प्राचीन काळातील रसिकांना व समीक्षकांना जितके कुतूहल वाटत असे तितकेच कुतूहल आजच्या रसिकांना व समीक्षकांनाही वाटते. ह्या विषयासंबंधी खुद्द ललित लेखकांनी व सूक्ष्म बुद्धीच्या समीक्षकांनी आजवर जरी विपुल लेखन केलेले असले तरी हे कुतूहल कमी होणारे नाही. हे कुतूहल निर्मिति-प्रक्रियेच्या अनेक पैलूंसंबंधी असते. उदाहरणार्थ, ललित लेखकाला एखादा विषय कसा सुचतो, मनोभूमिकेत त्याचे बीजारोपण होण्यास कोणती बाह्याभ्यन्तर कारणे घडतात, सुचलेल्या विषयाचा मनात विस्तार कसा होतो, त्याला प्रत्यक्षातील लोकजीवन साहाय्यभूत ठरते काय, ठरत असल्यास कोणत्या स्वरूपात व किती प्रमाणात, स्फूर्तीचा आवेग किती वेळपर्यंत टिकून राहतो, दीर्घ कथानक समग्रपणे सुचते की खंडशः सुचते, कल्पना सुचण्यास विशिष्ट स्थळ व/वा विशिष्ट वेळ विशेषेकरून पोषक असते काय, काव्यातील कल्पना एकेक अशा सुचतात की एकदम सुचतात, कल्पना सुचल्याबरोबर ती लिहून काढावी लागते काय की कालान्तराने तिचे स्मरण होऊ शकते किंवा पुनरुज्जीवन करता येते, इत्यादी अनेक कुतूहल-विषयांबरोबरच आणखी एक कुतूहल-विषय असतो तो हा की, ललित साहित्यिक एकदा जे लिहितो तेच अन्तिम असते काय की त्यात त्याला एकदा किंवा अनेकदा फेरबदल करावे लागतात, लागत असल्यास ते तो कसे म्हणजे कोणत्या मार्गदर्शक तत्त्वांच्या अनुरोधाने करतो. वेगळ्या शब्दांत म्हणावयाचे म्हणजे रसिकांसमोर हस्तलिखित वा मुद्रित स्वरूपात येणारी ललित साहित्यकृती ही कच्च्या मालावर संस्कार होऊन बाहेर पडलेल्या पक्क्या मालासारखी असते काय, हा कुतूहलाचा विषय असतो. सुचलेल्या मूळ कल्पनेवर किंवा मनातल्या मनात जुळलेल्या प्राथमिक मजकुरावर हे जे संस्कार होतात त्यांना पाश्चात्त्य शैलीशास्त्रज्ञ Polishing, Refinement किंवा Revision असे नाव देतात तर पौरस्त्य काव्यशास्त्रज्ञांनी त्याच्यासाठी अवेक्षण, परीक्षण व संशोधन अशा तीन संज्ञा वापरलेल्या आढळतात. पाश्चात्त्य व पौरस्त्य काव्यमीमांसकांना अभिमत असलेल्या ह्या विषयाचे प्रतिपादन त्यांनी कसे केले आहे तेच प्रस्तुत निबंधात तुलनात्मक पद्धतीने समजून घ्यावयाचे आहे.

## (1) निर्दोष लेखनाचा उत्तुंग आदर्श

ललित साहित्यकृती सर्वथा निर्दोष असली पाहिजे ह्या आग्रहात संस्करण किंवा परिष्करण संकल्पनेचे मूळ आहे असे साधार म्हणता येते. ललित साहित्यकृतीच्या निर्दोषत्वाचा आग्रह प्राचीन भारतीय काव्यशास्त्रकार व अर्वाचीन पाश्चात्त्य शैली-शास्त्रकार सारख्याच खंबीरपणे बाळगताना आढळून येतात. ह्या मुद्याच्या बाबतीत ते कोणत्याही स्वरूपाच्या तडजोडीस तयार नाहीत. ह्या संदर्भातील त्यांची अनेक वचने उद्धृत करण्यासारखी आहेत. उदाहरणार्थ भामह ठामपणे म्हणतो :

**'पदं एकं परं साधु नार्वाचीननिबन्धनम् ।'[1]**

अर्थात—विभक्त्यादी प्रत्ययांनी युक्त असलेला, सर्वथा निर्दोष असा, एक शब्ददेखील मी पसंत करीन; परंतु दोषांनी भरलेले दीर्घ काव्य मला रुचणार नाही. दण्डीचीही एतद्विषयक भूमिका अशीच अत्याग्रहाची आहे. त्याने तर काव्यदोषाची तुलना शरीरावरील कोडाच्या अप्रिय डागाशी केली आहे. त्याची ह्या बाबतीतील मूळ उक्ती खालीलप्रमाणे आहे :

**'तदल्पमपि नोपेक्ष्यं काव्यं दुष्टं कथञ्चन । स्याद्वपुः सुन्दरमपि श्वित्रेणैकेन दुर्भगम् ॥'[2]**

दण्डीचा आशय असा की, [ शास्त्रीय नियमांस धरून लिहिलेले व म्हणून स्वरूपत व अर्थतः परिशुद्ध असलेले काव्य विद्वानांच्या दीर्घकाळ लक्षात राहाते, अर्थात ते संस्मरणीय बनते पण शास्त्रीय नियम मोडून लिहिलेले व म्हणून सदोष झालेले काव्य विद्वानांच्या हेटाळणीस पात्र ठरते. ] म्हणून अगदी लहानशाही दोषाने डागळलेल्या काव्याची कधीसुद्धा उपेक्षा करू नये. एखाद्या व्यक्तीचे शरीर एरव्ही भले कितीही सुन्दर असो, पण कोडाच्या एखाद्याही डागाने ते बघवत नाहीसे होते. [ अर्थात काव्य त्याज्य व्हावयास नको असेल व ते विद्वानांच्या व रसिकांच्या पसंतीस उतरावयास हवे असेल तर त्यात एकही शब्दरूप वा अर्थरूप दोष राहू देऊ नये. तसा दोष असल्यास तो शास्त्राधारे काढून टाकावा व काव्य सर्वतोपरी निर्दोष बनवावे. ]

काव्याच्या निर्दोषत्वाचा हा आदर्श आपल्या डोळ्यांसमोर ठेवून केशवमिश्रदेखील ठासून उपदेश करताना म्हणतो :

**'दोषः सर्वात्मना त्याज्यो रसहानिकरो हि सः ।<br>अन्यो गुणोऽस्तु वा मास्तु महान् निर्दोषता गुणः ॥'[3]**

अर्थात—दोष सर्वतोपरी त्याज्य होय [ ह्याबाबतीत कोणतीही तडजोड स्वीकार्य नाही ] कारण तो रसहानी करणारा असतो [ अर्थात रसिकाच्या आनंदाला विरजण लावणारा असतो ]. काव्यात इतर गुण असो वा नसो, पण निर्दोषता हा सर्वांत मोठा गुण अवश्य असलाच पाहिजे.

दोष हा शरीरावरील कोडाच्या डागासारखा असून तो पाहणाऱ्याचा विरस करतो, त्याच्या मनात जुगुप्सा उत्पन्न करतो, ही दण्डीची विचारसरणी आणि दोष रसग्रहणात विघ्न उत्पन्न करतो, ही केशवमिश्राची विचारसरणी ह्या दोन्हींत तत्त्वतः फरक नाही. दोष लहान असो, मोठा असो, शब्दाचा असो वा अर्थाचा असो, तो दोषच असतो व म्हणून तो सर्वथा त्याज्यच ठरतो ही वरील तिन्ही विचारवंतांची समान भूमिका आहे.

परंतु, दोषाची ही त्याज्यता भामह व राजशेखर ह्या दोघां काव्यमीमांसकांनी आणखी प्रखर भाषेत प्रतिपादिली आहे. त्यांनी सदोष काव्याची तुलना साक्षात मृत्यूशी केली आहे. ह्याबाबतीत भामहाचे म्हणणे असे आहे :

**'कुकवित्वं पुनः साक्षान्मृतिमाहुर्मनीषिणः ।।[4]**

अर्थात विचारवंतांची अशी धारणा आहे की, वाईट काव्य म्हणजे [ कवीचे व अप्रत्यक्षपणे रसिकाचेही ! ] मरणच ! कारण अशा काव्यामुळे कवीची निंदानिर्भर्त्सना होते व ती संवेदनशील कविमनाला मरणप्राय वाटते. बिचाऱ्या रसिकाला असले दळभद्री काव्य नको, त्यापरीस मरण पुरवले, असे वाटू लागते !

राजशेखरानेही खाली उद्धृत केलेल्या वचनांत भामहाच्याच वरील विचाराचा पुनरुच्चार करून त्यास आपली संमती दर्शवली आहे :

**'वरमकविर्न पुनः कुकविः स्यात् । कुकविता हि सोच्छ्वासं मरणम् ।'[5]**

अर्थात, अ-कवी असणे [ म्हणजे काव्य रचता न येणे ] बरे [ परवडले ], पण वाईट कवी असणे बरे नाही [ परवडणारे नाही ]. कारण कुकाव्य [ सदोष काव्य ] म्हणजे जिवंतपणीचे मरणच !

एतावता प्राचीन भारतीय काव्यशास्त्रकारांनी ह्याबाबतीत उत्तुंग आदर्श स्वतःसमोर ठेवला होता. आता पाश्चात्त्य शैलीशास्त्रकारांचे एतद्विषयक विचार समजून घेऊ. ललित लेखन [ ज्याला पाश्चात्त्य शैलीशास्त्रज्ञ creative writing किंवा imaginative literature म्हणतात ] सुन्दर असले पाहिजे ह्याबद्दल अर्थातच मतभेद असण्याचे कारण नाही. साहित्याच्या सौन्दर्याचा आग्रह धरताना हाउ ( Hough ) म्हणतो : "....Secondly, and above all, he uses language with an aesthetic intention; he strives to create beauty with words, as a painter does with colours or a musician with sounds."[6]

अर्थात—एखादा चित्रकार ज्याप्रमाणे रंगांच्या मदतीने सौंदर्यनिर्मिती करतो किंवा एखादा संगीतकार [ गायक ] स्वरांच्या साहाय्याने सौंदर्य निर्माण करतो त्याप्रमाणेच एखादा ललित लेखक सौन्दर्यनिर्मिती करण्याचा उद्देश मनात बाळगून भाषेचा वापर करतो. व्हॅलिन्स (Vallins) देखील हीच भूमिका घेतो. तो प्रतिपादितो : 'With this instinct ( the instinct for language ), however, goes

another–the instinct for the aesthetic quality of the sentence and the paragraph."[7]

अर्थात—ललित साहित्यिक लेखनातील वाक्यांच्या व परिच्छेदांच्या सौन्दर्यगुणांकडे लक्ष पुरवतो. सौन्दर्ययुक्त लिखाण पसंत करणारे हे पाश्चात्त्य विचारवंत सदोष लिखाण नापसंत करीत असल्यास त्यात नवल नाही. उदाहरणार्थ, सदोष किंवा वाईट लेखनाचे स्वरूप विशद करताना **चॅडबर्न** ( Chadburn ) म्हणतो : "·····and by bad prose I mean what is affected, or redundant or straggly or confused or illogical."[8] पोकळ शैली, अनावश्यक, पसरट किंवा भरकटलेल्या, गोंधळाने भरलेल्या अथवा तर्कदुष्ट अशा गद्याला चॅड्‌बर्न वाईट गद्यलिखाण समजतो. **मार्जोरी बोल्टन** ( Marjorie Boulton ) ह्या विदुषीने निकृष्ट दर्जाच्या कादंबरिकांचे दोषदर्शन करताना म्हटले आहे : "In the bad thriller there are usually far too many exclamation marks; all the characters speak alike; words are used inaccurately by a writer who obviously never looks in the dictionary when he is in doubt about a word, because he has not enough feeling for words to be in doubt about any of them."[9] सवंग करमणूक करणाऱ्या लिखाणात उद्‌गारवाचक चिह्नांचा सुकाळ असतो [ त्यांचा वापर औचित्यविवेकाने केलेला नसतो ], त्या लिखाणातील सगळीच पात्रे सारखीच बोलतात [त्यांचे वय, शिक्षण, दर्जा, इत्यादींच्या अनुरोधाने उत्पन्न होणारी तफावत त्यांत जाणवत नाही], शब्दांचा अचूक अर्थी वापर केलेला नसतो कारण लेखकाला शब्दांच्या सूक्ष्म अर्थच्छटांची जाण नसल्यामुळे तो अर्थनिश्चितीसाठी कधी शब्दकोश उघडून पाहातच नाही. **सी. ऐझॅक** ( C. Isaac ), **जी. ब्रॅण्ड्रेथ** ( G. Brandreth ), **के. मॉरिसन** ( K. Morrison ), **जे. आर. क्रुइझर** ( J R Kreuzer ), **एल. कोगन** ( L. Cogan ), **ए. क्विलर कूच** ( A. Quiller-Couch ), **बी. बी. कोहन** ( B. B. Cohen ) इत्यादी अनेक विचारवंतांनी सदोष लेखनाचा विचार करून त्याचे ठळक विशेष पुढीलप्रमाणे सांगितले आहेत : व्याकरणदुष्टता, दुर्बोधता, पुनरुक्ती, अप्रस्तुत मजकुराची भरताड, गुळमुळीतपणा, वापरून-वापरून गुळगुळीत झाल्यामुळे अर्थ गमावून बसलेल्या शब्दांचा वा शब्दसंहतींचा पुनःपुन्हा प्रयोग, शब्दबंबाळपणा, विशिष्ट व्यवसायात किंवा प्रदेशात प्रचलित असलेल्या शब्दांचा अतिरेकी वापर. वरील सर्व भाषाविशारदांनी वाईट लिखाणाचा धिक्कार केला आहे हे खरे; परंतु, ह्यांपैकी कोणीही प्राचीन भारतीय काव्यशास्त्रज्ञांइतक्या आवेशाने व तीव्रतेने सदोष लिखाणाचा धिक्कार केलेला नाही; ह्यांपैकी कोणीही प्राचीन भारतीयांप्रमाणे सदोष लिखाणाची मरणाशी तुलना केलेली नाही, ही वस्तुस्थिती ध्यानात घेण्याजोगी आहे. एकंदरीने, प्राचीन भारतीय

चिन्तकांनी निर्दोष लेखनाचा स्वत:समोर ठेवलेला आदर्श पाश्चात्यांच्या एतद्विषयक आदर्शाहून खूपच उत्तुंग होता, असे म्हणता येईल.

## (2) लिखाणाचा कच्चा खर्डा

परिष्करण-प्रक्रियेत पूर्वसिद्ध लिखाण गृहीत धरलेले असते. लेखक अगोदर काही मजकूर लिहितो व त्यातील त्रुटी ध्यानात आल्यावर त्यात तो सुधारणा करतो. हा जो अगोदर लिहिलेला किंवा पूर्वलिखित मजकूर असतो त्यालाच कच्चा खर्डा ( इंग्रजीत first draft ) म्हणतात. ह्या कच्च्या खर्ड्याविषयी पौरस्त्य व पाश्चात्त्य अशा उभयविध विचारवंतांनी आपापली मते व्यक्त केली आहेत. राजशेखराने ह्या सन्दर्भात कवींना असा सल्ला दिला आहे की, त्यांनी आपल्या लिखाणाचा कच्चा खर्डा दिवसाच्या दुसऱ्या प्रहरात लिहावा. त्याचे मूळ शब्द असे आहेत : **'द्वितीये काव्यक्रियाम् ।'**[10] त्याने कवीची दिनचर्याच आखून दिली आहे, ती अशी : **'स प्रातरुत्थाय कृतसन्ध्यावरिवस्यः सारस्वतं सूक्तमधीयीत । ततो विद्यावसथे यथासुखमासीनः काव्यस्य विद्या उपविद्याश्चानुशीलयेदाप्रहरात् । न ह्येवंविधमन्यत्प्रतिभाहेतुर्यथा प्रत्यग्रसंस्कारः । द्वितीये काव्यक्रियाम् ।...'**[11] राजशेखराच्या ह्या वचनांचा आशय असा की, कवीने पहाटे उठावे, सन्ध्यावंदन वगैरे करून सारस्वत सूक्त म्हणावे. नंतर एक प्रहरभर [ सुमारे तीन तास ] काव्यरचनेला उपकारक विद्या व उपविद्या यांचे अध्ययन करावे व नंतरच्या प्रहरी म्हणजे सकाळी सुमारे आठ ते अकरा ह्या तीन तासांत प्रत्यक्ष काव्यरचना करावी. राजशेखरोत्तर काळात होऊन गेलेल्या वाग्भटानेही आपल्या वाग्भटालङ्कार नामक ग्रंथात प्रातःकालीन शांत वेळीच रमणीय कल्पना सुचतात असे म्हटले आहे. त्याने, खाली उद्धृत केलेल्या श्लोकात, मनाची प्रसन्नता, प्रतिभेची नैसर्गिक देणगी, प्रात:कालीन शांत वेळ उद्यमशीलता व अनेक शास्त्रांचे ज्ञान ह्यांमुळे कवीला अभिनव व रमणीय कल्पना सुचतात असा विचार मांडला आहे :

**'मनःप्रसत्तिः प्रतिभा प्रातःकालोऽभियोगिता ।**
**अनेकशास्त्रदर्शित्वमित्यर्थालोकहेतवः** ।। 14 ।।'[12]

पाश्चात्त्य शैलीशास्त्रज्ञांपैकी पर्ल होग्रेफे ( Pearl Hogrefe ) ह्या विदुषीने विशिष्ट वेळेचा निर्देश न करता ह्याबाबतीत फक्त पुढील सूचना केली आहे : "Write the first draft of your story at a single sitting if possible"[13] [ अर्थात शक्य झाल्यास लिखाणाचा कच्चा खर्डा एका बैठकीत लिहून हातानिराळा करा. ]

हा कच्चा खर्डा कोणत्या मन:स्थितीत तयार होत असतो त्याचा खुलासा राजशेखराने पुढील वचनात केला आहे : **'रसावेशतः काव्यं विरचयतो न च विवेक्त्री दृष्टिः...'**[14] अर्थात कवी काव्य लिहावयास बसला असताना तो एका आवेगाच्या स्थितीत असतो; त्याला काव्यरचनेखेरीज त्या क्षणी दुसरे काही सुचत

नसते; त्याचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व जणू काव्यमयच नव्हे तर काव्यरूप बनलेले असते. त्यामुळे त्याला त्या स्थितीत चूक व बरोबर, योग्य व अयोग्य, वर्ण्य व त्याज्य यांचा विवेक करण्याचे भान राहिलेले नसते. त्यामुळे त्याच्या हातून व्याकरणदृष्टया अशुद्ध शब्दांचा प्रयोग, संदिग्धार्थक शब्दांचा वापर, विसंगत अर्थाची योजना, कविसमयांचे उल्लंघन, भावनेला विघातक यमकांची गुंफण, संगीत-नृत्य-नाटय-चित्र-प्रभृती कलांच्या शास्त्रांच्या नियमांचा भंग, सदोष उपमांचे प्रयोग इत्यादी अनेक दोष घडण्याची शक्यता असते. हे दोष सरतेशेवटी काव्यसौन्दर्याला गालबोट लावतात. काव्यनिर्मितीच्या वेळी कवीचा जो भावावेग असतो त्याच्या परिणामी त्याच्या मनाची एकाग्रता किंवा सावधानता ढळते. तीच काव्यात वरीलसारखे दोष उत्पन्न करण्यास कारणीभूत ठरते.

ललित साहित्यिकाच्या कच्च्या खडर्याच्या सदोषतेची जी कारणमीमांसा, वर दर्शविल्याप्रमाणे, पौरस्त्य काव्यशास्त्रज्ञांनी केली आहे तीच जवळजवळ त्याच शब्दांत पाश्चात्त्य शैलीशास्त्रज्ञांनीही केली आहे. **एस्. आईव्हज्** ( Summer Ives ) नामक लेखिकेने ललित लेखकाच्या कच्च्या खडर्याचे वर्णन पुढील शब्दांत केले आहे : "His first draft is rather like a road under construction. A reader, like a motorist, would have to go slow and watch for obstructions."[15] आईव्हज्च्या मते लेखकाचा कच्चा खर्डा हा, ज्याचे बांधकाम चालू आहे अशा, एखाद्या रस्त्यासारखा असतो. अशा रस्त्यावरून मोटार हाकणाऱ्याला ज्याप्रमाणे खाचखळगे, उंचवटे व खड्डे हे नीटपणे पाहून मोटार हाकावी लागते त्याप्रमाणे कच्चा खर्डा वाचणाऱ्या वाचकाला अशुद्ध मजकूर, चुकीचे प्रयोग इत्यादी खाचखळगे टाळण्याची खबरदारी घ्यावी लागते. **मार्जोरी बोल्टन** ह्या लेखिकेने कच्च्या खडर्यातील अपूर्णतेची किंवा सदोषतेची कारणमीमांसा राजशेखराच्या उपर्युल्लिखित पद्धतीनेच केली आहे. कच्च्या खडर्यातील त्रुटींना लेखकाचा भावावेगच जबाबदार असतो असे तिचेही राजशेखराप्रमाणे मत आहे. ती म्हणते : "The poet may find that in the excitement of composition he has wrenched an accent unnaturally or committed some inaccuracy of fact; he may become doubtful of the strict meaning of a word, or its accentuation.····"[16]

**सी. ब्रुक्स** ( Cleanth Brooks ) व **रॉबर्ट पेन वॉरेन** ( Robert Penn Warren ) यांनी, खाली उद्धृत केलेल्या त्यांच्या वचनांत, असे प्रतिपादिले आहे की, अगदी नामांकित लेखकांच्या कच्च्या खडर्यातही वरीलसारख्या चुका होतात :

"It is, however, our great variety of modifiers that most often leads us into this kind of blundering. We write, for example :

Being lazy by nature and because I am clumsy, I have never liked tennis.

Such violations of parallelism easily creep into *first drafts* —even into the first drafts of a good writer."[17]

एकंदरीने 1 कच्चा खर्डा हा एका भारावलेल्या मन:स्थितीत लिहिला जात असतो व 2 त्यामुळे तो सदोष किंवा अपूर्ण असतो ह्या दोन मुद्यांच्या बाबतीत पौरस्त्य व पाश्चात्त्य विचारवंत ह्यांचे एकमत आहे, असे दिसून येते.

परंतु, ह्या सन्दर्भात पाश्चात्त्य शैलीशास्त्रकारांनी जो एक मूलभूत व महत्त्वपूर्ण विचार मांडला आहे त्याचा आढळ प्राचीन भारतीय काव्यशास्त्रकारांच्या विवेचनात होत नाही. पाश्चात्त्य शैलीशास्त्रकारांच्या मतानुसार आपण मानवप्राणी एका बाबतीत असमर्थ किंवा अपूर्ण आहोत. ती बाब अशी की, लक्ष देऊन ऐकावी किंवा वाचावी अशी कोणतीही गोष्ट आपण पहिल्याच फटक्याला समग्रपणे व अविकृतपणे बोलू किंवा लिहू शकत नाही. श्रवणीय किंवा वाचनीय बाब आपल्या मुखावाटे किंवा लेखणीवाटे प्रथमत: अर्धीमुर्धी, वेडीवाकडी किंवा तुटक अशीच बाहेर पडते आणि नंतर ती सुधारून आपण पुन्हा बोलतो किंवा लिहितो. **समर आईव्हज्‌ने** हा मौलिक विचार पुढील मार्मिक शब्दांत मांडला आहे : "....Hardly any one consistently writes good sentences without revision."[18] **ए. एच. गार्डिनरने** हा मुद्दा अधिक स्पष्ट शब्दांत मांडताना म्हटले आहे : "It is····a true and lamentable fact that, in ultimate analysis, one cannot speak about anything without altering it to some extent."[19] अर्थात आपण जे काही श्रवणीय बोलतो किंवा वाचनीय व स्मरणीय असे लिहितो, त्याला ठाकठिकीचे रूप द्यावे लागतच असते. त्यावाचून ते श्रवणीय व संस्मरणीय होत नाही, ही बाब कितीही अप्रिय वा कटू असली तरी सत्य आहे. मनुष्याच्या वाणी-लेखणीच्या ह्या नैसर्गिक दुबळिकीवर पाश्चात्त्य शैलीशास्त्रकारांनी अचूक बोट ठेवून एतद्विषयक चिन्तनात महत्त्वाची भर घातली आहे, ह्यात संदेह नाही. हा विचार भारतीय काव्यशास्त्रज्ञांना अपरिचित आहे.

## (3) परिष्करणानुकूल समय

वर दर्शविल्याप्रमाणे लिखाणाचा कच्चा खर्डा 'अपरिपूर्ण' 'असल्यामुळे तो जसाच्या तसा मुद्रित करून वाचकांना सुपूर्त करता येत नाही. त्यावरून हात फिरवणे अत्यंत आवश्यक असते. ह्या विचारकणिकेच्या बाबतीत पश्चिमेकडील विचारवंत पूर्वेकडील विचारवंतांशी पूर्णतया सहमत असल्याचे खालील विवेचनावरून स्पष्ट होईल.

राजशेखराने म्हटले आहे : **'तस्मादनुपरीक्षेत ।'**[20] अर्थात [ प्रतिभेच्या स्फूर्तीच्या आवेगात साहित्यनिर्मिती करणाऱ्या साहित्यिकाची विवेचकता दक्ष राहत नसल्यामुळे

त्याच्या निर्मितीत नानाविध त्रुटी उतरण्याची शक्यता असते ] म्हणून त्याने एकदा मजकूर लिहून झाल्यावर त्याचे परीक्षण करावे. म्हणजेच तो मजकूर शांत वा अक्षुब्ध मनःस्थितीत वाचून काढावा, त्यातील दोष हेरावेत व त्यांचे निवारण करावे. **ब्रूक्स व वॉरेन** यांचेही असेच ठाम मत आहे. ते म्हणतात : "Careful rewriting is the answer"[21] ( to remove the blundering ). अर्थात, कच्च्या खडर्यातील भयंकर [ अर्थात रसहानिकारक व वैरस्योत्पादक ] चुका कशा दुरुस्त कराव्यात असे विचाराल तर त्याचे उत्तर, 'लिखाण काळजीपूर्वक पुन्हा लिहून काढा', हे आहे. **पर्ल होग्रेफे** ह्या लेखिकेचाही उपदेश असाच आहे. ती प्रतिपादिते : "If you and your readers are not completely satisfied, rewrite the whole story or at least the weaker sections Unless you are semiprofessional you will be doing very well to get a good story in two or even three or four writings."[22] लेखकाने आपल्या स्वतःचे व आपल्या वाचकांचे समाधान होईपर्यंत लिखाणावर हात फिरवत राहावे व लिखाण आवश्यकता भासल्यास दोनदा, तीनदा किंवा चारदा सुद्धा सुधारत-सुधारत लिहून काढावे, हा होग्रेफेचा सल्ला केवळ नवशिक्या लेखकांनाच लागू आहे असे नाही. तर मी-मी म्हणणाऱ्या लेखकांनाही आपले लिखाण अशा प्रकारे सुधारावे लागत असते हे सत्य आहे. **मार्जोरी बोल्टन** ह्या लेखिकेचे एतद्विषयक निरीक्षण अधिक वस्तुस्थिति-प्रदर्शक आहे. ते निरीक्षण असे : "However, if we look at a manuscript left by any well-known poet we shall nearly always find that the poet has made many erasures and alterations before arriving at the final version. This process of polishing is very important."[23] अर्थात कोणत्याही विद्यमान किंवा दिवंगत कवीच्या हस्तलिखितावरून आपण बारकाईने नजर फिरवल्यास आपल्या असे निदर्शनास येते की, त्या कवीने आपल्या हस्तलिखितात अनेकदा व अनेक ठिकाणी खाडाखोड करून व मुळातील संहितेत बदल करून मगच अन्तिम काव्यसंहिता सिद्ध केलेली असते. बदल करण्याची, सुधारणा करण्याची किंवा परिष्करण करण्याची ही प्रक्रिया फार महत्त्वाची आहे.

परिष्करणाच्या आवश्यकतेच्या ह्या मुद्द्याशी अगदी जवळून निगडित असलेला मुद्दा म्हणजे परिष्करणाला अनुरूप वेळ व मनःस्थिती हा होय. ह्या कार्याला दिवसाचा चवथा प्रहर सगळ्यात आदर्श होय अशी शिफारस राजशेखर करतो. तो म्हणतो: **"चतुर्थ एकाकिनः परिमितपरिषदो वा पूर्वाह्णभागविहितस्य काव्यस्य परीक्षा ।"**[24] अर्थात्, कवीने दिवसाच्या चवथ्या प्रहरी [ म्हणजे दुपारी सुमारे दोन ते पाच ह्या तीन तासांत ] एकट्याने बसावे किंवा काव्यकलेची उत्तम जाण असणाऱ्या मोजक्या मित्रांच्या मेळाव्यात बसावे आणि दिवसाच्या दुसऱ्या प्रहरी

रचिलेल्या काव्याचे [ कठोर ] परीक्षण करावे. ह्या कार्यासाठी कवी एकटाच बसला तर त्याला स्वतःच्या कृतीविषयी वाटणाऱ्या ममत्वामुळे, किंवा अज्ञानामुळे वा अनवधानामुळे एक किंवा अनेक दोष त्याच्या काव्यात तसेच राहून जातील, म्हणून त्याने जाणकारांच्या मेळाव्यात बसावे अशी पर्यायी सूचना राजशेखराने केली आहे. जाणकार जवळ असले की, ते काव्य ऐकून त्यात सुधारणा सुचवू शकतील. कवीला त्यांचे वाचन, त्यांची रसिकता, त्यांचे शास्त्रज्ञान व त्यांचा पूर्वानुभव ह्यांचा उपयोग करून घेता येईल, हे मनात बाळगून राजशेखराने मित्रांच्या मेळाव्यात बसण्याचा उपदेश केला आहे. [ कवीने स्वरचित काव्याचे परिष्करण करण्यासाठी एकट्याने बसावे असा जो पहिला पर्याय राजशेखराने सुचवला आहे त्यामागे त्याची अशी विचारसरणी असावी की, कवी एकटा असला व आजूबाजूला त्याचे चित्त विचलित करण्यास कोणी नसला की, कवीला आपल्या काव्यरचनेवर लक्ष एकाग्र करता येईल, त्याला सर्व स्थूल व सूक्ष्म दोष जाणवतील व त्यांच्या निवारणाचे उपायही सुचतील. त्याच्या भोवती चार माणसे असली तर त्याला मन एकाग्र करता येणार नाही, किमान तसे करणे अवघड होऊन बसेल. ] मात्र मित्रमेळाव्याचा सल्ला देतानाही राजशेखराने 'परिमितपरिषद.' असे अत्यन्त काटेकोर व सावधगिरीचे शब्द वापरले आहेत. त्यांच्या द्वारे त्याला असे सुचवावयाचे आहे की, काव्यपरीक्षेच्या वेळी भोवताली मित्र, प्रशंसक किंवा सल्लागार कोणीही असोत, ते संख्येने कमीच असणे इष्ट. त्यांची गर्दी झाल्यास वैचारिक गोंधळ होण्याची धास्ती जास्त व तिचे पर्यवसान काव्यपरीक्षणात काही चुका राहून जाण्यात होण्याची शक्यता अधिक. काव्यपरीक्षणाचा हेतू असफल होऊ नये म्हणून राजशेखराने परिमित जाणकारांची शिफारस केली आहे. असे परीक्षण चवथ्या प्रहरी करावे असा उपदेश करण्यामागील अभिप्राय सहज ध्यानात येण्यासारखा आहे. तो असा की, राजशेखराने कवीसाठी आखून दिलेल्या दिनचर्येनुसार कवीने दुसऱ्या प्रहरी काव्याचा कच्चा खर्डा लिहावा, नंतर स्नान व भोजन करून अमळ विश्रांती घ्यावी आणि अशाप्रकारे ताजेतवाने झाल्यावर शांत व संतुलित मनःस्थितीत सकाळी लिहिलेले काव्य बारकाईने वाचून त्यात राहून गेलेल्या त्रुटी निवारणाच्या कार्यास लागावे. ह्या कार्याला मनाची शांती व प्रसन्नता ह्या दोन गोष्टींची नितान्त आवश्यकता आहे व त्या गोष्टी भोजनोत्तरच्या विश्रांतीनंतर सहजप्राप्य आहेत, हे उघड आहे. पर्ल होग्रेफे ह्या विदुषीनेही राजशेखरासारखीच भूमिका घेतली आहे. ती उपदेश करताना म्हणते: "After your work has cooled, read it critically. Read it aloud. Prune unessential words....''[25] होग्रेफेने अशी कल्पना केली आहे की, कवीचा कच्चा खर्डा म्हणजे मुशीतून बाहेर आलेली तापलेली वस्तू असते. ती थंड व्हावी लागते [ ती लिहिल्यानंतर काही वेळाने लेखकाचा आवेग ओसरतो, त्याचे मन समधात

होते, तेच परिष्करणाला अपेक्षित असते. होग्रेफेचा हाच अभिप्राय आहे ]. तिने लेखकाला स्वत:चे लिखाण पुन:पुन्हा व मोठ्याने वाचण्याचा सल्ला दिला आहे, तर राजशेखराने परीक्षा करण्याचा व शेलक्या मर्मज्ञांसमोर वाचण्याचा सल्ला देऊन तोच आशय व्यक्त केला आहे. दोघांनी वापरलेले शब्द वेगळे असले तरी दोघांना अभिप्रेत असलेला अर्थ एकच आहे.

## (4) परिष्करणाचे मार्ग

प्रत्यक्ष परिष्करणाला प्रारंभ करण्यापूर्वी ललित लेखकाला परिष्करणाचे मार्ग किंवा उपाय निश्चित करावे लागतात. ह्याबाबतीत प्राचीन विचारवंतांनी धारण केलेले मौन अमळ बुचकळ्यात टाकणारे आहे. असे म्हणण्याचे कारण हे की, ज्या प्राचीन काव्यशास्त्रकारांनी 'हृदयकविः' [ **यो हृदय एव कवते निह्नुते च स हृदय-कविः ।**[26] ] [ अर्थात जो फक्त मनातल्या मनात गुणगुणतो, आपले काव्य हृदयात लपवून ठेवतो; वाणीच्या किंवा लेखणीच्या द्वारे जाहीरपणे प्रकट करीत नाही, तो हृदयकवी ] ही अत्यंत सूक्ष्मतरल कल्पना केली त्यांना हृदयातल्या हृदयात होणाऱ्या परिष्करणाची तितकीच सूक्ष्म कल्पना कशी भावली नाही, ह्याचा अचंबा वाटतो. मात्र ह्याबाबतीत पाश्चात्त्य शैलीशास्त्रकारांनी परिष्करणाच्या दोन मार्गांची कल्पना करून पौरस्त्यांवर मात केली आहे. ते दोन मार्ग म्हणजे 1 मनातल्या मनात केले जाणारे परिष्करण व 2 कागदावर प्रत्यक्षात किंवा प्रकटपणे केले जाणारे परिष्करण. ह्या सन्दर्भात **हर्बर्ट रीड** [Herbrt Read] ने गिबन [Gibbon] ची पुढील उक्ती उद्धृत केली आहे: "It has always been my practice to cast a long paragraph in a single mould, to try it by my ear, to deposit it in my memory, but to suspend the action of the pen till I had given the last polish to my work."[27] गिबन्चा आशय असा की, तो एखादा दीर्घ परिच्छेद मनातल्या मनात रचत असे, नंतर तो स्वत:लाच ऐकवीत असे, त्यायोगे तो आपल्या स्मृतिकोषात साठवून ठेवत असे आणि नंतर त्यात पुन:पुन्हा फेरफार करून मनाचे समाधान झाल्यावरच तो कागदावर उतरून काढीत असे. **ग्रॅहॅम हाउनेही** मानसिक परिष्करणाची ही प्रथा अनुमोदिली आहे. तो म्हणतो: "Most writing involves a process of revision, conducted either on paper or in the mind before anything is written down."[28] प्रत्येक लेखकाला केवळ पहिल्या, केवळ दुसऱ्या किंवा दोन्ही उपायांचा अवलंब करावाच लागत असतो. एकदा परिष्करणाच्या मार्गाची किंवा उपायाची निश्चिती झाली की, प्रत्यक्ष परिष्करण-कार्याला प्रारंभ होतो. ह्या कार्याची प्रक्रिया व ह्या कार्याचे घटक ह्यांविषयी उभयवर्गांतील विचारवंतांनी मांडलेल्या विचारांचा आता तुलनात्मक परामर्श घेऊ.

## (5) परिष्करणाची प्रक्रिया व परिष्करणाचे घटक

राजशेखराने चतुर्विध प्रक्रियेचा पुरस्कार पुढील शब्दांत केला आहे:

"अधिकस्य त्यागो, न्यूनस्य पूरणम्, अन्यथास्थितस्य परिवर्तनं, प्रस्मृतस्य अनुसन्धानं च । इति अहीनम् ।"[29]

अर्थात, काव्यपरीक्षणाच्या वेळी कवीने 1 आवश्यकतेहून जास्त अशा शब्दार्थादींना फाटा देऊन 'अधिक तें सरतें' करावे, 2 आवश्यक असूनही न वापरलेल्या शब्दादींची वा व्यक्त न केलेल्या अर्थादींची योजना करून 'न्यून तें पुरतें' करावे, 3 भलत्याच जागी योजलेला शब्द तेथून काढून त्याची योग्य जागी योजना करावी आणि, 4. जे लिहावयाचे राहून गेलेले असेल वा ज्याचा विसर पडलेला असेल ते नीटपणे आठवून योजावे. अशा प्रकारे काव्य किंवा लिखाण पूर्ण करावे. परिष्करणाचे हे जे चार घटक राजशेखराने नमूद केले आहेत त्यांचा तपशील खालीलप्रमाणे नोंदता येईल :

### (5.1) अधिकस्य त्यागः

अनर्थक [ म्हणजे केवळ चरणपूर्तीसाठी योजलेले शब्द ], अपुष्टार्थ [ क्षुद्र आशय ], क्लिष्ट [ ज्या शब्दाच्या अर्थाचे ज्ञान दूरच्या शब्दाशी अन्वय केल्यावरच होते ], नेयार्थ [ ज्या शब्दामागील संकेत लेखकाने स्वतः कल्पिलेला असतो, त्यामुळे जो फक्त त्यालाच कळतो, वाचकांना कळत नाही ], अप्रयोजक [ अत्यंत सामान्य अर्थाचा वाचक शब्द ] हे सर्व पददोष,[30] पुनरुक्तिमत् [ शब्द व शब्दार्थ अभिन्न असणे ], वाक्यगर्भित [ ज्याच्या पोटात दुसरे वाक्य असते असे मोठे वाक्य ], अधिकोपमम् [ ज्या वाक्यात आवश्यकतेहून जास्त उपमाने/विशेषणे आहेत असे वाक्य ], हे वाक्यदोष, आणि व्यर्थ [ गतार्थ किंवा निष्प्रयोजक अर्थ ], एकार्थ [ पूर्वोक्त अर्थाची पुनरुक्ती ], परुष [ अतिरेकी किंवा कठोर अर्थ ], अधिकोपमम् [ उपमानांची वाजवीहून अधिक संख्या ] हे वाक्यार्थ दोष असे आहेत की, ज्यांत कोणता ना कोणता तरी अंश अधिकचा म्हणजे अनावश्यक व म्हणून वर्ज्य आहे. अर्थात हे सर्व दोष त्याज्य ठरतात व 'अधिकस्य त्यागः' ह्या वर्गात पडतात. ह्यांखेरीज ह्या वर्गात भामहाने निषिद्ध मानलेला 'व्यायता' [ 'कुर्वन्ति काव्यमपरे व्यायताभीप्सया यथा ।'[31] अर्थात, काव्य आकाराने दीर्घ असावे अशी चुकीची कल्पना मनात बाळगणारे काही कवी काव्यात अनावश्यक पद्ये रचून लांबण लावतात ] हा दोषही समाविष्ट होतो.

### (5.2) न्यूनस्य पूरणम्

देश्य शब्द [ ज्याची व्युत्पत्ती सांगता येत नाही असा=देशविशेषात प्रचलित असलेला शब्द ] हा पददोष, न्यूनोपम [उपमानांची/विशेषणांची संख्या कमी असणे], अशरीर [ वाक्यात क्रियापदाचा अभाव असणे ] हे वाक्यदोष, आणि अपार्थ [वाक्यातील एकूण शब्दांपासून कोणताही अर्थ उत्पन्न न होणे], हीनोपम [उपमानांची संख्या

उपमेयांच्या तुलनेने कमी असणे], निरलंकार [ वाक्य शोभाकर धर्माने युक्त नसणे ] हे अर्थदोष यांचा अन्तर्भाव ह्या कोटीत करता येतो. क्षेमेन्द्राने आपल्या **कविकण्ठाभरण**[32] नामक ग्रंथात व्यंजनाराहित्य [ अर्थामध्ये सूचकता नसणे, सर्व अर्थ उत्तान किंवा उघड असणे ] व प्रसादशून्यता [ काव्य प्रसाद-गुणहीन असणे ] ह्या दोन दोषांचा उल्लेख केला आहे. त्यांचाही विचार प्रस्तुत सदरात होऊ शकतो.

## (5.3) अन्यथास्थितस्य परिवर्तनम्

ह्या वर्गात अनेक दोषांचा समावेश होतो. परिणामी ह्या वर्गातील दोषांची एक लांबलचक यादीच बनू शकते. ती अशी—

**पददोष**—असाधू (व्याकरणशास्त्राच्या नियमांच्या विरुद्ध असलेले शब्द), अप्रयुक्त (ज्या शब्दांचा प्रयोग कवी करीत नाहीत असे शब्द), कष्ट (कर्णकटू शब्द), अन्यार्थ (रूढीस सोडून असलेले शब्द), असमर्थ ( असंगत शब्द ), अप्रतीत ( फक्त शास्त्रात प्रचलित व प्रसिद्ध असलेले पण लोकव्यवहारात प्रचलित व प्रसिद्ध नसलेले शब्द ), गूढार्थ ( अप्रसिद्धार्थी शब्दप्रयोग ), सन्दिग्ध ( ज्यांच्या अर्थाविषयी सन्देह उत्पन्न होतो असे शब्द ), विरुद्ध ( विपरीत अर्थ प्रकट करणारे शब्द ), व ग्राम्य ( अश्लील, अमंगलार्थक व किळसवाणे शब्द ).

**वाक्यदोष** : शब्दहीन ( व्याकरणदृष्ट्या अशुद्ध शब्दांनी भरलेले वाक्य ), क्रमभ्रष्ट ( कर्ता, कर्म, क्रियापद इत्यादी नियत क्रमास सोडून असलेले शब्द ज्यात आहेत असे वाक्य ), व्याकीर्ण ( विभक्तींच्या विसंगतींनी युक्त वाक्य ), संकीर्ण ( दुसऱ्या वाक्यातील शब्दांनी मिश्रित वाक्य ), अपद ( अपेक्षेहून वेगळ्याच प्रकृतिस्थ शब्दांची योजना असलेले वाक्य ), भिन्नलिंग (ज्यातील उपमेत लिंगभेद दोष जाणवतो असे वाक्य), भिन्नवचन (ज्यातील उपमेत भिन्नवचन दोष जाणवतो असे वाक्य), भग्नच्छन्द ( वृत्तभंगाने युक्त ), भग्नयती (ज्यात यतिभंग झालेला आहे असे वाक्य), अरीतिमत् ( ज्यात श्लेष, समता, सौकुमार्य, प्रसाद, अर्थव्यक्ती, कान्ती, ओज, माधुर्य व औदार्य ह्या गुणांचे विपर्यय अयोग्य स्थानी आढळून येतात असे वाक्य ).

**वाक्यार्थदोष** : सन्दिग्धार्थ ( स्पष्ट अर्थाच्या जागी संदिग्ध अर्थाची योजना ), अपक्रम ( क्रमभंग ), खिन्न ( भलत्याच जागी प्रयुक्त ), अतिमात्र (अतिशयोक्तिपूर्ण), विरस ( प्रस्तुत रसाला विघातक ), असदृशोपम ( ज्यातील उपमान उपमेयाशी तुल्य नाही ), अश्लील ( अश्लील अर्थाची प्रतीती आणून देणारे वाक्य ), प्रत्यक्ष-अनुमान-आगम-विरुद्ध ( प्रत्यक्षज्ञान, तर्कज्ञान व शास्त्रज्ञान यांना छेद देणारे ).

वरील सर्व [33] अन्यथास्थिताची उदाहरणे होत. ह्या यादीत, राजशेखराने निर्देशिलेला अनवस्थितपाक[34] [ कवठाच्या फळासारखी शुष्क वा नीरस रचना ], क्षेमेन्द्राने सुचविलेले असंवादार्थसंगती [ संदर्भाला सोडून अर्थाची गुंफण असणे ] व विरोधरसव्यक्ती[35] [ वर्ण्य विषयाच्या विरुद्ध रसाची अभिव्यक्ती ], हेमचन्द्राने[36]

वर्णिलेल्या कविसमयां[ कवींनी स्वत:वर लादून घेतलेल्या काही नियमां ]च्या विपरीत वर्णने आणि श्रृंगार व करुण रसांच्या वर्णनात रुद्रटाने[37] त्याज्य मानलेली यमके, या आणखी काही दोषांचाही अन्तर्भाव करता येतो.

## (5.4) प्रस्मृतस्य अनुसन्धानम्

विसन्धि ( विद्रूप संधी करणे किंवा संधी न करणे ) हा वाक्यदोष आणि अप्रसिद्धोपम[38] [ अप्रसिद्ध उपमान वापरून उपमेयाचे वर्णन करणे ] हा वाक्यार्थदोष ह्या दोन गोष्टींचा समावेश ह्या चवथ्या वर्गात होतो.

हा झाला प्राचीन भारतीयांनी केलेल्या एतद्विषयक विचाराचा परामर्श. पाश्चात्यांच्या विचारांकडे वळता **ब्रुक्स** व **वॉरेन** हे दोघे पुढीलप्रमाणे प्रतिपादन करताना आढळतात: "....And in our writing, and especially in our rewriting, we need to see that we have avoided irritating monotony of sentence length or of sentence structure."[39] ह्या दोघा शास्त्रकारांनी कंटाळवाणी वाक्यरचना व वाक्याची अतिरेकी लांबी हे दोन दोष लेखनात व विशेषत: पुनर्लेखनात [ म्हणजेच परिष्करणात ] टाळण्याचा उपदेश केला आहे. पूर्वी उल्लेखिल्याप्रमाणे **पर्ल होग्रेफे** ह्या विदुषीने अनावश्यक शब्द छाटून टाकण्याचा सल्ला दिला आहे [ "Prune unessential words" ][40]. **समर आईव्हज्** ह्या विदुषीने ह्या मुद्याचा विचार काहीशा विस्ताराने खालीलप्रमाणे केला आहे:

"Skillful writers allow the first suggestion of a pattern to come from the continuity of the passage and then try to fit the material for the new sentence into this pattern. If it does not fit, the writer runs through his inventory of available patterns, seeking the one best suited for the immediate material and the total context. In this process, he may revise his original structures to fit the final pattern. For example, he may reduce an adverbial clause to a prepositional phrase, or expand a phrase to a clause. He may reduce an adjectival phrase to a modifying participle, or add a subject that will make a modifying verb into a finite verb. The possibilities are limited only by the resources of the language and the exigencies of the design...."[41]

लेखिकेच्या वरील प्रतिपादनाचा आशय असा की, लेखकाने लिखाणाचा एक विशिष्ट विन्यास मनाशी निश्चित केलेला असतो व त्याला मिळतीजुळती अशी वाक्यरचना तो करीत असतो. तसे करताना तो एखाद्या वेळेस शब्दसंहतीऐवजी वाक्यखंडाची योजना करतो, तर कधी दोनतीन शब्दांच्या ऐवजी एखादेच बोलके

विशेषण वापरतो. क्वचित्प्रसंगी तो क्रियारूपांतही अशी परिवर्तने करतो. तो ज्या भाषेत लेखन करीत असतो त्या भाषेची शब्दसंपत्ती आणि त्याने स्वीकारलेला विशिष्ट रचनाविन्यास ह्या दोन गोष्टींनी ही परिवर्तने नियंत्रित होत असतात.

हीच लेखिका अन्यत्र पुढीलप्रमाणे एक निरीक्षण नोंदवते:

"A writer, like a builder, must smooth out the bumps and fill in the holes. The final version seems to be effortless because the verbal impediments have been removed and the mental gaps have been bridged"[42]

अर्थात, लेखक हा एखाद्या गवंड्यासारखा असतो. गवंडी ज्याप्रमाणे भोके बुजवून पृष्ठभाग सपाट व गुळगुळीत करतो, त्याप्रमाणे लेखकालाही सर्व शाब्दिक खाचाखोचा बुजवाव्या लागतात आणि फटी सांधाव्या लागतात. तो तसे करतो म्हणून त्याची ललितकृती [ जी परिष्कृत स्वरूपात वाचकांच्या हाती येते ती ] आपल्याला सहजपणे किंवा अनायासे सिद्ध केल्यासारखी वाटते.

**मार्जोरी बोल्टनने** कविकृत परिष्करणाचे वर्णन पुढील शब्दांत केले आहे:

"During the polishing, the poet is usually dealing with individual words; he may exclude a word because its sound echoes or clashes with the sound of another where such an effect is not wanted."[43]

अर्थात-कच्च्या खड्यात सुधारणा करताना कवीचे लक्ष सामान्यपणे शब्दांवर असते. एखादा शब्द दुसऱ्या एखाद्या शब्दाच्या प्रतिध्वनीसारखा वाटल्यास किंवा त्या शब्दाचा नाद विशिष्ट स्थानी अयोग्य आहे असे वाटल्यास कवी तो शब्द वगळतो.

बोल्टनच्या मते परिष्करण-प्रक्रियेत सहज बदलता येण्याजोगे शब्द म्हटले म्हणजे विशेषणे व क्रियाविशेषणे हे होत [ "The words that can most easily be altered in polishing a poem are adjectives and adverbs" ][44]

पाश्चात्त्य शैलीशास्त्रज्ञांच्या उपर्युद्धृत विचारांत **'अधिकस्य त्यागः, न्यूनस्य पूरणम्, अन्यथास्थितस्य परिवर्तनम् प्रस्मृतस्य अनुसन्धानं च ।'** ह्या भारतीय काव्यशास्त्रज्ञांच्याच विचारांचे प्रतिध्वनी ऐकू येतात. परंतु, भारतीयांचे विचार सूत्रबद्ध, सुविशद व सर्वसमावेशक आहेत हा त्यांचा उल्लेखनीय विशेष असून तो पाश्चात्त्य विचारांत अभावाने तळपतो.

## (6) परिष्करणाचा सिद्धान्त

प्राचीन भारतीय काव्यशास्त्रकारांनी परिष्करणाचा सिद्धान्तच मांडला आहे. त्यांच्या मते परिष्करण-कार्य बेमुदत किंवा सतत करीत राहावयाचे नाही, तर एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच ते करावयाचे. हा परिष्करण-सिद्धान्त मांडणारा आद्य

भारतीय काव्यशास्त्रकार वामन हा होय. त्याने आपल्या काव्यालंकारसूत्राणि-ग्रंथामध्ये मांडलेला हा सूत्रात्मक सिद्धान्तच उत्तरकालीन राजशेखर व क्षेमेन्द्र यांनी पुन्हा एकदा प्रतिपादिला. वामनाने प्रकीर्ण काव्याङ्गाच्या विवेचनाच्या ओघात हा सिद्धान्त 'अवेक्षण' ह्या मुद्याच्या संदर्भात खालील शब्दांत मांडला आहे:

## (6.1) वामनाची शब्दपाकविषयक धारणा

"पदाधानोद्धरणमवेक्षणम् ॥ 15 ॥

पदस्याधानं न्यासः । उद्धरणमपसारणम् । तयोः खल्ववेक्षणम् । अत्र श्लोकौ –

आधानोद्धरणे तावद् यावद् दोलायते मनः ।
पदस्य स्थापिते स्थैर्ये हन्त सिद्धा सरस्वती ॥
यत्पदानि त्यजन्त्येव परिवृत्तिसहिष्णुताम् ।
तं शब्दन्यासनिष्णाताः शब्दपाकं प्रचक्षते" ॥[45]

अर्थात—विभक्त्यादी प्रत्ययांनी युक्त असलेले शब्द योजणे व काढणे ह्या द्विदल क्रियेला अवेक्षण म्हणतात. ॥ 15 ॥

विभक्ती, काळ, अर्थ इत्यादींचे प्रत्यय शब्दाला लावले की, त्याचे जे रूप सिद्ध होते त्याला पद म्हणतात [ उदाहरणार्थ 'राम' हा शब्द, रामस्य हे त्याचे पद; लिख् हा शब्द, लिखति हे पद; गम् ( गच्छ् ) हा शब्द, गच्छ ( तू जा, आज्ञार्थ द्वितीय पुरुष एकवचन ) हे पद, इत्यादी ]. ते चरणात किंवा पद्यात ठेवणे म्हणजे योजणे आणि ते चरणातून बाजूला सारणे म्हणजे काढून टाकणे [ व त्याच्या जागी दुसरे पद ठेवणे ]. ह्या दोन क्रिया लक्षपूर्वक आचरणे म्हणजे अवेक्षण. ह्याबाबतीत परंपरागत दोन श्लोक आहेत, ते असे :

शब्द योजणे व शब्द काढणे ( बाजूला सारणे ) हे द्विपक्षीय कार्य जोवर मन दोलायमान ( संदिग्ध/अनिश्चयाच्या ) स्थितीत असते, तोवर चालू राहते. पण एकदा ( योग्य ) जागी ( योग्यतम ) शब्द योजिला जाऊन तो स्थिर झाला की, जणू देवी सरस्वतीची कृपाच झाली असे मानावे !

जेव्हा विभक्तिप्रभृती प्रत्ययांनी युक्त शब्द परिवर्तन सहन न करण्याच्या स्थितीस पोचतात तेव्हा त्यांच्या त्या स्थितीला ( काव्यात ) शब्द योजण्यात कुशल असलेले ( विचारवंत ) शब्दपाक म्हणजे शब्दांची परिपूर्णता किंवा शंभर टक्के अन्वर्थकता असे म्हणतात.

वामनाचा हा सिद्धान्त नीटपणे समजून घ्यावयास हवा. कवी जेव्हा काव्य लिहावयास बसतो तेव्हा त्याला भराभर शब्द सुचत जातात व ते तो लिहीत जातो. पण जेव्हा तो स्वरचित काव्य परीक्षणाच्या हेतूने पुन्हा वाचू लागतो तेव्हा त्याला काही शब्द अधिक, न्यून, अन्यथास्थित किंवा प्रस्मृत असल्याचे जाणवते. अशा जाणिवेबरोबर तो प्रथमतः वापरलेले शब्द बदलण्यास प्रवृत्त होतो. तो वर्ण्य विषय,

पात्र,भाव किंवा रस, वृत्त इत्यादी अनेक बाबींचा विचार करून [अशा योग्यायोग्यतेच्या सत्तावीस कसोट्या क्षेमेन्द्राने आपल्या 'औचित्यविचारचर्चा' ग्रंथात प्रतिपादिल्या आहेतच.] योग्य शब्द शोधून काढतो [एखाद्या वेळी त्याला एखादा नवीन शब्द बनवावाही लागतो आणि प्रतिभाशाली कवी तसा नवीन शब्द बनवतोही] आणि पूर्वीचा शब्द काढून टाकून त्याच्या जागी हा सुचलेला दुसरा शब्द योजतो. कदाचित त्याला एकाहून अधिक शब्दही योजून बघावे लागतात, अर्थात योजलेला शब्द काढणे व त्याच्या जागी सुचलेला नवीन शब्द वापरणे असे हे कार्य अनेक वेळाही, क्वचित्प्रसंगी, करावे लागते. परंतु, हे असेच सतत चालू राहात नाही. तर एक क्षण असा येतो की, काढलेल्या शब्दाच्या जागी सुचलेला व योजलेला दुसरा शब्द इतका चपखल असतो की, मग तो बदलण्याची आवश्यकताच उरत नाही. स्वतःला अभिप्रेत आशय व्यक्त करण्यासाठी कवीला अगदी सर्वतोपरी समुचित शब्द सापडलेला असतो. तो शब्द एकदा जुन्या (म्हणजे दूर सारल्या गेलेल्या) शब्दाच्या जागी विराजमान झाला की, तोच जणू कवीला बजावतो : 'आता मी बदल सहन करणार नाही. परिवर्तन पुरे झाले !' हाच परिवृत्ति-सहिष्णुतेचा त्याग आणि हाच शब्दपाक ! ह्यालाच इंग्रजीत the best words in their best order, the perfection of diction किंवा पाश्चात्त्य शैलीशास्त्रज्ञांच्या परिभाषेनुसार 'mot juste' म्हणतात. मार्जोरी बोल्टनने परिष्करणाचे प्रयोजन स्पष्ट करून सांगताना जे म्हटले आहे त्यात वामनाच्या वरील विचारांचा पडसाद स्पष्टपणे ऐकू येतो. ती विदुषी म्हणते : "....but most polishing is probably done in search for the mot juste, the most exact and effective word possible in the context."[46] अशा प्रकारे परिष्करणसंकल्पनेच्या बाबतीत जरी पूर्व व पश्चिम यांचा संगम प्रतीत होत असला तरी पूर्वेच्या विचारांच्या अभिव्यक्तीत जे माधुर्य व सौन्दर्य आहे त्याचा पश्चिमेच्या विचारांत अभावच जाणवतो.

## (6.2) राजशेखरप्रतिपादित दशविध पाक

वामनाचे शब्दपाकविषयक विचार वर समजून घेतलेच. राजशेखराने वामनाच्या ह्या पाक-संकल्पनेचा नुसता पुरस्कारच केला नाही तर तिचा विस्तार करून तिला आणखी काही परिमाणे मिळवून दिली. त्याचे एतद्विषयक विचार समजून घेण्यासाठी त्याच्या ग्रंथामधून खालील काहीसा दीर्घ भाग उतरून घेणे आवश्यक आहे :

"सततमभ्यासवशतः सुकवेः वाक्यं पाकमायाति । "कः पुनरयं पाकः ?" इत्याचार्याः । "परिणाम." इति मङ्गलः । 'कः पुनरयं परिणाम ?" इत्याचार्याः । "सुपां तिङां च श्रवः सैषा व्युत्पत्तिः" इति मङ्गलः । "सौशब्द्यमेतत् । पदनिवेशनिष्कम्पता पाकः" इत्याचार्याः । तदाहुः—

**"आवापोद्धरणे तावद्यावद्दोलायते मनः । पदानां स्थापिते स्थैर्ये हन्त सिद्धा सरस्वती ॥"**

"आग्रहपरिग्रहादपि पदस्थैर्यपर्यवसायस्तस्मात्पदानां परिवृत्तिवैमुख्यं पाकः" इति वामनीयाः। तदाहुः

"यत्पदानि त्यजन्त्येव परिवृत्तिसहिष्णुताम्।
तं शब्दन्याय(स)निष्णाताः शब्दपाकं प्रचक्षते॥"

"इयमशक्तिर्न पुनः पाकः" इत्यवन्तिसुन्दरी। यदेकस्मिन्वस्तुनि महाकवीनामनेकोऽपि पाठः परिपाकवान्भवति। तस्माद्रसोचितशब्दार्थसूक्तिनिबन्धनः(नं)पाकः। यदाह –

गुणालङ्काररीत्युक्तिशब्दार्थग्रथनक्रमः। स्वदते सुधियां येन वाक्यपाकः स मां प्रति॥"

तदुक्तम्—'सति वक्तरि सत्यर्थे शब्दे सति रसे सति।
अस्ति तन्न विना येन परिस्रवति वाङ्मधु॥"

"कार्यानुमेयतया यत्तच्छब्दनिवेद्यः परं पाकोऽभिधाविषयः। तत्सहृदयप्रसिद्धिसिद्ध एव व्यवहाराङ्गमसौ इति यायावरीयः।

स च कविग्रामस्य काव्यमभ्यस्यतो नवधा भवति। तत्राद्यन्तयोरस्वादु पिचुमन्दपाकम्, आदावस्वादु परिणामे मध्यमं बदरपाकम् आदावस्वादु परिणामे स्वादु मृद्वीकापाकम्, आदौ मध्यममन्ते चास्बादु वार्ताकपाकम्, आद्यन्तयोर्मध्यमं तिन्तिडीकपाकम्, आदौ मध्यममन्ते स्वादु सहकारपाकम्, आद्यावुत्तममन्ते चास्वादु क्रमुकपाकम्, आदावुत्तममन्ते मध्यमं त्रपुसपाकम्, आद्यन्तयोः स्वादु नालिकेरपाकमिति तेषां त्रिष्वपि त्रिकेषु पाकाः प्रथमे त्याज्याः। वरमकविर्न पुनः कुकविः स्यात्। कुकविता हि सोच्छ्वासं मरणम्। मध्यमाः संस्कार्याः। संस्कारो हि सर्वस्य गुणमुत्कर्षयति। द्वादशवर्णमपि सुवर्णं पावकपाकेन हेमीभवति। शेषा ग्राह्याः। स्वभावशुद्धं हि न संस्कारमपेक्षते। न मुक्तामणेः शाणस्तारतायै प्रभवति। अनवस्थितपाकं पुनः कपित्थपाकमामनन्ति। तत्र पलालधूननेन अन्नकणलाभवत्सुभाषितलाभः।

सम्यगभ्यस्यतः काव्यं नवधा परिपच्यते। हानोपादानसूत्रेण विभजेत्तद्धि बुद्धिमान्॥

अयमत्रैव शिष्याणां दर्शितस्त्रिविधो विधिः।
किन्तु वि (त्रि) विधमप्येतत्त्रिजगत्यस्य (?) वर्तते॥"[47]

राजशेखराच्या वरील विचारांचा सारांश असा:

( i ) उत्तम साहित्याच्या निर्मितीसाठी लेखकाने लेखनाचा सतत सराव करणे आवश्यक आहे;

( ii ) 'निर्दोष किंवा अपरिवर्तनीय वाक्यरचना' ह्या संकल्पनेविषयी प्राचीन आचार्यांमध्ये मतभेद होते, हे जरी खरे असले तरी अशा वाक्यरचनेमुळेच वाङ्मयात सरसता किंवा मधुरता उत्पन्न होते ह्याविषयी मतैक्यही होते;

( iii ) काव्यातील वाक्यरचना निर्दोष आहे की नाही हे काव्याच्या प्रकार्याधारे अनुमित करता येते;

( iv ) राजशेखराच्या मते पाकाचे एकूण नऊ प्रकार संभवत असले तरी त्यांपैकी द्राक्षापाक, आम्रपाक व नारिकेलपाक हे तीनच ग्राह्य होत, कारण ते स्वभावतः शुद्ध असतात.

( v ) ज्या काव्यात पाक नसतो ते काव्य नीरस असून आनन्ददायक नसते.

जाताजाता हे आवर्जून नमूद करावयास हवे की, राजशेखराचा वामनाच्या एतद्विषयक विचारांशी तसेच परंपरेने चालत आलेल्या साररूप श्लोकांशी उत्तम परिचय होता. एकंदरीने काव्यशास्त्रज्ञांमध्ये ह्या विषयावर बरेच मंथन चालू होते.

## (6.3) क्षेमेन्द्राचे परिष्करण-विषयक विचार

क्षेमेन्द्राने आपल्या **'कविकण्ठाभरणम्'** नामक ग्रंथात होतकरू कवींना शंभर गोष्टींविषयी उपदेश केला आहे. [ **'शिक्षाणां शतमित्युक्तं युक्तः प्राप्तगिरः कवेः ॥22॥'** ][48] त्याच्या ओघात त्याने 'अवेक्षण' संकल्पनेचा उल्लेख पुढील शब्दांत केला आहे: **'आधानोद्धरणप्रज्ञा कृतसंशोधनं मुहुः'** ॥[49] अर्थात, होतकरू कवीने उचित शब्दांची योजना व अनुचित शब्दांची वगळ करण्याचे ज्ञान संपादन करावे आणि आपल्या लिखाणावर वारंवार हात फिरवून त्यात सुधारणा करावी.

क्षेमेन्द्राच्या ह्या विचारांच्या बाबतीत दोन गोष्टींचा खुलासा करणे आवश्यक आहे. पहिली गोष्ट अशी की, त्याने आधानोद्धरणे ही वामनपूर्वकालापासून चालत आलेली [ कारण वामनानेही 'अत्र श्लोकौ' असे प्रास्ताविक करून जे दोन संग्रहश्लोक उद्धृत केले आहेत त्यांत हे शब्द आहेत. अर्थात ते वामनपूर्वकालीन एखाद्या चिन्तकाने पहिल्यांदा वापरलेले असले पाहिजेत व ते तदनंतरच्या विचारवंतांना पटल्यामुळे ग्राह्य बनून प्रचलित झाले असले पाहिजेत. इतके की, आधानोद्धरणसूत्र म्हणून ते मान्यता पावले. ] शब्दजोडी क्षेमेन्द्राने वापरून आपला परंपरेशी असलेला परिचय प्रदर्शित केला आहे. दुसरी गोष्ट अशी की, जरी त्याने वरील उद्गारांत 'वारंवार' ह्या अर्थाचा 'मुहुः' शब्द वापरला असला तरी त्याचा अर्थ 'कवीने सतत परिष्करण करीत राहावे' असा घ्यावयाचा नाही. तर क्षेमेन्द्राने शिरोधार्य मानलेल्या औचित्य[50] व चमत्कृती[51] ह्या दोन व्यापक सिद्धान्तांच्या सन्दर्भात 'जोपर्यंत कवीला उचित वा चमत्कृतिपूर्ण शब्द गवसत नाही तोपर्यंत कवीने परिष्करण करीत राहावे; एकदा तसा शब्द गवसला की परिष्करणाची गरज न उरल्यामुळे ते थांबवावे', असा क्षेमेन्द्राच्या वरील विधानांचा अर्थ घ्यावयाचा आहे.

## (6.4) अर्थपाक संकल्पना

वर दर्शविल्याप्रमाणे वामनाने शब्दपाकाची व राजशेखराने वाक्यपाकाची चर्चा केली आहे. आता ज्याअर्थी प्रत्येक शब्द कोणत्या ना कोणत्या तरी अर्थाचा वाचक असतो व उलटपक्षी ज्याअर्थी कोणताही अर्थ कोणत्यातरी शब्दाच्या वापरानेच व्यक्त होत असतो त्याअर्थी शब्दपाकाप्रमाणेच अर्थपाकाची व वाक्यपाकाप्रमाणे वाक्यार्थ-

पाकाची [शब्ददोषांप्रमाणेच शब्दार्थदोष असतात आणि वाक्यदोषांप्रमाणेच वाक्यार्थ-दोष असतात, ह्या कल्पना प्राचीनांना मान्य होत्या व त्यांचे विवेचनही त्यांनी केले होते, ही बाब जाणकारांना विदितच आहे] कल्पना करणे न्याय्य व समर्थनीय आहे. किंबहुना गोपेन्द्रतिप्पभूपाल हा जो वामनाच्या सूत्रग्रंथाचा टीकाकार पंधराव्या[52] शतकात होऊन गेला त्याने तसे स्पष्टपणे म्हटलेच आहे: **"इत्थं अर्थपाकोऽपि समर्थनीयः ।"**[53] हे ध्यानात ठेवूनच मागे 5.1 ते 5.4 मध्ये वाक्यार्थदोषांचाही निर्देश केला आहे. आता ह्यानंतर परिष्करणामुळे नेमके काय साधते त्याचा विचार करू.

## (7) परिष्करणाची फलश्रुती

शब्दयोजनेची निर्दोषता व अर्थयोजनेची परिपूर्णता साधण्यासाठी परिष्करण केले जाते, हे वर विस्ताराने दाखवून दिले आहे. ह्या उभयविध परिपूर्णतेच्या योगे ललित साहित्यकृती सर्वथा निर्दोष अतएव रसिकांना ग्राह्य वाटते व आनंद देणारी बनते. राजशेखराने परिष्करणाचे 'अधिकस्य त्यागः', इत्यादी चार मार्ग सांगून झाल्यावर ( मागील छेदक 5 पाहा ) **'इति अहीनम्'** असे निःसंदिग्धपणे म्हटलेच आहे. त्याचा अभिप्राय असा की, परिष्करणाच्या ह्या चार उपायांच्या योगे साहित्यकृतीतील हीनतेचे ( सदोषतेचे ) निवारण होऊन ती निर्दोष बनते. अर्थात परिष्करणाच्या संस्कारामुळे साहित्यकृतीत गुणात्मक सुधारणा होते, ती उत्कृष्ट बनते [**'संस्कारो हि सर्वस्य गुणं उत्कर्षयति ।'**[54] असा एक सर्वव्यापी नियमच राजशेखराने सांगितला आहे]. पौरस्त्य काव्यशास्त्रज्ञांची ही भूमिका आहे.

आता पाश्चात्त्य शैलीशास्त्रज्ञांची एतद्विषयक विचारसरणी लक्षात घेऊ. गुंता-गुंतीच्या किंवा लांबलचक वाक्यांच्या रचनेमुळे वाचकांना जो एक कंटाळा येतो तो परिष्करणामुळे टाळता येतो ह्या **ब्रूक्स व वॉरेन** ह्या दोघां विद्वानांच्या मताचा उल्लेख पूर्वी 5.4 मध्ये केलाच आहे. ह्या विषयाच्या बाबतीत **डब्ल्यू० एस्० मॉर्गनचे** निरीक्षण असे आहे : Revising is a conscious and careful attempt to make your writing good."[55] अर्थात, लेखक आपले लिखाण चांगले [ म्हणजे रसिकांना वाचनीय, रमणीय व स्मरणीय वाटेल असे ] व्हावे ह्यासाठी जाणीवपूर्वक व काळजीपूर्वक परिष्करण करतो. म्हणजेच परिष्करणामुळे लिखाणाची गुणवत्ता उंचावते. समर आईव्हज् ह्या विदुषीच्या मते परिष्करणाच्या योगे शाब्दिक अडथळे-उंचवटे दूर होतात आणि बौद्धिक [ बुद्धीला जाणवणारे स्थूल व सूक्ष्म दोष ] फटी भरून येतात. तिचे मूळ वचनही ह्यापूर्वी 5.4 मध्ये उद्धृत केले आहे. बी० बी० कोहनचे ह्याबाबतीत असे मत आहे की, कधीकधी एखाद्या लेखकाने केलेल्या सुधा-रणांच्या योगे वाचकाला लिखाणाच्या अर्थाच्या व तंत्राच्या अंतस्तलापर्यंत पोचण्याची सोय उपलब्ध होते ["In some cases the changes an author made in the text of his work can provide insight into meaning and

technique.'[56]] प्रस्तुत मुद्याच्या बाबतीत ग्रॅहॅम हाऊने मांडलेले विचार वाचकांच्या बुद्धीला भरपूर खाद्य पुरविणारे आहेत, ते विचार असे :

"The organic unity of a work of literature is not something ready-made; it is not an entire and perfect chrysolite found lying about in nature; it is something achieved. This organic whole may be arrived at in a variety of ways.... Most writing involves a process of revision, conducted either on paper or in the mind before anything is written down. There is some evidence that different writers look on this revising process in very different lights; some see it as the progressively more accurate embodiment of a preconceived meaning; some see it as a continual change and modification of meaning itself. In either case it is best for the critic to look at the matter prospectively."[57]

हाऊच्या म्हणण्याचे तात्पर्य असे की, आपल्याला कोणतीही साहित्यकृती जेव्हा एकसंध वाटत असते तेव्हा तिची ती एकसंधता आयती किंवा नैसर्गिक नसते, तर ती लेखकाने प्रयत्नपूर्वक साधलेली असते. ही एकसंधता साधण्याचे एकाहून अधिक उपाय संभवतात, त्यांपैकी महत्त्वाचा उपाय म्हणजे परिष्करण हा होय. हे परिष्करण कधीकधी लेखक प्रत्यक्षात कागदावर काही लिहिण्यापूर्वी मनातल्या मनात करतो [ मनात प्रथमत: जुळलेला मजकूर जणू 'खोडून काढतो' व त्याच्या जागी दुसरा मजकूर जुळवतो ] तर कधी मजकूर कागदावर लिहिल्यानंतर त्यात खाडाखोड करून करतो. वेगवेगळ्या लेखकांचा ह्या परिष्करण-प्रक्रियेकडे बघण्याचा दृष्टिकोण वेगवेगळा असतो. काहींच्या मते परिष्करणामुळे पूर्वकल्पित विचारकल्पनादींना उत्तरोत्तर अचूक स्वरूप लाभते तर काहींना असे वाटते की, परिष्करणामुळे पूर्वकल्पित अर्थात बदल किंवा परिवर्तन होत असते. समीक्षकाने मात्र परिष्करणामुळे होणाऱ्या संभाव्य परिणामांचा तेवढा विचार करावा.

वरील तौलनिक विवेचनावरून हे स्पष्ट होईल की, परिष्करणामुळे लिखाणाच्या कच्च्या खड्यात गुणात्मक सुधारणा होते ह्या विचाराच्या बाबतीत पौरस्त्य व पाश्चात्त्य शास्त्रकारांमध्ये एकमत आहे. परंतु, ह्या मुद्याच्या विवेचनाच्या ओघात पाश्चात्त्य विचारवंतांनी काही अन्तर्भेदी व सूक्ष्म कल्पना मांडल्या आहेत, त्यांचा आढळ पौरस्त्यांच्या विवेचनात होत नाही.

प्रस्तुत लेखाचा समारोप करण्यापूर्वी परिष्करण-संकल्पनेशी निगडित असलेल्या एका शेवटच्या मुद्याचा विचार करावयास हवा, नाहून हे विवेचन अपुरे राहील. म्हणून आता त्या अखेरच्या मुद्याकडे वळू.

## (8) परिष्करण: त्याज्य व आदर्श

ह्या मुद्याच्या बाबतीत सुरवातीलाच हे नमूद करावयास पाहिजे की, ह्या मुद्याचा विचार फक्त पाश्चात्त्य शैलीशास्त्रज्ञांनीच केलेला दिसून येतो. पौरस्त्यांना हा मुद्दा जाणवलेला दिसत नाही. परिष्करणामुळे लेखन दोषमुक्त होऊन त्याचे सौन्दर्यदृष्ट्या मूल्य वृद्धिगत होते ह्याबद्दल सन्देह नाही. तथापि, काही बाबतींत परिष्करण इष्ट नसते असे काही पाश्चात्त्य शैलीशास्त्रज्ञांचे अभिमत आहे. म्हणूनच ह्या मुद्याचा विचार कर्तव्य ठरतो.

पर्ल होग्रेफे ह्या विदुषीला कच्च्या खर्ड्यात डागडुजी करणे पसंत नाही. ती ललित साहित्यकृतीच्या मानसिक पुनर्दर्शनाची व पुनर्निर्मितीची शिफारस करते. ती ह्याबाबतीत प्रतिपादिते: "If your work needs much revising, do not be satisfied with mechanical tinkering. Revisualize until it becomes an imagined experience. Then rewrite."[58] अर्थात लेखकाने आपल्या साहित्यकृतीचा कच्चा खर्डा वाचल्यावर त्याला जर असे जाणवले की, त्या प्रथम लिखाणात खूपच सुधारणा करण्याची आवश्यकता आहे तर त्याने केवळ यांत्रिकपणे इकडेतिकडे पुस्तीदुरुस्ती करण्यात समाधान मानू नये. त्याने समग्र साहित्यकृती मनात फिरून एकवार उभी करावी. तिला काल्पनिक अनुभूती बनू द्यावे. नंतर ती पुन्हा लिहून काढावी.

ह्यावरून होग्रेफेला जुजबी परिष्करण मंजूर नाही व तिला कलाकृतीची नव्याने मानसिक पुनर्घडण अपेक्षित व स्वागतार्ह वाटते, ह्या दोन बाबी स्पष्ट होतात. पण येथे हे ध्यानात ठेवावयास हवे की, कलाकृतीच्या अशा प्रकारच्या पुनर्घडणीमुळे तिचे संपूर्ण नूतनीकरण न होता 'अधिकस्य त्याग:' इत्यादी पूर्वोक्त चतुर्विध परिष्करण मनातल्या मनात होते. होग्रेफेने हाच उपदेश कथालेखनाच्या संदर्भात पुढीलप्रमाणे केला आहे: "But if you are doing much revision, revisualize and let the story grow from within you as you rewrite it. Avoid a mere detached tinkering".[59] स्टीचेन( Steichen )ने हेन्री मातीस ( Henri Matisse ) ह्या फ्रेंच चित्रकाराच्या एका श्रेष्ठ चित्रकृतीविषयी जे उद्‌गार काढले आहेत ते कोणत्याही ललित साहित्यकृतीलाही पूर्णपणे व सार्थपणे लागू पडण्याजोगे आहेत. ते उद्‌गार असे:

"I remember one of Matisse's greatest paintings, called *The Dance*.... I saw the effort and turmoil and the changes and changes that he made. It was gradual, almost as gradual as the development of the baby that's under a woman's apron. And then came the final burst of passion. Within a few days he

changed the whole painting, the figures became brilliant vermilion, the background a deep Prussian blue. It was a moment of exaltation–a child being born ! A work of art being born."[60]

अर्थात, मातीस [ ज. 1869, मृ. 1954. Gustave Moreau चा शिष्य. ] ह्या फ्रेंच चित्रकाराच्या 'नृत्य' ह्या एका श्रेष्ठ चित्राची मला आठवण होते. त्याने सुरुवातीला रंगविलेल्या चित्रात पुढे सतत व खूप बदल केले. ते करताना त्याने घेतलेले कष्ट व त्याने केलेली धडपड मला आठवते. एखाद्या मातेने आपल्या तान्ह्या बालकाला पदराखाली धरून हळूहळू वाढवावे, तसे त्याने त्या चित्रात धीरेधीरे बदल केले आणि नंतर स्फूर्तीचा जबरदस्त अन्तिम झटका आला. मग काय विचारता, पाहता पाहता ते सारे चित्र पार बदलून गेले. त्यातील आकृती तजेलदार तांबड्या रंगात उठून दिसू लागल्या आणि पार्श्वभूमी गडद निळ्या रंगात ! एखादे मूल जन्माला येत असताना जसा त्याच्या मातेला अपूर्व आनन्द होत असतो, तसा तो क्षण होता ! एक कलाकृती जन्म घेत होती.

परिष्करण-प्रक्रिया असा चमत्कार घडवून आणू शकते. ललित साहित्यिकाने अत्यंत मन लावून व सर्व मानसिक-बौद्धिक शक्ती एकाग्र करून आपल्या कलाकृतीच्या कच्च्या खर्ड्याचे परिष्करण-संस्करण केले तर त्याचे परिपूर्ण, निर्दोष, टवटवीत रमणीय व जिवंत कलाकृतीत रूपान्तर होते. अशी कलाकृती रसिकांना उत्कट कलानंद देऊन 'चिरंजीव' बनते.

## (9) निष्कर्ष

(i) ललित लेखकाने केलेल्या प्रारंभिक लेखनाला कच्चा खर्डा ( first draft ) म्हणतात. तो सर्वथा निर्दोष व सौन्दर्यदृष्ट्या परिपूर्ण बनवण्यासाठी त्यात फेरबदल करावे लागतात, ह्याविषयी पौरस्त्य व पाश्चात्त्य साहित्यमीमांसकांत एकमत आहे.

(ii) ह्या फेरबदल-कार्याला भारतीयांनी अवेक्षण, परीक्षण व संशोधन अशी तीन नावे दिली आहेत, तर पाश्चात्त्यांनी ह्यासाठी polishing, revision व refinement या संज्ञा वापरल्या आहेत.

(iii) अधिक शब्दार्थादींचा त्याग, न्यूनांची कल्पनापूर्वक योजना, अस्थानी पडलेल्यांची सुस्थानी स्थापना व विसरून गेलेल्यांची योजना ही चतुर्विध परिष्करण-प्रक्रिया भारतीयांनी साक्षात प्रतिपादिली आहे, तर पाश्चात्त्यांना ती अभिप्रेत असल्याचे जाणवते.

(iv) भारतीयांनी परिष्करणाचे 'आधानोद्धरण-सूत्र' इसवी सन 800 च्या सुमाराला च मांडले होते.

(v) परिष्करणामुळे साहित्यकृतीची गुणवत्ता उंचावते हा विचार उभयवर्गीय विचारवंतांना मान्य आहे.

(vi) एतद्विषयक विवेचनात पुढील मुद्यांच्या बाबतीत भारतीयांचे विचार पाश्चात्त्यांच्या विचारांहून श्रेष्ठ आहेत: निर्दोष काव्याचा उत्तुंग आदर्श; कच्चा खर्डा लिहिण्यास व परिष्करण करण्यास अनुकूल वेळ; शब्दयोजनेची निर्दोषता व परिपूर्णता. ह्याउलट पुढील मुद्यांचे स्पृहणीय विवेचन फक्त पाश्चात्त्यांच्या ग्रंथांतच आढळते: कोणतीही श्रवणीय / स्मरणीय कल्पना समग्रपणे पहिल्या फटक्याला लिहिण्याची / बोलण्याची मनुष्याची असमर्थता; मनातल्या मनात केले जाणारे परिष्करण; जुजबी परिष्करण पुरेसे सौन्दर्यसाधक नसते आणि शांत मनःस्थितीत विचारपूर्वक केलेले परिष्करण साहित्यकृतीला लावण्य प्राप्त करून देते.

## संदर्भटीपा


1. आचार्य भामहविरचित **काव्यालङ्कार,** भाष्यकार देवेन्द्रनाथ शर्मा, पटना, बिहार राष्ट्रभाषा परिषद्, 1962, पृ. 139.
2. दण्डिकृतं काव्यादर्शापराभिधम् **काव्यलक्षणम्,** संस्कर्ते अनन्तलाल ठाकुर व उपेन्द्र झा, दरभंगा, मिथिला विद्यापीठ प्रकाशन, 1957, पृ. 5.
3. केशवमिश्रकृत: **अलङ्कारशेखरः,** संशोधक अनन्तरामशास्त्री वेताळ, बनारस सिटी, चौखम्बा संस्कृत सीरीज ऑफिस, 1927, पृ. 14.
4. भामहविरचित **काव्यालङ्कार,** उ. नि. पृ. 6.
5. कविश्रीराजशेखरकृता **काव्यमीमांसा,** संपा. सी. डी. दलाल व आर. ए. शास्त्री, तृतीय आवृत्ती, बडोदे, ओरिएण्टल् इन्स्टिट्यूट, 1934, पृ. 21.
6. Graham Hough, *Style and Stylistics,* London, Routledge & Kegan Paul, 1972, p. 28.
7. G. H. Vallins, *The Best English,* London, Andre Deutsch, 1960, p. 17.
8. Chadburn, 'Style : The Art and Craft of Self-expression', *Good English How To Speak And Write It,* London, Odhams Press Limited, 1949, p. 219.
9. Marjorie Boulton, *The Anatomy of Prose,* London, Routledge & Kegan Paul Ltd., 1962, p. 84.
10. कविश्रीराजशेखरकृता **काव्यमीमांसा,** उ. नि. पृ. 52.
11. तत्रैव.
12. श्रीवाग्भटप्रणीत: **वाग्भटालङ्कारः,** टीकाकार सत्यव्रत सिंह, वाराणसी, चौखम्बा विद्याभवन, 1957, पृ. 9.
13. Pearl Hogrefe, *The Process of Creative Writing,* New York, Harper and Brothers, 1956, p. 275.
14. कविश्रीराजशेखरकृता **काव्यमीमांसा,** उ. नि. पृ. 52.

15. Summer Ives, *A New Handbook for Writers*, New York, Alfred A. Knopf, 1960, p. 275.

16. Marjorie Boulton, *The Anatomy of Poetry*, London, Routledge and Kegan Paul Ltd., 1968, p. 153.

17. C. Brooks and R. P. Warren, *Fundamentals of Good Writing*, London, Dennis Dobson, 1968, p. 319.

18. *A New Handbook for Writers*, cited above, p. 58.

19. Reproduced by Bonamy Dobree' in *Modern Prose Style*, Oxford, The Clarendon Press, 1956, pp. 217-18.

20. **काव्यमीमांसा**, उ. नि. पृ. 52.

21. *Fundamentals of Good Writing*, cited above, p. 319.

22. *The Process of Creative Writing*, cited above, p. 276.

23. *The Anatomy of Poetry*, cited above, pp. 152-53.

24. **काव्यमीमांसा**, उ. नि. पृ. 52.

25. *The Process of Creative Writing*, cited above, p. 20.

26. **काव्यमीमांसा**, उ. नि., पृ. 19.

27. Herbert Read, *English Prose Style*, Ludhiana, Lyall Book Depot, 1968, p. 59.

28. *Style and Stylistics*, cited above, p. 11.

29. **काव्यमीमांसा**, उ. नि. पृ. 52.

30. भोजविरचितम् **सरस्वतीकण्ठाभरणम्**, संपा. आनन्दराम बरुआ, गौहती, पब्लिकेशन बोर्ड, आसाम, 1969, पृ. 2-4, 7-9, 12-14.

31. भामहविरचित **काव्यालङ्कार**, उ. नि. पृ. 141.

32. महाकविक्षेमेन्द्रकृत **कविकण्ठाभरण**, संपा. वामन केशव लेले, प्रथम, वाराणसी, मोतीलाल बनारसीदास, 1967, पृ. 98 व 72.

33. **सरस्वतीकण्ठाभरणम्**, उ. नि. पृ. 1-4, 6-12, 13-17.

34. **काव्यमीमांसा**, उ. नि. पृ. 21.

35. **कविकण्ठाभरण**, उ. नि. पृ. 72.

36. श्रीहेमचन्द्रविरचितं **काव्यानुशासनम्** सटीकम्, संशोधक शिवदत्तशर्मा व इतर, द्वितीय, मुंबई, निर्णयसागर मुद्रणालय, 1934, पृ. 13-18.

37. श्रीरुद्रटप्रणीत: **काव्यालङ्कार:**, संशोधक दुर्गाप्रसाद व इतर, तृतीय, मुंबई, निर्णयसागर मुद्रणालय, 1928, पृ. 35.

38. **सरस्वतीकण्ठाभरणम्**, उ. नि. पृ. 7, 14.

39. *Fundamentals of Good Writing*, cited above, p. 327.

40. *The Process of Creative Writing*, cited above, p. 20.

41. *A New Handbook for Writers*, cited above, pp. 58-59.

42. Ibid., p. 275. 43. *The Anatomy of Poetry*, cited above, pp. 152-53.

44. Ibid., p. 155.

45. श्रीवामनविरचिता **काव्यालङ्कारसूत्रवृत्तिः**, संशोधक, ना. ना. कुळकर्णी, पुणे, ओरिएण्टल बुक एजन्सी, 1927, पृ. 12.

46. *The Anatomy of Poetry*, cited above, p. 153.

47. **काव्यमीमांसा**, उ. नि., पृ. 20-21. 48. **कविकण्ठाभरण**, उ. नि. पृ. 72.

49. तत्रैव, पृ. 68.

50. **क्षेमेन्द्रप्रणीत औचित्यसिद्धान्त आणि औचित्यविचारचर्चा**, संपा. वा. के. लेले, प्रथम, वाराणसी, सौ. मालती वा. लेले, 1966, पृ. 1-159.

51. **कविकण्ठाभरण**, उ. नि. पृ. 75-86.

52. P. V. Kane, *History of Sanskrit Poetics*, Third revised edition, Delhi, Motilal Banarsidass, 1961, p. 147.

53. श्रीमद्वामनाचार्यविरचिता **काव्यालङ्कारसूत्रवृत्तिः**, व्याख्याकार केदारनाथशर्मा, द्वितीय, वाराणसी, चौखम्बा अमरभारती प्रकाशन, 1979, पृ. 37.

54. **काव्यमीमांसा**, उ. नि. पृ. 21.

55. W.S. Morgan, *Writing And Revising*, New York, The Macmillan Company, 1957, p. 45.

56. B. B. Cohen, *Writing About Literature*, Chicago, Scott, Foresman and Company, 1963, p. 102.

57. *Style And Stylistics*, cited above, p. 11.

58. *The Process of Creative Writing*, cited above, p. 20.

59. Ibid., p. 276.

60. E J. Steichen, 'The Living Joy of Pictures', *Studies in Prose Writing*, ed. J R Kreuzer and L Cogan, New York, Holt, Rinehart and Winston, 1961, p. 148.

# 5. साहित्यातील उसनवारी

## [ स्वरूप, प्रकार व इष्टानिष्टता : संस्कृत काव्यशास्त्रदृष्ट्या विवेचन ]

### (1) प्रास्ताविक

प्राचीन भारतीय साहित्यशास्त्रज्ञांनी आपापल्या ग्रंथांत ललित साहित्याचे प्रयोजन, त्याच्या निर्मितीची कारणे, प्रतिभा, शास्त्रज्ञान, लेखनाचा सराव, सत्काव्य, कुकाव्य, साहित्याची गद्यादी माध्यमे, साहित्याच्या अभिव्यक्तीच्या विविध भाषा, साहित्याचे विषय, प्रकार, दोष, अलंकार, रस, नायक-नायिकांचे प्रकारोपप्रकार, कवीचे व रसिकांचे वर्ग, साहित्यातील शब्दांची शुद्धता, कविसंप्रदाय इत्यादी अनेक विषयोप-विषयांची सोपपत्तिक व सोदाहरण चर्चा विस्ताराने केलेली आढळते. त्या विषयोप-विषयांत साहित्यातील उसनवारी अथवा वाङ्मयचौर्य ह्या विषयाच्या विवेचनालाही यथान्याय स्थान मिळाले आहे. तसे होणे अनेक कारणांखातर अपरिहार्य होते. ती कारणे अशी:

( i ) वाल्मीकी व व्यास ह्या दोन महर्षींनी अनुक्रमे रामायण व महाभारत ह्या कृतींच्या द्वारे उत्तरकालीन साहित्यकारांपुढे उत्तुंग आदर्श ठेवून दिले होते. क्षेमेन्द्राने म्हटल्याप्रमाणे[1] प्राचीन साहित्यिक वाल्मीकींना चक्रवर्ती व सर्वोपजीव्य कवी मानीत असत; त्यांच्या धवल-विमल श्लोकांनी त्रिभुवन उजळून निघाले आहे, विभूषित झाले आहे, अशी त्यांची धारणा होती. व्यासांच्या महाभारताबद्दलही प्राचीनांची अशीच नितान्त आदराची भावना होती. त्यांना व्यास भुवनोपजीव्य कवी वाटत असत आणि त्यांचे महाभारत सर्वोपजीव्य वाटत असे.[2] ह्या दोन ग्रंथांना इतिहास म्हणत असत; त्यांपैकी एकनायक रामायणाला परक्रिया व बहुनायक महाभारताला पुराकल्प अशा संज्ञा असल्याचा उल्लेख राजशेखराने[3] केला आहे. हे दोन्ही ग्रंथ ऋषिप्रणीत असल्यामुळे सर्व समाज त्यांना पूज्य मानीत असे. या दोन ग्रंथांत प्राचीन भारतीयांची संस्कृती सामावलेली आहे, ही श्रद्धा समाजाच्या सर्व वर्गांत व म्हणूनच साहित्यिकांत दृढमूल झाली होती. 'यदिहास्ति तदन्यत्र यन्नेहास्ति न तत्क्वचित् ।' असा महा-भारताचा लौकिक सर्वत्र पसरलेला होता. खुद्द व्यासांनी आपल्या काव्याविषयी ज्या खालील स्वरूपाच्या प्रतिज्ञा केल्या होत्या त्याही प्राचीन साहित्यिकांच्या अवलोकनात आलेल्या होत्याच:

**'अस्य काव्यस्य कवयो न समर्था विशेषणे ।'** ( अनुक्रमणिका पर्व 1.73 ) अर्थात ह्या ( महाभारत ) काव्यावर भविष्यकालीन कवी मात करू शकणार नाहीत.

'सर्वेषां कविमुख्यानामुपजीव्यो भविष्यति ।
पर्जन्य इव भूतानामक्षयो भारतद्रुमः ॥' ( तत्रैव, 1.92 )

अर्थात, सर्व प्राणिमात्रांना ज्याप्रमाणे पर्जन्य सतत आधार देतो त्याप्रमाणे सर्व प्रमुख कवींना हा महाभारतरूपी वृक्ष निरंतर आधार देत राहील ( अर्थात कथानकोपकथानके पुरवीत राहील ).

प्राचीन काव्यशास्त्रकारांनीही होतकरू साहित्यिकांना आपापल्या साहित्यकृतींसाठी कथानके उपर्युक्त इतिहासग्रंथांमधून घेण्याचा उपदेश केला होता. उदाहरणार्थ, भामह म्हणतो: '…इतिहासाश्रयाः कथाः ।…मन्तव्याः काव्यगैः…।।'[4] अर्थात, काव्याकडे वळू इच्छिणाऱ्यांनी ( काव्यरचनेस प्रवृत्त झालेल्यांनी ) रामायण व महाभारत यांतील कथांचे, आख्यानांचे चांगले मनन करावे. दण्डीनेही[5] महाकाव्याचे कथानक इतिहासोद्भूत ( अथवा काल्पनिक ) असावे असा दण्डक घालून दिला आहे, राजशेखराने[6] काव्ययोग्य विषयांचे बारा स्रोत ( =पुरवठाकेन्द्रे ) सांगताना श्रुती ( वेद ), स्मृतिग्रंथ, इतिहास व पुराणे यांचा आवर्जून उल्लेख केला आहे. साहित्यसम्राट बनण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या साहित्यिकाने कोणकोणत्या शास्त्रांशी उत्तम परिचय करून घ्यावा ते विशद करून सांगताना क्षेमेन्द्राने[7] महाभारत व रामायण यांचा, न विसरता, निर्देश केला आहे. धनंजयाने[8] आपल्या दशरूपकाच्या प्रथम प्रकाशाच्या अखेरीस असा सल्ला दिला आहे की, नाटककाराने रामायणादी ( =महाभारत, पुराणे इत्यादी ) व बृहत्कथा यांचे उत्तम अनुशीलन करून सरस नाटक लिहावे. म्हणजे धनंजयाने, साहित्यिकाने अभ्यासावयाच्या ग्रंथांत, बृहत्कथेची भर घातली. हेमचन्द्राने[9] व्युत्पत्तीचे ( विविध शास्त्रांच्या ज्ञानाचे ) स्पष्टीकरण करताना श्रुती, स्मृती, पुराण व इतिहास या ग्रंथांचा स्मरणपूर्वक निर्देश केला आहे.

एतावता रामायण, महाभारत, भागवतादी पुराणे, पैशाची भाषेतील गुणाढ्यरचित बृहत्कथा इत्यादी प्राचीन ग्रंथांचे आदर्श नवोदित साहित्यिकांपुढे होते आणि त्या आदर्श ग्रंथांचे अनुशीलन करून त्यांतून घटना, प्रसंग, व्यक्तिचित्रण, कथांश इत्यादींची विवेकपूर्ण उसनवारी करण्याची त्यांना मुभा होती. संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश इत्यादी भाषांतील साहित्याचे अवलोकन केले असता त्या भाषांतील साहित्यिकांनी तशी उसनवारी प्रत्यक्षात केली असल्याचेही दृष्टोत्पत्तीस येते. भासाचे प्रतिमा नाटक, धीरनागाचे कुन्दमाला, भट्टीचे रावणवध महाकाव्य, कुमारदासाचे जानकीहरण महाकाव्य, मात्रराजाचे उदात्तराघव नाटक, यशोवर्म्याचे रामाभ्युदय नाटक, भवभूतीचे उत्तररामचरितम् नाटक, मुरारीचे अनर्घराघव नाटक, अभिनन्दाचे रामचरितम् महाकाव्य, शक्तिभद्राचे आश्चर्यचूडामणी नाटक, धनंजयकृत द्विसन्धान महाकाव्य, राजशेखराचे बालरामायण नाटक, भोजाचा रामायणचंपू, क्षेमेन्द्राचे कनकजानकी

नाटक इत्यादी संस्कृत भाषेतील विविध साहित्य-प्रकारान्तर्गत साहित्यकृती रामायणाधारित होत्या. तर भासाची मध्यमव्यायोग, ऊरुभंग इत्यादी नाटके, भारवीचे किरातार्जुनीयम् महाकाव्य, भट्टनारायणाचे वेणीसंहार नाटक, माघाचे शिशुपालवध महाकाव्य, अभिनन्दाचे भीमपराक्रम नाटक, कुलशेखराचे सुभद्राधनंजय नाटक, नीलकंठाचे कल्याणसौगन्धिक नाटक, वासुदेवाचे कृष्णयुधिष्ठिर महाकाव्य, नीतिवर्म्याचे कीचकवध काव्य; धनंजयाचे द्विसन्धान महाकाव्य, राजशेखराचे बालभारत नाटक, क्षेमीश्वराचे चण्डकौशिक नाटक, त्रिविक्रमाचा नलचंपू, क्षेमेन्द्राचे चित्रभारत नाटक इत्यादी ललित साहित्यकृतींना महाभारताचे अधिष्ठान होते. लक्ष्मीधराचे चक्रपाणिविजय, महासेनाचे प्रद्युम्नचरित, क्षेमेन्द्राचे अमृततरंग, त्याचेच दशावतारचरित, सुकुमाराचे कृष्णविलास, मंखाचे श्रीकंठचरित इत्यादी साहित्यकृतींनी आपापली कथानके भागवत, शिव इत्यादी पुराणांतून घेतलेली होती. ही परभृतता फक्त संस्कृत साहित्यकृतींपुरतीच मर्यादित नव्हती, तर ती प्राकृत, अपभ्रंश इत्यादी अन्य भाषांतील साहित्यांतही आढळून येत होती. उदाहरणार्थ, विमल नामक जैनसंप्रदायी कवीचे पद्मचरित महाराष्ट्री प्राकृतातील महाकाव्य जैन परंपरेतील रामायणावर आधारित आहे; सर्वसेनाचे हरिविजय, पारिजातहरण इत्यादी प्राकृत ग्रंथ महाभारत, हरिवंश यांच्या आधारे लिहिलेले आहेत, तर प्रवरसेनाचे सेतुबन्ध नामक प्रसिद्ध प्राकृत महाकाव्य रामायणावर अधिष्ठित आहे. रइधूचे पद्मपुराण, पुष्पदन्ताच्या महापुराणाचा प्रथमार्ध, स्वयंभूचे पउमचरिउ इत्यादी अपभ्रंश भाषेतील साहित्यकृती रामायणाधारित आहेत व पुष्पदंताच्या महापुराणाचा द्वितीयार्ध, स्वयंभूचे रिठ्ठणेमिचरिउ, धवलकविकृत हरिवंशपुराण इत्यादी कृतींना महाभारत, श्रीकृष्णचरित्र, हरिवंश इत्यादींचा आधार आहे. वादिभसिंहाचा गद्यचिन्तामणी गुणाढ्याच्या बृहत्कथेवर आधारलेला आहे.[10]

तात्पर्य संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश इत्यादी भाषांतील अनेक साहित्यकृतींच्या मुळाशी रामायण, महाभारत, बृहत्कथा, भागवतादी पुराणे इत्यादी ग्रंथ असल्यामुळे त्या साहित्यकृतींत उपजीव्य ग्रंथांतील शब्द, वाक्ये, कल्पना, विचार, सुभाषिते कधी जशीच्या तशी तर कधी थोड्याफार फेरबदलाने उतरणे अगदी स्वाभाविक होते. अशा प्रकारे जाणीवपूर्वक केलेली किंवा अजाणता झालेली उसनवारी साहजिकपणेच साहित्यशास्त्रज्ञांच्या चिन्तनाचा विषय होऊन बसली.

( ii ) अशा चिन्तनाला दुसरे एक कारण झाले. ते म्हणजे काही प्राचीन साहित्यकारांनी पूर्वसूरींच्या ग्रंथांची प्राय: नक्कल केली. पूर्वसूरींच्या ग्रंथांमधून कथावस्तूची प्रेरणा घेणे व किरकोळ स्वरूपाची उसनवारी करणे वेगळे आणि नक्कल किंवा पूर्ण अनुकरण करणे वेगळे. अशा अनुकरणात मूळच्या कृतीचे प्रतिध्वनी ऐकू येतात, हे वेगळे सांगावयास नकोच. उदाहरणार्थ, सोमेश्वराने काव्यादर्शात असे सुचवले आहे की, पुष्पताडितकाचे कथानक मूलदेवचरित नामक पूर्वीच्या काव्यातून जसेच्या तसे

घेतलेले आहे.[11] जयसिंहनन्दिन्ने कथानक व तपशील ह्या बाबतीत अश्वघोषाचे अनुकरण केले आहे.[12] उद्भटाचे कुमारसंभवम् महाकाव्य कालिदासाच्या कुमारसंभवम् महाकाव्याची नक्कल आहे.[13] मयूरकवीच्या सूर्यशतक ह्या स्तोत्रकाव्याचे सहीसही अनुकरण करून वज्रदेव नामक बौद्ध कवीने लोकेश्वरस्तोत्र इसवी सनाच्या नवव्या शतकात रचले.[14] रविषेण नामक कवीने आपल्या पद्मचरितात विमलकवीच्या पद्मचरित या महाराष्ट्री प्राकृतातील महाकाव्यातून वैपुल्याने उसनवारी केली आहे, आणि स्वयंभूने रविषेणाच्या काव्यातून तपशील जशाच्या तसा उचलला आहे.[15] अनुकरणाचे हे लोण बृहत्तर भारतातही पोचले. उदाहरणार्थ, Ramayana kakawin ( =kāvya ) हे जुन्या जावा-भाषेतील काव्य भट्टीच्या रावणवध या संस्कृत महाकाव्याची अनुकृती आहे. त्यातील कित्येक पद्ये भट्टीच्या श्लोकांची जावा-भाषेतील भाषान्तरे आहेत.[16]

अनिष्ट अनुकरणाची ही प्रवृत्ती लक्षात आल्यामुळेच प्राचीन साहित्यशास्त्रकारांनी वाङ्मयचौर्याचे स्वरूप व त्याची इष्टानिष्टता या विषयाचा गंभीरपणे परामर्श घेतला.

( iii ) अनेक प्राचीन साहित्यकारांनी त्यांना उपलब्ध झालेल्या पूर्वकालीन साहित्यकृतींचे यथामती व यथाशक्ती संक्षेपविस्तारही केले. तसे करताना स्वाभाविकपणे मूळ साहित्यकृतींतील शब्द, कल्पना, पद्ये, सर्ग इत्यादींचा यथामूल किंवा किंचित फेरबदलासह समावेश नवीनांच्या कृतींत झाला. उदाहरणार्थ, भासाने रचलेल्या चारुदत्त नामक संक्षिप्त नाटकाचा शूद्रकाने विस्तार करून आपले मृच्छकटिकम् हे लोकप्रसिद्ध नाटक सिद्ध केले.[17] नवव्या शतकात होऊन गेलेल्या वासुदेव नामक कवीने आपल्या युधिष्ठिरविजय नामक अष्टाश्वासात्मक महाकाव्यात महाभारतीय कथानकाचे सुटसुटीत सारसंकलन केले आहे; तसे करताना त्याने एकमेकांत गुंफलेली मुळातील उपाख्याने व इतर कथानके यांना फाटा दिला आहे. रविदेवकृत नलोदय हे चतुःसर्गात्मक महाकाव्यदेखील महाभारतान्तर्गत नलकथेचा असाच एक नमुनेदार सारांश आहे. दहाव्या शतकात होऊन गेलेल्या धनपालाने तिलकमंजरी नामक एक कल्पित दीर्घकथा लिहिली. कालान्तराने पल्लीपाल-पद्मसागर-प्रभृतींनी त्या दीर्घकथेची संक्षिप्त संस्करणे सिद्ध केली.[18] सोमदेवकृत कथासरित्सागर व क्षेमेन्द्ररचित बृहत्कथामंजरी ही गुणाढ्याच्या बृहत्कथेची सारांशकाव्ये असून क्षेमेन्द्राची रामायणमंजरी व भारतमंजरी ह्या क्रमशः रामायण व महाभारत ह्या आर्ष महाकाव्यांच्या संक्षिप्त आवृत्त्या आहेत व त्या प्रसिद्ध आहेत. इसवी सनाच्या दहाव्या शतकात होऊन गेलेल्या धणवालू नामक एका दिगंबर जैन कवीने भविसयत्तकहा नावाची एक कादंबरी ( दीर्घ कल्पित कथा ) अपभ्रंश भाषेत लिहिली. पुढे सतराव्या शतकातील मेघविजय नामक कवीने त्या कादंबरीचे सार संस्कृत भाषेत लिहिले, ते भविष्यदत्त-

चरित्र नावाने ओळखले जाते.[19] हरिभद्र नामक कादंबरीकाराची महाराष्ट्री प्राकृतातील समराइच्च नामक कादंबरी प्रद्युम्न नामक साहित्यिकाने संस्कृतात संक्षिप्त स्वरूपात सादर केली, तर हरिभद्राच्याच धुत्तक्खाणाचा संस्कृतात सारांश संघतिलकाने सिद्ध केला.[20] कुवलयमाला या संस्कृत ग्रंथाचे संस्कृतातच पण चंपू-प्रकारात संक्षिप्तीकरण रत्नप्रभाने तेराव्या शतकात केले तर कुवलयमालेतील मायाइच्च कथा बाराव्या शतकातील आम्रदेवाने प्राकृत पद्यात साररूपाने कथन केली.[21] ह्यापूर्वी परिच्छेद ( ii ) मध्ये म्हटल्याप्रमाणे ह्या सारांशकाव्यांची प्रवृत्ती बृहत्तर भारतातही प्रचलित झाली. परिणामी, इसवी सनाच्या सातव्या शतकातील कुमारदासाच्या जानकीहरण या संस्कृत महाकाव्याचा कालान्तराने बाराव्या शतकात सिंहली भाषेत संक्षिप्त अनुवाद करण्यात आला. उत्तरकालीन पाली काव्यावरही त्याचा खूप प्रभाव पडला.[22]

( iv ) प्राचीन साहित्यिक आपल्या साहित्यकृतींच्या अनेक नकला करून त्या दूर देशी राहणाऱ्या रसिकांना व समीक्षकांना पाठवीत असत. प्राचीनांच्या ह्या प्रथेचा उल्लेख राजशेखर व क्षेमेन्द्र या दोघा काव्यमीमांसकांनी केला आहे. राजशेखर कवींना उपदेश करतो : **'सिद्धं च प्रबन्धमनेकादर्शगतं कुर्यात् ।'**[23] अर्थात, एकदा कविता ( =साहित्यकृती, फेरबदल वगैरे करून झाल्यावर ) सिद्ध झाली की, तिच्या अनेक प्रती तयार कराव्यात. असे करण्यामागे, काही प्रती मर्मज्ञ काव्यरसिकांकडे धाडाव्यात, असे सुचवण्याचा हेतू उघड आहे. क्षेमेन्द्राचे एतद्विषयक उद्‌गार अधिक स्पष्ट व निःसंदिग्ध आहेत. तो होतकरू कवींना शंभर सूचनांनी भरलेला उपदेश देण्याच्या ओघात म्हणतो : **'स्वसूक्तप्रेषणं दिक्षु परसूक्तपरिग्रहः ।'**[24] अर्थात, कवीने आपल्या सुंदर काव्यकृती दशदिशांत पाठवाव्यात व दुसऱ्या कवींच्या रमणीय कवितांचा स्वतःपाशी संग्रह करावा. प्राचीन कवींच्या ह्या प्रथेची दखल डॉ० वॉर्डर यांनीही पुढील शब्दांत घेतली आहे : "It is possible, in view of the fact that it does appear to have been the habit of Indian poets to circulate their poems canto by canto at times, or to read current work to their friends,..."[25] प्राचीनांच्या ह्या प्रघातामुळे त्यांच्या मनावर इतरांच्या शब्दरचनांचा, कल्पनांचा, प्रतिमांचा, वाक्यविन्यासांचा, अभिव्यक्तिशैलींचा कळत-नकळत ठसा उमटत असे व त्यातील काही भाग तसाच कळत-नकळत स्वतःच्या साहित्यकृतीतही उतरत असे. सुबन्धू, बाणभट्ट, दण्डी, उद्योतनसूरी, राजशेखर, त्रिविक्रम, सोमदेव, धनपाल, सोड्ढल, सोमेश्वर, विनयचन्द्र इत्यादी कित्येक प्राचीन व मध्ययुगीन साहित्यिकांनी गुणाढ्याच्या बृहत्कथेच्या साहित्यसौन्दर्याचा आपल्यावर खूप प्रभाव पडला असल्याचे आणि त्याच्या कृतीपासून आपल्याला प्रेरणा लाभली असल्याचे प्रांजळपणे नमूद केले आहे.[26] भासाच्या प्रतिमा नाटकापासून

प्रेरणा घेऊन त्या नाटकात जेवढा रामायणीय कथाभाग आलेला आहे, तेवढ्यावरच मात्रराजाने उदात्तराघव नावाचे नाटक लिहिले आहे.[27] पुष्पदन्ताला अपभ्रंश भाषेत जसहरचरिउ काव्य लिहिण्याची प्रेरणा सोमदेवाच्या यशस्तिलकचंपू या संस्कृत साहित्यकृतीपासून लाभली.[28] धनपालाने तिलकमंजरी नामक संस्कृत कादंबरीत बृहत्कथाकार गुणाढ्य, पादलिप्त, बाण, पुलिन्द्र, हरिभद्र, रुद्र इत्यादी स्वपूर्वकालीन साहित्यिकांना स्वतःचे स्फूर्तिदाते मानले आहे.[29] कुलशेखरवर्मन् नामक नवव्या शतकातील नाटककाराने शूद्रक, कालिदास, हर्ष, दण्डी इत्यादींचा, स्वतःचे नामांकित पूर्वसूरी म्हणून, गौरवाने निर्देश केला आहे.[30] गौडवह काव्याचा कर्ता जो वाक्पतिराज त्याने आपल्या ठायी काव्यनिर्मितीची शक्ती कमलायुधाने उत्पन्न केली असे स्वतःच कबूल केले आहे.[31] कुतूहलकृत लीलावई काव्याचा प्रभाव धनेश्वराच्या सुरसुन्दरी या महाराष्ट्री प्राकृतातील काव्यावर तसेच सोड्ढलाच्या उदयसुन्दरी या संस्कृत काव्यावर, नेमिचन्द्राच्या लीलावती ह्या प्राचीन कन्नड काव्यावर आणि जायसीच्या पद्मावत या सोळाव्या शतकातील अवधी भाषेतील काव्यावर पडला होता.[32] असाच काहीसा प्रकार तिरुत्तक्कतेवर या दहाव्या शतकातील तमिळ कवीच्या बाबतीतही घडून आला होता. त्याने चिवकचिन्तामणी नावाचे जैन-परंपरानुसारी महाकाव्य तमिळ भाषेत लिहिले होते. ते त्याला गुणाढ्याची पैशाचीतील बृहत्कथा वाचून स्फुरले होते.[33]

( v ) एखाद्या साहित्यकृतीची रसिकप्रियताही तिच्या विभिन्न भाषांतील संचार-विहाराला, शब्दशः अथवा मुक्त अनुवादाला किंवा रूपान्तराला कारणीभूत होत असे. त्यामुळे अशा मूलाधारित कृतीत मूळ कृतीचे साद-पडसाद ऐकू येत असत. त्यांचा वाङ्मयचौर्यदृष्ट्या परामर्श घेणे साहित्यविमर्शकांना प्राप्त होत असे. श्वेतांबर व दिगंबर जैनांच्या परंपरेतील, स्थविरवादी बौद्धांच्या परंपरेतील आणि मध्य तसेच दक्षिणपूर्व आशियातील तिबेटी, खोतानी, ख्मेरी, थायलंडी, जावादेशीय, ब्रह्मदेशीय, सयामी व मलायी परंपरांतील रामायण-कथेच्या रूपान्तरांकडे ह्या दृष्टीने अंगुलिनिर्देश करता येईल.[34] आठव्या शतकात होऊन गेलेल्या प्रभंजन कवीची जसहरचरिअ ( यशोधर-चरित्र ) ही प्राकृत भाषेतील कथा इतकी काही लोकप्रिय झाली की, कालान्तराने तिची संस्कृत, महाराष्ट्री, अपभ्रंश, कन्नड, तमिळ इत्यादी अनेक भाषांत भाषान्तरे, रूपान्तरे वा संक्षिप्तीकरणे झाली.[35]

( vi ) एखादा साहित्यिक स्वतःच्या किंवा दुसऱ्याच्या एखाद्या विशिष्ट साहित्यप्रकारातील साहित्यकृतीचे दुसऱ्या साहित्यप्रकारात रूपान्तर घडवतो तेव्हा त्याला मूळ कृतीतील काही भाग प्रकारान्तरित कृतीत जसाच्या तसा, संक्षेपाने, विस्ताराने किंवा थोडी मुरड घालून समाविष्ट करावासा वाटतो; त्याला तसा मोह होण्याची शक्यता असते. अशा स्वरूपाच्या आंशिक उसनवारीचाही तात्त्विक

ऊहापोह शास्त्रकाराला कर्तव्य ठरतो. अशी प्रकारान्तरे प्राचीन काळात झालेली आढळून येतात व म्हणून ती विचारणीय ठरतात. उदाहरणार्थ, संस्कृत भाषेत अवदान साहित्यात मणिचूडाची कथा आढळते. ह्या कथात्मक सामग्रीला चौथ्या शतकातील चन्द्रगोमिन् नामक बौद्ध नाटककाराने 'लोकानन्द' नाटकाचे रूप दिले.[36] बाणभट्टाने स्वतःच्याच कादम्बरी ह्या कल्पित दीर्घकथेला शारदचन्द्रिका नामक नाटकाचा पेहराव दिला.[37] कादम्बरीकल्याण नावाच्या कथेचे नाटकात रूपान्तर चौदाव्या शतकातील नरसिंह नामक साहित्यिकाने घडवून आणले.[38]

उपरिवर्णित षड्विध प्रवृत्तींमुळे उपजीवक कवीने उपजीव्य कवीचे ऋण कोणकोणत्या बाबतीत घेतले, तशी उसनवारी करताना त्याने केवळ परभृतता प्रकट केली की आपली स्वतंत्र प्रज्ञाही प्रदर्शित केली, अशा प्रकारचे कोणते साहित्यिक ऋण इष्ट व कोणते अनिष्ट इत्यादी अनेक मुद्दे विचारात घेण्याजोगे ठरतात, हे ध्यानात घेऊनच प्राचीन साहित्यशास्त्रकारांनी 'वाङ्मयचौर्य' ह्या विषयाचा सोपपत्तिक, सोदाहरण व सविस्तर परामर्श घेतला आहे. त्याचाच यथामूल परिचय करून घेऊन त्याची संस्कृत-प्राकृतादी प्राचीन व मध्ययुगीन मराठी साहित्याच्या दृष्टीने कशी व कोणती उपयुक्तता आहे, ते दर्शवून देणे हा प्रस्तुत निबंधाचा उद्देश आहे.

## (2) क्षेमेन्द्राचे संक्षिप्त विवेचन

ह्या विषयाचे विवेचन प्राचीन साहित्यशास्त्रकारांपैकी राजशेखर व क्षेमेन्द्र या दोघांनीच प्रामुख्याने केलेले आढळते. ह्यांपैकी क्षेमेन्द्र हा अकराव्या शतकात[39] होऊन गेला तर राजशेखर त्याच्या अगोदर सुमारे दोनशे[40] वर्षांपूर्वी होऊन गेला होता. म्हणजेच क्षेमेन्द्राच्या अवलोकनात राजशेखराचा ग्रंथ आलेला असला पाहिजे. शिवाय, राजशेखरोत्तर व क्षेमेन्द्रपूर्व कालावधीत विपुल ललित साहित्यही निर्माण झाले होते.[41] तरीदेखील क्षेमेन्द्राचे एतद्विषयक विवेचन राजशेखराच्या विवेचनाच्या तुलनेने अतिसंक्षिप्त आहे. ते प्रथमतः समजून घेऊ म्हणजे त्याच्या पार्श्वभूमीवर राजशेखराचे वर्गीकृत, सोदाहरण व विस्तृत विवेचन किती व्यापक व महत्त्वपूर्ण आहे ते लक्षात येईल व त्याची वरील उद्देशाच्या दृष्टीने उपयुक्तताही जाणवेल.

क्षेमेन्द्राने आपल्या कविकण्ठाभरण ग्रंथाच्या द्वितीय सन्धीत ( =प्रकरणात ) पुढील कारिकेत उपजीवक कवीचे प्रकार वर्णिले आहेत :

**"छायोपजीवी पदकोपजीवी पादोपजीवी सकलोपजीवी ।**
**भवेदथ प्राप्तकवित्वजीवी स्वोन्मेषतो वा भुवनोपजीव्यः ॥ 1 ॥"**[42]

अर्थात—[ भाषाप्रभुत्व मिळविलेला कवी ] दुसऱ्या कवीच्या छायेवर जगणारा, [ मूळ कवीचाच आशय आपल्या काव्यात व्यक्त करणारा ], दुसऱ्या कवीच्या शब्दांवर जगणारा [ शब्दांची उसनवारी करून स्वतःची कविता रचणारा ],

दुसऱ्या कवीच्या श्लोकांशावर जगणारा [ पद्याच्या चरणांची चोरी करणारा ] व दुसऱ्याने रचलेल्या समस्त काव्यावर जगणारा [ समग्र काव्याची उसनवारी करणारा ] असतो. कालान्तराने तो स्वप्रयत्नांनी मिळविलेल्या कवित्वशक्तीवर विसंबून राहतो [ उसनवारी करण्याचे थांबवून स्वतःच्या कल्पनाशक्तीच्या बळावर स्वतंत्र काव्यनिर्मिती करतो ]. तर प्रतिभाशाली कवी [ ज्याला प्रतिभेची नैसर्गिक देणगी लाभलेली असते असा कवी ] आपल्या प्रतिभेच्या उन्मेषामुळे समस्त जगाला उपजीव्य म्हणजे आधार देणारा होतो [ इतर कवी त्याच्या रचनेतून मुक्तपणे उसनवारी करून आपली काव्ये सिद्ध करतात ].

क्षेमेन्द्राने सुरुवातीलाच एक महत्त्वाची बाब सुचविली आहे. ती अशी की, कोणत्याही कवीला काव्यनिर्मितीसाठी केवळ भाषाप्रभुत्व पुरेसे नसते. भाषाप्रभुत्वाला कवित्वाची जोड मिळणे आवश्यक असते, हा त्याचा अभिप्राय आहे. क्षेमेन्द्राने वरील कारिकेत चार उपजीवक व एक उपजीव्य अशा एकूण पाच प्रकारच्या कवींची गणना केली आहे. वरील कारिकेनंतर त्याने वरील चतुर्विध उपजीवक कवींच्या स्वरूपाच्या स्पष्टीकरणासाठी प्रत्येकी दोन उदाहरणपद्ये उद्धृत केली आहेत. ती अशी: छायोपजीवी कवी भट्टभल्लट उपजीव्य व श्रीमदुत्पलराजदेव उपजीवक; पदकोपजीवी: मुक्ताकण उपजीव्य व चक्रपाल उपजीवक; पादोपजीवी: अमरक उपजीव्य व स्वतः क्षेमेन्द्र उपजीवक [ अमरकाच्या 'गन्तव्यं....' इत्यादी पद्याचा अखेरचा चरण 'को जानाति पुनस्त्वया सह मम स्याद् वा न वा सङ्गमः।' असा आहे. क्षेमेन्द्राने तो चरण स्वरचित 'हंहो स्निग्धसखे !...' इत्यादी पद्यात जसाच्या तसा उतरून घेतला आहे. हीच संपूर्ण चरणाची उसनवारी ! मात्र दोन्ही पद्यांतील पहिले तीन-तीन चरण अर्थदृष्ट्या भिन्न आहेत ]; सकलोपजीवी: आर्यभट्ट उपजीव्य व भट्टबाण उपजीवक [भट्टबाणाने आर्यभट्टाचे शब्द व कल्पना या दोहोंची उसनवारी केली आहे ]. या चार प्रकारच्या उपजीवक कवींच्या उदाहरणांनंतर क्षेमेन्द्राने खालील शब्दांत कविवर्य व्यासांचा गौरव केला आहे :

**"भुवनोपजीव्यो यथा भगवान् व्यासः । तथा चोक्तम्—**
**इदं कविवरैः सर्वैराख्यानमुपजीव्यते । उदयं प्रेप्सुभिर्भृत्यैरभिजात इवेश्वरः ।।"[43]**

अर्थात–भुवनोपजीव्य कवीचे उदाहरण म्हणजे परमपूज्य व्यास. असे म्हटले आहे की, ज्याप्रमाणे उत्कर्षाची इच्छा बाळगणारे सेवक एखाद्या उदार अंतःकरणाच्या धनिकाचा आश्रय घेतात (व त्यायोगे आपला उत्कर्ष साधतात) त्याप्रमाणे सर्व श्रेष्ठ कवी उपजीविकेसाठी ( काव्यासाठी कथानके मिळविण्यासाठी ) महर्षी व्यासांच्या ह्या आख्यानाचा ( म्हणजे महाभारताचा ) आश्रय घेतात. ( महाभारतातून स्वतःच्या काव्यांसाठी कथानके निवडतात, त्यांच्यावर काव्ये रचतात व ती मर्मज्ञ रसिकांपुढे ठेवून कीर्ती व संपत्ती मिळवतात. अशा प्रकारे आपली उपजीविका सांभाळतात, )

क्षेमेन्द्र वाल्मीकींना कविचक्रवर्ती व सर्वोपजीव्य कवी मानीत असे हे पूर्वी परिच्छेद ( 1 ) ( i ) मध्ये नमूद केलेच आहे.

आता क्षेमेन्द्राच्या ह्या त्रोटक विवेचनाच्या पार्श्वभूमीवर राजशेखराचे तपशीलवार विवेचन समजून घेऊ.

## (3) राजशेखराचे विस्तृत विवेचन

राजशेखरकृत 'काव्यमीमांसा' हा काव्यशास्त्रावरील एक अद्वितीय ग्रंथ आहे. तो काव्यशास्त्राशी निगडित असलेल्या अनेक विषयोपविषयांच्या चर्चांनी ओतप्रोत भरलेला आहे. त्याच्या एकूण 18 अध्यायांपैकी 11 ते 13 अध्यायांत उसनवारी, तिचे स्वरूप व ती करणारे कवी ह्या विषयांचे विवेचन आले आहे. त्याचा उपन्यास पुढील शब्दांत झाला आहे—

**"परप्रयुक्तयोः शब्दार्थयोरुपनिबन्धो हरणम् । तद्द्विधा परित्याज्यमनुग्राह्यं च । तयोः शब्दहरणमेव तावत्पञ्चधा पदतः, पादतः, अर्धतः, वृत्ततः प्रबन्धतश्च । [इति]"**[44]

अर्थात—दुसऱ्या कवींनी वापरलेल्या शब्दांचा व विचारकल्पनादींचा प्रयोग स्वरचित काव्यात करणे म्हणजे हरण किंवा उसनवारी होय. ती सर्वथा त्याज्य व स्वीकार्य अशी दोन प्रकारची असते. पैकी, शब्दांच्या उसनवारीचेच पाच भेद संभवतात, ते असे—शब्दाची उसनवारी, चरणाची उसनवारी, श्लोकार्धाची उसनवारी, वृत्ताची उसनवारी व प्रबंधाची उसनवारी. राजशेखराने ह्या सर्व प्रकारांची सोदाहरण चर्चा करून तदनंतर 'उसनवारी' ह्या विषयासंबंधी एक शंका उपस्थित करून तिचे, अवन्तिसुंदरीच्या मताच्या आधारे, समाधान केले आहे. एतद्विषयक मूळ वचने अशी आहेत—

**"नन्विदमुपदेश्यमेव न भवति । यदित्थं कथयन्ति—**

**'पुंसः कालातिपातेन चौर्यमन्यद्विशीर्यते । अपि पुत्रेषु पौत्रेषु वाक्चौर्यं च न शीर्यति ।।'**

**'अयमप्रसिद्धः प्रसिद्धिमानहम्, अयमप्रतिष्ठः प्रतिष्ठावानहम्, अप्रक्रान्तमिदमस्य संविधानकं प्रक्रान्तं मम, गुडूचीवचनोऽयं मृद्वीकावचनोऽहम्, अनादृतभाषाविशेषोऽयमहमादृतभाषाविशेषः, प्रशान्तज्ञातृकमिदं, देशान्तरितकर्तृकमिदम्, उच्छ(त्स)न्ननिबन्धनमूलमिदं, म्लेच्छितकोपनिबन्धनमूलमिदमित्येवमादिभिः कारणैः शब्दहरणेऽर्थहरणे वाभिरमेत' इति अवन्तिसुन्दरी ।"**[45]

अर्थात—खरे म्हणाल तर उसनवारीचा किंवा चोरीचा हा विषय उपदेश करण्याजोगाच नाही. कारण ह्या बाबतीत प्राचीनांनी असे म्हटले आहे—

एखाद्या व्यक्तीने एखादी वस्तू वगैरे चोरल्याने तिला लागणारा काळिमा कालांतराने नष्ट होतो. ( लोकांना त्याची आठवण राहत नाही. ) परंतु, व्यक्तीच्या वाक्चौर्याची आठवण दुसऱ्या-तिसऱ्या पिढीपर्यंत बुजत नाही. ( तशीच राहते. म्हणून वाक्चौर्य सर्वथा वर्ज्य. )

परंतु वाक्चौर्याचे समर्थन अवन्तिसुंदरीने पुढील शब्दांत केले आहे. ( ते राजशेखराला अर्थातच मान्य आहे ! ) — वाक्चौर्य करणाऱ्याने असे मनात आणावे की, आपण ज्या कवीची चोरी करीत आहोत तो फारसा प्रसिद्ध नाही, आपण मात्र प्रसिद्ध आहोत ( आपण प्रसिद्ध असल्यामुळे लोक आपल्याला नाव ठेवणार नाहीत, त्यामुळे चोरी सहज पचून जाईल ); ह्याला लोकात प्रतिष्ठा नाही ( त्यामुळे ह्याने जरी आपल्यावर चोरीचा आळ घेतला तरी लोक तो खरा मानणार नाहीत ), आपल्याला मात्र प्रतिष्ठा आहे ( तिचा फायदा करून घ्यावा व नि:संकोचपणे वाक्चौर्य करावे ); ह्याच्या काव्याचे कथानक प्रचारातले नाही ( त्यामुळे ते लोकप्रिय नाही ), आपले कथानक प्रचारातले आहे ( त्यामुळे जरी ते चोरलेले असले तरी ते आपणच कल्पिलेले आहे, असे रसिक मानतील, असा विश्वास बाळगून नि:शंकपणे चोरी करावी व रसिकांकडून वाहवा मिळवावी ); ह्याचे शब्द गूळवेलीच्या सत्त्वासारखे कडू आहेत (त्यामुळे हा अगोदरच रसिकांच्या मर्जीतून उतरलेला आहे), तर आपले शब्द म्हणजे गोड द्राक्षांचा पाकच ( त्यामुळे रसिक आपल्या काव्याचे कौतुकाने रसास्वादन करतील ); ह्याची कविता वेगळ्या भाषेतील आहे, आपली कविता निराळ्या भाषेतील आहे ( त्यामुळे ती चोरलेली आहे हे, संबंधित मूळ कवितेची भाषा न येणाऱ्यांना, ओळखू येणार नाही ); ह्याच्या काव्याचे जाणकार आता जिवंत नाहीत ( त्यामुळे आपल्याला आक्षेपकांचे भय बाळगण्याचे कारण नाही ); ह्या कवीने आता देशान्तर केलेले आहे ( त्यामुळे त्याच्याकडून आपल्यावर चोरीचा आळ येण्याची धास्ती नाही व रसिकांच्या मनातलीही त्याच्याविषयीची आठवण जवळजवळ बुजली आहे—public memory is short-lived ह्या तत्त्वानुसार ); ज्या काव्याची आपण चोरी करीत आहोत त्या काव्याचे मूळ हस्तलिखित आता नष्ट झाले आहे ( त्यामुळे आपली चोरी कोणालाही साधार सिद्ध करता येणार नाही ); त्या काव्याचे मूळ रूप आता भ्रष्ट झाले आहे ( त्यामुळे कोणालाही आपल्या काव्याचा मूळ पाठ निश्चित करणे अशक्य नसले तरी अवघड होऊन बसले आहे ); किंवा ते काव्य ज्या भाषेत आहे ती भाषा आता कळेनाशी झाली आहे ( त्यामुळे आपण चोरी केलेली असल्याचे कोणाला उमगणार नाही ), इत्यादी अनेक कारणांखातर शब्दचौर्य तसेच अर्थचौर्य नि:शंकपणे करावे.

अवन्तिसुन्दरीने वरील उपदेशात मनुष्यस्वभाव, समाजाची सामान्य प्रवृत्ती, जनरीत, वाक्चौर्याचा मोह होण्याची कारणे, रसिकांच्या अभिरुचीची ठेवण, उसनवारीच्या संभाव्यतेच्या विविध बाजू, हस्तलिखितांची हाताळणी इत्यादी अनेक मुद्यांचा प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे उल्लेख केला आहे. तिच्या ह्या औरसचौरस विवेचनावरून मध्ययुगीन साहित्यिक व्यवहारावर उत्तम प्रकाश पडतो, हे निरीक्षण नोंदवून पुन्हा राजशेखराच्या चर्चेकडे वळू.

### (4) उसनवारीविषयी दोन महत्त्वाचे नियम

उसनवारी किती शब्दांची किंवा शब्दांपर्यंत करावी ह्या विषयाबद्दल प्राचीन आचार्य आणि राजशेखर यांच्यात मतभेद आहेत. राजशेखराने प्रथमतः आचार्यांचे एतद्विषयक मत उद्धृत करून ते अमान्य करताना दोन महत्त्वपूर्ण नियम घालून दिले आहेत. त्यांपैकी पहिला नियम असा की, मूळ कवीने ज्या शब्दसमूहाच्या कल्पनेत आपली प्रतिभा वेचली असेल अशा शब्दसमूहाची चोरी कधीच करू नये [ **'उल्लेखवान्पदसन्दर्भः परिहरणीयो'''।'** ][46]. दुसरा नियम असा की, दुसऱ्याच्या शब्दादींची चोरी करूनच्या करून वर ते शब्दादी आपलेच आहेत, असा गावभर डंका पिटू नये. कारण तसे करणे हे अकुलीनत्वाचे लक्षण आहे. [ **'यत्तु परकीयं स्वीयमिति प्रोक्तानामन्यतमेन कारणेन विलपन्ति, तन्न केवलं हरणम्, अपि तु दोषोदाहरणम् ।'**[47] ] हे दोन्ही नियम सुटी पद्ये व दीर्घ काव्ये ह्या दोन्ही प्रकारच्या काव्यांच्या बाबतीत पाळावयाचे आहेत, असा राजशेखराचा दंडक आहे. त्याने ह्या विषयाचा ( शब्दहरणापुरता ) समारोप करताना एक व्यापक सिद्धान्तच पुढील शब्दांत सांगून टाकला आहे—

> **"नास्त्यचौरः कविजनो नास्त्यचौरो वणिग्जनः ।**
> **न नन्दति विना वाच्यं यो जानाति निगूहितुम् ।।"**[48]

अर्थात—चोरी न करणारा असा कवी असतच नाही, जसा चोरी न करणारा वाणी शोधू जाताही सापडणार नाही. जो चोरी लपविण्याची कला जाणतो, त्याची निंदानालस्ती होत नाही, त्यामुळे तो आनंदाने जगतो ( ह्याउलट ज्याला चोरी लपविता येत नाही, म्हणजेच ज्याची चोरी उघडकीस येते, त्याची छीथू होते. )

ह्याच संदर्भात राजशेखराने कवींचे काही प्रकार पुढीलप्रमाणे नमूद केले आहेत—

> **"उत्पादकः कविः कश्चित्कश्चिच्च परिवर्तकः ।**
> **आच्छादकस्तथा चान्यस्तथा संवर्गकोऽपरः ।।**
> **शब्दार्थोक्तिषु यः पश्येदिह किञ्चन नूतनम् ।**
> **उल्लिखेत्किञ्चन प्राच्यं मन्यतां स महाकविः ।।"**[49]

अर्थात—एखादा ( उत्पादक ) कवी स्वबुद्धीने काव्यविषयाची कल्पना करणारा असतो, एखादा ( परिवर्तक कवी ) उपलब्ध विषयात फेरफार करणारा असतो; एखादा ( आच्छादक ) कवी दुसऱ्याच्या विषयाला आपल्या शब्दांत झाकून टाकतो तर आणखी एखादा ( संवर्गक ) अनेकांच्या काव्यांतील कल्पना-विचारांचे ग्रहण करून त्यांची आपल्या काव्यात योजना करतो. परंतु, जो शब्द व अर्थ ह्यांमध्ये काही अपूर्वत्व किंवा नावीन्य पाहू शकतो आणि आपल्या प्रतिभेच्या बळावर अभिनव असे वर्णन करू शकतो तो 'महाकवी' म्हणून मान्यता पावतो. अशा प्रकारे राजशेखराने

शाब्दिक उसनवारीचा विषय संपविला आहे व मग तो अर्थाच्या उसनवारीच्या विषयाच्या विवेचनाकडे वळला आहे.

## (5) अर्थाची उसनवारी

अर्थाची उसनवारी किंवा चोरी या विषयाच्या चर्चेला मतमतांतरांच्या उल्लेखांनी सुरुवात झाली आहे, ती अशी :

**"पुराणकविक्षुण्णे वर्त्मनि दुरापमस्पृष्टं वस्तु, ततश्च तदेव संस्कर्तुं प्रयतेत" इत्याचार्याः । "न" इति वाक्पतिराजः ।**

**"आसंसारमुदारैः कविभिः प्रतिदिनगृहीतसारोऽपि ।**
**अद्याप्यभिन्नमुद्रो विभाति वाचां परिस्पन्दः ॥"**

**"तत्प्रतिभासाय च परप्रबन्धेष्ववदधीत । तदवगाहने हि तदेकयोनयोऽर्थाः पृथक् पृथक् प्रथन्ते" इत्येके । "तत्रत्यानामर्थानां छायया परिवृत्तिः फलम्" इत्यपरे । "महात्मनां हि संवादिन्यो बुद्धयः एकमेवार्थमुपस्थापयन्ति, तत्परित्यागाय तानाद्रियेत" इति च केचित् । "न" इति यायावरीयः । सारस्वतं चक्षुरवाङ्मनसगोचरेण प्रणिधानेन दृष्टमदृष्टं चार्थजातं स्वयं विभजति ।**

**तदाहुः सुप्तस्यापि महाकवेः शब्दार्थौ सरस्वती दर्शयति । तदितरस्य तत्र जाग्रतोऽप्यन्धं चक्षुः । अन्यदृष्टचरे ह्यर्थे महाकवयः जात्यन्धाः । तद्विपरीते तु दिव्यदृशः । न तत् त्र्यक्षः सहस्राक्षो वा यच्चर्मचक्षुषोऽपि कवयः पश्यन्ति । मतिदर्पणे कवीनां विश्वं प्रतिफलति । कथं नु वयं दृश्यामह इति महात्मनामहंपूर्विकयैव शब्दार्थाः पुरो धावन्ति । यत्सिद्धप्रणिधाना योगिनः पश्यन्ति, तत्र वाचा विचरन्ति कवयः इत्यनन्ता महाकविषु सू[विसू]क्तयः [ इति ] ।"[50]**

अर्थात—आचार्यांचे मत असे आहे की, प्राचीन कवींनी काव्यमार्ग आपल्या प्रतिभाबळाने इतका काही तुडविला आहे की, ह्या मार्गावरील कोणतीही वर्णनीय वस्तू त्यांच्या सूक्ष्म दृष्टीतून सुटलेली नाही. ( =अवर्णित असा एकही विषय राहिलेला नाही. ) म्हणून आधुनिक काव्यनिर्मात्यांनी तेच पूर्ववर्णित विषय काव्यकलेच्या द्वारे सुसंस्कृत व शोभिवंत करण्याचा प्रयत्न करावा. ( म्हणजे ते नवीन भासतील, हा अभिप्राय[51]. )

परंतु, वाक्पतिराजाला ही भूमिका पटत नाही. तो म्हणतो, छे छे, तसे नाही. वाणीचा हा स्रोत ( प्रवाह ) अमर्याद व अनंत आहे.[52] सृष्टिकालापासून आजतागायत प्रखर प्रतिभेचे कवी प्रतिदिन त्याचे तत्त्वग्रहण करीत आले आहेत. तथापि, हा वाक्प्रवाह कोणत्याही प्रकारच्या परिवर्तनावाचून अद्यापि तसाच ( पूर्ववत ) वाहत आहे. ( म्हणजेच अजून अस्पृष्ट विषय अनेक आहेत. )

म्हणून त्या दुष्प्राप्य व अस्पृष्ट विषयांच्या शोधपूर्वक प्रतीतीसाठी इतरांची काव्ये चांगल्या रीतीने अभ्यासावीत[53]. ह्या बाबतीत काही आचार्यांचे मत असे आहे

की, अशा प्रकारे इतरांच्या काव्यांचे सखोल अध्ययन केल्याने समरूप ( ज्या विषयांचे मूळ एकच आहे असे विषय समरूप होत ) विषय वेगवेगळे भासतात. तर आणखी काही आचार्य अशा मताचे आहेत की, इतरांच्या काव्यातील विषयांचा ठसा आधुनिक कवीच्या मनावर उमटतो व तोच त्याच्या काव्यात व्यक्त होतो ( म्हणजे मूळचेच काव्य ठशाच्या रूपाने परिवर्तन पावते ). आणखी एका वर्गातील आचार्यांची एतद्‌विषयक विचारसरणी अशी आहे की, सूक्ष्म बुद्धीच्या महात्म्यांची बुद्धी समरूप असते. परिणामी, त्यांना सारखेच विषय प्रतीत होतात. ते वगळता यावेत ह्यासाठी इतरांच्या काव्यांचे आदराने अध्ययन करावे. राजशेखराला ही विचारसरणी अमान्य आहे. त्याच्या मते, वाणी व मन ज्या विषयापर्यंत पोचूही शकत नाहीत त्या विषयापर्यंत कवीचा ज्ञानमय चक्षू पोचतो, इतकेच नव्हे तर कोणता विषय पूर्ववर्णित व कोणता पूर्व-अवर्णित ह्याचा निर्णयही करू शकतो. हा निर्णय समाधीच्या द्वारे होत असतो.[54] ( म्हणूनच अद्यापि कोणत्या विषयाचे वर्णन काव्यात झालेले नाही हे शोधून काढण्यासाठी महाकवीला इतरांच्या काव्यांचे साक्षात सावध अवलोकन करावे लागत नाही. ) असे म्हटले आहे की, महाकवी झोपलेला असता त्याला देवी सरस्वती काव्यानुकूल शब्द व अर्थ ह्यांचे ज्ञान करवून देते. सामान्य कवी त्या ज्ञानाच्या बाबतीत जागेपणीही डोळे असूनसुद्धा आंधळाच राहतो. दुसऱ्या कवीच्या दृष्टीला गोचर झालेल्या विषयांच्या बाबतीत महाकवी जन्मांधासारखे असतात ( त्या विषयांकडे त्यांची दृष्टी अजिबात वळत नाही ), तर इतर विषयांच्या बाबतीत ते जणू दिव्यदृष्टी असतात ( इतर कवींनी न हाताळलेल्या विषयांकडेच महाकवींची दृष्टी वळते ). महाकवींना आपल्या सामान्य चर्मचक्षूंनीही जो पदार्थ किंवा विषय दिसतो तो त्रिनेत्र शंकराला किंवा सहस्रनेत्र इंद्रालाही दिसू शकत नाही. महाकवींच्या बुद्धिरूप आरशात समस्त विश्व प्रतिबिंबित होते ( विश्वातील कोणताही विषय त्यांच्या बुद्धीला अनाकलनीय नसतो ). 'आपण महाकवींच्या दृष्टीस सगळ्यात आधी कसे बरे पडू', अशा जणू अहमहमिकेने शब्द व अर्थ महाकवींसमोर येण्यासाठी धावपळ करीत असतात. समाधिसिद्ध योगी लोक जी वस्तू ( समाधीच्या द्वारे ) पाहतात, तीत महाकवी वाणीने विहार करतात. महाकवींच्या संबंधात अशा प्रकारची अनेक गौरववचने प्रचलित आहेत.

राजशेखराला महाकवींचा हा सर्व गौरव पूर्णपणे मान्य आहे. परंतु, त्याच्या मते काव्यविषयाचे तीन मुख्य प्रकार आहेत. ते असे—अन्ययोनी=ज्या विषयाचे मूळ दुसऱ्या कवीच्या काव्यात असते; निह्नुतयोनी=ज्याचा मूलस्रोत झाकलेला किंवा अज्ञात असतो; आणि अयोनी[55]=ज्याला अन्य उगमस्थान नसते म्हणजे ज्याची कल्पना स्वतः कवीनेच स्वबुद्धीने केलेली असते. पैकी अन्ययोनीचे प्रतिबिंबकल्प व आलेख्यप्रख्य असे पोटभेद असतात. तसेच निह्नुतयोनीचेही तुल्यदेहितुल्य आणि

परपुरप्रवेशसदृश असे दोन उपभेद असतात. अयोनीचे मात्र पोटभेद नसतात, तो प्रकार अखंड किंवा एकरूप असतो. अशा प्रकारे, काव्यार्थाचे ( काव्यविषयाचे ) पाच प्रकार संभवतात. राजशेखराची एतद्विषयक मूळ वचने अशी आहेत—

**"समस्तमस्ति" इति यायावरीयः। किन्तु त्रिपथमर्थमध्यगीष्महि। यदुतान्ययोनिर्निह्नुतयोनिरयोनिश्च [ इति ]। तत्रान्ययोनिर्द्विधा प्रतिबिंबकल्पः आलेख्यप्रख्यश्च [इति]। निह्नुतयोनिरपि द्विधा तुल्यदेहितुल्यः परपुरप्रवेशसदृशश्च [इति]। अयोनिः पुनरेएकादृश (?) एव।"[56]**

## (6) काव्यविषयांचे पाच प्रकार

आता वरील पाच प्रकारांची स्वरूपे क्रमशः समजून घेऊ.

( अ ) **प्रतिबिम्बकल्प—**

**"अर्थः स एव सर्वो वाक्यान्तरविरचनापरं यत्र।**
**तदपरमार्थविभेदं काव्यं प्रतिबिम्बकल्पं स्यात्॥"[57]**

अर्थात—ज्या काव्यात मूळ कवीचाच सर्व आशय विद्यमान असतो, ज्यात फक्त भिन्न वाक्यरचना असते, पण ज्यात कोणताही पारमार्थिक ( वास्तविक ) भेद नसतो, त्या काव्याला प्रतिबिंबकल्प काव्य म्हणतात. (थोडक्यात, 'वाक्य' भिन्न पण 'काव्य' अभिन्नच). अशी रचना करणाऱ्या कवीला **भ्रामक** कवी म्हणतात. त्याचे लक्षण असे—

**"तन्वानोऽनन्यदृष्टत्वं पुराणस्यापि वस्तुनः।**
**योऽप्रसिद्ध्यादिभिर्भ्रम्यत्यसौ स्याद् भ्रामकः कविः॥"[58]**

अर्थात—जो पुराणप्रसिद्ध विषय आपल्यापूर्वी दुसऱ्या कोणालाही जाणवला नाही असे भासवून विस्ताराने वर्णितो व अप्रसिद्धिप्रभृती कारणांखातर रसिकांना भ्रमात ठेवतो, तो भ्रामक कवी होय.

( आ ) **आलेख्यप्रख्य**

**"कियताऽपि यत्र संस्कारकर्मणा वस्तु भिन्नवद्भाति।**
**तत्कथितमर्थचतुरैरालेख्यप्रख्यमिति काव्यम्॥"[59]**

अर्थात—पूर्वप्रसिद्ध अर्थावर थोडासा संस्कार करण्याने जर तो भिन्न म्हणजे अप्रसिद्ध किंवा नवीन भासू लागला तर त्याला अर्थाचे तत्त्ववेत्ते आलेख्यप्रख्य अर्थयुक्त काव्य म्हणतात. ( थोडक्यात, मूळ आशयात किंचित परिवर्तन ). अशा कवीला **चुम्बक** कवी म्हणतात. त्याचे लक्षण असे :

**"यश्चुम्बति परस्यार्थं वाक्येन स्वेन हारिणा।**
**स्तोकार्पितनवच्छायं चुम्बकः सः कविर्मतः॥"[60]**

अर्थात—जो कवी, दुसऱ्या कवीने व्यक्त केलेल्या अर्थाला, स्वतःच्या मनोहर वाक्याने स्पर्श करतो व त्या ( पूर्वोक्त ) अर्थात नवीन सौंदर्यच्छटा भरतो, त्याला चुंबक कवी म्हणतात.

**( इ ) तुल्यदेहितुल्य काव्य**

**"विषयस्य यत्र भेदेऽप्यभेदबुद्धिर्नितान्तसादृश्यात् ।**
**तत्तुल्यदेहितुल्यं काव्यं बध्नन्ति सुधियोऽपि ।।"**[61]

अर्थात—जेथे विषय भिन्न असूनही आत्यंतिक साम्यामुळे अभिन्नतेची प्रचीती येते त्यास तुल्यदेहितुल्य काव्य म्हणतात. असे काव्य विद्वज्जनही रचतात. ( थोडक्यात वेगळा अर्थ कमालीच्या सारखेपणाने व्यक्त करणे ). अशा कवीला **कर्षक** कवी म्हणतात. त्याचे लक्षण असे—

**"परवाक्यार्थमाकृष्य यः स्ववाचि निवेशयेत् ।**
**समुल्लेखेन केनापि सः स्मृतः कर्षकः कविः ।।"**[62]

अर्थात—जो कवी आपल्या लोकोत्तर प्रतिभेच्या साह्याने दुसऱ्या कवींच्या वचनांतील आशय आत्मसात करून तो स्वतःच्या सुंदर रचनेच्या मुशीत ओततो, त्याला कर्षक कवी म्हणतात.

**( ई ) परपुरप्रवेशप्रतिम—**

**"मूलैक्यं यत्र भवेत्परिकरबन्धस्तु दूरतोऽनेकः ।**
**तत्परपुरप्रवेशप्रतिमं काव्यं सुकविभाव्यम् ।।"**[63]

अर्थात—जेथे मूळ व आधारित काव्यांतील विषय एकच असतो परंतु रचनेत सर्वथा भेद असतो ते काव्य परपुरप्रवेशप्रतिम म्हणून ओळखले जाते. असे काव्य उत्कृष्ट कोटीचे कवीही रचतात. असे काव्य रचणाऱ्यास **'द्रावक'** कवी म्हणतात. त्याचे लक्षण असे—

**"अप्रत्यभिज्ञेयतया स्ववाक्ये नवतां नयेत् ।**
**यो द्रावयित्वा मूलार्थं द्रावकः स भवेत्कविः ।।"**[64]

'जो कवी दुसऱ्या कवीचा आशय स्वरचित काव्यात इतक्या बेमालूमपणे विरघळवून टाकून त्याला नवीन रूप देतो की, तो आशय मुळात दुसऱ्या कवीचा आहे हे ओळखता येत नाही. अशी करामत करणाऱ्या कवीला द्रावक कवी म्हणतात.

वरील चार प्रकारच्या कवींखेरीज आणखी एक पाचव्या प्रकारचा कवी असतो. त्याला अभूतपूर्व अर्थांचे ( =विषयांचे ) प्रत्यक्षज्ञान होते. त्याला **'चिन्तामणि'** कवी म्हणतात. त्याचे लक्षण असे—

**"चिन्तासमं यस्य रसैकसूतिरुदेति चित्राकृतिरर्थसार्थः ।**
**अदृष्टपूर्वो निपुणैः पुराणैः कविः सः चिन्तामणिरद्वितीयः ।।"**[65]

अर्थात—चिन्तन करताच तत्काळ ज्याच्या ठायी रसाचा प्रादुर्भाव होतो आणि तत्त्ववेत्त्या अशा प्राचीन आचार्यांनाही न जाणवलेला असा सालंकृत व अपूर्व अर्थ ज्याच्या मनात उचंबळून येतो, तो अद्वितीय **चिन्तामणी** कवी होय.

भ्रामकादी चार प्रकारचे कवी लौकिक कवी असून चिन्तामणी अलौकिक कवी

होय ( "भ्रामकश्चुम्बकः किञ्च कर्षको द्रावकश्च सः। सः कविर्लौकिकोऽन्यस्तु चिन्तामणिरलौकिकः ॥"[66] ). ह्या चिन्तामणीच्या काव्याचे विषय अयोनी म्हणजे सर्वथा स्वतंत्र किंवा मौलिक असून त्यांचे लौकिक, अलौकिक व संमिश्र असे तीन प्रकार असतात ( "तस्य चायोनिरर्थः । स च त्रिधा लौकिकालौकिकभेदेन, तयोर्मिश्रत्वेन च ॥"[67] ).

अशा प्रकारे राजशेखराने 'परभृत' कवींच्या मुख्य प्रकारांचा संक्षेपाने उल्लेख करून प्रस्तुत विषयाची स्थापना केली आहे व त्यानंतर ( वरील मुख्य प्रकारांच्या ) उपप्रकारांच्या तपशीलवार विवरणास प्रारंभ केला आहे. त्याच्या मते प्रतिबिंबकल्पप्रभृती अर्थांचे प्रत्येकी आठ-आठ उपभेद संभवतात. म्हणजे एकूण उपभेदांची संख्या 32 होते. राजशेखराची एतद्विषयक उक्ती अशी—

"चत्वार एते कथिता मयैव येऽर्थाः कवीनां हरणोपदेशे ।
प्रत्येकमष्टत्ववशाद्भवन्ति द्वात्रिंशता तेऽनुगताः प्रभेदैः ॥"[68]

## (7) प्रतिबिंबकल्प

ह्याचे आठ उपभेद असे—( i ) व्यस्तक, ( ii ) खण्ड, ( iii ) तैलबिंदू, ( iv ) नटनेपथ्य, ( v ) छन्दोविनिमय, ( vi ) हेतुव्यत्यय, ( vii ) संक्रांतक व ( viii ) सम्पुट. ह्यांची लक्षणे पुढीलप्रमाणे आहेत.[69]

(i) **व्यस्तक**—जेव्हा मूळ व तदाधारित पद्यांतील वर्ण्यविषय एकच असतो, फक्त त्यांत पौर्वापर्यविपर्य (अगोदरचा अर्थ मागाहून किंवा मागाहूनचा अर्थ अगोदर) वर्णिलेला असतो, तेव्हा व्यस्तक प्रकार होतो.

(ii) **खण्ड**—जेव्हा मूळ पद्यातील वर्ण्यविषय तदाधारित पद्यात अर्धाच वर्णन करून अर्धा सोडून दिलेला असतो तेव्हा खंडप्रकार होतो.

(iii) **तैलबिन्दू**—मूळ पद्यात वर्ण्यविषय संक्षिप्तपणे वर्णिलेला असता आधारित पद्यात त्याचेच सविस्तर वर्णन केलेले असल्यास तैलबिंदू प्रकार होतो.

(iv) **नटनेपथ्य**—मूळ व आधारित पद्यांतील वर्ण्यविषय पूर्णपणे एकच (अभिन्न) असून दोहोंची केवळ भाषा भिन्न असते (म्हणजे मूळचे वर्णन संस्कृतात असल्यास आधारित पद्यातील वर्णन प्राकृतात असणे म्हणजे नटनेपथ्य.) तेव्हा हा प्रकार होतो.[70]

(v) **छन्दोविनिमय**—मूळ व आधारित पद्यांतील अर्थ एकच असून फक्त दोहोंची वृत्ते भिन्न असतात, तेव्हा छन्दोविनिमय होतो. ( वृत्तसुखार्थ शब्दरचनेत परिवर्तन करावे लागले तरी आशयाचे ऐक्य अभंग असल्यामुळे आधारित रचना स्वतंत्र मानली जात नाही, ती केवळ परिवर्तित रचना मानली जाते, हे येथे लक्षात ठेवावयास हवे. )

(vi) **हेतुव्यत्यय**—मूळ पद्यात वर्ण्यविषयाचे ज्या कारणाने ग्रहण केलेले असेल त्याहून भिन्न कारणाने परिवर्तित पद्यात ग्रहण केलेले असल्यास हेतुव्यत्यय होतो.

(vii) **संक्रांतक**—मूळ पद्यात आढळून येणारा वर्ण्यविषय परभृत पद्यात वेगळ्या स्वरूपात संक्रमित झालेला असल्यास प्रस्तुतचा अर्थहरण प्रकार होतो.

(viii) **सम्पुट**—मुळातील दोन पद्यांतील आशय एकत्रित करून परभृत पद्यात व्यक्त केलेला असल्यास त्याला संपुट अर्थहरण म्हणतात. ( अर्थात अशा संकलितार्थ-पर पद्याला स्वतंत्र पद्याचा दर्जा नाही, हे लक्षात ठेवावयास हवे. )

अशा प्रकारे प्रतिबिंबकल्प अर्थाचे आठ प्रकार सांगून झाल्यावर राजशेखराने ह्या अर्थप्रकाराच्या विवेचनाचा उपसंहार पुढील शब्दांत केला आहे—

**"सोऽयं कवेरकवित्वदायी सर्वथा प्रतिबिम्बकल्पः परिहरणीयः ।**

यतः—**पृथक्त्वेन न गृह्णन्ति वस्तु काव्यान्तरस्थितम् ।**

**पृथक्त्वेन न गृह्णन्ति स्ववपुः प्रतिबिम्बितम् ॥"**[71]

अर्थात—अशा प्रकारे वर वर्णिलेला प्रतिबिम्बकल्प-मार्ग, 'हा खऱ्या अर्थाने कवी नाहीच' असा ह्या मार्गानुसार काव्य रचणाऱ्याचा उपहास करणारा असल्यामुळे, सर्वतोपरी वर्ज्य होय.[72] कारण, दुसऱ्या काव्यातून उचललेला अर्थ किंवा आशय स्वतंत्र (मौलिक) मानला जात नाही ( तो मूळ कवीचा मानला जातो, हरणकर्त्याचा मानला जात नाही. ) आरशात प्रतिबिम्बित झालेले स्वतःचे शरीर कोणीही स्वतंत्र (निराळे) मानत नाही.

## (8) आलेख्यप्रख्य

ह्या अर्थाचे आठ उपभेद असे: (i) समक्रम, (ii) विभूषणमोष, (iii) व्युत्क्रम, (iv) विशेषोक्ती, (v) उत्तंस, (vi) नवनेपथ्य, (vii) एकपरिकार्य व (viii) प्रत्यापत्ती. ह्यांची लक्षणे[73] खालीलप्रमाणे:

(i) **समक्रम**—मूळ पद्यात वर्ण्यविषयाचा तपशील ज्या क्रमाने वर्णिलेला असतो त्याच क्रमाने तो परभृत पद्यात वर्णिलेला असल्यास समक्रम अर्थ होतो. ( मूळ पद्यातील 'अर्थ' तदाधारित पद्यात संस्कारसंपन्न होऊन आविष्कृत होत असल्यामुळे नवीनसा वाटतो. )

(ii) **विभूषणमोष**—मुळातील अलंकारयुक्त वर्णन अलंकाररहित करून वाचकांसमोर ठेवणे ( मुळातील अलंकार चोरणे = वगळणे. )

(iii) **व्युत्क्रम**—मूळ पद्यातील वर्ण्यविषयाच्या तपशिलाचा क्रम बदलून उलटचा क्रमाने वर्णन करणाऱ्या आधारित पद्यात व्युत्क्रम होतो (येथेही विपरीत क्रमामुळे मुळातलाच अर्थ निराळासा भासतो. हा प्रतिबिंबकल्पाच्या 'व्यस्तक' भेदासारखा आहे.)

(iv) **विशेषोक्ती**—मूळ पद्यातील सर्वसामान्य वर्णन तदाधारित पद्यात व्यक्तिविशेषाला अनुलक्षून करणे ( दुसऱ्या एखाद्या कवीने केलेले सर्वसाधारण वर्णन आपल्या काव्यातील नायक-नायिकेच्या व्यक्तिदर्शनास उठाव यावा म्हणून राबवून घेणारा कवी निःसंशय चतुर होय. )

(v) **उत्तंस**–मूळ पद्यातील गौण व मुख्य अर्थांना परभृत पद्यात अनुक्रमे मुख्य व गौण अर्थांचे रूप देणे म्हणजे उत्तंस होय ( अशा प्रकारच्या अर्थ-संस्करणात नावीन्याची प्रचीती अवश्य येते. )

(vi) **नवनेपथ्य**–मूळ पद्यातील आशय केवळ शब्दभेदाने बदलणे म्हणजे नवनेपथ्य होय. ( ज्याप्रमाणे शिवाजी महाराजांच्या पोषाखातील नटाने तो पोषाख काढून शंकराचार्यांचा पोषाख चढवला की, तोच नट वेगळा भासतो त्याप्रमाणे एकच अर्थ शब्दबदलाने व्यक्त झाला की निराळासा भासतो. ) प्रतिबिंबकल्प अर्थाच्या चवथ्या उपभेदाचे नाव नटनेपथ्य आहे. त्या प्रकारात फक्त भाषाभेद असतो, विषय एकच असतो. म्हणून तो त्याज्य मानण्यात आला आहे, तर प्रस्तुतचा कल्पना-कौशल्यावर आधारित नवनेपथ्य प्रकार ग्राह्य मानण्यात आला आहे.

(vii) **एकपरिकार्य**–जेव्हा परिकर म्हणजे अलंकार तोच असला तरी परिकार्य म्हणजे अलंकार्य वेगळे असते, तेव्हा अर्थप्रकार होतो.

(viii) **प्रत्यापत्ती**—मूळ पद्यात विकृती पावलेला वर्ण्यविषय तदाधारित पद्यात प्रकृतिप्राप्त झाल्याचे वर्णन असल्यास प्रत्यापत्ती अर्थभेद होतो.

ह्या आठ प्रकारांच्या चर्चेचा समारोप राजशेखराने खालील शब्दांत केला आहे–

**"ता इमा आलेख्यप्रख्यस्य भिदाः । सोऽयमनुग्राह्यो मार्गः ।**

**आहुश्च—"सोऽयं भणितिवैचित्र्यात्समस्तो वस्तुविस्तरः ।**

**नटवद्वर्णिकायोगादन्यथात्वमिवाच्छेति ।।"**[74]

अर्थात—अशा प्रकारे आलेख्यप्रख्याचे आठ भेद आहेत. हा मार्ग स्वीकार्य आहे. ( अर्थात अशा प्रकारे अर्थहरण करणे अपहरण मानले जात नाही ). प्राचीन आचार्य म्हणतात—जसा एकच नट विविध वेषांत भिन्नभिन्न पात्रांच्या भूमिकांत प्रेक्षकांसमोर येतो, तसाच एकच अर्थ उक्तिवैचित्र्यामुळे 'बहुरूपी' भासतो. मूलाधारित पद्यातील अर्थ चमत्कृतीमुळे आल्हाददायी बनतो ).[75]

## (9) तुल्यदेहितुल्य

आता तुल्यदेहितुल्याचे आठ प्रकार समजून घेऊ.

प्रस्तुत आठ उपप्रकार असे—[ i ] विषय-परिवर्त, [ ii ] द्वंद्वविच्छित्ती, [ iii ] रत्नमाला, [ iv ] संख्योल्लेख, [ v ] चूलिका, [ vi ] विधानापहार, [ vii ] माणिक्यपुंज आणि [ viii ] कंद. त्यांची लक्षणे अशी :[76]

( i ) **विषयपरिवर्त**—मुळातील कल्पनाच परभृत काव्यात वेगळ्या विषयाच्या संदर्भात योजल्याने जेव्हा निराळे रूप धारण करते, तेव्हा विषयपरिवर्त होतो. ( परभृत कवी दुसऱ्याच्या काव्यातील अर्थ आत्मसात करून तो स्वतःच्या रचनेच्या मुशीत ओततो व त्याला रमणीय रूप बहाल करतो. असे करण्यात अर्थातच त्याचे प्रतिभासामर्थ्य दिसून येते ).

( ii ) **द्वन्द्वविच्छित्ती**—मूळ काव्यातील दोन कल्पनांपैकी एकीला परभृत काव्यात निश्चित रूप देणे. द्वंद्व म्हणजे दोन कल्पनांमुळे होणारा संदेह. विच्छित्ती म्हणजे नाश. संदेहाचा नाश म्हणजेच निश्चय.

( iii ) **रत्नमाला**—मूळ काव्यातील कल्पनांमध्ये अन्य कल्पनांच्या अन्तर्भावाच्या द्वारे परभृत काव्यात व्यवधान उत्पन्न करणे.

( iv ) **संख्योल्लेख**—मूळ पद्यातील संख्याविषयक उल्लेख पूर्णपणे उलटा करून त्याचे मूलाधारित काव्यात वर्णन करणे.

( v ) **चूलिका**—मुळातील व आधारित काव्यातील विषय एकच असला तरी आधारित काव्यात त्याच्या एखाद्या वैशिष्टयाचे वर्णन केलेले आढळते. हिचे संवादिनी व विसंवादिनी असे दोन प्रकार आहेत.

( vi ) **विधानापहार**—मूळ काव्यातील निषेधरूप अर्थाचे परभृत काव्यात विधिरूपात्मक वर्णन केलेले असल्यास हा अर्थप्रकार होतो.

( vii ) **माणिक्यपुंज**—प्राचीन कवींच्या वेगवेगळ्या पाच-सहा पद्यांचा अर्थ साररूपाने एका पद्यात गुंफणे म्हणजे माणिक्यपुंज. ( हा प्रतिबिंबकल्पाच्या संपुट प्रकारासारखा आहे ).

( viii ) **कन्द**—जेव्हा मूळ काव्यातील कन्दरूप अर्थ परभृत काव्यात विस्तृत स्वरूपात वर्णून फुलविलेला असतो, ( जणू मूळच्या कन्दाला अंकुर फुटल्याचा भास होतो. ) तेव्हा कन्द होतो. ( हा प्रतिबिंबकल्पाच्या तैलबिन्दू प्रकारासारखा आहे ).

तुल्यदेहितुल्य अर्थाच्या अष्ट–प्रकारांच्या विवेचनाचा समारोप करताना राजशेखराने पुढील उद्गार काढले आहेत—

**"ता इमास्तुल्यदेहितुल्यस्य परिसंख्याः । "सोऽयमुल्लेखवाननुग्राह्यो मार्गः" इति सुरानन्दः । तदाह—**

**"सरस्वती सा जयति प्रकामं । देवी श्रुतिः स्वस्त्ययनं कवीनाम् ।**
**अनर्घतामानयति स्वभङ्ग्या । योल्लिख्य यत्किञ्चिदिहार्थरत्नम् ।।"[77]**

अर्थात—ते हे ( वर सांगितलेले आठ ) तुल्यदेहितुल्य अर्थाचे प्रकार होत. 'हा अर्थमार्ग प्रतिभासंपन्न असल्यामुळे स्वीकार्य होय,"[78] असे सुरानन्दाचे मत आहे (वरील आठ मार्गांनी अर्थहरण करणे त्याज्य नसून विद्वन्मान्य आहे) म्हटले आहे–कवींना प्रसिद्धी देऊन त्यांचे हितमंगल करणाऱ्या अशा श्रुतिरूप देवी सरस्वतीचा सर्वतोपरी उत्कर्ष होतो. ती देवी अत्यंत सामान्य अर्थाला आपल्या पद्धतीनुसार प्रतिभेच्या साह्याने उजळून टाकते व एखाद्या रत्नाप्रमाणे बहुमोल बनवते. ( तात्पर्य, तुल्यदेहितुल्य अर्थपर काव्य परभृत असले तरी त्याला प्रतिभेचा स्पर्श झालेला असतो व त्यामुळे ते रत्नाप्रमाणे तेजस्वी असते ).

आता अन्तिम अर्थप्रकाराकडे वळू.

## (10) परपुरप्रवेशसदृश

ह्या अर्थाचे आठ उपभेद असे :—( i ) हुडयुद्ध,[79] ( ii ) प्रतिकञ्चुक,[80] ( iii ) वस्तुसंचार, ( iv ) धातुवाद, ( v ) सत्कार, ( vi ) जीवंजीवक,[81] ( vii ) भावमुद्रा, ( viii ) तद्विरोधी. त्यांची लक्षणे[82] अशी :

( i ) **हुडयुद्ध**—प्राचीन कवीच्या पद्यातील अर्थाचे परभृत काव्यात सोपपत्तिक परिवर्तन घडवून आणणे. ( अशा रचनेत मुळातील आशय विरघळून जाऊन अभिनव स्वरूपात अभिव्यक्त होतो. हे कार्य प्रतिभेनेच साधते. म्हणून अशी रचना ग्राह्य मानली जाते. हा पूर्ववर्णित विषयपरिवर्तासारखाच प्रकार आहे ).

( ii ) **प्रतिकञ्चुक**—मूळ पद्यातील वर्ण्य विषयाशी सदृश वर्ण्यविषयाचे परभृत पद्यात वेगळ्या प्रकाराने वर्णन केल्यास हा अर्थभेद होतो,

( iii ) **वस्तुसंचार**—मूळ पद्यगत वर्णनात वापरलेल्या उपमानाच्या जागी परभृत पद्यात दुसऱ्या उपमानाची योजना करणे.

( iv ) **धातुवाद**—मूळ पद्यातील शब्दालङ्काराचे आधारित पद्यात अर्थालङ्कारात परिवर्तन साधणे.

( v ) **सत्कार**—मूळ पद्यात सामान्य व्यक्तींच्या संदर्भात केलेले वर्णन आधारित पद्यात विशेष आदरणीय व्यक्तींच्या संदर्भात करून त्याला उत्कृष्ट स्वरूप बहाल करणे. ( हा अर्थप्रकार आलेख्यप्रख्याच्या 'विशेषोक्ती' उपभेदाहून भिन्न आहे. विशेषोक्तीतील विशिष्ट व्यक्ती काव्यगत मानवी नायक वा नायिका असते तर सत्कारातील विशेष व्यक्ती देव किंवा देवी असते, हा दोहोंतील फरक आहे ).

( vi ) **जीवंजीवक**—मूळ व आधारित पद्यांतील वर्ण्यविषय सुरवातीस सारखाच असतो पण आधारित पद्याच्या उपसंहारात त्या विषयाला वेगळी कलाटणी दिलेली असते.

( vii ) **भावमुद्रा**—प्राचीन कवीच्या काव्यातील आशयाचे आधारित पद्यात मनोज्ञ व सोपपत्तिक शब्दांकन केलेले असते. ( कवीच्या भावाची मुद्रा आधारित पद्यावर उमटलेली असते ).

(viii) **तद्विरोधी**—म्हणजे भावमुद्राविरोधी. मूळ कवीच्या काव्यातील वर्णनाच्या बरोबर विरुद्ध वर्णन करणे म्हणजे तद्विरोधी.

राजशेखराने उसनवारी ह्या विषयाचा उपसंहार पुढील शब्दांत केला आहे—

**"इत्यर्थहरणोपाया द्वात्रिंशदुपदर्शिताः । हानोपादानविज्ञाने कवित्वं तत्र मां प्रति ॥**
**किंचैते हरणोपाया ज्ञेयाः सप्रतियोगिनः । अर्थस्य वैपरीत्येन विज्ञेया प्रतियोगिता ॥**

**किञ्च—शब्दार्थशासनविदः कति नो कवन्ते ।**
**यद्वाङ्मयं श्रुतिधनस्य चकास्ति चक्षुः ।**
**किन्त्वस्ति यदवचसि वस्तु नवं सदुक्तिसन्दर्भिणां स धुरि तस्य गिरः पवित्राः ॥[83]**

अर्थात्–अशा प्रकारे अर्थहरणा( ग्रहणा )चे बत्तीस उपाय सांगितले आहेत. ह्या उपायांपैकी अमुक एक उपाय त्याज्य आहे व अमुक एक ग्राह्य आहे असे वैशिष्ट्यपूर्ण ज्ञान ज्याला होते त्यालाच, माझ्या (=राजशेखराच्या) मते, काव्य रचता येते.

शिवाय, अर्थग्रहणाचे हे उपाय सविरोधी आहेत, हे लक्षात ठेवावे. म्हणजे असे की, अर्थाचा विपर्यास केल्यास प्रतियोगिता (विरुद्धता) उत्पन्न होते. ( मूळ काव्यातील अर्थाच्या सौंदर्याला धक्का बसता कामा नये, त्याची हानी होता कामा नये किंवा त्यास विकृत स्वरूप प्राप्त होता कामा नये, ही खबरदारी अर्थग्रहणकर्त्याने घ्यावयाची असते. ) शिवाय ( असे पहा की ), सर्वच वैयाकरण व नैयायिक शास्त्रकाव्ये रचतात. परंतु त्यांच्यापैकी प्रखर अध्ययनशील व्यक्तीचेच शास्त्र ( काव्य ) इतरांचे डोळे दिपवून टाकते. तद्वत ( कविता सगळेच करतात ), परंतु ज्याच्या काव्यात शब्द व अर्थ यांचे नावीन्य असते त्यालाच कवींमध्ये अग्रपूजेचा मान मिळतो आणि त्याचीच वाणी पवित्र मानली जाते. तात्पर्य, सम्मानाची अपेक्षा बाळगणाऱ्या होतकरू कवीने प्राचीन काव्यातील शब्दार्थांची उसनवारी करताना विवेक बाळगावा, मुळातील अर्थसौंदर्याचा विचका होणार नाही याची काळजी घ्यावी व आपल्या स्वतःच्या रचनेत शब्द व अर्थ यांच्या अपूर्वत्वाची झळाळी आणण्याचा आटोकाट प्रयत्न करावा, असा राजशेखराच्या उपदेशाचा गोषवारा आहे.

## (11) राजशेखराच्या विवेचनाची वैशिष्ट्ये

येथवर 'साहित्यातील उसनवारी' किंवा 'वाङ्मयचौर्य' ह्या विषयाची राजशेखराने केलेली चर्चा समजून घेतली. तिची वैशिष्टये आता अवलोकू म्हणजे त्या चर्चेच्या द्वारे साहित्यसमीक्षेच्या सन्दर्भात राजशेखराने केलेल्या कार्याचे महत्त्व ध्यानात येईल व त्या चर्चेचा प्राचीन व अर्वाचीन मराठी भाषेतील ललित साहित्याच्या विश्लेषणात्मक अध्ययनाला कसा व कितीसा उपयोग होऊ शकतो तेही स्पष्ट होईल.

डॉ. व्ही. एम. कुळकर्णी ह्यांनी 'Sanskrit Writers on Plagiarism'[84] ह्या शीर्षकाच्या लेखात दाखवून दिल्याप्रमाणे राजशेखरापूर्वी होऊन गेलेल्या बाण, वाक्पतिराज, वामन, आनन्दवर्धन इत्यादी कवींनी व काव्यमीमांसकांनी तसेच राजशेखरानंतर होऊन गेलेल्या भोज-क्षेमेन्द्र-बिह्लण-हेमचन्द्र-वाग्भट-प्रभृती साहित्यिकांनी व साहित्यविमर्शकांनी प्रस्तुत विषयाची चर्चा केलेली असल्याचे आढळून येते हे खरे. तथापि, ह्यांपैकी कोणत्याही साहित्यशास्त्रकाराने ती चर्चा इतकी सोपपत्तिक, सोदाहरण व सविस्तर केलेली नाही. राजशेखराने आपल्या अठरा अध्यायांच्या ग्रंथाचे तब्बल तीन अध्याय ( क्रमांक 11 ते 13, पृ. 56-78 ) प्रस्तुत विषयाच्या चर्चेस वाहिले आहेत. त्यांत शब्दहरण, शब्दार्थहरण, अर्थहरण, कविप्रभेद व प्रतिबिंबकल्पप्रभृती बत्तीस वाङ्मयचौर्यप्रकारांची समीक्षा हे ठळक विषय येऊन गेले

आहेत. राजशेखराने उसनवारी किंवा वाङ्मयचौर्य याला 'हरण' असा पारिभाषिक शब्द वापरला आहे. ह्या विषयाच्या चर्चेचा उपन्यास करताना त्याने काही उसन-वारी पूर्णपणे त्याज्य म्हणजे वर्ज्य असते, तर काही ग्राह्य म्हणजे स्वीकरणीय असते, असे एक व्यापक निरीक्षण नोंदवले आहे. नंतर त्याने शब्दहरणाच्या पाच प्रकारांची लक्षणे व उदाहरणे देऊन ह्या विषयांशाची खुलासेवार चर्चा केली आहे. तिच्याच ओघात हरण हा विषय उपदेश करण्याजोगा की न करण्याजोगा असा एक मूलभूत प्रश्न उपस्थित करून आणि तद्विषयक प्राचीनांचे व अवन्तिसुन्दरीचे मत उद्धृत करून त्याला आपली मूक संमती दर्शवली आहे. अवन्तिसुन्दरीच्या मताचे विविध पैलू ह्यापूर्वी परिच्छेद (3) च्या अखेरीस नमूद केलेच आहेत. ह्याच विवेचक पद्धतीने त्याने कोणते हरण श्लाघ्य व कोणते अश्लाघ्य, जगात आता कवींना हाताळण्याजोगा विषय राहिला आहे की सर्व विषय प्राचीन कवींनी अगोदरच हाताळले असल्यामुळे आता काव्यानुकूल विषय शिल्लकच राहिला नाही, असे महत्त्वपूर्ण साहित्यशास्त्रीय मुद्दे उपस्थित करून त्यांच्याविषयी वाक्पतिराज व इतर शास्त्रकार (ह्यांचा उल्लेख राजशेखराने एके, अपरे, केचित् इत्यादी शब्दांनी केला आहे) ह्यांची कोणती विचारसरणी आहे व तिच्याबद्दल आपल्याला स्वतःला काय वाटते, ते राजशेखराने स्पष्ट शब्दांत मांडले आहे. विवेचनातील हा शास्त्रीय काटेकोरपणा व पद्धतशीरपणा कायम ठेवून त्याने 'हरणा'चे प्रतिबिंबकल्पप्रभृती चार मुख्य व त्यांचे प्रत्येकी आठ, असे मिळून एकूण बत्तीस प्रकारोपप्रकार क्रमशः व अनुरूप उदाहरणे देत-देत विशद केले आहेत. शिवाय, प्रत्येक प्रमुख प्रकाराच्या विवेचनाचा समारोप करण्यापूर्वी तो प्रकार त्याज्य की ग्राह्य व तसा का याचाही खुलासा त्याने एखाद्या वस्तुनिष्ठ शास्त्रकाराच्या भूमिकेतून केला आहे. ही विस्तृत चर्चा करताना राजशेखराने ज्या उपजीव्य कवींचे श्लोक उदाहरणादाखल उद्धृत केले आहेत त्यांमध्ये वाल्मीकी, भास, कालिदास, भारवी; भवभूती, बाणभट्ट, अमरुक, रत्नाकर व स्वतः राजशेखर या मान्यवरांचा समावेश आहे. तर उपजीवी कवींमध्येही कालिदास, माघ, चंद्रक, प्रकाशदत्त इत्यादी आदरणीयांचा अन्तर्भाव आहे. राजशेखराने ह्या द्विविध उदाहरणांच्या द्वारे प्रबुद्ध वाचकाला जणू हे सुचवले आहे की, प्रतिष्ठा लाभलेल्या महाकवींनाही अर्थहरण करण्यात संकोच किंवा कमीपणा वाटत नसे आणि म्हणूनच त्यांच्या काव्यांची समीक्षा करताना सावधानता बाळगली पाहिजे. राजशेखराने उपर्युल्लिखित बत्तीस हरण-प्रकारांच्या साक्षेपी व सविस्तर परामर्शाच्या ओघात पुढीलप्रमाणे बहुशाख व विपुल उपाय किंवा मार्ग उजेडात आणले आहेतः मूळच्या काव्यातील वर्ण्य विषयाच्या तपशिलाचा क्रम बदलणे; त्या तपशिलावर स्वतःच्या कल्पनेने संस्कार करून त्याचा कायापालट घडवून आणणे; वर्ण्य विषयातील गौण-मुख्य अंशांचा विपर्यय ( उलटफेर ) करणे; वर्ण्य विषयाचा सन्दर्भ पूर्णपणे बदलणे; त्यात अन्य

कल्पनांचा समावेश करणे; त्यातील संख्यात्मक उल्लेखांचा क्रम फिरवणे; वर्ण्य विषयगत निषेधपर अंशांचे विधिपर अंशांत व विधिपर अंशांचे निषेधपर अंशांत रूपान्तर करणे; सूक्ष्म वा संक्षिप्त वर्ण्य विषयाला मूर्त किंवा विस्तृत रूप बहाल करणे; मुळातील शब्दालंकार व अर्थालंकार यांची अदलाबदल करणे; तशीच अदलाबदल सामान्य वर्णन व विशेष वर्णन यांची करणे; मूळ काव्यातील विषयाला एकदम वेगळी कलाटणी देणे; वर्ण्य विषयाच्या वैशिष्ट्यांचे कल्पनासंपन्न व पल्लेदार वर्णन करणे; अनेक पद्यांचे सारसंकलन एका पद्यात करून चमत्कृती साधणे आणि अशीच चमत्कृती मूळ काव्यगत वर्णनाच्या विरुद्ध वर्णन करून साधणे.

अशा प्रकारे राजशेखराने प्रस्तुत विषयाचा यावच्छक्य समस्त अंगोपांगांनी, सोपपत्तिक, सप्रमाण, सोदाहरण व सविस्तर ऊहापोह केला आहे. त्याच्या ह्या ऊहापोहात आत्यन्तिक सूक्ष्मता व व्यापकता आहे. त्याने सामान्यपणे सुचू शकणारा प्रत्येक पैलू विचारात घेऊन हे समग्र विवेचन परिपूर्ण करण्याचा स्पृहणीय व अभिनंदनीय प्रयत्न केला आहे. म्हणूनच डॉ. कुळकर्णी यांनी राजशेखरासारख्या संस्कृत साहित्यशास्त्रकारांवर केलेली पुढीलसारखी टीका अनुदार व अन्याय्य वाटते. ते म्हणतात: "The Sanskrit theorist does not go far into the matter...."

"In conclusion it may be stated here that though Sanskrit writers have not given deep thought to this problem and have consequently failed to observe some subtle aspects of it yet it must be recorded that their contribution to this very interesting subject is sufficiently rich."[85]

वस्तुत: संस्कृत काव्यशास्त्रज्ञ व विशेषत: राजशेखर विनाअट किंवा मुक्त गौरवास पात्र आहे; त्याच्या एतद्विषयक अपूर्व कार्याबद्दल त्याची वरीलप्रमाणे हात आखडता घेऊन प्रशंसा करणे योग्य नाही.

## (12) प्राचीन मराठी काव्याभ्यासाला चर्चेची उपयुक्तता

प्रस्तुत निबंधाच्या प्रथम परिच्छेदाच्या अखेरीस नमूद केल्याप्रमाणे वरील प्रदीर्घ चर्चेची प्राचीन मराठी साहित्याच्या अभ्यासाला कोणती, कशी व किती उपयुक्तता आहे, त्याचा थोडक्यात खुलासा करून हा निबंध संपवू.

प्राचीन व मध्ययुगीन मराठी 'सारस्वतां'समोर संस्कृतातील रामायण-महाभारत-भागवतादी इतिहास-पुराण ग्रंथ होतेच. त्याशिवाय, ह्या ग्रंथांवर आधारित अभिजात संस्कृत-प्राकृतादी भाषांतील साहित्यकृतीही होत्या. अशा ह्या द्विविध आधारभूत साहित्याच्या मदतीने प्राचीन व मध्ययुगीन मराठी कवींनी उपर्युक्त आर्ष व अभिजात ग्रंथांत वर्णिलेल्या विविध घटना, प्रसंग, चरित्रे, आख्याने, स्वयंवरे, युद्धे, स्तोत्रे

इत्यादींना आपल्या काव्यांचे विषय बनवले व त्यांवर मराठी पेहराव चढवले. तसे करताना त्या कवींनी कधी मूळ कृतीचा शब्दशः अनुवाद केला, तर कधी संक्षेप साधला, तर कधी विस्ताराचा मार्ग अबलंबला, तर कधी रूपान्तर करणे श्रेयस्कर मानले, तर कधी थोडे मूळचे व थोडे पदरचे असे मिश्रण करणे पसंत केले. ही समस्त साहित्यिक निर्मिती करणाऱ्यांच्या कृती विश्लेषणात्मक पद्धतीने तपासून त्यांपैकी कोणत्या कृती प्रतिबिंबकल्पप्रभृती बत्तीस प्रकारांपैकी कोणत्या प्रकारात बसतात, तसेच कोणते साहित्यिक भ्रामक-चुंबकादी वर्गांत मोडतात, त्याचा निर्णय करणे उद्बोधक ठरेल. शिवाय, ह्या पद्धतीने केलेला निर्णय प्राचीन भारतातच सिद्ध झालेल्या साहित्यशास्त्राने घालून दिलेल्या नियमांस वा कसोट्यांस अनुसरून केला गेल्यामुळे विद्वद्ग्राह्य होईल. तसेच आजवर प्राचीन साहित्यिक व साहित्यकृती यांच्यासंबंधी केल्या गेलेल्या व सध्याही केल्या जात असलेल्या निन्दापर व/वा गौरवपर टीकेत ग्राह्याग्राह्यता किती आहे, त्याचाही वस्तुनिष्ठ निवाडा होऊ शकेल. खेरीज असा निवाडा पाश्चात्त्य साहित्य-समीक्षेच्या निकषांच्या आधारे, प्राचीन व मध्ययुगीन मराठी साहित्याविषयी काढल्या जाणाऱ्या निष्कर्षांना, परस्पर शह देऊ शकेल, ते वेगळेच.

## (13) निष्कर्ष

प्रस्तुत प्रदीर्घ निबंधातील चर्चेमधून हाती येणारे प्रमुख निष्कर्ष असे :

( i ) साहित्यातील उसनवारी वा वाङ्मयचौर्य या विषयाला प्राचीन संस्कृत साहित्यशास्त्रीय ग्रंथांत साधिकार स्थान प्राप्त झाले होते.

( ii ) संस्कृत-प्राकृतादी भाषांतील साहित्यकृती आर्ष महाकाव्ये, बृहत्कथा, पुराणे यांच्यावर आधारलेल्या होत्या; काही कृती 'अनुकृती' होत्या; काही सारांशरूप होत्या. काही अभिजात साहित्यिकांवर मूळ प्राचीन साहित्यकृतींचे गडद वा खोलवर संस्कार झालेले होते; काही आधारभूत साहित्यकृतींना अमाप लोकप्रियता लाभल्यामुळे उत्तरकालात त्यांची भाषान्तरे वा रूपान्तरे झाली, अशा विविध कारणांमुळे साहित्यिक उसनवारी झाली व स्वाभाविकपणे ती शास्त्रकारांच्या चर्चेचा विषय बनली.

( iii ) ही चर्चा बाण, वाक्पतिराज, आनन्दवर्धन इत्यादी अनेक कवींनी व काव्यमीमांसकांनी थोड्याफार प्रमाणात केली असली तरी तिचे सर्वांगीण, सोपपत्तिक, चर्चाप्रचुर, उदाहरणांसकट, पद्धतशीर, विभाजन-वर्गीकरणपूर्ण, सूक्ष्म व व्यापक असे दर्शन राजशेखराच्या काव्यमीमांसेतच घडते.

( iv ) 'वाङ्मयचौर्य' ह्या विषयाच्या उपदेश्यतेची अवन्तिसुन्दरीकृत तत्त्वमीमांसा आणि संभाव्य बत्तीस प्रकारच्या वाङ्मयचौर्याची राजशेखरकृत विस्तृत तत्त्वचर्चा ह्या दोन्ही गोष्टी प्राचीन भारतीय साहित्यशास्त्राच्या तात्त्विक व उपयोजनात्मक अंगांत महत्त्वपूर्ण भर घालणाऱ्या आहेत.

( v ) ह्या समस्त चर्चेच्या ओघात राजशेखराने मांडलेले काही विचार, घालून दिलेले काही नियम, व्यक्त केलेली निरीक्षणे आणि शब्दनिविष्ट केलेली काही सुवचने पुन:पुन्हा वाचनीय, चिन्तनीय व संस्मरणीय आहेत.

( vi ) राजशेखराचे हे महत्त्वपूर्ण कार्य लक्षात घेता त्याच्यावर व एकूण संस्कृत साहित्यिकांवर डॉ. कुळकर्णी ह्यांनी केलेली टीका अन्याय्य वाटते.

( vii ) राजशेखराने केलेल्या ह्या साक्षेपी विवेचनाच्या प्रकाशात प्राचीन व मध्ययुगीन मराठी भाषेतील [ तसेच अन्य भारतीय भाषांतील ] इतिहास-पुराणाधारित साहित्यिक कृती चिकित्सकपणे तपासून बघून त्यांतील 'उसनवारी'चे स्वरूप निश्चित करता येण्याजोगे आहे.

( viii ) एवंच, भारतात सिद्ध झालेले प्राचीन साहित्यशास्त्र भारतातच सिद्ध झालेल्या प्राचीन साहित्याच्या विश्लेषणास, परीक्षणास व मूल्यांकनास साहाय्यभूत होऊ शकेल.

## संदर्भ टीपा


1. क्षेमेन्द्र, **रामायणमञ्जरी**, मुंबई, निर्णयसागर, काव्यमाला नं. 83, 1903, श्लोक 4.
2. पाहा—**'भुवनोपजीव्यो यथा भगवान् व्यासः । तथा चोक्तम्–**
   **'इदं कविवरैः सर्वैराख्यानमुपजीव्यते । उदयं प्रेप्सुभिर्भृत्यैरभिजात इवेश्वरः ॥'**
   क्षेमेन्द्र, **कविकण्ठाभरण**, संपा., वा. के लेले, प्रथम, दिल्ली: पटना: वाराणसी, मोतीलाल बनारसीदास, 1967, पृ. 63.
3. राजशेखर, **काव्यमीमांसा**, संपा. सी. डी. दलाल व आर्. ए. शास्त्री, तृतीयावृत्ती, बडोदे, ओरिएण्टल् इन्स्टिट्यूट, 1934, पृ. 3.
4. भामह, काव्यालंकार [ **भामहालंकार** ], भाष्यकार, देवेन्द्रनाथ शर्मा, पटना, बिहार-राष्ट्रभाषा-परिषद्, 1962, पृ. 3.
5. दण्डी, **काव्यलक्षणम्**, संपा. अनन्तलाल ठक्कुर व उपेन्द्र उपाध्याय, दरभंगा, मिथिला विद्यापीठ, 1957, पृ. 11.
6. **काव्यमीमांसा**, उ. नि. पृ. 35.
7. **कविकण्ठाभरण**, उ. नि. पृ. 99.
8. धनञ्जय, **दशरूपकम्**, ( सावलोकम् ), व्याख्याकार, भोलाशङ्कर व्यास, बनारस, चौखम्बा विद्याभवन, 1955, पृ. 71.
9. हेमचन्द्र, **काव्यानुशासनम्**, संशोधक, शिवदत्त व इतर, द्वितीय आवृत्ती, मुंबई, निर्णयसागर मुद्रणालय, 1934 [ काव्यमाला 70 ], पृ. 6.
10. एतद्विषयक अधिक तपशिलासाठी पाहा:
    A. K. Warder, 'Classical Literature', *A Cultural History of India*, ed., A. L. Basham, Oxford, Clarendon Press. 1975, pp 170-195

11. A.K. Warder, *Indian Kāvya Literature*, Volume three [*IKL*–3], First, Delhi, Motilal Banarsidass, 1977, p. 116.
12. A. K. Warder, *Indian Kāvya Literature*, Volume four [*IKL*–4], First, Delhi, Motilal Banarsidass, 1983. p. 200.
13. P. V. Kane, *History of Sanskrit Poetics* [ *HSP* ], Third revised edition, Delhi, Motilal Banarsidass, 1961, p. 137
14. A. K. Warder, *Indian Kāvya Literature*, Volume V ( five ) [*IKL*-5], First, Delhi, Motilal Banarsidass, 1988, p. 133.
15. Ibid., p. 265   16. Ibid., pp. 671–72   17. *IKL*–3 p. 20.
18. *IKL*–5, p. 801.   19. Ibid., p. 755   20. *IKL*–4, pp. 538-39.
21. Ibid., pp. 567-68.   22. Ibid., p. 269.
23. **काव्यमीमांसा**, उ. नि. पृ. 53.   24. **कविकण्ठाभरण**, उ. नि. पृ. 70.
25. *IKL*-3, p. 152.
26. A. K. Warder, *Indian Kāvya Literature*, Volume two [*IKL*-2], First, Delhi, Motilal Banarsidass, 1974, pp. 140-41
27. *IKL*-4, p. 223.   28. *IKL*-5, p 653.   29. Ibid., p. 760
30. Ibid., p. 368.   31. *IKL*-4, p. 398.   32. Ibid., pp. 497-498
33. *IKL*-5, p. 670.   34. Ibid., pp. 633-39.   35. *IKL*-4, p. 498.
36. *IKL*-3, p. 66.   37 *IKL*-4, p. 25.   38. Ibid., p. 48.
39. *HSP*, pp. 264-66.   40. Ibid., pp. 208-18.
41. तपशिलासाठी पाहा: *A Cultural History of India*, cited above, pp. 188-192.
42. **कविकण्ठाभरण**, उ. नि. पृ. 58.   43. **तत्रैव**, पृ. 63.
44. **काव्यमीमांसा**, उ. नि. पृ. 56.   45. तत्रैव, पृ. 57.   46. तत्रैव, पृ. 58.
47. तत्रैव, पृ. 61.   48. तत्रैव.   49. तत्रैव, पृ. 62.   50. तत्रैव, पृ. 62-63.
51. हेमचन्द्राने आपल्या **'प्रमाणमीमांसा'** नामक ग्रंथाच्या सुरुवातीलाच वाङ्मयीन उसनवारीचे समर्थन पुढील शब्दांत केले आहे:

    "अनादय एव एता विद्याः संक्षेपविस्तरविवक्षया नवनवीभवन्ति तत्तत्कर्तृकाश्च उच्यन्ते ।"

    –V. M. Kulkarni, *Studies in Sanskrit Sāhitya S'āstra* [ *KSS* ], First, Patan, B. L. Institute of Indology, 1983, p. 24, footnote 2 वरून उद्धृत.

52. तुळा: "महान् हि शब्दस्य प्रयोगविषयः। सप्तद्वीपा वसुमती त्रयो लोकाः चत्वारः वेदाः साङ्गाः सरहस्या बहुधा विभिन्ना एकशतं अध्वर्युशाखाः सहस्रवर्त्मा सामवेद एकविंशतिधा बाह्वृच्यं नवधा अथर्वणो वेदो वाकोवाक्यं इतिहासः पुराणं वैद्यकं इति एतावान् शब्दस्य प्रयोगविषयः।"—पतंजलिकृत **महाभाष्यम्,** आह्निक 1.5

53. असा उपदेश बहुसंख्य प्राचीन साहित्यशास्त्रकारांनी केलेला आढळतो : उदाहरणार्थ, ( i ) **'विलोक्यान्यनिबन्धांश्च कार्यः काव्यक्रियादरः।'— भामहालंकार,** पृ. 5.

( ii ) **'अन्येषां काव्येषु परिचयो लक्ष्यज्ञत्वम्। ततो हि काव्यबन्धस्य व्युत्पत्तिर्भवति।'**—वामन, **काव्यालंकारसूत्राणि,** संशोधक ना. रा. आचार्य, चतुर्थ, मुंबई, निर्णयसागर प्रेस, 1953, पृ. 10.

( ii ) **'पठेत्समस्तान्किल कालिदासकृतप्रबन्धानितिहासदर्शी।'—कविकण्ठाभरण,** उ. नि. पृ. 53, इत्यादी.

54. एकाच आलंबनावर मन व मानसिक व्यापार यांना समान व सम्यक रूपाने लावणे म्हणजे समाधी होय. समाधीच्या योगे भाव्य पदार्थाविषयीचा संशय वा तद्विषयक खोटे ज्ञान नष्ट होते व त्याचे स्वरूप उत्तम प्रकारे समजते. वामनाने 'अवधान' ह्या काव्यांगाचे स्पष्टीकरण करताना 'समाधी' चे स्वरूप खालील शब्दांत वर्णिले आहे :

**'चित्तस्य ऐकाग्र्यं बाह्यार्थनिवृत्तिस्तदवधानम्। अवहितं हि चित्तमर्थान् पश्यति।'**—काव्यालंकारसूत्राणि, उ. नि., पृ. 11.

55. राजशेखरपूर्वकालीन वामनाने समाधी नामक अर्थगुणाच्या विवेचनात अर्थाचे अयोनी ( केवळ ध्यानापासून स्फुरलेला ) व अन्यच्छायायोनी ( दुसऱ्याचे काव्य वाचून मनावर उमटलेल्या ठशापासून प्रस्फुरित झालेला ) असे दोन प्रकार वर्णिले आहेत— **काव्यालंकारसूत्राणि,** उ. नि., 39.

56. **काव्यमीमांसा,** उ. नि., पृ. 63. 57. तत्रैव 58. तत्रैव, पृ. 64.
59. तत्रैव, पृ. 63 60. तत्रैव, पृ. 64. 61. तत्रैव, पृ. 63. 62. तत्रैव, पृ. 64.
63. तत्रैव 64. तत्रैव, पृ. 65. 65. तत्रैव 66. तत्रैव, पृ. 64.
67. तत्रैव, पृ. 65. 68. तत्रैव 69. तत्रैव, पृ. 65-68.

70. सरस्वतीकण्ठाभरणाच्या 2.39 कारिकेवरील टीकेत रत्नेश्वर नामक टीकाकाराने ( i ) प्रकृतिपरिणाम, ( ii ) परपुरप्रवेश, ( iii ) खण्डसङ्घात्य, ( iv ) चूलिका व ( v ) परिमल ह्या पाच प्रकारच्या 'परभृत' कवितांचे विवेचन केले आहे. त्यांतील परपुरप्रवेशाचे तत्कृत स्वरूपवर्णन खालीलप्रमाणे आहे :

**"भाषामात्रभिन्नः परपुरप्रवेशः। यथा—**

देवाधिपो वा भुजगाधिपो वा धराधिपो वा यदि हैहय: स्याम् ।।
संदर्शनं ते गुणकीर्तनं ते सेवाञ्जलिं ते तदहं विदध्याम् ।।
यथा च—
सविमो अणज्जणमिमं अमहिंदमवासुइं च अप्पाणं ।
सेवंजलि-दंसण-गुण-कहासु तुह जो ण पज्जत्तो ।।
[ शपामहे अनर्जुनं इमम् अमहेन्द्रं अवासुकिं चात्मानम् ।
सेवाञ्जलिदर्शनगुणकथासु तव यो न पर्याप्त: ।। ]
अत्र भाषामात्रं भिन्नं इति परपुरप्रवेशनामायं योनिजकाव्यभेद: ।।"
*KSS*, Addendum. p. 192 वरून उद्धृत

राजशेखरवर्णित नटनेपथ्य व उपरिवर्णित परपुरप्रवेश हे दोन्ही स्वरूपत: सारखेच आहेत.

71. **काव्यमीमांसा,** उ. नि. पृ. 68.
72. आनन्दवर्धनानेही प्रतिबिंबकल्प काव्यवस्तू वर्ज्य मानण्याचाच उपदेश केला आहे. पाहा : 'तत्र पूर्वं प्रतिबिम्बकल्पं काव्यवस्तु परिहर्तव्यं सुमतिना, यतस्तदनन्यात्म तात्त्विकशरीरशून्यम् ।'
—आनन्दवर्धन, **ध्वन्यालोक:**, विवृतिकार बदरीनाथ शर्मा, अनुवादक शोभित मिश्र, द्वितीय, बनारस, चौखम्बा-संस्कृत-सीरिज, 1953, पृ. 654.
73. **काव्यमीमांसा,** उ. नि., पृ. 69-71. 74. तत्रैव, पृ. 71.
75. आनन्दवर्धनाने मात्र आलेख्यप्रख्य प्रकार त्याज्यच मानला आहे. तो म्हणतो : 'यदनन्तरमालेख्यप्रख्यमन्यसाम्यं शरीरान्तरयुक्तमपि, तुच्छात्मत्वेन त्यक्तव्यम् ।'
—**ध्वन्यालोक,** उ. नि., पृ. 654.
76 **काव्यमीमांसा,** उ. नि., 71-75. 77. तत्रैव, पृ. 75.
78. आनन्दवर्धनालाही तुल्यदेहितुल्य प्रकार ग्राह्य वाटतो. तो प्रतिपादितो : "तृतीयं [ =तुल्यदेहिवत् ] तु कमनीयं शरीरसद्भावे सति ससंवादमपि काव्यवस्तु न त्यक्तव्यं कविना । न हि शरीरी शरीरिणाऽन्येन सदृशोऽप्येक एवेति शक्यते वक्तुम् ।"—**ध्वन्यालोक,** उ. नि., पृ. 654.
79. हुडयुद्ध किंवा हुडुयुद्ध म्हणजे मेंढयांची टक्कर.
80. 'प्रतिकंचुक'चा शब्दश: अर्थ निराळा पोषाख असा आहे.
81. जीवंजीवकाच्या संदर्भात डॉ. कुळकर्णी खालीलप्रमाणे सानुमान विवेचन करतात : "जीवञ्जीवक: Lit. Cakora bird 'वसन्ते चकोरस्य अक्षिणी रज्येते'. This poetic convention might be responsible for giving the name Jivanjivaka to this variety."—*KSS*, p. 12, footnote 27.
82. **काव्यमीमांसा,** उ. नि., पृ. 75-78. 83. तत्रैव, पृ. 78.
84. *KSS*, pp 1-18. 85. Ibid , p. 18.

# 6. शास्त्रीय ग्रन्थरचनेची प्राचीन पद्धती

## [ प्राचीन शोधप्रबंधांची निर्माण-निरूपण-प्रक्रिया ]

### (1) प्राचीन शास्त्रविस्तार

प्राचीन भारतीयांच्या भव्योत्तुंग, बहुमुखी व अविस्मरणीय प्रतिभाविलासाचा परिचय प्रस्तुत संग्रहातील **'साहित्याचे स्वरूप'** शीर्षकाच्या निबंधात ह्यापूर्वी करून देण्यात आलाच आहे. प्रस्तुत निबंधात, प्राचीन भारतीयांनी कल्पिलेल्या शास्त्रीय ग्रंथरचनेच्या पद्धतीची [ Methodology of theoretico-scientific compositions ] ओळख करून घ्यावयाची आहे.

प्राचीन भारतीय विचारवंत प्रखर व निष्ठावान ज्ञानोपासक म्हणून तत्कालीन जगात विख्यात होते. त्यांनी आपल्या अन्तर्भेदी बुद्धीने ज्ञानाची नवीन-नवीन क्षेत्रे शोधून काढली. त्यांनी श्रवण, निरीक्षण, विश्लेषण, चिन्तन, प्रयोग, संश्लेषण व निष्कर्षण ह्या सर्व बौद्धिक उपायांच्या मदतीने बहि:सृष्टीचे व अन्त:सृष्टीचे ज्ञान संपादन केले; ते प्रथमत: गुरुमुखपरंपरेने[1] पुढल्या पिढीत संक्रमित केले आणि तदनंतर ते चिरस्थायी होऊन आगामी पिढ्यांना उपयोगी पडावे ह्या हेतूने ग्रंथनिविष्ट[2] केले. ह्या ग्रंथांत आयुर्वेद, धनुर्वेद, गान्धर्ववेद, षड्दर्शने, व्याकरण, कोष, ज्योतिष, गणित, धर्म, राजनीती, अश्वविद्या, हस्तिविद्या, रत्नपरीक्षा, योग, वाणिज्य, चित्रकला, शिल्पकला, वास्तुकला, नृत्य, नाट्य, काव्य इत्यादी अनेक विद्या, कला व शास्त्रे ह्यांच्या मूलभूत सिद्धान्त-नियमादींचा विभाजन-वर्गीकरण-पूर्वक, शिस्तबद्ध व विस्तृत परामर्श घेण्यात आला आहे. हे ग्रंथ स्वाभाविकपणेच प्रौढ व गंभीर असून ते तत्त्व-चर्चात्मक व प्रयोगात्मक असे उभयस्वरूपी आहेत. ह्या ग्रंथांच्या[3] द्वारे प्राचीन भारतीय विचारवंतांनी आपल्या प्रखर प्रज्ञेच्या यच्चयावत आविष्कारांना अत्यंत ठाकठिकीचे व मूर्त स्वरूप दिले. तसे करताना त्यांनी कोणताही विषय वर्ज्य मानला नाही. ज्याप्रमाणे त्यांनी ललित लेखनाच्या बाबतीत सर्व कल्पनीय विषय लेखनयोग्य मानले त्याप्रमाणेच त्यांनी ज्ञानप्रधान ग्रंथनिर्मितीच्या बाबतीत सर्व संकल्पनीय विषय शास्त्रग्रंथयोग्य[4] मानले. त्यांच्या ह्या पूर्वग्रहरहित प्रवृत्तीचे अचूक वर्णन डॉ. सी. के. राजा ह्यांनी पुढील शब्दांत केले आहे :

"There is no subject under the sun on which something has not been written in Sanskrit. The people in general, and the

intellectuals especially, were so very scientifically minded that they could not think of virtuosity as a bar to the scientific investigation of any subject. Every subject is a subject and must be dealt with in science. Is there something that is worthy of being scientifically treated ? This is the only question that they had to consider when they took up a subject."[5]

## (2) शास्त्ररचनेचे उपाय

अशा प्रकारे प्राचीन भारतीयांची मनोरचना शास्त्रीय चिन्तनास, अनुसन्धानास व ग्रंथलेखनास पूर्णपणे अनुरूप असल्यामुळे त्यांनी अगणित विषयांवर शास्त्रीय स्वरूपाचे ग्रंथ तर लिहिलेच, परंतु, त्यांनी आपल्या कुशाग्र बुद्धीने आणि कल्पकतेने शास्त्रीय ग्रंथांच्या रचनेचे शास्त्रही सिद्ध केले. म्हणूनच त्यांचे ग्रंथ आखीवरेखीव, सर्वग्राह्य व 'चिरंजीव' झाले. इमारत बांधावयास निघालेला एखादा मनुष्य ज्याप्रमाणे प्रथमतः इमारतीची जागा निश्चित करतो; नंतर संकल्पित इमारतीचा नकाशा काढतो; खोल्या, दरवाजे, दालने, खिडक्या इत्यादी तपशील मनाशी योजून त्याची स्थान-निश्चिती नकाशात करतो; दगड, विटा, चुना, लोखंड इत्यादी साहित्य कोणत्या दर्जाचे, कोणत्या बनावटीचे, किती लांबीरुंदीचे व केवढ्या मजबुतीचे वापरावयाचे ते सारे पक्केपणी ठरवितो आणि मग समग्र साहित्याची जुळवाजुळव करून इमारती-च्या बांधकामास साक्षेपाने सुरुवात करतो. अशी इमारत देखणी, सर्वांगपरिपूर्ण व टिकाऊ झाली नाही तरच नवल ! ह्याच पद्धतीने प्राचीन विचारवंत आपले शास्त्रीय ग्रंथ नीटनेटके, पद्धतशीर, प्रमाणबद्ध, तंत्रशुद्ध व विद्वद्ग्राह्य व्हावेत ह्यासाठी विविध उपायांचा चिन्तनमननपूर्वक अवलंब करीत असत, असे अनेक प्राचीन ग्रंथांतील वचनांवरून ठामपणे म्हणता येते. त्या वचनान्तर्गत उपायांचा प्रथमतः परिचय करून घेऊ व त्यानंतर त्यांपैकी दोन उपायांचा प्रस्तुत निबंधात विस्तृत परामर्श घेऊ.

## (3) तंत्रयुक्त्या

उपर्युल्लिखित उपायांपैकी आद्य उपाय म्हणजे 'तंत्रयुक्ति' हा होय. तंत्र म्हणजे शास्त्र किंवा शास्त्रीय ग्रंथ[6] आणि 'युक्ति' म्हणजे उपाय.[7] अर्थात तंत्रयुक्ती म्हणजे शास्त्राचे किंवा शास्त्रीय ग्रंथ रचण्याचे ( आणि म्हणून अध्ययनाचे, अध्यापनाचे व आलोचनेचे ) भाषिक उपाय ( कारण मौखिक परंपरेने शिकविले जाणारे शास्त्र भाषेच्या साह्यानेच शिकविले जाते. तसेच शास्त्रीय ग्रंथही भाषेच्या मदतीनेच लिहिला जातो ). ह्या तंत्रयुक्त्यांची चर्चा खाली नमूद केलेल्या प्राचीन ग्रंथांमध्ये आढळून येते,

( अ ) कौटलीय **अर्थशास्त्र** ( रचना इ. स. पू. 321-300 ) : 'तंत्रयुक्ति' नामक पंधरावे अधिकरण युक्तिसंख्या बत्तीस

( आ ) चरकरचित **चरकसंहिता** ( रचना इ. स. पूर्व सुमारे पहिले शतक ) : सिद्धिस्थान, बारावा अध्याय, श्लोक 41 ते 45, युक्तिसंख्या छत्तीस.

( इ ) सुश्रुतकृत **सुश्रुतसंहिता** (रचना इ. स. सुमारे 100) : पासष्टावा अध्याय, युक्तिसंख्या बत्तीस.

( ई ) वाग्भटकृत **अष्टाङ्गसङ्ग्रह** ( रचना इ. स. सुमारे 350-400 ) : उत्तर-स्थान, पन्नासावा अध्याय, युक्तिसंख्या बत्तीस.

( उ ) **विष्णुधर्मोत्तरपुराण** (रचना इ. स. सुमारे 450 ते 650) : खण्ड तिसरा, अध्याय सहावा, युक्तिसंख्या छत्तीस.

( ऊ ) नीलमेघप्रणीत **'तंत्रयुक्तिविचारः'** ( रचना इ. स. 800-850 ) : संपूर्ण ग्रंथ तंत्रयुक्तिविवेचनाला वाहिलेला आहे. युक्तिसंख्या छत्तीस.

( ए ) नीलमेघाचा अविज्ञातनाम शिष्य. त्याने लिहिलेले **'तंत्रयुक्तिः'** नामक छोटेसे पुस्तक ( रचना इ. स. 950-1000 ) : तंत्रयुक्त्या हाच पहिला प्रतिपाद्य विषय, युक्तिसंख्या छत्तीस.

ह्याखेरीज इ. स. पूर्व 450 च्या सुमारास होऊन गेलेल्या पाणिनीला संगती, मंगल, अधिकार व विधान ह्या तंत्रयुक्त्या विदित असून त्याने आपल्या ग्रंथात—**अष्टाध्यायीत**—हेत्वर्थ, उपदेश इत्यादी चौदा तंत्रयुक्त्यांचे ज्ञान ध्वनित केले आहे असे डॉ. वासुदेवशरण अग्रवाल ह्यांनी दाखवून दिले आहे.[8] एकंदरीत पाणिनीसकट आठ प्राचीन ग्रंथकारांनी शास्त्ररचनेच्या उपायांची चर्चा केलेली आढळते. यांपैकी कौटल्य, नीलमेघ व त्याचा अज्ञातनाम शिष्य ह्यांनी तंत्रयुक्त्यांची लक्षणे तर सांगितली आहेतच, परंतु त्याखेरीज आपण आपल्या ग्रंथांत त्या-त्या युक्त्या कोणत्या ठिकाणी व कशा वापरल्या आहेत, त्याचाही खुलासा केला आहे. विष्णुधर्मोत्तरपुराणात फक्त व्याख्या ( definitions ) आढळून येतात. चरक, सुश्रुत व वाग्भट यांच्या ग्रंथांच्या टीकाकारांनी युक्तिलक्षणे व उदाहरणे देऊन चर्चा केलेली आढळते. चरक, सुश्रुत व वाग्भट ह्या तिघांनीही आपापल्या ग्रंथांमध्ये तंत्रयुक्त्यांच्या प्रयोजनांवरही विस्तृतपणे प्रकाश टाकला आहे. वरील विविध शास्त्रकारांनी विवेचिलेल्या तंत्र-युक्त्यांच्या संज्ञांची एकूण संख्या ३९ आहे. त्यांची नावे अशी: अतिक्रान्तावेक्षण, अतिदेश, अधिकरण, अनागतावेक्षण, अनुमत अपदेश, अपवर्ग, अर्थापत्ती, उत्तरपक्ष, उद्देश, उद्धार, उपदेश, उपमान, ऊह्य, एकान्त, दृष्टान्त, निदर्शन, नियोग, निर्णय, निर्देश, निर्वचन, नैकान्त, पदार्थ, पूर्वपक्ष, प्रत्युत्सार, प्रदेश, प्रयोजन, प्रसङ्ग, योग, वाक्यशेष, विकल्प, विधान, विपर्यय, व्याख्यान, संशय, समुच्चय, सम्भव, स्वसंज्ञा व हेत्वर्थ.

### (4) व्याख्याः

आदर्श शास्त्ररचनेचा द्वितीय उपाय म्हणजे व्याख्या हा होय. ह्यांची विस्तृत

चर्चा अरुणदत्त नावाच्या टीकाकाराने ( काळ इ. स. सुमारे 875 ते 950 ) वाग्भटाच्या अष्टांगसंग्रह नावाच्या पूर्वोल्लिखित ग्रंथाच्या उत्तरस्थानाच्या चाळिसाव्या अध्यायाच्या अठ्ठ्याहत्तराव्या श्लोकावर टीका लिहिताना केली आहे. त्याने "व्याख्या अपि तंत्रस्य गुणः ताभिरपि तन्त्रमलङ्क्रियते ।"[9] ( व्याख्या हादेखील शास्त्रीय ग्रंथाचा एक स्पृहणीय गुण आहे. व्याख्यांच्या योगेही शास्त्रीय ग्रंथ उपादेय किंवा ग्राह्य बनतो ), अशी प्रस्तावना करून त्यानंतर पिण्ड, पद, पदार्थ, अधिकरण, प्रकरण, अर्थ, कृच्छ्र, फल, उच्चितक, न्यास, प्रयोजन, अनुलोम, प्रतिलोम, अतिसूत्र व समस्त असे पंधरा व्याख्याप्रकार नमूद करून त्यांची उदाहरणेही दिली आहेत.

### (5) कल्पना

व्याख्यांनंतरचा उपाय कल्पना हा होय. ह्यांचेही सलक्षणोदाहरण विवरण अरुणदत्तानेच केले आहे.[10] त्याने प्रधानस्य कल्पना, प्रधानेन कल्पना, गुणकल्पना, लेशकल्पना, विद्याकल्पना, भक्ष्यकल्पना व आज्ञाकल्पना अशा सात कल्पना मानल्या आहेत.

### (6) आश्रय

कल्पना हा तिसरा उपाय झाला. त्यानंतरचा चौथा उपाय म्हणजे आश्रय हा होय. आश्रय म्हणजे आधार, आसरा किंवा टेकू. शास्त्रीय ग्रंथकार ज्या शब्दादींचा आधार घेऊन आपले ग्रंथ रचतात व ज्यांचा आधार घेऊन अभ्यासकांना ते ग्रंथ समजून घ्यावे लागतात त्यांना आश्रय असे म्हणतात. असे एकूण वीस आश्रय अरुणदत्ताने[11] मानले आहेत. त्यांची नावे अशी : आदिलोप, मध्यलोप, अन्तलोप, उभयपदलोप, आदिमध्यान्तलोप, वर्णोपजनन, ऋषिक्लिष्ट, तन्त्रशील, तन्त्रसंज्ञा, प्राकृत, समानतन्त्रप्रत्यय, परतन्त्रप्रत्यय, हेतुहेतुकधर्म, कार्यकारणधर्म, आद्यन्तविपर्यय, शब्दान्यत्व, प्रत्ययधर्म, उपनय, सम्भव व विभव.

### (7) 'ताच्छील्य'

म्हणजे स्वभावता हा प्राचीनोक्त पाचवा उपाय होय. ह्याची चर्चाही अरुणदत्तानेच[12] केली असून त्याने ताच्छील्य, अवयव, विकार, सामीप्य, भूयस्त्व, प्रकार, गुणिगुणविभव, संसक्तता, तद्धर्मता, स्थान, तादर्थ्य, साहचर्य, कर्म, गुणनिमित्तता, चेष्टानिमित्तता, मूलसंज्ञा व तात्स्थ्य अशी एकूण सतरा ताच्छील्ये प्रतिपादिली आहेत. एकंदरीने अरुणदत्ताने शास्त्रीय ग्रंथाच्या रचनेचा खूप तपशीलवार विचार केलेला होता असे जाणवते. त्याने, पूर्वीच्या शास्त्रकारांनी सांगितलेल्या छत्तीस तंत्रयुक्त्यांत, 15 व्याख्या, 7 कल्पना, 20 आश्रय व 17 ताच्छील्ये अशा 59 उपायांची भर घालून एकूण उपायसंख्या 95 वर नेऊन पोचवली आहे. त्याने जणू असे सूचित केले आहे की, एखाद्या शास्त्रीय ग्रंथाचे अविकृत, परिपूर्ण व सुस्पष्ट ज्ञान संपादन करू इच्छिणाऱ्या अभ्यासकाने ह्या 95 उपायांचा उत्तम परिचय प्राप्त करून घ्यावयास हवा. ह्यावरून असे अनुमान करता येते की, अरुणदत्ताने

शास्त्रीय ग्रंथरचनेच्या सर्व संभाव्य अंगोपांगांचा समावेश करणारा एक व्यापक किंवा समावेशक आराखडा ( A comprehensive plan of a theoretico-scientific treatise ) तयार केला आहे. ह्या आराखड्याला Methodology of writing a dissertation or thesis असे आजच्या परिभाषेनुसार म्हणता येईल. अर्थात आपल्या देशात शास्त्रनिर्मितीचे तंत्र फार प्राचीन काळात सिद्ध झाले होते, ही बाब ध्यानात घेतली की, आपल्या पूर्वजांच्या विचारवैभवाविषयी आदर वाटू लागतो.

### (8) शास्त्रग्रंथाचे सामान्य गुण

वरील 95 उपाय हे शास्त्रीय ग्रंथाचे विशेष उपाय म्हणता येतील. परंतु, त्याखेरीज कोणत्याही शास्त्रीय ग्रंथात अनिवार्यपणे असावयात हवेतच असेही उपाय असू शकतात, ह्याचेही भान प्राचीन चिंतकांनी बाळगले होते असे दिसून येते. खुद्द चरकाने आपल्या ग्रंथाच्या विमानस्थानाच्या आठव्या अध्यायात सुमहद्यशस्विप्रभृती अनिवार्य गुणांचे विवेचन केले आहे. चरकानंतर होऊन गेलेल्या ईश्वरकृष्णाने ( उत्कर्षकाळ इ. स. 450 )[13] 'सांख्यकारिका' हा दार्शनिक ग्रंथ लिहिला आहे. त्यावर युक्तिदीपिका ( रचनाकाळ इसवी सनाचे सहावे शतक ) नावाची टीका आहे. तिच्यात 1 सूत्र, 2 प्रमाणावयवोपपत्ति, 3 अन्यूनता, 4 संशयनिर्णयोक्ति, 5 उद्देश-निर्देश, 6 अनुक्रम, 7 संज्ञा व 8 उपदेश असे आठ तंत्रगुण सांगितलेले आहेत, असे श्री० ओबेरहॅमर यांनी निदर्शनास आणले आहे.[14] ह्यांपैकी कोणते गुण चरकोक्त गुणांत समाविष्ट होतात, कोणते नवीन असल्यामुळे स्वतंत्रपणे स्वीकारणे इष्ट ठरते, इत्यादी मुद्द्यांचा विचार पुढे यथास्थल करू. तूर्त इतकेच नमूद करून ठेवणे आवश्यक आहे की, प्राचीन चिंतकांनी शास्त्रीय ग्रंथाच्या रचनेचे जसे वैशेषिक गुण कल्पिले होते तसे सामान्य गुणही मानले होते.

### (9) शास्त्रीय ग्रंथाचे दोष

गुण ग्राह्य असतात, त्यांचे विपर्यय जे दोष ते त्याज्य असतात. गुणांचे ज्ञान झाले तरी त्यांच्या विपर्ययांचे म्हणजे दोषांचे ज्ञान होतेच असे नाही. ते स्पष्टपणे व्हावे एतदर्थ पूर्वोक्त अरुणदत्ताने आपल्या 'सर्वाङ्गसुन्दरा'[15] टीकेत अप्रसिद्धशब्द, दुःप्रणीत, असङ्गतार्थ, असुखारोहि, विरुद्ध, अतिविस्तृत, अतिसंक्षिप्त, अप्रयोजन, भिन्नक्रम, संदिग्ध, पुनरुक्त, निःप्रमाणक, असमाप्तार्थ, अपा(न)र्थक व व्याहत[16] अशा एकूण पंधरा दोषांचे विवेचन करून 'प्राचीन शास्त्रीय ग्रंथांच्या रचनेचे शास्त्र' ह्या विषयाला जणू पूर्णता प्राप्त करून दिली. एकंदरीत प्राचीन भारतीय विचारवंतांनी शास्त्ररचनेच्या शास्त्राचा सर्व बाजूंनी व सूक्ष्म विचार केला होता, हे वरील तपशिलावरून निःसंदिग्धपणे जाणवते. प्रस्तुत निबंधात चरकोक्त साधारण गुणांचा व अरुणदत्तकल्पित दोषांचा परिचय करून देण्याचे योजिले आहे. असा परिचय करून देत असताना युक्तिदीपिकाकारांच्या विचारांचीही दखल घेण्याचे ठरविले आहे. तेव्हा आता चरकवर्णित गुणांकडे वळू.

## (10) शास्त्रीय ग्रंथाचे अनिवार्य गुण

चरकाने पुढील शब्दांत तंत्रगुणांचे वर्णन केले आहे :

**"तत्र यन्मन्येत सुमहद्यशस्वि, धीरपुरुषासेवितं, अर्थबहुलं, आप्तजनपूजितं, त्रिविधशिष्यबुद्धिहितं, अपगतपुनरुक्तदोषं, आर्षं, सुप्रणीतसूत्रभाष्यसङ्ग्रहक्रमं, स्वाधारं, अनवपतितशब्दं, अकष्टशब्दं, पुष्कलाभिधानं, क्रमागतार्थं, अर्थतत्त्वविनिश्चयप्रधानं, संगतार्थं, असंकुलप्रकरणं, आशुप्रबोधकं, लक्षणवत्, उदाहरणवत् च । तदभिप्रपद्येत शास्त्रम् । शास्त्रं ह्येवंविधममल इवादित्यस्तमो विधूय प्रकाशयति सर्वम् ।"**[17]

[ चरकाने वरील गुणोल्लेखापूर्वी आपल्या वाचकांना असा इशारा दिला आहे की, सध्या समाजात वैद्यकशास्त्रावरील अनेक ग्रंथ प्रचारात आहेत. परंतु, ते सर्वच अध्ययनयोग्य आहेत असे नाही. म्हणून ज्या ग्रंथामध्ये पुढील गुण असतील तोच ग्रंथ जिज्ञासूंनी अभ्यासासाठी निवडावा. अर्थात प्रमाणभूत व विश्वसनीय शास्त्रीय ग्रंथामध्ये पुढील स्पृहणीय गुण आढळतात— ]

### (10.1) 'सुमहद्यशस्वि'

( थोर व वैद्यकीय व्यवसायात यशस्वी ठरलेले विचारवंत जो ग्रंथ अभ्यासार्थ किंवा शंकानिवारणार्थ निवडतात व त्यामुळे ) ज्या ग्रंथाला महान व यशस्वी म्हणून लौकिक लाभलेला असतो असा ग्रंथ. आयुर्वेद हे केवळ तात्त्विक शास्त्र नाही, तर ते प्रायोगिक शास्त्रही आहे. त्यामुळे आयुर्वेदावरील ज्या ग्रंथातील तत्त्वविवेचन अधिकृत ( authoritative ) आहे व रोगनिदानप्रक्रिया हमखास गुणकारी आहे, असा ग्रंथ वैद्याला व्यवसायात यश मिळवून देतो व म्हणून लौकिकवान ठरतो.

### (10.2) धीरपुरुषासेवितम्

स्थिर व दृढ बुद्धीचे थोर विचारवंत पुरुष ज्या ग्रंथाच्या सहवासाचा आनंद लुटतात; एक सन्दर्भग्रंथ म्हणून ज्यास नित्य आपल्यापाशी बाळगतात; ज्यातील शब्द, कल्पना, विचार, भाषा व मांडणी यांचे अनुसरण करतात; आपले स्वतःचे विचार मांडताना व मंडित करताना ज्याचा हवाला देतात आणि अध्ययन-अध्यापन, चिन्तन-मनन, संशोधन-लेखन इत्यादी विविध बौद्धिक क्रियाकलापांसाठी ज्याचा निःशंकपणे आधार घेतात, असा शास्त्रीय ग्रंथ.

### (10.3) अर्थबहुलम्

ज्यामध्ये परंपरागत तसेच स्वत:च्या बुद्धीला सुचलेले विपुल विचार ( प्रमेये, संकल्पना किंवा सिद्धान्त ) ग्रंथकाराने संगृहीत केलेले असतात, असा शास्त्रीय ग्रंथ. स्वाभाविकपणे असा ग्रंथ वाचकाच्या चिन्तनाला भरपूर खाद्य पुरवतो आणि एक प्रकारे शास्त्राच्या भाविकालीन विकासाला साहाय्य करतो.

### (10.4) आप्तजनपूजितम्

जो ग्रंथ सत्यवादी, क्रोधद्वेषादिविकाररहित व अधिकारी व्यक्ती पूज्य मानतात

असा ग्रंथ. अशा व्यक्तींना त्या ग्रंथातील सत्याचा पडताळा आलेला असतो, म्हणून त्या व्यक्ती तो ग्रंथ विश्वसनीय मानतात. तात्पर्य, तावूनसुलाखून घेतलेला ग्रंथ.

## (10.5) त्रिविधशिष्यबुद्धिहितम्

तीव्र, मध्यम व अल्प अशा तीन प्रकारच्या बुद्धीच्या शिष्यांना सारखाच उपयुक्त असलेला ग्रंथ. जो शास्त्रीय ग्रंथ अर्थबहुल व अर्थतत्त्वविनिश्चयप्रधान असतो तो तीव्र ( =प्रखर ) बुद्धीच्या शिष्यांना उपकारक ठरतो. जो ग्रंथ स्वाधार व सुप्रणीतसूत्र-भाष्यसंग्रहक्रम असतो तो मध्यम बुद्धीच्या शिष्यांना उपयुक्त ठरतो. तर जो अकष्टशब्द, पुष्कलाभिधान, क्रमागतार्थ, संगतार्थ, असंकुलप्रकरण, लक्षणवत, उदाहरणवत व आशुबोधक असतो तो अल्प बुद्धीच्या वाचकांना हितप्रद ठरतो. एकंदरीने, शास्त्रकाराने सर्व प्रकारच्या बौद्धिक मगदुरांच्या शिष्यांचे हित डोळ्यां-समोर ठेवून ग्रंथरचना केल्यास ती सर्वग्राह्य ठरते.

## (10.6) अपगतपुनरुक्तदोषम्

विषयोपविषयांच्या विवेचनाच्या पुनरुक्तीचा दोष ज्यात अजिबात नाही असा ग्रंथ. विवेच्य विषयाची पुनरुक्ती ग्रंथकर्त्याच्या बौद्धिक बेशिस्तीची निदर्शक असते. शिवाय, ती तैलबुद्धीच्या अभ्यासकाला स्वतःच्या आकलनशक्तीचा उपमर्द करणारी वाटते. तसेच ती सर्वच प्रकारच्या शिष्यांना कंटाळवाणी वाटते. अर्थात निष्प्रयोजन पुनरुक्ती त्याज्यच ठरते. अशा पुनरुक्तीपासून अलिप्त असलेले शास्त्र स्वाभाविकपणे अभ्यासकांना प्रिय वाटते.

## (10.7) आर्षम्

ज्याला प्राचीन किंवा परंपरागत तत्त्वांचे उत्तम स्मरण आहे, ज्याने प्रतिपाद्य विषयात यथेच्छ अवगाहन केले आहे आणि जो ध्यानादींच्या योगे अतीन्द्रिय विषयांचे आकलन करू शकतो अशा पवित्र पुरुषाने[18] (=व्यक्तीने) लिहिलेला ग्रंथ. ग्रंथकर्त्याच्या ठिकाणी कोणत्या शक्ती ( faculties ) आवश्यक असतात तेच जणू येथे चरकाने सांगितले आहे.

## (10.8) सुप्रणीतसूत्रभाष्यसंग्रहक्रमम्

खूप विचार करून रचलेल्या सूत्रांवर ज्या ग्रंथामध्ये स्पष्टार्थक भाष्य आहे व ज्यात विषयोपविषयांचे संकलन क्रमबद्ध रीतीने केलेले आहे असा ग्रंथ साहजिकपणेच आदर्श शास्त्रीय ग्रंथ ठरतो. प्राचीन ग्रंथ प्रायः सूत्ररूपच असत.

**'अल्पाक्षरं असन्दिग्धं सारवत् विश्वतोमुखम् ।**
**अस्तोभं अनवद्यं च सूत्रं सूत्रविदो विदुः ॥'**

ही सूत्र शब्दाची सर्वत्र प्रचलित व सर्वप्रसिद्ध व्याख्या ( definition ) आहे. सूत्र म्हणजे सारांशरूपाचे, निर्दोष व संक्षिप्त असे विधान. प्राचीन काळात सूत्रशैलीचाच पुरस्कार का झाला त्याची मीमांसा डॉ. परममित्र शास्त्री ह्यांनी पुढील यथार्थ शब्दांत केली आहे :

'भारतवर्ष में शास्त्ररचना प्राय. सूत्रशैली में की जाती थी। एक समय इसकी परंपरा बृहत्तर रूप से फैली हुई थी। सूत्रशैली की सबसे बड़ी विशेषता होती है संक्षेप में अधिक बातें व्यक्त करना। इस प्रणाली का उद्भव बहुत ही चिंतन एवं मनन के बाद हुआ था। चिंतनशील प्राणी ही विस्तृत विषयवस्तु को संक्षेप में व्यक्त करने की क्षमता रख सकता है। मनन और निदिध्यासन करनेवाला व्यक्ति ही शास्त्ररचना करता है। शास्त्रचिंतन करने के लिये भी पूर्वोक्त बातों की आवश्यकता होती है। इसके अतिरिक्त पुरातन युग में छापखाने के अभाव के कारण भी इस परंपरा का अधिक विकास हुआ। संक्षेप में ही कंठस्थ करके शास्त्रों का ज्ञान प्राप्त करने की प्रणाली सबसे सुलभ मानी गई।"[19]

डॉ. वासुदेवशरण अग्रवाल ह्यांनीही पाणिनीय व्याकरणाच्या संदर्भात सूत्रशैलीचे महत्त्व खालील शब्दांत वर्णिले आहे :

"An indication of the great pains which these pioneers of learning took in order to enrich their subjects is given by Patañjali when he speaks of Pāṇini as **महता यत्नेन सूत्राणि प्रणयति स्म** i. e., 'he planned and composed the sūtras with strenuous effort'. Pāṇini himself speaks of a perfect sūtra as pratiṣṇāta, 'immersed'. i. e, emerging out of concentrated thought".[20]

एकंदरीने सूत्र म्हणजे विचारवंताच्या विचारांचा जणू अर्कच आणि तो अत्यन्त गोळीबंद शब्दांतच साकार होत असे. सूत्रे ही नेहमी गद्यातच असत असे नाही. तर कारिका (म्हणजे शास्त्रतत्त्वविवेचक श्लोक) ही सूत्रपद्धतीने लिहिलेल्या असत. उदाहरणार्थ, भर्तृहरीचा 'वाक्यपदीय' ( रचना इ. स. 651 ) हा ग्रंथ कारिकामय असला तरी त्या कारिका सूत्रसदृशच आहेत. त्यामुळे त्यांच्या अर्थाचे ज्ञान पुण्यराजाच्या 'प्रकाश' टीकेवाचून यथावत होत नाही, असे प्रा. साठे ह्यांनी नमूद केले आहे.[21] शास्त्रग्रंथातील सूत्रे गद्यमय असोत वा पद्यमय असोत, ती चांगल्या प्रकारे (सुप्रणीत) रचलेली असावीत, असा चरकाचा आग्रह आहे. भाष्यात सूत्राचा आशय सूत्रानुसारी शब्दांनी सुस्पष्ट करून सांगितलेला असतो. शिवाय, भाष्यकार स्वत:च्या शब्दप्रयोगांचाही उलगडा वाचकांच्या अवबोधासाठी करीत असतो.[22] सुप्रणीत सूत्रे,[23] स्पष्टार्थक भाष्य व क्रमबद्ध विषयसंकलन असे एकूण तीन गुण चरकाने प्रशंसनीय मानले आहेत. त्याची ही विचारसरणी पटण्याजोगीच आहे.

## (10.9) स्वाधारम्

ज्यात जागोजागी प्राचीन ग्रंथातील युक्तिवाद आधारास घेऊन विवेचन स्थिर व दृढ केलेले असते असा ग्रंथ. असे विवेचन घरंगळत नाही किंवा त्यात डळमळीतपणाचा[24] दोष उतरत नाही. स्वाभाविकपणे असा ग्रंथ प्रमाणभूत ठरतो.

### (10.10) अनवपतितशब्दम्

ज्यात नवीन म्हणजे परंपरागत अर्थाला सोडून असणारे व म्हणून अभ्यासकाचा बुद्धिभेद करणारे शब्द वापरलेले नसतात; तसेच ज्यात अपभ्रष्ट, व्याकरणदुष्ट व/वा अप्रचलित शब्द वापरलेले नसतात, असा ग्रंथ ग्राह्य ठरतो. परंपरेला सोडून असणारे शब्दप्रयोग वाचकाला बुचकळ्यात टाकतात. अपभ्रष्ट व व्याकरणदुष्ट शब्दप्रयोगांमुळे शास्त्र गचाळ बनते. रूढीतून नाहीसे झालेले शब्द पुन: वापरले गेल्यास ते अस्वीकार्य ठरतात. एकंदरीने चरकाने हे वैशिष्टच सांगताना खूप विचार केला होता, असे प्रतीत होते.

### (10.11) अकष्टशब्दम्

प्रतिपाद्य अर्थाच्या दृष्टीने चुकीचे व/वा समजण्यास अवघड असे शब्द शास्त्रीय ग्रंथात असू नयेत. प्रामादिक शब्दप्रयोग केव्हाही वर्ज्यच होत, कारण ते अर्थहानीस किंवा अर्थहीनतेस कारणीभूत होतात. शास्त्रीय ग्रंथ सामान्य बुद्धीच्याही अभ्यासकाच्या आटोक्यातील असावा अशी चरकाची अपेक्षा असल्यामुळे ( त्याने 'त्रिविधशिष्यबुद्धिहितम्' ह्या शब्दांत ती अपेक्षा स्पष्टपणे बोलून दाखविलीच आहे. ) त्याने आकलनास दुष्कर असलेले शब्दही वर्ज्य मानले आहेत. शब्दरचना कर्णकटू असू नये असाही प्रस्तुत गुणाचा अर्थ करता येईल.

### (10.12) पुष्कलाभिधानम्

ज्यात पुष्कळ पारिभाषिक संज्ञा वापरलेल्या असतात किंवा ज्यात विपुल स्पष्टीकरणे (निरूपणे) केलेली असतात असा ग्रंथ. शास्त्रीय ग्रंथात पारिभाषिक शब्द साहजिकपणेच वैपुल्याने वापरलेले असतात. शास्त्रकार त्यांचे समानार्थक शब्दही नमूद करतो. शिवाय तो विविध शब्दांची, संकल्पनांची किंवा सिद्धान्तांची स्पष्टीकरणे करतो. अशा विपुल स्पष्टीकरणांमुळे शास्त्रीय विषय विशद होत जातो.

### (10.13) क्रमागतार्थम्

ज्या ग्रंथात विषयोपविषयांच्या विवेचनाची एकच पद्धत ( सुरवातीपासून अखेरपर्यंत ) पाळलेली असते, ज्यात चिन्तनोत्तर प्रतीत होणाऱ्या विषयोपविषयांचे वर्णन केलेले असते किंवा ज्यात विविध विषयोपविषयांचे कमी-अधिक महत्त्व व त्यांचे परस्परसंबंध ध्यानात घेऊन त्यांच्या विवेचनाची पूर्वापरस्थाने निश्चित केलेली असतात व तदनुसार त्यांचे प्रत्यक्षात विवेचन केलेले असते, असा ग्रंथ. ज्या शास्त्रीय ग्रंथात विवेचनाची एकसुरी पद्धत पाळलेली असते व ज्यात विषयोपविषय क्रमवारीने लावून त्यांची चर्चा केलेली असते, त्या ग्रंथाचे वाचन सुरळीतपणे होऊ शकते व त्याचे आकलन तत्काळ व सहजपणे होते. चरकाची ही विचारसरणी योग्यच आहे.

### (10.14) अर्थतत्त्वविनिश्चयप्रधानम्

ज्यात विषयाच्या अन्तस्तलापर्यंत पोचून त्याच्या अस्सल ( यथार्थ ) स्वरूपाचा

निर्णय करणे हाच प्रमुख उद्देश असतो. तत्त्वनिर्णय करणे हा प्रधान उद्देश नजरे-समोर ठेवून शास्त्रीय ग्रंथकार ग्रंथरचनेस प्रवृत्त झालेला असतो.

## (10.15) संगतार्थम्

ज्यात विवेचिलेले विविध विषय एकमेकांशी चांगल्या प्रकारे जोडलेले असतात, ज्यातील विविध विषय परस्परानुरूप असतात व ज्यातील प्रतिपादन तर्कपूत असते, असा ग्रंथ. कोणत्याही आदर्श शास्त्रीय ग्रंथातील विषयांची मांडणी रेखीव असणे, त्यांत मेळ असणे व विवेचन बुद्धीला पटणारे असणे आवश्यक असते. चरकाचा एतद्विषयक दृष्टिकोण स्वीकार्यच आहे.

## (10.16) असंकुलप्रकरणम्

ज्यातील प्रकरणे, अध्याय किंवा विषयविभाग परस्परविरुद्ध किंवा एकमेकांचे खंडन करणारे नसतात, असा ग्रंथ. प्रकरणांच्या संकुलत्वामुळे ग्रंथगत विवेचनात परस्परविरोध उत्पन्न होईल; अशा ग्रंथातील कोणता भाग बरोबर म्हणून ग्राह्य व कोणता चुकीचा म्हणून अग्राह्य ते अभ्यासकास समजेनासे होईल. एकंदरीने सगळा गोंधळ माजेल. म्हणून संकुलत्व त्याज्य.

## (10.17) आशुप्रबोधकम्

शान्त व सावध चित्ताने अल्पसा विचार केल्यावर ज्यातील प्रतिपादनाचे रहस्य सरळपणे ध्यानात येते, असा ग्रंथ. कोणत्याही शास्त्रीय ग्रंथाचे आकलन वाचल्या-बरोबर होत नाही. तत्प्रीत्यर्थ थोडासा विचार अवश्य करावा लागतो. पण शास्त्र-काराने विषयाची मांडणी रेखीवपणे केलेली असल्यास विषयाचे आकलन, अल्प विचारानंतर, सरळपणे होते.

## (10.18) लक्षणवत्

ज्यातील विविध शास्त्रीय शब्दांची, संकल्पनांची, तत्त्वांची, प्रमेयांची किंवा सिद्धान्तांची लक्षणे ( definitions ) अव्याप्ती, अतिव्याप्ती व असंभव ह्या त्रिदोषां-पासून मुक्त असतात व ज्यातील इतर शास्त्रीय विषयांची ( उदाहरण, प्रयोग, प्रक्रिया, प्रतिक्रिया इत्यादींची ) वर्णने अचूक असतात, असा ग्रंथ.

## (10.19) उदाहरणवत्

ज्यात विवेच्य विषयांच्या विशदीकरणासाठी अर्थपूर्ण, चपखल व पुरेशी उदाहरणे ( दाखले किंवा दृष्टान्त ) दिलेली असतात असा ग्रंथ.

चरकाचा आदेश असा की, जिज्ञासूने वरील गुणांनी युक्त असलेलाच शास्त्रीय ग्रंथ अभ्यासासाठी निवडावा, असाच ग्रंथ जवळ बाळगावा ( आणि ग्रंथरचनेच्छूने ) असाच ग्रंथ रचावा. अशा प्रकारचे ग्रंथरूप शास्त्र निष्कलंक सूर्याप्रमाणे अंधकाराचे निरसन करून सर्व विषयोपविषयांना उजळून टाकते ( =सुविशद करते ).

चरकाने प्रतिपादिलेल्या वरील गुणांपैकी अपगतपुनरुक्तदोषम्, अनवपतितशब्दम्,

अक्लिष्टशब्दम् व असंकुलप्रकरणम् हे गुण अभावरूप ( negative ) असून उरलेले सर्व गुण भावरूप ( positive ) आहेत. त्या सर्वांचा साकल्याने विचार केल्यावर असे लक्षात येते की, चरकाने आदर्श शास्त्रीय ग्रंथाची शब्दनिष्ठ, रचनानिष्ठ व अर्थनिष्ठ अशी तिन्ही अंगे पूर्णपणे विचारात घेतली होती. ह्या प्रत्येक अंगाची वैशिष्टये खालील प्रमाणे सांगता येतील :

( i ) **शब्दनिष्ठ**—मोजकेपणा; पारिभाषिक शब्दवैपुल्य; बुद्धिभेदक, अपभ्रष्ट, सदोष, अप्रचलित, प्रामादिक व अनाकलनीय शब्दांचा अभाव.

( ii ) **रचनानिष्ठ**—शिस्तबद्धता, रेखीवपणा, मोजकेपणा, संकलनसौष्ठव, क्रमबद्धता व स्पष्टता.

( iii ) **अर्थनिष्ठ**—परंपरागत व नवीन विचारांनी भरलेला, चिंतनाला खाद्य पुरविणारा, तज्ज्ञप्रणीत, विश्वसनीय, तत्त्वप्रकाशक, तत्त्वनिर्णायक, तर्कशुद्ध प्रतिपादनाने ओतप्रोत, सर्व प्रकारच्या जिज्ञासूंना अभ्यासयोग्य, बिनचूक वर्णने व निर्दोष व्याख्या ( definitions ) यांनी मंडित, अधिकृत संदर्भग्रंथवत व सर्वदा उपयुक्त.

चरकाने कल्पिलेले आदर्श शास्त्रीय ग्रंथाचे हे स्वरूप कोणत्याही देशातील, कोणत्याही काळातील व कोणत्याही भाषेतील ग्रंथाला लागू पडावे असेच आहे. म्हणूनच चरकोक्त प्रस्तुत लक्षण आदर्श तत्त्वविवेचक ग्रंथाचे आदर्श लक्षण ( An ideal definition of an ideal theoretico-scientific work ) आहे, असे म्हणता येते.

## (11) युक्तिदीपिकाकारांचे विचार

येथवर 'शास्त्रीय ग्रंथाचे अनिवार्य गुण' ह्याबद्दलचे चरकाचे विचार समजून घेतले. आता युक्तिदीपिकाकाराच्या विचारांकडे वळू. त्याने (1) सूत्र, (2) प्रमाणावयवोपपत्ती, (3) अन्यूनता, (4) संशयनिर्णयोक्ती, (5) उद्देशनिर्देश, (6) अनुक्रम, (7) संज्ञा व (8) उपदेश असे एकूण आठ तंत्रगुण प्रतिपादिलेले आढळतात. ह्यांतील एकेका गुणाचा क्रमशः विचार करू.

## (11.1) सूत्र

कोणत्याही शास्त्रीय ग्रंथातील सूत्रे अल्पाक्षर, असंदिग्ध इत्यादी पूर्वोल्लिखित गुणवैशिष्ट्यांनी युक्त असावीत हा आशय चरकोक्त 'सुप्रणीतसूत्रभाष्यसंग्रहक्रम' ह्या गुणात अन्तर्भूत आहे. किंबहुना हा उत्तरोक्त गुण अधिक व्यापक आहे.

## (11.2) प्रमाण

शास्त्रीय ग्रंथातील प्रत्येक विधानास प्रमाण म्हणजे आधार असलाच पाहिजे. तसा आधारयुक्त ग्रंथच युक्तिवादाच्या कसोटीला उतरून बुद्धीला पटतो. ह्यापूर्वी परिच्छेद 10.9 मध्ये दाखवून दिल्याप्रमाणे चरकाने 'स्वाधार' हा गुण अभीष्ट मानला आहे. त्यात व प्रस्तुत प्रमाणात काहीच अंतर नाही.

## (11.3) अवयव

अवयव म्हणजे विषयाचे अंश किंवा भाग. एखाद्या व्यापक विषयाचे अनेक पोटविषय असू शकतात. त्या सर्वांची तर्कशुद्ध व क्रमबद्ध मांडणी करून मग ग्रंथाच्या एकेका भागात एकेका पोटविषयाचे विवेचन केलेले असावे. विषयाचे घटकोपघटक सुस्पष्ट असावेत व लक्षात ठेवता येतील असे मांडलेले असावेत. हा गुणही चरकोक्त सुप्रणीतसूत्रभाष्यसंग्रहक्रमं (10.8) व संगतार्थं (10.15) ह्या पूर्वोक्त दोन गुणांत समाविष्ट होतो.

## (11.4) उपपत्ती

विवेच्य विषयाला अनुकूल युक्तिवाद सादर करणे किंवा दाखले देऊन, प्रकरण-गत प्रतिपाद्य विषयाचे प्रतिपादन करणे म्हणजे उपपत्ती.[25] शास्त्रीय ग्रंथातील प्रत्येक विषय कार्यकारणसंबंधपूर्वक मांडलेला असणे आवश्यक असते. त्याच्या योगेच ग्रंथाचे प्रामाण्य वाढते. ग्रंथाची योग्यता त्याच्या प्रामाण्यावरूनच ठरविली जाते. ह्या गुणाचा आशयही चरकोक्त 'स्वाधारम्' (10.9) शब्दात व्यक्त झाला आहे.

## (11.5) अन्यूनता

शास्त्रीय ग्रंथाच्या विवेचनात कोठेही कमतरता राहू देऊ नये. ते यावच्छक्य परिपूर्ण करावे. अशी कमतरता अनेक बाबतींत राहण्याची शक्यता असते, जसे: विषयाच्या सर्व बाजू नमूद न करणे; नमूद करूनही त्यांच्या विवेचनाच्या बाबतीत धरसोड करणे; ग्रंथलेखनकालापर्यंत होऊन गेलेला शास्त्रीय विचार लक्षात न घेणे; मांडणी, युक्तिवाद व भाषाशैली ह्याबाबतींत हलगर्जीपणा करणे; पुरेशी व समुचित उदाहरणे न देणे, इत्यादी. अशा उणिवा टाळल्याने अन्यूनता हा गुण साधला जातो. चरकाने अन्यूनता हा शब्दप्रयोग प्रत्यक्षपणे केलेला नसला तरी पूर्वी दर्शवून दिल्याप्रमाणे त्याने शब्दनिष्ठ, रचनानिष्ठ व अर्थनिष्ठ असा सर्वांगीण विचार करून परिपूर्णता हा अर्थ सूचित केलेलाच आहे.

## (11.6) संशयोक्ती

ग्रंथलेखनकालापावेतो झालेल्या शास्त्रमंथनाचे आलोडन करून इतर विचार-वंतांनी घेतलेल्या आक्षेपांचे ज्ञान करून घेणे व ते आपल्या ग्रंथात उद्धृत करणे. जातिवंत शास्त्रकाराने विरोधी विचारांची दखल घेणे अत्यावश्यक असते. पूर्वी तृतीय परिच्छेदाच्या अखेरीस सादर केलेल्या तंत्रयुक्त्यांच्या यादीतील ( परिच्छेद 3 ) पूर्वपक्ष तंत्रयुक्ती म्हणजेच प्रस्तुतचा संशयोक्ती हा गुण होय.

## (11.7) निर्णयोक्ति

विरोधकांच्या विचारांची आदरपूर्वक दखल घेऊन ते विचार आपल्या ग्रंथामध्ये आवर्जून दाखल करून घेणे; त्यांवर सूक्ष्म बुद्धीने साधकबाधक चर्चा करून त्यांचे प्रतिष्ठित भाषेत खंडन करणे आणि आपली निर्णायक मते ठामपणे मांडणे. शास्त्रीय

ग्रंथकाराने आपल्या भूमिकेची बूज राखली पाहिजे. ह्यापूर्वीच्या संशयोक्तीप्रमाणेच प्रस्तुतचा निर्णयोक्ती हा गुण चरकोक्त पूर्वपक्ष व निर्णय ह्या दोन तंत्रयुक्त्यांत (परिछेद 3) अन्तर्भूत होतो.

### (11.8) उद्देश

शास्त्रान्तर्गत विषयोपविषयांचे उल्लेख स्थलकालविवेक करून क्वचित संक्षिप्तपणे करावेत. असे केल्याने ग्रंथाला अकारण फुगवटा येत नाही. शास्त्रकाराने शक्यतो विस्तारभीरू असावे. हा गुण म्हणजे चरकप्रणीत उद्देश तंत्रयुक्ती.

### (11.9) निर्देश

शास्त्रीय विषयोपविषयांचे सविस्तर उल्लेख. आदर्श शास्त्रकाराने विस्ताराचे भय बाळगावे हे जरी सर्वसाधारणपणे खरे असले तरी जेथे आवश्यकता असेल, जेथे संक्षिप्त उल्लेखाने संदेह उत्पन्न होण्याची शक्यता असेल अथवा जेथे उल्लेखनीय विषय मुळातच संख्यादृष्टया अल्प नसतील तेथे शास्त्रकाराने संपूर्ण उल्लेखच करावेत. हा गुणही ह्याच संज्ञेने चरकाने विवेचिलेला आहे. ( परिच्छेद 3 )

### (11.10) अनुक्रम

शास्त्रीय विषयोपविषय एक प्रकारच्या तार्किक सुसंगतीने परस्परांशी संबद्ध असतात. त्या संबंधामुळेच त्यांच्या विवेचनाचा क्रम सुनिश्चित होत असतो. तो क्रम सांभाळणे आवश्यक असते. अन्यथा विवेचन विस्कळित, शिस्तहीन व दुर्बोध होण्याची धास्ती असते. चरकानेही विधान ( म्हणजे अनुक्रमच ) ह्या अर्थाची तंत्रयुक्ती मानलेली आहे. ( मागील तृतीय परिच्छेद पाहा. )

### (11.11) संज्ञा

प्रत्येक शास्त्राची स्वतःची अशी खास परिभाषा असते. त्या परिभाषिक[26] शब्दांना संज्ञा असे म्हणतात. दक्ष शास्त्रकाराने त्या संज्ञांचा निःशंक मनाने, नियत अर्थाने व यथास्थल प्रयोग करावा. हा गुणदेखील चरकोक्त स्वसंज्ञा तंत्रयुक्तीत अन्तर्भूत होतो.

### (11.12) उपदेश

**'शिष्यते अनेन इति शास्त्रम्।'** अर्थात ज्याच्या साह्याने एखादा विषय शिकविला जातो, त्यास शास्त्र म्हणतात, अशी शास्त्र शब्दाची व्युत्पत्ती आहे. शिकविण्यात उपदेश येतोच. खाली उद्धृत केलेले परंपरागत व प्रसिद्ध शास्त्रलक्षण 'शास्त्र उपदेश करते' याच अर्थाचे आहे.

**'प्रवृत्तिश्च निवृत्तिश्च पुंसां येनोपदिश्यते ।**
**तद्धर्माश्चोपदिश्यन्ते शास्त्रं शास्त्रविदो विदुः ॥'**[27]

युक्तिदीपिकाकारोक्त उपदेश गुण चरकोक्त उपदेश तन्त्रयुक्तीत अन्तर्भूत होतो. एकंदरीने युक्तिदीपिकेत प्रतिपादिलेले तंत्रगुण चरकोक्त तंत्रयुक्त्यांत व्यवस्थितपणे

बसतात. म्हणूनच श्री. ओबेरहॅमर यांचा पुढील अभिप्राय स्वीकार्य ठरत नाही: "On the other hand we have also seen great deviations from the old tradition of the tantrayuktis. They are obviously due to a development of the old doctrine, possibly under the influence of the vāda–tradition, leading from Caraka to the Nyāyasūtras, and in the particular problem of the term sañjña under the influence of grammar."[28]

श्री. ओबेरहॅमर यांचे चरकाच्या गुणविवेचनाकडे पुरेसे लक्ष गेलेले दिसत नाही. त्यामुळे त्यांनी वरीलप्रमाणे विधान केले असावे.

## (12) शास्त्रीय ग्रंथाचे दोष

येथवर शास्त्रीय ग्रंथाच्या स्पृहणीय विशेषांचा म्हणजेच गुणांचा परामर्श घेतला. आता दोषांकडे वळू. अरुणदत्ताने आपल्या 'सर्वाङ्गसुन्दरा' टीकेत एकूण पंधरा दोषांचा विचार केला असल्याचा उल्लेख मागे नवव्या परिच्छेदात केलाच आहे. त्यांचेच स्वरूप लक्षणोदाहरणांसह समजून घेऊ.

### (12.1) अप्रसिद्धशब्दम्

**'अप्रसिद्धशब्दं नाम यल्लोके नातीव प्रसिद्धम्'**[29] असे ह्याचे लक्षण अरुणदत्ताने केले आहे. जेव्हा लोकव्यवहारात अप्रचलित किंवा अनतिप्रसिद्ध असलेल्या शब्दाचा प्रयोग शास्त्रात केलेला असतो तेव्हा शास्त्राचा तेवढा भाग दुर्बोध होतो. उदाहरणार्थ, उदक्या हा शब्द रजस्वला स्त्री ह्या अर्थाने रूढ नाही. त्याचा प्रयोग केल्यास तो अनाकलनीय ठरेल. तसेच भद्र शब्द वृषभ (बैल) ह्या अर्थी किंवा अर्व शब्द अश्व ह्या अर्थी वापरल्यास अप्रसिद्धशब्द हा दोष होईल. शास्त्र सुबोध असावयास हवे. चरकाने स्पृहणीय म्हणून मानलेल्या अनवपतितशब्दम् ह्या गुणाच्या विरुद्ध असा हा दोष होय. म्हणून त्याज्य. ( मागील परिच्छेद 10.10 पाहा. )

### (12.2) दुःप्रणीतम्

**'सूत्रभाष्यप्रयोजनरहितम् ।'**[30] अर्थात ज्या शास्त्रीय ग्रंथात निष्प्रयोजन सूत्र व निरुद्देश भाष्य असतात, त्यात हा दोष उत्पन्न होतो. हा दोष पूर्वोक्त 'सुप्रणीतसूत्रभाष्यसङ्ग्रहक्रमम्' (परिच्छेद 10.8) ह्या गुणाच्या विरुद्ध असल्यामुळे त्याज्य ठरतो.

### (12.3) असङ्गतार्थम्

ह्याचे लक्षण असे : **'यत्सूत्रेणासम्बद्धम् ।'**[31] अर्थात, जेव्हा शास्त्रीय विषय सूत्राने बांधलेला किंवा संबद्ध नसतो म्हणजेच विस्कळित असतो तेव्हा प्रस्तुत दोष उत्पन्न होतो. सूत्रे ही समग्र शास्त्रीय ग्रंथाचे जणू अधिष्ठान असतात व त्यामुळे शास्त्रात वर्णिलेले समस्त विषय सूत्रांनी अन्वित असतात. त्यायोगे शास्त्रग्रंथात शिस्त उत्पन्न होते. हा दोष पूर्वोक्त 'सङ्गतार्थम्' ( परिच्छेद 10.15 ) गुणाचा विपर्यय होय.

## (12.4) असुखारोहि पदम्

**'यत्पदसन्निवेशस्य विषमतया दुःखेनोच्चार्यते, चर्करीतादिप्रायम् ।'**[32] अर्थात, जेव्हा शास्त्रात वापरलेले शब्द ओबडधोबड, कर्णकटू किंवा जोडाक्षरप्रचुर असतात तेव्हा त्यांच्या उच्चाराला प्रयास पडतात. अशा शब्दप्रयोगांमुळे प्रस्तुतचा दोष होतो. उदाहरणार्थ, धातर्यरिप्रद इत्यादी शब्द उच्चारदुष्कर व श्रवणकटू आहेत. ग्रंथगत शब्दरचना सुखोच्चार्य व श्रुतिसुभग असली पाहिजे असा अरुणदत्ताचा आग्रह आहे. असा ग्रंथ वाचावयास गोडी वाटते. हा दोष म्हणजे पूर्वोक्त (10.11) 'अकष्टशब्दम्'चा विपर्यय होय, म्हणून त्याज्य ठरतो.

## (12.5) विरुद्धम्

ह्याचे अरुणदत्तकृत लक्षण असे : **'यद् दृष्टान्तसिद्धान्तसमयैर्विरुद्धम् ।'**[33] अर्थात, ज्या शास्त्रीय ग्रंथातील विवेचन दृष्टान्त, सिद्धान्त व नियम यांच्या विरुद्ध असते त्या ग्रंथात हा दोष उत्पन्न होतो. शास्त्रगत प्रतिपाद्य विषय सुबोध करण्यासाठी दिलेले व्यावहारिक वा अन्य दाखले अनुभव-विरुद्ध असल्यास शास्त्र सदोष होते. प्रत्येक शास्त्रात परंपरागत व नवीन संशोधनावर आधारित प्रमेयांचे किंवा मूलभूत सिद्धान्तांचे विवेचन आढळून येते. जेव्हा अशा सिद्धान्तांच्या विवेचनात गफलत होते, तेव्हा हा दोष होतो. ह्याच प्रकार शास्त्रीय नियमांनाही लागू आहे. पूर्वोक्त अर्थबहुलम् (10.3) गुणाच्या विरुद्ध असा हा दोष होय.

## (12.6) अतिविस्तृतम्

**यथा मधुरादिस्कन्धं ब्रुवन् यावन्ति मधुराणि जगति सन्ति मधुरप्रायाणि मधुर-प्रभवाणि तान्यशेषाणि यद्यभिदधाति, तदाऽतिविस्तृतत्वं स्यात् ।'**[34]

अर्थात—कोणताही शास्त्रीय ग्रंथ अतिविस्तृत ( विस्ताराने अफाट ) असू नये. कारण अशा ग्रंथाच्या वाचनाचा वाचकाला कंटाळा येण्याची शक्यता असते. उदाहरणार्थ, मधुर पदार्थांचे वर्णन कर्तव्य असता एखाद्या शास्त्रकाराने जगातील यच्चयावत मधुरप्राय, मधुरोत्पन्न अशा प्रकारोपप्रकारांची गणनापूर्वक नोंद करावयास सुरुवात केली तर ग्रंथ कमालीचा फुगेल व तो अखेरीस वाचकाला नीरस वाटू लागेल. म्हणून अशा प्रसंगी प्रातिनिधिक मधुर पदार्थांचे तेवढे उल्लेख करून ग्रंथकाराने बाजूस सरले पाहिजे. म्हणजेच ह्या बाबतीत ग्रंथकाराने विवेक बाळगावयास हवा; तारतम्य दाखवावयास हवे. विचारशील वाचक असाच ग्रंथ आदराने जवळ करतात.

## (12.7) अतिसंक्षिप्तम्

**'यथा योगशतकप्रायम् । यथा वा—हेतुलिङ्गौषधोद्देश एव क्रियते, न तु तदवबोधक-वाक्यानामिति शेषः ।'**[35]

अर्थात—अतिसंक्षिप्त दोष असा : योगशतकप्रायम् एवढेच म्हणणे, त्याचा खुलासा न करणे किंवा रोगाचे कारण, रोगाचे लक्षण व रोगावरील औषध म्हणजे आयुर्वेद

एवढेच सांगणे. ह्या तीन घटकांची स्पष्टीकरणे न करणे, म्हणजे अतिसंक्षिप्त दोष पदरी बांधून घेणे होय. अशा प्रकारचे अतिसंक्षिप्त शास्त्रीय विवेचन अनर्थकारक, अपुष्टार्थक, संदिग्धार्थप्रतिपादक, अनपेक्षितार्थबोधक, द्व्यर्थप्रतिपादक किंवा भ्रमोत्पादक होण्याची धास्ती असते. म्हणून शास्त्रीय ग्रंथकाराने अतिविस्तृत व अतिसंक्षिप्त असे दोन्ही 'अति' वर्ज्य मानावेत. अरुणदत्ताचा हा सल्ला शास्त्रीय व लौकिक अशा उभयविध व्यवहारांच्या दृष्टीने योग्यच आहे.

## (12.8) अप्रयोजनम्

ह्या दोषाचा खुलासा करताना अरुणदत्ताने म्हटले आहे—**'यथा "इत्याचारः समासेन" इत्येतावद्यदि वदेत्, न तु ब्रूयात् "यं प्राप्नोति समाचरन्। आयुरारोग्यमैश्वर्यम्" इत्यादि, तदा न कश्चिदनुतिष्ठेदिति।"**[36]-अर्थात, आयुर्वेदावर लिहिणाऱ्या ग्रंथकाराने 'थोडक्यात, असे आदर्श आचरण असावे', एवढेच म्हटले, पण त्या आचरणामागील प्रयोजन किंवा उद्दिष्ट सांगितले नाही, तर त्या उपदेशानुसार कोणीही वागणार नाही. परंतु, ग्रंथकाराने 'असे आचरण करणाऱ्यास आयुष्य, आरोग्य व ऐश्वर्य यांची प्राप्ती होते' या शब्दांत फलश्रुतीही सांगितली तर कोणत्या हेतूसाठी आचरण करावयाचे ते कळल्यामुळे श्रोता तदनुसार आचरणास प्रवृत्त होतो. युक्तिदीपिकाकाराने अन्यूनता व उपदेश ह्या गुणवाचक शब्दांच्या द्वारे प्रस्तुतच्या दोषाचा परामर्श घेतलेला आहेच.

## (12.9) भिन्नक्रमम्

**'पूर्वं येनानुक्रमेणोक्तं न तेनैव निर्दिश्यते प्रयोजनान्तरासम्भवेऽपि"**[37]-अर्थात, पूर्वी विषयोपविषयांचे निर्देश ज्या क्रमाने केलेले असतील ते निर्देश, विशेष अन्य प्रयोजन नसतानाही, निरूपणात डावलणे म्हणजे भिन्नक्रम दोष होय. कोणत्याही आदर्श शास्त्रीय ग्रंथात प्रतिपाद्य विषयोपविषयांच्या निर्देशपूर्वक विवेचनाची शिस्तबद्ध पद्धत असते; असावयास हवी असते. विभिन्न विषयांच्या महत्त्वक्रमानुसार व त्यांच्या अन्योन्यसंबंधानुसार त्यांचा प्रथमतः उल्लेख व त्यानंतर विचारविमर्श व्हावयास हवा. अन्यथा, शास्त्रीय व्यवस्था कोलमडते. शास्त्रकाराने विशेष उद्देश मनात बाळगून निर्देशक्रमाहून वेगळा असा निरूपणक्रम स्वीकारला तर त्याचे तसे करणे समर्थनीय ठरते. अरुणदत्ताचा असा रोख आहे की, कोणताही शास्त्रीय ग्रंथ अथपासून इतिपर्यंत क्रमबद्ध असला तरच तो शास्त्रीय या संज्ञेस पात्र ठरतो. प्रस्तुत दोष पूर्वोक्त 'क्रमागतार्थम्' (10.13) गुणाच्या विरुद्ध आहे.

## (12.10) सन्दिग्धम्

**'किमकालमृत्युरस्ति उत नास्ति ?' इत्युभयत्र हेत्वाभासपरिग्रहात् संशयः।**[38]

जेव्हा एखाद्या शास्त्रीय ग्रंथातील विवेच्य विषयाच्या निश्चितीच्या बाबतीत संदेह उत्पन्न होतो, तेव्हा प्रस्तुत दोष उत्पन्न होतो. शास्त्रकाराने आपल्या वाचकांना प्रवृत्ती

व निवृत्ती ह्याबाबतींत सुनिश्चित उपदेश करावयास पाहिजे. संदेहामुळे वाचकाला एकाच विषयाच्या बाबतीत परस्परविरुद्ध नानाकोटिक ज्ञान होते. ते ठाम मत बनविण्याच्या आड येते. प्रस्तुत दोष म्हणजे पूर्वोक्त 'अर्थतत्त्वविनिश्चयप्रधानं' (10 14) ह्या गुणाचा विपर्यय होय.

## (12.11) पुनरुक्तम्

**"योऽर्थ उक्तोऽपि पुनरुच्यते ।"[39]**

अर्थात पूर्वी एकदा प्रतिपादिलेला विषय पुनः एकदा प्रतिपादणे म्हणजे पुनरुक्त ( क्ती ) दोष होय. ग्रंथकाराने एखाद्या विवेच्य विषयावर साभिप्राय जोर देण्यासाठी किंवा त्या विषयाकडे वाचकांचे लक्ष वेधण्यासाठी त्याची पुनरुक्ती केली तर ती दोषरूप न मानली जाता, गुणरूप मानली जाते. परंतु, अभिप्राय किंवा उद्देश यांच्या अभावी केलेली पुनरुक्ती ही नेहमीच निंद्य वा वर्ज्य मानली जाते. अशी पुनरुक्ती शास्त्रकाराचे बौद्धिक दुबळेपण निदर्शनास आणते. बौद्धिक दृष्टचा शिस्तहीन व्यक्तीस कोणीही सच्छास्त्रकार मानीत नाही. पूर्वी 'अपगतपुनरुक्तदोषं' ( 10.6 ) हा गुण वर्णिलेला आहे, त्याचा विपर्यय म्हणजे प्रस्तुतचा दोष होय.

## (12.12) निःप्रमाणम्

जेव्हा एखादा शास्त्रकार आपल्या शास्त्रीय ग्रंथात एखाद्या विषयाचे विवेचन करताना प्रमाण देत नाही किंवा त्या विषयाच्या विकल्पांपैकी नेमका कोणता विकल्प आपल्याला अभिप्रेत आहे ते स्पष्टपणे नमूद करीत नाही, तेव्हा ते विवेचन अधांतरी लोंबकळत राहते आणि वाचकाला बुचकळचात टाकते. शास्त्रीय ग्रंथाच्या वाचनात वाचकाच्या बुद्धीचा गोंधळ उडणे हे केव्हाही अनिष्टच होय. म्हणून निःप्रमाण हा दोष ठरतो. हा दोष पूर्ववर्णित स्वाधारं ( 10.9 ) गुणाच्या विरुद्ध होय.

## (12.13) असमाप्तार्थम्

**'अत्र तावदुच्यते । परतोऽपि चेदित्येतत्ततः समाप्तार्थत्वान्न ज्ञायते किमनेन कार्यमिति ।'[40]**

एखाद्या शास्त्रकाराने अंगीकृत शास्त्रीय विषयाच्या समाप्तीपर्यंत विवेचन न करता मध्येच त्याचा उपसंहार केला तर त्यायोगे प्रस्तुतचा दोष उत्पन्न होतो. ह्या दोषामुळे अभ्यासकाला विवेच्य विषयाचे समग्र व सम्यक्ज्ञान होऊ शकत नाही. शास्त्र हे प्रतिपाद्य विषयाचे सर्वांगीण व यथासांग ज्ञान करून देण्यासाठी लिहिलेले असते.

## (12.14) अपा( न )र्थकम्

**'यदन्यार्थेनापि पदेनापगताभिधेयम् ।'[41]**

जेव्हा एखादा शास्त्रकार विशिष्ट अर्थ प्रतिपादन करण्यासाठी त्याहून वेगळ्या अर्थाच्या शब्दांचा प्रयोग करतो तेव्हा अभिप्रेत अर्थ अपगत म्हणजे नष्ट झालेला असल्यामुळे अपार्थक दोष होतो. या दोषाच्या स्वरूपाचे दुसरे स्पष्टीकरण असे

संभवते की, जेव्हा अभिप्रेत अर्थ अन्य शब्दार्थाद्वारे अगोदरच प्रकट झालेला असतो तेव्हा त्याचा पुनरुच्चार करणे म्हणजे अनर्थक दोष होय. कोणत्याही शास्त्रीय ग्रंथात शब्दांच्या वाच्यार्थालाच महत्त्व असते, त्यामुळे वाच्य अर्थ व त्याचा वाचक शब्द ह्यांमध्ये एकता किंवा अभिन्नता अपेक्षित असते. हा दोष म्हणजे पूर्वोक्त अपगतपुन-रुक्तदोषं ह्या गुणाचा विपर्यय आहे, हे उघड आहे. आता व्याहत ह्या अन्तिम दोषाचा विचार करू.

## (12.15) व्याहतम्

**"यथा पूर्वया वाक्ययुक्त्याऽपरा व्याहन्यते, अपरया पूर्वा वा । यथा "अनास्थाप्या मेहिनः" इत्युक्त्वा पुनरास्थापनमनुजज्ञे ।...तदत्र विधिप्रतिषेधयोः परस्परविरोधाद् व्याहतत्वम् ।"**[42] जेव्हा पूर्वोक्त वाक्याने उत्तरोक्त वाक्याचे किंवा उत्तरोक्त वाक्याने पूर्वोक्त वाक्याचे खंडन होते तेव्हा व्याहत हा दोष उत्पन्न होतो. अरुणदत्ताचा अभिप्राय असा की, जेव्हा एखादा शास्त्रकार परस्परविरुद्ध अर्थाची विधाने करतो तेव्हा ती वाचणाऱ्या वाचकाचा गोंधळ उडतो. अर्थात ह्या दोषामुळे शास्त्रीय ग्रंथा-चा तेवढा भाग मोहप्रवर्तक होतो. शास्त्रीय ग्रंथ नेहमीच मोहनिवर्तक असला पाहिजे. म्हणून हा दोष त्याज्य ठरतो. पूर्वोक्त असंकुलप्रकरणम् ( 10.16 ) गुणाचा विपर्यय म्हणजे प्रस्तुतचा दोष होय.

## (13) निष्कर्ष

वरील दोषांपैकी अधिकांश दोष गुणांच्या विपर्ययांच्या स्वरूपाचे आहेत. अति-विस्तृतं, अतिसंक्षिप्तं, अप्रयोजनं व असमाप्तार्थं ह्या दोषांना दोष म्हणून स्वतंत्र अस्तित्व आहे. शास्त्रीय ग्रंथरचनेत ग्राह्य काय व त्याज्य काय ह्याचा खुलासेवार उलगडा करण्यासाठी गुण व दोष यांचे स्वतंत्रपणे विवेचन करण्यात आले आहे. वरील दोषांपैकी अप्रसिद्धशब्द, असुखारोहि व अपा( न )र्थक हे शब्ददोष आहेत; अतिविस्तृत, अतिसंक्षिप्त, भिन्नक्रम व दुःप्रणीत हे चार रचनागत दोष होत; आणि असंगतार्थ, विरुद्ध, अप्रयोजन, संदिग्ध, निःप्रमाण, असमाप्तार्थ व व्याहत हे सगळे अर्थनिष्ठ दोष आहेत. पूर्वी दहाव्या परिच्छेदाच्या अखेरीस हे दर्शवून दिले आहे की, चरकाने गुणांचे शब्दनिष्ठ, रचनानिष्ठ व अर्थनिष्ठ असे त्रिभेद मानले. तीच व्यवस्था शिरोधार्य मानून अरुणदत्ताने दोषांचेही शब्दनिष्ठ, रचनानिष्ठ व अर्थनिष्ठ प्रकार केले आहेत. अशा प्रकारे अरुणदत्ताने चरकाचा ग्रंथ आदर्श मानून त्याचे अनुसरण केले आहे. ह्यावरून असे म्हणता येते की, शास्त्रकारकृत गुणदोषचर्चेत एक प्रकारची एकरूपता आहे.

एकंदरीने प्राचीन भारतीय शास्त्रकारांनी शास्त्रीय ग्रंथांच्या निर्मितीच्या शास्त्राची किंवा पद्धतीची कल्पना निश्चितपणे केली होती. त्या पद्धतीचा तपशील विचारपूर्वक ठरविलेला असून तो व्यापक होता. त्यामध्ये जे घटक अन्तर्भूत होते त्यांत

शास्त्रीय ग्रंथाचे गुण व दोष ह्यांना प्रमुख स्थान होते. ह्या दोन घटकांचा शास्त्रकारकृत विचार सूक्ष्म, सर्वांगीण, परिपूर्ण व सार्वकालिक असाच होता. प्राचीनांनी हा गुणदोषविवेक करूनच आपले ग्रंथ लिहिले, त्यामुळेच ते ग्रंथ पद्धतशीर व रेखीव असे उतरले आणि आजही विचारणीय वाटतात.

## संदर्भ टीपा

1. ( i ) अयोध्या, कांची, काशी, कुंडिनपूर, गुणशीला, तक्षशिला, नालंदा इत्यादी ठिकाणच्या विद्यापीठांत अनेक शास्त्रे, विद्या व कला ह्यांच्या अध्ययनाची, अध्यापनाची, संशोधनाची व ग्रंथलेखनाची हजार-हजार वर्षांची दीर्घकालीन परंपरा होती, ही सत्यस्थिती अभ्यासकांना ठाऊकच आहे.

( ii ) तक्षशिला येथील शास्त्रोपासनेविषयी **रॉलिन्सन** म्हणतो :

"Taxila was of special interest for the scientists in Alexander's train, as being one of the leading seats of Hindu learning, where crowds of pupils, sons of princes and wealthy brāhmans resorted to study 'the three vedas and eighteen accomplishments." - H. G. Rawlinson, 'Early Contacts between India & Europe', *A Cultural History of India*, ed., A. L. Basham, Oxford, Clarendon Press, 1975, p. 430.

या विद्यापीठात सर्व विद्यांचे तात्त्विक व प्रात्यक्षिक असे उभयविध शिक्षण देण्यात येत असे.

(iii) अयोध्या येथील विद्यापीठात पुरुषांना 72 व स्त्रियांना 64 विद्या शिकविण्याची व्यवस्था होती. [ पाहा-- **मराठी विश्वकोश** खंड 1, प्रमुख संपा. लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रथम, मुंबई, म. रा. सा-सं. मंडळ, 1976, पृ. 438. ]

(iv) प्राचीन भारतीय गुरुशिष्यपरंपरेच्या गुणदोषांविषयी **विण्टर** म्हणतो :

"In both ancient and medieval times the native master-pupil relationship had its triumphs and its failures; on the one hand 'schools' would merely perpetuate traditional methods or simply die away, on the other the torch of learning would be kindled anew by the genius of some isolated guru."—Winter, 'Science,' *A Cultural History of India*, cited above, pp. 160-61.

2. नालंदा विद्यापीठाच्या ग्रंथालयाला धर्मगंज असे नाव असून त्याच्या तीन

इमारती होत्या. त्यांत शेकडो ग्रंथांचा संग्रह करण्यात आला होता. [ पाहा– **भारतीय संस्कृति कोश** पाचवा खंड, संपा. महादेवशास्त्री जोशी व इतर, **प्रथम,** पुणे, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, 1968, पृ. 78. ]

3. ( i ) **खिस्तपूर्व** दुसऱ्या शतकापासून **खिस्तोत्तर** काही शतकांपर्यंत झालेल्या शास्त्रीय ग्रंथांच्या निर्मितीसंबंधी **टी. बरो** ( T. Burrow ) म्हणतो : "After this time [ i. e. after second century B. C. ], and particularly during the early centuries of the Christian era, a great corpus of technical scientific literature, covering the fields of philosophy, medicine, politics, and administration, etc., came into existence."—T. Burrow, 'Ancient and Modern Languages', *A Cultural History of India,* cited above, p. 163.

(ii) ह्या प्राचीन ग्रंथांचे सम्यक अनुशीलन करून आधुनिक भारतीयांनी त्यांचे स्वरूप व महत्त्व वर्णन करणारे पुढीलसारखे ग्रंथ सिद्ध केले : *The Positive Sciences of the Ancient Hindus* ( B. N. Seal ); *History of Indian Medicine* ( G. Mukhopadhyaya ); *Physics in Ancient India* ( N. G. Dongre ); *Geometry in Ancient and Medieval India* ( T. A. Sarasvati Amma ); *Yantras or Mechanical Contrivances in Ancient India* ( V. Raghavan ); *Aspects of Ancient Indian Technology* ( H. C. Bharadwaj ); *Founders of Sciences in Ancient India Parts I & II* ( Swami Satya Prakash Sarasvati ) इत्यादी.

4. प्राचीन शास्त्रांवरील ग्रंथसंपत्तीचे केवळ ओझरते दर्शन **श्री. भि. वेलणकर** यांनी **'प्राचीन भारतीय भौतिक विज्ञान'** ( पहिली, मुंबई, केशव भिकाजी ढवळे, 15 ऑक्टोबर 1985 ) ग्रंथाच्या परिशिष्ट 4 पृ. 140-41 वर घडवले आहे, ते जिज्ञासूंनी पाहावे.

5. C. K. Raja, *Survey of Sanskrit Literature,* First, Bombay, Vidya Bhavan, 1962, pp. 281-83.

6. तन्त्रान्तरसाधितम्, स्मृतितन्त्रम्, अलङ्कारतन्त्रम्, नानातन्त्रज्ञानम्, तन्त्राधिकरणम्, सर्वतन्त्रसिद्धान्तः, प्रतितन्त्रसिद्धान्तः, इत्यादी 'तन्त्र'-युक्त अनेक शब्द संस्कृत ग्रंथांत वापरलेले आढळून येतात, आणि त्यांपैकी प्रत्येकातील 'तन्त्र' शब्दाचा अर्थ शास्त्र असाच असतो, ही वस्तुस्थिती अभ्यासकांच्या परिचयाची आहे.

7. 'युक्तिशब्दः खलूपायवाची ।'
**तन्त्रयुक्तिः**, कोट्टायम, वैद्यसारथि प्रेस, 1949, प्रस्तावना पृ. 1
8. *India as Known to Panini*, Lucknow, University of Lucknow, 1953, pp. 309-10
9. नीलमेघ, तन्त्रयुक्तिविचारः [ **नीलयुक्ति** ] संपा., एन्. ई. मुत्तुस्वामि, द्वितीय, त्रिवेंद्रम, केरलदेशप्रशासन, 1976. Appendix, p. XIII
10. तत्रैव, Appendix, p. XV
11. तत्रैव, Appendix, pp XXVII-XX
12. तत्रैव, Appendix, pp. XXI-XXIII
13. पाहा: म. दा. साठे, **पाणिनि व पाणिनीय व्याकरण-संप्रदाय**, प्रथम, पुणे, जोशी-लोखंडे प्रकाशन, 1962, पृ. 166
14. G. Oberhammer, 'Notes on the Tantrayuktis', ब्रह्मविद्या, Dr. V. Raghavan Felicitation Volume, Vols. 31-32, Adyar, Theosophical Society, 1967-68, p. 605
15. **नीलयुक्ति**, Appendix, pp. XXIII-XXV
16. ह्यांपैकी काही दोष काव्यशास्त्रकारांनी विवेचिलेल्या दोषांसारखेच आहेत. उदाहरणार्थ, अप्रसिद्धशब्द, असुखारोही, विरुद्ध, भिन्नक्रम, सन्दिग्ध, पुनरुक्त, असमाप्तार्थ, अपार्थक व व्याहत.
17. **नीलयुक्ति** p. xii, footnote 32
18. 'पुरातनतत्त्वस्मर्ता, अतीन्द्रियार्थदर्शीति ऋषिः ।'
**सर्वतन्त्रसिद्धान्तपदार्थलक्षणसंग्रहः**, संग्राहक, भिक्षुगौरीशङ्कर, षष्ठ, काशी, संग्राहक, संवत् 2006 पृ. 61
19. परममित्र शास्त्री, **'सूत्रशैली और अपभ्रंश व्याकरण'**, प्रथम, काशी, नागरी प्रचारिणी सभा, संवत् 2024, आमुख पृ 1
20. पाहा: *India as Known to Panini*, cited above, p. 305
21. पाहा: **पाणिनि व पाणिनीय व्याकरण-संप्रदाय**, उ. नि., पृ. 111-113.
22. 'सूत्रार्थो वर्ण्यते यत्र पदैः सूत्रानुसारिभिः ।
स्वपदानि च वर्ण्यन्ते भाष्यं भाष्यविदो विदुः ॥'
**सर्वतन्त्रसिद्धान्तपदार्थलक्षणसंग्रह**, पूर्वोक्त, पृ. 151
23. डॉ. एस्. एन्. दासगुप्तांच्या मते सूत्रे ही प्रायः व्याख्यानाची टिपणे असावीत व त्यांचे विशदीकरण व्याख्यात्याकडून व्याख्यानाच्या ओघात अपेक्षित असावे. पाहा: S. N. Das Gupta, 'Philosophy', *A Cultural History of India*, cited above, p. 119.

24. 'पतनप्रतिबन्धकः ।'–सर्वतन्त्रसिद्धान्तपदार्थलक्षणसंग्रह, पृ. 42
25. 'प्रकृतार्थानुकूला युक्तिः ।····प्रकरणप्रतिपाद्यस्य दृष्टान्तैः प्रतिपादनम् ।'–तत्रैव पृ. 55
26. कोणत्याही शब्दाच्या वाच्य अर्थाचे ग्रहण 'अमुक शब्दापासून अमुक अर्थ घ्यावा' अशा संकेतग्रहणाने होते. शास्त्रकार जे पारिभाषिक शब्द बनवतात त्यांच्या अर्थाविषयीचा संकेत शास्त्रकारांच्या इच्छेवर अवलंबून असतो. ह्याला आधुनिक संकेत म्हणतात. ह्याच्या द्वारे फक्त पारिभाषिक शब्दांच्या अर्थांचे ग्रहण होते, म्हणून याचा प्रयोगही कधीमधीच होत असतो. म्हणजे सर्रास होत नाही तर फक्त शास्त्रव्यवहारात होतो. ह्याबाबतीत भर्तृहरी आपल्या **वाक्यपदीयात** म्हणतो: 'कादाचित्कस्तु आधुनिकः शास्त्रकारादिभिः कृतः ।'–पाहा: **अर्थविज्ञान,** कमलाकान्त मिश्र, प्रथम, दिल्ली, नाग प्रकाशक, 1988 पृ. 86-87.
27. **सर्वतन्त्रसिद्धान्तपदार्थलक्षणसंग्रह,** उ. नि., पृ. 203.
28. 'Notes on the Tantrayuktis', cited above, p. 614
29. **नीलयुक्ति,** उ. नि. Appendix पृ. XXIII
30. तत्रैव, Appendix पृ. XXIV
31. तत्रैव
32. तत्रैव
33. तत्रैव
34. तत्रैव
35. तत्रैव
36. तत्रैव
37. तत्रैव.
38. तत्रैव
39. तत्रैव
40. तत्रैव
41. वाग्भट, **अष्टाङ्गहृदयम्,** संपा. अ. मो. कुंटे, परिष्कर्ता कृ. रा. नवरे, पंचम संस्करण, मुंबई, निर्णयसागर मुद्रणालय, 1925, पृ. 586.
42. **नीलयुक्ति,** उ. नि., Appendix पृ. XXV

●

# 7. शास्त्रीय ग्रन्थरचनेचे मुख्य उपाय

[ तंत्रयुक्त्या व व्याख्या ]

## (1) विवेचनाची अंगीकृत पद्धत

प्राचीन भारतीय विचारवंतांनी तत्त्वचर्चात्मक शास्त्रीय ग्रन्थांच्या रचनेची व्यापक व सर्वांगस्पर्शी पद्धत निश्चित केली होती व तीत तंत्रयुक्त्या, व्याख्या, कल्पना, आश्रय, ताच्छील्ये, गुण व दोष एवढ्या घटकांचा समावेश केला होता, हे ह्या अगोदरच्या निबंधात विस्ताराने विशद केले आहे. ह्या घटकांत सर्वप्रथम तंत्रयुक्त्यांचा उल्लेख झाला आहे; त्यांची संख्याही एकूणचाळीस ( इतर छटा वगळून ) म्हणजेच खूप मोठी आहे. ह्यावरून प्राचीन विद्वानांच्या मतेही हा तंत्रोपाय सर्वाधिक महत्त्वाचा ठरतो. त्याचाच साक्षात प्रयोग काव्यशास्त्रकारांनी आपापल्या ग्रन्थांत केला होता काय व असल्यास त्याचे स्वरूप कसे होते ते विस्ताराने व उदाहरणांसह समजून घेणे हे ह्या निबंधाचे उद्दिष्ट आहे. मात्र निबंधाचा अफाट विस्तार होऊ नये म्हणून जरी तंत्रयुक्त्यांचा परामर्श कौटिल्य, चरक, सुश्रुत, वाग्भट, विष्णुधर्मोत्तरपुराणकार, नीलमेघ व त्याचा अज्ञातनाम शिष्य हे मूळ ग्रन्थकार आणि चरकाचा टीकाकार चक्रपाणिदत्त, सुश्रुताचा टीकाकार डल्हण, अष्टांगसंग्रहाचा टीकाकार इन्दू व अष्टांगहृदयाचा टीकाकार अरुणदत्त ह्या सर्वांनी केलेला असला तरी फक्त अरुणदत्ताने केलेल्या तंत्रयुक्त्यांच्या व्याख्या ह्यापुढील विवेचनात उद्धृत करावयाच्या व इतरांनी केलेल्या व्याख्यांचे अर्थ सारांशाने दाखल करावयाचे असे धोरण बाळगण्याचे ठरविले आहे. ह्यायोगे निबंधाचा विस्तार होणार नाही आणि शिवाय निरनिराळ्या शास्त्रकारांनी केलेल्या व्याख्यांच्या अर्थच्छटांतील भेदांशीही वाचकांचा परिचय होईल. हे विवेचन करताना अरुणदत्ताने स्वतंत्रपणे चर्चिलेल्या पदव्याख्या, पदार्थव्याख्या इत्यादी पंधरा व्याख्यांपैकी कोणती व्याख्या कोणत्या तंत्रयुक्तीमुळे गतार्थ होते, तेही दाखवून देण्यात येईल. अरुणदत्ताने तंत्रयुक्त्यांचे स्पष्टीकरण करताना आयुर्वेदावरील ग्रन्थांतील उदाहरणे उद्धृत केली आहेत. काव्यशास्त्रकारांनीही तंत्रयुक्त्यांचा अवलंब करूनच आपले ग्रन्थ सिद्ध केले होते हे निःसंदिग्धपणे स्थापित करणे हे प्रस्तुत निबंधाचे उद्दिष्ट असल्यामुळे ह्यापुढील विवेचनात काव्यशास्त्रीय ग्रन्थांतील उदाहरणे उद्धृत केली जातील. हे समस्त विवेचन तंत्रयुक्त्यांच्या संज्ञांच्या अकारानुक्रमाने केले जाईल. तदनुसार आता अतिक्रान्तावेक्षण ह्या तंत्रयुक्तीची चर्चा करू.

**(2) अतिक्रान्तावेक्षण** [ = पूर्वी केलेल्या विधानाचा उल्लेख / विचार ]

**संज्ञान्तरे :** अतीतावेक्षा [ चरक ], अतीतापेक्षा [ इन्दू, नीलमेघ व त्याचा शिष्य ], अतीतापेक्षण [ अरुणदत्त ]

**लक्षण :** 'यदतिक्रान्तमपेक्ष्य प्रस्तुतस्य साधनमुच्यते ।'[1]

**अर्थ :** पूर्वी केलेल्या विधानाला प्रस्तुत विषयाच्या सिद्धीचे साधन बनवणे.

**इतर अर्थच्छटा :** ( 1 ) पूर्वी विस्ताराने विवेचिलेल्या विषयाकडे अंगुलिनिर्देश करणे; ( 2 ) पूर्वी असे म्हटले आहे, असा उल्लेख करणे.

**प्रकार्ये :** ( 1 ) व्यापक शास्त्रीय विषयाच्या विविध उपविषयांचे परस्परसंबंध प्रस्थापित करणे, ( 2 ) समान व सजातीय विषयांच्या चर्चेची पुनरावृत्ती टाळणे, ( 3 ) मागची-पुढची विधाने जोडून-जुळवून ग्रन्थार्थ लावण्याची सोय वाचकाला / अभ्यासकाला उपलब्ध करून देणे.

**उदाहरणे :** ( i ) 'अवहितं हि चित्तमर्थान्पश्यति ( 1.3.17 ) इत्युक्तं प्राक् ।'[2]

अर्थात, सावध वा दक्ष चित्ताला कल्पना-विचारादींचे दर्शन [ ज्ञान, आकलन ] होते हे पूर्वी 'चित्तैकाग्र्यमवधानम्'[3] ह्या सूत्राच्या स्पष्टीकरणप्रसंगी म्हटलेच आहे.

वामनाने वरील उद्गार 'समाधि'[4] अर्थगुणाच्या विवरणात काढले असून त्या सूत्राच्या अर्थाची सिद्धी पूर्वोक्त सूत्राच्या साहाय्याने केली आहे.

( ii ) 'तत्राद्यस्योदाहरणं प्राक् प्रदर्शितमेव ।'[5]

अर्थात—[ व्यतिरेकध्वनीच्या दोन प्रकारांपैकी ] पहिल्या प्रकाराचे [ म्हणजे शब्दशक्तिमूल व्यतिरेकध्वनीचे ] उदाहरण पूर्वी [ म्हणजे 'एवंविधो व्यतिरेकोऽपि दृश्यते'[6] ह्या प्रस्तावनेनंतर ] दाखविलेच आहे [ म्हणून त्याची पुनरुक्ती टाळली आहे. जिज्ञासूंनी ते पूर्वोक्त उदाहरण अवलोकावे, हा ध्वन्यालोककारांच्या म्हणण्याचा आशय ].

ह्यावरून काव्यशास्त्रकारही ह्या तंत्रयुक्तीचा अवलंब करीत असत हे स्पष्ट होईल.

**(3) अतिदेश** [ = एका विषयाच्या निरूपणाचा संबंध दुसऱ्या विषयाशी जोडणे किंवा एका विषयाचे निरूपण दुसऱ्या विषयाला लागू करणे ].

**लक्षण :** 'यत् किञ्चिदेवार्थजातमुक्त्वाऽनुक्तार्थसाधनाय एवमन्यदपि प्रत्येतव्यमिति परिभाषायां स्थापयति ।'[7]

**अर्थ :** एखाद्या विषयाचे निरूपण करून अनुक्त विषयाच्या सिद्धीसाठी 'ह्याच पद्धतीने अनुक्त विषय समजून घ्यावा', असे म्हणणे.

**इतर छटा :** ( 1 ) पूर्वोक्ताच्या द्वारे अनुक्ताची सिद्धी करणे, ( 2 ) पूर्वोक्त विषयाशी निगडित नियम दुसऱ्या विषयाला लागू करणे, ( 3 ) एकाच्या गुणधर्मांचा संबंध दुसऱ्याशी प्रस्थापित करणे.

**प्रकार्ये :** ( 1 ) शास्त्रकाराला समग्र ग्रंथाची रूपरेषा निश्चित करून तीत विविध

विषयांचे स्थान ठरवावे लागते, ( 2 ) शास्त्रीय विषयाच्या नियमांची सुसंबद्ध शृंखला सिद्ध होते, ( 3 ) अनुक्त विषयांच्या सिद्धीचे वाचकाला मार्गदर्शन करणे, ( 4 ) विविध विषयांचा संदर्भ ध्यानात ठेवून ग्रंथ वाचण्यास वाचकाला भाग पाडणे.

**उदाहरणे** : ( i ) दण्डीने आपल्या काव्यलक्षणम् ग्रंथात 'विशेषोक्ती' अलंकाराचे विवेचन संपविताना खालील कारिका लिहिली आहे :

**"सैषा हेतुविशेषोक्तिस्तेजस्वीति विशेषणात् । अयमेव क्रमोऽन्येषां भेदानामपि कल्पने ।।**[8]

अर्थात् [ ह्यापूर्वीच्या एकचक्रो....इत्यादी पद्यात ] तेजस्वी हे विशेषण वापरलेले असल्यामुळे त्या पद्यात हेतु-विशेषोक्ती नावाचा अलंकार झाला आहे. ह्याच न्यायाने विशेषोक्तीच्या इतर प्रकारोपप्रकारांची कल्पना [ वाचकांनी, कवींनी किंवा समीक्षकांनी ] करावी.

दण्डीने विशेषोक्तीच्या पाच भेदांची उदाहरणे देऊन झाल्यावर ह्या विषयाचा वरील कारिकेत समारोप केला आहे. त्याने विशेषोक्ती अलंकार शोधून काढण्याचा क्रम किंवा मार्ग वाचकांना दाखवून दिला आहे आणि असे उपदेशिले आहे की, काव्यनाटकादी ग्रंथ वाचताना ह्याच प्रकारचा रचनाविन्यास आढळला की, तेथे विशेषोक्ती अलंकार आहे अशी कल्पना करावी किंवा स्वत.च्या ठायी कवित्वशक्ती असल्यास तशी सालंकृत पद्ये स्वतः रचावीत. तसेच काव्यादी वाचत असताना आढळलेल्या वा स्वतः रचलेल्या पद्यांना त्यांतील वैशिष्ट्यांस धरून [ उदाहरणार्थ, जसे हेतुविशेषोक्ती हे नाव आहे तशी ] नावे द्यावीत. असे केल्याने वाचकांच्या शोधक वा कल्पक बुद्धीला वाव मिळतो, त्यांच्या ठायी बौद्धिक मान्द्य किंवा औदासीन्य उत्पन्न होत नाही व शास्त्र जिवंत राहून त्याची वाढ होते.

उपर्युद्धृत श्लोकावरील रत्नश्रीज्ञानाची टीका वर केलेल्या विवेचनाला पुष्टी देणारी आहे. तो लिहितोः **'इमामवान्तरभेदविकल्पनादिशमतिदिशन्नाह—अयमित्यादि ।'**[9] त्याने ह्या विवरणवाक्यात अतिदिशन् हा शब्द स्पष्टपणे वापरलाच आहे व त्यानंतर अविरुद्धक्रियाविशेषोक्तिः, विरुद्धक्रियाविशेषोक्तिः व चाटुविशेषोक्तिः[10] ह्या तीन प्रकारच्या विशेषोक्तीची कल्पना करून, त्यांची उदाहरणे सादर केली आहेत व अशा प्रकारे दण्डीच्या शास्त्रीय विवेचनात भर घातली आहे. आता वामनाच्या ग्रंथाकडे वळू.

( ii ) अश्लीलपददोष व क्लिष्टपददोष ह्यांची चर्चा संपवल्यावर वामन पुढीलप्रमाणे एक सूत्र रचतोः **'अन्त्याभ्यां वाक्यं व्याख्यातम् ।।22।।'**[11] अर्थात ज्याप्रमाणे पद ( सैल भाषेत 'शब्द' ) अश्लील व क्लिष्ट असते त्याप्रमाणेच वाक्यही अश्लील व क्लिष्ट असते. म्हणून तेही दुष्ट ( =दोषयुक्त ) समजून वर्ज्य करावे. अश्लील व क्लिष्ट पददोषांची चर्चा नीटपणे समजून घ्यावी व ती [ म्हणजे प्रस्तुत विषयाची जी चर्चा नुकतीच संपवली आहे ती ] चर्चा अश्लील व क्लिष्ट वाक्यदोषालाही लागू

करावी. हे कार्य वामनाने आपल्या सुबुद्ध वाचकांवर सोपविले आहे [ अर्थात सूत्रकार वामनाने अपुरे ठेवलेले हे कार्य वृत्तिकार वामनाने जणू विचक्षण वाचकाची भूमिका घेऊन पुरे केले आहे. ] आणि पददोषाच्या विवेचनाच्या द्वारे वाक्यदोषाचे विवेचन झाल्यात जमा आहे असे म्हणून प्रस्तुत विषयाचा निरोप घेतला आहे. ह्या पद्धतीमुळे मूळ ग्रंथकाराचे श्रम वाचतात व वाचलेल्या तात्त्विक चर्चेचे उपयोजन करण्याची प्रेरणा वाचकांना मिळते. तिचा एकूण शास्त्रव्यवहाराला लाभ होतो. वामनाच्याच ग्रंथातील आणखी एक उदाहरण पाहू. वर्णयमकांचे विस्तृत विवेचन संपवल्यावर वामनाने **"अनया च वर्णयमकमालया पदयमकमाला व्याख्याता ।"**[12] असा अतिदेश केला आहे. वाचकांनी वर्णयमकाचे निरूपण समजून घ्यावे व त्याच पद्धतीने पादयमक, एकपादादिमध्यान्तयमक, पादयोरादिमध्यान्तयमक, एकान्तरपादान्तयमक, एकान्तरपादादिमध्ययमक, आणि समस्तपादादिमध्यान्तयमक यांची पदनिष्ठ उदाहरणे काव्यादींतून शोधून काढावीत किंवा स्वतः कल्पून रचावीत. म्हणजेच वाचकांनी वामनाच्या ग्रंथाला स्वपरिश्रमाने अशी पुरवणी जोडून शास्त्राची अभिवृद्धी साधावयाची आहे. वामनाच्या ग्रंथातील आणखी एक उदाहरण अवलोकनीय आहे. उपमा-दोषांच्या चर्चेच्या ओघात उपमाहीनत्व दोषाचे निरूपण करून झाल्यावर वामन म्हणतो: **"तेनाधिकत्वं व्याख्यातम"** ।[13] अर्थात जसे हीनत्वदोषाचे जाती, प्रमाण व धर्म असे स्वरूपभेद आढळून येतात तसेच ते अधिकत्वाचेही आहेत असे समजावे. वामनाने ह्या सूत्रावरील वृत्तीत वरील तिन्ही स्वरूपांची उदाहरणे देऊन मुद्दा पूर्णपणे विशद केला आहे.

एतावता ह्या युक्तीच्या द्वारे शास्त्रकाराला विवेच्य विषयाचे विविध पैलू व त्यांच्या विवेचनाची स्थाने निश्चित करता येतात, विवेचनाचा विस्तार टाळता येतो, वाचकाच्या कल्पकतेला व बुद्धीला वाव देता येतो, शास्त्रचर्चेत वाचकाला सक्रियपणे सहभागी करून घेता येते आणि त्यायोगे स्वतः जाणूनबुजून अपूर्ण ठेवलेला शास्त्रांश वाचकांना कल्पावयास लावून शास्त्राची प्रगती साधता येते.

### (4) अधिकरण [ =विवेच्य वा प्रतिपाद्य विषय; आधार ]

**लक्षण:** 'यदधिकृत्य प्रवर्तते शास्त्रं स्थानमध्यायः प्रकरणं वाक्यं वा ।'[14]

**अर्थ:** ज्या विषयाला/विषयांशाला अनुलक्षून शास्त्र ( शास्त्रीय ग्रंथ ), त्याचे स्थान ( त्याचा एक भाग ), अध्याय, प्रकरण, अथवा वाक्य यांचे प्रवर्तन अर्थात लेखन झालेले असते, त्याला अधिकरण म्हणतात. [ येथे अरुणदत्ताने वापरलेला **स्थान** शब्द ग्रंथविभागाचा वाचक आहे. चरकसंहितेची सूत्र, निदान, बिमान इत्यादी आठ स्थाने आहेत. त्या-त्या स्थानात तो-तो विषय निरूपिलेला आहे. ]

**इतर छटा:** (1) विषयाचा मुख्य आधार, (2) सर्वसाधारण संज्ञेला विशेष अर्थ प्रदान करणे.

**प्रकार्ये:** (1) प्रतिपाद्याचा तत्काळ खुलासा करणे, (2) ग्रंथाचा व्यापक विषय कोणत्या व किती घटकांत विभागलेला आहे ते स्पष्ट करणे, (3) ग्रंथातील विषयांतरांची स्थळे नेमकेपणाने दाखवणे, (4) संज्ञांच्या साधारण व विशेष अर्थांचा बोध करवणे व (5) लेखनामागील हेतू वाचकाला कळवणे.

**उदाहरणे:** ( i ) **'अथातः काव्यं व्याख्यास्यामः ।'**[15] गुलाबराव महाराज ग्रंथारंभीच, ह्या सूत्रात, आपल्या ग्रंथाचा प्रतिपाद्य विषय 'काव्य' हा आहे, हे सुचवतात.

( ii ) राजशेखरानेही आपल्या ग्रंथाची सुरुवात **'अथातः काव्यं मीमांसिष्यामहे' ।**[16] ह्या शब्दांत करून काव्याची मीमांसा=विचारपूर्वक तत्त्वनिर्णय करणे[17] हा आपल्या ग्रंथाचा विवेच्य विषय असल्याचे सांगितले आहे. त्याने आपल्या ग्रंथाच्या अध्यायांना शास्त्रसंग्रह, शास्त्रनिर्देश, काव्यपुरुषोत्पत्तिः इत्यादी नावे देऊन त्यांच्या द्वारे त्या-त्या अध्यायांतील प्रतिपाद्य विषय सुचवले आहेत.

( iii ) वामनाने आपल्या 'काव्यालंकारसूत्राणि' नामक ग्रंथाची पाच अधिकरणे कल्पिली असून त्यांना क्रमशः शारीरं, दोषदर्शनं, गुणविवेचनं, आलंकारिकं व प्रायोगिकं अशी तत्तद्विषयबोधक नावे दिली आहेत.[18]

( iv ) वामनाच्या मतानुसार प्रतिभा हा 'प्रकीर्ण' नामक काव्यांगाचा पहिला[19] घटक आहे. प्रतिभा म्हणजे काव्यनिर्मितिक्षम बौद्धिक शक्ती. परंतु, वामन प्रतिभा हा शब्द ह्या रूढ वा प्रसिद्ध सामान्य अर्थी न वापरता तो प्रतिभा म्हणजे 'कवित्वबीज' अशा वैशिष्टचपूर्ण अर्थाने वापरतो. [ कवित्वबीजं प्रतिभानम् ॥16॥[20] ] अर्थात वामनाने प्रतिभा शब्दाच्या बाबतीत 'अधिकरणा'ची वर दाखल केलेली दुसरी छटा प्रदर्शित केली आहे.

शास्त्रीय ग्रंथकाराला ह्या शास्त्रोपायाचा अवलंब वाक्याच्या पातळीपासून तो समस्त ग्रंथाच्या पातळीपर्यंत करावा लागत असल्यामुळे हा अतिशय व्यापक उपाय आहे. ह्याचे ज्ञान शास्त्रकार व शास्त्राभ्यासक ह्या दोघांनाही आवश्यक आहे.

अधिकरणव्याख्या [ जिचे लक्षण असे आहे : 'यद्वस्तुक्रतमारभ्य तदनुषङ्गेण व्याख्यानमारभ्यते ।'[21] ] आणि पिण्डव्याख्या [ जिचे लक्षण असे आहे : 'सङ्क्षेपतया सूत्ररूपेणाध्यायादीनां व्याख्या ।'[22] ] ह्या स्वरूपतः प्रस्तुतच्या अधिकरण तंत्रयुक्तीसारख्याच असल्यामुळे हिच्या योगे गतार्थ होतात.

### (5) अनागतावेक्षण [ =नंतर/पुढे विवेचिल्या जाणाऱ्या विषयाचा उल्लेख ]

**संज्ञान्तरे :** अनागतावेक्षा [चरक], अनागतापेक्षा [वाग्भट]. परंतु अनागतावेक्षण हीच जास्त प्रचलित संज्ञा आहे. ही तंत्रयुक्ती अतिक्रान्तावेक्षणाच्या विरुद्ध आहे.

**लक्षण :** अरुणदत्ताच्या टीकेत हिचे लक्षण मिळत नाही. तंत्रयुक्त्यांचा परामर्श घेणारा प्राचीनतम शास्त्रकार जो कौटिल्य त्याच्या ग्रंथातील लक्षण असे : **'पश्चादेवं विहितमित्यनागतावेक्षणम् ।'**[23]

**अर्थ :** पुढे ( ग्रंथाच्या ह्यानंतरच्या भागात ) असे म्हटले आहे, असे विधान करणे.

**इतर छटा :** ( 1 ) उत्तरकालीन विषयाकडे केवळ अंगुलिनिर्देश करणे, ( 2 ) प्रस्तुतचा व नंतरचा विषय यांतील अन्योन्यसंबंध दर्शवणे, ( 3 ) पुढे प्रतिपादावयाचा नियम विश्वसनीय मानून प्रस्तुतचा विषय सिद्ध करणे.

**प्रकार्ये :** ( 1 ) चालू चर्चेय विषयाचे विवेचन, मध्येच खंडित करावे न लागता, पूर्ण करता येते, ( 2 ) ग्रंथात पुढे प्रतिपादावयाच्या विषयाची पूर्वकल्पना वाचकाला देऊन ठेवता येते, ( 3 ) शास्त्रीय ग्रंथातील संभाव्य विस्कळितपणा टाळता येतो व ( 4 ) विवेच्य विषयाशी संबद्ध विषयाची ओळख करून देता येते.

**उदाहरणे :** ( i ) खाली उद्धृत केलेल्या वचनात आनन्दवर्धन म्हणतो की, वाच्यार्थाहून वेगळा असलेला जो अलंकारध्वनी त्याचे विवेचन आपण विस्ताराने मागाहून करू :

**'द्वितीयोऽपि प्रभेदो वाच्याद्विभिन्नः सप्रपञ्चमग्रे दर्शयिष्यते ।'**[24]

( ii ) आपल्या ग्रंथाच्या नंतरच्या भागात केल्या जाणाऱ्या चर्चेचा हवाला त्याने 'ततोऽन्यच्चित्रमेवेत्यग्रे दर्शयिष्यामः ।',[25] 'अलङ्कारा गुणा वृत्तयश्चेति प्रतिपादयिष्यन्ते ।',[26] 'वाच्यप्राधान्ये तु प्रकारान्तरं निर्देक्ष्यते ।'[27] इत्यादी वचनांतही दिला आहे.

( iii ) वामनाने दोषविवेचनप्रसंगी इतर सूक्ष्म शब्दार्थदोषांचे विवेचन आपण गुणविवेचनाच्या वेळी करू आणि उपमादोषांचा विचार उपमाविवेचनात करू असे आश्वासन पुढील शब्दांत दिले आहे : 'ये त्वन्ये शब्दार्थदोषाः सूक्ष्मास्ते गुणविवेचन एवोच्यन्ते उपमादोषाश्चोपमाविचार इति ।'[28] वामनाचे हे वचन महत्त्वाचे आहे. कारण ह्यात वामनाने ओजस्, श्लेष, समता, माधुर्य, सौकुमार्य, उदारता, अर्थव्यक्ती, कान्ती व शुद्धप्रसाद ह्या शब्दार्थगुणांच्या विपर्ययांचा अस्फुट निर्देश केला आहे, तो वाचकांनी नीटपणे समजून घ्यावयाचा आहे.

( iv ) राजशेखरानेही पुढीलसारख्या उक्तींत ह्या युक्तीचा अवलंब केलेला आढळतो: 'अलङ्कारव्याख्यानं तु पुरस्तात् ।',[29] 'आन्वीक्षिकीं तु विद्यावसरे वक्ष्यामः ।',[30] 'वृत्तिरीतिस्वरूपं यथावसरं वक्ष्यामः ।',[31] 'तं यदि सारस्वतोऽनुभावः प्रसादयति तमौपनिषदिके वक्ष्यामः ।।'[32]

ह्यावरून प्राचीन काव्यशास्त्रकारांना ह्या शास्त्रोपायाची शक्ती व उपयुक्तता ठाऊक होती व त्यांनी ह्या उपायाचा कौशल्याने व उद्देशपूर्तिपूर्वक प्रयोग केला होता, हे प्रतीत होते. पूर्वोक्त अतिदेशाप्रमाणेच हा उपायही अपूर्ण शास्त्रग्रंथाला पूरक ठरतो.

**(6) अनुमत** [ =संमती, रुकार ] दुसऱ्याच्या मताचे अनुमोदन करणे.

**लक्षण :** अरुणदत्ताने लक्षण न करता उदाहरण मात्र दिले आहे. म्हणून कौटल्याचे लक्षण उतरून घेऊ. ते असे : **'परवाक्यमप्रतिषिद्धमनुमतम् ।'**[33]

**अर्थ :** दुसऱ्या शास्त्रकाराच्या विधानाचा निषेध न करणे [ म्हणजेच त्याला मूक संमती दर्शवणे किंवा त्याचे मूक अनुमोदन करणे ] म्हणजे अनुमत.

**इतर छटा :** ( 1 ) इतरांच्या मतांचे खंडन न करता त्यांचा स्वीकार करणे, ( 2 ) इतरांच्या मतांचे खंडन करून आपले मत प्रस्थापित करणे. [ हा अर्थ फक्त नीलमेघाने घेतला आहे ].

**प्रकार्ये :** ( 1 ) इतर शास्त्रकारांच्या मतांचे आकलनपूर्वक उद्धरण करणे, ( 2 ) एखाद्या विषयाच्या मतमतांतरांचे ज्ञान वाचकाला करून देणे, ( 3 ) एखाद्या विषया-बद्दलच्या विवाद्य मतांचा कालानुक्रमी विकास उपलब्ध करून देणे, ( 4 ) दृष्टिकोणा-च्या ग्राह्याग्राह्यतेचे ज्ञान वाचकाला करून देणे.

**उदाहरणे :** (i) भामह श्रुतिकष्ट ( कर्णकटू ) दोषाच्या चर्चाप्रसंगी मतांतराचा उल्लेख **'न तदिच्छन्ति कृतिनो गण्डमप्यपरे किल ।'**[34] [ अर्थात, काही विद्वान 'गण्ड' शब्दही पसंत करीत नाहीत, म्हणजेच तोही श्रुतिकष्ट मानतात ] ह्या शब्दांत केला आहे त्यानेच काही शास्त्रकार स्वभावोक्ती हा अलंकार मानतात [ 'स्वभावोक्तिर-लङ्कार इति केचित्प्रचक्षते ।' ],[35] असे इतरांचे मत नोंदवले आहे.

(ii) केशवमिश्रानेही ह्या उपायाचा अवलंब पुढीलसारख्या वचनांत केला आहे : 'व्यतिरेकालङ्कारस्त्वतिरिच्यते इत्येके ।',[36] '....आक्षेपः । सोऽपि पृथगित्यपरे ।'[37]

(iii) राजशेखराने आपल्या ग्रंथात मतमतांतरे वैपुल्याने उद्धृत केली आहेत. त्यांपैकी काही अशी : 'वेदोपवेदात्मा सार्ववर्णिकः पञ्चमो गेयवेदः' इति द्रौहिणिः ।',[38] 'पुराणप्रविभेद एवेतिहासः' इत्येके ।,[39] "नहि प्रकृतिमधुरा द्राक्षा फाणितसंस्कारमपेक्षते' इत्याचार्याः । 'न' इति यायावरीयः। एकार्थं हि क्रियाद्वयं द्वैगुण्याय सम्पद्यते ।"[40]. ह्या शेवटच्या उदाहरणात राजशेखराने परमतखंडन व स्वमतमंडन दोन्ही केले आहे.

तात्पर्य, भारतीय काव्यशास्त्रीय ग्रंथांत ह्या युक्तीचे अचूक स्वरूपज्ञान व समर्पक प्रयोग ह्या दोहोंचे दर्शन घडते. ही युक्ती प्राचीन भारतीय 'काव्यशास्त्रातील वादस्थळे' ह्या विषयाच्या अभ्यासाला सहायक ठरू शकेल.

न्यासव्याख्या [ जिचे लक्षण असे : 'यस्मिन्नधिकारे वर्तमाने तेनाधिकरणार्थेन सहितं संबंधमभिवीक्ष्यान्यस्यार्थो विनिक्षिप्यते ।' ][41] आणि फलव्याख्या [ जिचे लक्षण असे: 'यत्र वस्तुनि बहुष्वनिश्चितार्थेष्वेकीयमते प्रस्तुतेषु वस्तुसारभूतं स्वमतं स्वमर्थमुपनिक्षिप्यैकीयमतानि तस्मिन्नेव स्वमतेऽन्तर्भावं नयति । ]'[42] ह्या दोन व्याख्या प्रस्तुतच्या तंत्रयुक्तीच्या योगे अंशतः गतार्थ होतात.

## (7) अपदेश [ = प्रतिज्ञापर विधानाच्या सिद्धीचे साधक निमित्त सांगणे ].

**लक्षण :** 'यदाचार्यः किञ्चिदर्थं प्रतिज्ञाय हेतुमुपदिशति ।'[43]

**अर्थ :** शास्त्रीय ग्रंथकार प्रतिज्ञेवर एखादे व्यापक विधान करून त्याच्या सिद्धी-चे कारण सांगतात.

**इतर छटा :** ( 1 ) हेतुवाचक विधान कधी प्रत्यक्ष तर कधी प्रच्छन्न असते. जेव्हा ते प्रत्यक्ष असते तेव्हा हेतुवाचक शब्द तृतीया वा पंचमी विभक्तीत असतो. जेव्हा ते प्रच्छन्न असते तेव्हा हेतू वाक्यरूप असतो. ( 2 ) एखाद्या विषयाबद्दल दुसऱ्याचे व स्वतःचेही मत नोंदवणे [ ही छटा म्हणजे अनुमतच ]. ( 3 ) साक्षात वापरलेल्या शब्दांच्या द्वारे अभिप्रेत अर्थाकडे बोट दाखवणे.

**प्रकार्ये :** ( 1 ) वाचकाला कार्याच्या कारणाचा / कारणांचा बोध होतो, ( 2 ) त्यायोगे लेखकाने प्रतिपादिलेला कार्यकारणसंबंध पडताळून पाहाता येतो, ( 3 ) वाचकाला विविध दृष्टिकोण कळतात, ( 4 ) लेखकाला अभिप्रेत असलेला अर्थ समजून घेण्यासाठी सावध वाचन करणे वाचकाला भाग पडते.

**उदाहरणेः** ( i ) गुलाबराव महाराजांनी ह्या युक्तीचा अवलंब खालील सूत्रांत केला आहेः 'कविर्द्विविधः । ईश्वरो जीवश्च । ईश्वरो वेदबोधकः । तदंशाज्जीवोऽपि कविर्भवितुमर्हति ॥1-4॥''[44] [ अर्थात-कवीचे दोन वर्ग आहेतः ईश्वर व जीव. ईश्वर हा वेदांचा बोध करवून देतो. त्याचा अंश असल्यामुळे जीवदेखील कवी होण्यास पात्र ठरतो ], 'कवित्वं साध्यं सर्वैः । सद्यःपरनिर्वृतिदर्शनात् ॥1-2॥[45] [ अर्थात सर्वांनी कवित्व साधावे, त्यापासून ताबडतोब श्रेष्ठ दर्जाचा आनंद होत असल्याचे दिसत असल्यामुळे.

( ii ) राजशेखराने कवित्व व रसिकत्व यांतील फरकही कारणवाचक शब्दांनी असा व्यक्त केला आहेः 'पृथगेव हि कवित्वाद् भावकत्वं भावकत्वाच्च कवित्वम् । स्वरूपभेदाद्विषयभेदाच्च।'[46] [ अर्थात, कारण कवित्वाहून रसिकत्व वेगळे आहे आणि रसिकत्वाहून कवित्व वेगळे आहे. कारण त्या दोहोंचे स्वरूपही वेगळे आहे आणि विषयही वेगळे आहेत ].

(iii) वामनाच्या ग्रंथातील खालील वचने ह्या दृष्टीने अवलोकनीय आहेतः

'काव्यं सद्दृष्टादृष्टार्थम्, प्रीतिकीर्तिहेतुत्वात् ।'[47];

'पूर्वे शिष्याः, विवेकित्वात् ।।'[48];

'तासां पूर्वा ग्राह्या, गुणसाकल्यात् ।।'[49].

(iv) हेमचन्द्राने 'इह च काव्यं नायकादिप्रतिबद्धं भवतीति नायकादिलक्षण-मुच्यते ।'[50] या वचनात 'इति' शब्दाच्या द्वारे कारण सांगितले आहे

ह्यावरून काव्यशास्त्रकारांचा या शास्त्रोपायाशी उत्तम परिचय होता, हे स्पष्ट होते.

## (8) अपवर्ग [ =सामान्य नियमाचा अपवाद ]

**संज्ञान्तरः** अपवर्ज [ सुश्रुत ].

**लक्षणः** 'साकल्येनोत्सृष्टस्य यत्पुनस्तदेकदेशापकर्षणम् ।'[51]

**अर्थः** व्यापक नियम सांगून नंतर त्याच्या काही अंशाला मुरड घालणारा अपवाद सांगणे.

**इतर छटाः** (1) अभीष्ट अर्थ काढणे, (2) इतरांची अनुचित मते बाजूला सारणे.

**प्रकार्येः** (1) वाचकाला एकसमयावच्छेदेकरून नियम व त्याचा अपवाद यांचा परिचय करून देणे, (2) ह्या परिचयाच्या योगे एकदेशग व बहुदेशग विधानांवर प्रकाश पडतो, (3) वाचकाला सामान्यविधी व विशेषविधी दोन्ही कळून त्याचे शास्त्रविषयक ज्ञान परिपूर्ण होते, (4) उचितानुचित मतांचा विवेक वाचकाला करता येतो, (5) त्यायोगे शास्त्र शुद्ध स्वरूपात टिकवता येते.

**उदाहरणेः** ( i ) भामहाने खाली उद्धृत केलेल्या पद्यात वाणीचे म्हणजे भाषेचे चार दोष नमूद केले आहेत; ते म्हणजे श्रुतिदुष्टता, अर्थदुष्टता, कल्पनादुष्टता व श्रुतिकष्टता हे होत.

**श्रुतिदुष्टार्थदुष्टे च कल्पनादुष्टमित्यपि ।**
**श्रुतिकष्टं तथैवाहुर्वाचां दोषं चतुर्विधम् ॥47॥**[52]

परन्तु, ह्या सर्वसाधारण नियमाला त्याने स्वतःच एक अपवाद सांगितला आहे. तो असा की, असा एखादा 'दुष्ट' शब्द इतर ['सुष्ट'] शब्दांच्या सानिध्यात योजला असता तो आपला दुष्टपणा गमावून बसतो, इतकेच नव्हे तर तो शोभून दिसतो. भामह प्रतिपादितोः **'सन्निवेशविशेषात्तु दुरुक्तमपि शोभते ।'**[53] अर्थात् [ फुलांच्या हारात मधूनमधून गुंफलेली हिरवी पाने जशी खुलून दिसतात तसेच ] आजूबाजूच्या शब्दांमुळे व रचनेच्या कौशल्यामुळे कधीकधी सदोष शब्ददेखील काव्यात शोभून दिसतात. म्हणजेच वरील चतुर्विध शब्द नेहमीच सदोष असत नाहीत, तर ते विशिष्ट परिस्थितीत निर्दोष व सुन्दरही ठरतात. अर्थात, वरील चतुर्विध शब्दांच्या सदोषत्वाच्या नियमाला हा अपवाद आहे. भामहाने येथे पाश्चात्य शैलीशास्त्राच्या दृष्टीने एक महत्त्वाचा विचार मांडला आहे. तो स्वतंत्रपणे विचारणीय आहे.

( ii ) आता रुद्रटाच्या **काव्यालंकार**[54] ग्रंथाचे अवलोकन करू. यमकाचे लक्षण करताना त्याने म्हटले आहेः **'पुनरावृत्तिर्यमकः प्रायश्छन्दांसि विषयोऽस्य ।'**[55] ह्यावरील आपल्या टिप्पणीत नमिसाधूने प्रायः शब्दाचा खुलासा करताना म्हटले आहेः **'अस्य च यमकस्य प्रायो बाहुल्येन च्छन्दांसि पद्यं विषयः । प्रायोग्रहणाद्गद्यमपि क्वापीति ।'**[56] अर्थात यमक हा शब्दालंकार पद्यात आढळतो ही बाब सर्वविदित आहे. **परंतु कधीकधी गद्यातही यमकप्रतीती होते.** ह्या अनुभूतीची सोय शास्त्रकारांना लावावी लागते. तशी ती रुद्रटाने वरील कारिकेत लावून वाचकांना सुचविले आहे. की, त्यांनी सयमक गद्य सूक्ष्म बुद्धीने शोधून काढावे.

( iii ) ह्यानंतर वाग्भटालंकारातील एक वैशिष्ट्यपूर्ण उदाहरण अवलोकू. नवशिक्या कवीला उपदेश करताना वाग्भट सुचवतोः 'पादादौ न च वक्तव्यश्च दयः

प्रायशो बुधैः ।'[57] [ अर्थात, बुद्धिमान कवींनी कोणत्याही काव्यचरणाच्या सुरवातीस 'च' इत्यादी अव्ययांचा प्रयोग करू नये ]. येथेही 'प्रायशो' शब्दाच्या द्वारे वाग्भटाने अपवाद सुचवला आहे, तो सिंहदेवगणीने पुढील शब्दांत विशद केला आहेः "तथा बुधैः पादस्यादौ चादयो न वाच्याः । यथा 'च नौमि नेमिं सुविधिं सुपार्श्वम्' इत्यादि । प्रायोग्रहणात्-रे-धिक्-हा-किं-न-आ:प्रभृतयो न दुष्टाः ।"[58]

( iv ) हेमचन्द्र 'शब्दशास्त्रविरोधोऽसाधुत्वम् ।'[59] [ अर्थात जो शब्द व्याकरण-शास्त्राच्या विरुद्ध असेल तो अशुद्ध म्हणून वर्ज्य मानावा ] ह्या शब्दांत सामान्य नियमाचे प्रतिपादन करून लगेच त्याच्या अपवादाचा खुलासा पुढील शब्दांत करतो. "न दोषोऽनुकरणे इति वक्ष्यमाणत्वात् 'पश्यैष च गवित्याह' इत्यत्र न दोषः ।"[60] [ अर्थात, कोणाचे अनुकरण करून काही सांगावयाचे असल्यास व्याकरण-दृष्टचा अशुद्ध शब्द सदोष ठरत नाही. म्हणजे एखादे पात्र दुसऱ्या पात्राची नक्कल करून किंवा दुसऱ्या पात्राने काय म्हटले त्याचा पुनरुच्चार करून काही अशुद्ध म्हणाले तर ते सदोष नाही. हेमचन्द्राने येथे शैलीशास्त्रातील एका मुद्याचा विचार केला आहे. तो स्वतंत्रपणे विचारणीय आहे.

( v ) वामनाच्या ग्रंथात ह्याची उदाहरणे वैपुल्याने आढळतात जशी :

सामान्य नियम : 'पूरणार्थमनर्थकम् न वाक्यालंकारार्थम् ।।'[61]

अपवाद : 'अपवादार्थमिदम् । वाक्यालंकारप्रयोजनं तु नानर्थकम् ।।'[62]

सामान्य नियम : 'असभ्यार्थान्तरमसभ्यस्मृतिहेतुश्चाश्लीलम् ।।....न गुप्तलक्षित-संवृतानि ।।'[63]

अपवाद : 'अपवादार्थमिदम् । गुप्तं लक्षितं संवृतं च नाश्लीलम् ।'[64]

वामनाने 'अपवाद' शब्दाचा साक्षात प्रयोग आपल्या विवरणात केला असल्याचे वरील नोंदींवरून स्पष्ट होईल. ह्यावरून वामनाला प्रस्तुतची तंत्रयुक्ती माहीत होती हे उघड होते. [ वामनाने वरीलसारख्या सूत्रांत व त्यांवरील विवरणात आधुनिक पाश्चात्त्य शैलीशास्त्राच्या काही संकल्पना मांडल्या आहेत. त्यांचा स्वतंत्रपणे अभ्यास करणे इष्ट व आवश्यक आहे ]. ही तंत्रयुक्ती वाचकाला विचारास प्रवृत्त करणारी आहे. अशा विचारप्रवर्तनामुळे वाचकाकडून शास्त्राचा स्वागतार्ह विस्तार संभवतो. प्राचीन शास्त्रकारांनाही हेच अभिप्रेत होते.

**(9) अर्थापत्ती** [ =सूचित वा ध्वनित अर्थाची प्राप्ती ].

अर्थापत्ती ह्या सामासिक शब्दात अर्थ व आपत्ती असे दोन घटक आहेत. त्यांपैकी आपत्ती शब्दाचा अर्थ प्राप्ती किंवा ज्ञान असा आहे.

**लक्षण**—'योऽन्येनार्थेनोक्तेन ततोऽपरोऽप्यर्थो गदित इव ज्ञायते ।'[65]

**अर्थ** : साक्षात शब्दांनी व्यक्त केलेल्या एका अर्थापासून त्यापेक्षा वेगळा असा दुसरा अर्थ, जणू व्यक्त केलाच आहे, असा जाणवतो.

**इतर छटा :** ( 1 ) सूचित अर्थ उक्त शब्दांच्या प्रभावामुळे प्रतीत होतो, ( 2 ) अभिप्रेत अर्थ निराळ्या मार्गाने समजतो, ( 3 ) दुसरा (=सूचित) अर्थ व्यक्तार्थाच्या प्राय: विरुद्ध असतो.

**प्रकार्ये :** ( 1 ) वाचकाला संदर्भ-दक्ष बनवणे, ( 2 ) वाचकाच्या अनुमानशक्तीवर काही ग्रन्थार्थ सोपवणे, ( 3 ) 'अनुक्त विषयांश' सुचवणे, ( 4 ) शास्त्रग्रन्थाला फुगवटा येऊ न देणे.

**उदाहरणे :** ( i ) काव्य व शास्त्र यांच्या परस्परसंबंधाच्या मुद्याची चर्चा करताना भामह म्हणतो : 'अज्ञस्येव प्रगल्भत्वमकवेः शास्त्रवेदनम् ।'[66]

[ अर्थात जो कवी नाही त्याचे विविध शास्त्रांचे ज्ञान, अडाणी मनुष्याच्या प्रगल्भत्वासारखे आहे. म्हणजेच निष्फळ आहे. ] ह्याच्या विपरीत अर्थ असा की, जो कवी आहे त्याचे शास्त्रपाण्डित्य प्रभावशाली ठरते; ते त्याला कीर्तिदायक ठरते. भामहानेच महाकाव्याच्या विषयासंबंधी 'सर्गबन्धो महाकाव्यं महतां च महत् च यत् ।'[67] [ अर्थात सर्गबद्ध महाकाव्य थोरामोठ्यांचे व मोठे असावे ], असे म्हटले आहे. ह्याच्या विपरीत अर्थ असा की, थिट्या कर्तृत्वाच्या, क्षुद्र व्यक्तिमत्त्वाच्या व सामान्य चारित्र्याच्या व्यक्तींच्या जीवनावर महाकाव्य लिहू नये आणि तसे एखाद्या कवीने रचल्यास त्याला महाकाव्य म्हणू नये.

( ii ) रुद्रटाच्या 'सुविहितपदभङ्गं सुप्रसिद्धाभिधानम् । तदनु विरचनीयं सर्गबन्धेषु भूम्ना ।'[68] ह्या उपदेशातून निघणारा ध्वन्यर्थ असा की, ज्यात सुश्लिष्ट व मनोरम पदभंग नाहीत व ज्यात अप्रसिद्ध वर्णनपर शब्द आहेत अशी यमके टाळावीत आणि नाटक, कथा व आख्यायिका ह्यांमध्ये तर अशी यमके अगदी कमीतकमी योजावीत.

( iii ) वाग्भटाने 'अनारतं गुरूपान्ते यः काव्ये रचनादरः । तमभ्यासं विदुस्तस्य क्रमः कोऽप्युपदिश्यते ॥'[69] [ अर्थात—योग्य गुरूच्या चरणापाशी सतत बसून काव्यरचनेसाठी जे परिश्रम केले जातात त्यांनाच अभ्यास म्हणतात. त्याच्या काही प्रकारांचे स्पष्टीकरण केले जात आहे. ] ह्या वचनाच्या द्वारे असे सुचवले आहे की, जो कविशिष्य मधूनमधून गुरुचरणांपाशी बसतो किंवा एखाद्याच वेळी बसतो तो अभ्यास करतो असे मानू नये. [ सिंहदेवगणी म्हणतोच: 'एतेन यः कदाचिदेकवारमप्यभ्यसनमात्रमभ्यासः, सोऽभ्यास एव न भवति इति ज्ञापितम् ।' ][70]

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की, प्राचीन शास्त्रीय ग्रन्थ अभ्यासताना त्यांतील अनेक वचनांपासून निष्पन्न होणारा ध्वन्यर्थ अवश्य ध्यानात घ्यावयास हवा. तो अर्थ मूळ विवेचनाला पूरक, पोषक व उपोद्बलक असतो. तो अनेकदा मूलार्थावर प्रकाश टाकून वाचकाला ग्रंथाच्या रहस्याप्रत घेऊन जाणारा असू शकतो. ह्या दृष्टीने शास्त्रीय ग्रंथाच्या रचनेत अर्थापत्तीला महत्त्वाचे स्थान आहे. आता 'उत्तरपक्षाकडे' वळू.

## (10) उत्तरपक्ष [ =उत्तर ]

**संज्ञावैशिष्टच :** ही एक सापेक्ष संज्ञा आहे. ही पूर्वपक्ष ह्या संज्ञेवर अवलंबून असून हिचे अर्थकार्य पूर्वपक्षाने नियंत्रित व निर्धारित होते. कौटिल्याखेरीज इतर सर्व शास्त्रकारांनी उत्तरपक्षाऐवजी निर्णय हीच संज्ञा पत्करून तिचेच लक्षणनिरूपण केले आहे. तोच क्रम प्रमाण मानून पुढे 'निर्णय' शीर्षकाखाली या शास्त्रोपायाची चर्चा करू.

## (11) उद्देश [ =संक्षिप्त विधान ].

**संज्ञावैशिष्टच :** ही शास्त्रीय संज्ञा 'निर्देश' [ =विस्तृत विधान ] ह्या संज्ञेच्या विरुद्धार्थाची आहे.

**लक्षण :** 'सङ्क्षेपाभिधानम् ।'[71]

**अर्थ :** संक्षिप्त नामोल्लेखाला उद्देश म्हणतात.

**इतर छटा :** ( 1 ) विवेच्य विषयाचा निव्वळ ओझरता उल्लेख, ( 2 ) विवेच्य विषयाचे सर्व सूक्ष्मांश ध्यानात ठेवून केलेले एक सामूहिक विधान.

**प्रकार्ये :** ( 1 ) ग्रन्थविस्तारास आळा घालणे, ( 2 ) निर्देशाच्या = विस्तृत उल्लेखाच्या अस्तित्वाला अर्थ प्राप्त करून देणे. [ उद्देशावाचून निर्देश केला जाऊ शकत नाही ]. ( 3 ) संक्षिप्त उल्लेखाच्या द्वारे समग्र विषय जाणून घेण्याची जिज्ञासूची इच्छा चाळवणे.

**उदाहरणे** ( i ) केशवमिश्राने 'तद्धेतुः प्रतिभादिकम् ॥'[72] [ अर्थात प्रतिभादी गोष्टी काव्यनिर्मितीस कारण होतात ] असा 'हेतु'चा संक्षिप्त उल्लेख केला आहे [ व मग त्याची विस्ताराने चर्चा केली आहे ]. त्याचीच 'रीतिरुक्तिस्तथा मुद्रा वृत्तिः काव्यस्य जीवितम् । त्रिविधस्यापि दोषास्तु त्याज्याः श्लाघ्या द्वये गुणाः ॥'[73] हीदेखील उद्देशकारिकाच होय.

( ii ) वामनाने काव्यांगांचा संक्षिप्त उल्लेख 'लोको विद्या प्रकीर्णं च काव्याङ्गानि ॥'[74] ह्या सूत्रात केला आहे आणि मग त्यातील लोक इत्यादी एकेका काव्यांगाचे विस्तृत स्पष्टीकरण केले आहे ह्या सूत्रावरील वृत्तीत तो स्वतःच म्हणतो: 'उद्देशक्रमेणैतद्व्याचष्टे'[75]. 'काव्यं गद्यं पद्यं च ।'[76] हेदेखील त्याने रचलेले एक उद्देशसूत्रच आहे. त्याने 'ओजःप्रसादश्लेषसमतासमाधिमाधुर्यसौकुमार्योदारतार्थव्यक्तिकान्तयो बन्धगुणाः ॥'[77] ह्या सूत्रात पदरचनेचे ओजप्रसादादी गुण नामतः उल्लेखिले आहेत. नंतर त्यांची लक्षणे व उदाहरणे देऊन विस्तृत विवेचन केले आहे.

शास्त्रकाराला विवेच्य विषयाच्या उपविषयांचे उल्लेख अनिवार्यपणे करावे लागत असल्यामुळे तो ह्या युक्तीचा अवलंब अवश्य करतो.

## (12) उद्धार [ =उचलून धरणे किंवा बाहेर काढणे ].

**लक्षण:** 'शास्त्रारम्भप्रत्याख्यानादिचोद्यस्य समाधानम् ।'[78]

**अर्थः** शास्त्रीय ग्रन्थाच्या सुरुवातीस उपस्थित केलेल्या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर देणे किंवा शंकेचे निरसन करणे.

**इतर छटाः** ( 1 ) दुसऱ्याच्या विचारांतील दोष दाखवून आपले मत उचलून धरणे, ( 2 ) विपक्षाच्या आक्षेपाचे बिनतोड खंडन करणे, ( 3 ) संदर्भानुसार पूर्वोक्त विचारादींची जुळणी करणे.

**प्रकार्येः** ( 1 ) प्रतिपक्षाच्या विचारसरणीतील हेत्वाभास दाखवणे, ( 2 ) स्वतःचे मत ठासून मांडणे, ( 3 ) वाचकाला चुकीच्या विचारांचा धोका दाखवून योग्यशा वैज्ञानिक विचारांचा मार्ग दर्शवणे, ( 4 ) संदर्भाकडे लक्ष पुरवून नीटपणे ग्रन्थार्थ लावण्यास जिज्ञासूस शिकवणे.

**उदाहरणेः** ( i ) भामहपूर्वकालीन काही शास्त्रकारांची काव्यांना 'हे वैदर्भकाव्य', 'हे गौडीयकाव्य' अशी लेबले चिकटविण्याची प्रथा होती. तिच्यातील हेत्वाभास दाखवताना व स्वतःचे मत ठासून मांडताना भामह म्हणतोः

**'ननु चाश्मकवंशादि वैदर्भमिति कथ्यते । कामं तथास्तु प्रायेण संज्ञेच्छातो विधीयते ॥'**[79]

[ अर्थात, परंतु 'अश्मकवंश' इत्यादी काव्यकृतींना वैदर्भकाव्ये म्हणतात. ठीक आहे, म्हणणारे तसे म्हणोत. संज्ञा बहुधा इच्छेनुसार उत्पन्न होत असतात; त्यांना अर्थ नसतो ]. या मुद्याचा समारोप करताना भामह म्हणतोः

'न नितान्तादिमात्रेण जायते चारुता गिराम् ।
वक्राभिधेयशब्दोक्तिरिष्टा वाचामलङ्कृतिः ॥'[80]

अर्थात–केवळ नितान्त [सुन्दर, नितान्त रमणीय] इत्यादी [प्रकर्षवाचक] शब्द वापरल्याने वाणीत [=काव्यात] सौन्दर्य उत्पन्न होत नाही. वक्र [=विचलित वा चमत्कृतिपूर्ण] शब्द व अर्थ यांच्या प्रयोगानेच वाणीचे अलंकरण होते [=काव्यात सौन्दर्य उपजते].

( ii ) काही शास्त्रकारांच्या मते अनिबद्ध काव्यात ( =सुट्या पद्यांत ) खरे काव्यसौन्दर्य असते [ 'केचिदनिबद्ध एव पर्यवसिताः ।'[81] ]. या विचारातील दोष दाखवताना वामन प्रतिपादन करतोः 'नानिबद्धं चकास्त्येकतेजःपरमाणुवत् ।'[82] [ अर्थात अनिबद्ध काव्य एखाद्या तेजःकणासारखे=स्फुलिंगासारखे असते, त्यामुळे ते चमकत नाही. ] येथील खुद्द वामनाचा विचार अग्राह्य असला तरी त्याने प्रतिपक्षाच्या विचारातील दोष दर्शवून स्वतःचे मत प्रस्थापित केले आहे.

**(13) उपदेश** [ =सल्ला, अधिकृत आदेश; अनुभवी व अधिकारी वडीलधाऱ्या व्यक्तीने अननुभवी व्यक्तीला हितवाक्य सांगणे. ]

**लक्षणः** 'आप्तवचनम् ।'[83]

**अर्थः** आप्ताचे बोलणे तो उपदेश. ज्याला धर्मसाक्षात्कार झालेला आहे व जो नेहमी यथार्थ बोलतो त्याला आप्त म्हणतात. त्याचे बोलणे विश्वसनीय व आचरणीय

असते. शब्दापासून होणाऱ्या अर्थग्रहणाची व्याकरण, उपमान, कोष, आप्तवाक्य, वृद्धव्यवहार, वाक्यशेष, विवृती व सिद्धपदसांनिध्य अशी जी आठ साधने नैयायिक मानतात[84] त्यांत आप्तवाक्य हे एक आहे. पतंजलीच्या मतानुसार ज्याला आपल्या अनुभवाच्या आधारे वस्तूच्या स्वरूपाचे पूर्णरूपाने निश्चयात्मक ज्ञान होते व जो रागलोभादींमुळेही असत्य बोलत नाही तो आप्त होय [ 'आप्तो नाम अनुभवेन वस्तुतत्त्वस्य कार्त्स्न्येन निश्चयवान् । रागादिवशादपि नान्यथावादी यः सः इति चरके पंतजलिः ।' ] त्याचे वचन ते आप्तवाक्य. हे अर्थज्ञानप्रक्रियेत महत्त्वाचे असते. गौतमाच्या मते आप्तोपदेशाच्या सामर्थ्याने शब्दर्थाचे ज्ञान होते. जगात ज्या अनेक वस्तू आपण प्रत्यक्षपणे पाहू शकत नाही व व्यवहाराद्वारेही आपल्याला त्यांचे ज्ञान होऊ शकत नाही अशा वस्तूंच्या ज्ञानाच्या बाबतीत आपल्याला दार्शनिक व भक्त यांच्या वचनावर विश्वास ठेवावा लागतो. पापपुण्यादी संकल्पना, शास्त्रांतील पारिभाषिक शब्द इत्यादींचे अर्थज्ञान आपल्याला आप्तवाक्यामुळेच होते. म्हणूनच न्याय, वैशेषिक, सांख्य, मीमांसा, बौद्ध व जैन ही सर्वच दर्शने 'शब्द' [ आप्तोपदेश ] हे एक ज्ञानाचे प्रमाण मानतात. हे सगळे लक्षात घेऊनच तंत्रयुक्तिकारांनीही 'आप्त-वाक्य' ही एक तंत्रयुक्ती प्रतिपादली आहे.

**इतर छटा** ( 1 ) 'असे' वा 'अशा प्रकारे वर्तन कर' असा आदेश देणे, ( 2 ) 'हे असे असे आहे' असे सांगणे.

**प्रकार्येः** ( 1 ) गुरुमुखपरंपरा टिकवून धरणे, ( 2 ) पूर्वीच्या अनेक पिढ्यांचे विचार व अनुभव जतन करणे, ( 3 ) विश्वसनीय पूर्वजांची मते उद्धृत करून आपल्या विचारसरणीचे समर्थन करणे, ( 4 ) बरोबर व चूक मतांत विवेक करण्यास वाचकाला शिकवणे, ( 5 ) एखाद्या विषयाच्या वैचारिक परंपरेची वाचकाला ओळख करून देणे.

**उदाहरणेः** ( i ) भामहाच्या 'तद्वदसाधीयः साधीयश्च प्रयोजयेत् ।';[85] 'यत्नोऽस्यां कविना कार्यः····।'[86], 'अन्येषामपि कर्तव्या संसृष्टिरनया दिशा ।,[87] 'नाप्रयुक्तं प्रयुञ्जीत चेतःसंमोहकारिणम् ।'[88] इत्यादी वचनांत वेगवेगळ्या विषयांबद्दलचा उपदेशच आहे.

( ii ) तसाच उपदेश केशवमिश्रानेही 'हिताय सुकविः कुर्यात्····।',[89] 'तत्तत् कविप्रयोगेण ज्ञातव्यं काव्यमिच्छता ।'[90] ह्यांसारख्या वचनांत केला आहे.

( iii ) राजशेखराच्या काव्यमीमांसेत अशी उपदेशपर वचने वैपुल्याने आढळतात. त्यांपैकी काही अशीः '···· न च स्वकृतिं बहु मन्येत ।'[91]; 'शास्त्रपूर्वकत्वात् काव्यानां पूर्वं शास्त्रेष्वभिनिविशेत ।'[92]; 'इत्थं कविर्निबध्नीयादित्थं च मतिमान्पठेत् ।'[93]; 'गृहीतविद्योपविद्यः काव्यक्रियायै प्रयतेत ।'[94] इत्यादी.

शास्त्रांचा उद्देशच वाचकाला योग्यायोग्याचा वा सत्यासत्याचा उपदेश करणे हा

असल्यामुळे कोणत्याही शास्त्रीय ग्रन्थात अशी उपदेशपर वचने अपरिहार्यपणे आढळतात. काव्यशास्त्रीय ग्रन्थांतील अशा सर्व वचनांचे संकलन व वर्गीकरण करून त्यांचे अध्ययन केल्यास शास्त्रकारांनी कोणकोणत्या मुद्यांबद्दल व कसकसा उपदेश केला होता, ते स्पष्ट होईल. आता उपमानाचा विचार करू.

**(14) उपमान** [ =तुलना, दृष्टान्त, ज्याच्याशी तुलना केली जाते ते. ]

**लक्षण:** 'दृष्टेनादृष्टस्य साधनमुपमानम् ।'[95]

**अर्थ:** प्रसिद्ध वा परिचित वस्तूच्या साहाय्याने अप्रसिद्ध वा अल्पपरिचित वा अपरिचित वस्तूची सिद्धी करणे.

फक्त कौटिल्याने ह्या युक्तीचा परामर्श घेतला आहे. ह्यापूर्वीच्या उपदेश तंत्रयुक्तीच्या विवरणात म्हटल्याप्रमाणे नैयायिकांनी अर्थग्रहणाची जी आठ साधने मानली आहेत त्यांत उपमानालाही स्थान आहे. त्याचा थोडा खुलासा करू.

उपमान म्हणजे सादृश्यज्ञान [ सादृश्यज्ञानं उपमानम् । तर्कसंग्रह 58 ][96]. उदाहरणार्थ, गौरिव गवयः = गायीसारखी नीलगाय. ज्याला गायीचे ज्ञान आहे त्याला तत्सदृश ( गायीसारख्या ) नीलगायीचे ज्ञान होते. हे ज्ञान सादृश्यापासून होते. ह्यातील गाय ही ज्ञात किंवा दृष्ट आहे. तिच्यापासून अज्ञात वा अदृष्ट नीलगायीचे ज्ञान होते. हे ज्ञान उपमानाने म्हणजे सादृश्याने होते. अर्थात उपमान हे ज्ञानग्रहणाच्या प्रक्रियेतील एक साधन आहे. हे अनेक शब्दांच्या अर्थज्ञानात उपयुक्त ठरते.[97]

ह्यावरून उपमानापासून यथार्थज्ञानाची उत्पत्ती होत असल्याचे अनुभवास येत असल्यामुळे तंत्रयुक्तिकारांनी शास्त्रीय ग्रंथात उपमानाला एक तंत्रयुक्ती ह्या नात्याने स्थान दिले. ही तंत्रयुक्ती हे अर्थज्ञानाचे एक साधन आहे, त्याचा 'उपमा' अलंकाराशी काहीही संबंध नाही हे येथे ध्यानात ठेवावयास हवे. ह्या तंत्रयुक्तीच्या अर्थाला इतर छटा नाहीत.

**प्रकार्ये:** (1) सहजपणे न समजणारा शास्त्रीय विषय परिचित दृष्टांताच्या अथवा व्यवहारातील नित्याच्या अनुभवाच्या उल्लेखाने कळण्याजोगा करणे. (2) तो सुखावह वा आनंददायक बनवणे.

**उदाहरणे:** ( i ) भामहाची खालील वचने अवलोकू.

'विलक्ष्मणा हि काव्येन दुःसुतेनेव निन्द्यते ।'[98] [ अर्थात कुपुत्रामुळे त्याच्या पित्याची जशी छीथू होते तशी कुकाव्यामुळे ते रचणाऱ्या कवीची होते ]; 'सन्निवेशविशेषात्तु दुरुक्तमपि शोभते । नीलं पलाशमाबद्धमन्तराले स्रजामिव ।'[99] [ अर्थात फुलांच्या हारात मधूनमधून कौशल्याने गुंफलेली हिरवी पानेही जशी शोभून दिसतात तसेच श्रवणकटू शब्दही काव्यात कौशल्याने वापरल्यास सुन्दर ठरतात. ]

( ii ) केशवमिश्राने खालील पद्यात किती बहारदार उपमान योजले आहे पाहा:

'गुणवत्यपि निर्दोषेऽलङ्कारैः काव्यराजनि । जायतेऽन्यैव सुषमा रत्नालङ्करणैरिव ॥'[100]

अर्थात–एखाद्या राजाने रत्नजडित अलंकार धारण केल्यावर जशी वेगळीच शोभा येते, तद्वत गुणयुक्त व निर्दोष काव्य अलंकारांनी मंडित असल्यास त्याला अवर्णनीय सौन्दर्य लाभते.

( iii ) वामन अनिबद्ध व निबद्ध काव्यांच्या सिद्धीत क्रमबद्धता मानतो. त्याच्या मते एखाद्या कवीला अनिबद्ध ( म्हणजे सुटी ) काव्ये एकदा चांगली साधली की त्याच्या पुढची पायरी म्हणजे निबद्ध ( =दीर्घ ) काव्ये हळूहळू साधू लागतात. हा विचार वामनाने एका उपमानाने असा मांडला आहे: 'क्रमसिद्धिस्तयोः स्रगुत्तंसवत् ।'[101] [ अर्थात, एखाद्या माळ्याला हार गुंफण्याचे कसब साध्य झाले की त्यानंतरची पायरी म्हणजे मुकुट गुंफण्याचे कसब साध्य होते. तद्वत अनिबद्ध काव्यरचना साधली की मग निबद्ध साधते. ] वामनाची 'तद्धि चित्रं चित्रपटवत् विशेषसाकल्यात् ।'[102] व 'एतासु तिसृषु रीतिषु रेखास्विव चित्रं काव्यं प्रतिष्ठितम् ।'[103] ही अनुक्रमे नाटक ( दशरूपके ) व वैदर्भी-गौडी-पांचाली ह्या तीन रीती ह्यांबद्दलची वचनेही उपमान तंत्रयुक्तीचीच उदाहरणे आहेत.

एतावता प्राचीनांनी शास्त्रीय ग्रंथही एकाच वेळी उद्बोधक ( ज्ञानवर्धक ) व मनोरंजक करण्याची 'कला' आत्मसात केली होती हे प्रस्तुतच्या तंत्रयुक्तीवरून जाणवते. उपमान म्हणजे काव्यातील उपमा(न) नव्हे हे वर म्हटलेच आहे. म्हणूनच जाताजाता असे आवर्जून नमूद करावेसे वाटते की, मनुस्मृती, शाङ्करभाष्य इत्यादी शास्त्रीय ग्रंथांतील 'उपमां' चे अभ्यास अयोग्य होत. आता ह्यानंतर क्रमप्राप्त ऊह्य तंत्रयुक्तीचा विचार करू.

**(15) ऊह्य** [ =तर्कनीय, अनुमेय. मूळ धातू ऊह् ( 1 आ. ). त्याचा अर्थ तर्काने जाणणे, अनुमान किंवा कल्पना करणे. म्हणून ऊह्य म्हणजे तर्कनीय किंवा कल्पनीय ].

**लक्षणः** 'यदप्रतिबद्धं ग्रन्थे स्वयं प्रज्ञया तर्कयित्वा योज्यम् ।'[104]

**अर्थः** शास्त्रकाराने आपल्या ग्रंथात जे योजिलेले किंवा लिहिलेले नसेल त्याचा वाचकाने/अभ्यासकाने स्वबुद्धीने तर्क करावा व त्याची योजना करावी [ आणि अशा प्रकारे ग्रंथाचा संबंधित अनुक्तांश पूर्ण करावा ].

**इतर छटाः** ( 1 ) मूळ ग्रंथकाराने अनुक्त ठेवलेले प्रत्यक्षात 'उक्त' आहे असे मानणे. ( 2 ) संदर्भाकडे लक्ष पुरवून ग्रंथकर्त्याचा रोख जाणणे. ( 3 ) ग्रंथातील पूर्वोक्त अंशाच्या प्रकाशात योग्य रीतीने ग्रन्थार्थ लावणे.

**प्रकार्येः** ( 1 ) शास्त्रीय विषयाच्या काही अंशाचे/अंशांचे आकलन जिज्ञासूच्या बुद्धीवर सोपवणे, ( 2 ) शास्त्रीय ग्रन्थास अकारण फुगवटा येऊ न देणे (परिहार्य विस्तार टाळणे), ( 3 ) संदर्भ ध्यानात घेऊन ग्रन्थ लावण्यास वाचकांस भाग पाडणे, ( 4 ) अनुक्त विषयांश सूचित करून शास्त्रीय विषयास पूर्णता प्राप्त करून देणे, ( 5 ) अभ्यासूच्या विचारशक्तीला चालना व वाव देणे.

**उदाहरणे :** ( i ) भामहाने स्वभावोक्तीपर्यंतच्या अलङ्कारांचे निरूपण संपवल्यावर पुढील कारिका लिहिली आहे : 'समासेनोदितमिदं धीखेदायैव विस्तरः । असङ्गृहीतमप्यन्यदभ्यूह्यमनया दिशा ।'[105] [ अर्थात हे आतापर्यंतचे निरूपण संक्षेपाने केले. विस्तार वाचकांच्या बुद्धीला केवळ शिणवतो. ज्या इतर अलङ्कारप्रपंचाचा येथे संग्रह केलेला नाही त्याचा तर्क, येथवर दाखवलेल्या मार्गाने, वाचकांनी स्वतः करावा ]. भामहाने 'अभ्यूह्यम्' हा तंत्रयुक्तिवाचक शब्दच वापरला आहे, ही बाब ध्यानात घ्यावयास हवी.

( ii ) दण्डीच्या ग्रन्थात ह्या तंत्रोपायाची उदाहरणे जागोजागी आढळतात. एखाद-दोन उदाहरणे अवलोकू. 'न पर्यन्तो विकल्पानां रूपकोपमयोरतः । दिङ्मात्रं दर्शितं धीरैरनुक्तमनुमीयताम् ।।'[106] [ अर्थात रूपक व उपमा यांच्या पोटभेदांना अन्त नाही म्हणून येथे मोजक्यांचीच चर्चा केली आहे. जे चर्चिलेले नाहीत त्यांविषयीचे अनुमान बुद्धिमान वाचकांनी करावे ]. दण्डीने ह्या युक्तीचा अवलंब रूपक, दीपक, आक्षेप, अर्थान्तरन्यास, ज्ञापकहेतू व अपह्नुती ह्या अलंकारांच्या उपभेदांसंबंधी विधान करताना केला आहे. ह्या संदर्भात दण्डीच्या 'इक्षुक्षीरगुडादीनां…' इत्यादी[107] कारिकेवरील रत्नश्रीज्ञानाची पुढील टीका अवलोकनीय आहे. तो म्हणतो: 'सर्वत्रैव लक्षणशास्त्रे सर्वभेदव्यापि सामान्यलक्षणमुच्यते । न तु तद्भेदाः परिसंख्यायन्ते । अत्रापि सैव व्यवस्था काव्यलक्षणशास्त्रत्वादस्य ।' [ अर्थात—कोणत्याही शास्त्रीय ग्रन्थात समस्त भेदोपभेदांना लागू पडणारे सर्वसामान्य लक्षण प्रतिपादिलेले असते. त्या विषयाच्या सकल भेदोपभेदांची गणना केलेली नसते. काव्यलक्षण हेही एक शास्त्र असल्यामुळे तीच व्यवस्था ( =पद्धती ) येथेही स्वीकारलेली आहे ].

( iii ) वामनाने 'अवेक्षण' काव्यांगाच्या विवेचनाच्या ओघात शब्दपाकाची [ शब्दप्रयोगाच्या संपूर्ण योग्यतेची ] कल्पना केली आहे [ 'यत्पदानि त्यजन्त्येव परिवृत्तिसहिष्णुताम् । तं शब्दन्यासनिष्णाताः शब्दपाकं प्रचक्षते ।'[108] ] ती ध्यानात घेऊन 'अर्थपाकाची' कल्पना वाचकांनी पुढीलप्रमाणे करावयाची आहे : कवीला आपल्या काव्यातील एखादी कल्पना अयोग्य, न्यूनाधिक, अन्यथास्थित व / वा सदोष असल्याचे जाणवताच तो ती दूर सारून तिच्या जा गी दुसरी कल्पना योजून पाहतो; बदलाची ही क्रिया सर्वथा यथायोग्य कल्पना सुचेपर्यंत चालू राहते व तशी कल्पना सुचून ती काव्यात योजली गेल्यावर ही क्रिया थांबते. अशी ही अर्थपाकाची कल्पना वाचकाने करावयाची असते.

( iv ) क्षेमेन्द्राने आपल्या कविकण्ठाभरणात दशविध चमत्कारांचे सोदाहरण विवेचन संपवल्यावर 'इत्युक्त एष सविशेषचमत्कृतीनाम् । सारः प्रकारपरभागविभाव्यमानः ।।'[109] असे उद्गार काढले आहेत. त्यांच्या आधारे वाचकाने वाक्य, प्रबंधार्थ, गुण, क्रियापद, लिंग, वचन, विशेषण, काल, देश, अभिप्राय, स्वभाव इत्यादी काव्यघटकांतील चमत्कारांचा तर्क स्वतःच्या बुद्धीने करावयाचा आहे.

( v ) क्षेमेन्द्रानेच आपल्या 'औचित्यविचारचर्चे'चा उपसंहार करताना पुढील विधान केले आहे : 'अन्येषु काव्यांगेषु अनयैव दिशा स्वयमौचित्यमुत्प्रेक्षणीयम्। तदुदाहरणान्यानन्त्यान्न प्रदर्शितानीत्यलमतिप्रसंगेन ।'[110]. क्षेमेन्द्राने सत्तावीस प्रकारच्या औचित्यांचा अन्वयव्यतिरेकाने व सोदाहरण विचार संपवल्यावर वरील उद्‌गार काढले आहेत व त्यांत ऊह्य तंत्रयुक्तीचा अवलंब करून इतर काव्यांगांतील औचित्याची व औचित्यभंगाचीही कल्पना व उदाहरणे वाचकांनी तर्क लढवून शोधून काढावीत असे सुचवले आहे. परंतु ह्या तंत्रयुक्तीशी परिचय नसल्यामुळे डॉ. एस्. के. दे यांनी आपल्या History of Sanskrit Poetics, Sanskrit Poetics As A Study of Aesthetics आणि Some Problems. of Sanskrit Poetics ह्या तिन्ही ग्रंथांत, पुढील शब्दांत, क्षेमेन्द्राला पठडीबंद किंवा दुराग्रही संबोधून त्याच्यावर अन्याय केला आहे : "He dogmatically summarises the cases of application as twenty-seven in number."[111] वस्तुत: क्षेमेन्द्र अधिकच्या काव्यांगांच्या औचित्यचर्चेला स्वागतशील भूमिकेने सामोरा जाण्यास उत्सुक / उद्युक्त आहे.

( vi ) रुद्रटाने ग्राम्य दोषाच्या बाबतीत असा उपदेश केला आहे : 'एतद्विज्ञाय बुधै: परिहर्तव्यं महीयसो यत्नात् । न हि सम्यग्विज्ञातुं शक्यमुदाहरणमात्रेण ।'[112] [ भावार्थ—बुद्धिमान वाचकांनी भगीरथ प्रयत्न करून हा दोष टाळावा. ह्याची केवळ उदाहरणे दिल्याने ह्याचे सम्यक ज्ञान होणार नाही ]. ह्या कारिकेवर नमिसाधूने पुढीलप्रमाणे मार्मिक व ऊह्य-तंत्रयुक्तीच्या दुहेरी कार्यावर प्रकाश टाकणारी टिप्पणी लिहिली आहे : 'महाकवयो यत्र मुह्यन्तीत्यतो महीयसो यत्नादित्युक्तम् । तर्ह्युदाहरणानि किमेतेषु नोच्यन्त इत्याह—नहीत्यादि । यस्मादुदाहरणमात्रेण न यथावद्विज्ञातुं शक्यते । तत: स्वधिया विज्ञाय यथा ग्राम्यत्वं न भवति तथा प्रयोज्यम् ।'[113] नमिसाधूचा आशय असा की, शास्त्रकाराने अनुक्त ठेवलेल्या विषयांशाच्या कल्पनापूर्वक आकलनासाठी तर वाचकाने आपल्या तर्कशक्तीचा उपयोग करावाच, पण त्याशिवाय उक्त विषयांशाच्या सर्वांगीण ज्ञानासाठीही तिचा उपयोग करावा. एकंदरीने ही तंत्रयुक्ती वाचकांना तर्क करण्यास प्रवृत्त करून शास्त्रीय संकल्पनांत भर घालण्यास सहायक ठरते व त्यायोगे ती शास्त्राचा विकास साधते, असे निखालस म्हणता येते. प्राचीन शास्त्रांच्या अर्वाचीन अभ्यासकांना हिच्या उत्तम ज्ञानाची नितान्त आवश्यकता आहे, हे डॉ. दे यांच्या वर दिलेल्या उदाहरणावरून, सहज पटेल.

अरुणदत्तप्रतिपादित उच्चितकव्याख्या [ जिचे लक्षण असे: "यस्मिन् सूत्रे निदर्शनभूतान्युदाहरणानि तन्त्रान्त समाकृष्यार्थ: शस्यते ।" ][114] प्रस्तुत तंत्रयुक्तीच्या योगे गतार्थ होते. आता ह्यानंतरच्या 'एकान्त' युक्तीकडे वळू.

**(16) एकान्त** [ =अपरिवर्तनीय नियम / विधान; सर्वत्र लागू पडणारे विधान ].

**लक्षण** : 'य एकमेव पक्षमव्यभिचारेण श्रयति नान्यम् ।'[115]

**अर्थ :** जे विधान एकाच बाजूला नित्यसाहचर्याने चिकटून असते, दुसऱ्या बाजूला स्पर्श करीत नाही, असे विधान. निरपवाद, मतभेदरहित व सर्वत्र लागू पडणारे विधान. एकच व एकच अर्थ व्यक्त करणारे विधान.

**इतर छटा :** ह्याच्या स्वरूपाच्या बाबतीत शास्त्रकारांत मतभिन्नता नसल्यामुळे ह्याच्या अर्थाच्या इतर छटा नाहीत.

**प्रकार्ये :** ( 1 ) अभ्यासकाला सार्वत्रिक नियमाचे ज्ञान करून देणे. ( 2 ) जिज्ञासूच्या मनात काही शंका असल्यास ती / त्या दूर करणे.

**उदाहरणे :** ( i ) भामहाची खाली उद्धृत केलेली वचने निरपवाद व / वा मतभेदशून्य आहेत: 'आस्त एव निरातङ्कं कान्तं काव्यमयं वपु: ।'[116] [ अर्थात सत्कवीचे काव्यरूप शरीर त्यांच्या मरणानंतरही रमणीय व निर्बाध असेच राहते, ह्याविषयी शंका नको ]; 'युक्तं वक्रस्वभावोक्त्या सर्वमेवैतदिष्यते ।[117] [ म्हणजे संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश भाषांतील, गद्यात्मक तसेच पद्यात्मक, सर्गबंध, अभिनेय ( =नाटके ), आख्यायिका, कथा व अनिबद्ध ( सुटे श्लोक ) हे सर्वच काव्य ( ह्याला अपवाद नाही ) वक्र ( विपथित / विचलित, चमत्कृतिपूर्ण वा सौन्दर्यसंपन्न ) स्वरूपाच्या वचनांनी युक्त असणे इष्ट मानले आहे ].

( ii ) दण्डीने 'पद्यं गद्यं च मिश्रं च तत् त्रिधैव व्यवस्थितम् ।'[118] [ अर्थात इष्टार्थयुक्त शब्दावली हे ज्याचे शरीर आहे असे काव्य पद्य, गद्य व पद्य-गद्य-मिश्र असे तीनच प्रकारचे असते [ तिनाहून अधिक प्रकार नसतात असे समजावे ], या उक्तीतही एक निश्चितार्थक विधान केले आहे.

( iii ) राजशेखराने 'वरमकविर्न पुन: कुकवि: स्यात् ।'[119] [ अर्थात अकवी असणे परवडले, पण वाईट कवी असणे चांगले नाही ] हे असेच ठासून तत्त्वप्रतिपादन केले आहे की ज्याला अपवाद वा सूटसवलत मुळीच नाही.

अशा अपरिवर्तनीय व निरपवाद नियमांची व / वा विधानांची अनेक उदाहरणे आनन्दवर्धन, हेमचन्द्र, वामन इत्यादींपैकी प्रत्येकाच्या ग्रन्थात सर्रास आढळून येतात. सामान्यपणे अशा विधानांत एव व सर्वथा ही अव्यये वापरलेली आढळतात. ह्या युक्तीच्या आधारे काव्यशास्त्रातील समस्त अपरिवर्तनीय नियमांचे संकलनपूर्वक लेखन करणे शक्य आहे. त्या दृष्टीने ही युक्ती महत्त्वाची ठरते. आता ह्यानंतरच्या तंत्रयुक्तीचे स्वरूप समजून घेऊ.

## (17) दृष्टान्त [ =उदाहरण, दाखला किंवा निदर्शन ]

**लक्षण :** फक्त विष्णुधर्मोत्तरपुराणकाराने हिचे लक्षण दिले आहे, ते असे ;

'तद्युक्तिनिदर्शनं दृष्टान्त: ।'[120]

**अर्थ :** युक्तिपूर्ण ( तर्कशुद्ध ) उदाहरण देणे म्हणजे दृष्टान्त तंत्रयुक्ती. शास्त्रकार एखादा शास्त्रीय मुद्दा विशद करण्यासाठी एखादा दाखला किंवा उदाहरण देतो.

त्यायोगे तो शास्त्रीय मुद्दा सुखावह होऊन समजतो. अनुमानातील पंचावयवांपैकी उदाहरण किंवा दृष्टान्त ह्याचे जे 'ज्ञापक' कार्य तेच शास्त्रीय ग्रन्थातील या दृष्टान्ताचे कार्य आहे. हा दृष्टान्त शास्त्रीय ग्रन्थ-व्यवस्थेतील एक साधन आहे, तर काव्यातील दृष्टान्त हा एक अलङ्कार असून साध्य आहे. दोहोंतील हा फरक ध्यानात ठेवला म्हणजे शास्त्रातील प्रस्तुतचा दृष्टान्त आणि काव्यातील अलंकाररूप दृष्टान्त एकच मानण्याचा घोटाळा होणार नाही.

**प्रकार्ये :** ( 1 ) दृष्टान्ताच्या योगे शास्त्रकाराचे युक्तिवाद एकीकडे बुद्धीला पटतात व दुसरीकडे मनाला रिझवितात. ( 2 ) दुर्बोध व रूक्ष शास्त्र वाचनीय व रंजक बनते.

**उदाहरणे**—( i ) राजशेखराची खालील वचने दृष्टान्ताची उदाहरणे आहेत.

'संस्कारो हि सर्वस्य गुणमुत्कर्षयति । द्वादशवर्णमपि सुवर्णं पावकपाकेन हेमीभवति ।'[121] [ संस्कार प्रत्येकाच्या गुणांचा प्रकर्ष साधतो. सोनेही अग्नीत घालून तापवले की पिवळेधमक होते ].

'स यत्स्वभाव: कविस्तदनुरूपं काव्यम् । यादृशाकारश्चित्रकरस्तादृशाकारमस्य चित्रमिति प्रायोवाद: ।'[122] [ जसा कवीचा स्वभाव तसे त्याचे काव्य. जसा चित्रकार तसे त्याचे चित्र ].

( ii ) केशवमिश्राच्या खालील उक्तीतही सुन्दर दृष्टान्त आहे :

'अलङ्कारसहस्रै: किं गुणो यदि न विद्यते ।
विक्रीयन्ते न घण्टाभिर्गाव: क्षीरविवर्जिता: ।।'[123]

अर्थात—काव्यात गुण अजिबात नसला तर त्याच्या हजारो अलंकारांचा काय उपयोग ? सुंदर घंटा गळ्यात बांधलेल्या गायी जर दूध देणाऱ्या नसतील तर त्यांना बाजारात कोणी विकत घेत नाही.

पुराणकाराव्यतिरिक्त इतरांनी दृष्टान्ताऐवजी निदर्शन तंत्रयुक्ती मानली आहे. म्हणून आता तिचाच परामर्श घेऊ.

## (18) निदर्शन [ =उदाहरण, दाखला किंवा दृष्टान्त ].

**लक्षण :** 'यन्निदर्शयितव्यं सूक्ष्ममप्यर्थं स्वधर्मसादृश्यात् । स्पष्टीकरोत्यादर्श इव मुखविधुम् ।[124]

**अर्थ :** सूक्ष्म वर्ण्यविषय व दाखला यांतील धर्मसादृश्यामुळे, आरशात प्रतिबिम्बित झालेला मुखचंद्र जसा स्पष्ट दिसावा, तसा वर्ण्यविषय सुविशद होतो.

**इतर छटा :** ( 1 ) विद्वान व अविद्वान यांना सारखाच समजणारा दाखला, ( 2 ) दृष्टान्ताद्वारे वर्ण्यविषयाची सिद्धी, ( 3 ) दाखला म्हणजे साध्याचा एक भाग, ( 4 ) असंभाव्य अर्थही स्थापित करणारा दाखला, ( 5 ) दुसऱ्या विषयाच्या अर्थावर प्रकाश टाकणारे उदाहरण.

**प्रकार्ये**: ( 1 ) पंडितांना व सर्वसाधारण बुद्धीच्या वाचकांना–दोघांनाही-शास्त्रीय विषय आकलनीय बनवणे, ( 2 ) प्रतिपाद्य विषय सिद्ध / प्रस्थापित करणे, ( 3 ) सूक्ष्म शास्त्रीय संकल्पनांचे नितळ व लख्ख स्पष्टीकरण करणे, ( 4 ) ग्रन्थकाराचे तर्कपूत युक्तिवाद वाचनीय बनवणे.

**उदाहरणे**—( i ) दृष्टान्त तंत्रयुक्तीच्या विवरणात काही उदाहरणे उद्धृत केलीच आहेत. येथे वामनाच्या ग्रंथातील दोन अशी उदाहरणे उतरून घेऊ की, ज्यांत 'निदर्शन' या संज्ञेचा साक्षात प्रयोगच केलेला आहे. पहिले उदाहरण असे :
'न शास्त्रमद्रव्येष्वर्थवत् ॥ 4 ॥ न खलु शास्त्रमद्रव्येष्वविवेकिष्वर्थवत् । निदर्शनमाह–न कतकं पङ्कप्रसादनाय ॥ 5 ॥'[125]

अर्थात —अनधिकारी व्यक्तींच्या बाबतीत शास्त्र फलद्रूप होत नाहीच. अद्रव्येषु म्हणजे अविवेकी व्यक्तींचे बाबतीत शास्त्र सफल होत नाही, हे निश्चित समजावे. ह्या बाबतीत दाखला असा–निवळी चिखल निर्मळ करण्यास समर्थ नसते ( निवळीमुळे फक्त गढूळ पाणी स्वच्छ होते ).

दुसरे उदाहरण : 'तत्तु न; अतत्त्वशीलस्य तत्त्वानिष्पत्तेः ॥ 17 ॥
'न ह्यतत्त्वं शीलयतस्तत्त्वं निष्पद्यते ।
निदर्शनार्थमाह—न शणसूत्रवानाभ्यासे त्रसरसूत्रवानवैचित्र्यलाभः ॥ 18 ॥'[126]

( वैदर्भीवर प्रभुत्व मिळवण्यासाठी गौडीया व पांचाली यांचा अभ्यास करावा असे काही विचारवंत मानतात ). परंतु ते बरोबर नाही. स्वरूपाभावाच्या किंवा स्वरूपभिन्नतेच्या अभ्यासाच्या द्वारे स्वरूपाची निष्पत्ती होत नसते. अस्वरूपाचे परिशीलन करणाऱ्या पुरुषास स्वरूपाची प्राप्ती किंवा ज्ञान होत नाही. उदाहरणार्थ पाहा–तागाच्या सुताचे वाण बनवण्याचा अभ्यास केल्याने टसरच्या धाग्याचे वस्त्र विणण्याचे कसब येणार नाही.

वरील दोन्ही उदाहरणांतील दाखले अत्यंत व्यावहारिक असल्यामुळे ते ज्ञानी व अडाणी अशा दोन्ही वर्गांतील व्यक्तींना सहज समजण्यासारखे आहेत. त्यांच्या योगे विवेच्य विषय कमालीचा स्पष्ट झाला आहे. म्हणूनच ह्या तंत्रयुक्तिरूप ज्ञानसाधनाला शास्त्रीय ग्रंथव्यवस्थेत निश्चित स्थान आहे. मात्र दृष्टान्त व निदर्शन यांचे कार्य एकच असल्यामुळे अनावश्यक विस्तार टाळून लाघव ( brevity ) साधण्यासाठी सापेक्षतया अधिक परिचित जो दृष्टान्त तो मानणे व निदर्शनाचा त्यातच अन्तर्भाव करणे इष्ट ठरेल. आता नियोगाचे स्वरूप जाणून घेऊ.

**(19) नियोग** [ =आज्ञा, अधिकृत आदेश, विधिपर विधान ].

पूर्ववर्णित उपदेश [ परिच्छेद क्र. 13 ] व एकान्त [ परिच्छेद क्र. 16 ] आणि प्रस्तुतचा नियोग यांतील सीमारेषा निश्चित करणे आवश्यक आहे. सुश्रुतसंहितेचा टीकाकार जो डल्हण त्यालाही उपदेश व नियोग यांतील भेद स्पष्ट करण्याची गरज

भासली व म्हणून त्याने पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण केले आहे : 'ननूपदेशनियोगयोः को भेदः ? उच्यते, प्रायिक उपदेशः यथा-रात्रौ न जागृयादिति प्रायिकत्वेनोपन्यस्तं, कफाद्यभिभूते तु तत्र रात्रिजागरणस्यापि शस्तत्वात्; दिवा न स्वापं कुर्यादित्यपि प्रायिकं, ग्रीष्मे तृणाद्यन्वये च दिवास्वापस्योचितत्वात्; नियोगश्चाप्रायिकः, यथा पथ्यमेव भोक्तव्यमिति; यद्यपि 'ज्वरितोऽहितमश्नीयाद्यद्यप्यस्यारुचिर्भवेत्' इत्यादिनाऽपथ्यभोजनस्याप्यवकाशः, तथाऽपि तदानीमपथ्यस्यैव पथ्यत्वमिति नियोगस्य व्यभिचारो नास्ति ।'[127]

डल्हणाच्या वरील टीकेचा आशय असा की, उपदेश सापवाद असतो, त्यामुळे त्याचे अगदी काटेकोर पालन केलेच पाहिजे असे नसते. पण नियोग निरपवाद असतो. तदनुसार आचरण अवश्य कर्तव्य असते. थोडक्यात, उपदेशातील आदेशाचे पालन ऐच्छिक असते तर नियोगातील आदेशाचे पालन अनिवार्य असते. डल्हणाच्या ह्या खुलाशासंबंधी एक शंका उपस्थित होते ती अशी की, उपदेश हे जर आप्तवचन असते तर त्याचे उल्लंघन कसे संभवते ? म्हणून असे सुचवावेसे वाटते की, उपदेश म्हणजे 'सर्वसाधारण आदेश' तर नियोग म्हणजे 'अवश्य परिपालनीय आदेश'. तिसरी संज्ञा जी एकान्त तिचा अर्थ निरपवाद नियम.

**संज्ञान्तर :** संनियोग ( चरक )

**लक्षण :** 'यो यस्यानुष्ठेयः ।'[128]

**अर्थ :** ज्याने ज्याचे अनुष्ठान ( आचरण ) करावे असे.

**इतर छटा :** (1) 'असे करा, वेगळे काही करू नका' असा आदेश. (2) 'असेच वागा' असा आदेश. (3) 'हेच किंवा असेच.'

**प्रकार्ये :** (1) वाचकाला कर्तव्य व अकर्तव्य यांचा बोध होतो. (2) गौण अर्थाने केलेले आदेश समजून घेण्यास वाचकाला ही युक्ती शिकवते. (3) हिच्या योगे स्थलकालातीत सत्यांचे ज्ञान होते.

**उदाहरणे :** ( i ) भामह प्रतिज्ञावर्णनाच्या बाबतीत पुढील अव्यभिचारी आदेश देतो : 'कार्योऽन्यत्र प्रतिज्ञायाः प्रयोगो न कथञ्चन । परित्यागश्च कर्तव्यो नाऽऽसां चतसृणामपि ॥'[129] [ अर्थात, प्रतिज्ञेचा प्रयोग दुसऱ्या संदर्भात कधीच करू नये. तसेच ह्या ( =धर्म-अर्थ-काम-कोप-मूलक ) चार प्रतिज्ञांचा त्यागही कधी करू नये म्हणजेच यांचे वर्णन अवश्य करावे. ]

( ii ) हेमचन्द्र ठासून आदेश देतो : '....उत्साहस्तु मानुषेभ्योऽन्येषु मानुषेषु तु यावदवदानं प्रसिद्धं उचितं वा, तावदेव वर्णनीयम् ।'[130] [ अर्थात अचाट कार्याविषयीचा उत्साह मनुष्यांव्यतिरिक्त दिव्य व्यक्तींच्या संदर्भात वर्णावा. पृथ्वीतलावरील मनुष्य जितके अचाट कृत्य करू शकतो अशी प्रसिद्धी असेल, किंवा जितके त्याच्या बाबतीत उचित असेल, तितकेच वर्णावे. त्याहून अधिक वर्णन करू नये ].

( iii ) वामन होतकरू कवीला छंद:शास्त्राच्या अभ्यासाचा उपदेश करताना साग्रह म्हणतो : 'काव्याभ्यासाद्वृत्तसंक्रांतिर्भवत्येव ।'[181] अर्थात—इतर कवींनी रचलेली काव्ये अभ्यासल्याने वृत्ताचे ज्ञान होतेच होते ( त्याविषयी शंका नाही ).

वरील वचनांत 'एव' ह्या अव्ययाचा प्रयोग आढळतो. तसाच तो पूर्ववर्णित एकान्तातही आढळतो. त्यामुळे उत्पन्न होणाऱ्या घोटाळ्याचे निवारण करण्यासाठी असे सुचवावेसे वाटते की, जेव्हा एखाद्या विधानात एखादा सार्वत्रिक नियम सांगितलेला असतो तेव्हा त्यात 'एकान्त' आहे असे मानावे व बाकीच्या स्थळी 'नियोग' आहे असे समजावे. आता निर्णयाकडे वळू.

**(20) निर्णय** [ =निश्चय, निर्धार, निष्कर्ष ]

**लक्षण :** 'यन्निवारितस्यार्थस्य प्रतिष्ठापनम् ।'[182]

**अर्थ :** संदिग्ध वा आक्षेपार्ह अर्थाचे निवारण करून निष्कर्ष सांगणे. ह्याच्या योगे तत्त्वदर्शन होते. [ 'निर्णयस्तत्त्वदर्शनम् ।'[183] ]

**इतर छटा :** ( 1 ) आक्षेपाला उत्तर, ( 2 ) अप्रतिपादिताच्या व्यर्थतेचा निश्चय, ( 3 ) संदिग्ध विषयाचे स्थिरीकरण, ( 4 ) विविध मते विचारात घेऊन निष्कर्ष काढणे, ( 5 ) प्रतिपाद्यविषयक संशयाचे निरसन.

**प्रकार्ये :** ( 1 ) एखाद्या शास्त्रीय विषयाबद्दलची मतमतांतरे जिज्ञासूला कळवणे, ( 2 ) ग्रंथकाराला स्वत:चा दृष्टिकोण स्थिरपद करण्याची संधी देणे, ( 3 ) इतरांच्या बुद्धिभेदकारक मतांचे कायमचे निरसन करणे, ( 4 ) प्रतिपाद्य विषयाच्या सत्स्वरूपा-विषयीचे वाचकाचे ज्ञान वाढवणे.

**उदाहरणे :** ( i ) 'काव्यातील सौन्दर्य' ह्या नेहमीच्या विवाद्य विषयाबद्दलची स्वत:ची निर्णायक विचारसरणी भामहाने खालील शब्दांत सांगितली आहे : 'रूपकादिमलङ्कारं बाह्यमाचक्षते परे । सुपां तिङां च व्युत्पत्तिं वाचां वाञ्छन्त्य-लङ्कृतिम् ।। तदेतदाहु: सौशब्द्यं नार्थव्युत्पत्तिरीदृशी ।।'[184] [ अर्थात, दुसरे अलंकार-शास्त्रज्ञ रूपकाला बाह्य अलंकार मानतात. ते नामे व क्रियापदे यांच्या रूपांच्या सौन्दर्यालाच काव्याचा अलंकार समजतात. ते वस्तुत: शब्दसौन्दर्य आहे, अर्थसौन्दर्य असे असत नाही. ]

( ii ) आनन्दवर्धनाने वाच्यार्थ व व्यंग्यार्थ यांच्या प्रतीतीत प्रदीप-घट न्याय मानणे सदोष नाही हे पटवताना प्रथमत: असा युक्तिवाद केला आहे की, वाच्य व व्यंग्य यांत गौण-प्रधान-संबंध असतो. म्हणजे कधी व्यंग्यार्थ प्रधान असतो व वाच्यार्थ गौण असतो, तर कधी ह्याच्या उलट स्थिती असते. आता जेव्हा व्यंग्यार्थ प्रधान असतो तेव्हा त्याला ध्वनिकाव्य म्हणतात व वाच्यार्थ प्रधान असतो तेव्हा त्याला गुणीभूतव्यंग्य काव्य म्हणतात. एवढे लिहिल्यावर आनंदवर्धनाने निष्कर्ष पुढील शब्दांत नोंदला आहे : 'तस्मात् स्थितमेतत्—व्यंग्यपरत्वेऽपि काव्यस्य, न व्यंग्य-

स्याभिधेयत्वम्, अपि तु व्यंग्यत्वमेव ।'[135] [ अर्थात–म्हणून हे सिद्ध झाले की, काव्य व्यंग्यप्रधान असले तरीही व्यंग्यार्थ हा वाच्य नसून व्यंग्यच असतो. ]

( iii ) राजशेखराच्या खालील उक्तींतही ह्या युक्तीचेच दर्शन घडते : " 'असत्यार्थाभिधायित्वान्नोपदेष्टव्यं काव्यम्' इत्येके ।....'न' इति यायावरीयः । 'नासत्यं नाम किञ्चन काव्ये यस्तु स्तुत्येष्वर्थवादः । स न परं कविकर्मणि श्रुतौ च शास्त्रे च लोके च ॥'....'असदुपदेशकत्वात्तर्हि नोपदेष्टव्यं काव्यम्' इत्यपरे ।.... 'अस्त्ययमुपदेशः । किन्तु निषेध्यत्वेन न विधेयत्वेन' इति यायावरीयः ।....'असभ्यार्थाभिधायित्वान्नोपदेष्टव्यं काव्यम्' इति च केचित् ।' प्रक्रमापन्नो निबन्धनीय एवायमर्थः' इति यायावरीयः ।"[136]

प्रत्येक शास्त्रकाराला मतमतांतरांचे मंथन व खंडन करून सन्मताचा निर्णय करावाच लागतो. अर्थात ही युक्ती शास्त्रप्रणालीत अनिवार्य आहे. निर्णय तंत्रयुक्तीच्या योगे न्यासव्याख्या व फलव्याख्या गतार्थ होतात.

## (21) निर्देश [ =विस्तृत/तपशीलवार उल्लेख ]

ह्यापूर्वी उद्देशविषयक चर्चेत [ परिच्छेद 11 ] म्हटल्याप्रमाणे निर्देश उद्देशाच्या [ संक्षिप्त उल्लेखाच्या ] विरुद्ध असतो. उद्देशावाचून निर्देश संभवत नाही. म्हणून निर्देश हा नेहमी उद्देशानुगामी असतो. परंपरेनुसार निर्देश म्हणजे 'विस्तारपूर्वककथनम् ।'[137]

**लक्षण :** 'तस्यैव विस्तारोक्तिः ।'[138]

**अर्थ :** तस्य=उद्देशस्य उद्देशाच्या [ =नामतः संक्षिप्त उल्लेखाच्या ] विस्तृत वचनास निर्देश म्हणतात.

**इतर छटा :** ( 1 ) वर्ण्य विषयाची काही वैशिष्ट्ये प्रदर्शित करण्यासाठी पूर्वोक्तीचा पुनरुच्चार करणे, ( 2 ) पूर्वोक्त क्रमानेच, वर्ण्य विषयाचे तपशीलवार वर्णन.

**प्रकार्ये :** ( 1 ) उद्दिष्ट विषयाचा तपशील पुरवणे, ( 2 ) अतिव्यापक विषयाच्या उपविषयांचा परिचय करून देणे, ( 3 ) शास्त्रीय ग्रंथाला पद्धतशीर रूप देणे.

**उदाहरणे :** ( i ) पृथ्वीच्या अंतापर्यंत टिकून राहणारे यश मिळवू इच्छिणाऱ्या कवीला भामहाने 'यत्नो विदितवेद्येन विधेयः काव्यलक्षणः ।'[139] [ अर्थात त्याने सर्व ज्ञेय विषय जाणून घेऊन काव्यनिर्मितीचा प्रयत्न करावा ] असा प्रथमतः संक्षिप्त उपदेश करून तदनंतर त्या ज्ञेय विषयांचा विस्ताराने खुलासा असा केला आहे : 'शब्दश्छन्दोभिधानार्था इतिहासाश्रयाः कथाः । लोको युक्तिः कलाश्चेति मन्तव्या काव्यगैर्ह्यमी ॥'[140]

( ii ) केशवमिश्राने प्रथमतः 'रीतिरुक्तिस्तथा मुद्रा वृत्तिः काव्यस्य जीवितम् ।'[141] ह्या शब्दांत प्रथमतः रीती, उक्ती, मुद्रा व वृत्ती यांचा 'उद्देश' केला असून नंतर 'पद्येषु रीतयो गौडी वैदर्भी मागधी तथा ।';[142] लोकच्छेकार्भकोन्मत्तभेदादुक्तिश्चतुर्विधा ।';[143]

'मुद्रा पदस्य वाक्यस्य विभक्तेर्वचनस्य च ।'[144] आणि 'तिस्रो वृत्तयः पदानां भवति, शक्तिर्लक्षणा व्यञ्जना चेति ।'[145] ह्या शब्दांत त्यांचाच निर्देश [ विस्तृत उल्लेख ] केला आहे.

( iii ) राजशेखराने आपल्या ग्रंथाच्या दुसऱ्या अध्यायात प्रथमतः शास्त्राचे पौरुषेय व अपौरुषेय असे दोन मुख्य प्रकार नामतः उल्लेखिले[146] असून त्यानंतर अपौरुषेयाचे सर्व उपप्रकार[147] आणि पौरुषेयाचे पुराण, आन्वीक्षिकी, मीमांसा व स्मृतितन्त्र हे चार प्रकार[148] विस्ताराने प्रतिपादले आहेत.

( iv ) क्षेमेन्द्राने सकल काव्यरूप शरीराला व्यापून असणाऱ्या जीवितभूत औचित्याची उपलब्धिस्थाने 'पदे वाक्ये प्रबन्धार्थे....'[149] इत्यादी एकेका शब्दाच्या उल्लेखाने प्रथमतः सांगितली व नंतर त्यांपैकी प्रत्येकाचा विस्ताराने उल्लेख क्रमशः केला. उदाहरणार्थ, प्रथम संक्षिप्त उल्लेखात 'कारक' एवढेच म्हटले, पण पुढे कर्तृ, कर्म, करण, संप्रदान, अपादान व अधिकरण या सर्वांची चर्चा केली.[150]

( v ) वामनाने 'लोको विद्या प्रकीर्णं च काव्याङ्गानि ।'[151] ह्या शब्दांत तीन काव्यांगांचा संक्षिप्त उल्लेख केला व नंतर त्यांचा क्रमशः 'लोकवृत्तं लोकः ।',[152] 'शब्दस्मृत्यभिधानकोशच्छन्दोविचितिकलाकामशास्त्रदण्डनीतिपूर्वा विद्याः ।'[153], व 'लक्ष्यज्ञत्वमभियोगो वृद्धसेवावेक्षणं प्रतिभानमवधानं च प्रकीर्णम् ।।'[154] ह्या शब्दांत सविस्तर उल्लेख केला. ह्या उपायामुळे शास्त्रीय ग्रंथाला पद्धतशीरपणा प्राप्त होतो. तो कोणत्याही शास्त्रीय ग्रंथाला आवश्यक असतो. उद्देश व निर्देश या युक्त्यांच्या योगे अधिकरणव्याख्या [ 'यद्वस्तुक्तमारभ्य तदनुषङ्गेण व्याख्यानमारभ्यते ।'[155] ] व कृच्छ्रव्याख्या ['यत्र लेशत उक्तानामविस्पष्टानां प्रकरणे सूत्रे वा अर्थानां यत्नत उद्भावनं क्रियते ।'[156]] हे दोन व्याख्याप्रकार गतार्थ होतात. आता निर्वचनाकडे वळू.

## (22) निर्वचन [ =शब्दाच्या स्वरूपाचे स्पष्टीकरण; व्युत्पत्ती ]

**लक्षण :** 'निर्णयार्थं वचनं निरुक्तम् ।'[157]

**अर्थ :** शास्त्रीय शब्दाच्या अर्थाचा निर्णय व्हावा ह्यासाठी केलेली त्या शब्दाची उकल किंवा सांगितलेली व्युत्पत्ती. हिच्या योगे शब्दाच्या सिद्धीचे आकलन होते.

**इतर छटा :** ( 1 ) फक्त विद्वानांना समजेलसा दाखला देणे, ( 2 ) निश्चितार्थबोधक किंवा निर्णायक विधान, ( 3 ) लोकप्रसिद्ध उदाहरण, ( 4 ) वाक्यार्थ प्रकट करणारा खुलासा.

**प्रकार्ये :** ( 1 ) शास्त्रीय संज्ञांचा अचूक धात्वर्थ / घटकशब्दार्थ विशद करणे, ( 2 ) शास्त्रीय ग्रंथाची विश्वसनीयता वाढवणे, ( 3 ) शास्त्रीय ग्रंथ उद्बोधक व वाचनसुखद बनवणे.

**उदाहरणे :** (i) काव्यशास्त्रकारांनी 'दीपक' अलंकार मानला आहे. त्या शब्दाची उकल भामहाने अशी केली आहे: 'अमूनि कुर्वतेऽन्वर्थामस्याख्यामर्थदीपनात् ।'[158]

[ आदिदीपक, मध्यदीपक व अन्तदीपक हे तीन प्रकार अर्थ प्रकाशित करणारे असल्यामुळे ह्या अलंकाराची 'दीपक' ही संज्ञा सार्थ करतात. ]

(ii) राजशेखराने 'काव्यमीमांसा' शब्दाचे मोठे मार्मिक निर्वचन असे केले आहे: 'इयं सा काव्यमीमांसा मीमांसा यत्र वाग्लवः ।।'[159]. वाग्लव म्हणजे काव्य व मीमांसा म्हणजे सत्स्वरूपाचा विचारपूर्वक निर्णय.

(iii) हेमचन्द्राने खाली उद्धृत केलेल्या वचनांत संकेतार्थाला मुख्यार्थ का म्हणतात ते, व्युत्पत्ती विशद करून, सांगितले आहे.

'अव्यवधानेन यत्र संकेतः क्रियते स मुखमिव हस्ताद्यवयवेभ्योऽर्थान्तरेभ्यः प्रथमं प्रतीयते इति मुख्यः ।'[160]

(iv) वामनानेही 'अप्रस्तुतार्थस्य प्रशंसनमप्रस्तुतप्रशंसा ।'[161] व '....अर्थान्तरस्य ....न्यसनं....अर्थान्तरन्यासः ।'[162] ह्या शब्दांत क्रमशः अप्रस्तुतप्रशंसा व अर्थान्तरन्यास यांची रूपसिद्धी केली आहे. शास्त्रीय ग्रंथाच्या चौकटीत ह्या युक्तीला शास्त्रीय शब्दांच्या मूळाकडे वाचकाला घेऊन जाण्याचे महत्त्वाचे कार्य बजावयाचे असते. त्या दृष्टीने ही युक्ती उल्लेखनीय ठरते. ह्या युक्तीच्या वर नमूद केलेल्या 1 व 3 ह्या इतर छटा स्वतंत्र न मानता त्यांचा दृष्टान्तात समावेश करणे योग्य.

## (23) नैकान्त [ =परिवर्तनीय नियम ]

**संज्ञान्तरे :** अनैकान्त ( चक्रपाणिदत्त ); अनेकान्त ( सुश्रुत, विष्णुधर्मोत्तरपुराण ). नैकान्त=न+एकान्त. अर्थात ही युक्ती पूर्वविवेचित एकान्ताच्या ( परिच्छेद 16 ) विरुद्ध आहे.

**लक्षण :** 'अन्यतरपक्षानवधारणात् ।'[163]

**अर्थ :** दोहोंपैकी कोणताही एक पक्ष किंवा युक्तिवाद निर्धारित न करणे.

**इतर छटा :** ( 1 ) काही बाबतीत लागू पडणारा व काही बाबतीत लागू न पडणारा असा सापवाद नियम. ( 2 ) विविध मतमतान्तरे उद्धृत करणे.

**प्रकार्ये :** ( 1 ) प्रयोगनिष्ठ शास्त्रात काही नियम निश्चित व सार्वकालिक असतात तर काही लवचिक व परिवर्तनीय असतात. अशांची व्यवस्था लावणे. ( 2 ) मतमतांतरे व्यक्त करणे. ( 3 ) विविध विचारप्रवाहांच्या संकलनाची व अध्ययनाची सोय उपलब्ध करून देणे

**उदाहरणे :** ( i ) हेमचन्द्राने 'जातिरेव संकेतविषय इत्येके । तद्वानित्यपरे । अपोह इत्यन्ये ।'[164] ह्या विधानांत जातिविषयक भिन्नभिन्न मते एकत्र केली आहेत. हेमचन्द्रानेच गौण अर्थाच्या बाबतीत 'गौर्वाहीकः' हे प्रसिद्ध उदाहरण देऊन तद्विषयक मतमतान्तरे नोंदली आहेत.[165]

( ii ) काव्यात पदगत, पदार्थगत, वाक्यगत व वाक्यार्थगत गुणांना वैशेषिक गुण म्हणतात कारण ते कधी गुण असतात, तर कधी दोष असतात. केशवमिश्राने, खालील अवतरणात, एतद्विषयक विविध दृष्टिकोण संकलित केले आहेत.

'केचित्तु—एतेषामेव दोषाणां स्थानेष्वेतेष्वदोषता ।
परं नत्वस्ति गुणता पार्थक्यमनयोर्यतः ।।

अन्ये तु—क्वचिददोषतामात्रम्, क्वचिद्गुणतापि । तत्र सहृदयानामेव प्रतीतिः साक्षिणी । तदाहुः—

अलङ्कारे गुणे दोषे रसे वा काव्यसम्पदाम् । प्रतीतिरेव विदुषां प्रमाणमवसीयते ।।

श्रीपादस्तु—'रसोत्पत्तिप्रतिबन्धकतयैवैतेषां दोषता ।

यत्र केनापि निमित्तेन न रसप्रतिबन्धः, तत्रादोषत्वमुचितमेवे'त्याह ।।'[166]

वैशेषिक गुण गुणही असतात व दोषही असतात, म्हणजेच त्यांची स्थिती अ-निश्चित असते. ही प्रस्तुत युक्तीची एक छटा झाली. केशवमिश्राने इतरांची मते उद्धृत केली आहेत, ती दुसरी छटा झाली.

ही दुसरी छटा पूर्ववर्णित अनुमतासारखीच ( परिच्छेद 6 ) आहे. त्यामुळे ही अनुमतात विलीन करणे योग्य ठरेल. मग सापवाद नियम ही एकच छटा राहील व ती भौतिकेतर शास्त्रांच्या बाबतीत ग्राह्यच ठरेल. आता पदार्थ तंत्रयुक्ती समजून घेऊ.

## (24) पदार्थ [ =शब्दाचा अर्थ, ज्याच्याविषयी बोलावयाचे तो ]

**लक्षण :** 'पदेनार्थो गम्यते ।'[167]

**अर्थ**—पदाने ( शब्दाने ) पदार्थाचा ( शब्दार्थाचा ) बोध होतो.

अर्थ हा शब्दाचा प्राण आहे. शब्दाचे सारे महत्त्व अर्थावर अवलंबून असते. प्रयुक्त शब्दापासून अर्थाचे ग्रहण कसे होते हा प्रश्न महत्त्वपूर्ण आहे. व्याकरणशास्त्रानुसार हे अर्थज्ञान संकेतग्रहाने किंवा शक्तिग्रहाने होते. त्याला वृत्तिज्ञान, शक्तिज्ञान शक्तिग्रह किंवा संकेतग्रह म्हणतात. शब्दाचा जो शब्दार्थाशी संबंध असतो त्याला शक्ती म्हणतात. ह्या शक्तिग्रहाची=पदार्थज्ञानाची पुढीलप्रमाणे आठ प्रमुख साधने सांगितलेली आहेत—व्याकरण, उपमान, कोष, आप्तवाक्य, वृद्धव्यवहार, वाक्यशेष, विवृती व सिद्धपदाचे सांनिध्य. कोणत्याही शास्त्रीय ग्रन्थात व्यावहारिक व पारिभाषिक असे उभयविध शब्द वापरलेले असतात. पैकी व्यावहारिक [ सर्वसाधारण भाषेतील ] शब्दांचे ज्ञान व्याकरण, उपमान, कोश, वृद्धव्यवहार व सिद्धपदाचे सांनिध्य ह्या साधनांनी होते, परंतु पारिभाषिक शब्दांच्या ज्ञानासाठी आप्तवाक्य, वाक्यशेष ( =प्रकरण किंवा संदर्भ ) व विवृती या साधनांची आवश्यकता असते.[168]

अमुक शब्दापासून अमुक अर्थ घ्यावा किंवा अमुक अर्थ अमुक शब्दाने ज्ञेय आहे ह्याला संकेत म्हणतात. ज्या संकेताने शास्त्रगत पारिभाषिक शब्दांचे अर्थज्ञान होते त्या संकेताला भर्तृहरीने आधुनिक संकेत म्हटले आहे. हा संकेत भिन्न-भिन्न शास्त्रकारांच्या द्वारे निर्मित तांत्रिक व पारिभाषिक शब्दांशी संबद्ध असतो.[169]

भर्तृहरीच्या मतानुसार अर्थग्रहणापूर्वी शब्द व अर्थ पृथक मानले जाऊ शकतात, पण अर्थग्रहणाबरोबर दोन्ही एक होतात; शब्द व अर्थ एकाच वस्तूचे दोन धर्म

आहेत. भर्तृहरी पुढे असा खुलासा करतो की, शब्द हा प्रकाशक किंवा कारण असतो आणि अर्थ हा प्रकाश्य किंवा कार्य असतो. त्याचा टीकाकार जो पुण्यराज त्याने ह्याबाबतीत अशी पुस्ती जोडली आहे की, शब्द हा गौण असून अर्थ हा प्रधान किंवा प्रमुख असतो.[170]

पदार्था ( = शब्दार्था ) च्या बाबतीत आणखी एक खुलासा करणे आवश्यक आहे. तो असा की, एकच पारिभाषिक शब्द भिन्नभिन्न शास्त्रांत वापरलेला आढळत असला तरी त्याचा त्या-त्या शास्त्राच्या संकेतानुसार अर्थ घ्यावयाचा असतो.

**इतर छटा :** ( 1 ) प्रयुक्त शब्दापुरता मर्यादित अर्थ, ( 2 ) विशिष्ट ज्ञानशाखेला संमत अर्थ, ( 3 ) मागचा-पुढचा संबंध वा क्रम ध्यानात घेऊन निर्धारित करावयाचा अर्थ, ( 4 ) सूत्राचा अर्थ, ( 5 ) अनेक अर्थ प्रकाशित करणारा एकच शब्द, ( 6 ) निरनिराळ्या शब्दांनी प्रकट होणारा एकच अर्थ.

**प्रकार्ये :** ( 1 ) शब्दाचा अर्थ सीमित करणे, ( 2 ) अनेकार्थक शब्दांच्या मुक्त प्रयोगाची लेखकाला मुभा देणे, ( 3 ) कोणता शब्द कोणत्या अर्थी वापरला आहे त्याचा बोध करवणे, ( 4 ) शब्दार्थविषयक संदेह दूर करणे, ( 5 ) वाचकाला संदर्भा-विषयी दक्षता बाळगण्यास भाग पाडणे. ह्या दृष्टीने ह्या तंत्रयुक्तीची अर्थापत्ती व ऊह्य यांच्याशी तुलना संभवते.

**उदाहरणे :** ( i ) राजशेखराच्या 'मनस एकाग्रता समाधिः।'[171] या सूत्ररूप वचनातील 'समाधि' ही काव्यशास्त्रातील संज्ञा आहे, योगशास्त्रातील नाही. म्हणून 'समाधि' शब्दाचा अर्थ हा पदार्थ आहे, तसेच समग्र सूत्रवाक्याचा अर्थही पदार्थ होय.

( ii ) वामनाने 'लोक' शब्दाचा अर्थ 'लोकवृत्तं'[172] असा दिला आहे. त्याने पांचाली,[173] समता,[174] शृंखला,[175] लोकविरुद्ध[176] असे व्यवहारात प्रचलित असलेले कितीतरी शब्द वापरले आहेत. पण त्यांचे अर्थ क्रमशः एक रीती; शब्द व अर्थ यांचा काव्यगत विशिष्ट धर्म; यमकभंगाचा प्रकार; देशकालस्वभावविरुद्ध वाक्यार्थ असे घ्यावयाचे आहेत.

हा शास्त्रोपाय अत्यावश्यक आहे हे वेगळे सांगावयास नको. ह्या युक्तीच्या योगे पदार्थव्याख्या [= 'तेषामेव पदानां विवरणम् । यथा अतः शब्दो हेतावित्यादि ।'[177]] हा व्याख्याप्रकार गतार्थ होतो. आता पूर्वपक्ष विचारात घेऊ

## (25) पूर्वपक्षः [ = आक्षेपात्मक युक्तिवाद, खंडनीय मत ]

**संज्ञावैशिष्ट्य :** ही सापेक्ष संज्ञा आहे. पूर्वपक्षातील युक्तिवादाचे खंडन उत्तर-पक्षात केलेले असते. ह्या दोन्ही संज्ञा वादविद्येशी संबद्ध आहेत. तत्त्वाचे स्वरूप निश्चित करण्याची विद्या ती वादविद्या. वाद म्हणजे तत्त्व जाणण्याची इच्छा बाळगणाऱ्या व्यक्तीबरोबर केला जाणारा संवाद. एखाद्या विषयाच्या अनुकूल व प्रतिकूल बाजूंची चर्चा करून असत्य सत्यापासून वेगळे काढून सत्य निश्चित करणे, भ्रम दूर करणे हे

वादाचे उद्दिष्ट असते. अशा प्रकारच्या तत्त्वबोधासाठी प्राचीन भारतात अनेक वादसभा भरत असत. त्यांना 'तद्विद्यसंभाषा' म्हणत असत व त्यांचे नियम पहिल्याप्रथम चरकसंहितेत सांगितले गेले. कालान्तराने गौतमाने न्यायदर्शनात ही विद्या समग्रपणे मांडली. ह्यातूनच पुढे बौद्धादी अवैदिक व मीमांसादी वैदिक दर्शनांचे ग्रंथ आकारास आले. ते पूर्वोत्तरपक्ष-स्वरूपात लिहिलेले आहेत. पूर्वपक्ष विस्ताराने मांडणे व मग त्याचे खंडन करणे हीच सर्व आचार्यांची शैली आहे.[178]

**लक्षण :** 'प्रतिज्ञातार्थसंदूषणं वाक्यम् ।'[179]

**अर्थ :** प्रतिज्ञापूर्वक केलेल्या विधानातील दोष दाखवणारे ( त्यावर आक्षेप घेणारे ) वाक्य.

**इतर छटा :** ( 1 ) संशय व्यक्त करणारा प्रश्न, ( 2 ) आक्षेपात्मक प्रश्न, ( 3 ) दुसऱ्याच्या खंडनीय मतात आपल्या अभिन्न मतांचा समावेश.

**प्रकार्ये :** ( 1 ) वाचकाला विषयाच्या चर्चेच्या आरंभबिंदूपर्यंत नेणे, ( 2 ) तर्कदुष्ट व म्हणून खंडनीय विषयाचा बोध करवणे, ( 3 ) वाचकाला मतमतांतरांची ओळख करून देणे.

**उदाहरणे :** ( i ) भामहाने बाह्य व आन्तरिक अशी विभागणी मानणाऱ्या आलंकारिकांचे मत खालील कारिकेत मांडून पूर्वपक्ष केला आहे :

'रूपकादिमलङ्कारं बाह्यमाचक्षते परे ।
सुपां तिङां च व्युत्पत्तिं वाचां वाञ्छन्त्यलङ्कृतिम् ।।'[180]

ह्याला सौशब्द्य म्हणतात, अर्थसौन्दर्य ह्याहून वेगळे असते अशा शब्दांत भामहाने ह्या पूर्वपक्षाचे खंडन केले आहे.

( ii ) राजशेखराने कवीचे सारस्वत, आभ्यासिक व औपदेशिक असे तीन प्रकार मानले आहेत. ह्यांपैकी अन्तिम दोन प्रकारच्या कवींना मंत्रादी उपायांची आवश्यकता नसते [ 'तस्मान्नेतरौ तन्त्रशेषमनुतिष्ठताम् । न हि प्रकृतिमधुरा द्राक्षा फाणितसंस्कारमपेक्षते' इत्याचार्याः ।"[181] ] असे जे आचार्यांचे मत आहे तो पूर्वपक्ष आहे. राजशेखराने हे मत झिडकारले आहे.

( iii ) वामनकालीन काही आचार्य असे मानत असत की, वैदर्भी रीती उत्तम साधावी ह्यासाठी गौडी व पांचाली ह्यांचा सराव करणे श्रेयस्कर होय [ 'तदारोहणार्थमितराभ्यास इत्येके ।'[182] ] वामन 'अतत्त्वाचा सराव करणाऱ्याला तत्त्वाची फलप्राप्ती होत नाही,' ह्या शब्दांत हे मत फेटाळतो.

वरील 'संज्ञावैशिष्ट्यात' म्हटल्याप्रमाणे प्रायः सर्वच प्राचीन शास्त्रीय ग्रंथ पूर्वोत्तरपक्षस्वरूपात लिहिलेले असल्यामुळे ह्या तंत्रयुक्तीची उदाहरणे प्राचुर्याने आढळतात. आता प्रत्युत्साराकडे सरकू.

## (26) प्रत्युत्सार

**संज्ञान्तर :** प्रत्युच्चार[183]

**लक्षण :** 'यत्रोपपत्ति दर्शयन्तः परस्परमतानि निवारयन्ति ।'[184]

**अर्थ :** इतरांच्या चुकीच्या मतांचे सप्रमाण निरसन करणे.

**इतर छटा :** ( 1 ) सुरुवातीचे, मधले व शेवटचे लुप्त शब्द सुचवणे ( पुरवणे ).

**प्रकार्ये :** ( 1 ) स्वतःची मते दृढतेने मांडण्याची संधी शास्त्रकारास देणे, ( 2 ) वाचकाची मतमतांतरांशी ओळख करून देणे, ( 3 ) ह्यायोगे एखाद्या विषयाच्या 'संकल्पनांचा इतिहास' सिद्ध करण्यास साहाय्य करणे, ( 4 ) शास्त्रकाराने बुद्धिपुरस्सर अपूर्ण ठेवलेला शास्त्रीय ग्रंथ, लुप्त शब्द सुचवून, पूर्ण करणे, ( 5 ) शास्त्रीय विषयाचे अस्सल ज्ञान मिळवण्याचा व अन्याय्य टीकेला आळा घालण्याचा मार्ग अभ्यासकाला दाखवणे.

**उदाहरणे :** ( i ) काव्यनिर्मितीस सहायक कारणे कोणती हा प्राचीनांच्या दृष्टीने खूप विवाद्य विषय होता. एतद्विषयक मतांतरांचे खंडन शास्त्रकार कसे करतात ते पुढील उताऱ्यावरून स्पष्ट होईल. "काव्यकर्मणि कवेः समाधिः परं व्याप्रियते' इति श्यामदेवः । '··· अभ्यास' इति मङ्गलः । अविच्छेदेन शीलनमभ्यासः । स हि सर्वगामी सर्वत्र निरतिशयं कौशलमाधत्ते । 'समाधिरान्तरः प्रयत्नो बाह्यस्त्वभ्यासः तावुभावपि शक्तिमुद्भासयतः । सा केवलं काव्ये हेतुः' इति यायावरीयः ।"[185] अर्थात–काव्यक्रियेत कवीची समाधी हाच मुख्य व्यापार होय, असे श्यामदेवाचे मत आहे. तर अभ्यास ( हाच मुख्य व्यापार होय ) हे मंगलाचे मत आहे. अविच्छिन्न प्रवृत्तीस अभ्यास म्हणतात. कारण तोच सर्व विषयांत व सर्वत्र कौशल्य उत्पन्न करतो. समाधी हा आन्तरिक प्रयत्न असून अभ्यास हा बाह्य प्रयत्न आहे. हे द्विविध प्रयत्न शक्तीचे उद्भासक असून तीच तेवढी काव्याचे निर्मितिकारण आहे, असे राजशेखराचे मत आहे.

( ii ) वामनाच्या काळात काही काव्यशास्त्रज्ञ उत्प्रेक्षेलाच अतिशयोक्ती मानत असत [ 'उत्प्रेक्षैवातिशयोक्तिरिति केचित्'[186] ], पण वामन ह्या चुकीच्या मताचे निरसन करताना म्हणतो की, कल्पनीय धर्माच्या व त्याच्या उत्कर्षाच्या कल्पनेला अतिशयोक्ती म्हणतात. म्हणजेच ती उत्प्रेक्षेहून वेगळी असते [ 'तन्निरासार्थमाह–संभाव्यधर्म- तदुत्कर्षकल्पनातिशयोक्तिः ।'[187] ]. वामनाने 'निरासार्थं' हा शब्द स्पष्टपणे वापरला आहे ही बाब लक्षात ठेवण्याजोगी आहे.

( iii ) वामनाने 'उपमेयस्योक्तौ समानवस्तुन्यासः प्रतिवस्तु ।।'[188] ह्या शब्दांत उपमाप्रपंचापैकी प्रथम अलंकार जो प्रतिवस्तू( पमा ) त्याची व्याख्या केली आहे. ह्यानंतरचे सूत्र समासोक्तिलक्षणपर असून ते 'अनुक्तौ समासोक्तिः ।'[189] असे आहे. त्यात सुरुवातीचा 'उपमेयस्य' शब्द लुप्त आहे. तो पुरवून 'उपमेयस्य अनुक्तौ

समासोक्तिः ।' असे सूत्र पूर्ण करून मग त्याचा अर्थ लावावयाचा. यात आदिलोप ही प्रस्तुत तंत्रयुक्तीची छटा आहे. मध्यलोप व अन्तलोप यांचीही उदाहरणे काव्यशास्त्रीय ग्रंथांत आढळतात.

पूर्वी वर्णिलेल्या अनुमत ( परिच्छेद 6 ), अपदेश ( परिच्छेद 7 ), व उद्धार ( परिच्छेद 12 ) ह्या तंत्रयुक्त्यांत परमतखंडन ही छटा येऊन गेलेली असल्यामुळे प्रत्युत्साराची तीच छटा पुन्हा मानण्यात काहीच अर्थ नाही. त्यामुळे प्रत्युत्साराचे वरीलपैकी एका युक्तीत विलीनीकरण करणे योग्य. 'लोप'निष्ठ अन्य छटा मात्र नवीन व म्हणून ग्राह्य ठरते. आता प्रदेश तंत्रयुक्तीचा परिचय करून घेऊ.

**(27) प्रदेश** [ =आंशिक उल्लेख ]

**लक्षण :** 'येषामर्थानामतिबहुत्वात् साकल्येनाभिधानस्याशक्यत्वात् स्तोकमुच्यते।'[190]

**अर्थ :** एखाद्या विषयाचे घटकोपघटक अनेक असल्यामुळे त्या सर्वांचा उल्लेख अशक्य असतो, म्हणून थोडक्यात ( संक्षिप्त ) उल्लेख करणे.

**इतर छटा :** ( 1 ) नंतर वर्णावयाच्या विषयाच्या मदतीने सद्यःकालीन विषय सिद्ध करणे, ( 2 ) पूर्ववर्णित विषयाच्या मदतीने सद्यःकालीन विषय सिद्ध करणे, ( 3 ) स्फटिकवत सुविशद विषयांशामुळे समग्र विषय सुविशद होणे, ( 4 ) कारण हेच कार्य असे गौणार्थाने म्हणणे.

**प्रकार्ये :** ( 1 ) विवेचनात संक्षिप्तता साधणे, ( 2 ) विवेच्य विषयाच्या काही भागाचे पूर्ण विवेचन करून उर्वरित भागाचे आकलन सुबुद्ध वाचकांवर सोपवणे, ( 3 ) वाचकाला शास्त्रीय ग्रंथाच्या दक्षतापूर्वक वाचनास भाग पाडणे, ( 4 ) प्रयुक्त शब्दांच्या गौणप्रधान अर्थांचा विवेक करावयास लावणे, ( 5 ) प्रतिपाद्य विषयांचे विखुरलेले अंश शोधून काढून त्यांचा मुख्य विषयाशी संबंध जोडावयास लावणे, ( 6 ) शास्त्रकाराने ही युक्ती प्रभुत्वाने हाताळणे व अभ्यासकाने साक्षेपाने अर्थाकलन करणे.

**उदाहरणे :** ( i ) भारतीय काव्यशास्त्रकारांनी अनेक अलंकार कल्पिले व निरूपिले आहेत, ही वस्तुस्थिती आहे. पण भामहाने अलंकार ह्या अतिविशाल विषयाच्या एका अंशाचा उल्लेख खालीलप्रमाणे केला आहे : 'रूपकादिरलङ्कारस्तथान्यैर्बहुधोदितः ।।'[191] भामहाने 'बहुधा' हा शब्दही साक्षात वापरला आहे ही गोष्ट ध्यानात ठेवण्याजोगी आहे.

( ii ) केशवमिश्राने 'तद्धेतुः प्रतिभादिकम् ।'[192] ह्या स्तोकोल्लेखाच्या द्वारे काव्यनिर्मितीच्या कारणांच्या व्यापक विषयाचा उल्लेख केला आहे.

( iii ) राजशेखराने 'मर्त्यपातालीय' या प्रस्तुत विषयाची सिद्धी 'दिव्य' या पूर्ववर्णित विषयाच्या द्वारे पुढील शब्दांत केली आहे : 'इहापि पूर्ववत् समस्तमिश्रभेदानुगमः ।'[193] [ म्हणजेच मर्त्यपातालीयाच्या बाबतीत वाचकाने पुढीलप्रमाणे

कल्पना करावयाच्या: मर्त्य व्यक्ती पातालात गेल्यानंतर तिचे तेथील आचरण; पातालीय व्यक्तीचे पृथ्वीवर आल्यानंतरचे आचरण, मर्त्य व्यक्ती पातालीय झाल्यानंतरचे तिचे आचरण तसेच पातालीय व्यक्तीचे जीवन इत्यादी ].

वामनादींच्या ग्रंथांतही ह्या युक्तीची उदाहरणे स्वाभाविकपणे वैपुल्याने आढळतात. या युक्तीची तुलना पूर्वचर्चित अतिक्रान्तावेक्षण ( परिच्छेद 2 ) व अनागतावेक्षण ( परिच्छेद 5 ) या युक्त्यांशी करण्याजोगी आहे. हिच्या क्रमांक 3 व 4 ह्या छटा मात्र स्वतंत्र आहेत. आता प्रयोजनाचा परामर्श घेऊ.

**(28) प्रयोजन** [ =हेतू, उद्देश, उद्दिष्ट ]

**लक्षण :** 'यदर्थं शास्त्रादि प्रवर्तते ।'[194]

**अर्थ :** ज्या उद्देशाने शास्त्रकार शास्त्र ( =शास्त्रीय ग्रंथ ) रचण्यास प्रवृत्त झालेला असतो त्या उद्देशाला प्रयोजन म्हणतात.

**इतर छटा :** ( 1 ) शास्त्रीय ग्रंथाच्या अध्ययनाचे उद्दिष्ट, ( 2 ) अनेक अर्थ सिद्ध करण्यासाठी एखादा शब्द वापरणे.

**प्रकार्ये :** ( 1 ) शास्त्रीय ग्रंथाच्या स्वरूपाचा निश्चय करणे, ( 2 ) शास्त्रीय ग्रंथात वर्ण्य काय व वर्ज्य काय त्याचा निर्णय करण्यास ग्रंथकर्त्यास मदत करणे, ( 3 ) शास्त्रकाराच्या उद्देशाचा अभ्यासकाला परिचय करून देणे, ( 4 ) शास्त्राच्या अभ्यासाचे दिशादर्शन करणे, ( 5 ) शास्त्रीय ग्रंथाच्या योग्य परीक्षेचा मार्ग वाचकाला दाखवणे.

**उदाहरणे :** ( i ) भामहाने आपल्या 'काव्यालङ्कार' ग्रंथाचे प्रयोजन 'सुजनावगमाय भामहेन ग्रथितं रक्रिलगोमिसूनुनेदम् ।।'[195] [ अर्थात मी रक्रिलगोमिपुत्र भामहाने सज्जनांना काव्यालङ्कारांचा बोध व्हावा म्हणून हा ग्रंथ रचला ] ह्या शब्दांत सांगितले आहे.

( ii ) आपण दोषांचे विवेचन इतरांचे दोष दाखवण्यासाठी किंवा स्वतःची शेखी मिरवण्यासाठी केलेले नसून वाचकांना / होतकरू कवींना दोषज्ञान व्हावे एतदर्थ केले आहे [ 'न दूषणायायमुदाहृतो विधिर्न चाभिमानेन किमु प्रतीतये ।'[196] ह्या शब्दांत भामहानेच दोषचर्चेचा हेतू सांगितला आहे

( iii ) केशवमिश्राने अलङ्कारांच्या संक्षिप्त विवरणाचा उद्देश स्पष्ट करताना म्हटले आहे : 'सुखबोधाय बालानामतिकोमलवर्त्मना । मया सङ्क्षेपणादित्थमलङ्काराः प्रदर्शिताः ।।'[197] [ अर्थात ज्यांना काव्यशास्त्रात अजून गती प्राप्त झालेली नाही अशांना अनायासे अलङ्कारज्ञान व्हावे म्हणून मी हे संक्षिप्त विवेचन केले आहे ].

( iv ) राजशेखराने आपण काव्यमीमांसा हा ग्रंथ का रचला त्याच्या कारणाचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे केले आहे : "ततस्ते पृथक् पृथक् स्वशास्त्राणि विरचयाञ्चक्रुः इत्थङ्कारञ्च प्रकीर्णत्वात् सा किञ्चिदुच्चिच्छिद इतीयं प्रयोजका( ना )ङ्गवती

सङ्क्षिप्य सर्वमर्थमल्पग्रंथेनाष्टादशाधिकरणी प्रणीता ।"[198] [ येथे 'इति' शब्द म्हणून या अर्थाचा आहे ].

( v ) वामनाने काव्यनिर्मितीचे व काव्यास्वादाचे दृष्ट व अदृष्ट असे द्विदल प्रयोजन मानले आहे. त्याचे मूळ शब्द असे : 'काव्यं सत् चारु दृष्टप्रयोजनम्, प्रीति-हेतुत्वात् । अदृष्टप्रयोजनम्, कीर्तिहेतुत्वात् ।'[199]

अशा प्रकारे काव्यशास्त्रकारांनी ही युक्ती योग्य पद्धतीने वापरली आहे. या युक्ती-च्या योगे प्रयोजनव्याख्या [ जिचे लक्षण असे: 'यत्सूत्रमभिधीयमानं स्वार्थस्य निष्पत्तौ निमित्तभावमुपैति ।' ][200] हा व्याख्याप्रकार गतार्थ होतो. आता ह्यानंतरच्या 'प्रसंग' युक्तीची ओळख करून घेऊ.

## (29) प्रसंग [ =सकारण पुनर्विवेचन ]

**संज्ञाघटना :** प्र+सङ्ग=प्रकृष्टः सङ्गः=उन्नत संबंध किंवा उत्कृष्ट ऐक्य.

**लक्षण :** 'पूर्वाभिहितस्यार्थस्य केनचित् सम्बन्धान्तरेण पुनरभिधानम् ।'[201]

**अर्थ :** पूर्ववर्णित अर्थाचे दुसऱ्या एखाद्या संबंधाच्या कारणाने पुन्हा वर्णन करणे.

**इतर छटा :** ( 1 ) पुनर्वर्णन सकारण करणे, ( 2 ) एखाद्या विषयाच्या चर्चेस ग्रन्थात एखाद्या ठिकाणी सुरुवात करणे व ती चर्चा अन्यत्र पूर्ण करणे, ( 3 ) प्रस्तुत विषयाशी किंचित संबंध असणाऱ्या मुद्याचे विवेचन करणे, ( 4 ) पूर्ववर्णित विषय अन्यत्र वेगळ्या हेतूने व वेगळ्या स्वरूपात प्रतिपादणे, ( 5 ) पूर्वचर्चित विषयाचे प्रस्तावनापूर्वक पुनर्वर्णन, ( 6 ) एखाद्या विश्वसनीय विषयाची साभिप्राय पुनश्चर्चा.

**प्रकार्ये :** ( 1 ) एखाद्या विषयाच्या पुनरुक्तीची आवश्यकता पुरी करणे, ( 2 ) एखाद्या विषयाचे प्रतिपादन ग्रंथाच्या एका प्रकरणात सुरू करून ते अन्यत्र पूर्ण करणे, ( 3 ) प्रस्तुत मुद्याशी दूरान्वयाने संबद्ध मुद्दा हाताळण्याची संधी ग्रंथकारास देणे, ( 4 ) पूर्वी मांडलेल्या मुद्याला पीळ भरणे, तो दृढ करणे, ( 5 ) विशिष्ट संबंधाखातर एखाद्या सत्यपूर्ण व विश्वसनीय विचाराचा पुनरुच्चार करणे.

**उदाहरणे :** ( i ) आनन्दवर्धनाने आपल्या ध्वन्यालोकाच्या पहिल्या उद्द्योतात लक्षणा व व्यंजना ह्या समान नाहीत, पूर्णपणे भिन्न आहेत आणि व्यंजना रसिकाला जो आनंद देऊ शकते तो लक्षणा देऊ शकत नाही, हा सर्व विषय विस्ताराने मांडला आहे. पण ह्या विषयाच्या काही बाजूंचे वाचकांना सुस्पष्ट ज्ञान व्हावे ह्यासाठी त्याने ह्याच विषयाची चर्चा पुन्हा एकदा तृतीय उद्द्योतात पुढील प्रस्तावनेसह केली आहे : 'तदेतत् सर्वं प्राक् सूचितमपि स्फुटतरप्रतीतये पुनरुक्तम् ।'[202]. आनन्दवर्धनाने केलेली ही पुनरुक्ती सहेतुक असल्यामुळे दोषास्पद नाही.

( ii ) दण्डीने श्लेष-प्रसादादी दहा गुणांची चर्चा आपल्या ग्रंथाच्या पहिल्या परिच्छेदात[203] तपशीलवार केली आहे. नंतर दुसऱ्या परिच्छेदाच्या सुरुवातीस तो म्हणतो :

"काश्चिन्मार्गविभागार्थमुक्ताः प्रागप्यलंक्रियाः ।
साधारणमलङ्कारजातमन्यन्निरूप्यते ॥"[204]

अशा शब्दांत तो पूर्वविवेचित विषयाचेच पुन्हा एकदा विवेचन करीत आहे, पण दोन्ही ठिकाणच्या विवेचनाचे प्रयोजन व स्वरूप ही दोन्ही वेगळी आहेत.

( iii ) वामनकृत गुणविवेचनाची प्रारंभिक सूत्रे अशी आहेत : 'काव्यशोभायाः कर्तारो धर्मा गुणाः ॥ 1 ॥'; 'तदतिशयहेतवस्त्वलंकाराः ॥ 2 ॥'[205] पुढे अलङ्कार-विवेचनास प्रारंभ करताना त्याने गुण व अलङ्कार यांतील भेदाचा पुन्हा एकदा उल्लेख केला आहे. कारण त्या 'प्रसंगी' तो आवश्यक आहे. तो उल्लेख असा : 'गुण-निर्वर्त्या काव्यशोभा । तस्याश्चातिशयहेतवोऽङ्काराः ।' अशा प्रकारे वामनाने गुण व अलङ्कार यांतील भेदाचा पुनरुल्लेख कारणपरत्वे केला आहे व तो न्याय्य आहे.

( iv ) राजशेखराच्या काव्यमीमांसेतील पुढील वचने म्हणजे भिन्न संदर्भातील समान अर्थाची वचने आहेत : 'यदपरं नृत्तवाद्यादिकमेषा चक्रे सा भारती वृत्तिः । तां ते मुनय इति समानं पूर्वेण ।'[206] '....जगाद सा गौडीया रीतिः । तां ते मुनय इति समानं पूर्वेण ।'[207] '....तत्राभियुञ्जाना तमौमेयीति समानं पूर्वेण ।'[208]

ह्या युक्तीच्या प्रयोगात अनेक ठिकाणी 'इति समानं पूर्वेण' असे शब्द वापरलेले आढळतात. ते जणू ह्या युक्तीचे खुणेचे शब्द होत.

ही युक्ती व प्रकरणव्याख्या [ 'यस्मिन्नर्थे सूत्रे वा प्रकृतेनाप्रकृतं साध्यते यथा— त्रिलवणाद्ये चूर्णे गुणानुक्त्वाऽभयाख्ये एवमाह 'समानं पूर्वेण' इति । तत्र समानगुणता व्याख्याता ।' ][209] तंतोतंत सारख्या असल्यामुळे प्रकरणव्याख्येचे स्वतंत्र अस्तित्व मानण्याची आवश्यकता नाही. ह्यानंतर आता 'योग' युक्तीची चर्चा करू.

**(30) योग** [ =जोडणे, जुळवणे, संबंध स्थापित करणे. ]

**संज्ञास्वरूप :** योग शब्द युज् ( 7 उ. ) धातूपासून साधलेला आहे. त्याचा अर्थ जोडणे, जुळवणे, एकत्र आणणे असा आहे. वाक्यातील शब्दांची व्याकरणदृष्ट्या वा तर्कदृष्ट्या जुळणी केल्यावरच त्यांपासून योग्य व ग्राह्य अर्थ निघतो. हे ध्यानात घेऊनच 'योगः वाक्ययोजना ।' असे निरूपण करण्यात येते.

**लक्षण :** 'योजना, उद्देशनिर्देशयोः सूत्रभाष्ययोर्वा ।....युक्तिर्वा योगः प्रतिज्ञा हेतु-र्दृष्टान्त उपनयो निगमनमिति पञ्चविधः ।'[210]

**अर्थ :** संक्षिप्त उल्लेख व विस्तृत उल्लेख यांची जुळणी किंवा सूत्र व त्यावरील भाष्य यांची जुळणी; अथवा प्रतिज्ञा, हेतू, दृष्टान्त, उपनय व निगमन असे पंचावयवी अनुमान म्हणजे योग.

उद्देश व निर्देश ह्या युक्त्या परस्परसंबद्ध असतात, निर्देश ही नेहमीच उद्देशपूर्वक असते हे सर्व ह्यापूर्वी परिच्छेद 11 व 21 यांमध्ये विस्ताराने प्रतिपादिलेच आहे. त्यावरून उद्देश व निर्देश यांची सांगड अनिवार्य आहे. भाष्य हे नेहमीच सूत्रसापेक्ष

असते, किंबहुना 'भाष्य' संज्ञेचे लक्षणच मुळी 'सूत्रार्थो वर्ण्यते यत्र पदैः सूत्रानुसारिभिः। स्वपदानि च वर्ण्यन्ते भाष्यं भाष्यविदो विदुः ।' [ अर्थात, सूत्रानुसारी शब्दांनी ज्यात सूत्राचा अर्थ निरूपिलेला असतो आणि ज्यात भाष्यकार स्वतः वापरलेल्या शब्दांचेही निरूपण करतो त्याला भाष्यवेत्ते भाष्य म्हणतात ] असे करण्यात आले आहे. त्यामुळे सूत्र व भाष्य यांचा समन्वय साधणे आवश्यकच असते. न्यायशास्त्रानुसार 'ह्या पर्वतावर अग्नी आहे' ही प्रतिज्ञा, 'कारण हा धुराने व्यापलेला आहे' हा हेतू, 'ज्याप्रमाणे स्वयंपाकघर धुराने व्यापलेले असते' हा दृष्टान्त, 'त्याप्रमाणे हा पर्वत आहे' हा उपनय व 'म्हणून ह्याच्यावर अग्नी आहे' हे निगमन, हे पाच अवयव अनुमानात मानलेले असतात. या सर्वांची शास्त्रीय विवेचनातील जुळणी म्हणजे योग. प्रस्तुत तंत्रयुक्तीची ही छटा न्यायशास्त्रातून घेतलेली आहे हे उघड आहे.

**इतर छटा :** ( 1 ) एकमेकांशी संबंधित असलेले पण ग्रन्थात इतस्ततः विखुरलेले शब्द एकत्र आणणे, ( 2 ) दूरस्थ, समीपस्थ व / वा विपरीत अर्थी वापरलेल्या शब्दांची सुसंगत जुळणी करणे, ( 3 ) औचित्यानुसार शब्दरचना करणे, ( 4 ) साध्य व साधन यांत समर्पक संबंध प्रस्थापित करणे, ( 5 ) संदर्भसंगत वाक्यरचना करणे, ( 6 ) दोन वाक्यार्थांची अनुरूप योजना.

**प्रकार्ये :** ( 1 ) शब्दांचे संदर्भ व अशा संदर्भान्वित शब्दांपासून निघणारे तर्कशुद्ध आणि समुचित अर्थ यांचे ज्ञान वाचकाला करून देणे.

**उदाहरणे :** ( i ) भामहाच्या 'शब्दाभिधेये विज्ञाय कृत्वा तद्विदुपासनम् ।'[211] ह्या वचनातील 'तद्विद्' शब्दाचा संबंध शब्द व अभिधेय या दोहोंशी लावून शब्दविद् [ व्याकरणशास्त्रकार ] व अभिधेयविद् [ शब्दार्थवेत्ते=कोशकार, व्युत्पत्तिज्ञ, अर्थमीमांसक इ. ] असे अर्थ करणे.

भामहानेच 'युक्तं वक्रस्वभावोक्त्या सर्वमेवैतदिष्यते ।'[212] ह्या कारिकेत वापरलेला 'एतद्' शब्द तत्पूर्वी वर्णिलेल्या सर्व साहित्यप्रकारांशी जोडावयाचा व ते सर्व साहित्यप्रकार ( गद्य, पद्य, संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश, वृत्तदेवादी, उत्पाद्यवस्तू, महाकाव्य, नाटकादी, आख्यायिका, कथा व मुक्तक ) चमत्कृतिपूर्ण वा चित्ताकर्षक स्वरूपाच्या उक्तींनी युक्त असणे इष्ट असते, असा अर्थ करावयाचा.

( ii ) शौद्धोदनीने पददोष, वाक्यदोष व अर्थदोष या तीन प्रकारच्या दोषांचा 'त्रिविधस्यापि दोषास्तु त्याज्याः···· ।'[213] असा प्रथमतः संक्षिप्त उल्लेख करून नंतर[214] त्यांचे खुलासेवार निरूपण केले आहे. त्या दोहोंची जोडणी करावयाची.

( iii ) राजशेखराने पिचुमन्द-बदर-प्रभृती नऊ काव्यपाकांचे प्रथमतः वर्णन[215] करून मग 'मध्यमाः संस्कार्याः'[216] असा उपदेश केला आहे. त्यातील मध्यम शब्द बदरपाक, ( बोराची चव ), तिन्तिडीकपाक ( चिंचेची चव ) आणि त्रपुसपाक ( टाकणखाराची चव ) यांच्याशी अन्वित करावयाचा व हे तीन पाक संस्कारयोग्य

होत असा अर्थ करावयाचा. राजशेखरानेच 'स त्रिधा' इति द्रौहिणिः।"[217] या वाक्यात वापरलेला 'सः' शब्द त्याच्या बऱ्याच अगोदर 'श्रुतिः, स्मृतिः,....'[218] इत्यादी शब्दांत वर्णिलेल्या काव्यार्थयोनींशी [ काव्याच्या विषयांचे मूलस्रोत म्हणजे काव्यार्थयोनी ] संबद्ध करावयाचा.

( iv ) वामनाच्या खालील वचनांतील अभिसंबंध व संबंध हे शब्द प्रस्तुत युक्तीचे निदर्शक आहेत.

'भिन्नवृत्तयतिभ्रष्टविसंधीनि वाक्यानि ॥ 1 ॥ दुष्टानीत्यभिसंबंधः ।'[219] 'व्यर्थैकार्थसन्दिग्धायुक्तापक्रमलोकविद्याविरुद्धानि च ॥ 9 ॥ वाक्यानि दुष्टानि इति संबंधः ॥'[220]

( v ) दण्डीच्या 'पद्यं गद्यं च मिश्रं च तत्त्रिधैव व्यवस्थितम् ।'[221]

[ अर्थात पद्य, गद्य व पद्यगद्यमिश्र स्वरूपाचे काव्य तीनच प्रकारचे असते ] ह्या वचनाची जोडणी खालील श्लोकाशी करावयाची आहे :

'तदिदं वाङ्मयं भूयः संस्कृतं प्राकृतं तथा ।
अपभ्रंशश्च मिश्रं चेत्याहुराप्ताश्चतुर्विधम् ॥ 32 ॥'[222]

[ अर्थात, पुनः=दुसऱ्या प्रकारे त्या वाङ्मयाचे संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश व संस्कृत-प्राकृत-अपभ्रंश-मिश्र असे भाषानिष्ठ चार भेद प्राचीन सत्यवक्त्या व विश्वास-पात्र विद्वानांनी सांगितले आहेत. ] वरीलप्रमाणे जोडणी केली की, गद्य, पद्य, व मिश्र या त्रिप्रकारक साहित्याचे प्रत्येकी चार भाषानिष्ठ पोटभेद पुढीलप्रमाणे होतात: 1. संस्कृत गद्य, 2. प्राकृत गद्य, 3. अपभ्रंश गद्य व 4. मिश्र गद्य, 5. संस्कृत पद्य, 6. प्राकृत पद्य, 7. अपभ्रंश पद्य व 8. मिश्र पद्य, 9. संस्कृत गद्यपद्यमिश्र, 10. प्राकृत गद्यपद्यमिश्र, 11. अपभ्रंश गद्यपद्यमिश्र व 12. संस्कृत-प्राकृत-अपभ्रंश-मिश्र गद्य-पद्यमिश्र.

प्राचीन काव्यशास्त्रकारांना वरील सर्व साहित्यप्रकार अभिमत होते. पण हे सगळे अनुक्त प्रकार वरीलप्रमाणे जोडकाम करून शोधून काढावयाचे. ह्यावरून योग तंत्रोपायही अतिदेश, अपवाद, अर्थापत्ती, ऊह्य इत्यादी अनेक तंत्रोपायांप्रमाणेच 'अनुक्त काव्यशास्त्र' व्यक्त करण्यास व समजून घेण्यास सहायक ठरतो हे सिद्ध होते.

( vi ) असेच एक 'अनुक्त' स्थळ भामहाच्या ग्रन्थातही आढळते. ते शास्त्रकार-कल्पित प्राचीन साहित्याचा व्यापविस्तार किती मोठा होता हे स्पष्ट करणारे व म्हणून महत्त्वपूर्ण असल्यामुळे विचारात घेऊ.

भामहाने खालील दोन कारिकांत काव्याच्या विविध प्रकारांचा निर्देश केला आहे:

'शब्दार्थौ सहितौ काव्यं गद्यं पद्यं च तद्द्विधा ।
संस्कृतं प्राकृतं चान्यदपभ्रंश इति त्रिधा ॥ 16 ॥

वृत्तदेवादिचरितशंसि चोत्पाद्यवस्तु च ।
कलाशास्त्राश्रयञ्चेति चतुर्धा भिद्यते पुनः ।। 17 ।।'[228]

ह्या दोन्ही कारिका 'योग' युक्तीने एकमेकींशी जोडल्या की, काव्याचे खालील-प्रमाणे एकूण चोवीस पोटभेद होतात हे लक्षात येईल.




असेच पद्याचेही बारा पोटभेद होतात. [ वृत्तदेवादिचरितशंसि=राम, श्रीकृष्ण इत्यादी देवदेवतांच्या जीवनातील घटनाप्रसंगांना विषय बनवून लिहिलेले काव्य; उत्पाद्यवस्तू=कवीने स्वतःच्या कल्पनेने विषय शोधून काढून त्यावर रचलेले काव्य; कलाश्रय= संगीत, चित्र इत्यादी कलांचे सिद्धान्त, नियम, संकेत इत्यादींचे विवरण करणारे काव्य; शास्त्राश्रय=न्याय, मीमांसा, वेदान्त आदी शास्त्रीय विषयांच्या तत्त्वसिद्धान्तादींचे निरूपण करणारे काव्य. ह्यांपैकी कलाश्रय व शास्त्राश्रय काव्यग्रन्थ ज्ञानप्रधान असतात, त्यांना 'काव्य' ही संज्ञा औपचारिकपणे लावलेली असते. ह्या मुद्याची मार्मिक व उद्बोधक चर्चा उद्भटाचा टीकाकार जो प्रतीहारेन्दुराज ह्याने केलेली आहे.[224] जिज्ञासूनी ती पाहावी ].

वरील विवेचनावरून प्रस्तुत युक्तीचे शास्त्रीय ग्रन्थातील स्थान व महत्त्व यांचा उत्तम प्रकारे बोध होईल. आता वाक्यशेष विचारात घेऊ.

### (31) वाक्यशेष [ =अनुक्त / अप्रयुक्त शब्दांची कल्पना करून वाक्य पूर्ण करणे ].

**संज्ञा-विवरण :** वाक्य हे भाषेचे मूलभूत एकक आहे. कोणताही विचार व्यक्त करताना आपण वाक्याचाच प्रयोग करतो. वाक्याच्या लक्षणाच्या म्हणजे स्वरूप-वर्णनाच्या बाबतीत प्राचीन वैयाकरण, मीमांसक, काव्यशास्त्रज्ञ इत्यादींत बरीच

मतभिन्नता आढळते. पंतजलीने आपल्या महाभाष्यात वाक्याची चार लक्षणे पुढील-प्रमाणे दिलेली आहेत.

( 1 ) 'आख्यातं स-अव्यय-कारक-विशेषणं वाक्यम् ।' अर्थात—अव्यय, विभक्ति-प्रत्यययुक्त शब्द व विशेषण यांपैकी एकाने अथवा सर्वांनी युक्त क्रियापदाला वाक्य म्हणतात; ( 2 ) 'सक्रियाविशेषणं च ।'—अर्थात वरीलखेरीज क्रियाविशेषण हा अधिकचा घटक ज्यात क्रियापदाबरोबर असतो, त्याला वाक्य म्हणतात; ( 3 ) 'आख्यातं सविशेषणम् ।'—अर्थात, विशेषणयुक्त क्रियापदाला वाक्य म्हणतात; ( 4 ) 'एकतिङ् वाक्यम्'—अर्थात, ज्यात एक क्रियापद असते ते वाक्य.[225]

वरील लक्षणांवरून वाक्यात क्रियापद प्रधान असते अशी पतंजलीसकट प्राचीन विचारवंतांची भूमिका असल्याचे प्रतीत होते. हे क्रियापद कधी श्रूयमाण (=साक्षात शब्दांनी उच्चारलेले ) असते तर कधी अनुमेय ( अनुमानाने कल्पावयाचे ) असते.[226]

वाक्यातील क्रियापद वाचून किंवा ऐकून वरीलप्रमाणेच अनुमान विभक्तिप्रत्यय-युक्त शब्द, विशेषण वा क्रियाविशेषण याविषयीही करावे लागते. असे अनुमान केल्याने वाक्याचा अर्थ पूर्ण होतो. अशा अनुमानालाच ( ज्याला अध्याहारही म्हणतात ) तंत्रयुक्तिकारांनी वाक्यशेष तंत्रयुक्ती म्हटले आहे. शास्त्रकार ग्रन्थलाघवार्थ असे शब्द अनुक्त ठेवतात, त्यांची कल्पनापूर्वक योजना अभ्यासकांकडून अपेक्षित असते.

**लक्षण :** 'यस्मिन् सूत्रे लाघविकेनार्थाद्गम्यमानमनुक्तपूरणार्थमध्याह्रियते ।'[227]

**अर्थ :** ग्रन्थलाघव साधावे म्हणून ज्या सूत्रात साक्षात न वापरलेल्या शब्दाचा अर्थ सूचित होतो, त्या शब्दाचा अध्याहार ( कल्पना ) करणे.

**इतर छटा :** ( 1 ) वगळलेल्या शब्दाचे विनासायास आकलन होणे, ( 2 ) तो शब्द सूत्राच्या निरूपणाच्या समयी अभ्यासकाला सुचणे, ( 3 ) सुसंगत अर्थाचे प्रतिपादन करणारे वाक्य.

**प्रकार्ये :** ( 1 ) ग्रन्थविस्तार टाळणे व ग्रन्थ सुटसुटीत बनवणे, ( 2 ) जिज्ञासू वाचकाला ग्रन्थ दक्षतेने वाचण्यास भाग पाडणे.

**उदाहरणे :** ( i ) भामहाच्या 'हेतुः सूक्ष्मो लेशोऽथ नालङ्कारतया मत ।'[228]

[ अर्थात हेतू, सूक्ष्म व लेश यांना मी / आम्ही अलङ्कार म्हणून मानत नाही ] या विधानात 'मया' किंवा 'अस्माभिः' शब्द कल्पून वाक्यपूर्ती करावयाची.

( ii ) गुलाबरावमहाराजांच्या 'काव्यचित्रयोरैक्यम् ।',[229] 'भोगरूपो बाह्य-विषयेभ्यः ।',[230] 'द्वयोर्मिश्रणं वर्णनम् ।',[231] व 'स्वप्नध्यानाद्वा'[232] या सूत्रांची पूर्णता क्रमशः अस्ति, अनुभूयते, इत्युच्यते व सिध्यति या शब्दांनी करावयाची आहे.

( iii ) त्याच पद्धतीने पूर्वसूरिभिः किंवा पूर्वाचार्यैः या शब्दाच्या द्वारे केशव-मिश्राची 'दोषास्त्याज्या इत्युक्तम् ।',[233] व 'श्लाघ्या गुणा इत्युक्तम् ।'[234] ही सूत्रे पूर्ण करावयाची.

( iv ) वामनाने तर वाक्यशेष हा शब्दच, खाली उद्धृत केलेल्या सूत्रवृत्तीत, वापरलेला असल्याचे स्पष्ट दिसते :

"रीतिरात्मा काव्यस्य ।। 6 ।।

रीतिर्नामियमात्मा काव्यस्य । शरीरस्येवेति वाक्यशेषः ।।"[235]

ह्यावरून काव्यशास्त्रकारांनी ह्या तंत्रोपायाचा वारंवार समुचितपणे प्रयोग केला असल्याचे दृष्टोत्पत्तीस येते. हा तंत्रोपाय व्याकरणनिष्ठ किंवा वाक्यरचनानिष्ठ आहे. आता ह्यानंतरच्या विकल्पाचा परामर्श घेऊ.

## (32) विकल्प [ =पर्याय ]

विकल्प म्हणजे 'पक्षान्तरबोधकः शब्दः ।',[236] अर्थात दोहोंपैकी एका पक्षाचा [ =बाजूचा ] बोध करवणारा शब्द. दोहोंपैकी कोणताच पक्ष अनिवार्य नसतो, दोन्ही परस्परनिरपेक्ष असतात.

**संज्ञान्तर :** विकल्पन [ चरक, वाग्भट, नीलमेघ व त्याचा अज्ञातनाम शिष्य ]

**लक्षण :** 'विविधं कल्पनम्, इदं कार्यमिदं वा कार्यम् ।'[237]

**अर्थ :** वेगवेगळ्या पद्धतीने कल्पना करणे, हे करावे किंवा हे दुसरे करावे.

**इतर छटा :** ( 1 ) विकल्पांचा क्रमिक वा एककालिक उल्लेख, ( 2 ) अनिर्धार्य अर्थाचे सांगोपांग विवेचन, ( 3 ) विविध विकल्पांबद्दलचे सखोल चिन्तन.

**प्रकार्ये :** ( 1 ) एखाद्या अर्थाचे विविध पर्याय एकत्र आणणे, ( 2 ) एखाद्या विषयाच्या सर्व संभाव्य बाजूंचा सखोल विचार करून त्यांचा यथायोग्य अर्थ निर्धारित करणे व तसा निर्धारित केलेला अर्थ अनुरूप शब्दांत व्यक्त करणे, ( 3 ) वाचकाला एखाद्या विषयाच्या भिन्नभिन्न वैकल्पिक बाजू कळवून त्या विषयाचा यथावत अर्थ निश्चित करण्यास मदत करणे.

**उदाहरणे :** (i) गुलाबरावमहाराजांनी 'सृष्टिर्द्विधा ईश्वरजा जीवजेति भेदात् ।'[238] असे सृष्टीचे दोन प्रकार सांगितले पण तदनंतर 'एकविधा वा सृष्टिर्भावनामयी ।।'[239] ह्या शब्दांत विकल्प सांगितला.

( ii ) ध्वन्यालोकातील खालील विधाने अवलोकनीय असून त्यांपैकी दुसऱ्या विधानात तर विकल्प शब्दच वापरला आहे :

'तथाहि वाच्यत्वं तस्य स्वशब्दनिवेदितत्वेन वा स्यात्, विभावादिप्रतिपादनमुखेन वा ।';[240] 'कथानायकश्च धीरोदात्तादिभेदभिन्नः पूर्वस्तदन्तरो वेति विकल्पः ।'[241]

( iii ) वामनाच्या ग्रन्थात काही काव्यशास्त्रीय संकल्पनांची अशी वैकल्पिक लक्षणेच आढळतात. उदाहरणार्थ, 'अपक्रम' वाक्यदोषाची अशी पर्यायी लक्षणे पाहा : "क्रमहीनार्थमपक्रमम् ।। 22 ।। उद्देशिनामनूद्देशिनां च क्रमः संबंधः, तेन हीनोऽर्थो यस्मिंस्तत्क्रमहीनार्थमपक्रमम् ।....अथवा प्रधानस्यार्थस्य प्रथमनिर्देशः क्रमः । तेन हीनोऽर्थो यस्मिंस्तदपक्रमम् ।"[242]. त्याने समता गुणाचेही असेच वैकल्पिक लक्षण दिले आहे.

एकंदरीने संस्कृत काव्यशास्त्रज्ञांचा विकल्पाचे स्वरूप व विकल्पाची व्याप्ती यांच्याशी चांगला परिचय होता व हा तंत्रोपाय त्यांनी अचूकपणे हाताळला होता हे दिसून येते. मात्र 'वा' नेहमीच विकल्पबोधक नसून कधीकधी समुच्चयबोधक असतो हे ध्यानात ठेवावयास हवे. ह्याबाबतीतील सोदाहरण स्पष्टीकरण पुढे यथास्थल करण्यात येईलच. आता विधानाकडे वळू.

**(33) विधान** [ =स्थापना, व्यवस्था ]

**लक्षण :** 'यत्प्रकरणानुपूर्वं विधानमवेक्ष्यते ।'[248]

**अर्थ :** प्रकरणांचा क्रम दृष्टिपथात ठेवणे किंवा पाळणे.

**इतर छटा :** ( 1 ) अध्याहृत अर्थ ध्यानात ठेवून विधान करणे, ( 2 ) ग्रंथाचे पद्धतशीर निरूपण करणे, ( 3 ) शब्दांची हेतुपुरस्सर योजना करणे, ( 4 ) सुसंगत व्यवस्थेत पर्यवसित होणाऱ्या परस्परविरुद्ध अर्थांचे विधान करणे.

**प्रकार्ये :** ( 1 ) शास्त्रीय ग्रंथाचे विषयोपविषय, त्यांचे आन्तरिक अन्योन्यसंबंध व त्यांच्या निरूपणाचा क्रम या सर्वांची कल्पना करणे, ( 2 ) या सर्व गोष्टींचे ज्ञान वाचकाला करून देणे, ( 3 ) कोणत्या शब्दांचे कोणते अर्थ गृहीत धरले आहेत व कोणते शब्द कोणत्या उद्देशांनी वापरले आहेत त्याचा बोध वाचकाला करवणे, ( 4 ) शास्त्रीय विषयांच्या यथावत मीमांसेच्या व शास्त्रीय शब्दांच्या सुसंगत अर्थनिरूपणाच्या जबाबदारीची जाणीव वाचकाला करून देणे.

**उदाहरणे :** ( i ) वामनाच्या खालील सूत्रांत अनिबद्ध ( सुटी पद्ये ) व निबद्ध ( दीर्घ रचना ) यांतील आन्तरिक संबंध स्पष्ट झाला आहे :
'तदनिबद्धं निबद्धं च ।। 27 ।।....क्रमसिद्धिस्तयोः स्रगुत्तंसवत् ।। 28 ।।....नानिबद्धं चकास्त्येकतेजःपरमाणुवत् ।। 29 ।।....संदर्भेषु दशरूपकं श्रेयः ।। 30 ।।'[244] [ अर्थात, अनिबद्ध व निबद्ध हे साहित्यप्रकार क्रमशः सिद्ध होणारे आहेत. अनिबद्ध साध्य झाला की, निबद्ध साध्य होतो. जसे माळ गुंफता येऊ लागली की नंतर मुगुटही गुंफता येतो ... अनिबद्ध काव्य एखाद्या ठिणगीसारखे असते, ते चमकत नाही. निबद्ध काव्यांत नाटके सर्वश्रेष्ठ होत ].

( ii ) राजशेखराने आपल्या ग्रंथाच्या प्रकरणांचा अनुक्रम पुढील शब्दांत सांगितला आहे : "अयं प्रकरणाधिकरणसमुद्देशः । शास्त्रसङ्ग्रहः, शास्त्रनिर्देशः, काव्य-पुरुषोत्पत्तिः, पदवाक्यविवेकः, पाठप्रतिष्ठा, अर्थानुशासनम्, वाक्यविधयः, कविविशेषः, कविचर्या, राजचर्या, काकुप्रकाराः, शब्दार्थहरणोपायाः, कविसमयः, देशकालविभागः, भुवनकोश, इति कविरहस्यं प्रथममधिकरणमित्यादि ।"[245] ह्यावरून राजशेखराने आपल्या ग्रंथाचा पूर्ण आराखडा प्रथमतः मनात तयार केला होता व नंतरच त्याने लेखनास सुरुवात केली होती हे प्रतीत होते.

( iii ) भामहाने खाली उद्धृत केलेल्या दोन श्लोकांत आपल्या ग्रंथाची विषयानुक्रमणिका सांगितली आहे :

"षष्टया शरीरं निर्णीतं शतषष्टया त्वलंकृतिः ।
पञ्चाशता दोषदृष्टिः सप्तत्या न्यायनिर्णयः ।।
षष्टया शब्दस्य शुद्धिः स्यादित्येवं वस्तुपञ्चकम् ।
उक्तं षड्भिः परिच्छेदैर्भामहेन क्रमेण वः ।।"[246]

या श्लोकद्वयातील वस्तुपंचकम् [ पाच विषय ] व क्रमेण [ उक्त क्रमाने ] हे दोन्ही शब्द खूप बोलके आहेत.

( iv ) वामनाने आपल्या ग्रंथाची शारीर, दोषदर्शन, गुणविवेचन, आलंकारिक व प्रायोगिक अशी पाच मुख्य अधिकरणे कल्पून ती प्रयोजनस्थापना-प्रभृती बारा अध्यायांत विभागली आहेत आणि त्यांचे 'येथवर एका विषयाचे निरूपण केले, आता ह्यानंतर क्रमागत पुढच्या विषयाचे निरूपण सुरू करतो' अशा पद्धतीने विवेचन केले आहे ( उदाहरणार्थ, 'अधिकारिचिन्तां रीतितत्त्वं च निरूप्य, काव्याङ्गान्युपदर्शयितुमाह[247]–काव्यशरीरे स्थापिते काव्यसौन्दर्याक्षेपहेतवस्त्यागाय दोषा विज्ञातव्या इति दोषदर्शनं नामाधिकरणमारभ्यते ।'[248] इत्यादी ). ह्यावरून वामनाने आपला ग्रंथ प्रत्यक्षात लिहिण्यापूर्वी बुद्धीत समग्रपणे साकार केला होता, असे असंदिग्धपणे म्हणता येते. एखाद्या संशोधनात्मक प्रबंधाची जशी रेखीव व सुश्लिष्ट रचना व मांडणी असावी, तशी वामनाच्या ग्रंथाची आहे. ती लक्षात घेता प्रस्तुत प्रकरणात शास्त्रीय ग्रंथरचनेच्या ज्या प्रधान उपायांचा विस्ताराने विचार केला जात आहे त्या उपायांच्या समुच्चयाला Methodology of a Research Dissertation / Thesis असे निखालसपणे म्हणता येईल.

( v ) केशवमिश्रानेही आपल्या अष्टरत्नात्मक अलंकारशेखर ग्रंथात कोणकोणते विषय हाताळले गेलेले आहेत त्यांची सूची आपल्या ग्रंथाच्या अखेरीस[249] दिली आहे.

ह्यावरून प्राचीन काव्यशास्त्रकारांनी हा शास्त्रोपाय तज्ज्ञपणे हाताळला होता, असे प्रत्ययास येते. आता विपर्ययाचे स्वरूप समजून घेऊ.

## (34) **विपर्यय** [ =विरुद्धता, उलटेपणा; व्यतिक्रम ]

**लक्षण** : "यथोपदिष्टविपर्ययेण लक्षणादिकरणम् ।"[250]

**अर्थ** : शास्त्रकाराने उपदेशात वापरलेल्या शब्दांचा विपर्यय [ =प्रतिलोम ] करून लक्षणादीचे निरूपण करणे. उदाहरणार्थ, कृश व्यक्तींच्या रोगाचे निदान करणे कठीण असते असे म्हटल्यावर 'सुदृढ व्यक्तींच्या रोगाचे निदान करणे सोपे असते' असा त्याचा विपर्यय [ विरुद्धार्थ ] ध्यानात येतो.

**इतर छटा** : ( 1 ) विरुद्धार्थाच्या मदतीने एखादा मुद्दा सिद्ध करणे, ( 2 ) सयुक्तिक कारणाखातर विषयांच्या विवेचनाच्या क्रमाचा भंग करणे.

**प्रकार्ये :** ( 1 ) प्रतिपाद्याची विरुद्ध बाजू दर्शवून प्रतिपाद्याच्या चर्चेला पूर्णता आणून देणे, ( 2 ) अभ्यासकाला विपरीत पण विचारणीय मुद्दा समजून घेण्यास भाग पाडणे, ( 3 ) हेतुतः अपूर्ण ठेवलेल्या शास्त्रीय विवेचनाला समग्रता अर्पिणे, ( 4 ) विवेचनाच्या क्रमभंगाचे कारण जाणवून देणे.

**उदाहरणे :** ( i ) भामहाने 'प्रतीतशब्दमोजस्वि सुश्लिष्टपदसन्धि च । प्रसादिस्वभिधानञ्च यमकं कृतिनां मतम् ॥'[251] ह्या शब्दांत रसिकप्रिय यमकाची वैशिष्टये नमूद केली आहेत. त्यांचा विपर्यय केला की, त्याज्य किंवा सदोष यमकाचे स्वरूप आविष्कृत होते, ते असे : ज्यातील शब्द अप्रसिद्ध असून ओजोगुणसंपन्न नाहीत, ज्या यमकातील शब्दांचे संधी ओबडधोबड ( श्रवणकटू ) आहेत, जे यमक पांडित्यप्रदर्शक व अर्थदृष्टया अनाकर्षक आहे, असे यमक रसिकांना नकोसे वाटते.

( ii ) दण्डीने 'श्लेषः प्रसादः....'[252] इत्यादी श्लोकात वैदर्भमार्गाचे प्राणरूप दहा गुण नमूद करून लगेच म्हटले आहे : 'एषां विपर्ययः प्रायो दृश्यते गौडवर्त्मनि ॥'[253] दण्डीने विपर्यय शब्द येथे स्पष्टपणे वापरला आहे. पण त्याचबरोबर वापरलेल्या 'प्रायः' शब्दाकडे पूर्ण लक्ष देऊन गौड मार्गात पुढील दहा गुण असतात असा अर्थ सावधपणे लावावयाचाः शैथिल्य, व्युत्पन्नता ( कष्टसाध्य अर्थाकलन ), विषमता, अनुप्रासप्राचुर्य, कठोरता, आकुलत्व, अत्युक्ती, अर्थव्यक्ती, उदारता व समाधी (शेवटचे तीन गुण उभयमार्गसमान आहेत ).

( iii ) वामनाने काव्यशिक्षणास योग्य शिष्यांचे विवेकी व अविवेकी असे दोन प्रकार मानले आहेत. पैकी विवेकी हे शासनीय होत ['पूर्वे शिष्याः विवेकित्वात् ।']'[254] हे सांगून झाल्यावर दुसरे तसे=शासनीय नसतात कारण ते विवेकींच्या विरुद्ध असतात, असे प्रत्यक्षात 'विपर्यय' शब्द वापरून उपदेशिले आहे [ 'नेतरे, तद्विपर्ययात् ॥' ][255]

वामनानेच आणखी एका मुद्याच्या चर्चेत विपरीत शब्दाचा वापर केला आहे [ 'अनाविद्धललितपदं चूर्णम् ॥ 24 ॥....विपरीतमुत्कलिकाप्रायम् ॥ 25 ॥' ][256]

तसेच त्याने 'न कर्मधारयो बहुव्रीहिप्रतिपत्तिकरः ।'[257] [ अर्थात बहुव्रीही समासार्थाचा बोधक असा कर्मधारय समास वापरू नये ], 'तेन विपर्ययः व्याख्यातः ॥'[258] [ अर्थात वरील सूत्रगत उपदेशाच्या योगे 'कर्मधारय समासार्थाचा बोधक असा बहुव्रीही समास वापरू नये' हा विरुद्धार्थ विवेचिल्यात जमा होतो ] ह्या दोन सूत्रांतही प्रस्तुत तंत्रोपाय समर्थपणे राबवून घेतला आहे.

त्याने वर्णानुप्रास, माधुर्य व सौकुमार्य या काव्यशास्त्रीय संकल्पनाही ह्याच युक्तीच्या साहाय्याने विशद केल्या आहेत.

ह्या युक्तीच्या द्वारे अभ्यासकाला अनुक्त वा अलिखित शास्त्रीय विषयाचा बोध होतो. अर्थात ही युक्तीही अतिदेश, अर्थापत्ती, ऊह्य इत्यादी पूर्वोक्त अनेक युक्त्यांप्रमाणेच

अपूर्ण शास्त्रीय विषय पूर्ण करून घेण्यास उपकारक ठरते. पूर्ववर्णित अर्थापत्तीत ( परिच्छेद 9 ) विरुद्ध अर्थाची अटकळ बांधावी लागते; प्रयुक्त शब्द वाचून त्याच्या विरुद्ध अर्थाचे अनुमान करावे लागते. तर येथे म्हणजे विपर्ययात विपर्यय, न, विपरीत इत्यादी विरुद्धार्थक शब्द प्रत्यक्षातच वापरलेले असतात, हा दोहोंतील फरक आहे. आता व्याख्यानाची चर्चा करू.

**(35) व्याख्यान** [ =विस्तृत स्पष्टीकरणासह केलेले विषयनिरूपण ]

परंपरेनुसार व्याख्यानाचे पाच घटक मानण्यात आले आहेत, ते असे :

'पदच्छेदः, पदार्थोक्तिर्, विग्रहो, वाक्ययोजना ।
आक्षेपस्य समाधानं, व्याख्यानं पञ्चलक्षणम् ।।'

तथापि, तंत्रयुक्तिकारांनी ह्या संज्ञेचे वेगळे लक्षणविवरण केले आहे.

**लक्षण :** 'यन्मादृशेभ्यो विशिष्टतरबुद्धिगम्यम् ।'[259]

**अर्थ :** आमच्यासारख्या सामान्य बुद्धीच्या व्यक्तींहून विशिष्ट बुद्धीच्या **(=योगि-दृष्टीच्या)** व्यक्तीला जाणवणाऱ्या विषयाचे विवेचन.

**इतर छटा :** ( 1 ) वेगळेपणाने उठून दिसणाऱ्या वैशिष्टयाचे स्पष्टीकरण, ( 2 ) संपूर्ण ज्ञेय विषयाचे समग्र विवेचन, ( 3 ) पूर्वोक्त संक्षिप्त मुद्याचे तपशीलवार वर्णन, ( 4 ) स्पष्ट शब्दांत न सांगितलेल्या मुद्याचे गुरुमुखपरंपरेने आकलन, ( 5 ) समाधिद्वारा होणाऱ्या अतीन्द्रिय अर्थाचे दर्शन व वर्णन, ( 6 ) विशाल विषयाच्या लहान घटकांचे वर्णन. ह्यांवरून ह्या तंत्रोपायाच्या विविध अर्थच्छटा असल्याचे स्पष्ट होते.

**प्रकार्ये :** ( 1 ) व्यापक विषयाचे लहान घटक तपशीलवारपणे नमूद करणे, ( 2 ) विषयाच्या प्रधान / महत्त्वपूर्ण वैशिष्टयांकडे वाचकांचे लक्ष वेधणे, ( 3 ) समाधिद्वारा झालेले ज्ञान वाचकांप्रत पोचवणे, ( 4 ) विषयाचे यच्चयावत ज्ञेय पैलू जाणून घेण्याची संधी अभ्यासकाला देणे, ( 5 ) गुरुमुखपरंपरा टिकवून धरणे.

**उदाहरणे :** ( i ) भामहाने उपमा अलङ्कारातील सारूप्य ( साम्य, सादृश्य किंवा साधर्म्य ) या मुद्याचे परिपूर्ण वर्णन केले आहे, त्याचा आशय असा : कोणत्याही दोन वस्तूंत सर्वथा सादृश्य कधीच नसते; बुद्धिमान कवी यथासंभव सादृश्य पुरेसे मानून वर्णितात; तसे पाहता कोठे पूर्ण चंद्रबिंबाची कांती व कोठे कांतिहीन रमणीचे मुख ! पण तरीही दोहोंतील नाममात्र सादृश्य लक्षात घेऊन रमणीमुखाला चंद्राची उपमा दिली जाते; तरीही काव्यशास्त्रीय उपदेशानुसार अशी वर्णने आस्वाद्य मानावयाची किंवा महाकवींच्या प्रयोगानुसार अशा वर्णनांचे आकलन-आस्वादन करावयाचे; आता अशा वर्णनात अतिशयोक्ती अवश्य असते, पण ती उपमादी अलङ्कारांत अभीष्टच असते; म्हणूनच सुरुवातीस म्हटले आहे की, कोणत्याही दोन वस्तूंत सर्व-तोपरी सादृश्य कधीच नसते.[260] भामहाने वर अतिशय हा शब्दही वापरला आहे.

( ii ) केशवमिश्राने आपल्या ग्रन्थाचा एक संपूर्ण मरीची[261] [ =अनुभाग ] उपमाचर्चेला वाहिला आणि त्यानंतर उपमेचे उज्ज्वल वैशिष्टच असे नमूद केले :

'अलङ्कारशिरोरत्नं सर्वस्वं काव्यसम्पदाम् ।
उपमा कविवंशस्य मातैवेति मतिर्मम ।।'[262]

अशाच पद्धतीने त्याने उत्प्रेक्षेला प्रतिष्ठा मिळवून देणारे वैशिष्टच ( distinguishing feature ) पुढील शब्दांत वर्णिले आहे :

'सर्वालङ्कारसर्वस्वं कविकीर्तिविवर्धिनी ।
उत्प्रेक्षा हरति स्वान्तमचिरोढा स्मितादिव ।।'[263]

त्यानेच सादृश्यज्ञानाची नानाविध कारणे विस्ताराने सांगून झाल्यावर कविनिर्मितीची अलौकिकता पुढील शब्दांत सांगितली आहे :

"कवीनां घटनाऽन्यैव चराचरविलक्षणा ।
अकर्तुमन्यथाकर्तुं कर्तुं या क्षमते जगत् ।।'[264]

( iii ) राजशेखराने 'प्रतिभा' हा केन्द्रवर्ती विषय मानून प्रतिभेचे कार्य, तिची अपूर्व शक्ती, आंधळ्या प्रतिभावंतांचे अलौकिक सामर्थ्य, प्रतिभेचे प्रकार, कवींचे प्रतिभानिष्ठ वर्गीकरण, प्रतिभेची कीर्तिदायकता इत्यादी सर्व अंगोपांगे तपशीलवार वर्णिलेली आढळतात.[265]

( iv ) वैदर्भी रीती, यमक, काव्यांगे, उपमा इत्यादी मुद्यांची वामनकृत वर्णने ही व्याख्यानाचीच उदाहरणे आहेत. पण त्याने समाधी गुणाचे केलेले निरूपण हे प्रस्तुत युक्तीचे वैशिष्टचपूर्ण उदाहरण मानता येईल. वामनापूर्वीच्या कोणत्याही आचार्याने वामनाच्या पद्धतीने ह्या गुणाचे लक्षण-विवरण केलेले नाही. वामनाने प्रथमतः 'अर्थदृष्टिः समाधिः ।'[266] [ अर्थात अर्थाचे दर्शन म्हणजे समाधिगुण ] ह्या शब्दांत 'समाधि' शब्दाची व्याख्या केली आहे, नंतर अर्थाचे अयोनी ( अनन्यकारण ) व अन्यच्छायायोनी ( ज्याचे कारण दुसऱ्या अर्थाच्या छायेत आढळते ) असे दोन स्थूल भेद नमूद केले आहेत. मग ह्या दोहोंचे प्रत्येकी व्यक्त व सूक्ष्म असे पोटभेद उल्लेखून तत्पश्चात सूक्ष्माचे भाव्य व वासनीय असे आणखी दोन उपभेद निर्देशिले आहेत. ह्या सर्व प्रकारांच्या स्पष्टीकरणासाठी त्याने समर्पक पद्येही उद्धृत केली आहेत. हे सगळेच विवरण[267] नावीन्यपूर्ण आहे. ते त्याने गुरुमुखपरंपरेने किंवा योगिदृष्टीने लाभलेल्या ज्ञानाच्या आधारे केले असावे.

ह्यावरून काव्यशास्त्रकारांनी ही युक्ती सर्वांगांनी व प्रभुत्वाने उपयोजल्याचे प्रतीत होते. ह्या युक्तीच्या योगे अरुणदत्तवर्णित अधिकरणव्याख्या,[268] अर्थव्याख्या, कृच्छ्रव्याख्या, एवढ्या व्याख्या गतार्थ होतात. आता संशयाकडे वळू.

## (36) संशय [ =संदेह, निर्णयाभाव, अनिश्चय. ]

ज्ञेय वस्तूच स्वरूपतः संदिग्ध असल्यास अथवा तद्विषयक होणारी जाणीव एकाच

वेळी भावरूप व अभावरूप असल्यास किंवा ती जाणीव परस्परविरुद्धधर्मविषयक असल्यास मनात संदेह उत्पन्न होतो.

**लक्षण**—'साकाङ्क्षत्वमनिश्चितवस्तुविज्ञानम् ।'[269]

**अर्थ :** वस्तुवैशिष्ट्याचे निश्चित ज्ञान न होणे अथवा साकांक्ष ज्ञान होणे. ही युक्ती निर्णयाच्या बरोबर विरुद्ध अर्थाची आहे.

**इतर छटा :** ( 1 ) परस्परविरुद्ध / परस्परभिन्न असे दोन्ही पक्ष सारख्याच जोरदार युक्तिवादांनी मांडता येण्याजोगे असल्यामुळे त्यांपैकी कोणत्याही एकाचा निश्चय करता न येणे, ( 2 ) एखाद्या मुद्यासंबंधीची अनिश्चितता.

**प्रकार्ये :** ( 1 ) प्रतिपाद्य विषयाबद्दलची अनुकूल व प्रतिकूल अथवा परस्परविरुद्ध मते अभ्यासकांसमोर मांडण्याची संधी शास्त्रकाराला मिळणे, ( 2 ) वाचकाला प्रतिपाद्य विषयाच्या अनिश्चिततेचे निवारण करण्याचे मार्ग वा उपाय कळवणे, ( 3 ) विशिष्ट संदर्भात वापरलेल्या एखाद्या शब्दाच्या अचूक अर्थाचा बोध करवणे.

**उदाहरण :** ( i ) राजशेखराने आपल्या काव्यमीमांसेच्या बाराव्या अध्यायात एक मनोरंजक शंका उपस्थित करून तिची चर्चा केली आहे. तिचा सारांश असा : काही विद्वानांचे असे मत आहे की, प्राचीन कवींनी न हाताळलेला असा एकही विषय नाही. ( असा विषय उरला आहे काय, हा संदेह ). पण इतरांना हे मत अमान्य. त्यांच्या मते प्राचीनांनी न स्पर्शिलेले अगणित विषय अजून बाकी आहेत. ( ह्या मतामुळे वरील संदेह बळकट बनतो. ) या दोन्ही मतांच्या बाजूंनी सारखेच जोरदार युक्तिवाद करता येतात....पहिल्या मताचे विद्वान होतकरू साहित्यिकांना प्राचीन लेखकांनी हाताळलेल्या विषयांचे रूपान्तर करण्याचा उपदेश करतात. पण वाक्पतिराज ह्या भूमिकेशी सहमत नाही. तो प्राचीनांनी न स्पर्शिलेले विषय शोधून काढण्याचा उपदेश नवीनांना देतो. येथेही शंका उत्पन्न होते की, प्राचीन काव्ये वाचून अस्पृष्ट विषयांचे ज्ञान निश्चितपणे होईलच काय ? ह्यावर काहींचे म्हणणे असे की, निरनिराळ्या कवींनी एकाच विषयावर रचलेली काव्ये निरनिराळी ( म्हणजे नवीन ) भासतात. ह्या संदेहाचे निवारण करण्यासाठी राजशेखराने असा युक्तिवाद केला आहे की, वाणी व मन यांच्या पकडीत न येणाऱ्या 'सारस्वत चक्षू'च्या मदतीने कवीला पूर्वस्पृष्ट व पूर्व-अस्पृष्ट विषयांचा विवेक करता येतो.[270]

ह्या तंत्रयुक्तीचे स्वरूप एकंदरीने वरीलप्रमाणे आहे. आता क्रमप्राप्त समुच्चयाचा विचार करू.

## (37) समुच्चय [ =समूह, एकत्रीकरण, संकलन ]

**संज्ञास्वरूप :** परस्परनिरपेक्ष अशा अनेक वस्तूंचा एकमेकींशी संबंध जोडणे. सामान्यपणे 'च' अव्ययाने असा संबंध जोडून दाखवलेला असतो

**लक्षण :** अरुणदत्ताने ह्याचे लक्षण केलेले नसल्याने कौटिल्याचे लक्षण समजून घेऊ. 'अनेन चानेन चेति समुच्चयः ।'[271]

**अर्थ :** हे व हे ( दुसरे ) असा समूह.

**इतर छटा :** ( 1 ) परस्परांच्या अविरुद्ध अशा विषयांबद्दल एकामागून एक केलेले दोन उल्लेख किंवा अशी दोन विधाने, ( 2 ) अशा दोन विषयांचे सह-अस्तित्व शक्य असल्याचे दर्शवणे, ( 3 ) एकाच विधानात अनेक गोष्टींचा समाहार करणे.

**प्रकार्ये :** ( 1 ) परस्परांशी सुसंवादी व म्हणून एकमेकांबरोबर राहू शकणाऱ्या विषयांशांचे एकत्रीकरण करणे, ( 2 ) एकमेकांना अविरोधी मुद्यांशी वाचकाचा परिचय करून देणे, ( 3 ) विविध विषय व उपविषय एकत्र करून त्यांचा अन्वयार्थ लावण्याची दिशा वाचकाला सुचवणे, ( 4 ) ग्रंथाचा विस्तार टाळण्यास मदत करणे.

**उदाहरणे :** ( i ) गुलाबरावमहाराजांनी खालील सूत्रांत 'च' वापरून विविध संकल्पनांचे एकत्रीकरण केले आहे :

'आनन्दो द्विविधः भोगरूपः स्वयंरूपश्च ॥',[272] 'ईश्वरो जीवश्च ।'[273],

'तृतीयया भक्तिज्ञानप्राप्तिश्च ।'[274] [ =भक्तिप्राप्तिः ज्ञानप्राप्तिः च ]

त्यांनीच खाली उद्धृत केलेल्या सूत्रांत 'च' प्रत्यक्षात न वापरता समुच्चय केला आहे :

"ईश्वरो द्विविधः कविः कर्तेति भेदात् ॥',[275] 'उच्छिष्टो भोक्ता साक्षीति भेदात् ।',[276] 'स्फूर्तिस्त्रिधा नैसर्गिकी वैचारिकी स्वयं भेदात् ॥'[277]

तर त्यांनीच खालील सूत्रांत प्रत्यक्षात 'वा' ( =अथवा ) वापरून 'च' काराचा अर्थ जो समुच्चय/समूह तो सुचवला आहे :

'तच्चेश्वरसंस्पर्शात् सिध्यति ॥',[278] 'स्वप्नध्यानाद् वा ।',[279] 'बहुजन्मकृताभ्यासाद् वा ।',[280] 'अत्यन्तरसनिविष्टसाक्षात्काराद् वा ।'[281] 'विचारकर्तव्येऽपि विचारशून्यानन्दप्राप्तेर्वा ।'[282]

( ii ) वामनाने 'सा त्रिधा वैदर्भी गौडीया पाञ्चाली चेति ।'[283] या सूत्रात तीन सजातीय गोष्टींचा समुच्चय केला आहे तर त्यानेच 'लक्ष्यज्ञत्वमभियोगो वृद्धसेवावेक्षणं प्रतिभानमवधानं च प्रकीर्णम् ।'[284] ह्या सूत्रात विजातीय / परस्परनिरपेक्ष घटकांचा समुच्चय केला आहे ( घटक विजातीय असल्यामुळे त्यांच्या समूहाला प्रकीर्ण miscellaneous ही संज्ञा समर्पकच आहे ).

( iii ) आनंदवर्धनानेही 'वाच्यं च ध्वन्यात्मरसांगं रसाभासांगं वा, अभिनेयार्थमनभिनेयार्थं वा, उत्तमप्रकृत्याश्रयं, तदितराश्रयं वेतिबहुप्रकारम् ।'[285] या निरीक्षणपर विधानात 'वा' द्वारे समुच्चय केला आहे ह्यावरील आपल्या 'दीधिति' टीकेत बदरीनारायण शर्मांनी 'वाशब्दाः समुच्चयार्थकाः ।'[286] असाच खुलासा केला आहे.

( iv ) रुद्रटाचा टीकाकार जो नमिसाधू त्याने 'तथा शब्दः समुच्चयार्थः ।'[287]

आणि 'एव शब्दः समुच्चये ।'[288] अशा ज्या नोंदी केल्या आहेत, त्यांवरून हे दोन शब्दही समुच्चयार्थक मानले जात होते, हे स्पष्ट होते. शास्त्रीय ग्रन्थात विषयोपविषयांचे एकत्रीकरण अनेकदा अपरिहार्यपणे करावे लागत असल्यामुळे शास्त्रकार या युक्तीचा स्वाभाविकपणे सर्रास उपयोग करतात. वाचकाने मात्र 'वा'सुद्धा 'च'कारार्थी कोठे वापरला आहे ते सावधपणे ध्यानात घेऊन ग्रन्थाचा अर्थ लावावयाचा असतो. आता सम्भवाकडे वळू.

## (38) सम्भव [ =शक्यता, अनुरूपता ]

**संज्ञास्वरूप :** काही गोष्टींचे सामान्यपणे नित्य साहचर्य असते किंवा त्या एकमेकींशी कमालीच्या निगडित असतात. उदाहरणार्थ, पूर्वीच्या काळी सर्वसाधारण प्रत्येक ब्राह्मण विद्वान असे. म्हणून 'संभवति ब्राह्मणे विद्या' असे म्हणत असत. तसेच 'संयोगो हि वियोगस्य संसूचयति सम्भवम्' ( संयोग वियोगाची शक्यता सुचवतो ) असे एक सुभाषित आहे. भौतिकेतर शास्त्रांतील काही घटितांना अपरिवर्तनीय नियम लागू पडत नाहीत. अशा घटितांच्या संदर्भात शास्त्रकार काही शक्यतांचा उल्लेख करू शकतो. तसा तो करण्यासाठी ह्या युक्तीचा अवलंब केला जातो.

**लक्षण :** 'उपपत्तिर्यस्मिन्नुपपद्यते अनुपदिष्टे ।'[289]

**अर्थ :** युक्तिवाद किंवा प्रमाण प्रत्यक्षात उपदेशिले नसले तरी ते सिद्ध होते.

**इतर छटा :** ( 1 ) इतरत्र अनुपलब्ध घटिताची नियमद्वारा स्थापना, ( 2 ) ध्वनित उपदेश, ( 3 ) अनुरूप अनुमानाच्या द्वारे एखाद्या अर्थाची कल्पना करणे.

**प्रकार्ये :** ( 1 ) शक्यतांच्या उल्लेखाची सोय करणे, ( 2 ) योग्य तर्क करून अनुक्त वा सूचित उपदेश जाणून घेण्यास वाचकाला भाग पाडणे.

**उदाहरणे :** ( i ) काव्यरचनेचे सामर्थ्य कोणात संभवते त्याचा विचार करताना वामनाने पुढीलप्रमाणे उद्‌गार काढले आहेत :

'अरोचकिनः सतृणाभ्यवहारिणश्च कवयः ।। 1 ।।

इह खलु द्वये कवयः सम्भवन्ति–अरोचकिनः, सतृणाभ्यव्यवहारिणश्च ।'[290] [ अर्थात, विवेकी व अविवेकी असे कवींचे दोन प्रकार या जगात संभवतात. त्यांपैकी पहिल्या प्रकारचे कवी काव्यरचना करण्यास समर्थ ठरतात ]. वामनाने 'सम्भवन्ति' हा शब्दच वापरला आहे.

( ii ) कुन्तकाने आपल्या ग्रन्थात संभवति, संभवन्ति इत्यादी शब्दांद्वारे ह्या तंत्रयुक्तीचा प्रयोग अनेक ठिकाणी[291] केलेला आढळतो. आता स्वसंज्ञा ह्या तंत्रोपायाचा परामर्श घेऊ.

## (39 ) स्वसंज्ञा [ =शास्त्रीय पारिभाषिक शब्द ]

**संज्ञास्वरूप :** संज्ञा म्हणजे नाव. ते संज्ञीची संक्षेपात ओळख करून देते. ( 'सङ्क्षेपेण ज्ञायते यया ।' ) शास्त्रीय ग्रन्थकर्त्याला पदार्थ, संकल्पना, घटिते यांचा

आपल्या ग्रन्थात वरचेवर उल्लेख करावा लागतो. त्यासाठी तो ग्रन्थकर्ता विशेष संज्ञा वापरतो, त्यांना पारिभाषिक शब्द म्हणतात. असे काही शब्द अनेक शास्त्रांना समान असतात; तथापि प्रत्येक शास्त्रात ते थोड्याफार वेगळ्या अर्थांनी वापरलेले असतात.

**लक्षण :** 'या तन्त्रकारैः स्वतन्त्रसंव्यवहारार्थं प्रणीता सती परतन्त्रेषु न व्यवह्रति ।'[292]

**अर्थ :** शास्त्रकारांनी आपल्या शास्त्रात ( =शास्त्रीय ग्रन्थात ) स्वतंत्रपणे प्रयोग करण्यासाठी बनवलेली व दुसऱ्या शास्त्रात ( त्याच अर्थाने ) प्रयुक्त न होणारी संज्ञा म्हणजे स्वसंज्ञा.

**इतर छटा :** ( 1 ) कार्यक्षम प्रयोगासाठी बनवलेली संज्ञा. ( 2 ) लोकप्रिय दाखला.

**प्रकार्ये :** ( 1 ) प्रत्येक शास्त्रीय ( वैज्ञानिक, तांत्रिक इत्यादी ) 'अर्थ' विशिष्ट शास्त्रीय पारिभाषिक संज्ञेनेच व्यक्त करावयाचा असतो. त्यामुळे प्रत्येक शास्त्राला 'स्वसंज्ञा' ( स्वतःचे विशिष्ट पारिभाषिक शब्द ) अनिवार्यतया आवश्यक असतात. ( 2 ) शास्त्रीय संकल्पनेची निर्दोष, पूर्ण व काटेकोरपणे अभिव्यक्ती करणे. ( 3 ) वाचकाला शास्त्रीय 'अर्थ' बिनचूकपणे, समग्रपणे व अविकृतपणे कळवणे.

**उदाहरणे :** ( i ) काव्यशास्त्र ही एक स्वतंत्र ज्ञानशाखा किंवा विद्या असल्यामुळे तिची स्वतःची अशी वेगळी परिभाषा आहे. उदाहरणार्थ, भामहाने सर्गबन्ध, अभिनेयार्थ काव्य, अनिबद्ध काव्य, नेयार्थ दोष, रसवत अलङ्कार असे अनेक पारिभाषिक शब्द वापरले आहेत.

( ii ) राजशेखराने काव्यमीमांसेत कित्येक पारिभाषिक संज्ञा वापरल्या आहेत; त्यांपैकी काही अशा : अन्ययोनी, निह्नुतयोनी व अयोनी हे अर्थप्रकार;[293] प्रतिबिंबकल्प, आलेख्यप्रख्य, तुल्यदेहितुल्य व परपुरप्रवेशसदृश हे वरील अर्थांचे उपप्रकार;[294] व्यस्तक, खण्ड, तैलबिन्दू, नटनेपथ्य, छन्दोविनिमय, हेतुव्यत्यय, सङ्क्रान्तक व सम्पुट हे प्रतिबिम्बकल्पाचे पोटभेद;[295] आलेख्यप्रख्यप्रभृतींचेही पुढीलप्रमाणे पोटभेद–समक्रम, विभूषणमोष, व्युत्क्रम,····तद्विरोधी.[296]

( iii ) वामनाच्या ग्रन्थातील रीती, वैदर्भी, गौडीया, पाञ्चाली, लोक, विद्या, काव्याङ्ग, लक्ष्यज्ञत्व, अभियोग, वृद्धसेवा, अवेक्षण, प्रतिभान, अवधान, असाधू, कष्ट, ग्राम्य, अप्रतीत, अनर्थक, काव्यसमय, शब्दशुद्धी इत्यादी शब्द स्वसंज्ञाच आहेत आणि त्यांचा तत्तत्स्थानीय विशिष्ट अर्थ समजून घेतल्याशिवाय तत्तत्स्थानीय प्रतिपाद्य विषयाचा बोध होणार नाही.

अशा संज्ञा प्रत्येक काव्यशास्त्रीय ग्रन्थात स्वाभाविकपणेच आढळून येतात, त्यामुळे त्यांची यादी देण्याचे प्रयोजन नाही. पूर्वी (परिच्छेद 24) पदार्थ तंत्रयुक्तीची

चर्चा केली आहे. तिच्यातील व प्रस्तुतच्या स्वसंज्ञेतील अंतर स्पष्ट करणे आवश्यक आहे. पदार्थाचा प्राधान्याने संबंध शब्दाच्या अर्थाशी असतो. तर स्वसंज्ञेचा संबंध साक्षात त्या विशिष्ट संज्ञेशी ( म्हणजे शब्दाशी ) असतो. पदार्थात पूर्वी उल्लेखिल्या-प्रमाणे सूत्रार्थाचाही समावेश होतो तर स्वसंज्ञेचा सूत्रार्थाशी मुळीच संबंध नसतो. स्वसंज्ञा हा 'विशिष्ट' शब्द असतो, पदार्थ तसा नसतो. अर्थात दोन्ही स्वरूपत: वेगळे शब्द आहेत. आता अन्तिम तंत्रोपाय जो हेत्वर्थ त्याचा परिचय करून घेऊ.

**(40) हेत्वर्थ** [ =कारणाचे विधान, 'म्हणून', 'ह्या कारणास्तव' इत्यादी ]

हेतुदर्शक शब्द सामान्यपणे तृतीया वा पंचमी विभक्तीत वापरलेला असतो. अनेकदा 'हि' हे अव्ययही हेतुबोधक असते.

**लक्षण :** 'यदन्यप्रस्तावोक्तमन्यत्रापि तथैवोपपद्यते ।'[297]

**अर्थ :** एका संदर्भातील विशिष्ट वचनांच्या आधारे दुसऱ्या विषयाच्या संदर्भात अनुरूप अनुमान किंवा युक्तिवाद करणे.

**इतर छटा :** ( 1 ) एकत्र कार्यक्षम असणारे कारण अन्यत्रही कार्यक्षम असणे, ( 2 ) दाखला देऊन शास्त्रीय विषय सिद्ध करणे, ( 3 ) प्रयुक्त शब्दांपासून अनुक्त अर्थाचे अनुमान करणे, ( 4 ) साध्याच्या सिद्धीचे अधिकचे प्रमाण / साधन, ( 5 ) आत्मस्पष्टीकरण करणारे व प्रतिपाद्याच्या अर्थावरही प्रकाश टाकणारे कारण.

**प्रकार्ये :** ( 1 ) प्रतिपाद्य अर्थ प्रत्ययोत्पादक रीतीने सिद्ध करणे, (2) विषयाच्या घटकांतील कार्यकारणसंबंध शोधून काढण्यास वाचकाला प्रवृत्त करणे, ( 3 ) अनुक्त अर्थाचे अनुमान करण्यास, साधक हेतूच्या साहाय्याने ध्वनित विषय सिद्ध करण्यास आणि दाखल्याचे युक्तिवादार्थी निरूपण करण्यास वाचकाला मदत करणे, ( 4 ) हेतु-बोधक एका शब्दाच्या प्रयोगाच्या द्वारे ग्रन्थात संक्षिप्तता आणणे, ( 5 ) शास्त्रीय ग्रन्थ सावधपणे वाचण्याची जबाबदारी अभ्यासकावर टाकणे.

**उदाहरणे :** ( i ) काव्यात एकही सदोष शब्द का योजू नये त्याचे कारण सांगताना भामह म्हणतो : 'विलक्ष्मणा हि काव्येन दु:सुतेनेव निन्द्यते ।'[298] [ अर्थात, कारण दोषयुक्त काव्यामुळे कुपुत्रामुळे व्हावी तशी दुष्कीर्ती होते ]. भामहाने हि, काव्येन हे तृतीयान्त पद व कुपुत्राचा दाखला हे सर्व एकत्र वापरले आहे, त्यामुळे हे 'हेत्वर्था'चे वैशिष्ट्यपूर्ण ( typical ) उदाहरण आहे.

( ii ) वामनाच्या ग्रन्थात हेत्वर्थ वैपुल्याने आढळतो. खालील काही वचने पाहा : 'शुद्धानि हि पदानि नि:शंकै: कविभि. प्रयुज्यन्ते ।'[299] [ अर्थात, कारण नि:शंक कवी शुद्ध शब्दांचा प्रयोग करतात ]; 'न हि कलातत्त्वानुपलब्धौ कलावस्तु सम्यङ्-निबन्धुं शक्यमिति ।'[300] [ अर्थात, कारण कलेचे तात्त्विक ज्ञान झाल्यावाचून कलाकृतीची उत्तम प्रकारे निर्मिती करता येत नसते ]; 'स हि कवित्वप्रकर्षमाद-धाति ।'[301] [ अर्थात, कारण काव्यरचना करण्याचा प्रयत्न प्रकर्षाने काव्यनिर्मिती

साधतो ]; 'तद्धि चित्रं चित्रपटवद्विशेषसाकल्यात् ।। 31 ।। तद्दशरूपकं हि यस्माच्चित्रं चित्रपटवत् । विशेषाणां साकल्यात् ।'[302] [ अर्थात, कारण ती दहा प्रकारची नाटके, कापडावरील चित्रांप्रमाणे, सकल वैशिष्टयांनी संपन्न असल्यामुळे, रम्य असतात ]. येथे खुद्द वामनानेच हि म्हणजे यस्मात् असा खुलासा केला आहे.

( iii ) आनन्दवर्धनानेही पूर्वाचार्यांप्रमाणे कारणबोधक 'हि' आपल्या ग्रंथात अनेक जागी वापरला आहे. पण त्याचे खालील वचन प्रस्तुत संदर्भात विशेषेकरून विचारणीय आहे :

"आलोकार्थी यथा दीपशिखायां यत्नवाञ्जनः ।
तदुपायतया तद्वदर्थे वाच्ये तदादृतः ।।'[303]

अर्थात, ज्याप्रमाणे प्रकाश इच्छिणारा, प्रकाशसाधनरूप दीप प्रज्वलित करण्यास उद्युक्त होतो, त्याप्रमाणे व्यंग्यार्थ इच्छिणारा, तत्साधनरूप वाच्यार्थाला आदराने जवळ करतो. येथे दीपाच्या दाखल्याच्या साहाय्याने व्यंग्यार्थप्राप्तीचा विषय सिद्ध केला आहे.

( iv ) राजशेखराच्या ग्रंथातील 'तद्धि शास्त्राण्यनुधावति ।'[304], 'सा हि बुद्धि-विकासकामधेनुः ।'[305], 'कुकविता हि सोच्छ्वासं मरणम् ।'[306], 'पक्षपातो हि गुणदोषौ विपर्यासयति ।'[307] इत्यादी 'हि'-युक्त वचने प्रस्तुत तंत्रयुक्तीची निदर्शक आहेत.

पूर्वविवेचित अपदेश ( परिच्छेद 7 ) हाही कारणबोधकच असतो. किंबहुना अपदेशातही 'हि' अव्ययाचा प्रयोग आढळतो ( पाहा—'न हि उपायमपेक्षन्ते सर्वे रोगाः····'[308] ). त्यामुळे हि-निबद्ध हेत्वर्थ अपदेशात विलीन करणेच योग्य. हेत्वर्थात जसा दाखला असतो तसाच निदर्शनातही ( परिच्छेद 18 ) असतो. या दोहोंतील भेदासंबंधी डल्हणाने पुढीलप्रमाणे खुलासा केला आहे, तो चिंत्य आहे :

"दृष्टान्तेनार्थः प्रसाध्यते यत्र तन्निदर्शनमिति । अतएव च निदर्शनात् हेत्वर्थो भिद्यते, हेत्वर्थस्य दृष्टान्तमात्रत्वात् ।"[309] अर्थात, डल्हणाच्या मतानुसार निदर्शन उपाय अर्थ सिद्ध करतो, तर हेत्वर्थ अर्थ सिद्ध करीत नाही, तर तो केवळ दृष्टान्त असतो. पण खुद्द डल्हणानेच हेत्वर्थाच्या निरूपणात पुढील उद्‌गार काढले आहेत, ते त्याच्या वरील मताचे खंडन करणारे आहेत : "यथा—मृत्पिण्डोऽद्भिः प्रक्लिद्यते तथा माषदुग्धप्रभृतिभिर्व्रणः प्रक्लिद्यत इति ।····अत्र बाह्येन मृत्पिण्डदृष्टान्तेन माषदुग्ध-योगादिभिराभ्यन्तरो व्रणप्रक्लेदः साध्यते ।"[310] ह्यावरून निदर्शन व हेत्वर्थ हे तंत्रोपाय एकच कार्य बजावतात.

येथवर छत्तीस तंत्रयुक्त्यांच्या एकूणचाळीस संज्ञांचा सविस्तर विचार केला. नीलमेघाच्या मतानुसार शास्त्रकार व शास्त्राभ्यासक ह्या दोघांनी संबंधित विषयाच्या बाबतीत ह्या युक्त्या सावधपणे योजावयाच्या असतात :—

[ "एता एवमेवं तत्र तत्र तन्त्रप्रदेशे सर्वत्र सावधानेनोपयोज्याः ।"[311] ]

यांच्या प्रयोगाच्या प्रयोजनाचा खुलासा चरक व त्याचा टीकाकार चक्रपाणिदत्त, सुश्रुत व त्याचा टीकाकार डल्हण आणि वाग्भट व त्याचा टीकाकार इन्दू यांनी स्वतःच केला आहे. तो थोडक्यात समजून घेऊ.

## (41) तंत्रयुक्त्यांचे प्रयोजन

( 1 ) चरकाच्या मते ज्याप्रमाणे सूर्य कमळे फुलवतो किंवा एखादा दिवा घराचा कोनाकोपरा उजळून टाकतो, त्याप्रमाणे ह्या तंत्रयुक्त्या शास्त्रीय अर्थावर प्रकाश टाकतात. ज्याने एखाद्या शास्त्रात उत्तम प्रावीण्य संपादिले आहे व ज्याने ह्या तंत्रयुक्त्याही चांगल्या रीतीने आत्मसात केल्या आहेत, त्याला ह्या तंत्रयुक्त्यांच्या ज्ञानामुळे, दुसरे कोणतेही शास्त्र चटकन कळू शकते. वैद्याला ह्या तंत्रयुक्त्यांचे ज्ञान, वैद्यकीय विषयाच्या सगळ्या खाचाखोचा समजून घेण्याच्या दृष्टीने, अत्यावश्यक आहे. ( यथाम्बुजवनस्यार्कः प्रदीपो वेश्मनो यथा ॥ 46 ॥ प्रबोधप्रकाशार्थास्तथा तन्त्रस्य युक्तयः ॥ एकस्मिन्नपि यस्येह शास्त्रे लब्धास्पदा मतिः ॥ 47 ॥ स शास्त्रमन्यदप्याशु युक्तिज्ञत्वात् प्रबुध्यते ॥[312] ) चरकाच्या ह्या वचनांवरून तंत्रयुक्त्या सर्व शास्त्रांत वापरलेल्या असतात; त्या शास्त्रीय अर्थ सूर्यप्रकाशासारखा लख्ख करतात व म्हणून प्रत्येक शास्त्राच्या अभ्यासकाला, अध्यापकाला, समीक्षकाला तसेच शास्त्रीय विषयावर ग्रन्थरचना करू इच्छिणाऱ्याला त्यांचे उत्तम ज्ञान आवश्यक असते, असे निष्कर्षरूपाने स्थापित होते.

( 2 ) वरील चरकोक्त कारिकांवर आयुर्वेददीपिका नामक टीका लिहिणाऱ्या चक्रपाणिदत्ताने जे विवरण केले आहे त्यातील महत्त्वाचा अंश असा: चरकाने सूर्याच्या दाखल्याच्या द्वारे असे प्रतिपादिले आहे की, तंत्रयुक्त्या शास्त्रातील संकुचित म्हणजे संक्षिप्त विषयोपविषयांचा विस्तार (=तपशीलवार खुलासा) करतात. दीपाचा दाखला देऊन चरकाने असे प्रतिपादिले आहे की, शास्त्रकाराच्या विशिष्ट निरूपणपद्धतीमुळे उत्तान शब्दांखाली झाकला गेलेला म्हणजेच गूढ असा अर्थ हेत्वर्थादि-तंत्रयुक्त्यांमुळे प्रकट होतो ('··· तन्त्रे संकुचितस्यार्थप्रदेशस्य विस्तारकास्तन्त्रयुक्तयः; प्रबोधनाद्विस्तारका भवन्तीत्यर्कदृष्टान्तेन दर्शयति; दीपदृष्टान्तेन तु यथा दीपः सन्तमेव तमसा पिहितं प्रकाशयति तथा हेत्वादिकास्तन्त्रयुक्तयः सन्तमर्थं गूढं प्रकाशयन्तीति दर्शयति ।'[313]) एतावता, चक्रपाणिदत्ताच्या मतानुसार ह्या तंत्रयुक्त्या सूत्ररूपाने/संक्षिप्तपणे मांडलेल्या शास्त्रीय विषयाचा विस्ताराने उलगडा करतात आणि अनुक्त, अल्पोक्त किंवा गूढोक्त अर्थांवर प्रकाशझोत टाकून त्यांना सुविशद करतात. ह्यांच्यामुळे शास्त्राचे पूर्ण, सांगोपांग, प्रमादरहित व स्पष्ट ज्ञान होते.

( 3 ) सुश्रुताने 'तंत्रयुक्त्यांचे ( शास्त्रात ) प्रयोजन काय ?' असा प्रश्न स्वतःच उपस्थित करून त्याच्या उत्तराच्या निमित्ताने तंत्रयुक्त्यांचे प्रयोजन सांगितले आहे.

त्याच्या मतांचा गोषवारा असा : वाक्याची योजना व अर्थाची संरचना असे तंत्रयुक्त्यांचे द्विविध प्रयोजन आहे. त्यांच्या मदतीने, स्पष्ट शब्दांत व्यक्त न केलेल्या, प्रच्छन्न व अल्पोक्त अशा शास्त्रीय अर्थांची, प्रतिष्ठापना करता येते. तसेच खोटेपणाने वाद करणाऱ्या किंवा वितंडवाद करणाऱ्या वावदूकाच्या युक्तिवादांचे खंडन करून स्वतःच्या भूमिकेचे समर्थन करता येते. ('अत्रासां तन्त्रयुक्तीनां किं प्रयोजनम् ? उच्यते—वाक्ययोजनमर्थयोजनं च ॥ 4 ॥ असद्वादिप्रयुक्तानां वाक्यानां प्रतिषेधनम् । स्ववाक्यसिद्धिरपि च क्रियते तन्त्रयुक्तितः ॥ 5 ॥ व्यक्ता नोक्तास्तु ये ह्यर्था लीना ये चाप्यनिर्मलाः । लेशोक्ता ये च केचित्स्युस्तेषां चापि प्रसाधनम् ॥ 6 ॥'[814]) सुश्रुतानेच 'ऊह्य' तंत्रयुक्तीच्या विवरणानंतर एतद्विषयक अधिकचा खुलासा पुढीलप्रमाणे केला आहे : तंत्रयुक्त्यांच्या वैशिष्ट्यांची कल्पना बुद्धिमान वाचकांनी स्वतः करावी; शास्त्राचे सार शोधून काढण्यास ह्या युक्त्यांची मदत होते; त्यांना शब्दरचनेचे व अर्थयोजनेचे नियम लागू पडतात; ह्या शास्त्रीय ग्रन्थाच्या यथावत अर्थनिरूपणाचा मार्ग दाखवतात, म्हणून बुद्धिमान मनुष्याने ह्यांचे यथाम्नाय ( गुरुपरंपरागतोपदेशानुसार )[815] ज्ञान प्रयत्नपूर्वक संपादन करावे. ( 'द्वात्रिंशद्युक्तयो ह्येतास्तन्त्रसारगवेषणे। मया सम्यग्विनिहिताः शब्दार्थन्यायसंयुताः ॥ 42 ॥'[816] ) अशा प्रकारे सुश्रुताने पूर्वकथित प्रयोजनांत 'शास्त्रीय ग्रन्थाच्या तात्पर्याचे ग्रहण' ह्या आणखी एका प्रयोजनाची भर घातली आहे. शिवाय तंत्रयुक्त्यांच्या मदतीने शास्त्रीय ग्रन्थाची यथावत अर्थमीमांसा करता येते अशीही त्याची धारणा आहे.

( 4 ) सुश्रुताच्या उपर्युक्त प्रयोजनासंबंधी त्याचा टीकाकार जो डल्हण त्याने खुलासा केला आहे तो असा : "वाक्ययोजनमर्थयोजनं चेति वाक्यस्यासंबद्धस्य योजनं सम्बन्धनं वाक्ययोजनं, लीनस्यासङ्गतस्य चार्थस्य प्रकाशनं सङ्गतीकरणं चार्थयोजनम् । तत्र कासांचित्तन्त्रयुक्तीनां योगोद्देशनिर्देशादीनां वाक्ययोजनं, कासाञ्चिदधिकरणपदार्थोह्यादीनामर्थयोजनम् ।"[817] अर्थात, दूरस्थ व म्हणून असंबद्ध असलेली विधाने एकमेकांजवळ आणून त्यांचा संबंध जोडणे म्हणजे वाक्ययोजन. प्रच्छन्न अर्थ प्रकट करणे व असंगत भासणाऱ्या अर्थाची संगती लावून दाखवणे म्हणजे अर्थयोजन होय. योग, उद्देश, निर्देश इत्यादी युक्त्या वाक्ययोजनापर असून अधिकरण, पदार्थ, ऊह्य इत्यादी अर्थयोजनापर आहेत. एकंदरीने डल्हणाने अर्थसंगती साधणे हे तंत्रयुक्त्यांचे आणखी एक कार्य नमूद केले आहे.

( 5 ) वाग्भट हा चरक व सुश्रुत यांचा निष्ठावान अनुयायी आहे. त्याने चरकाचा सूर्याचा(व दीपाचाही) दाखला देऊन म्हटले आहे की, ह्या तंत्रयुक्त्या लीन ( =प्रच्छन्न ), व्यत्यास ( =असंबद्ध व विरुद्ध/विपरीत ) व लेश ( =अल्प ), उक्तींच्या अर्थांवर प्रकाश टाकतात ('लीनव्यत्यासलेशोक्तिगदितानां प्रकाशकाः ।').[818] ह्यांपैकी असंबद्धार्थाचा निर्देश डल्हणाने केला आहे. पण विरुद्धार्थाचा केलेला नाही. तो करण्याचे श्रेय वाग्भटाला आहे.

( 6 ) वाग्भटाच्या इन्दू नामक टीकाकाराने आपल्या टीकेत काही महत्त्वपूर्ण विधाने केली आहेत, ती अशी: "…तन्त्रयुक्ति-अविचक्षण:… तन्त्रार्थं न अधिगच्छति । …लीनगदितानां व्यत्यासगदितानां लेशगदितानामुक्तिगदितानां च प्रकाशका: । लीनं तद्यत् स्फुटं वक्तुं न पार्यते । व्यत्यास: परस्परविवर्तनम् । लेशोंशेन स्पर्श: । उक्तिर्वचनभङ्गि: । एताश्च युक्तयो वाक्यन्यायोदधेरसंख्यप्रकारसम्भविनो…. सारं गृहीत्वा एवं व्यवस्थिता: । पदार्थयोजनास्तु व्युत्पन्नानां प्रसिद्धा एवेत्यत आचार्येण नोक्ता: ।'[819] अर्थात, ह्या तंत्रयुक्त्यांचे अध्ययन न करणाऱ्यास शास्त्राचे ज्ञान होत नाही. ह्या पुढील चार प्रकारच्या अर्थांवर प्रकाश टाकतात: 1 स्पष्टपणे न सांगितला गेलेला किंवा तसा सांगणे अशक्य असलेला, 2 क्रमपरिवर्तित किंवा परस्परविरुद्ध, 3 ज्याला थोडासा स्पर्श केला आहे असा ( अत्यल्प भाग शब्दोक्त, बहुतांश अनुक्त ), व 4 अपेक्षित शब्दांऐवजी वेगळ्या शब्दांत सांगितलेला. वाक्यरचना व वाक्यार्थमीमांसा ह्यांना लागू होणाऱ्या नियमांशी प्रस्तुत तंत्रयुक्त्या सुसंगत असल्यामुळे ह्यांचे अगणित प्रकार संभवतात. चरकप्रभृतींनी सांगितलेल्या तंत्रयुक्त्या म्हणजे त्या ( अगणित ) तंत्रयुक्तिविस्ताराचे सार होय.

इन्दूने वर जे 'उक्ती'चे स्पष्टीकरण केले आहे ते महत्त्वपूर्ण आहे. त्याने वाक्ययोजना व वाक्यार्थव्यवस्था यांच्याशी तंत्रयुक्त्यांचा संबंध जोडला आहे, तो नीटपणे समजून घ्यावयास हवा. प्रथमत: वाक्ययोजनेचा विचार करू.

पूर्वी वाक्यशेष ( परिच्छेद 31 ) तंत्रयुक्तीच्या संदर्भात 'वाक्य' संज्ञेचा थोडासा विचार केलाच आहे. त्यात आवश्यक तेवढी भर घालू.

वाक्य हे भाषेचे प्राथमिक एकक आहे. म्हणून भाषेच्या सम्यक ज्ञानासाठी वाक्याचे समुचित अध्ययन व ज्ञान आवश्यक आहे. वाक्यातील शब्द साकांक्ष असले तरी वाक्यार्थ निराकांक्ष ( स्वयंपूर्ण ) असतो. वाक्य एकार्थक वा एकप्रयोजननिष्ठ असते. म्हणून वाक्यात क्रियापदाला 'प्राधान्य' असते. भर्तृहरीने वाक्यविषयक आठ वाद ( विचारप्रवाह ) संकलित व प्रतिपादित केले आहेत. ह्यांपैकी 1. आख्यातशब्दवादानुसार वाक्यात श्रूयमाण किंवा अनुमेय असे क्रियापदच प्रधान असून तदाधारे कर्ताकर्मादींचा अध्याहाराने बोध होतो. 2. संघातवादानुसार एक अर्थ व्यक्त करणाऱ्या शब्दांच्या समूहाला वाक्य म्हणतात. 3 संघातवर्तिनी-जातिवाद (शब्दांच्या समूहात राहणाऱ्या सामान्याला हे नाव आहे)-शब्दसमूहातील जातीच ( =सामान्य; उदाहरणार्थ, गोचे सामान्य 'गोत्व' ) वाक्य आहे. 4. एकानवयवशब्दवादानुसार वाक्य अखंड व निरवयव असते. ते वास्तविक असून बुद्धिस्थ असते. आपण सोयीखातर त्याचे शब्दांत विभाजन करतो. 5. क्रमवादानुसार वाक्यातील शब्द ज्या कालानुक्रमाने उच्चारलेले असतात त्या क्रमालाच वाक्य म्हणतात. 6. बुद्ध्यनुसंहृतिवादानुसार शब्द मुख्यत: आन्तरिक असून तो एकसंध व अखंड असतो, त्यालाच

वाक्य म्हणतात. त्याचा अर्थही बुद्धिगत असतो. 7. आद्यपदवादानुसार वाक्यात वापरलेल्या आद्य शब्दालाच वाक्य म्हणतात. 8. पृथक्-साकांक्ष-सर्वपदवादानुसार कोणत्याही वाक्यातील सर्वच शब्द वेगवेगळी वाक्येच असतात व त्या सगळ्याच शब्दांना स्वत:चा अर्थ असतो. ह्या आठांपैकी कोणताही सिद्धान्त सर्वमान्य होऊ शकला नाही. लोकव्यवहारात एकार्थक शब्दसमूहालाच वाक्य मानले जाते.[820]

वाक्यांत वापरलेल्या शब्दांपासून होणाऱ्या अर्थबोधाची पुढील आठ साधने शास्त्रकारांनी वर्णिलेली आहेत : 1 व्याकरण, 2 उपमान, 3 कोष, 4 आप्तवाक्य, 5 वृद्धव्यवहार, 6 वाक्यशेष, 7 विवृती व 8 सिद्धपदाचे सांनिध्य.[821]

इन्दूच्या उपर्युद्धृत टीकेत पदार्थयोजना शब्द आला आहे. त्याचे स्पष्टीकरण असे : प्रत्येक भाषेत एकच अर्थ व्यक्त करणारे निरनिराळे अनेक शब्द असतात. तसेच एकाच शब्दाचे निरनिराळे अनेक अर्थही असतात. अशा अनेकार्थक शब्दांचे/ वाक्यांचे 'एकार्थक' निरूपण नियंत्रित करण्याची पुढील नियामके भर्तृहरीने सांगितली आहेत : 1 संसर्ग ( एका वस्तूचा दुसरीशी असलेला संयोगसंबंध ), 2 विप्रयोग ( दोन प्रसिद्ध वस्तंचे पृथक राहणे ), 3 साहचर्य ( एखाद्या कार्यात दोन व्यक्तींचे/ वस्तूंचे नित्य एकत्र असणे ), 4 विरोधिता ( दोन वस्तूंचे/व्यक्तीचे एकत्र नसणे ), 5 अर्थ ( प्रयोजन ), 6 प्रकरण ( प्रसंग, संदर्भ ), 7 लिंग ( खूण किंवा चिह्न ), 8 अन्य शब्दाचे सांनिध्य, 9 सामर्थ्य ( विशिष्ट कार्य संपादन करण्यास समर्थ अर्थ ), 10 औचित्य ( योग्यता ), 11 देश ( नगर, ग्राम इ. स्थान ), 12 काल ( दिवस, ऋतू, संवत्सर इ० ). 13 व्यक्ती ( व्याकरणानुसार लिंग ), 14 स्वर-आदि ( उच्चाराचे चढउतार, अभिनय इ० )[822]. ह्यांना इन्दूने पदार्थयोजना म्हटले आहे.

नीलमेघाने ह्या सर्व युक्त्या उपयोजनीय असल्याचे प्रतिपादले आहे हे पूर्वी परिच्छेद 40 च्या अखेरीस उल्लेखिले आहेच. ह्याचा अर्थ असा की, शास्त्रकाराने समग्र ग्रंथात तंत्रयुक्त्यांचा सर्रास प्रयोग करावा आणि अशा प्रकारे सिद्ध झालेल्या ग्रंथात ग्रंथकाराने कोणत्या ठिकाणी कोणती युक्ती योजलेली आहे ते अभ्यासकाने वा विवरणकाराने खोलवर विचार करून शोधून काढावे आणि तदनुसार सावधपणे ग्रंथाचा अर्थ लावावा. अशा प्रकारे शास्त्रीय ग्रंथनिबन्धन (= रचना) व ग्रंथनिर्वचन ( =अर्थनिरूपण, अर्थपरीक्षण व अर्थनिर्णय ) ह्या उभयविध बौद्धिक व्यापारांशी तंत्रयुक्त्या अविभाज्यपणे निगडित असतात, हे ठरते.

## (42) विश्लेषण

( 1 ) उत्तरपक्ष, उपमान, व दृष्टान्त ह्या तंत्रयुक्त्या क्रमश: कौटिल्य व विष्णुधर्मोत्तरपुराणकार या दोघांनीच विचारात घेतल्या आहेत. ( 2 ) उत्तरपक्ष, एकान्त, उपमान व दृष्टान्त ह्या एकार्थक युक्त्या आहेत, त्यांच्या इतर अर्थच्छटा नाहीत. ( 3 ) उर्वरित पस्तीस युक्त्या अनेकार्थक आहेत. ( 4 ) निर्वचन, पदार्थ, योग,

विधान, व्याख्यान व स्वसंज्ञा यांची पर्यायी लक्षणे त्या-त्या आद्य लक्षणकारांनीच केली आहेत. ( 5 ) अनुमत-अपदेश, उत्तरपक्ष-पूर्वपक्ष, उद्देश-निर्देश व निर्णय-पूर्वपक्ष या जोडया परस्परपूरक आहेत. ( 6 ) तर अतिक्रान्तावेक्षण-अनागतावेक्षण, उत्तरपक्ष-पूर्वपक्ष, उद्देश-निर्देश, एकान्त-नैकान्त व विकल्प-समुच्चय ह्या जोडया परस्पर-विरुद्धार्थक आहेत. ( 7 ) कौटिल्य, सुश्रुत, अरुणदत्त, इन्दू व नीलमेघ यांपैकी प्रत्येकाचा एतद्विषयक स्वतंत्र संप्रदाय असल्याचे प्रतीत होते. त्यांनी अनेक तंत्रयुक्त्यांचे स्वतःच्या स्वतंत्र दृष्टिकोणातून स्वरूपकथन व निरूपण केलेले आढळते. ह्या तंत्र-युक्त्यांच्या आधारे कोणत्याही शास्त्रीय ग्रंथाचे जे घटक किंवा पैलू हस्तगत होतात त्यांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करता येईल :

( i ) **प्रतिपाद्य विषय :** शास्त्रीय ग्रंथाचा प्रतिपाद्य विषय; त्याचे मूळ उगम-स्थान; उपविषय; त्यांचे भाग-अनुभाग; त्यांचे परस्परसंबंध; त्यांची परस्परानुरूपता; मुख्य प्रतिपाद्य विषयाची वैशिष्ट्ये.

( ii ) **प्रयोजन :** शास्त्राच्या प्रधान विषयाच्या व तदंगभूत प्रमेयतत्त्वादींच्या विश्लेषणात्मक विशदीकरणाचा उद्देश.

( iii ) **तात्त्विक गाभा :** विविध शास्त्रीय संकल्पना व विचार स्थापित करण्याची साधने निश्चित करून उपयोजणे; अनुक्त, अल्पोक्त, सूचित व वैशिष्टयपूर्ण पद्धतीने व्यक्त संकल्पनांची पृथक्करणपूर्वक चर्चा करणे; ह्या सर्व संकल्पनांचे परस्परावलंबित्व दर्शवणे; विविध विचारांच्या निश्चितीच्या बाबतीत संदर्भाचे महत्त्व व प्रकार्य ध्यानात घेणे; त्या विचारांची जुळणी-जोडणी व स्थापना करणे; इतर विचारवंतांच्या मतांची साक्षेपी दखल घेणे; त्या मतांचा स्वीकार किंवा धिक्कार करणे; स्वमताचे तर्कशुद्ध प्रतिष्ठापन करणे; सयुक्तिक चर्चेनंतर शास्त्रीय प्रश्नांचा अन्तिम निर्णय करणे; विविध विचार-कल्पनादींतील कार्यकारण-संबंधाची तपासणी करणे; अपरिवर्तनीय नियम प्रतिपादणे; वैकल्पिक सूचना देणे; अनुल्लंघनीय आदेश देणे.

( iv ) **असाधारण वैशिष्टय :** शास्त्रीय विषयाच्या विद्वद्ग्राह्य विवेचनात गुरुमुख-परंपरेने तसेच योगिदृष्टीने मिळविलेल्या ज्ञानाचा यथोचित उपयोग करून घेणे.

( v ) **रचना :** संक्षेप व विस्तार यांत तारतम्य करणे; विषय व उपविषय यांची अनुक्रमणिका सिद्ध करून त्यांची पद्धतशीर मांडणी करणे; त्यांच्या निर्देशांच्या विविध पद्धतींचा यथाशक्ती, यथामती व यथौचित्य अवलंब करणे; वाक्यारंभ, वाक्य-मध्य व वाक्यान्त यांचा विवेक करणे; ग्रन्थात विखुरलेल्या विधानांची संगतवार व विषयानुरूप जुळणी करणे; पारिभाषिक शब्द बनवणे, त्यांची व्युत्पत्ती सांगणे, त्यांची अर्थमर्यादा ठरवणे; लुप्त-शब्दांचा विवेक करणे; शब्दांचा अन्वय जुळवणे.

( vi ) **भाषा :** अर्थपूर्ण शब्दरचना करणे; लोकप्रसिद्ध उदाहरणांचा यथास्थान

नि:संकोचपणे उपयोग करणे; तर्कशुद्ध विचार पटवण्यासाठी अनुरूप दाखले देणे; ज्ञानी व अडाणी अशा उभयवर्गीय वाचकांना कळेलसा विवेचनाचा बाज ठेवणे; विषयाचा काही अंश विशेषज्ञांसाठीच प्रतिपादणे; एकूण ग्रन्थ ज्ञानवर्धक, विचार-प्रवर्तक, नवसंशोधनाला प्रेरक व चित्तवेधक बनवणे.

प्रस्तुत निबंधात प्राचीन शास्त्रीय ग्रन्थरचनेच्या "प्रधान" उपायांचे सोदाहरण, सविस्तर व विश्लेषणात्मक अध्ययन केले. ह्याच पद्धतीने पुढील निबंधात "गौण" उपायांचे अध्ययन करू आणि मग ह्या दोन्ही निबंधान्तर्गत विवेचनामधून हाती येणारे निष्कर्ष पुढील निबंधाच्या अखेरीस एकत्रित करून नोंदवू. तसे केल्याने प्राचीन शास्त्रीय ग्रन्थरचनेच्या पद्धतीचे अथवा प्राचीन शोधप्रबंधांच्या लेखनपद्धतीचे स्वरूप सुस्पष्ट होईल.

## संदर्भ टीपा

1. नीलमेघ, **तन्त्रयुक्तिविचारः [ नीलयुक्ति ]**, संपा. एन्. ई. मुत्तुस्वामी, द्वितीय, त्रिवेंद्रम, केरलदेशप्रशासन, 1976, Appendix p. xi.
2. वामन, **काव्यालङ्कारसूत्राणि [ वामन ]**, संशोधक, नारायण राम आचार्य, चतुर्थ, मुंबई, निर्णयसागर प्रेस, 1953, पृ. 39.
3. तत्रैव, पृ. 11. 4. तत्रैव, पृ. 39.
5. आनंदवर्धन, **ध्वन्यालोकः**, विवृतिकार बदरीनाथ शर्मा, भाषानुवादक, शोभित मिश्र, द्वितीय, बनारस, चौखम्बा-संस्कृत-सीरिज, 1953, पृ. 204.
6. तत्रैव, पृ. 174. 7. **नीलयुक्ति**, Appendix p. x.
8. दण्डी, **काव्यलक्षणम्**, संस्कर्ते अनन्तलाल ठाकुर व इतर, दरभंगा, मिथिला विद्यापीठ, 1957, पृ 180.
9. तत्रैव. 10. तत्रैव, पृ. 181. 11. **वामन**, उनि. पृ. 20. 12. तत्रैव, पृ. 45.
13. तत्रैव, पृ. 52. 14. **नीलयुक्ति**, उनि., Appendix p. viii.
15. गुलाबराव महाराज, **काव्यसूत्रसंहिता**, संपा. वा. के. लेले, नागपूर, विश्वसंत साहित्य प्रतिष्ठान, 1981, पृ. 4.
16. राजशेखर, **काव्यमीमांसा**, संपा. सी. डी. दलाल व इतर, तृतीय, बडोदे, ओरिएण्टल इन्स्टिटयूट, 1934, पृ. 1.
17. भिक्षुगौरीशङ्कर, **सर्वतन्त्रसिद्धान्तपदार्थलक्षणसंग्रह**, षष्ठ, काशी, भिक्षुगौरीशङ्कर, संवत् 2006, पृ. 161.
18. वामन, उनि.; पृ. 1, 14, 29, 43 व 68. 19. तत्रैव, पृ. 10.
20. तत्रैव, पृ. 11. 21. **नीलयुक्ति**, Appendix. p. xiii. 22. तत्रैव
23. कौटल्य, **कौटलीयार्थशास्त्रम्**, संपा. एन्. एम्. वेङ्कटनाथाचार्य, सुधारलेली चौथी आवृत्ती, मैसूर, मैसूर विश्वविद्यालय, 1960, पृ. 461.

24. **ध्वन्यालोक**, उनि. पृ. 25. 25. तत्रैव, पृ. 44. 26. तत्रैव, पृ. 63.
27. तत्रैव, पृ. 442. 28. **वामन**, पृ. 29. 29. **काव्यमीमांसा**, उनि., पृ. 3.
30. तत्रैव, 31. तत्रैव, पृ. 8. 32. तत्रैव, पृ. 11.
33. **कौटलीयार्थशास्त्रम्**, उनि., पृ. 459.
34. भामह, **काव्यालङ्कार**, भाष्यकार देवेन्द्रनाथ शर्मा, पटना, बिहार-राष्ट्रभाषा-परिषद्, 1962, पृ. 26.
35. तत्रैव, पृ. 66.
36. केशवमिश्र, '**अलङ्कारशेखरः**', संशोधक अनंतराम वेताळ, बनारस, चौखम्बा संस्कृत सीरीज ऑफिस, 1927, पृ. 39.
37. तत्रैव 38. **काव्यमीमांसा**, उनि., पृ. 2. 39. तत्रैव, पृ. 3.
40. तत्रैव, पृ. 13. 41. **नीलयुक्ति**, उनि., Appendix. p. xiv 42. तत्रैव.
43. तत्रैव, Appendix p. ix
44. **काव्यसूत्रसंहिता**, उनि., पृ. 35-37. 45. तत्रैव, पृ. 74-75.
46. **काव्यमीमांसा**, उनि., पृ. 14. 47. **वामन**, पृ. 2. 48. तत्रैव, पृ 3.
49. तत्रैव, पृ. 6.
50. हेमचन्द्र, **काव्यानुशासनम्**, संपा. शिवदत्त व इतर, द्वितीय, मुंबई, निर्णयसागर मुद्रणालय, 1934, पृ. 355.
51. **नीलयुक्ति**, उनि. Appendix p. xi. 52. **काव्यालङ्कार**, उनि. पृ. 24.
53. तत्रैव, पृ. 26.
54. रुद्रट, **काव्यालङ्कार [ रुद्रटालङ्कार ]**, संपा. दुर्गाप्रसाद व इतर, तृतीय, मुंबई, निर्णयसागर मुद्रणालय, 1928.
55. तत्रैव, पृ. 21 56. तत्रैव
57. वाग्भट, **वाग्भटालङ्कारः**, टीकाकार सत्यव्रत सिंह, वाराणसी, चौखम्बा विद्याभवन, 1957, पृ. 11.
58. तत्रैव. 59. **काव्यानुशासनम्**, उनि., पृ. 164. 60. तत्रैव. 61. **वामन**, पृ. 16.
62. तत्रैव. 63. तत्रैव, पृ. 18. 64. तत्रैव 65. **नीलयुक्ति**, उनि. Appendix p. x
66. **काव्यालङ्कार**, उनि., पृ. 2. 67. तत्रैव, पृ. 11.
68. **रुद्रटालङ्कार**, उनि., पृ. 35. 69. **वाग्भटालङ्कार**, उनि., पृ. 5
70. तत्रैव. 71. **नीलयुक्ति**, Appendix p. ix. 72. **अलङ्कारशेखर**, उनि., पृ. 4.
73. तत्रैव, पृ. 6. 74 **वामन**, पृ. 8. 75. तत्रैव, 76. तत्रैव, पृ. 12.
77. तत्रैव, पृ. 30. 78. **नीलयुक्ति**, Appendix p. xiii.
79. **काव्यालङ्कार**, उनि., पृ 17. 80. तत्रैव, पृ. 19. 81 **वामन**, पृ. 13.
82. तत्रैव. 83. **नीलयुक्ति**, Appendix, p ix.

84. कमलाकान्त मिश्र, **अर्थविज्ञान**, प्रथम. दिल्ली, नाग प्रकाशक, 1988, पृ. 38, 41-42.

85. **काव्यालङ्कार**, उनि , पृ. 27. 86. तत्रैव, पृ. 62. 87. तत्रैव, पृ. 84.

88. तत्रैव, पृ. 154. 89. **अलङ्कारशेखर**, उनि., पृ. 4. 90. तत्रैव, पृ. 67.

91. **काव्यमीमांसा**, उनि , पृ. 52. 92. तत्रैव, पृ. 2. 93. तत्रैव, पृ. 32.

94. तत्रैव, पृ. 49 95. **कौटलीयार्थशास्त्रम्**, उनि., पृ. 459.

96. **अर्थविज्ञान**, पूर्वोक्त, पृ. 42, पादटीप. 4. 97. तत्रैव, पृ. 42-43.

98. **काव्यालङ्कार**, उनि., पृ. 6. 99. तत्रैव, पृ. 26.

100. **अलङ्कारशेखर**, पृ. 29. 101. **वामन**, पृ. 13. 102. तत्रैव, पृ. 13.

103. तत्रैव, पृ 6. 104. **नीलयुक्ति**, Appendix. p. xii

105. **काव्यालङ्कार**, उनि , पृ. 66. 106. **काव्यलक्षणम्**, उनि , पृ. 94.

107. तत्रैव, पृ 58. 108. **वामन**, पृ. 11

109. क्षेमेन्द्र, **कविकण्ठाभरण**, संपा. वा. के. लेले, प्रथम, वाराणसी, मोतीलाल बनारसीदास, 1967, पृ. 85.

110. क्षेमेन्द्र, **औचित्यसिद्धान्त आणि औचित्यविचारचर्चा**, संपा. वा. के. लेले, प्रथम, वाराणसी, सौ. मालती वामन लेले, 1966, पृ. 156.

111. (A) *History of Sanskrit Poetics*, S. K. De, Complete rev. ed., Calcutta, 1960, p. 285.
 (B) *Sanskrit Poetics As A Study of Aesthetics* S. K. De, Calcutta, 1963, p. 40.
 (C) *Some Problems of Sanskrit Poetics*, S. K. De, Calcutta, 1959, p. 44.

112. **रुद्रटालङ्कार**, पूर्वोक्त, पृ. 143. 113. तत्रैव.

114. **नीलयुक्ति**, Appendix. p. xiv. 115. तत्रैव, Appendix. p. x.

116. **काव्यालङ्कार**, पृ. 4. 117. तत्रैव, पृ. 16. 118. **काव्यलक्षणम्**, पृ. 8.

119. **काव्यमीमांसा**, पृ. 21.

120. **विष्णुधर्मोत्तरपुराण** तृतीय खण्ड प्रथम भाग, संपा. प्रियबाला शाह, बडोदे, ओरिएण्टल इन्स्टिटयूट्, 1958, पृ. 13. 121. **काव्यमीमांसा**, पूर्वोक्त, पृ. 97.

122. तत्रैव, पृ. 49. 123. **अलङ्कारशेखर**, पूर्वोक्त, पृ. 21.

124. **नीलयुक्ति**, Appendix p. xii. 125. **वामन**, पृ. 3. 126. तत्रैव, पृ. 6-7.

127. **नीलयुक्ति**, Appendix p. xxxiv 128. तत्रैव, Appendix. p. xii.

129. **काव्यालङ्कार**, पृ. 129. 130. **काव्यानुशासनम्**, पृ. 150. 131. **वामन**, पृ. 9.

132. **नीलयुक्ति**, Appendix p. x.

133. **सर्वतन्त्रसिद्धान्तपदार्थलक्षणसंग्रहः**, उनि. पृ. 113. 134. **काव्यालङ्कार,** पृ. 7-8.
135. ध्वन्यालोकः, उनि., पृ. 442. 136. **काव्यमीमांसा,** पृ. 24-27.
137. **सर्वतन्त्रसिद्धान्त**...उनि., पृ. 113. 138. **नीलयुक्ति,** Appendix. p. ix.
139. **काव्यालङ्कार,** पृ. 4. 140. पृ. 5. 141. **अलङ्कारशेखर,** पृ. 6.
142. तत्रैव, पृ. 7. 143. तत्रैव, पृ. 8. 144. तत्रैव, पृ. 9. 145. तत्रैव, पृ. 10.
146. **काव्यमीमांसा,** पृ. 2 147. तत्रैव, पृ. 2-3. 148. तत्रैव, पृ. 3.
149. **औचित्यसिद्धान्त**..., उनि., पृ. 10. 150. तत्रैव, पृ. 35-40.
151. **वामन,** पृ. 8. 152. तत्रैव 153 तत्रैव 154. तत्रैव, पृ. 10.
155. **नीलयुक्ति,** Appendix. p. xiii. 156. तत्रैव, Appendix. xiv.
157. **नीलयुक्ति,** Appendix. xii. 158. **काव्यालङ्कार,** पृ. 40.
159. **काव्यमीमांसा,** पृ. 2. 160. **काव्यानुशासनम्,** पृ. 27.
161. **वामन,** पृ. 57. 162. तत्रैव, पृ. 63. 163. **नीलयुक्ति,** Appendix p. xi.
164. **काव्यानुशासनम,** पृ. 28. 165. तत्रैव, पृ. 29. 166. **अलङ्कारशेखर,** पृ. 24.
167. **नीलयुक्ति,** Appendix p. ix. 168. **अर्थविज्ञान,** उनि., पृ. 37-47.
169 तत्रैव, पृ. 33-34. 170. तत्रैव, पृ. 35-36.
171. **काव्यमीमांसा,** पृ. 11. 172. **वामन,** पृ. 8 173. तत्रैव, पृ. 4.
174. तत्रैव, पृ. 32 व 39. 175. तत्रैव, पृ. 45. 176. तत्रैव, पृ. 27.
177. **नीलयुक्ति,** Appendix. p. xiii.
178. पाहा : **भारतीय संस्कृतिकोश आठवा खंड,** संपा. महादेवशास्त्री जोशी व इतर, प्रथम, पुणे, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, 1974, पृ. 575-76.
179. **नीलयुक्ति,** Appendix p. xi. 180. **काव्यालङ्कार,** पृ. 7.
181. **काव्यमीमांसा,** पृ. 13. 182. **वामन,** पृ. 6.
183. **नीलयुक्ति,** 'Tantrayukti-An Exposition', pp. x & xxxiii.
184. तत्रैव, Appendix p. xii. 185. **काव्यमीमांसा,** पृ. 11.
186. **वामन,** पृ. 60. 187. तत्रैव 188. पृ. 56. 189. तत्रैव.
190. **नीलयुक्ति,** Appendix p. ix. 191. **काव्यालङ्कार,** पृ. 7.
192. **अलङ्कारशेखर,** पृ. 4. 193. **काव्यमीमांसा,** पृ. 44.
194. **नीलयुक्ति,** Appendix p. ix. 195. **काव्यालङ्कार,** पृ. 173.
196. तत्रैव, पृ. 106 197. **अलङ्कारशेखर,** पृ. 39. 198. **काव्यमीमांसा,** पृ. 1.
199. **वामन,** पृ. 2. 200. **नीलयुक्ति** Appendix p. xv.
201. तत्रैव, Appendix p. x. 202. **ध्वन्यालोक,** पृ. 462
203. **काव्यलक्षणम्,** पृ. 27-66. 204. तत्रैव, पृ. 68. 205. **वामन,** पृ. 29.
206. **काव्यमीमांसा,** पृ. 8. 207. तत्रैव 208 तत्रैव

209. **नीलयुक्ति,** Appendix p. xiv. 210. **तत्रैव,** Appendix p. viii.
211. काव्यालङ्कार, पृ. 5 212. तत्रैव, पृ. 16. 213. **अलङ्कारशेखर,** पृ. 6.
214. तत्रैव, पृ. 14-20. 215. **काव्यमीमांसा,** पृ. 20-21. 216. तत्रैव, पृ. 21.
217. तत्रैव, पृ. 42. 218. तत्रैव, पृ. 35. 219. **वामन,** पृ. 20.
220. तत्रैव, पृ. 23. 221. **काव्यलक्षणम्,** पृ. 8. 222. तत्रैव, पृ. 23.
223. **काव्यालङ्कार,** पृ. 9-10.
224. उद्भट, **काव्यालङ्कारसारसंग्रहः,** परिष्कर्ता ना. दा. बनहट्टी, प्रथम, पुणे, भाण्डारकरप्राच्यविद्यासंशोधनमन्दिर, 1925, पृ. 83-84.
225. पाहा–**अर्थविज्ञान,** पूर्वोक्त, पृ. 203-205. 226. तत्रैव, पृ. 207.
227. **नीलयुक्ति,** Appendix p. ix. 228. **काव्यालङ्कार,** पृ. 63.
229. **काव्यसूत्रसंहिता,** पृ. 14 230. तत्रैव पृ. 18. 231. तत्रैव, पृ. 21.
232. तत्रैव पृ. 81. 233. **अलङ्कारशेखर,** पृ. 14. 234. तत्रैव, पृ. 21.
235. **वामन,** पृ. 3. 236. **सर्वतन्त्रसिद्धान्त**···पृ. 181.
237. **नीलयुक्ति,** Appendix p. xii. 238. **काव्यसूत्रसंहिता,** पृ. 57.
239. तत्रैव, पृ. 62. 240. **ध्वन्यालोक,** पृ. 25. 241. तत्रैव, पृ. 274.
242. **वामन,** पृ. 26-27. 243. **नीलयुक्ति,** Appendix p. xi.
244. **वामन,** पृ. 13. 245. **काव्यमीमांसा,** पृ. 1-2. 246. **काव्यालङ्कार,** पृ. 173.
247. **वामन,** पृ. 8. 248. तत्रैव, पृ. 14. 249. **अलङ्कारशेखर,** पृ. 92.
250. **नीलयुक्ति,** Appendix p. xi. 251. **काव्यालङ्कार,** पृ. 37.
252. **काव्यलक्षणम्,** पृ. 28-29. 253. तत्रैव, पृ. 29. 254. **वामन,** पृ. 3.
255. तत्रैव 256. तत्रैव, पृ. 12. 257. तत्रैव, पृ. 70. 258. तत्रैव
259. **नीलयुक्ति,** Appendix p. xi. 260. **काव्यालङ्कार,** पृ. 47-54.
261. **अलङ्कारशेखर,** पृ. 32-34. 262. तत्रैव, पृ. 34.
263. तत्रैव, पृ. 36. 264. तत्रैव, पृ. 58. 265. **काव्यमीसांसा,** पृ. 11-14.
266. **वामन,** पृ. 39. 267. तत्रैव पृ. 39-40.
268. **नीलयुक्ति** Appendix, p. xiii-xiv.
269. तत्रैव, Appendix, p. xi. 270. **काव्यमीमांसा,** पृ. 62.
271. **कौटलीयार्थशास्त्रम्,** पृ. 461. 272. **काव्यसूत्रसंहिता,** पृ. 17.
273. तत्रैव, पृ. 35. 274. तत्रैव पृ. 54. 275. तत्रैव, पृ. 15.
276. तत्रैव, पृ. 38. 277. तत्रैव, पृ. 45. 278. तत्रैव, पृ. 80.
279. तत्रैव, पृ. 81. 280. तत्रैव, पृ. 82. 281. तत्रैव, पृ. 84. 282. तत्रैव, पृ. 86.
283. **वामन,** पृ. 4. 284. तत्रैव, पृ. 10. 285. **ध्वन्यालोक,** पृ. 274.
286. तत्रैव 287. **रुद्रटालङ्कार,** पृ. 67. 288. तत्रैव, पृ. 78.

289. **नीलयुक्ति**, Appendix, p. xiii. 290. **वामन**, पृ. 2-3.

291. कुन्तक, **वक्रोक्तिजीवितम्**, व्याख्याकार, राधेश्याम मिश्र, द्वितीय, वाराणसी, चौखम्बा संस्कृत संस्थान, 1977, पृ. 96, 135, 192, 195 इ.

292. **नीलयुक्ति**, Appendix, p. xii. 293. **काव्यमीमांसा**, पृ. 63.

294. तत्रैव 295. तत्रैव, पृ. 65-68. 296. तत्रैव, पृ. 69-78.

297. **नीलयुक्ति**, Appendix, p. ix. 298. **काव्यालङ्कार**, पृ. 6.

299. **वामन**, पृ. 8. 300. तत्रैव, पृ. 9. 301. तत्रैव, पृ. 10.

302. तत्रैव, पृ. 13-14. 303 **ध्वन्यालोक**, पृ. 38.

304. **काव्यमीमांसा**, पृ. 4. 305. तत्रैव, पृ. 10. 306. तत्रैव, पृ. 21.

307. तत्रैव, पृ. 52 308. **नीलयुक्ति**, Appendix, p. ix.

309. तत्रैव, Appendix, p. xl. 310. तत्रैव, p. xxxiv.

311. तत्रैव, पृ. 33. 312. तत्रैव, Appendix, p. xxix.

313. तत्रैव 314. तत्रैव, Appendix, p. xxxi.

315. 'आम्नाय: गुरुपरम्परागतोपदेश:'—**सर्वतन्त्रसिद्धान्त**···पृ. 44.

316. **नीलयुक्ति**, Appendix, p. xli. 317. तत्रैव, Appendix p. xxxi.

318. तत्रैव, Appendix p. iv. 319. तत्रैव, Appendix p. v.

320. **अर्थविज्ञान**, उनि. पृ. 201-17.

321. तत्रैव, पृ. 38-47. 322. तत्रैव, पृ. 59-71.

•

# 8. शास्त्रीय ग्रन्थरचनेचे गौण उपाय

[ कल्पना, आश्रय, ताच्छील्ये व संकीर्ण उपाय ]

## (1) विवेचनाची स्वीकृत पद्धत

मागील निबंधाच्या अखेरीस म्हटल्याप्रमाणे प्रस्तुत निबंधात प्राचीन शास्त्रीय ग्रन्थरचनेच्या गौण उपायांचा परामर्श घ्यावयाचा आहे. या संग्रहातील सहाव्या निबंधात उल्लेखिल्याप्रमाणे व्याख्या, कल्पना, आश्रय व ताच्छील्य हे ते गौण उपाय होत. ह्यांपैकी कोणती व्याख्या कोणत्या तंत्रयुक्तीमुळे गतार्थ होते ते मागील निबंधात संबंधित तंत्रयुक्त्यांच्या विवेचन-प्रसंगी दर्शवून व्याख्यांची चर्चा हातानिराळी केली आहे. त्यामुळे कल्पना, आश्रय व ताच्छील्य ह्या अवशिष्ट तीन गौण उपायांची चर्चा प्रस्तुत निबंधात कर्तव्य आहे. ह्यांची लक्षणोदाहरणे फक्त अरुणदत्तानेच दिली आहेत. त्यामुळे ती त्याच्याच विवेचनातून उद्धृत करू व तसे करताना नीलमेघाच्या 'तंत्रयुक्तिविचार:' ग्रन्थासाठी मागील निबंधाच्या सन्दर्भटीपांत जो 'नीलयुक्ति' संकेत वापरला आहे त्याचाच प्रयोग करू. भामहादी काव्यशास्त्रकारांच्या आणि इतरही ग्रन्थकारांच्या ग्रन्थांसाठी जे संकेत ह्याअगोदरच्या निबंधाच्या सन्दर्भटीपांत वापरलेले आहेत तेच वापरू. शिवाय, मागील निबंधात विविध तंत्रयुक्त्यांच्या अर्थांच्या इतर ( सुमारे पावणेदोनशे ) छटा दाखल केल्या आहेत. त्या ध्यानात ठेवून उपर्युक्त गौण उपायांपैकी कोणता उपाय कोणत्या तंत्रयुक्तीमुळे गतार्थ ( अर्थात स्वतंत्रपणे अस्वीकरणीय ) ठरतो तेही, त्या-त्या तंत्रयुक्तीची संज्ञा व तिच्या चर्चेचा मागील निबंधातील परिच्छेदांक नमूद करून, स्पष्ट करू. ह्या पद्धतीने विवेचन केल्याने त्यास बंदिस्तपणा येईल व ते प्रस्तुत विवेच्य शास्त्रीय विषयाला अनुरूपही होईल. एवढ्या खुलाशानंतर आता कल्पनांच्या चर्चेला सुरुवात करू.

## (2) कल्पना

ह्या तंत्रोपायाचे प्रधानस्य कल्पना, प्रधानेन कल्पना, गुणकल्पना, लेशकल्पना, विद्याकल्पना, भक्ष्यकल्पना व आज्ञाकल्पना असे सात पोटभेद मानण्यात आले आहेत. [ 'इयं सप्तविधा कल्पना'—**नीलयुक्ति**, App xvii ]. यांचा क्रमश: परामर्श घेऊ.

### (2.1) प्रधानस्य कल्पना

अरुणदत्ताने हिचे रीतसर लक्षण न करता पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण केले आहे : 'प्रधानस्य कल्पना यथा–सर्पि: स्नेहनम्, क्षीरं जीवनम्····इत्यत्र मध्ये प्रष्कृष्टगुणत्वात्

सर्पिःक्षीरे स्नेहजीवने कल्प्येते ..." [ **नीलयुक्ति,** App. xx ] अर्थात, पातळ तुपात स्निग्धता प्राधान्याने असते; मध हा पदार्थ जोडण्याचे कार्य प्राधान्याने करतो. जरी तेलात स्निग्धता असली तरी ती तुपात ( तेलाच्या मानाने ) प्रकर्षाने असते. म्हणून स्निग्धता हा तुपाचा प्रधान गुण कल्पिला जातो. ही कल्पना सुसंगत तर्काने [ ऊह्य 15 ] किंवा अनुरूप अनुमानाने [सम्भव 38] करता येते, म्हणून गतार्थ होते.

## (2.2) प्रधानेन कल्पना

अरुणदत्तकृत स्पष्टीकरण असे : 'प्रधानेन तु कल्पना **यथा**—क्षीरदधितक्र...**सर्वः** क्षीरवर्गः इत्युक्तः क्षीरप्राधान्यात् । प्रधानेन कल्पनाव्यपदेशः इत्येकोऽर्थः ।' [ **नीलयुक्ति,** App. xv ] अर्थात, दूध, दही, ताक, तूप इत्यादींत दुधाचे प्राधान्य असल्यामुळे ह्यांना 'दूध' वर्गातील पदार्थ मानतात. प्राधान्य लक्षात ठेवून संज्ञा[ नाम ]करण केले जाते. 'दुग्धवर्ग' हा एक शब्द दूध, दही, ताक, तूप इत्यादी अनेक अर्थांचा साधक असल्यामुळे प्रस्तुत कल्पना प्रयोजन [ 28 ] तंत्रयुक्तीने गतार्थ होते. 'प्रधानेन व्यपदेशा भवन्ति ।' हा न्याय प्राचीन ग्रन्थकार सर्रास वापरताना आढळतात [ विश्वनाथ, **साहित्यदर्पण,** व्याख्याकार, सत्यव्रत सिंह, पंचम, वाराणसी, चौखम्बा विद्याभवन, 1979, पृ. 686 ].

## (2 3) गुणकल्पना

**लक्षण :** 'येन धर्मेणोपेतोऽर्थः प्रयुज्यमानः समर्थो भवति, तेन धर्मेण युक्तस्य तस्यासावगुणोऽपि गुर्वादिष्वपाठाद्गुण इति कल्प्यते ।' [ **नीलयुक्ति,** App. xv ]

**भावार्थ :** एखाद्या शब्दाचा शास्त्रानुसार काटेकोरपणे विशिष्ट अर्थी प्रयोग न करता सामान्य वा स्थूल अर्थी प्रयोग करणे. जसा, 'गुण' शब्दाचा दार्शनिक अर्थ न घेता 'मूळधर्म' हा सामान्य अर्थ घेणे.

**उदाहरण :** वामनाने रीतीचे लक्षण करताना वृत्तीत [ 'विशेषवती पदानां रचना रीतिः ।'—**वामन,** पृ. 4 ] विशेष शब्द वापरला आहे. परंतु तो वैशेषिक दर्शनान्तर्गत पंचम पदार्थवाचक [ द्रव्य, गुण, कर्म, सामान्य, विशेष, समवाय व अभाव हे सात पदार्थ ] न मानता गुणरूप मानावयाचा आहे. अर्थात हे कार्य अपवर्ग [ 8 ] तंत्रयुक्तीद्वारे साध्य होत असल्यामुळे प्रस्तुत कल्पना बाद ठरते.

## (2.4) लेशकल्पना

**लक्षण :** 'अनुपदिष्टस्य विधेः कण्ठपाठेन यत्किञ्चित्सूत्रावयवान्तरमाश्रित्यार्थः कल्प्यते ।' [ **नीलयुक्ति,** App. xv ]

**अर्थ :** साक्षात शब्दांनी स्पष्टपणे न वर्णिलेल्या (उपदेशिलेल्या) विधिविधानाचे, इतर समर्पक अप्रत्यक्ष उल्लेखांच्या साह्याने अनुमान करणे. 'अष्टांगहृदय'—ग्रन्थात कालमृत्यू व अकालमृत्यू या विषयाचे स्पष्ट शब्दांत विवेचन केलेले नसले तरी अरिष्टलक्षण, रसायनक्रिया इत्यादी वर्णित विषयांच्या साक्षेपी विश्लेषणाने त्या विषयाचे

अनुमान करता येते. ही कल्पनाही ऊह्य [ 15 ] व संभव [ 38 ] ह्या युक्त्यांनी गतार्थ होते.

## (2.5) विद्याकल्पना

**लक्षण :** 'यथा सर्वविद्यानुगतार्थनिर्देशे शास्त्रकारस्य सर्वविद्यास्थानानुप्रवेश इह शास्त्रे हित इति वचनाद्विनाऽपीष्यते ।' [ **नीलयुक्ति,** App. xvi ]

**अर्थ :** शास्त्रकाराने स्वतःच्या ज्ञानशाखेच्या चर्चेच्या ओघात केलेल्या इतर ज्ञानशाखांच्या उल्लेखांवरून त्याची त्या ज्ञानशाखांतील गती कल्पिणे. वेगळ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे शास्त्रकाराच्या आन्तर्विद्याशाखीय अध्ययनाची [ interdisciplinary study ]ची कल्पना करणे. अशी कल्पना काव्यशास्त्रावरील कोणताही ग्रन्थ वाचल्यावर अवश्य होते. कारण त्या ग्रन्थांत कोश, अर्थशास्त्र, व्याकरण, छन्दःशास्त्र, न्यायदर्शन, धर्मशास्त्र, कलाशास्त्र, कामशास्त्र, दण्डनीती, इत्यादींचे उल्लेख वारंवार येतात. ह्याबाबतीत क्षेमेन्द्राने कवींना पुढीलप्रमाणे केलेला उपदेश हे सर्वांत बोलके व प्रत्ययोत्पादक उदाहरण आहे :

"तत्र तर्क-व्याकरण-भरत-चाणक्य-वात्स्यायन-भारत-रामायण-मोक्षोपाय-आत्मज्ञान-धातुवाद-रत्नपरीक्षा-वैद्यक-ज्यौतिष-धनुर्वेद - गजतुरग-पुरुषलक्षण-द्यूत - इन्द्रजाल-प्रकीर्णेषु परिचयः कविसाम्राज्यव्यंजनः ॥" [ **कविकण्ठाभरण** पृ. 99 ]. प्राचीन कवी असे बहुशाख अध्ययन करीत असल्यामुळे त्या-त्या शास्त्रांतील पद-पदार्थांचे वर्णन आपापल्या काव्यांत, सामान्यपणे, बिनचूक करीत असत. तात्पर्य, येथे विवेचिलेली आन्तर्विद्याशाखीय अध्ययनाची 'कल्पना' योग्य आहे. शिवाय ही कल्पना आधुनिक नसून प्राचीन आहे, हे लक्षात ठेवावयास हवे.

## (2.6) भक्ष्यकल्पना

अरुणदत्ताने केलेल्या 'एतत्तदमृतं साक्षात् [ **नीलयुक्ति,** App. xvii ] ह्या अतिसंक्षिप्त उल्लेखावरून असे अनुमान होते की, शास्त्रीय विषयाच्या विवेचनात खाद्यपेयादींचा उल्लेख शास्त्रीय विषयाला पोषक/उपयुक्त ह्या स्वरूपात करणे म्हणजे प्रस्तुतची कल्पना.

**उदाहरणे :** ( i ) वाग्भटाने आपल्या ग्रन्थाच्या द्वितीय परिच्छेदाचा उपसंहार पुढील श्लोकाने केला आहे : 'इति दोषविषनिषेकैरकलङ्कितमुज्ज्वलं सदा विबुधैः । कविहृदयसागरोत्थितममृतमिवास्वाद्यते काव्यम् ।' [ **वाग्भटालङ्कारः,** पृ० 31 ] अर्थात, कवींच्या हृदयसागरातून उत्पन्न झालेल्या आणि दोषरूप विषापासून मुक्त झाल्याकारणाने निष्कलंक बनलेल्या अमृततुल्य काव्यरसाचा आस्वाद विद्वान सदैव करीत असतात.

( ii ) काव्यशास्त्रीय ग्रन्थात वर्णिलेल्या श्रृङ्गारादी रसांच्या चर्चेतही भक्ष्य-

कल्पना अनुस्यूत असतेच [उदाहरणार्थ, 'साधुपाकेऽप्यनास्वाद्यं भोज्यं निर्लवणं यथा ।' [ **वाग्भटालंकारः**, पृ. 98 ].

( iii ) वामनाने गुणविवेचनाच्या अखेरीस [ **वामन**, पृ. 42 ] असे प्रतिपादले आहे की, गुणांची स्पष्टता व पूर्णता ह्या दोहोंना मिळून आम्रपाक म्हणतात व ज्या काव्यात अर्थगुणांची स्पष्टता नसते त्याला वृन्ताकपाक [ वांग्याच्या चवीचे म्हणजेच बेचव ] काव्य म्हणतात. रसिकांना ते आवडत नाही.

( iv ) राजशेखराने पिचुमन्द [ कडुनिंब ], बदर [ बोर ], मृद्वीका [ द्राक्ष ], वार्ताक [ वांगे ], तिन्तिडीक [ चिंच ], सहकार [ आंबा ], क्रमुक [ सुपारी ], त्रपुस [ टाकणखार ] व नालिकेर [ नारळ ] अशा नवविध काव्यपाकांची कल्पना केली आहे. [ **काव्यमीमांसा**, पृ. 20-21 ] अर्थात ही कल्पना ग्राह्य ठरते.

## (2.7) आज्ञाकल्पना

**लक्षण** : 'यस्यानुष्ठाने हेतुः सम्यगवगन्तुं न शक्य; केवलमाप्तवचनं प्रमाणीकृत्यानुष्ठीयते ।' [ **नीलयुक्ति**, App. xvii ].

**अर्थ** : ज्या विधिविधानाच्या अनुष्ठानाचे कारण उत्तम प्रकारे समजावून सांगणे शक्य नसते त्याच्या अनुष्ठानाचा उपदेश आप्तवचन प्रमाण मानून करणे. ही तर सरळसरळ उपदेश [ 13 ] तंत्रयुक्ती असल्यामुळे गतार्थ होते.

एकंदरीने सप्तविध कल्पनांपैकी विद्याकल्पना पूर्णपणे व भक्ष्यकल्पना मानवी भाषेची एक नैसर्गिक लकब म्हणून स्वीकार्य ठरतात; उर्वरित कल्पनापंचक वेगवेगळ्या तंत्रयुक्त्यांनी गतार्थ ठरते. आता 'आश्रय' ह्या दुसऱ्या गौण शास्त्रोपायाचा परामर्श घेऊ.

## (3.1) आदिलोप

अरुणदत्ताने याचे रीतसर लक्षण न करता 'धारणोदीरणनिशा' [ **नीलयुक्ति**, App. xvii ] या वचनातील 'धारण' व 'उदीरण' शब्दांच्या आधी 'वेग' शब्दाचा लोप आहे असे समजून व तो शब्द पुरवून अर्थ लावावयाचा, असे ह्या आश्रयाचे स्वरूप कल्पिले आहे. हा आश्रय पूर्ववर्णित प्रत्युत्सार [26] तंत्रयुक्तीने गतार्थ होतो.

## (3.2) मध्यलोप

वरील आदिलोपाप्रमाणे या आश्रयात मधला शब्द लुप्त असल्याचे समजून तो पुरवावयाचा. उदाहरणार्थ, 'द्रवद्रव्यविज्ञानीयमध्यायं व्याख्यास्यामः ।' [ **नीलयुक्ति**, App. xvii ] या वचनात 'द्रव्य' शब्दानंतर 'स्वरूप' शब्द लुप्त मानावयाचा. हा आश्रयही प्रत्युत्साराने [ 26 ] बाद होतो.

## (3.3) अन्तलोप

एखाद्या वचनाच्या अन्ती सन्दर्भोचित शब्द लुप्त असल्याचे मानून तो पुरवणे म्हणजे अन्तलोप. हाही प्रत्युत्साराहून भिन्न नाही.

## (3.4) उभयपदलोप

मध्यलोप व अन्तलोप म्हणजे उभयपदलोप. ह्याचीही अटकळ प्रत्युत्साराने बांधता येते.

## (3.5) आदिमध्यान्तलोप

अरुणदत्ताने ह्याचे रीतसर लक्षण न करता उदाहरण तेवढे दिले आहे. पण हा आश्रयप्रकार अनिष्ट आहे. कारण सुरवातीच्या, मधल्या व शेवटच्या अशा तिन्ही ठिकाणच्या लुप्त शब्दांची एकाच वेळी कल्पना करावयाची म्हटल्यास चूक होण्याचीच शक्यता अधिक. शिवाय, तिन्ही शब्द लुप्त ठेवून केलेले शास्त्रीय विवेचन प्रामादिक, अतिसंक्षिप्त व संदिग्ध होईल. हे तिन्ही शास्त्रग्रंथाचे दोष ठरतात हे सहाव्या निबंधाच्या बाराव्या परिच्छेदात विस्ताराने दाखवून दिलेच आहे. म्हणून हा आश्रय त्याज्य होय.

## (3.6) वर्णोपजनन

**लक्षण :** 'यत्रानुक्तो ग्रन्थे वर्ण आचार्येण पश्चाद् व्याख्याकाल उपजन्यार्थोऽभिधीयते ।' [ **नीलयुक्ति,** App. xviii ].

**अर्थ :** सूत्रकारांनी ग्रन्थ रचताना न उच्चारलेला वर्ण ( अनेक वर्ण किंवा एक शब्द ) नंतर स्पष्टीकरणप्रसंगी व्याख्याकार उपजवून ( योजून ) मग ग्रन्थार्थाचे प्रतिपादन करतो, तेव्हा हा आश्रय होतो. ह्याबाबतीत खुद्द अरुणदत्तानेच पुढे असे म्हटले आहे की, 'वाक्यशेषोऽप्ययमेवंप्राय एव ।' [ तत्रैव ], अर्थात वाक्यशेष तंत्रयुक्ती ह्याच्यासारखीच. त्याने ह्या दोन उपायांच्या खुलाशासाठी वाग्भटाची तीच वचने उद्धृत केली आहेत, त्यामुळे या आश्रयाचे वाक्यशेषाहून [ 31 ] स्वतंत्र अस्तित्व मानण्याचे प्रयोजन नाही.

## (3.7) ऋषिक्लिष्ट

**लक्षण :** 'यदृषी ऋषिपुत्रो वाऽसमाहितचित्ततयाऽशक्त्या वा किञ्चित्पदजातम ( जातं ) भ्रष्टमुच्चरितवान् तथैव तल्लोके प्रयुज्यते । यथा–'रोमलोम' इत्यादि ।' [ **नीलयुक्ति,** App. xviii ]

**अर्थ :** जेव्हा सूत्रकार ऋषी किंवा ऋषिपुत्र बेसावध असताना किंवा सामर्थ्याच्या अभावी एखादा शब्द भ्रष्ट स्वरूपात उच्चारतो, तेव्हा तो शब्द लोकव्यवहारात तसाच रूढ होऊन बसतो. उदाहरणार्थ, 'शरीरावरील केस' ह्या अर्थाच्या रोम शब्दाचा लोम असा उच्चार.

वरील लक्षणातील क्लेश शब्दाचा अर्थ अडथळा असा घ्यावयाचा. बेसावधपणाच्या किंवा असामर्थ्याच्या स्वरूपाच्या अडथळ्यामुळे होणारा सदोष शब्दोच्चार असे ह्या आश्रयाचे स्वरूप आहे. ऋषी हे प्रतिभावान, स्तोत्रसामर्थ्यसंपन्न, ज्ञाते, तपस्वी, द्रष्टे, पुण्यशील व दैवी पुरुष असतात, असे मानण्यात आले आहे. काव्यादी ऋषी होत

आणि वत्सरप्रभृती ऋषिपुत्र होत. हे सत्त्वशील ऋषि-ऋषिपुत्र बेसावध होतीलच कसे ? शिवाय, अशा दैवी व पुण्यशील व्यक्तींकडून भ्रष्ट शब्दोच्चार होणे असंभाव्य वाटते. एकंदरीने प्रस्तुतचा आश्रय मानणे सयुक्तिक वाटत नाही. [ पतंजलीच्या मते अतिप्रमादामुळे म्हणजे चित्त ठिकाणावर नसल्यास विद्यमान वस्तूचीही उपलब्धी म्हणजे प्रतीती होऊ शकत नाही. पाहा : **अर्थविज्ञान**, पृ. 49. ]

## (3.8) तन्त्रशील

**लक्षण** : 'या तन्त्रकारणे प्रकृतिः स्वभाव इत्यर्थः । यथा–किञ्चिच्छिष्यानुग्रहार्थं विस्तीर्णं सङ्क्षिपन्ति;....किञ्चिद्विस्तारयन्ति....।' [ **नीलयुक्ति**, App. xviii ], अर्थात. प्रत्येक शास्त्रकार आपल्या स्वभावानुसार संक्षेपविस्तारविषयक धोरण, शिष्य-हितार्थ, आखतो व अवलंबतो. आपले विवेचन अपूर्ण, संदिग्ध, किंवा अनाकलनीय होईल अशी शंका आल्यास शास्त्रकार संबंधित विषयाचे निरूपण सविस्तर करतो; तर जेव्हा आपले विवेचन स्वतःस्पष्ट, स्वयंपूर्ण व निःसंदिग्ध असल्याची त्यास खात्री वाटते, तेव्हा तो अंगीकृत विषय थोडक्यात मांडतो.

**उदाहरणे** : ( i ) भामहाने अलंकारांचे निरूपण संक्षिप्तपणे करण्याचे कारण सांगताना म्हटले आहे : 'समासेनोदितमिदं धीखेदायैव विस्तरः ।' [ **काव्यालंकार,** पृ. 66 ], अर्थात, विस्ताराने वाचकांच्या बुद्धीला शीणच येईल. त्याने प्रतिज्ञाप्रभृती न्यायशास्त्रीय मुद्यांचे विवेचन, वाचकांस त्या विषयांचे केवळ ज्ञान व्हावे एवढ्याच-साठी केले आहे [ 'समासेन यथान्यायं तन्मात्रार्थप्रतीतये'—तत्रैव, पृ. 107 ].

( ii ) हेमचन्द्राने निवडक उपमाप्रकारांचे विवरण संपवल्यावर पुढील शेरा मारला आहे : 'आसां हि पृथग्लक्षणकरणे एवंविधवैचित्र्यसहस्रसंभवादतिप्रसङ्गः स्यादिति' । [ **काव्यानुशासनम्** पृ. 296 ], अर्थात, अशा प्रकारचे हजारो उपमाप्रकार संभवत असल्यामुळे त्या सर्वांची स्वतंत्र लक्षणे केल्यास ग्रन्थाचा अतिविस्तार होईल; तसे करणे इष्ट नाही.

( iii ) केशवमिश्राने आपण संक्षेपशील असून विस्ताराला घाबरतो असे पुढील-सारख्या वचनांत स्पष्टपणेच म्हटले आहे : 'अत्र बिस्तारभिया सर्वं नोदाह्रियते' । [ **अलङ्कारशेखर,** पृ. 37 ]; 'मया संक्षेपशीलेन गच्छता मृदुवर्त्मनि । सर्वेषामविरोधेन दिङ्मात्रमिह दर्शितम्' । [ तत्रैव, पृ. 52 ], 'ग्रन्थगौरवभयान्नेह तन्यते इति' । [ तत्रैव, पृ. 89 ].

( iv ) विश्वनाथाने अष्टदलपद्मबन्ध ह्या चित्रालङ्काराचे सोदाहरण विवेचन संपवून आपण खड्ग, मुरज, चक्र इत्यादी चित्रालङ्कारांचे विवेचन न करण्याचे कारण पुढील शब्दांत सांगितले आहे : 'काव्यान्तर्गड्भूततया तु नेह प्रपञ्च्यते' । [ **साहित्य-दर्पण** पृ. 688 ] अर्थात, चित्रालङ्कार काव्यातील रसप्रवाह अडवणाऱ्या गाठीसारखा असल्याकारणाने त्याचे विस्तृत विवेचन टाळले आहे. एकंदरीने हा आश्रय शास्त्रकार वापरत असत.

## (3.9) तन्त्रसंज्ञा

**लक्षण :** 'यत्कस्मिंश्चिदर्थे मध्ये व्याख्यायमाने स्वतन्त्रसिद्धोदाहरणं तत्प्रमाणार्थ-मुच्यते'। [ **नीलयुक्ति,** App. xviii ].

**अर्थ :** एखाद्या अनेकार्थक पारिभाषिक शब्दाच्या एका विशिष्ट अर्थाचे ग्रहण, विवेच्य विषय म्हणजेच संदर्भ, ध्यानात घेऊन करणे व तदनुसार ग्रन्थ लावणे. असे न केल्यास चुकीच्या अर्थाचे ग्रहण होण्याची धास्ती असते.

**उदाहरणे :** ( i ) रूपक हा एक काव्यशास्त्रीय पारिभाषिक शब्द आहे. त्याचे 'एक विशिष्ट अर्थालङ्कार' व 'अभिनेय-दृश्य-साहित्यप्रकार' असे दोन अर्थ आहेत. परंतु, जेव्हा वामनासारखा शास्त्रकार 'संदर्भेषु दशरूपकं श्रेयः'। [ **वामन,** पृ. 13 ] असे सूत्र रचतो तेव्हा त्यातील रूपक शब्दाचा अर्थ 'अभिनेयदृश्य साहित्य-प्रकार' असा घ्यावयाचा, कारण तोच संदर्भानुरूप आहे. 'व्युत्पत्ति' ह्या बह्वर्थक शब्दाचे सुन्दरता, बहुश्रुतता किंवा प्रवीणता असे अर्थ काव्यशास्त्राला मान्य आहेत. पण जेव्हा भामह 'सुपां तिङां च व्युत्पत्तिं वाचां वाञ्छन्त्यलङ्कृतिम्'। [ **काव्या-लङ्कार,** पृ. 7 ] ह्या कारिकेत तो शब्द वापरतो तेव्हा त्याचा अर्थ सुन्दरता किंवा सुस्थिती असा करावयाचा, पण वामनाच्या 'ततो हि काव्यबन्धस्य व्युत्पत्तिर्भवति।' [ **वामन,** पृ. 10 ] ह्या निरीक्षणात व्युत्पत्ती म्हणजे निपुणता किंवा प्रवीणता असे समजावयाचे. हे कार्य पूर्ववर्णित ऊह्य [ 15 ], पदार्थ [ 24 ] व योग [ 30 ] ह्या तीन तंत्रयुक्त्यांनी साध्य होत असल्याने प्रस्तुतचा आश्रय अनावश्यक ठरतो.

## (3.10) प्राकृत

अरुणदत्ताने ह्याचे लक्षण केलेले नाही. पण त्याने केलेल्या स्पष्टीकरणानुसार [ **नीलयुक्ति,** App. xix ] प्रयुक्त शब्दाचा संदर्भ ध्यानात घेऊन त्याच्या अर्थाचे निरूपण करावयाचे. उदाहरणार्थ, संदर्भ युद्धाचा असेल तर सैन्धव शब्दाचा अर्थ घोडा असा करावयाचा पण संदर्भ औषधादींचा असेल तर मीठ असा अर्थ करावयाचा. तात्पर्य, अर्थनिरूपण करताना प्रकृत=प्रस्तुत विषय आधारास घ्यावयाचा. हे कार्य 'प्रकरण' ह्या पदार्थयोजनेने साधते, [ संसर्गादी पदार्थयोजनांची चर्चा मागील निबंधाच्या उपांत्य परिच्छेदात केलेलीच आहे ]. त्यामुळे हा स्वतन्त्र आश्रयप्रकार मानण्याची गरज नाही.

## (3.11) समानतन्त्रप्रत्यय

**लक्षण :** 'यत्साध्यस्य कस्यचिदर्थस्य साधनायानुपलभ्यमाने स्वतन्त्रात् प्रत्यये समानेभ्यस्तन्त्रेभ्यः प्रत्यय इति।' [ **नीलयुक्ति,** App. xix ]

**अर्थ :** जेव्हा साध्य करावयाच्या अर्थाच्या सिद्धीसाठी स्वतःच्या शास्त्रीय ग्रंथात विश्वसनीय मत किंवा कल्पना सापडत नसेल तेव्हा आपल्याच ज्ञानशाखेवरील दुसऱ्या एखाद्या ग्रंथातून तसे मत किंवा तशी कल्पना शोधून काढणे व अर्थ स्पष्ट करणे.

मूळ शास्त्रकार आपल्या निरूपणातील काही अंश अनुक्त ठेवून त्याचे सम्यक आकलन व्याख्याकारावर किंवा बुद्धिमान अभ्यासकावर सोपवतो. व्याख्याकार वा अभ्यासक ते कार्य प्रस्तुत आश्रयाच्या मदतीने पार पाडतो.

**उदाहरण :** ( i ) शौद्धोदनीने 'काव्यं रसादिमद्वाक्यं····। हिताय सुकविः कुर्यात्····।।' [ **अलंकारशेखर,** पृ. 2-4 ], अर्थात–सत्कवीने रसादींनी ओतप्रोत व विशेष प्रकारचा आनंद देणारे काव्य हितासाठी लिहावे असा उपदेश केला. पण त्याने 'हिताय' शब्दाचा खुलासा केला नाही. ते अपूर्ण कार्य केशवमिश्राने श्रीपादाच्या ग्रंथाधारे पुढील शब्दांत पुरे केले : 'हितमाह श्रीपादः—

लाभः पूजा ख्यातिर्धर्मः कामश्च मोक्षश्च ।
इष्टानिष्टप्राप्तित्यागौ ज्ञानं फलानि काव्यस्य ।।" [ तत्रैव, पृ. 4 ]

अर्थात–लाभ, सत्कार-सम्मान, प्रसिद्धी, धर्म-काम-मोक्षांची प्राप्ती, इष्टाची जोड व अनिष्टाचा परिहार तसेच ज्ञानप्राप्ती ही काव्याची फळे होत, असे श्रीपादाचे हिताबद्दल म्हणणे आहे. अशा प्रकारे केशवमिश्राने दुसऱ्या एका काव्यशास्त्रीय ग्रंथाधारे शौद्धोदनीच्या मूळ सूत्रात्मक वचनाचा उलगडा केला आहे. अशी स्पष्टी-करणे करण्याची प्रथा सर्रास प्रचलित होती, त्यामुळे हा आश्रय स्वीकरणीय ठरतो.

## (3.12) परतन्त्रप्रत्यय

**लक्षण :** 'यस्यार्थस्य प्रसिद्धितो न स्वकीयमुदाहरणं शक्यमभिधातुं नाप्यन्येभ्यो भिषक्तन्त्रेभ्यः । ततस्तस्मिन् द्वये परतन्त्रादुदाहरणं कल्प्यते ।' [ **नीलयुक्ति,** App. xix ].

**अर्थ :** एखादा विषय प्रसिद्ध असल्यामुळे त्याचे स्पष्टीकरण स्वतःच्या शास्त्रातून काढून देणे शक्य नसते तसेच ते स्वशाखीय अशा दुसऱ्या शास्त्रीय ग्रंथामधूनही देणे शक्य नसते. अशा स्थितीत ते विजातीय शास्त्रातून शोधून काढून सादर करावे लागते व त्याच्या द्वारे ग्रंथाचे निरूपण साधावे लागते.

**उदाहरणे :** (i) प्रत्येक शास्त्राची आपली स्वतःची परिभाषा व संकल्पना-व्यवस्था असते हे जरी खरे असले तरी त्या शास्त्रात इतर शास्त्रांतले पारिभाषिक शब्दही विषयविवेचनाच्या ओघात वापरलेले असतात. तशा शब्दांचा खुलासा शास्त्रकार करीत नसतो. जिज्ञासू वाचकाला तो खुलासा संबंधित शास्त्राचा अभ्यास करून हस्तगत करावा लागतो. उदाहरणार्थ, भामहप्रभृती सर्वच काव्यशास्त्रकारांनी यतिभ्रष्ट व भिन्नवृत्त हे काव्यदोष मानलेले आहेत. हे वस्तुतः छन्दःशास्त्राचे विषय होत. त्यांचे स्पष्टी-करण भामहादी करीत नाहीत. ते होतकरू कवीला 'छन्दोविचितेर्वृत्तसंशयच्छेदः ( विधेयः । )' [ **वामन,** पृ. 8-9 ], तसेच 'कलाशास्त्रेभ्यः कलातत्त्वस्य संवित् ( संपाद्या । )' [ तत्रैव ] असा उपदेश करतात. ह्या सन्दर्भात वामनाच्या ग्रंथातील एक अत्यन्त समर्पक उदाहरण विचारात घेऊ. वामनाने असा एक नियम सांगितला

आहे की, 'स्तन' इत्यादी शब्द द्वित्वयुक्त जातीचे मानून तसा त्यांचा प्रयोग करावा. [ तत्रैव, पृ. 72 ] त्यावर पूर्वपक्षकार शंका काढतो की, 'का हो, जाती म्हणजे सामान्य किंवा अनेक वस्तूंच्या ठायी आढळणारा एक समान धर्म ( उदाहरणार्थ, गोत्व, मनुष्यत्व इत्यादी ). असा धर्म तर एकच असतो. मग तुम्ही त्याचे द्वित्वयुक्त असे निरूपण कसे करता ? द्वित्व ( =दोनपण ) हे द्रव्यात ( म्हणजे गुणक्रियादींनी युक्त व इन्द्रियग्राह्य वस्तूत ) असते. जातीत म्हणजे, 'अनेकगत एकमेव धर्मात' ते असत नाही. कारण जाती द्रव्यस्वरूपी नसते'. ह्या शंकेचे समाधान करताना वामन म्हणतो : 'जाती ही द्रव्यस्वरूपी असल्यामुळे तिचा द्वित्वाविष्टा असा उल्लेख करणे चुकीचे नाही'. त्यावर शंकाकार वामनाला पुन्हा हटकतो : 'का हो, जाती द्रव्यस्वरूप कशी ? तुमच्या ह्या धारणेला आधार काय ?' त्यावर वामन उत्तर देतो : 'तद्धि जैना जानन्ति । वयं तु लक्ष्यसिद्धौ सिद्धपरमतानुवादिनः ।' [ तत्रैव ] अर्थात, जाती द्रव्यस्वरूप कशी ते जैन दार्शनिकांना माहीत. आम्ही प्रतिपाद्य विषयाच्या सिद्धीच्या बाबतीत इतर शास्त्रकारांच्या सिद्ध मतांचा अनुवाद करणारे आहोत.

(ii) मागील दोन आश्रयांचे स्वरूप 'सन्दर्भग्रन्थाचा हवाला देणे' असे आहे. ह्याचा आविष्कार स्वरचित सन्दर्भग्रन्थाचा उल्लेख व पररचित सन्दर्भग्रन्थाचा उल्लेख असा दोन मार्गांनी झालेला आढळतो. ह्यांची काही उदाहरणे अवलोकू. केशवमिश्राने पुढील अनेक विधानांत स्वरचित शास्त्रीय ग्रन्थाकडे अंगुलिनिर्देश केला आहे : 'प्रयोजनं .... तथाऽलङ्कारसर्वस्वे सप्रपंचं अदर्शयम् ।' [ **अलङ्कारशेखर,** पृ. 10 ], 'प्रपंचितं चेदं मयैव काव्यरत्ने' [ तत्रैव, पृ. 13 ], 'तथाऽलङ्कारसर्वस्वे सप्रपंचं अदर्शयम् ।' [ तत्रैव, पृ. 39 ], 'इति विस्तृतं मयैव काव्यरत्ने ।' [ तत्रैव, पृ. 79 ], 'एतच्च अस्माभिरेव प्रपंचितमन्यत्र ।' [ तत्रैव, पृ. 84 ]. नाटकात कोणत्या पात्रांनी कोणती भाषा बोलावी त्याचा खुलासा करताना विश्वनाथाने 'भाषालक्षणानि मम तातपादानां भाषार्णवे ।' [**साहित्यदर्पण,** पृ. 473] ह्या शब्दांत स्वतःच्या वडिलांच्या ग्रन्थाचा हवाला दिला आहे.

(iii) दशरूपकाचा टीकाकार जो धनिक त्याने 'साधारणस्त्री गणिका तद्व्यवहारो विस्तरतः शास्त्रान्तरे निर्दिशितः ।' [ धनंजय, **दशरूपकम,** व्याख्याकार; भोलाशंकर व्यास, बनारस, चौखम्बा विद्याभवन, 1955, पृ. 109 ], 'शेषं प्रच्छन्नकामित्यादि कामसूत्रादवगन्तव्यम् ।' [ तत्रैव, पृ. 262 ] इत्यादी स्थळी नाट्यशास्त्रेतर शास्त्रांवरील ग्रन्थांकडे बोट दाखवले आहे. एकंदरीने हा आश्रय योग्य आहे.

## (3.13) हेतुहेतुकधर्म

**लक्षण :** 'यो हेतुहेतुकेन धर्मो ज्ञायते ।' [ **नीलयुक्ति,** App. xix ]

**अर्थ :** एखादे कार्य साधणाऱ्या प्रधान व गौण कारणांपैकी प्रधान कारण तेवढे विचारात घ्यावयाचे, कारण ते कार्य घडवून आणण्यास अवश्य समर्थ असते. ते

उपस्थित असताना कार्य घडतेच. गौण कारण उपस्थित असता कार्य क्वचित घडतही नाही.

**उदाहरण :** प्राचीन काव्यशास्त्रकारांमध्ये काव्यनिर्मितीच्या कारणांत–प्रतिभा, व्युत्पत्ती व अभियोग यांत–गौणप्रधानभाव असतो किंवा कसे ह्याबाबतीत मतभेद आहे व ह्या विषयाचा त्यांनी खूप ऊहापोह केला आहे. राजशेखराने आपल्या **'काव्यमीमांसा'** ग्रन्थात [ पृ. 11 ] ह्याबाबतीत जी चर्चा केली आहे तिचा आशय असा : श्यामदेव नावाच्या समीक्षकाचे असे मत आहे की, काव्याच्या रचनेच्या बाबतीत कवीच्या मनाची एकाग्रता हाच मुख्य व्यापार असतो. त्याच्याच योगे कवीला निरनिराळे विचार व कल्पना सुचतात. पण मंगलाला हे मत ग्राह्य वाटत नाही. त्याच्या दृष्टीने अभ्यास हाच मुख्य व्यापार होय; सततच्या प्रवृत्तीला अभ्यास म्हणतात. तो सर्वगामी असून सर्व बाबतींत पराकाष्ठेचे कौशल्य उत्पन्न करतो. पण मंगलाची ही भूमिका राजशेखराला पटत नाही. त्याच्या मते शक्तीच केवळ काव्य-निर्मितीचे कारण असते. शक्ती ही प्रतिभा व व्युत्पत्ती ह्यांहून वेगळी असून तिच्यापा-सूनच प्रतिभा व व्युत्पत्ती उत्पन्न होतात. शक्तिसंपन्नालाच पदार्थ भासमान होतात व शक्तिसंपन्नालाच विविध शास्त्रांचे ज्ञान प्राप्त होते. अशा प्रकारे राजशेखराने प्रधान हेतू व गौण हेतू ( हेतुक ) असा विवेक केला आहे आणि या विवाद्य विषयाचा निवाडा केला आहे. अरुणदत्तकल्पित प्रस्तुतचा आश्रय ग्राह्यच आहे. आता कार्य-कारणधर्माचा परिचय करून घेऊ.

## (3.14) कार्यकारणधर्म

**लक्षण :** 'यत्र कार्यसंज्ञया कारणं निर्दिश्यते, कारणसंज्ञया वा कार्यम् ।' [ **नील-युक्ति,** App. xix ]

**अर्थ :** जेव्हा कार्याच्या संज्ञेने कारणाचा किंवा कारणाच्या संज्ञेने कार्याचा निर्देश केला जातो, तेव्हा कार्यकारणधर्म नामक आश्रय होतो.

कारणवाचक पित्त शब्दाने पित्तरोगरूपी कार्याचा निर्देश करणे, म्हणजे कार्य-कारणधर्म. असा शब्दनिर्देश औपचारिक किंवा गौणार्थी असतो.

हा आश्रय पूर्ववर्णित प्रदेश [ 27 ] ह्या तन्त्रयुक्तीने गतार्थ होतो.

## (3.15) आद्यन्तविपर्यय

अरुणदत्ताने ह्याचे रीतसर लक्षण केलेले नाही, पण जे विवरण केले आहे त्यावरून असे जाणवते की, जेव्हा शास्त्रकार विवेच्य विषयोपविषयांच्या निर्देशक्रमाचे पालन त्यांच्या विवेचनात करीत नाही [ म्हणजेच क्रमभंग करतो ] तेव्हा हा आश्रय होतो. असा क्रमभंग किंवा क्रमविपर्यय शास्त्रकाराने जाणूनबुजून अथवा सकारण केलेला असतो, म्हणून तो दोषास्पद ठरत नाही.

**उदाहरण :** गुलाबरावमहाराजांची पुढील सूत्रत्रयी अवलोकनीय आहे : "ईश्वरो

द्विविध: कवि: कर्तेति भेदात् ।। 10 ।। जगत्स्थितिलयकारणं कर्ता ।। 11 ।। ब्रह्मानन्द-प्राकटचकारणं कवि: ।। 12 ।।" [ **काव्यसूत्रसंहिता,** पृ. 15-16. ] येथे पहिल्या निर्देशसूत्रात कवि-ईश्वर व कर्ता-ईश्वर ह्या क्रमाने झालेला उल्लेख पुढच्या दोन सूत्रांत कर्ता-ईश्वर व कवि-ईश्वर असा उलटा केला आहे. तो ह्या कारणास्तव की, जगत्स्थितिलयास कारणीभूत होणारा 'महान' कर्ता ब्रह्मानंद प्रकट करणाऱ्या कवीहून 'लहान' ठरू नये. महाराजांनीच कवीचे दोन प्रकार ईश्वर व जीव असे निर्देशिले पण पुढे प्रत्यक्ष विवेचनात प्रथमतः जीवकवीचा व नंतर ईश्वरकवीचा परामर्श घेतला. तसे करण्याचे कारण असे की, जीवकवी हा विषय निर्वचनीय म्हणजे शब्दगम्य म्हणजेच स्थूल आहे तर ईश्वरकवी हा विषय अनिर्वचनीय म्हणजे शब्दातीत म्हणजेच सूक्ष्म आहे. येथे महाराजांनी प्रथमत: स्थूल विषय समजावून सांगून नंतर सूक्ष्म विषय समजावला आहे. वस्तुत: हा आश्रय-प्रकार पूर्ववर्णित विपर्यय [ 34 ] तंत्रयुक्तीने गतार्थ होतो.

### (3.16) शब्दान्यत्व

**संज्ञान्तर**—शब्दान्तर [ **नीलयुक्ति,** App. xvii ].

**लक्षण** : 'यदर्थं पर्यायशब्दं वर्णयन्ति शास्त्रकृत: ।' [ तत्रैव, App. xx ].

**अर्थ** : पारिभाषिक शब्दांच्या पर्यायांना शब्दान्यत्व किंवा शब्दान्तर म्हणतात. चरकाने आदर्श शास्त्रग्रंथाचे जे साधारण गुण वर्णिले आहेत त्यांत 'पुष्कलाभिधानम्' हा एक आहे [ मागील निबंध सहावा पाहावा ]. अरुणदत्ताने शब्दान्यत्वाची कल्पना करून त्या चरकोक्त गुणाचा सक्रिय पुरस्कार केला आहे. 'इत्यनर्थान्तरम्', 'इति न अर्थान्तरम्' इत्यादी शब्दांत पर्यायवाचकांची नोंद करण्याची प्रथा शास्त्रकार पाळतात. तिच्या योगे वाचकाला विविध पारिभाषिक शब्दांचे समानार्थक शब्द कळण्याची सोय होते व ग्रंथाच्या अर्थाच्या आकलनात कोठेही अडथळा न येता त्याचा उलगडा होत जातो.

**उदाहरणे** : ( i ) केशवमिश्राने 'शक्ति: पुण्यविशेष: । स एव प्रतिभेत्युच्यते ।' [**अलंकारशेखर,** पृ. 5]; 'शक्तिरीश्वरेच्छा, या सङ्केत इत्युच्यते ।' [तत्रैव, पृ. 10]; 'सा वक्रोक्ति: । एतदेव वाकोवाक्यमुच्यते ।' [ तत्रैव, पृ. 29]; 'समासोक्ति: । सैव चाऽन्यापदेश उच्यते ।' [ तत्रैव, पृ. 36 ]; 'स्वभाव: । तदेव जातिरुच्यते ।' [ तत्रैव, पृ. 37 ]; 'विरोध: ।....अयमेव विरोधाभास उच्यते ।' [ तत्रैव ] इत्यादी विधानांत पुण्यविशेष, शक्ती, वक्रोक्ती, समासोक्ती, स्वभाव व विरोध यांचे क्रमश: प्रतिभा, संकेत, वाकोवाक्य, अन्यापदेश, जाती व विरोधाभास हे पर्यायशब्द निर्देशिले आहेत. ( ii ) राजशेखराने वाक्याचा वचन हा पर्यायशब्द उल्लेखिला आहे. [ 'वाक्यं वचनमिति व्यवहरन्ति ।'—**काव्यमीमांसा,** पृ. 28 ]. ( iii ) वामनानेही '....व्याजोक्ति: यां मायोक्तिरित्याहु: ।' [**वामन,** पृ. 65]; 'उपमेयोपमा ।....इयमेव परिवृत्तिरित्येके ।'

[ तत्रैव, पृ. 62 [; अशा काही पर्यायवाचकांच्या नोंदी केलेल्या आहेत. ( iv ) दण्डीने यथासंख्य अलंकाराची संख्यात व क्रम ही दुसरी दोन नावे असल्याची नोंद केली आहे [**काव्यलक्षणम्** पृ. 160]. ( v ) वाग्भटाचा टीकाकार सिंहदेवगणी ह्याने 'निबन्धनं गुम्फनं ग्रन्थनं योजनं इत्येकार्थाः ।' [**वाग्भटालङ्कार**, पृ. 90], 'क्रोड उत्संग उच्यते' [ तत्रैव, पृ. 71 ] अशी शब्दान्तरे नमूद केली आहेत. ( vi ) विश्वनाथाने 'चमत्कारः चित्तविस्ताररूपो विस्मयापरपर्यायः ।' [ **साहित्यदर्पण**, पृ. 106 ], 'दृश्यं तत्राभिनेयं, तस्य रूपकसंज्ञाहेतुमाह [ तत्रैव, पृ. 359 ] अशी पर्यायवाचके नोंदवली आहेत. ( vii ) विश्वेश्वराने 'वाक्छब्द इति पर्यायौ ।' [ **चमत्कारचन्द्रिका**, संपा. श्रीमती पन्दिरि सरस्वतीमोहन, दिल्ली, मेहरचन्द लछमनदास, 1972, पृ. 3 ] अशी नोंद केली आहे. एकंदरीने हा आश्रय ग्राह्य आहे.

## (3.17) प्रत्ययधर्म

**लक्षण :** 'यो न च हेतुर्हेतुधर्मोपपत्तिमात्रेण च केनचिद्धेतुत्वेन व्यपदिश्यते ।' [ **नीलयुक्ति**, App. xx ]

**अर्थ :** जेव्हा एखाद्या कार्याचे खरे कारण अंधारात ठेवून खोटया किंवा अवास्तविक कारणाला महत्त्व दिले जाते व त्याचाच खरे कारण म्हणून निर्देश केला जातो तेव्हा हा आश्रय होतो.

उन्माद किंवा अपस्मार ह्या रोगाचे खरे कारण प्रज्ञापराध हे असता ग्रन्थकार त्याचा उल्लेख न करता देवाचा कोप, भूतबाधा इत्यादी खोटेच कारण पुढे करतो व त्यालाच खरे कारण असे म्हणतो, तेव्हा तो प्रत्ययधर्माचा आश्रय घेत असतो.

वरीलप्रमाणे रोगाची दैववादी कारणमीमांसा ही सामान्य मनुष्याची विचारपद्धती झाली. शास्त्रकार प्रत्येक कार्याची / परिणामाची बुद्धीला पटतील अशी कारणे देऊ शकतो, तो कोणत्याही कार्याचे खरे व तर्कशुद्ध कारणच सांगतो. तो जर खोटेच कारण खरे म्हणून पुढे करू लागला तर त्याच्या ग्रन्थाचा आधार स्थिर बुद्धीचे विचारवंत घेणार नाहीत, अधिकारी व्यक्तींना अशा ग्रन्थाविषयी कदापि आदर वाटणार नाही व त्यामुळे असा ग्रन्थ चांगला लौकिक कधीही मिळवू शकणार नाही. विश्वसनीय सन्दर्भग्रंथाकडून ह्या सर्व अपेक्षा असतात हे पूर्वी सहाव्या निबन्धात दर्शविलेच आहे. म्हणूनच हा आश्रय ग्राह्य वाटत नाही. आता उपनयाची चर्चा करू.

## (3.18) उपनय

**लक्षण :** 'सूत्रहेतुप्रस्तावेन यत्रान्यत्प्रकरणमुपनीयते ।' [ **नीलयुक्ति**, App. xx ].

**अर्थ :** हेतुपर सूत्राच्या प्रस्तावनेने सन्दर्भाला सोडून असलेले दुसरेच प्रकरण जवळ करणे. उदाहरणार्थ, आहाराच्या प्रमाणाच्या स्वरूपवर्णनाची प्रस्तावना करून प्रमाणाबाहेर आहार घेतल्याने होणाऱ्या हगवणीची चिकित्सा हा विषय जवळ केल्यास उपनय आश्रय होतो.

वरीलप्रमाणे केलेले निरूपण हे असंबद्ध विषयाचे निरूपण ठरून ते वाचकाच्या बुद्धीचा गोंधळ उडविण्यास कारणीभूत ठरेल. अर्थात ते मागील सहाव्या निबंधात वर्णिलेल्या 'असंकुलप्रकरणं' ह्या गुणाच्या विरुद्ध असल्यामुळे दोषरूप होय. म्हणून प्रस्तुतचा आश्रय त्याज्य ठरतो. आता संभवाचा विचार करू.

## (3.19) सम्भव

**लक्षण :** 'यत्सूत्रं प्रकरणं वा विधीयमानमर्थस्य व्यापकत्वात् सकलेन शास्त्रेण व्याख्यायते ।' [ **नीलयुक्ति,** App. xx ]

**अर्थ :** एखाद्या सूत्रात किंवा प्रकरणात विवेचिला जाणारा अर्थ ( =विषय ) स्वरूपत: व्यापक असल्यामुळे सम्पूर्ण शास्त्राच्या द्वारे विवरून सांगितला जाणे म्हणजे सम्भव आश्रय.

एखादा शास्त्रीय ग्रंथकार आपल्या ग्रंथाच्या सुरुवातीच्या सूत्रात किंवा कारिकेत आपल्या समग्र ग्रंथातील मुख्य प्रतिपाद्य विषयांचा नामोद्देश करून त्यानंतरच्या सूत्रांत किंवा कारिकांत आपण त्या विषयांचे विश्लेषणपूर्वक विवेचन करणार आहोत अशी प्रतिज्ञा करतो व मग प्रत्यक्षात तसे विस्तृत विवेचन करतो. त्यायोगे तो शास्त्रीय ग्रंथ सिद्ध होतो.

कोणताही शास्त्रकार शास्त्रारंभी आपण अंगीकृत ग्रन्थात कोणत्या विषयाचे विवेचन करणार आहोत त्याचा प्रतिज्ञापूर्वक उल्लेख करतोच व अशा प्रकारे आपल्या ग्रन्थाच्या प्रतिपाद्य विषयाची वाचकाला ओळख करून देतो. ह्याला अधिकरण तंत्रयुक्ती [ 4 ] असे म्हणतात. अर्थात त्या युक्तीने हा आश्रय गतार्थ होतो. म्हणून आता शेवटच्या आश्रयाकडे वळू.

## (3.20) विभव

**लक्षण :** 'भङ्ग्या····विभवकल्पनायाश्चास्यायं विशेष: । अयं व्याख्याया विभवो भवति । स तु विनैव व्याख्याया: पठ्यमान एवेति ।' [ **नीलयुक्ति,** App. xx ]

**अर्थ :** अरुणदत्ताची ही वचने अपुरी आहेत. 'भङ्ग्या:' नंतरचे भाष्य खंडित आहे. त्यामुळे ह्या आश्रयाचे अरुणदत्ताला नेमके कोणते स्वरूप अभिप्रेत होते ते स्पष्ट होत नाही. सबब हा आश्रय विचारबाह्य ठरतो.

येथवर अरुणदत्तकल्पित वीस आश्रयांची चर्चा केली. तिच्या आधारे असे निष्कर्षरूपाने म्हणता येते की, तंत्रशील, समानतंत्रप्रत्यय, परतंत्रप्रत्यय, हेतुहेतुकधर्म, व शब्दान्यत्र एवढे पाचच आश्रय ग्राह्य ठरतात उरलेल्यांपैकी बरेचसे पूर्ववर्णित तंत्रयुक्तयांनी गतार्थ होत असल्यामुळे किंवा काहीचे स्वरूपच बुद्धीला न पटणारे असल्यामुळे किंवा काहीचे अरुणदत्तकृत विवेचनच अपूर्ण असल्यामुळे अग्राह्य ठरतात. वरील पाच ग्राह्य आश्रयांच्या साहाय्याने शास्त्रीय विषयोपविषयांच्या विवेचनाचा

संक्षेपविस्तार साधणे, किंचिदुक्त व/वा अनुक्त विषयांचा उलगडा करणे, इतर शास्त्रांच्या संकल्पनांशी परिचय करून घेण्याच्या जबाबदारीची अभ्यासकाला जाणीव करून देणे, विवाद्य मुद्याच्या निर्णयाच्या गौणप्रधान-साधनांचे तारतम्य करणे व ते समजून घेण्यास वाचकाला प्रेरित करणे, पारिभाषिक संज्ञांच्या पर्यायांचे ज्ञान वाचकाला करून देणे आणि आंतर्विद्याशाखीय अध्ययनास ( interdisplinary study ) प्रोत्साहन देणे ही कार्ये साधता येतात. ह्या दृष्टीने प्रस्तुत आश्रयांना शास्त्रीय ग्रन्थ-रचनेच्या पद्धतीत महत्त्वाचे स्थान आहे हे लक्षात येईल. आता तिसरा गौण शास्त्रोपाय जो 'ताच्छील्ये' त्याची चर्चा करू.

## (4) ताच्छील्य

ताच्छील्य म्हणजे एखाद्या वस्तूचा स्वभाव. ह्या शब्दाची घटना अशी: तत् शीलं स्वभाव: यस्य स तच्छील:, तस्य भाव: ताच्छील्यम् । अरुणदत्ताने हा शब्द 'शास्त्रीय ग्रंथामध्ये होणारे विविध औपचारिक शब्दप्रयोग' ह्या अर्थाने वापरला आहे.

एखादा मानवसमाज बोलणे, ऐकणे, विचार करणे, लिहिणे, व वाचणे ह्या पंचविध कार्यांसाठी ज्या भाषेचा उपयोग करीत असतो त्याच भाषेचा प्रयोग शास्त्रकारही शास्त्रीय संकल्पना, नियम, सिद्धान्त इत्यादींच्या प्रतिपादनासाठी करीत असतो.

कोणत्याही भाषेत व्यवहार करणाऱ्याला जे शब्द अर्थाभिव्यक्तीसाठी वापरावे लागतात त्यांचे अर्थबोधाच्या दृष्टीने यौगिक, रूढ, योगरूढ व यौगिकरूढ असे चार प्रकार मानण्यात येतात. [ **अर्थविज्ञान,** पृ. 51-56 ] वरील चतुर्विध शब्दांद्वारे व्यक्त होणाऱ्या अर्थांचे वाच्यार्थ, लक्ष्यार्थ व व्यंग्यार्थ असे तीन भेद मानण्यात आले आहेत.

अर्थ हा शब्दाचा [ एकूणच भाषेचा ] प्राण होय. भाषेचे सारे महत्त्व अर्थावर अवलंबून असते. परंतु भाषेचे हे अर्थतत्त्व परिवर्तनशील असते. अर्थाच्या परिवर्तना-च्या अर्थविस्तार, अर्थसंकोच, अर्थादेश, अर्थोत्कर्ष व अर्थापकर्ष ह्या प्रमुख दिशा असून ह्या दिशांनी होणाऱ्या अर्थपरिवर्तनाची पुढीलप्रमाणे अनेक कारणे संभवतात : आलंकारिक / लाक्षणिक प्रयोग, वातावरणातील बदल, नम्रताप्रदर्शन, अशुभपरिहार, उपहास-उपरोध, भावावेश, सामान्यार्थी विशेषाचा प्रयोग, अज्ञान वा भ्रमज्ञान, शब्दाची अन्तर्निहित अनिश्चितता, व्यक्तिगणिक शब्दप्रतीतीत भेद, शब्दार्थाच्या एका तत्त्वाची प्रधानता, साहचर्यामुळे गौण अर्थाला लाभलेली प्रधानता, अन्य भाषांतून शब्दांची उसनवारी, राजनैतिक परिवर्तन, सांस्कृतिक परिवर्तन, धार्मिक स्थित्यंतर, वाक्प्रचार व म्हणी, तत्सम व तद्भव शब्दांचा एककालिक प्रयोग, राष्ट्र व जातजमात यांची भावना, शब्दाचे प्रयोगबाहुल्य, सन्दर्भभिन्नता, संक्षेपीकरण, कवींची स्वच्छन्दता,

एका शब्दाच्या विभिन्न रूपांचा विभिन्न अर्थांमध्ये प्रयोग, व्याकरणिक रूपे इत्यादी [ **अर्थविज्ञान,** पृ. 142-72 ],

भाषेचे हे परिवर्तनक्षम स्वरूप लक्षात घेऊनच अरुणदत्ताने प्रस्तुतच्या ताच्छील्यांची कल्पना केली आहे. त्यांचाच आता क्रमशः परामर्श घेऊ.

## (4.1) ताच्छील्य

**लक्षण :** 'यत्केनचिदेवं धर्मसादृश्येन युक्तो भावस्ताच्छील्यमुच्यते ।' [ **नीलयुक्ति,** App. xxi ]

**अर्थ :** धर्मसादृश्यामुळे होणारा गौण प्रयोग. उदाहरणार्थ, 'देवदत्त झोपतो', असे आपण म्हणतो; 'देवदत्ताचे शरीर झोपते' असे म्हणत नाही. झोपलेल्या देवदत्ताला ज्याप्रमाणे कशाचेही भान नसते त्याचप्रमाणे रोगग्रस्त अवयवालाही कशाची जाणीव नसते हे [ धर्मसादृश्य ] ध्यानात घेऊन 'रोगग्रस्त अवयव झोपला' असा शब्दप्रयोग केला जातो.

**उदाहरण :** वामनाने आपल्या ग्रंथारंभी रचलेल्या पहिल्या तीन सूत्रांत [ काव्यं ग्राह्यमलङ्कारात् ॥1॥ सौन्दर्यमलङ्कारः ॥2॥ स दोषगुणालङ्कारहानादानाभ्याम् ॥3॥- **वामन** पृ. 1 ] अलङ्कार=सौन्दर्य=दोषांचे पूर्ण निवारण+गुणांचे व अलङ्कारांचे सुयोजन अशी समीकरणे मानली आहेत. ह्यांत वस्तुतः दोषवर्जन ही गुणालङ्कारांच्या सुयोजनाहून वेगळी संकल्पना आहे. दोष हे गुणालङ्कारविरुद्ध धर्म आहेत. गुण हे [ वामनानुसार ] काव्याचे अलङ्कारनिरपेक्ष व नित्य सौन्दर्योत्पादक धर्म आहेत, तर अलङ्कार हे गुणोत्पादित सौन्दर्याची वृद्धी साधणारे अनित्य धर्म होत. म्हणजेच दोष, गुण व अलङ्कार ह्या परस्परभिन्न संकल्पना आहेत. तथापि, दोषवर्जन व गुणालङ्कारसमावेशन यांत 'सौन्दर्य' हा उभयसदृश धर्म आहे. तो ध्यानात घेऊन वामनाने ह्या दोहोंचा सौन्दर्यसूत्रात **गौण** अर्थाने एकत्र निर्देश केला आहे. गोपेन्द्रतिप्पभूपालाने 'सौन्दर्यपर्यायेण अलङ्कारपदेन' असे स्पष्टपणे म्हटलेच आहे. [ पाहा : वामन, **काव्यालङ्कारसूत्रवृत्तिः ( कामधेनु ),** व्याख्याकार, केदारनाथ शर्मा, द्वितीय, वाराणसी, चौखम्बा अमरभारती प्रकाशन, 1979, पृ. 9 ]. अर्थात हे ताच्छील्य ग्राह्य आहे.

## (4.2) अवयव

**लक्षण :** 'यत्रैकदेशोदाहरणे क्रियमाणेऽनुक्तोऽन्योऽपि तज्जातीयकोऽर्थो लभ्यते ।' [ **नीलयुक्ति,** App. xxi ]

**अर्थ :** एखाद्या वाक्याच्या द्वारे एखादा अर्थ व्यक्त केला असता तद्विरुद्ध अर्थ, साक्षात शब्दांनी सांगितलेला नसतानाही, समजणे ह्याला अवयव म्हणतात. अरुणदत्ताने केलेल्या विवरणाचा आशय असा की, मूळ शास्त्रकाराने 'लङ्घनाच्या योगे आरोग्य सुधारते' असा साक्षात उपदेश केला असल्यास 'लंघन न केल्याने आरोग्य

लाभत नाही किंवा बिघडते' असा विरुद्धार्थ जाणवतो. हे कार्य पूर्ववर्णित अर्थापत्ती [ 9 ] तन्त्रयुक्तीने साध्य होत असल्यामुळे प्रस्तुतचे ताच्छील्य मानण्याची आवश्यकता नाही.

## (4.3) विकार

**लक्षण** : 'विपरीतक्रिया । यथा—विकारसंज्ञया प्रकृतिरपि लभ्यते । प्रकृतिसंज्ञया च विकारः ।' [ **नीलयुक्ति,** App. xxi ].

**अर्थ** : विकार म्हणजे विपरीत क्रिया. विकारवाचक शब्दाने प्रकृतीचा व प्रकृतिवाचक शब्दाने विकृतीचा बोध होणे. 'प्रकृति' म्हणजे मूळ रूप व विकृती म्हणजे संस्कारजनित रूप किंवा रूपान्तर. उदाहरणार्थ, आपण कच्च्या बटाट्यालाही भाजी म्हणतो आणि त्यापासून बनविलेल्या सुकी भाजी, रस्सा भाजी इत्यादी पदार्थालाही भाजीच म्हणतो ( अरुणदत्तानेही 'शाका'चेच उदाहरण दिले आहे ). असा शब्दप्रयोग औपचारिक असतो. वस्तुतः बोलणाऱ्याला प्रकृती अभिप्रेत आहे की विकृती अभिप्रेत आहे हे प्रकरणावरून म्हणजेच सन्दर्भावरून समजते. हे कार्य नैयायिकोक्त शक्तिग्रहाच्या शक्तिग्रह-व्याकरणप्रभृती आठ साधनांपैकी वाक्यशेष [ विवरणासाठी पाहा : **अर्थविज्ञान,** पृ. 43-45 ] ह्या साधनाने तसेच अपदेश [ 7 ] व ऊह्य [ 15 ] ह्या तन्त्रयुक्त्यांनीही साधते. त्यामुळे प्रस्तुतचे ताच्छील्य अनावश्यक ठरते.

## (4.4) सामीप्य

सामीप्य म्हणजे समीपता; निकटता किंवा जवळपण. पण अरुणदत्ताच्या टीकेचा 'सामीप्य'-विषयक अंश खंडित असल्यामुळे त्याची एतद्विषयक कोणती धारणा होती ते कळावयास साधन नाही.

नैयायिकांनी तत्सामीप्य हे लक्षणेचे एक ज्ञापक मानले असल्याचे जाणकारांना ठाऊक आहेच [ **अर्थविज्ञान,** पृ. 115 ].

## (4.5) भूयस्त्व

**लक्षण** : 'यदेकस्मिन् वर्तमानमाधिक्येन क्वचिल्लभ्यते ।' [ **नीलयुक्ति,** App. xxi ]

**अर्थ** : एखाद्या वस्तूत अधिक प्रमाणात असणाऱ्या व दुसऱ्या वस्तूंत तितक्या प्रमाणात नसणाऱ्या गुणाचा परामर्श.

**उदाहरणार्थ** : ( i ) दण्डीने ओजोगुणाचे लक्षण पुढील शब्दांत केले आहे : 'ओजः समासभूयस्त्वमेतद्गद्यस्य जीवितम् ।' [**काव्यलक्षणम्,** पृ. 49]. यातील भूयस्त्व म्हणजे बाहुल्य असाच खुलासा रत्नश्रीज्ञानाने केला आहे [ तत्रैव ].

( ii ) वाग्भटानेही 'ओजः समासभूयस्त्वं तद्गद्येषु अतिसुन्दरम् ।' [ **वाग्भटालङ्कार,** पृ. 36 ] असेच लक्षण केले आहे. त्याचे स्पष्टीकरण सिंहदेवगणीने असे केले

आहे : 'यत्समासभूयस्त्वं समासप्राचुर्यं भवति स ओजोगुणः। तत्समासभूयस्त्वं गद्येषु गद्यबन्धेषु अतिसुन्दरं भवति।' [ तत्रैव ].

( iii ) कुन्तकाने अप्रस्तुतप्रशंसालंकारातील वैचित्र्य व्याजस्तुती व पर्यायोक्ती अलंकारांतही प्राचुर्याने आढळून येते, असे निरीक्षण 'एतच्च व्याजस्तुतिपर्यायोक्तप्रभृतीनां भूयसा विभाव्यते।' ह्या शब्दांत नमूद केले आहे [ पाहा : कुन्तक, **वक्रोक्तिजीवितम्**, व्याख्याकार, राधेश्याम मिश्र, द्वितीय, वाराणसी, चौखम्बा संस्कृत संस्थान, 1977, पृ. 133 ]. ह्यावरून काव्यशास्त्रज्ञांना भूयस्त्व ठाऊक होते, हे दिसते.

## (4.6) प्रकार

**लक्षण :** 'यो यस्य समानधर्मः स तस्य प्रकारः।' [ **नीलयुक्ति**, App. xxii ]

**अर्थ :** समान गुणधर्म असलेल्या दोन किंवा अधिक वस्तूंचा एकच प्रकार मानणे.

**उदाहरणार्थ :** ( i ) केशवमिश्राने 'आदिपदात्प्रकारपरिज्ञानम्।' [ **अलंकारशेखर**, पृ. 5 ], 'आदिपदात् खेदादिपरिग्रहः।' [ तत्रैव, पृ. 84 ], 'रौद्रादौ इत्यादिपदेन भयानकस्य, हास्यादौ इति करुणस्य परिग्रहः।' [ तत्रैव, पृ. 89 ] अशा नोंदी केल्या आहेत.

( ii ) वाग्भटाच्या 'विसन्धिवर्जनं चेति बन्धचारुत्वहेतवः।' [ **वाग्भटालंकार**, पृ. 6 ] ह्या कारिकार्धातील इति शब्दावर सिंहदेवगणीने पुढीलप्रमाणे टिप्पणी लिहिली आहे : 'एवंप्रकारा अन्येऽप्युष्ट्रत्वष्ट्रादिपदवर्जनादयो····भवन्तीति प्रकारार्थ इतिशब्दः····।' [ तत्रैव ].

( iii ) विश्वनाथानेही 'च्युतदत्ताक्षरादिका' इत्यादी कारिकेवरील वृत्तीत 'आदिशब्दात् क्रियाकारकगुप्तचादयः।' [ **साहित्यदर्पण**, पृ. 691 ] असाच खुलासा केला आहे.

( iv ) वामनाने 'न पादादौ खल्वादयः।' [ **कामधेनु**, पृ. 77 ] या सूत्रावरील स्वरचित वृत्तीत 'आदिशब्दः प्रकारार्थः।' [ तत्रैव ] असे स्पष्टीकरण स्वतःच केले आहे.

( v ) रुद्रटाच्या 'भवति····तथाभूतम्।' [ **रुद्रटालंकार**, पृ. 77 ] ह्या कारिकेतील 'तथा' शब्दावरील टिप्पणीत नमिसाधू लिहितो : 'तथाशब्दः प्रकारे।' [ तत्रैव ]. रुद्रटाच्याच 'यो वा येन····' [ तत्रैव ] कारिकेवरील टिप्पणीत नमिसाधू 'वा शब्दः प्रकारार्थः।' [ तत्रैव ] असा खुलासा करतो.

( vi ) वामनप्रणीत 'प्रतिवस्तुप्रभृतिरुपमाप्रपञ्चः।' [ **कामधेनु**, पृ. 40 ] ह्या सूत्रातील 'प्रभृति' शब्दाचा अर्थ आदि = प्रकार असा आहे, असे स्पष्टीकरण [ 'प्रभृतिशब्द आद्यर्थः।'—तत्रैव ] गोपेन्द्राने केले आहे. वामनाच्याच 'शब्दस्मृत्य····

दण्डनीतिपूर्वा विद्याः ।' [ तत्रैव, पृ. 30 ] या सूत्रातील 'पूर्वा' शब्दही प्रकारार्थकच आहे, इति गोपेन्द्र [ तत्रैव ].

( vii ) कुन्तकाने 'एतच्च व्याजस्तुतिपर्यायोक्तप्रभृतीनां भूयसा विभाव्यते ।' [ **वक्रोक्तिजीवितम्**, पृ. 133 ] ह्या वृत्तिपर विधानात प्रभृती शब्द प्रकारार्थीच वापरला आहे.

एकंदरीने प्राचीन शास्त्रकारांनी विविध शब्दांद्वारे प्रस्तुत ताच्छील्याचा प्रयोग आपापल्या ग्रंथांत वारंवार केलेला आढळतो. म्हणून हे ग्राह्य ठरते.

## (4.7) गुणगुणिविभव

**लक्षण :** 'क्वचित् गुणीनि गुणशब्देनोक्तानि…गुणश्च गुणिवद्यथा ।' [ **नीलयुक्ति**, App. xxii ]

**अर्थ :** गुणवन्ताचा गुणवाचक शब्दाने आणि गुणाचा गुणवन्तवाचक शब्दाने उल्लेख करणे. उदाहरणार्थ, 'पार्थिव ( अग्नी ) पार्थिव पदार्थ शिजवितात' ह्या विधानात पार्थिव ( अग्नी )=पार्थिव गुणांनी युक्त ( अग्नी ). यात गुणवाचक शब्दाने गुणवन्ताचा उल्लेख झाला आहे. तर 'दीर्घायुषी मेधास्मृतिबलसंपन्न असतात' ह्यात गुणवन्तवाचकाने गुणवाचकाचा उल्लेख झाला आहे. ह्या दोहोंपैकी पहिले उदाहरण रूढिमूला लक्षणेचे असून दुसरे प्रयोजनमूला लक्षणेचे आहे.

**उदाहरण :** काव्य हे गुणी ( =गुणवन्त ) असते तर प्रसादादी, उपमादी, वैदर्भी-प्रभृती हे त्याचे गुण असतात. पण भामहाने 'वैदर्भमन्यदस्तीति मन्यन्ते सुधियोऽपरे ।…गौडीयमिदमेतत्तु वैदर्भमिति किं पृथक् ।' [ **काव्यालंकार**, पृ. 17 ] ह्या वचनांत इतर विचारवंतांच्या मतांचा जो उल्लेख केला आहे त्यात प्रस्तुत ताच्छील्य प्रतीत होते. ह्याची आणखी उदाहरणे शोधून काढावयास हवीत.

## (4.8) संसक्तता

**लक्षण :** 'यदेकस्य बहुभिः सम्बन्धः । यथाविद्यमानेष्वपि तत्रान्येषु सम्बन्धेषु तस्यैव व्यपदेशः क्रियते ।' [ **नीलयुक्ति**, App. xii ].

**अर्थ :** एखाद्या वस्तूचा अनेक गुणांशी संबंध असला तरी तो दुर्लक्षून त्या वस्तूचे विशिष्ट गुणावरून नामकरण करणे. उदाहरणार्थ, मधात किंचित तुरटपणा असतो. पण त्याचे मधुरप्रायत्व लक्षात घेऊन त्याचा मधुरवर्गात अन्तर्भाव केला जातो. ह्यात व पूर्ववर्णित प्रधानकल्पना [ 2.1, 2.2 ] यांत काहीच फरक नाही. सबब ह्याची स्वतंत्रपणे दखल घेण्याचे प्रयोजन नाही.

## (4.9) तद्धर्मता

**लक्षण :** 'येन तथाभूतं सत्तद्धर्मतामासाद्य दर्शनात्तामेवाख्यां लभते ।' [ **नीलयुक्ति**, App. xxii].

**अर्थ :** दोन वस्तूंतील समानधर्म लक्षात घेऊन तुलनात्मक विधान करणे.

उदाहरणार्थ, जसे यमाचे पाश टाळावेत तसेच वैद्याचेही पाश टाळावेत कारण दोहोंत मारण्याचा समानधर्म आहे. हे कार्य उपमान [ 14 ], दृष्टान्त [ 17 ], निदर्शन [ 18 ], निर्वचन [ 22 ], हेत्वर्थ [ 40 ] इत्यादी अनेक तंत्रयुक्त्यांनी साध्य होत असल्यामुळे हे वेगळे ताच्छील्य मानण्यात हशील नाही.

## (4.10) स्थान

**लक्षण :** 'यत्र स्थानिना स्थानं स्थानेन वा स्थानी व्यपदिश्यते ।' [ **नीलयुक्ति,** App. xii ].

**अर्थ :** स्थानीचे म्हणजे 'ठिकाणदारा'चे नाव स्थानाला म्हणजे 'ठिकाणा'ला देणे व उलट ठिकाणाचे नाव ठिकाणदाराला देणे.

**उदाहरणार्थ :** ( i ) काव्यशास्त्रकारांनी 'लाटानुप्रास' नावाचा एक शब्दालंकार मानला आहे. त्याचे नामकरण, लाट देशातील लोकांना प्रिय म्हणून लाटानुप्रास, अशा प्रकारे स्थानवाचकावरून झाले आहे. ह्याबाबतीत उद्भटाचा टीकाकार प्रतीहारेन्दुराज म्हणतो: 'लाटदेशनिवासिजनवल्लभत्वाल्लाटानुप्रासोभिधीयते ।' [ **काव्यालंकारसारसंग्रहः,** पृ. 7 ]. असेच स्पष्टीकरण सिंहदेवगणी [ **वाग्भटालंकार,** पृ. 46 ] व विश्वनाथ [ **साहित्यदर्पण,** पृ. 672 ] ह्यांनीही केले आहे.

( ii ) काव्यशास्त्रज्ञांनी वैदर्भी, गौडी, पांचाली, लाटी इत्यादी रीतींची नावेही विदर्भप्रभृती देशनामांधारे कल्पिलेली आहेत. वामनाच्या 'विदर्भादिषु दृष्टत्वात् तत्समाख्या ।।' [ **कामधेनु,** पृ. 17 ] या सूत्रावरील वृत्तीत गोपेन्द्राने स्पष्टपणे म्हटले आहे : 'विदर्भादिपदैरुपचाराद्विदर्भादिदेशस्था: कवयो लक्ष्यन्ते ।' [ तत्रैव, पृ. 18 ]. अर्थात, वैदर्भी, गौडी, पांचाली इत्यादी सर्व शब्दप्रयोग औपचारिक आहेत.

( iii ) कुन्तकानेही ह्याबाबतीत 'यस्मात् चिरन्तनै: विदर्भादिदेशविशेषसमाश्रयणेन वैदर्भीप्रभृतयो रीतय: तिस्र: समाम्नाता: ।' [ **वक्रोक्तिजीवितम्,** पृ. 97 ] असे निरीक्षण नोंदवले आहे. ह्यावरून असा औपचारिक शब्दप्रयोग करण्याची काव्यशास्त्रज्ञांची प्रथा होती, हे दिसून येते.

## (4.11) तादर्थ्य

**लक्षण :** 'यत्प्रयोजनार्थं प्रवर्तते यो भावस्तेनैव व्यपदिश्यते ।' [ **नीलयुक्ति,** App. xxii ]

**अर्थ :** एखाद्या वस्तूचा ज्या हेतूसाठी उपयोग केला जातो त्या हेतूचे नाव त्या वस्तूला देणे. उदाहरणार्थ, मदनफळ ओकारीसाठी वापरले जाते, म्हणून मदनफळालाच छर्दन [ =ओकारी, वांती ] म्हणतात.

**उदाहरण :** वामनाने वर्णभंगापासून उत्कृष्ट यमक साधते असे एक मूलग्राही निरीक्षण नोंदून [ 'भङ्गादुत्कर्षः ।–' **वामन,** पृ. 45 ] मग ह्या भंगसाधित यमकाचे शृंखला, परिवर्तक व चूर्ण असे तीन प्रकार कल्पून विवेचिले आहेत. [ तत्रैव,

पृ. 45-46 ]. त्याच्या विवेचनानुसार 'कलिकामधुर्गर्हितम्' ह्या शब्दाचा प्रथमतः 'कलि-कामधुर्गर्हितम्' असा, त्यानंतर 'कलिका-मधुर्गर्हितम्' असा व शेवटी 'कलिकाम-धुर्गर्हितम्' असा एकूण तीन प्रकारांनी विच्छेद केला की, पहिल्या विच्छेदप्रकारात 'लि' अक्षरावर होणारा भंग दुसऱ्या विच्छेदप्रकारात 'का' अक्षरावर सरकतो आणि तिसऱ्या व शेवटच्या विच्छेदप्रकारात तो आणखी पुढच्या अक्षरावर म्हणजे 'म'वर सरकतो. अशा प्रकारे साखळीच्या दुव्यांप्रमाणे वर्णभंग पुढेपुढे सरकत असल्यामुळे ह्या प्रकारच्या वर्णभंगाला शृंखला हे नाव वामनाने दिले आहे आणि त्यापासून साधल्या जाणाऱ्या यमकप्रकारालाही शृंखला हेच नाव दिले आहे. वरील 'कलिका.....' ह्या शब्दाची घडण 'कलिकामधुक्+अर्हितम्' अशी झाली आहे. संधीच्या नियमांस धरून क्+अ मिळून 'ग' होतो. म्हणजेच 'अर्हितम्' शब्दाला 'क्' ह्या व्यंजनाच्या संसर्गा-मुळे 'गर्हितम्' असे रूप लाभते. परन्तु संधी तोडून म्हणजेच संसर्गाचे निवारण करून वाचल्यास 'गर्हितम्' शब्दाला पुन्हा 'अर्हितम्' असे निजरूप लाभते. तात्पर्य, अन्य-संसर्गामुळे वेगळे रूप पावलेल्या ( म्हणजेच परिवर्तित झालेल्या ) शब्दाला संसर्ग-नाशाबरोबर पुन्हा 'स्व'-रूप प्राप्त होणे व अशा प्रकारे परिवर्तनाचे परावर्तन होणे, ह्याला परिवर्तक यमकभंग म्हणतात. येथेही हेतूचे नाव हेतुसाधित वस्तूला दिलेले आहे. चूर्ण यमकभंगाचे स्वरूप असे : 'दूरसमुन्मुक्तशुक्तिमीनां कान्तः।' यातील 'शुक्ति' हे जोडाक्षर तोडले की 'क्' पूर्वीच्या शब्दात सामील होतो व 'ति' पुढच्या शब्दात मिसळून जाते. परिणामी 'शुक्ति' हे जोडाक्षर फुटते; शिल्लकच राहत नाही. अशा प्रकारे त्याचे जणू चूर्ण होत असल्यामुळे ह्या यमकप्रकाराला चूर्ण असे नाव वामनाने सुचवले आहे. हे तीन यमकभंगप्रकार प्रस्तुतच्या ताच्छील्याची उत्तम उदाहरणे आहेत. ह्या तीन प्रकारांची कल्पना करून वामनाने आपल्या सूक्ष्म सौन्दर्यदृष्टीचा उत्तम परिचय करून दिला आहे, हे जाताजाता नमूद करावयास हवे. आता साहचर्य ताच्छील्याकडे वळू.

## (4.12) साहचर्य

**लक्षण :** 'यो येन नित्यं सम्बन्ध उपलभ्यते, स तस्मात् सम्बन्धात्तमेव सम्बन्धि-शब्दं लभते ।' [ **नीलयुक्ति,** App. xxii ]

**अर्थ :** एखाद्या वस्तूचा दुसरीशी नित्य संबंध असता त्या संबंधामुळेच संबंधिशब्द प्राप्त होतो. उदाहरणार्थ, धूर व अग्नी यांचे साहचर्य लक्षात घेऊन धूर दिसताच अग्नीचे अनुमान करणे.

**उदाहरणे :** ( i ) वामनाच्या खाली उद्धृत केलेल्या सूत्रवृत्तींत ह्याचे दर्शन घडते : 'धर्मयोरेकनिर्देशेऽन्यस्य संवित्, साहचर्यात् ।। 10 ।। धर्मयोरेकस्यापि धर्मस्य निर्देशेऽन्यधर्मस्य संवित् प्रतिपत्तिर्भवति । कुतः ? साहचर्यात् । सहचरितत्वेन प्रसिद्धयोरवश्यमेकस्य निर्देशेऽन्यस्य प्रतिपत्तिर्भवति ।' [ **वामन** पृ. 51-52 ] अर्थात,

दोन धर्मांपैकी एकाचा निर्देश केल्याने तत्सहचरित दुसऱ्याचे ( =दुसऱ्या धर्माचे ) ज्ञान अवश्य होते. उदाहरणार्थ, छपरावरून टपकणाऱ्या पावसाच्या पाण्याचे थेंब मधाच्या थेंबांसारखे पिंगट भासत होते. ह्या वर्णनात जलबिन्दू हे उपमेय असून मधु-बिन्दू हे उपमान आहे. पावसाचे पाणी छपरावरून टपकत असल्यामुळे ( त्यात माती वगैरे मिसळली गेल्यामुळे ) पिंगट रंगाचे होणे स्वाभाविक आहे. येथे जलबिंदू व मधुबिंदू यांचा पिंगटपणा हा एकच धर्म साक्षात शब्दांनी वर्णिलेला आहे. पण त्या दोहोंचा गोलपणा हा धर्म तसा प्रत्यक्ष शब्दांनी वर्णिलेला नाही. तथापि, तो पिंगट-पणाशी नित्यसंबद्ध असल्यामुळे लक्षात येतो. ह्याला साहचर्यामुळे होणारे अर्थज्ञान म्हणतात.

( ii ) वाग्भटाच्या 'श्रियं दिशतु....' [ **वाग्भटालंकार,** पृ. 1 ] इत्यादी मंगला-चरणपर कारिकेवरील टीकेत सिंहदेवगणीने पुढीलप्रमाणे नित्यसंबंधाचा उल्लेख केला आहे : 'यत्तदोर्नित्यसंबंधः' इत्युक्तेः स इति गम्यते ।' [ तत्रैव ] अर्थात, जरी वाग्भटाने 'यत्'चाच स्पष्ट उल्लेख केलेला असला व 'तत्'चा तसा केलेला नसला तरी त्यांच्या नित्यसंबंधामुळे 'स' चा [ 'तत्'चा ] बोध होतोच.

## (4.13) कर्म

**लक्षण :** 'यत्र कर्मकर्मेति चोपचर्यते ।' [ **नीलयुक्ति,** App. xxii ].

**अर्थ :** कर्मनिवृत्ती व / वा कर्माभाव वर्णिताना 'कर्म'-वाचक शब्दाचा औपचारिक प्रयोग करणे. 'मुनयः प्रशमं जग्मुः ।' ह्या वाक्याचा अर्थ 'मुनींनी मनःशांती मिळ-वली' हा आहे. म्हणजेच त्यांनी इंद्रिये आवरली किंवा त्यांना त्यांच्या-त्यांच्या कर्मांपासून निवृत्त केले. अर्थात इंद्रियांत कर्माभाव उत्पन्न झाला. तो व्यक्त करण्या-साठी 'जग्मुः' शब्दात 'गम्' ह्या गत्यर्थक धातूचा ( म्हणजेच 'कर्म' बोधक धातूचा ) प्रयोग केला आहे. तो औपचारिक आहे. संस्कृत भाषेत 'निःस्पन्दनेत्रता भवति', 'दूरगतमन्मथा सा', 'स्वनियोगं अशून्यं कुरु', असे कित्येक विशिष्ट प्रयोग होतात. ते त्या भाषेचे एक खास वळण किंवा पद्धत ( idiom of the language ) आहे, प्रत्येक भाषेत असे औपचारिक प्रयोग आढळून येतातच ( उदाहरणार्थ, मराठीत 'त्याला गणित येते', 'मला ताप आला आहे', 'तिला श्रीखंड चालते', इत्यादी औपचारिक प्रयोग होतातच ).

**उदाहरण :** वामनाने लक्ष्यज्ञत्वप्रभृती प्रकीर्ण काव्यांगे मानली आहेत, त्यांत 'अवधान' हे एक आहे. त्याचे निरूपण वामनाने असे केले आहे :

"चित्तैकाग्र्यमवधानम् ।। 17 ।।

चित्तस्यैकाग्र्यं बाह्यार्थनिवृत्तिः तदवधानम् । अवहितं हि चित्तमर्थान् पश्यति ।" [ **वामन,** पृ. 11; तुळा—'मनस एकाग्रता समाधिः । समाहितं चित्तमर्थान्पश्यति ।'— **काव्यमीमांसा,** पृ. 11 ] अर्थात, चित्ताची एकाग्रता म्हणजे अवधान. चित्ताचे बाह्य

विषयांपासून निवृत्त (पराङ्मुख) होणे म्हणजे अवधान. असे समाहित चित्त विविध अर्थांचे दर्शन ( ज्ञान प्राप्त ) करू शकते. वामनाने येथे भाषेच्या अंगवळणी पडलेल्या विशिष्ट अभिव्यक्ति-पद्धतीचा आश्रय करून वरील सूत्रवृत्ती रचली आहे.

शास्त्रकाराला भाषेत रूढ असलेल्या अशा औपचारिक प्रयोगांचा अवलंब अपरिहार्यपणे करावा लागत असतो. ह्या अत्यंत व्यावहारिक बारकाव्याची अरुणदत्ताने दखल घेतली आहे, ही बाब विशेषेकरून उल्लेखनीय आहे. आता गुणनिमित्त ताच्छील्य विचारात घेऊ.

## (4.14) गुणनिमित्त

**लक्षण :** 'यत्कस्य विभूतिः प्रशंसादिका ख्याप्यते ।' [**नीलयुक्ति,** App. xxiii].

**अर्थ :** एखाद्या वस्तूतील एखाद्या प्रशंसनीय गुणाचेच नाव त्या वस्तूला देणे. उदाहरणार्थ, ब्रह्मचर्याच्या पालनाने धर्मशीलता, ख्याती, दीर्घायुष्य व ऐकान्तिक शुद्धता हे गुण प्राप्त होतात. हे लक्षात घेऊन ब्रह्मचर्यंच धर्म्य आहे, ब्रह्मचर्यंच यशस्य आहे असे म्हणणे म्हणजे गुणनिमित्त ताच्छील्य.

**उदाहरण :** वामनाने गद्याचे वृत्तगन्धी ( =ज्या गद्याला वृत्ताचा म्हणजे छंदाचा गंध येतो ते ), चूर्ण ( =ज्या गद्यात सुटीसुटी व लालित्यपूर्ण शब्दरचना असते असे ) व उत्कलिकाप्राय असे तीन प्रकार वर्णिले आहेत [ 'गद्यं वृत्तगन्धि चूर्ण-मुत्कलिकाप्रायं च ।। 22 ।।' **वामन,** पृ. 12 ]. ह्यांपैकी उत्कलिकाप्रायाचे स्पष्टीकरण 'कामधेनु' टीकेत पुढीलप्रमाणे केलेले आढळते: 'उत्कलिका उत्कण्ठा ।····उत्कलिकायाः प्रायः प्रयोगबाहुल्यं यस्मिंस्तत् उत्कलिकाप्रायं गद्यम् । यस्मिन् श्रूयमाणे श्रोतृणा-मुत्कण्ठा बहुला भवतीत्यर्थः ।।' [ **कामधेनु,** पृ. 40 ]. अर्थात, ज्या गद्यात श्रोत्यांच्या मनात उत्कंठा उत्पन्न करण्याचा गुण असतो त्याला उत्कलिकाप्राय गद्य म्हणतात. येथे विशिष्ट गद्यप्रकारालाच तद्गत गुणानुरोधाने नाव दिले आहे. हे नामकरण औपचारिक आहे, हे स्पष्ट आहे ( 'चूर्ण' गद्य हीही औपचारिक संज्ञाच आहे ).

## (4.15) चेष्टानिमित्त

**लक्षण :** 'यस्मिन्नाममात्रं कस्यचित् क्रियया भवति भावस्य । नात्र प्रस्पन्द-क्रियेष्टा ।' [ **नीलयुक्ति,** App. xxiii ].

**अर्थ :** एखाद्या वस्तूच्या क्रियेच्या कारणाखातर तिची प्रशंसा करण्यासाठी तिचा संबंध दुसऱ्या वस्तूशी जोडणे. उदाहरणार्थ, 'अमक्याचे ज्ञान दिव्याप्रमाणे प्रकाशते' हे विधान पाहा. दिव्याला आकाशात वर जाणारी, दाहक आणि रंग व स्पर्श यांनी युक्त अशी ज्योत असते. ज्ञानाला ह्यांपैकी काहीच नसते. तरी केवळ प्रकाश-क्रिया लक्षात घेऊन, ज्ञानाची प्रशंसा करण्यासाठी, ज्ञान प्रकाशते असा औपचारिक शब्दप्रयोग केला जातो.

**उदाहरणे :** ( i ) दण्डीच्या 'यदि शब्दाह्वयं ज्योतिरा संसारान्न दीप्यते ॥' [ **काव्यलक्षणम्,** पृ 3 ] ह्या कारिकार्धावरील टीकेत रत्नश्रीज्ञानाने 'ज्योतिरालोकः शब्दाह्वयं शास्त्रसंज्ञकं चतुर्वर्गप्रकाशकत्वात् ।' [ तत्रैव ] असा खुलासा केला आहे.

( ii ) आदी, मध्य व अन्त असे तीन भेद असलेल्या दीपक [ =दिवा ] नामक अर्थालंकाराच्या संज्ञेची यथार्थता पटवताना भामहाने म्हटले आहे : 'अमूनि कुर्वतेऽन्वर्थामस्याख्यामर्थदीपनात् ।' [ **काव्यालंकार,** पृ. 39 ], अर्थात वरील तीन भेद अर्थ प्रकाशित करणारे असल्यामुळे या अलंकाराचे नाव सार्थ करतात. येथेही प्रकाश-क्रियेचाच संबंध वर्णिलेला आहे.

( iii ) राजशेखराने केलेली कवींची भ्रामक [ '....पुराणस्यापि वस्तुनः.... भ्राम्यत्यसौ .... भ्रामकः कविः ।'—**काव्यमीमांसा,** पृ. 64 ], चुम्बक [ 'यश्चुम्बति परस्यार्थं....चुम्बकः स कविर्मतः ।'—तत्रैव ], कर्षक [ 'परवाक्यार्थमाकृष्य यः स्ववाचि निवेशयेत् ।....स स्मृतः कर्षकः कविः ।'–तत्रैव ] इत्यादी नामकरणेही त्या-त्या क्रिया लक्षात घेऊनच केली आहेत, हे उघड आहे. म्हणून हे ताच्छील्य ग्राह्य आहे.

## (4.16) मूलसंज्ञा

**लक्षण :** 'या लोकेऽन्यस्मिन्नर्थे प्रसिद्धा तन्त्रे चान्यस्मिन् [ अर्थे ] निवेशिता ।' [ **नीलयुक्ति,** App. xxiii ]

**अर्थ :** एखादा शब्द लोकव्यवहारात ज्या अर्थाने रूढ वा प्रसिद्ध असतो, त्याहून वेगळ्या अर्थाने तो शास्त्रात वापरणे. उदाहरणार्थ, लोकव्यवहारात रूप शब्दाचा अर्थ पांढरा, तांबडा इत्यादी रंग हा आहे. तर आयुर्वेदशास्त्रात रूप म्हणजे लक्षण किंवा चिह्न.

**उदाहरण :** काव्यशास्त्रातील चर्चेत गुण, दोष, अलंकार, प्रीती ( =आनंद ), रीती, पांचाली, लोक, विद्या, वृद्धसेवा, अवधान, चित्र, सन्दर्भ, साधू, कष्ट, ग्राम्य, व्यर्थ, सन्दिग्ध, प्रसाद, समता, समाधी, माधुर्य, उदारता, कान्ती, सूक्ष्म, शृंखला, चूर्ण, हीनत्व, अधिकत्व, असादृश्य, असंभव, संदेह, विरोध, क्रम, दीपक, असे सर्वसामान्य दैनंदिन व्यवहारात वापरले जाणारे कित्येक शब्द वापरलेले असतात. परंतु जेव्हा आपण काव्यशास्त्रावरील ग्रंथ वाचीत असतो तेव्हा वरीलसारखे शब्द हे काव्यशास्त्र ह्या विशिष्ट ज्ञानशाखेतील पारिभाषिक शब्द असून त्यांचे अर्थ त्या ज्ञानशाखेच्या परंपरेनुसार किंवा संकेतानुसार घ्यावयाचे आहेत, ह्याचे आपल्याला भान असते. म्हणजेच आपण त्या ज्ञानशाखेला संमत असेच वरील शब्दांचे अर्थग्रहण करतो. हे कार्य पूर्वोक्त पदार्थ [ 24 ] ह्या तंत्रयुक्तीच्या द्वारे साधले जात असल्यामुळे प्रस्तुतचे ताच्छील्य अनावश्यक ठरते. आता अन्तिम ताच्छील्याचा परामर्श घेऊ.

## (4.17) तात्स्थ्य

**लक्षण :** 'यदन्यस्यैवार्थस्य तत्स्थत्वादन्यस्यैव कल्प्यते।' [ **नीलयुक्ति,** App. xxiii ]. तस्मिन् तिष्ठतीति तत्स्थः। तस्य भावस्तात्स्थ्यम्। असे हे संज्ञारूप सिद्ध झाले आहे.

**अर्थ :** एकाचा भाव दुसऱ्याच्या ठायी असल्यामुळे तो दुसऱ्याचा आहे अशी कल्पना करणे. उदाहरणार्थ, एनिमाच्या वेदना, मूत्राच्या वेदना असे शब्दप्रयोग वैद्यकशास्त्रात होतात. एनिमा व मूत्र यांत चैतन्याचा अभाव असल्यामुळे त्यांना वेदना असणे शक्य नाही. वेदना मनुष्य शरीरात सम्भवतात. मूत्र शरीरस्थ असल्यामुळे मूत्राच्या वेदना असा औपचारिक प्रयोग होतो.

**उदाहरण :** वामनाने वैदर्भी रीतीत समासयुक्त शब्द नसतील तर तिला शुद्धवैदर्भी म्हणतात [ 'सापि समासाभावे शुद्धवैदर्भी ।।'–**वामन,** पृ. 7 ]; तिच्यातील अर्थगुणांची सम्पत्ती आस्वाद्य असते [ 'तस्यामर्थगुणसंपदास्वाद्या ।।' तत्रैव ], इतकेच काय पण तिचा आधार असल्यास लेशमात्र अर्थगुणही आस्वाद्य बनतात [ 'तदुपारोहादर्थगुणलेशोऽपि ।।', तत्रैव ], हे सगळे विवेचन संपवल्यावर पुढीलप्रमाणे सूत्रवृत्ती लिहिली आहे :

"सापि वैदर्भी, तात्स्थ्यात् ।। 22 ।।

सापीयमर्थगुणसंपत् वैदर्भीत्युच्यते। तात्स्थ्यादित्युपचारतो व्यवहारं दर्शयति ।।' [ तत्रैव, पृ. 8 ].

अर्थात, ती अर्थगुणसंपत्ती वैदर्भीत असल्यामुळे तिलाही वैदर्भी असेच म्हणतात. असे संबोधन औपचारिकपणे होत असते.

शेतातील धान्य पक्ष्यांनी खाऊन टाकू नये म्हणून शेतात माच्यावर बसून माणसे आरडाओरडा करून पक्ष्यांना पिटाळतात. त्या सन्दर्भात संस्कृतात 'मञ्चाः क्रोशन्ति।' =माचे ओरडत आहेत, असा जो औपचारिक प्रयोग होतो तो तात्स्थ्यामुळेच [ माच्यावर असतात ते पुरुष म्हणजे मञ्चस्थ पुरुष ]. वरील वैदर्भीविषयक शब्दप्रयोगही तसाच औपचारिक आहे.

अरुणदत्ताने कल्पिलेल्या सतरा ताच्छील्यांची चर्चा, काव्यशास्त्रीय ग्रंथांच्या सन्दर्भात, येथवर केली. तिच्यावरून असे म्हणता येते की, सामीप्य ताच्छील्याचा खुलासा अरुणदत्ताच्या टीकेत उपलब्ध होत नसल्यामुळे ते आणि अवयव, विकार, संसक्तता, तद्धर्मता व मूलसंज्ञा यांचा अन्तर्भाव पूर्ववर्णित कोणत्याना कोणत्या शास्त्रोपायांत होत असल्यामुळे ही ताच्छील्ये स्वतन्त्रपणे विचार करण्याजोगी नाहीत, असे ठरते. उरलेली ताच्छील्ये स्वतन्त्र शास्त्रोपाय म्हणून स्वीकार्य ठरतात. भाषेतील औपचारिक वा गौण शब्दप्रयोगांवर आधारित ह्या ताच्छील्यांच्या कल्पनेचे श्रेय अरुणदत्ताकडे जाते. ह्या मुद्याचा निरोप घेण्यापूर्वी एका महत्त्वाच्या गोष्टीचा

उल्लेख करावयास हवा. ती गोष्ट ही की, वामनाने आपल्या 'काव्यालंकारसूत्राणि' ग्रंथात प्रकार, साहचर्य व तात्स्थ्य या ताच्छील्यांचा साक्षात प्रयोग केला आहे, ह्या संज्ञा प्रत्यक्षात वापरल्या आहेत, इतकेच नव्हे तर अरुणदत्ताला ह्या ताच्छील्यांचा जो अर्थ अभिप्रेत आहे त्याच्याशी वामनाचा उत्तम परिचय आहे. ह्या वस्तुस्थिती-वरून पुढील अनुमाने सम्भवतात : अरुणदत्ताची टीका वामनाच्या वाचनात आली असावी. असे झाले असल्यास अरुणदत्त हा वामनापूर्वी म्हणजे इसवी सन 800 पूर्वी होऊन गेला असावा. दुसरे सम्भाव्य अनुमान असे की, वामनाने ह्या ताच्छील्यांची स्वतःच्या बुद्धीने कल्पना केली असावी. तिसरे अनुमान असे की, अरुणदत्ताला उपलब्ध असलेला मूळ सन्दर्भग्रंथ वामनालाही उपलब्ध झाला असावा व दोघांनीही त्या मूळ सन्दर्भग्रंथाच्या आधारे आपापले विवेचन अन्यनिरपेक्षपणे केले असावे. ह्या मुद्याची अधिक चर्चा नको.

## (5) संकीर्ण उपाय

मागील निन्बधात 39 तन्त्रयुक्त्या व 15 व्याख्या मिळून 54 प्रमुख शास्त्रोपायांची व प्रस्तुत निन्बधात 7 कल्पना, 20 आश्रय व 17 ताच्छील्ये मिळून 44 गौण शास्त्रो-पायांची सविस्तर व सोदाहरण चर्चा केली. परंतु हा विषय येथेच संपत नाही, कारण पूर्वीच्या निबंधातील परिच्छेद 41 मध्ये केलेल्या उल्लेखानुसार इन्दू नामक टीका-काराने 'तन्त्रयुक्त्यांचे अगणित प्रकार संभवतात' असे निरीक्षण नोंदवले आहे. त्यांपैकी निदान काही युक्त्या म्हणजेच उपाय शोधून काढून त्यांची नोंद करणे आवश्यक आहे. ह्यासाठी काव्यशास्त्रावरील टीका-टिप्पण्यांचा यथाशक्ती अभ्यास करू आणि दृष्टोत्पत्तीस आलेल्या अशा अन्य उपायांची संकीर्ण ह्या सदरात खाली नोंद करू. असे केल्याने प्रस्तुत विषयाचे 'न्यून' 'पुरते' होईल.

## (5.1) अनुवृत्ती

**लक्षण :** 'पूर्ववाक्योपात्तपदादेरुत्तरत्रान्वयार्थमाकर्षणम् ।' [ **सर्वतंत्र**····पृ. 19 ]

**अर्थ :** पूर्वीच्या वाक्यात योजलेल्या शब्दादींची नंतरच्या वाक्यात, अन्वय जुळवण्यासाठी, पुन्हा योजना करणे.

**उदाहरणार्थ :** ( i ) वामन 'अन्यार्थ····' [ **वामन,** पृ. 16 ] इत्यादी स्वरचित सूत्रावरील वृत्तीत 'दुष्टं पदम्' इत्यनुवर्तते ।' [ तत्रैव ] असा खुलासा स्वतःच करतो. तोच 'भिन्नवृत्त···' [ तत्रैव, पृ. 20 ] या सूत्रावरील वृत्तीत 'दुष्टानीत्यभिसंबंधः ।' [ तत्रैव ] याप्रमाणे व 'व्यर्थैकार्थ····' [ तत्रैव, पृ. 23 ] ह्या सूत्रावरील वृत्तीत 'वाक्यानि दुष्टानि' इति संबंधः ।' [ तत्रैव ] याप्रमाणे अनुवृत्ती करतो.

( ii ) केशवमिश्राने 'अत्यन्तानन्द····' [ **अलंकारशेखर** पृ. 40 ] इत्यादी कारिकार्धानंतर 'योषिद् इति अनुवर्तते ।' [ तत्रैव ] ह्याच शब्दांत अनुवृत्ती दर्शवली आहे.

( iii ) सिंहदेवगणीने वाग्भटाच्या 'समाप्तमिव.....' [ **वाग्भटालंकार**, पृ. 9 ] इत्यादी कारिकेवरील वृत्तीत 'कुर्यादिति क्रियानुवर्तते ।' [ तत्रैव ] असे पदाकर्षण केले आहे.

( iv ) धनंजयाच्या 'नर्मतत्स्फिञ्जत.....' [ **दशरूपकम्**, पृ. 130 ] इत्यादी कैशिकीवृत्तिवर्णनपर कारिकार्धावरील टीकेत धनिकाने नर्म शब्द कैशिकीवृत्तीच्या चारी अंगवाचक शब्दांपूर्वी योजावयाचा [ 'तदित्यनेन सर्वत्र नर्म परामृश्यते ।'-तत्रैव ] अशी व्यवस्था सुचवली आहे.

( v ) विश्वनाथाच्या ग्रंथातही 'व्यंजना इति संबध्यते ।' [**साहित्यदर्पण**, पृ. 88], 'अत्र च सर्वत्र रुषा इति अनुवर्तते ।' [ तत्रैव, पृ, 164 ], अशा अनुवृत्तिपर सूचना जागोजागी आढळतात.

अनुवृत्ती हे पूर्ववर्णित योग तंत्रयुक्तीचेच [ परिच्छेद 30 ] एक स्वरूप आहे.

## (5.2) अन्वय

**स्वरूप :** वाक्यादींत वापरलेल्या शब्दांपासून सुसंगत अर्थ निष्पन्न होऊन तो वाचकाला कळावा म्हणून त्या शब्दांचा परस्परांशी असलेला संबंध दर्शवणे.

**उदाहरणे :** ( i ) 'शून्यं वासगृहं.....' इत्यादी श्लोकावरील टिप्पणीत केशवमिश्राने 'आलोक्य नम्रमुखीत्यन्वय: ।' [ **अलंकारशेखर**, पृ. 76 ] ह्या शब्दांत अन्वय दर्शवला आहे. त्यानेच 'परिहरति रतिं.....' इत्यादी विभावनिदर्शक पद्याचा शब्दान्वय 'इत्यनेन प्रकारेणास्य दशा देहं परिभवति इत्यन्वय: ।' [ तत्रैव, पृ. 87 ] या शब्दांत स्पष्ट केला आहे. ( ii ) वाग्भटाच्या 'श्रियं दिशतु वो देव:.....' [ **वाग्भटालंकार**, पृ. 1 ] ह्या मंगलाचरणावरील आपल्या टीकेत सिंहदेवगणीने 'श्रीनाभेयजिनो व: श्रियं दिशतु इति संटंकघटना ।' [ तत्रैव ] ह्या शब्दांत व 'हस्ताग्रविन्यस्त.....' [ तत्रैव, पृ. 69 ] इत्यादी श्लोकावरील टीकेत 'काचिदवश्यनाथा नायिका दो:कन्दलीं भुजादण्डलतां नेत्रस्रवदश्रुवारा लोचननिर्गच्छदश्रुजलेन सिषेच ।' [ तत्रैव ] ह्या शब्दांत संबंध दर्शवला आहे.

हा संबंध व्याकरणिक व तार्किक असा उभयविध असतो.

## (5.3) अर्थनिरूपणाचे दिशादर्शन

**स्वरूप :** ग्रंथाचे वाचन करण्याची, अर्थ लावण्याची व/वा विवाद्य विषयाचा निर्णय करण्याची दिशा, पद्धती व/वा उपाय दाखवणे.

**उदाहरणे :** ( i ) शंका ह्या व्यभिचारी भावाचे एक उदाहरणपद्य उद्‌धृत करून धनिक सुचवतो: 'अनया दिशा अन्यद् अनुसर्तव्यम् ।' [ **दशरूपकम्**, पृ. 186 ], अर्थात ह्याच पद्धतीने इतर अनुभावांची उदाहरणे शोधावीत व/वा रचावीत.

( ii ) लक्ष्यार्थाची व्यंजकता 'मुखं विकसितस्मितं.....' [ **अलंकारशेखर**, पृ. 12 ] इत्यादी पद्याद्वारे स्पष्ट करून केशवमिश्र प्रतिपादतो: 'एवमग्रेऽपि ।' [ तत्रैव ],

अर्थात ह्याच पद्धतीने 'अवलोक्य····' इत्यादी श्लोकात व्यंग्यार्थाची व्यंजकता समजून घ्यावी.

( iii ) वाग्भट 'ग्रामे वासो····' [ **वाग्भटालंकार,** पृ. 90 ] इत्यादी पद्य अपकृष्टसमुच्चय-अलंकाराचे उदाहरण म्हणून उद्धृत करतो. त्याबाबतीत सिंहदेवगणी 'भावना स्वयमेव विचारणीया ।' [ तत्रैव ] अर्थात, अर्थसंगतीचे चिंतन स्वतःच करावे, अशी सूचना करतो.

( iv ) विश्वनाथाने 'अस्य लटकमेलकप्रभृतिषु परिपोषो द्रष्टव्यः ।' [ **साहित्य-दर्पणम्,** पृ. 252 ], 'परिपोषस्तु महाभारते स्त्रीपर्वणि द्रष्टव्यः ।' [ तत्रैव, पृ. 254 ], 'पुष्टिस्तु महाभारतादौ द्रष्टव्या ।' [ तत्रैव, पृ. 264 ] इत्यादी सूचनांच्या द्वारे हास्य, करुण, शांत इत्यादी रसांच्या परिपोषाच्या ज्ञानपूर्वक आस्वादनाची दिशा दाखवून दिली आहे.

( v ) वैशेषिक गुणांविषयीची मतांतरे नोंदवून केशवमिश्र पुढील शब्दांत एतद्विषयक निर्णायक गमक नमूद करतो : 'तत्र सहृदयानामेव प्रतीतिः साक्षिणी ।' [ **अलंकारशेखर,** पृ. 24 ], अर्थात त्या बाबतीत रसिकांना होणारी प्रचीतीच प्रमाण-भूत मानावी. हा 'उह्या'चाच एक प्रकार आहे.

## (5.4) आरंभ

शास्त्रीय ग्रंथाचा आरंभ कसा करावा ह्याबाबतीत सिंहदेवगणीने खालील पद्याद्वारे उपदेश केला आहे :

'मङ्गलं चाभिधेयं च सम्बन्धश्च प्रयोजनम् ।
चत्वारि कथनीयानि शास्त्रस्य धुरि धीमता ॥' [ **वाग्भटालंकार,** पृ. 2 ]

अर्थात, बुद्धिमान पुरुषाने शास्त्राच्या शीर्षस्थानी [ =आरंभी ] मंगलाचरण, प्रतिपाद्य विषय, ग्रंथ व प्रतिपाद्य विषय यांचा संबंध व शास्त्राचे प्रयोजन यांचे निरूपण करावे.

## (5.5) उपलक्षण

**लक्षण :** 'स्वप्रतिपादकत्वे सति स्वेतरप्रतिपादकम् ।' [ **सर्वतंत्र··· पृ.** 56 ].

**अर्थ :** प्रयुक्त शब्द स्वतःच्या अर्थाखेरीज इतर समान वा स्वजातीय अर्थाचाही प्रतिपादक असणे. वा. शि. आपटे-कोशात [ The *Student's Sanskrit-English Dictionary*, Reprint, Delhi, Motilal Banarsidass, 1973, p. 113 ] ह्या शब्दाचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे केलेले आढळते : "Implying something that has not been actually expressed, implication of something in addition or any similar object where only one is mentioned."

**उदाहरणे :** ( i ) वाग्भटाच्या 'मनःप्रसत्तिः····' [ **वाग्भटालंकार, पृ.** 9 ] या कारिकेतील 'प्रातःकाल' शब्दाचे स्पष्टीकरण सिंहदेवगणीने उपलक्षणाधारे पुढील-

प्रमाणे केले आहे : 'प्रातःकालस्य उपलक्षणत्वादपररात्रादिवेलापि ज्ञेया। तत्र हि मन्दमेधसोऽपि मेधा प्रसीदति।' [ तत्रैव ]. ह्याचा अर्थ स्पष्ट आहे.

( ii ) विश्वनाथ 'संभोगे करुणे....' [ **साहित्यदर्पणम्**, पृ. 644 ] इत्यादी कारिकेवरील स्वरचित वृत्तीत म्हणतो: 'संभोगादिशब्दा उपलक्षणानि। तेन संभोगाभासादिषु अपि एतस्य स्थितिर्ज्ञेया।' त्याने 'वीरबीभत्सरौद्रेषु ....' [तत्रैव, पृ. 646] कारिकेवरील वृत्तीतही 'तेन वीराभासादौ अपि अस्यावस्थितिः।' असाच खुलासा केला आहे.

( iii ) करिज आवेगाचे [ हत्तीने केलेला विध्वंस पाहून उत्पन्न झालेल्या संचारी भावाचे ] निदर्शक पद्य रघुवंशातून उद्धृत करून धनिक म्हणतो: 'करिग्रहणं व्यालोपलक्षणार्थं, तेन व्याघ्रशूकरवानरादिप्रभवा आवेगा व्याख्याताः।' [ **दशरूपकम्**, पृ. 204 ].

हा उपाय म्हणजे पूर्ववर्णित अतिदेश [ परिच्छेद 3 ] व अर्थापत्ती [ 9 ] ह्या तंत्रयुक्तचा व प्रकार ताच्छील्य [ 4.6 ] यांचे मिश्रण आहे.

## (5.6) ऐकीव माहितीचा अन्तर्भाव

एखादा शास्त्रकार शास्त्रीय नियमादींच्या स्पष्टीकरणासाठी ऐकीव माहितीचाही समावेश आपल्या ग्रन्थात करताना आढळतो. उदाहरणार्थ, राजशेखराने भाषाविषयक निर्बंधांच्या बाबतीत खालीलप्रमाणे उल्लेख केले आहेत :

( i ) 'श्रूयते हि मगधेषु शिशुनागो नाम राजा, तेन दुरुच्चारानष्टौ वर्णानपास्य स्वान्तःपुर एव प्रवर्तितो नियमः.....।' [ **काव्यमीमांसा**, पृ. 50 ], अर्थात, शिशुनाग नामक मगधराजाच्या अंतःपुरात ट, ठ, ड, ढ, श, ष, ह व क्ष या आठ वर्णांच्या उच्चाराला बंदी होती, असे ऐकतो. राजशेखराने शूरसेनाचा कुविन्द, कुन्तलाचा सातवाहन, आणि उज्जयिनीचा साहसांक या राजांच्या अंतःपुरांतील भाषाविषयक नियमांचा निर्देशही वरील पद्धतीने ऐकीव माहितीच्या आधारे केला आहे [ तत्रैव ].

( ii ) राजशेखरानेच कालिदास, मेंठ, अमर, रूप, सूर, भारवी इत्यादी कवींची ( काव्यनिर्मितिनैपुण्य- )परीक्षा उज्जयिनीत झाल्याचे आणि उपवर्ष, वर्ष, पाणिनी, पिंगल, व्याडी, वररुची, पतंजली इत्यादी शास्त्रकारांची ( शास्त्रग्रन्थरचना-कौशल्याची ) परीक्षा पाटलिपुत्रात झाल्याचे ऐकीव माहितीच्या आधारे नोंदवले आहे [ तत्रैव, पृ. 55 ]. ह्या नोंदींवरून वाचकाला वरील दोन शहरे क्रमशः कवींच्या व शास्त्रकारांच्या परीक्षेची केन्द्रे होती ही माहिती मिळते. ती प्राचीन भारतीय वाङ्मयीन संस्कृतीच्या [ Ancient Indian Literary Culture ] परंपरांवर व ज्ञानावर प्रकाश टाकणारी आहे.

## (5.7) छन्दाचा निर्देश

वाग्भटाच्या 'दयां चक्रे दयाश्चक्रे।' [ **वाग्भटालंकार**, पृ. 49 ], 'यशस्ते

समुद्रान्सदारोरगारेः ।' [ तत्रैव, पृ. 50 ] व 'रम्भारामा····।' [ तत्रैव, पृ. 53 ] ह्या पद्यांत क्रमशः क्रीडा, सोमराजी व भ्रमरविलसित नामक छंद असून त्यांची लक्षणे 'छन्दश्चूडामणी' मध्ये बघावीत असे सुचवून सिंहदेवगणीने वाचकांच्या पद्याकलनाला जणू पूर्णता प्राप्त करून दिली आहे.

## (5.8) तात्पर्याची नोंद

प्राचीन शास्त्रकार अनेक स्थळी तात्पर्य, भाव किंवा आशय उन्मेखून नोंदवताना आढळतात. ह्या नोंदींच्या द्वारे त्यांचा अभिप्राय सुविशद होतो.

**उदाहरणे** : ( i ) वामनाने 'न विरुद्धोऽतिशयः ।' [ **वामन**, पृ. 55 ] ह्या स्वतःच्या सूत्रावरील वृत्तीत 'विरुद्धस्यातिशयस्य संग्रहो न कर्तव्य इत्यस्य सूत्रस्य तात्पर्यार्थः ।' [ तत्रैव, पृ. 56 ] असा खुलासा स्वतःच केला आहे.

( ii ) सिंहदेवगणीने 'अयं भावः सर्वेष्वप्यलंकारेषूपमादिष्वेकस्याप्यर्थस्य स्थापनां कर्तुं चाभ्यसेदित्यर्थः ।' [ **वाग्भटालंकार**, पृ 10 ], 'चतस्रोऽपि भाषाः काव्यस्य शरीरप्राया इत्यर्थः ।' [ तत्रैव, पृ. 18 ], 'कियन्मात्रः । न समग्र इति भावः ।' [ तत्रैव, पृ. 5 ] अशा शब्दांत भावार्थ सांगितले आहेत.

( iii ) कुन्तकाने 'तदिदमत्र तात्पर्यम् ।' [ **वक्रोक्तिजीवितम्**, पृ. 6, 188, 193, 448 इ. ], 'तदयमत्राभिप्रायः ।' [ तत्रैव, पृ. 124 ], 'इदमुक्तं भवति ।' [ तत्रैव, पृ. 442 ] अशी स्पष्टीकरणे केलेली आढळतात.

( iv ) दण्डीच्या 'सर्गैरनतिविस्तीर्णैः····।' [ **काव्यलक्षणम्**, पृ. 13 ] ह्या कारिकेवरील आपल्या टीकेत रत्नश्रीज्ञानाने 'अनतिविस्तीर्णैर्नातिमहद्भिर्मध्यमैरित्यर्थः ।' [ तत्रैव ] असा उलगडा केला आहे.

## (5.9) दोष : प्रदर्शन व समर्थन

( i ) वामनाने लोक, विद्या व प्रकीर्ण अशा तीन काव्यांगांचा नामनिर्देश [ **वामन**, पृ. 8 ] करून प्रतिभेचा अन्तर्भाव प्रकीर्णात केला आहे [ 'लक्ष्यज्ञत्वमभियोगो वृद्धसेवावेक्षणं प्रतिभानमवधानं च प्रकीर्णम् ।'–तत्रैव, पृ. 10 ]. वस्तुतः प्रतिभा ही कवित्वाच्या मुळाशी असल्यामुळे सर्वतोपरी महत्त्वाची व म्हणून आद्यनिर्देशयोग्य असताना वामनाने तिला, वर वर्णिल्याप्रमाणे, गौण स्थान देऊन चूकच केली आहे. तिची दखल गोपेन्द्राने पुढील शब्दांत घेतली आहे : 'कवित्वबीजं प्रथमं परिगणनीयम् । यत्तु पश्चात् परिगणितं इति तच्चिन्त्यम् ।' [ **कामधेनु**, पृ. 29 ].

( ii ) उद्भटाने उपमा व दीपक या दोन अलंकारांचा ह्या क्रमाने नामनिर्देश केला आहे [ **काव्यालंकारसारसंग्रह**, पृ. 1 ]. पण त्यांचे प्रत्यक्षात लक्षणनिरूपण करताना दीपक [ तत्रैव, पृ. 15-16 ] व उपमा [ तत्रैव, पृ. 17-29 ] असा क्रमविपर्यय केला आहे. वस्तुतः हा दोष आहे. पण ह्याचेही समर्थन प्रतीहारेन्दुराजाने पुढील युक्तिवादाने केले आहे, ते 'चिंत्य' आहे : उद्भटाने विविध अलंकारांच्या

स्वरूप-स्पष्टीकरणासाठी स्वरचित कुमारसंभव महाकाव्यातील पद्ये उद्धृत केली आहेत. त्यांत प्रथमत: दीपकाची उदाहरणे आहेत व नंतर उपमेची आहेत. तो क्रम अबाधित राहावा म्हणून त्याने येथील निर्देशक्रमाचा भंग केला आहे. निर्देशप्रसंगीच दीपक व उपमा असा क्रम राखला असता तर वृत्तभंग झाला असता, म्हणून तसे केले नाही [ तत्रैव, पृ. 16 ]. वस्तुत: शास्त्रग्रंथातील उद्देशक्रम प्रधान व महाकाव्यातील उद्देशक्रम गौण, हे तारतम्य येथे सुटले आहे.

## (5.10) द्वारश्लोक

ज्याप्रमाणे द्वार ( दार ) हे घरात प्रवेश करण्याचे ( व घरातून बाहेर येण्याचे ) स्थान असते, त्याप्रमाणे एखाद्या शास्त्रीय विषयात प्रवेश करवणाऱ्या श्लोकांना औपचारिकपणे द्वारश्लोक म्हणतात. उदाहरणार्थ, वाग्भटाने आपल्या ग्रंथाच्या चौथ्या परिच्छेदाच्या दोन ते सहा ह्या पाच कारिकांत [ **वाग्भटालंकार**, पृ. 39 ] चित्रादी चार व जातिप्रभृती पस्तीस शब्दार्थालंकारांचा फक्त नामोल्लेख केला आहे व त्यांच्या द्वारे अभ्यासकांचा ह्या विषयात प्रवेश करवला आहे. हे ध्यानात घेऊन सिंहदेवगणीने पस्तिसाव्या संकर अलंकाराच्या विवरणानंतर पुढील निरीक्षण नोंदवले आहे : "द्वार-श्लोकेषु येऽलंकारा यथानामान: कथितास्ते सर्वे व्याख्याता: ।' [ तत्रैव, पृ. 95 ]. त्याने 'अथ रीतिद्वारमाह–' [ तत्रैव, पृ. 96 ] या शब्दांनी वाग्भटकृत रीतिचर्चेचे उद्घाटन केले आहे. हा औपचारिक शब्दप्रयोग ताच्छील्यवजा आहे.

## (5.11) नियमादि-निर्देश

प्राचीन शास्त्रकार शास्त्रीय तत्त्वादींच्या पुष्टीसाठी नियमादींचा व त्यांच्या सिद्धीसाठी प्रमाणादींचा निर्देशपूर्वक हवाला देतात. ह्याबाबतीत शास्त्रकारांनी नय, नियम, नीती, न्याय, प्रमाण किंवा अधिकार इत्यादी पारिभाषिक शब्द वापरलेले आढळतात.

**उदाहरणे :** ( i ) "अत एवाहु: श्लेषनिरूपणप्रस्तावे 'काव्यमार्गे स्वरो न गण्यते' इति च नय: ।" [ **साहित्यदर्पणम्**, पृ. 79 ].

( ii ) 'अतश्च लौकिकशोकहर्षादि····इति नियमान्न कश्चिद्दोष: ।' [ तत्रैव, पृ. 116 ].

( iii ) 'प्रतिपाद्यस्य दुष्टत्वे प्रतिपादकमपि दुष्टं भवति इति ।' [ **कामधेनु**, पृ. 83 ].

( iv ) 'इष्टानुवर्तनात् कुर्यात् प्रागनिष्टनिवर्तनमिति नीत्या गुणालंकारादानात् पूर्वं दोषहानमेव कर्तव्यमिति सूचयितुं प्रथमतो दोषहानस्य निर्देश: कृत: ।' [ तत्रैव, पृ. 9 ].

( v ) 'यद्यपि कुमारसम्भवे कालिदासेन वर्णितम्, तथाप्यर्वाचीनैर्न कर्तव्यम् । नहि गजादीनामौदर्यं तेजो वटकाष्ठमशितं पचतीत्यस्मदादीनामप्यौदर्येण तेजसा तथा भवितव्यमिति न्यायात् ।' [ **अलंकारशेखर**, पृ. 88-89 ].

( vi ) 'सर्वं हि वाक्यं सावधारणमामनन्ति' इति न्यायात्....।" [ **वाग्भटालंकार**, पृ. 4 ].

( vii ) 'यत्परः शब्दः स शब्दार्थः' इति न्यायात् इति ।" [ **साहित्यदर्पणम्**, पृ. 342 ].

( viii ) 'पूरणमात्रप्रयोजनमव्ययपदमनर्थकम् । दण्डापूपन्यायेन...।" [ **वामन**, पृ. 16 ].

( ix ) छन्दोभ्रष्ट दोषाच्या बाबतीत सिंहदेवगणी म्हणतो : 'अधिकारस्तु तत्र वृत्तरत्नाकरच्छन्दसि विलोकनीय इति ।' [ **वाग्भटालंकार**, पृ. 28 ].

## (5.12) पद-प्रयोग-समर्थन

शास्त्रकाराने सूत्रात वा कारिकेत [=अल्पाक्षर पण बह्वर्थज्ञापक शास्त्रविषयपर श्लोकात ] वापरलेल्या पदांचे [ सैल भाषेत, शब्दांचे ] प्रयोजन सांगणे, समर्थन करणे व / वा त्यांच्या क्रमनिर्देशाचे कारण सांगणे.

**उदाहरणे :** ( i ) शौद्धोदनीच्या 'काव्यं रसादिमद् वाक्यं श्रुतं सुखविशेषकृत् ।' [ **अलंकारशेखर**, पृ. 2 ] मधील 'श्रुत' शब्दाचे प्रयोजन केशवमिश्र पुढील शब्दांत स्पष्ट करतो : 'अदृष्टद्वारा तद्धेतुशब्देऽतिव्याप्तेराह— श्रुतमिति ।' [ तत्रैव, पृ. 3 ].

( ii ) 'तथैव नीरसं काव्यं न स्याद्रसिकतुष्टये ।' [ तत्रैव, पृ. 75 ] वरील वृत्ती अशी: 'विशेषणं समूहालम्बनवारणाय ।' [ तत्रैव ].

( iii ) 'शब्दैः स्वभावादेकार्थैः श्लेषोऽनेकार्थवाचनम् ।' [ **साहित्यदर्पणम्**, पृ. 788 ] ह्या श्लेष-लक्षणपर कारिकार्धावरील स्वरचित वृत्तीत विश्वनाथाने स्वभावादेकार्थैः व वाचनम् शब्दांचे प्रयोजन पुढीलप्रमाणे स्पष्ट केले आहे : 'स्वभावादेकार्थैः इति शब्दश्लेषाद् व्यवच्छेदः । 'वाचनम्' इति च ध्वनेः ।" [ तत्रैव ].

( iv ) वामनाने 'शेषः सरूपोऽनुप्रासः ।' [ **वामन**, पृ. 47 ] ह्या अनुप्रास-लक्षणपर सूत्रातील 'सरूप' शब्दाचे प्रयोजन 'विशेषार्थं च सरूपग्रहणम् ।' [ तत्रैव ] असे स्पष्ट केले आहे.

( v ) वामनानेच 'सा त्रेधा वैदर्भी गौडीया पांचाली चेति ॥' [ **कामधेनु**, पृ. 17 ] ह्या क्रमाने रीतींचा निर्देश केला आहे. त्याच्या कारणाचा उलगडा गोपेन्द्राने पुढील आशयाचा युक्तिवाद करून केला आहे : वामनाने वैदर्भी रीती सकलगुणसंपन्न मानलेली असल्यामुळे तिचा प्रथम क्रमांकाने, नंतर सापेक्षतया अल्पगुणयुक्त गौडीचा व शेवटी उरलेल्या पांचालीचा उल्लेख केला आहे [ तत्रैव ].

## (5.13) परंपरागत विचारोद्धरण

शास्त्रकार शास्त्रीय संकल्पनेच्या पुष्टीसाठी / सिद्धीसाठी परंपरागत उक्ती, वचन वा विचार उद्‌धृत करतो. तसे करण्यापूर्वी तो अत्र गाथा, अत्र श्लोकः / श्लोकौ / श्लोकाः, अत्राह, अत्राहुः, आह, आहुश्च, उक्तं च, तथा चाहुः, तदाहुः,

तदिदमुक्तम्, तदुक्तम्, यथाह, यदाह, यदाहुः, यदित्थं कथयन्ति, यदुक्तम् इत्यादींपैकी एखादे प्रास्ताविक करतो व मग पूर्वकालीन विचारवंतांचे वचन उद्धृत करतो. **उदाहरणार्थ,**

( i ) 'तदिदमुक्तम्—प्रमाणवत्त्वादायातः प्रवाहः केन वार्यते ।' [ **वक्रोक्ति-जीवितम्**, पृ. 214 ].

( ii ) 'अत्र गाथा-अयं भस्मनि होमः स्यादियं वृष्टिर्मरुस्थले । इदमश्रवणे गानं तज्जडे शास्त्रशिक्षणम् ।' [ **कामधेनु**, पृ. 15 ].

( iii ) 'यदुक्तम्–पुण्यवन्तः प्रमिण्वन्ति योगिवद्रससन्ततिम् ।' [ **साहित्यदर्पणम्**, पृ. 107 ].

( iv ) 'यदाहुः—यथारुचि यथार्थित्वं यथाव्युत्पत्ति भिद्यते ।
'आभासोऽप्यर्थ एकस्मिन्ननुसन्धानसाधितः ॥' [तत्रैव, पृ. 752]

( v ) "विष्णोर्नाभिस्थकमले विश्वकर्तुर्निवासः' इति लोकोक्तेः ।' [ **वाग्भटालंकार**, पृ. 2 ].

## (5.14) विग्रह

शास्त्रकार स्वतः किंवा त्याचा टीकाकार सूत्रातील किंवा कारिकेतील सामासिक शब्दांचे विग्रह करून शब्दार्थाची उकल करतात. **उदाहरणार्थ,**

( i ) 'पङ्कप्रसादनाय····पङ्कस्य प्रसादनाय ।' [ **वामन**, पृ. 3 ]; 'ओजःकान्तिमती····ओजश्च कान्तिश्च विद्येते यस्यां सा ओजःकान्तिमती ।' [ तत्रैव, पृ. 5 ]; 'कवित्वबीजं····कवित्वस्य बीजं' [ तत्रैव, पृ. 11 ]; 'लोकसंवीतं····लोकेन संवीतं ।' [ तत्रैव, पृ. 18 ] इत्यादी

( ii ) 'शब्दाह्वयं' [ **काव्यलक्षणम्**, पृ. 3 ]='शब्द इत्याह्वयो यस्येति विग्रहे ।' [ **रत्नश्री**, तत्रैव ], 'छन्दोविचित्यां=छन्दो [ छन्दांसि ] विचीयन्ते यया वा तस्याम् ।' [ तत्रैव, पृ. 8 ]. संस्कृत भाषा स्वभावतः समासप्रचुर असल्यामुळे ह्या उपायाची उदाहरणे सर्वत्र आढळतात.

## (5.15) विषय-सूचना

वाग्भटाच्या 'साधुशब्दार्थसन्दर्भं गुणालंकारभूषितं । स्फुटरीतिरसोपेतं काव्यं कुर्वीत कीर्तये ।' [ **वाग्भटालंकार**, पृ. 3 ] ह्या कारिकेवरील टीकेत सिंहदेवगणीने असे निदर्शनास आणले आहे की, वाग्भटाने 'साधुशब्दार्थ–' द्वारा शब्दार्थप्रतिपादक द्वितीय परिच्छेद, 'गुणालंकारभूषितं–' द्वारा तृतीय गुणपरिच्छेद तसेच चतुर्थ अलंकारपरिच्छेद व 'स्फुटरीतिरसोपेतं–' द्वारा चतुर्थपरिच्छेदान्तर्गत रीतिप्रतिपादन आणि पंचम रसपरिच्छेद सुचवले आहेत [ तत्रैव ]. ही पूर्वोक्त विधान तंत्रयुक्तीचीच [ परिच्छेद 33 ] एक वेगळी पद्धत आहे.

## (5.16) 'शरीर' कल्पना

काव्य हे काव्यपुरुषाचे किंवा एखाद्या युवतीचे शरीर आहे ही 'कल्पना' भामहापासून जगन्नाथापर्यंत सर्वांनीच केली असून त्या शरीराचे विविध अवयव, शरीरावर धारण करावयाचे अलंकार, शरीरात राहणारा आत्मा इत्यादींचे तपशीलवार वर्णन केले आहे.

उदाहरणार्थ, राजशेखर काव्यपुरुषाला श्लाघनीय संबोधून त्याचे आनखशिख वर्णन पुढील शब्दांत करतो: 'शब्दार्थौ ते शरीरं, संस्कृतं मुखं, प्राकृतं बाहुः, जघनमपभ्रंशः, पैशाचं पादौ, उरो मिश्रम् । समः प्रसन्नो मधुर उदार ओजस्वी चासि । उक्तिचणं ते वचः, रस आत्मा, रोमाणि छन्दांसि, प्रश्नोत्तरप्रवह्लिकादिकं च वाक्केलिः, अनुप्रासोपमादयश्च त्वामलङ्कुर्वन्ति ।' [ **काव्यमीमांसा,** पृ. 6 ]. 'काव्यस्य शब्दार्थौ शरीरं, रसादिश्चात्मा, गुणाः शौर्यादिवत्, दोषाः काणत्वादिवत्, रीतयोऽवयवसंस्थानविशेषवत्, अलंकाराः कटककुण्डलादिवत्…।' [ **साहित्यदर्पणम्,** पृ. 11 ] इत्यादी विश्वनाथकृत वर्णन सर्वप्रसिद्ध व सर्वपरिचित आहे.

## (5.17) शास्त्रीय ग्रन्थांचे प्रकार

राजशेखराने शास्त्रीय ग्रन्थांचे स्वरूपनिष्ठ प्रकार खालीलप्रमाणे वर्णिले आहेत : 'सूत्राणां सकलसारविवरणं वृत्तिः । सूत्रवृत्तिविवेचनं पद्धतिः । आक्षिप्य भाषणाद् भाष्यम् । अन्तर्भाष्यं समीक्षा । अवान्तरार्थविच्छेदश्च सा । यथासम्भवमर्थस्य टीकनं टीका । विषमपदभञ्जिका पञ्जिका । अर्थप्रदर्शनकारिका कारिका । उक्तानुक्तदुरुक्तचिन्ता वार्तिकमिति शास्त्रभेदाः ।' [ **काव्यमीमांसा,** पृ. 5 ].

अर्थात, सूत्र हा शास्त्रग्रंथांचा पहिला प्रकार. सूत्रे सामान्यपणे गद्यातच असत. पण क्वचित ती पद्यातही रचलेली असत [ पाहा : P. V. Kane, *History of Sanskrit Poetics*, Third revised edition, Delhi, Motilal Banarasidass, 1961, p 310 ].

सूत्रातील आशयाच्या समग्र विवरणाला वृत्ती म्हणतात. सूत्र व त्यावरील वृत्ती अशा प्रकारच्या विवेचनाला पद्धती म्हणतात. सूत्रातील प्रत्येक शब्दाच्या सटीक व साक्षेप विवरणाला भाष्य म्हणतात. भाष्यात सूक्ष्म विचाराचा अन्तर्भाव असतो. त्यात अप्रधान वा आनुषंगिक विषयांशाचा परामर्श घेतलेला असतो. मूळ ग्रंथाच्या अर्थाचे स्पष्टीकरण करणारी ती टीका. कठिण शब्द फोडून त्यांचा अर्थ सांगणारी ती पंजिका. ( व्यापक शास्त्रीय ) अर्थ ( संक्षिप्तपणे ) प्रदर्शित करणारी ( स्मृतिसुलभ पद्यरचना म्हणजे ) कारिका. प्रत्यक्षपणे सांगितलेल्या व अप्रत्यक्षपणे सुचवलेल्या अर्थाच्या प्रतिपादनास वार्तिक म्हणतात. हे शास्त्रप्रकार होत.

## (5.18) अवान्तर उपाय

वर सोदाहरण वर्णिलेल्या उपायांखेरीज ग्रंथाची प्रश्नोत्तरात्मक रचना करणे,

पाठभेद सुचवणे, शास्त्रकारांच्या संप्रदायांचा 'इति औद्भटाः', 'इति वामनीयाः', 'इति नव्याः' इत्यादी शब्दांत उल्लेख करणे, एखाद्या शास्त्रीय संकल्पनेच्या स्पष्टीकरणासाठी स्वतः अनुरूप पद्य रचून ते दाखल करणे, हस्तलिखितातील नोंदींची पद्धत समजावून सांगणे असे काही अवान्तर उपायही प्राचीन शास्त्रकारांनी अवलंबलेले आढळतात.

येथवर शास्त्रीय ग्रन्थरचनेच्या सर्व गौण उपायांची चर्चा केली. आता वस्तुतः मागील निबंधाच्या अखेरीस म्हटल्याप्रमाणे ह्या समग्र चर्चेमधून निघणाऱ्या निष्कर्षांची नोंद करावयास हवी. परंतु तसे करण्यापूर्वी एका महत्त्वाच्या मुद्याचा स्वतंत्रपणे उल्लेख आवर्जून करावयास हवा. तोच प्रथमतः करू.

## (6) शोधात्मकता

भामहप्रभृती सर्वच शास्त्रकारांनी आपापल्या ग्रंथांसाठी निवडलेल्या विषयांसंबंधी स्वपूर्वकाळात कोणी, कोणते व कसे ग्रंथ लिहिले होते, ते शोधून काढून त्यांचे बारकाइने वाचन केले होते. त्या ग्रन्थांतील प्रतिपाद्य विषय, त्याचे स्वरूप, त्याचा व्यापविस्तार, त्यातील गुणदोष इत्यादी सारे उत्तम प्रकारे समजून घेऊन मग आपापल्या ग्रंथांचे विषय निश्चित केले होते. ह्यावरून संशोधकाच्या ठिकाणी आवश्यक असलेली शोधबुद्धी किंवा संशोधनप्रवृत्ती त्यांच्या ठायी होती, असे निश्चितपणे म्हणता येते.

एकदा ग्रंथाच्या विषयाची निश्चिती केल्यानंतर प्राचीन ग्रंथकारांनी त्या विषयाचे प्रत्ययोत्पादक प्रतिपादन व्हावे ह्यासाठी अविश्रांत परिश्रम घेतले होते. त्यांनी ग्रंथलेखनाची, मागील तीन निबंधांत विस्ताराने निरूपिलेली, पद्धती प्रथमतः अभ्यासून आत्मसात केली; समर्पक उदाहरणे देता यावीत ह्यासाठी शेकडो लक्ष्यग्रंथ (=कथा, आख्यायिका, महाकाव्ये इत्यादी ललित साहित्यकृती ) सावधपणे व सूक्ष्मपणे वाचले; त्यांतून उदाहरणपद्ये निवडून काढली; स्वतःचे विषयविवेचन साधार व विश्वसनीय व्हावे ह्यासाठी, व्याकरणादी संबद्ध शास्त्रांचा कसून अभ्यास केला; कोणत्या संकल्पनांचे / मतमतांतरांचे खंडन करावयाचे व कोणत्यांचे मंडन करावयाचे त्याचा मनाशी निश्चय केला आणि स्वतःच्या ग्रंथांसाठी निवडलेल्या विषयांचे भाग-विभाग, त्यांचा उल्लेख-क्रम, वर्णन-क्रम, इत्यादी संपूर्ण आराखडे पक्के करून मगच प्रत्यक्ष ग्रंथलेखनास सुरुवात केली. ह्यावरून संशोधकाच्या अंगी आवश्यक असणारी शोधनिष्ठाही भामहादींच्या ठायी प्रखर स्वरूपात होती, असे म्हणता येते.

प्रत्यक्ष लेखनात भामहादींनी शास्त्रग्रंथाची उपरिवर्णित पद्धती किंवा शिस्त अगदी काटेकोरपणे पाळली. त्या पद्धतीत उपदेशिलेल्या सर्व उपायांचा, आडाख्यांचा व शब्दांच्या औपचारिक प्रयोगांचा अचूकपणे व प्रभुत्वाने उपयोग करून त्यांनी आपापल्या ग्रन्थांना विद्वन्मान्यता व संदर्भग्रन्थांची योग्यता मिळवून दिली.

प्राचीन काव्यशास्त्रीय ग्रन्थांपैकी रुद्रटाचा काव्यालंकार, राजशेखरकृत काव्य-मीमांसा, मम्मटप्रणीत काव्यप्रकाश, जगन्नाथरचित रसगंगाधर इत्यादी ग्रंथांना आजच्या परिभाषेनुसार treatises म्हणता येईल; रुद्रभट्टकृत शृङ्गारतिलक, धनंजयकृत दशरूपक, महिमभट्टरचित व्यक्तिविवेक, इत्यादींना monographs म्हणून संबोधता येईल; क्षेमेन्द्राच्या औचित्यविचारचर्चेचे dissertation असे नाम-करण करता येईल; तर भामहरचित काव्यालंकार, वामनकृत काव्यालंकारसूत्राणि, आनन्दवर्धनांचा ध्वन्यालोक आणि कुन्तकविरचित वक्रोक्तिजीवित ह्यांपैकी प्रत्येकाचे thesis असे सार्थ वर्णन करता येईल. [ वरील इंग्रजी शब्दांचे अर्थग्रहण Webster's New Collegiate Dictionary अनुसार केले आहे ].

**(7) निष्कर्ष**

( i ) प्राचीन भारतीय क्रियावान पंडितांनी निरनिराळ्या ज्ञानशाखांवर प्रौढ-गंभीर तत्त्वचर्चात्मक ग्रंथ तर लिहिले होतेच, पण अशा शास्त्रीय ग्रंथांच्या अथवा संशोधनात्मक प्रबंधांच्या रचनेची व निरूपणाची वैज्ञानिक पद्धतीही सिद्ध केली होती.

( ii ) एतद्विषयक चिन्तनास इसवी सनपूर्व पाचव्या शतकाच्या आसपास सुरुवात झाली होती आणि ह्या चिंतनावर आधारित तांत्रिक ग्रंथांची निर्मिती इसवी सनाच्या दहाव्या शतकापर्यंत अव्याहतपणे होत राहिली.

( iii ) ह्या ग्रंथनिर्मिति-प्रक्रियेत चरक, सुश्रुत, वाग्भट, नीलमेघ व त्याचा अज्ञातनाम शिष्य हे वैद्यकीय व्यावसायिक, कौटिल्यासारखा अर्थशास्त्रज्ञ व विष्णु-धर्मोत्तरपुराणाचा संकलनकर्ता ह्यांनी मूलभूत स्वरूपाचे कार्य केले. ह्यांना चक्रपाणि-दत्त, डल्हण, इन्दू व अरुणदत्त ह्या व्याख्याकारांनी समर्थपणे व वाखाणण्याजोगे साहाय्य केले.

( iv ) वरील विचारवंतांनी सिद्ध केलेल्या शास्त्रीय-ग्रंथ-पद्धतीच्या किंवा प्रबंध-शिस्तीच्या किमान पाच परंपरा होत्या.

( v ) सदरहू पद्धतीत एकूणचाळीस संज्ञांनी ओळखल्या जाणाऱ्या छत्तीस तंत्र-युक्त्या, त्यांच्या सुमारे पावणेदोनशे वेगवेगळ्या छटा, पंधरा व्याख्या, सात कल्पना, वीस आश्रय, सतरा ताच्छील्ये, एकोणीस शास्त्रगुण, पंधरा शास्त्रदोष व कमीतकमी अठरा संकीर्ण उपाय एवढ्या साधनांचा अन्तर्भाव झाला होता.

( vi ) ह्या साधनांच्या योगे शास्त्रीय ग्रंथाच्या किंवा शोधप्रबंधाच्या बाह्य व आन्तरिक, व्यक्त व सूचित, रचनानिष्ठ व सैद्धान्तिक, भाषासंबद्ध व तत्त्वनिर्णयात्मक अशा सर्वच बाजूंचा परामर्श घेण्यात आला होता.

( vii ) परिणामी, ह्या साधनांचे अध्ययनपूर्वक अवलंबन करणाऱ्या ग्रंथकाराला आपला ग्रन्थ परिपूर्ण, प्रमादरहित, आखीवरेखीव, शिस्तबद्ध, अर्थतत्त्वनिर्णायक व विद्वद्ग्राह्य बनवता येत असे. काव्यशास्त्रावरील ग्रंथकर्त्यांनी आपापले ग्रंथ रचताना,

वर वर्णिलेल्या, सूक्ष्म, सर्वांगस्पर्शी, निर्दोष, व वस्तुनिष्ठ शिस्तीचा प्रत्यक्षात अवलंब केलेला होता. तसाच अवलंब इतर शास्त्रांवर ग्रन्थरचना करणारे शास्त्रकारही करीत असत.

( viii ) म्हणूनच प्राचीन शोधवजा शास्त्रीय ग्रंथांच्या अध्ययन, आकलन, अध्यापन, विवेचन, समीक्षण व मूल्यांकन ह्या बौद्धिक कार्यांसाठी उपर्युक्त पद्धतीचे ज्ञान अत्यन्त आवश्यक ( sine qua non ) आहे.

( ix ) सदरहू Ancient Indian Research Methodologyची Modern Methodology शी तुलना करणे उद्बोधक व उपकारक ठरेल.

●

# लेखकाची प्रमुख पुस्तके

1. **कविकण्ठाभरण** मराठी व हिन्दी संस्करणे
2. औचित्यसिद्धान्त आणि **औचित्य-विचारचर्चा**
3. **भारतीय काव्यशास्त्राची उत्क्रान्ति :** प्रथम युग
4. **मुक्तेश्वरकृत स्फुटकाव्ये**
5. **काव्य, शास्त्र व संस्कृति**
6. **विचार और विवेचन** ( हिन्दी )
7. **गजेन्द्रमोक्ष**
8. ***The Doctrine of the Tantrayuktis***
9. **काव्यसूत्रसंहिता**
10. **ललितलेखन व शैली** [ पाश्चात्त्य शैलीशास्त्राची मूलतत्त्वे ]
11. **ज्ञानेश्वरीचा शास्त्रीय अभ्यास**
12. **वाग्विलास**

# भाषा, साहित्य व शास्त्र

## : काही विचार

गद्यपद्यात्मक ललित साहित्याच्या भाषेची व्यावहारिक व व्याकरणिक भाषेहून पृथगात्मता, साहित्यिक भाषेच्या अर्थनिर्णयाची साधने, ललित साहित्याच्या निर्मितीला व विश्लेषणात्मक अध्ययनाला परिवर्तित वाक्यसर्जक व्याकरणाची उपयुक्तता, संस्कृत-प्राकृतादी साहित्याची व्यापकता, संस्कृत साहित्यशास्त्राची अखिल - भारतीयता, साहित्यकृतीच्या सिद्धीची प्रक्रिया, साहित्यातील उसनवारी, संशोधनात्मक प्रबंधलेखनाची प्राचीन भारतीय पद्धती इत्यादी विषयांची साधार, सोदाहरण व अभ्यासपूर्ण चर्चा करणाऱ्या आठ शोध-निबंधांचा संग्रह.

मराठी, संस्कृत व हिन्दी विषयांच्या एम ए.व एम्. फिल्. च्या विद्यार्थ्यांना तसेच पीएच् डी च्या संशोधक-विद्यार्थ्यांना अत्युपयुक्त ग्रन्थ.